# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र

**सत्र–३ Major - III**

## आधुनिक महाराष्ट्राची निर्मिती (१८४८–१९६०)

**(Making of Modern Maharashtra (1848-1960)**

**सत्र–४ Major - V**

## आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास (१९६०–२०१०)

**(History of Modern Maharashtra (1960-2010)**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार सुधारित अभ्यासक्रम
शैक्षणिक वर्ष २०२५–२०२६ पासून

**बी.ए. भाग–२ इतिहास**

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)
**प्रथमावृत्ती :** २०२५
बी. ए. भाग – २ इतिहास करिता
सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

**प्रती :** ३००

■

**प्रकाशक :**
**डॉ. व्ही. एन. शिंदे**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर – ४१६ ००४.

■

**मुद्रक :**
**श्री. बी. पी. पाटील**
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर–४१६ ००४.

■

ISBN - 978-93-49570-29-0

★ दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर–४१६ ००४ (भारत)

# दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र
# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## सल्लागार समिती


**प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के**
कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) पी. एस. पाटील**
प्र-कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) प्रकाश पवार**
राज्यशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एस. विद्याशंकर**
कुलगुरू, केएसओयू,
मुक्तगंगोत्री, म्हैसूर, कर्नाटक-५७० ००६

**डॉ. राजेंद्र कांकरिया**
जी-२/१२१, इंदिरा पार्क,
चिंचवडगांव, पुणे-४११ ०३३

**प्रा. (डॉ.) सीमा येवले**
गीत-गोविंद, फ्लॅट नं. २,
११३९ साईक्स एक्स्टेंशन,
कोल्हापूर-४१६००१

**डॉ. संजय रत्नपारखी**
डी-१६, शिक्षक वसाहत, विद्यानगरी, मुंबई विद्यापीठ,
सांताक्रुझ (पु.) मुंबई-४०० ०९८

**प्रा. (डॉ.) कविता ओझा**
संगणकशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) चेतन आवटी**
तंत्रज्ञान अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एस. एस. महाजन**
अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. एस. देशमुख**
अधिष्ठाता, मानव्य विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) श्रीमती एस. एच. ठकार**
प्रभारी अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्या (डॉ.) श्रीमती एम. व्ही. गुळवणी**
प्रभारी अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. व्ही. एन. शिंदे**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. ए. एन. जाधव**
संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्रीमती सुहासिनी सरदार पाटील**
वित्त व लेखा अधिकारी,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. के. बी. पाटील** (सदस्य सचिव)
प्र. संचालक, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

### अभ्यासमंडळ : इतिहास

**अध्यक्ष – डॉ. चंद्रवदन मोहनराव नाईक**
देवचंद कॉलेज, अर्जुननगर, ता. कागल, जि. कोल्हापूर

- **डॉ. अवनिश आर. पाटील**
  इतिहास अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

- **डॉ. अभयकुमार जगन्नाथ पाटील**
  सद्गुरू गाडगे महाराज कॉलेज, कराड,
  ता. कराड, जि. सातारा

- **डॉ. श्रीमती आरती बळवंत नाडगौडा**
  देवचंद कॉलेज, अर्जुननगर, ता. कागल, जि. कोल्हापूर

- **डॉ. श्रीमती कविता अशोक गगराणी**
  द न्यू कॉलेज, कोल्हापूर

- **डॉ. श्रीमती उर्मिला एन. क्षिरसागर**
  मथुबाई गरवारे कन्या महाविद्यालय, सांगली

- **डॉ. जयपाल चंद्रकांत सावंत**
  शंकरराव जगताप आर्टस कॉलेज, वाघोली, ता. सातारा

- **डॉ. संभाजी आनंदा मोरे**
  एम. एच. शिंदे महाविद्यालय, तिसंगी, ता. गगनबावडा,
  जि. कोल्हापूर

- **डॉ. प्रमोदकुमार अंकुश ओलेकर**
  आर्टस अॅण्ड कॉमर्स कॉलेज, आष्टा, ता. वाळवा,
  जि. सांगली

- **डॉ. चंद्रकांत संदिपान चव्हाण**
  इतिहास अधिविभाग, वालचंद कॉलेज ऑफ आर्टस अॅण्ड सायन्स, अशोक चौक, सोलापूर

- **डॉ. तेजस मदन घारगे**
  डायरेक्टोरेट ऑफ आर्किओलॉजी अॅण्ड म्युझियम, संत गोर्गे फोर्ट, संत गोर्गे हॉस्पिटल प्रिमाईसेस, फोर्ट, मुंबई

- **डॉ. नंदा पारेकर**
  एव्हरग्रीन होम, टॉवर डी, फेज ४, फ्लॅट नं. २०८,
  राजहंस प्रिंटींग प्रेस समोर, प्रभू हॉस्पिटल रोड,
  नागाळा पार्क, कोल्हापूर

- **डॉ. निरंजन कुलकर्णी**
  इतिहास अधिविभाग, मा. श्री. आण्णासाहेब डांगे, आर्टस्,
  कॉमर्स अॅण्ड सायन्स कॉलेज, हातकणंगले, जि. कोल्हापूर

- **श्री. सदानंद कदम**
  शिवराज, १०८२, दक्षिण वसंत नगर, छत्रपती शिवाजीराजे मार्ग, सांगली

# प्रस्तावना

शैक्षणिक वर्ष २००७ पासून शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्या वतीने दूरशिक्षण केंद्रामार्फत बहिस्थ विद्यार्थ्यांना दूरशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येत आहे. तसेच यंदाच्या वर्षापासून म्हणजे २०२५-२६ पासून राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार सुधारीत अभ्यासक्रम राबविण्यात येत आहे. त्या अनुषंगाने बी. ए. भाग २ इतिहास या वर्गाच्या विद्यार्थ्यांसाठी 'आधुनिक महाराष्ट्राची निर्मिती (१८४८-१९६०)' या विषयाचे सत्र-३ तसेच 'आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास (१९६०-२०१०)' हे सत्र-४ साठीचे स्वयं अध्ययनाचे हे स्वयंअध्ययन साहित्य सन २०२५-२६ या वर्षात तयार केलेले आहे. सदर स्वयं अध्ययन साहित्य लेखनासाठी शिवाजी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील पदवी व पदव्युत्तर विभागात अध्ययन करणाऱ्या अनुभवी आणि तज्ज्ञ लेखकांकडून या विषयाच्या अभ्यासक्रमानुसार असलेल्या विविध घटकांचे लेखन करून घेण्यात आले आहे. या पुस्तकातील विविध घटक घटक लिहिताना साधी व सोपी भाषा, संकल्पनात्मक स्पष्टता इत्यादींचा वापर केलेला आहे. वाचक व विद्यार्थ्यांना समजेल अशी विषयाची सोपी व सुटसुटीत मांडणी करण्यात आलेली आहे. प्रत्येक घटकाच्या शेवटी स्वयंअध्ययन प्रश्न आणि त्यांची उत्तरे दिली आहेत. तसेच घटकाच्या शेवटी सरावासाठी स्वाध्याय, पारिभाषिक शब्द, शब्दार्थ व अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथांची सूची दिलेली आहे.

'आधुनिक महाराष्ट्राची निर्मिती (१८४८-१९६०)' 'आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास (१९६०-२०१०)' या स्वयं अध्ययन साहित्यामध्ये **सामाजिक सुधारणा चळवळी, प्रजापक्षीय चळवळ विशेष संदर्भ दक्षिणेकडील संस्थाने, संयुक्त महाराष्ट्र चळवळ, यशवंतराव चव्हाण यांचे कार्य व सहकारी चळवळ, पश्चिम महाराष्ट्रातील शैक्षणिक विकास, सामाजिक चळवळी, आधुनिक महाराष्ट्र : आव्हाने** इ. घटकांचा समावेश करण्यात आलेला आहे.

शिवाजी विद्यापीठ दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र अंतर्गत स्वयं अध्ययन साहित्य निर्मितीसाठी मा. कुलगुरू, प्र. कुलगुरू, कुलसचिव यांचे प्रोत्साहन व मार्गदर्शन मोलाचे ठरले. दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राचे संचालक, उपकुलसचिव यांचे सहकार्य लाभले. सदर पुस्तक पूर्ण करण्यासाठी घटक लेखकांनी तसेच पुस्तक प्रकाशनासाठी शिवाजी विद्यापीठाचे प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. या सर्वांच्या मार्गदर्शनाबद्दल व सहकार्याबद्दूल मन:पूर्वक आभार!

**■ संपादक ■**

**प्रा. (डॉ.) तानाजी हवालदार**
विश्वासराव नाईक आर्टस्, कॉमर्स ॲण्ड
बाबा नाईक सायन्स महाविद्यालय, शिराळा,
ता. शिराळा, जि. सांगली

**प्रा. (डॉ.) चंद्रवदन नाईक**
देवचंद कॉलेज, अर्जुननगर,
ता. कागल, जि. कोल्हापूर

दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर

**'आधुनिक महाराष्ट्राची निर्मिती (१८४८–१९६०)'**
**'आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास (१९६०–२०१०)'**
**बी. ए. भाग –२, सत्र – ३ व ४**

## अभ्यास घटकांचे लेखक

| लेखकांचे नाव | घटक क्रमांक | |
|---|---|---|
| | सत्र ३ | सत्र ४ |
| **डॉ. जनार्दन जाधव,**<br>एम. एच. शिंदे महाविद्यालय तिसंगी,<br>ता. गगनबावडा, जि. कोल्हापूर | १ | – |
| **डॉ. रणजित माने,**<br>डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय,<br>पेठवडगाव, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर | २ | – |
| **डॉ. तानाजी हवालदार,**<br>विश्वासराव नाईक आर्टस्, कॉमर्स ॲण्ड बाबा नाईक सायन्स महाविद्यालय, शिराळा, ता. शिराळा, जि. सांगली | ३ | – |
| **प्राचार्या (डॉ.) स्वाती सरोदे,**<br>वेणुताई चव्हाण कॉलेज, कराड, ता. कराड, जि. सातारा | ४ | – |
| **डॉ. बाळासाहेब कोटलगी,**<br>नेमगौडा दादा पाटील नाईट कॉलेज ऑफ आर्टस् ॲण्ड कॉमर्स, सांगली, जि. सांगली | – | १ |
| **डॉ. संतोष जेठिथोर**<br>डी. आर. माने महाविद्यालय, कागल, ता. कागल, जि. कोल्हापूर | – | २ |
| **डॉ. सतिश चौगुले,**<br>क्रांतीसिंह नाना पाटील कॉलेज, वाळवा, ता. वाळवा, जि. सांगली | – | ३ |
| **डॉ. ऋषीकेश दळवी,**<br>राजाराम महाविद्यालय, कोल्हापूर, जि. कोल्हापूर | – | ४ |

■ **संपादक** ■

**प्रा. (डॉ.) तानाजी हवालदार**
विश्वासराव नाईक आर्टस्, कॉमर्स ॲण्ड
बाबा नाईक सायन्स महाविद्यालय, शिराळा,
ता. शिराळा, जि. सांगली

**प्रा. (डॉ.) चंद्रवदन नाईक**
देवचंद कॉलेज, अर्जुननगर,
ता. कागल, जि. कोल्हापूर

# अनुक्रमणिका


| घटक क्रमांक | घटकाचे शीर्षक | पान क्रमांक |
|---|---|---|
| | **सत्र–३ : आधुनिक महाराष्ट्राची निर्मिती (१८४८–१९६०)** | |
| १. | सामाजिक सुधारणा चळवळी | १ |
| २. | प्रजापक्षीय चळवळ विशेष संदर्भ दक्षिणेकडील संस्थाने | २९ |
| ३. | संयुक्त महाराष्ट्र चळवळ | ६० |
| ४. | यशवंतराव चव्हाण यांचे कार्य | ८३ |
| | **सत्र–४ : आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास (१९६०–२०१०)** | |
| १. | सहकारी चळवळ | ११० |
| २. | पश्चिम महाराष्ट्रातील शैक्षणिक विकास | १४२ |
| ३. | सामाजिक चळवळी | १८९ |
| ४. | आधुनिक महाराष्ट्र : आव्हाने | २१९ |

■ **विद्यार्थ्यांना सूचना :**

प्रत्येक घटकाची सुरुवात उद्दिष्टांनी होईल. उद्दिष्टे दिशादर्शक आणि पुढील बाबी स्पष्ट करणारी असतील.

१. घटकामध्ये काय दिलेले आहे.

२. तुमच्याकडून काय अपेक्षित आहे.

३. विशिष्ट घटकावरील कार्य पूर्ण केल्यानंतर तुम्हाला काय माहीत होण्याची अपेक्षा आहे.

स्वयं मूल्यमापनासाठी प्रश्न दिलेले असून त्यांची अपेक्षित उत्तरेही देण्यात आलेली आहेत. त्यामुळे घटकाचा अभ्यास योग्य दिशेने होईल. तुमची उत्तरे लिहून झाल्यानंतरच स्वयं अध्ययन साहित्यामध्ये दिलेली उत्तरे पाहा. ही तुमची उत्तरे (किंवा स्वाध्याय) आमच्याकडे मूल्यमापनासाठी पाठवायची नाहीत. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास करावा, यासाठी ही उत्तरे 'अभ्यास साधन' (डीएसएच) म्हणून उपयुक्त ठरतील.

प्रिय विद्यार्थी,

हे स्वयंअध्ययन साहित्य या पेपरसाठी एक पूरक अभ्याससाहित्य म्हणून आहे. असे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी २०२५-२६ पासून तयार केलेला नवीन अभ्यासक्रम पाहून त्याप्रमाणे या पेपरच्या सखोल अभ्यासासाठी संदर्भपुस्तके व इतर साहित्याचा अभ्यास करावा.

घटक १

# सामाजिक सुधारणा चळवळी

## (Social Reforms Movements)

अनुक्रमणिका


१.० उद्दिष्टे

१.१ प्रास्ताविक

१.२ विषय विवेचन

१.२.१ महात्मा ज्योतिराव फुले

१.२.२ राजर्षी छत्रपती शाहू महाराज

१.२.३ डॉ. बाबासाहेब आंबेडकर

१.३ सारांश

१.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

१.५ स्वयं अध्ययन प्रश्न व उत्तरे

१.६ सरावासाठी स्वाध्याय

१.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

## १.० उद्दिष्टे :

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला,

१) सामाजिक सुधारणा चळवळीची पार्श्वभूमी समजून येईल.

२) मूलभूत सामाजिक परिवर्तनामधील महात्मा फुले यांचे कार्य आणि विचार समजावून घेता येतील.

३) महात्मा फुले यांचे शैक्षणिक आणि सामाजिक कार्य समजावून घेता येईल.

४) राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांनी मागासवर्गीय व स्त्रियांच्या उन्नतीसाठी केलेल्या उपाययोजनाची माहिती होईल.

५) राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या शैक्षणिक कार्याची माहिती विद्यार्थ्यांना होईल.

६) भारतातील जातीव्यवस्था आणि अस्पृश्यता नष्ट करण्यामधील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य समजून घेता येईल.

७) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय संविधानात सामाजिक न्याय आणि समता या मूल्यांना कसे मूर्त स्वरूप दिले आहे हे समजावून घेता येईल.

## १.१ प्रास्ताविक :

आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासामध्ये फुले, शाहू, आंबेडकर हे नाव नसून ती एक विचारधारा आहे. ज्या विचारधाराने संपूर्ण देशामध्ये सामाजिक परिवर्तनाची चळवळ उभी करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले. ज्यामुळे भारतीय स्वातंत्र्य चळवळीची खऱ्या अर्थाने पार्श्वभूमी तयार झाली. १९ व्या शतकाच्या सुरुवातीस समाजपरिवर्तनाच्या अनेक चळवळी निर्माण झाल्या. विशेषतः राजाराम मोहन रॉय, स्वामी दयानंद सरस्वती, स्वामी विवेकानंद, लोकहितवादी, आगरकर, स्वामी श्रद्धानंद अशा कितीतरी समाजसुधारकांनी सुधारणावादी चळवळी सुरू करून हिंदू धर्मातील अनिष्ट प्रथा आणि परंपरा दूर करून हिंदू धर्माला शुद्ध स्वरूप प्राप्त करून देण्याचा प्रयत्न केला. पण हे करत असताना त्यांनी कधीही हिंदू धर्माच्या प्रमुख मूल्यांना विरोध केला नाही. त्यामुळे त्यांचे प्रयत्न एका विशिष्ट कक्षेत मर्यादित राहिले. याउलट महात्मा ज्योतिराव फुले यांनी सुरू केलेली मूलभूत सामाजिक परिवर्तनाची चळवळ ही खऱ्या अर्थाने क्रांतिकारक ठरली. त्यांनी हिंदू धर्मातील प्रमुख मूल्यांनाच विरोध करण्याचे धाडस दाखवले. अस्पृश्य, शेतकरी, स्त्रिया यांच्या दुःख आणि दारिद्र्यामागील कारणांची मिमांसा करून त्या दृष्टीने कार्य केले. तसेच सत्यशोधक समाजाच्या माध्यमातून सामाजिक न्याय आणि समाज परिवर्तनाची चळवळ अखंडपणे सुरू ठेवली. पुढील काळात छत्रपती शाहू महाराज यांनी आपल्या राजकीय सत्तेचा वापर सर्वसामान्य रयतेसाठी केला. त्यांनी बहुजनांची सामाजिक, धार्मिक आणि शैक्षणिक परिवर्तनाची चळवळ गतिमान केली. त्यांनी गरीब विद्यार्थ्यांच्यासाठी वस्तीगृहांची स्थापना केली. तसेच अस्पृश्य आणि महिलांच्यासाठी विशेष कायदे केले. शेतकऱ्यांच्यासाठी राधानगरी धरणाची पायाभरणी केली. विसाव्या शतकात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सामाजिक सुधारणा चळवळ अधिक गतिमान केली. भारतीय संविधानाच्या माध्यमातून त्यांनी या देशात लोकशाही प्रस्थापित करून सर्वांना कायद्याने एका समान पातळीवर आणले.

डॉ. आंबेडकरांनी अस्पृश्य समाजाची सामाजिक आणि धार्मिक गुलामगिरीतून सुटका करण्यासाठी शिक्षण प्रसारावर भर दिला. अस्पृश्यांना संघटित करून 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' असा मंत्र दिला. सामाजिक समतेसाठी त्यांनी महाड चवदार तळे सत्याग्रह, नाशिक काळाराम मंदिर प्रवेश चळवळ आणि भारतीय स्वातंत्र्यानंतर भारतीय घटनेचा मसुदा तयार करण्याचे महान कार्य केले. त्यांनी संविधानाच्या माध्यमातून सामाजिक समतेचे आणि न्यायाचे तत्व या देशांमध्ये कायद्याने प्रस्थापित केले. म्हणून खऱ्या अर्थाने ते भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार ठरले.

## १.२ विषय विवेचन :

१९ व्या शतकाच्या प्रारंभी महाराष्ट्रात अनेक सामाजिक सुधारणा चळवळी निर्माण झाल्या. यामध्ये विशेषत: महात्मा ज्योतिराव फुले यांनी सुरू केलेली समाज प्रबोधनाची चळवळ महत्वपूर्ण मानली जाते. त्यांनी तत्कालीन सामाजिक विषमतेविरुद्ध अखंडपणे संघर्ष केला. ज्योतिराव फुले हे कर्ते समाजसुधारक होते. त्यांनी सामाजिक समता आणि सामाजिक न्यायासाठी बहुजन हिताय, बहुजन सुखायचा लढा उभारला. अस्पृश्य, शेतकरी, स्त्रिया यांच्या दु:ख आणि दारिद्र्यामागील कारणांचा शोध घेतला. त्यांच्या या परिस्थितीला कारणीभूत असणारे त्यांचे अज्ञान दूर करण्यासाठी शिक्षणाचे कार्य हाती घेतले. हे कार्य करत असताना प्रस्थापितांच्याकडून मोठ्या प्रमाणात विरोध झाला पण त्यांनी आपले कार्य थांबवले नाही. पुढील काळात छत्रपती शाहू महाराज यांनी आपल्या राजकीय सत्तेचा वापर सर्वसामान्य रयतेच्या कल्याणासाठी केला. शैक्षणिक आणि सामाजिक परिवर्तनासाठी त्यांनी विद्यार्थी वस्तीगृह चळवळ, ब्रह्मणेत्तर चळवळ तसेच अस्पृश्यांच्या उन्नतीचे कार्य हाती घेतले. आपल्या संस्थानात प्राथमिक शिक्षण सक्तीचे करून बहुजन समाजाच्या आरक्षणाची तरतूद केली. पुढे विसाव्या शतकात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सामाजिक सुधारणा चळवळ अधिक गतिमान करून महात्मा फुले, छत्रपती शाहू महाराज यांच्या कार्याला परिपूर्णता दिली. त्यांनी भारतीय संविधानाच्या माध्यमातून या देशात लोकशाहीची स्थापना करून कायद्याने सामाजिक समता निर्माण केली. अस्पृश्य समाजाची सामाजिक आणि धार्मिक गुलामगिरीतून सुटका करण्यासाठी पुढील काळात त्यांनी शैक्षणिक कार्य हाती घेतले.

वरील तिन्ही समाज सुधारक हे वेगवेगळ्या कालखंडामध्ये आणि वेगवेगळ्या जातीमध्ये जन्माला आले असले तरी विचाराने आणि कार्याने परस्परांचे वारसदार होते. सामजिक सुधारणा चळवळीत सर्वांची भूमिका ही व्यवस्था परिवर्तनाची होती. त्यासाठी ते आयुष्यभर कार्यरत राहिले. पुरोगामी महाराष्ट्राच्या जडणघडणीत महात्मा ज्योतिराव फुले, राजर्षी छत्रपती शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर या मानवतावादी समाजसुधारकांचे योगदान अतिशय मोठे आहे. त्यांच्या कार्याचा आढावा येथे घ्यावयाचा आहे.

### १.२.१ महात्मा ज्योतिराव फुले :

महात्मा ज्योतिराव फुले हे एक विचारवंत आणि क्रांतिकारक समाजसुधारक होते. त्यांनी 'सत्यशोधक समाज' नावाची संस्था स्थापन केली. शेतकरी आणि बहुजन समाज्याच्या समस्यांना केंद्रस्थानी ठेवून पुरोगामी विचारांची मांडणी केली. महाराष्ट्रात स्त्रीशिक्षणाची सुरुवात खऱ्या अर्थाने महात्मा फुलेंनी केली. त्यांच्या कार्याचा आढावा खालीलप्रमाणे –

### १.२.१.१ शैक्षणिक कार्य :

मानवी जीवनातील शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित करत असताना महात्मा फुले म्हणतात की,

''विद्येविना मती गेली। मतीविना नीती गेली।
नीतीविना गती गेली। गतीविना वित्त गेले।
वित्ताविना शूद्र खचले। इतके अनर्थ एका अविद्येने केले।।''

महात्मा फुले यांनी आपल्या सार्वजनिक कार्याची सुरुवात इसवी सन १८४८ मध्ये केली. तत्कालीन समाजातील अज्ञान, दारिद्र्य आणि जातीभेद पाहून त्यांनी सामाजिक परिस्थिती सुधारण्याचा निश्चय केला. बहुजन समाजाच्या या अधोगतीला त्यांचे अज्ञान जबाबदार आहे. मानवाच्या विकासासाठी शिक्षण हे प्रमुख साधन आहे असे त्यांचे मत होते. शिक्षणामुळे मनुष्यात स्वाभिमान निर्माण होतो. कारण शिक्षण हे सर्व सुधारणांचे मूळ आहे. यावर ज्योतिराव फुले यांचा विश्वास होता. विशेषतः 'जिच्या हाती पाळण्याची दोरी, ती जगाचे उद्धारी' म्हणून त्यांनी स्त्री शिक्षणाला प्राधान्य दिले. ज्योतिराव फुले यांनी स्त्री उद्धाराचे कार्य हाती घेतले होते. त्यासाठी फार मोठे कष्ट सहन केले. स्त्री ही भारतीय समाजाचे मूळ म्हणून ज्योतिराव फुले यांनी स्त्री शिक्षण, विधवा विवाह, बालहत्या प्रतिबंध गृह, केशवपण यासारख्या समस्यांच्या बाबतीतही भरीव कार्य केले.

**■ स्त्री शिक्षण :**

स्त्री शिक्षण म्हणजे पर्यायाने तिच्या मुलांचे शिक्षण, तिच्या कुटुंबाचे शिक्षण या विचाराने महात्मा फुलेंनी स्त्री शिक्षणाचा प्रारंभ केला. सन १८४८ साली पुण्यातील बुधवार पेठेत तात्यासाहेब भिडे यांच्या वाड्यात महाराष्ट्रातील मुलींची पहिली मराठी शाळा सुरू केली. पहिल्या दिवशी या शाळेमध्ये आठ मुली उपस्थित होत्या. ज्योतिराव फुले स्वतः शिक्षकाचे काम करत होते. या शाळेत मुलींना शिकवण्यासाठी स्त्री शिक्षिका मिळेना म्हणून त्यांनी आपली पत्नी सावित्रीबाई यांना प्रथम शिक्षण देऊन साक्षर केले. सावित्रीबाईंना अध्यापिका होण्याचे प्रशिक्षण देऊन पहिली स्त्री शिक्षिका व प्रशिक्षित मुख्याध्यापिका बनवले. ही गोष्ट समाजातील उच्चवर्णीय लोकांना आवडली नाही. त्यांनी सावित्रीबाई फुलेंना शाळेत येता-जाता त्रास देण्यास सुरुवात केली. त्यांच्या अंगावर चिखल फेकणे, घाण टाकणे, दगड मारणे त्यांना शिव्या, शाप देणे. अशा प्रकारे त्रास देण्यास सुरुवात केली. एवढेच नाही तर त्यांनी ज्योतिराव फुले यांच्या वडिलांच्यावर सामाजिक आणि धार्मिक बहिष्काराचे दडपण आणले. ज्याचा परिणाम म्हणजे फुले दांपत्याला स्वतःच्या राहत्या घरातून बाहेर पडावे लागले. असे असले तरी त्यांनी हाती घेतलेले शिक्षणाचे हे कार्य सोडले नाही. त्यांच्या या शिक्षण कार्यात सावित्रीबाई फुले यांनी अत्यंत धैर्याने त्यांना साथ दिली. परंतु ही पहिली शाळा फार दिवस चालली नाही. पण निराश न होता त्यांनी पुढे १८५१ मध्ये चिपळूणकरांच्या वाड्यात मुलींची दुसरी शाळा तर रास्ता पेठेत तिसरी शाळा स्थापन केली. त्यानंतर १८५३ मध्ये वेताळपेठेत भिडे यांच्या वाड्यात मुलींची आणखीन एक शाळा सुरू केली. ज्योतीरावांच्या या कार्यात त्यांच्या मित्रांनी तसेच युरोपियन लोकांनी सुरुवातीपासूनच सर्व प्रकारचे साहाय्य केले. सरकारने सुद्धा त्यांच्या कार्याला सहकार्य केले. त्यांच्या या कार्याबद्दल विश्रामबाग येथे त्यांचा भव्य सत्कार करण्यात आला. महात्मा ज्योतिराव फुले यांनी खऱ्या अर्थाने स्त्री शिक्षणाच्या चळवळीला एक वेगळी दिशा देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले.

■ **अस्पृश्यांचे शिक्षण :**

अस्पृश्यता नष्ट करण्याचे 'शिक्षण' हेच प्रभावी माध्यम आहे. म्हणून महात्मा फुले यांनी त्याचा प्रचार आणि प्रसार केला. अस्पृश्यांना त्यांच्या हक्कांची जाणीव व्हावी यासाठी त्यांना शिक्षण मिळवून देण्याचे महान कार्य ज्योतिरावांनी हाती घेतले. त्यांनी १९ मे, १८५२ रोजी वेताळपेठेत अस्पृश्यांसाठी भारतातील पहिली शाळा सुरू केली. या शाळेत शिक्षक म्हणून धुराजी चांभार व गणू शिवाजी मांग या दलित शिक्षकांची नेमणूक केली. या कार्यात त्यांना सदाशिव गोवंडे, सखाराम परांजपे, विठ्ठल वाळवेकर, वामन प्रभाकर भावे, विनायक भांडारकर यांनी मोलाचे सहकार्य केले. याशिवाय महात्मा फुले यांनी सप्टेंबर, '१८५३ मध्ये महार, मांग इत्यादी लोकास विद्या शिकवण्याकरता मंडळी' या नावाची संस्था स्थापन करून अस्पृश्य लोकांच्या शिक्षणाला गती दिली. त्यांच्या या कार्यात त्यांना युरोपियन व ऐतदेशीय शिक्षणप्रेमींनी सहकार्य केले. दक्षिण-प्राइज फंडातून काही आर्थिक सहाय्य त्यांना मिळाले. इसवी सन १८५८ पर्यंत या संस्थेच्या मार्फत पुण्यात तीन शाळा सुरू करण्यात आल्या होत्या. इतकेच नाही तर शाळेतील अस्पृश्य मुलांना पाणी पिण्याची अडचण निर्माण झाली, तेव्हा त्यांनी आपल्या राहत्या घरातील पाण्याचा हौद सर्वांच्यासाठी खुला केला. याबरोबरच इसवी सन १८५५ मध्ये प्रौढांसाठी देशातील पहिली 'रात्र शाळेची' स्थापना करून शिक्षणाचे कार्य अखंडपणे सुरू ठेवले.

### १.२.१.२ सामाजिक कार्य :

महात्मा ज्योतिराव फुले यांचे सामाजिक कार्य खालीलप्रमाणे-

**१) बालहत्या प्रतितिबंध गृहाची स्थापना :** महात्मा फुले यांच्या काळी बालविवाहाची प्रथा होती. तसेच साथीच्या रोगांचे प्रमाण सुद्धा या काळात खूप होते. त्यामुळे तरुण मुलींना अकाली वैधव्य प्राप्त होत असे. अशा तरुण विधवांना सक्तीचे वैधव्याचे जीवन जगावे लागे. या तरुण विधवा कोणातरी जवळच्या नातेवाईकांच्या वासनेस बळी पडत असत. त्यातून त्या गरोदर राहत असत. आपली समाजात बदनामी होईल म्हणून जन्मास आलेले मूल कुठेतरी फेकून देत. महात्मा ज्योतिराव फुले यांनी समाजातील हे विदारक चित्र पाहिले होते. अशा या सामाजिक आपत्तीतून विधवांची सुटका व्हावी, म्हणून ज्योतीरावांनी २८ जानेवारी, १८६३ रोजी पुणे येथील आपल्या राहत्या घरी भारतातील पहिले 'बालहत्या प्रतिबंधक गृहाची' स्थापना केली. इतकेच नाही तर त्यांनी आपल्या घराच्या दारावर पाठी लावली होती. त्यावर लिहिले होते की, 'विधवांनो येथे या, सुरक्षितपणे बाळंत व्हा, तुमचे मुल न्यावे किंवा ठेवावे हे तुमच्या खुशीवर अवलंबून आहे. त्या मुलाची काळजी हा आश्रम घेईल.' त्यांच्या या कार्यात लोकहितवादी, रा. भांडारकर, बाबा परमानंद, तुकाराम तात्या पडवळ यांचे मोलाचे सहकार्य लाभले. पुढे अशाच स्वरूपाच्या गृहाची स्थापना 'पंढरपूर' या ठिकाणी करण्यात आली. ज्योतिरावांना मूलबाळ नव्हते. तेव्हा त्यांनी पुणे येथील बालहत्या प्रतिबंधक गृहातील काशीबाई या विधवा महिलेच्या मुलास दत्तक घेतले. त्याचे नाव यशवंत असे ठेवले. पुढे हाच यशवंत डॉक्टर झाला.

**२) विधवा पुनर्विवाहास प्रोत्साहन :** १९ व्या शतकाच्या प्रारंभी समाजामध्ये बालविवाहाची प्रथा रूढ होती. विशेष करून ब्राह्मण समाजात विधवा स्त्रियांचे प्रमाण अधिक होते. या विधवा स्त्रियांचे हाल पाहून त्यांचे मन अस्वस्थ होई. अशा या स्त्रियांचे हाल थांबवून त्यांच्या जीवनाला चांगले वळण लागावे या हेतूने ज्योतिराव

फुले यांनी विधवा पुनर्विर्विवाहासाठी पुढाकार घेतला. त्यांनी १८६४ मध्ये पुण्यातील गोखलेंच्या बागेत पहिला विधवा पुनर्विवाह घडवून आणला. समकाळात ज्योतिराव फुले यांनी केलेले हे कार्य म्हणजे फार मोठे धाडस होते.

**३) केशवपन प्रथेस विरोध :** महात्मा फुले यांनी केशवपन प्रथा बंद करण्यासाठी मुंबई, पुणे येथील नाभिक बांधवांची सभा १८९० मध्ये घेतली. त्यांनी स्त्रियांच्यावर होणारा अन्याय, अत्याचार तसेच त्यांची होणारी विटंबना याबद्दल त्यांना माहिती दिली. या परिषदेसाठी ५०० नाभिक बांधव उपस्थित होते. फुले यांच्या आव्हानास प्रतिसाद देऊन नाभिक बांधवांनी स्त्रियांचे केस कापण्याचे काम बंद केले. भारताच्या इतिहासातील नाभिक बांधवांचा हा पहिला ऐतिहासिक संप होय.

**४) अनाथ बालिकाश्रम :** विधवांच्या प्रसुतीगृहाबरोबरच महात्मा फुले यांनी विक्टोरिया अनाथाश्रमाची स्थापना केली.

**५) दुष्काळी कॅम्प :** इसवी सन १८७७ साली पुण्यातील धनकवडी येथे दुष्काळ पीडित विद्यार्थ्यांच्यासाठी त्यांनी कॅम्प उभारला होता.

**६) अस्पृश्यांच्यासाठी पाण्याचा हौद खुला केला :** महात्मा फुले यांनी अस्पृश्यांची पाण्यासाठी चाललेली वणवण पाहता स्वतःच्या घरातील पिण्याच्या पाण्याचा हौद खुला करून दिला. त्यांची ही कृती त्या काळातील एक क्रांतिकारक घटना मानली जाते.

**७) मद्यपानास विरोध :** महात्मा ज्योतिराव फुले हे फक्त विचारवंत नव्हते, तर ते आचारवंतसुद्धा होते. त्यांनी आपल्या प्रत्येक विचाराला कृतीची जोड दिली. त्यांनी १८८० साली पुण्यातील मध्यपानगृहात वाढ करण्याच्या सरकारी धोरणाविरोधात पुणे नगरपालिकेला पत्र लिहिले. त्यामध्ये त्यांनी पुणे शहराच्या मध्यवस्तीत दारूचे गुत्ते उघडल्यामुळे लोकांच्या आरोग्यावर परिणाम होत आहेत. तसेच अनेक कुटुंबांचा यामुळे सर्वनाश झाला आहे. हे स्पष्ट करून नगरपालिकेने या दारू गुत्त्यावर कर बसवावा असे म्हटले होते. तसेच मद्यपान वर्ज्य करून लोकांनी तो पैसा ग्रंथ खरेदीमध्ये गुंतवावा, असे त्यांनी आव्हानही केले.

**८) सार्वजनिनिक वाचनालयाची सुरुवात :** महात्मा फुले यांनी इसवी सन १८५२ मध्ये मागासलेल्या लोकांच्यासाठी वाचनालयाची स्थापना करून वैचारिक चळवळ गतिमान ठेवली.

**९) स्त्री मुक्तीचे पुरस्कर्ते :** महात्मा ज्योतिराव फुले यांनी हिंदू धर्मातील अनिष्ट प्रथा आणि परंपरा यावर कठोर हल्ले केले. त्यांनी बालविवाह, जरठ-कुमारी विवाह, बहुपत्नीत्व, केशवपन, वेश्यागमन, सक्तीचे वैधव्य यासारख्या अनिष्ट प्रथांच्या विरोधात विचार मांडले. बालविवाहाचे दुष्परिणाम लोकांना समजावून सांगितले. आपल्या वडीलधाऱ्या मंडळींचा तसेच ईस्टमित्रांचा सल्ला घेऊन आणि स्वतः सर्व बाजूंनी सारासार विचार करून मुला-मुलींनी आपला जोडीदार निवडण्याचे आव्हान केले.

**१०) अस्पृश्यता निवारण :** अस्पृश्यता ही परंपराने चालत आलेली अत्यंत वाईट प्रथा होती. विशेषत: १९ व्या शतकामध्ये ती पराकोटीला जाऊन पोचली होती. समाजातील उच्चवर्णीय लोकांच्याकडून अस्पृश्यांना हीन वागणूक दिली जात असे. त्यांना गावकुसाबाहेर राहावे लागे. स्पृश्य लोक त्यांचा स्पर्श विटाळ मानत

असत. त्यांना गावातून फिरण्यास मनाई होती. विशेषत: सकाळी किंवा संध्याकाळी त्यांना गावात फिरता येत नसे. गळ्यात मडके आणि कमरेला खराटा बांधून दुपारी भर उन्हात त्यांना गावात फिरण्यास परवानगी होती. सवर्ण लोकांची सेवा करणे हेच त्यांचे कर्तव्य समजले जाई. त्यांना कामाचा कोणताही मोबदला न देता कामे करून घेतली जात होती. इतकेच नाही तर त्यांना ज्ञानार्जनाचा अधिकार नव्हता. त्यामुळे अस्पृश्य समाज अज्ञानाच्या अंधकारात चाचपडत होता. अशा या कनिष्ठ वर्गातील लोकांचे अज्ञान, निरक्षरता दूर करून त्यांना सामाजिक गुलामगिरीतून मुक्त करण्याचे कार्य महात्मा फुले यांनी हाती घेतले होते.

### १.२.१.३ सत्यशोधक समाजाची स्थापना :

२४ सप्टेंबर, १८७३ रोजी महात्मा जोतिराव फुले यांनी 'सत्यशोधक समाजा'ची स्थापना केली. समाजातील विषमता नष्ट करणे व तळागाळातील समाजापर्यंत शिक्षण पोहचवणे हे सत्यशोधक समाजाचे ध्येय होते. वेदांना झुगारून त्यांनी हे कार्य करण्यास सुरुवात केली. त्यांनी जातीयभेद आणि चातुर्वर्णीय भेदास विरोध केला. अन्याय, अत्याचारांपासून व गुलामगिरीतून शूद्रातिशुद्रांची मुक्तता करणे व त्यांना त्यांच्या हक्काची जाणीव करून देणे हे सत्यशोधक समाजाचे ध्येय होते. 'सार्वजनिक सत्यधर्म' व 'गुलामगिरी' या दोन पुस्तकात ज्योतिरावांनी सत्यशोधक समाजाबद्दलचे आपले विचार मांडले आहेत. 'सर्व साक्षी जगत्पती । त्याला नकोच मध्यस्ती।।' हे या समाजाचे ब्रीद वाक्य होते. स्वातंत्र्य, समता व बंधुता हे विचार रुजवण्यासाठी त्यांनी या समाजाची स्थापना केली होती. सर्व जाती-धर्माच्या लोकांना एकच व्यासपीठ उपलब्ध व्हावे व समाज जागृत व्हावा, हा त्यामागील प्रमुख हेतु होता. कनिष्ठ वर्गाला मानसिक गुलामगिरीतून मुक्त करणारी ती एक चळवळ होती. सत्यशोधक समाजाने गुलामगिरीविरुद्ध आवाज उठविला आणि सामाजिक न्यायाची व सामाजिक पुनर्रचनेची मागणी केली. सत्यशोधक समाज ही समाज सुधारणेची महाराष्ट्रातील पहिली चळवळ होती. या चळवळीची प्रमुख तत्वे पुढीलप्रमाणे -

१) सर्व माणसे एकाच परमेश्वराची लेकरे आहेत व परमेश्वर त्यांचा आई-बाप आहे.

२) आईला भेटण्यास अगर बापाला प्रसन्न करण्यास ज्याप्रमाणे मध्यस्थीची गरज नसते. त्याप्रमाणे परमेश्वराची प्रार्थना करण्यास पुरोहिताची आवश्यकता नसते.

३) वरील तत्व मान्य असल्यास कोणालाही या समाजाचे सदस्य होता येते. या समाजाचे सभासद होत असताना शपथ घ्यावी लागे.

ती पुढीप्रमाणे 'सर्व मानव प्राणी एकाच देवाची लेकरे आहेत. सबब ती माझी भावंडे आहेत. अशा बुद्धीने मी त्यांच्याशी वागेन. परमेश्वराची पूजा, भक्ती अगर ध्यानधारणा करते वेळी, अगर धार्मिक विधीच्या वेळी मी मध्यस्थाची गरज ठेवणार नाही. मी माझ्या मुला-मुलींना सुशिक्षित करीन. सत्यशोधक चळवळ ही एका विशिष्ट वर्गाच्या विरोधात नव्हती. तर संपूर्ण बहुजन समाजामध्ये जागृती घडवून आणणे हे तिचे उद्दिष्ट होते. या समाजाच्या अनेक शाखा होत्या. पुरोहिताशिवाय लग्न लावण्यासाठी मंगलाष्टके मराठीत रचली गेली. जातिभेद कमी व्हावा हा त्यामागील प्रमुख हेतु होता. सत्यशोधक समाजाद्वारे उभारण्यात आलेला लढा हा सामाजिक, आर्थिक, राजकीय व सांस्कृतिक गुलामगिरीविरुद्धचा होता. सत्यशोधक समाज म्हणजे हिंदुस्थानातील अनेक शतके दडपून टाकलेल्या कनिष्ठ वर्गाची डरकाळी होय.

### १.२.१.४ धर्मविविषयक विचार :

महात्मा फुले यांनी १९ व्या शतकातील समाजातील निष्क्रियता, अंधश्रद्धा, विचारशक्तीचा अभाव असलेला समाज किंवा दैववाद या कारणांचा शोध घेतला. त्यांनी त्याचे विश्लेषण आणि मीमांसा केली. बहुजन समाजाच्या मानसिक गुलामगिरीसाठी हिंदू धर्मातील दैवप्रवृत्ती बरोबरच बुद्धीप्रमण्यावादाची उणीव या गोष्टी जबाबदार आहेत असे त्यांचे मत होते. हिंदू धर्मातील अनेक ईश्वरवादाची संकल्पना लोकांना एकमेकांपासून वेगळी करत होती. याउलट महात्मा ज्योतिराव फुले यांनी निर्विघ्न निर्मिकाचा विचार मांडला. त्यांना मूर्तिपूजा मान्य नव्हती. याशिवाय परमेश्वराची शुद्ध स्वरूपात आराधना केली पाहिजे असे त्यांचे स्पष्ट मत होते. पूजा, नामस्मरण, नैवेद्य, अन्नदान, अनुष्ठान पाप-पुण्य इत्यादींचा त्यांनी ऊहापोह केला. 'सर्व साक्षी जगतपती । त्याला नकोच मध्यस्थी।' हे त्यांच्या धर्म विचारांचे प्रमुख सूत्र होते. ईश्वर आणि माणूस यांच्यामध्ये मध्यस्थीची गरज नसल्याचे ते सांगतात. निर्मिकाला सुद्धा महत्त्व देताना माणसाची सामाजिक, धार्मिक आणि आर्थिक कोंडी होणार नाही याकडे त्यांनी लक्ष वेधले. त्यांनी व्यक्तीच्या भौतिक प्रश्नांना प्रमुख स्थान देऊन त्यातूनच त्यांनी समाजाला सत्य धर्माची जाणीव करून दिली. कनिष्ठ लोकांच्या अज्ञानामुळे वरिष्ठ लोक त्यांचे शोषण करतात असे त्यांचे स्पष्ट मत होते. त्यांनी सत्याला धर्म विचारात महत्त्वाचे स्थान दिले. त्या संदर्भात ते म्हणतात की, सत्य सर्वांचे आदीघर । सर्व धर्मांचे माहेर। त्यांनी सर्वधर्मसमावेशक अशा उदारमतवादी कुटुंबाचे चित्र रेखाटले. त्यांच्या विचाराने बहुजन समाजात जागृती झाली. त्यांनी समतेवर आधारलेल्या मानधर्माचा पुरस्कार केला.

### १.२.१.५ शेतकऱ्यांच्यासाठी कार्य :

भारत हा शेतीप्रधान देश असून देशाची प्रगती ही शेतकऱ्यावर अवलंबून असते. पण १९ व्या शतकाच्या प्रारंभी भारतातील शेतकऱ्याची अवस्था खूपच दयनीय होती. सरकारी धोरणाबरोबरच शेतकऱ्याचे अज्ञान, मागासलेपण, कर्जबाजारीपणा या गोष्टीही जबाबदार होत्या. इतकेच नाही तर सावकाराकडून होणारे शोषण यामुळे भारतीय शेतकरी पूर्णपणे खचून गेला होता. अशा परिस्थितीत शेतकऱ्याचे दुःख सरकारी दरबारी मांडणे गरजेचे होते. शेतकरी वर्गाची परिस्थिती सुधारण्यासाठी महात्मा फुले यांनी सरकारी दरबारी काही मौलिक सूचना केल्या होत्या. त्याखालील प्रमाणे -

१) नैसर्गिक आपत्तीच्या वेळी सरकारने शेतकऱ्याला सर्वतोपरी मदत करावी.

२) शेतीसाठी तलाव, विहिरीद्वारे जास्तीत-जास्त पाणी उपलब्ध करून द्यावे.

३) कालव्याचे पाणी शेतीसाठी वेळेवर मिळावे.

४) पीक संरक्षणासाठी शेतकऱ्यांना बंदुकांचे परवाने द्यावेत.

५) शेतीला जोडधंदा म्हणून पशुपालनास चालना द्यावी.

६) शेतीची अवजारे व पद्धत यामध्ये सुधारणा कराव्यात.

७) कमी व्याजाने शेतकऱ्यांना कर्ज उपलब्ध करून द्यावे.

८) शेतकऱ्याच्या मुलांना व्यावसायिक शिक्षण द्यावे.

९) शेतकऱ्यांच्या मुलांसाठी वस्तीगृहांची सोय करावी.

१०) कनिष्ठ वर्गातील लोकांना नोकऱ्यात प्राधान्य द्यावे.

याशिवाय महात्मा फुले यांनी इसवी सन १८८८ मध्ये 'ड्यूक ऑफ कॅनॉट' यांच्या भारत भेटीच्या वेळी स्वत: शेतकऱ्यांच्या वेशात म्हणजेच डोक्यास मुंडासे, साधा अंगरखा, खांद्यावर गोंधडी, हातात काठी व पायात फाटक्या वाहना घालून भेटीस गेले होते व जेव्हा त्यांना बोलण्याची संधी मिळाली, तेव्हा त्यांनी सांगितले की, ''या देशातील बहुसंख्य जनता ही शेतकरी आहे आणि ते जो पोशाख वापरतात त्याच पेहरावात मी त्यांचा प्रतिनिधी म्हणून आपल्या भेटीस आलो आहे. हिंदुस्तानच्या या बहुसंख्य जनतेचे हित तुम्हाला करावयाचे असेल तर त्यांचे अज्ञान घालवा. त्यांना प्राथमिक शिक्षण मोफत देण्याची सोय करा. असा त्या लोकांचा प्रतिनिधी म्हणून माझा निरोप महाराणीला कळवा,'' असे ज्योतीरावांनी स्पष्टपणे सांगितले होते.

### १.२.१.६ साहित्य संपदा :

महात्मा जोतीराव फुले हे मूलगामी विचारवंत होते. त्यांनी आपल्या लिखित साहित्य व सत्यशोधक समाजाच्या माध्यमातून बहुजन समाजाच्या प्रबोधनाची चळवळ जिवंत ठेवली. शेतकरी, कष्टकरी, स्त्रिया, शुद्र, अतिशूद्र, श्रमजीवी वर्ग हा त्यांच्या साहित्याचा केंद्रबिंदू होता. त्यांची दु:खे त्यांनी आपल्या साहित्यातून मांडली आहेत. त्यांनी लिहिलेले काही महत्त्वपूर्ण ग्रंथ पुढीलप्रमाणे –

**१) तृतीय रत्न :** हे नाटक महात्मा फुले यांनी लिहिले असून पुरोहित लोक स्वत:च्या फायद्यासाठी धर्माच्या नावाने अज्ञानी लोकास कसे फसवतात. तसेच ख्रिस्ती धर्मोपदेशक लोक आपल्या धर्माच्या आधारे अज्ञानी शूद्र लोकास खरे ज्ञान सांगून कसे सत्य मार्गावर आणतात, हे या नाटकाच्या माध्यमातून लोकांना दाखवून देण्याचा प्रयत्न केला आहे.

**२) छत्रपती शिवाजीराजे भोसले यांचा पोवाडा :** शिवरायांचे कार्य, कर्तृत्व आणि पराक्रमाकडे लोकांचे लक्ष वेधण्यासाठी त्यांनी हा पोवाडा रचला असून, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या चरित्रातील महत्वाचे प्रसंग प्रभावी भाषेत मांडले आहेत. त्यामध्ये त्यांनी स्वत:चा उल्लेख कुळवाडीभूषण असा केलेला आहे.

**३) ब्राह्मणाचे कसब :** ब्राह्मणांचे कसब, हे एक अध्यात्मिक पुस्तक असून यामध्ये त्यांनी स्वार्थ साधू ब्राह्मणांच्या कारवाया उघड करून दाखविल्या आहेत. तसेच सांस्कृतिक परंपरेतील ब्राह्मण महात्म्य, विद्येची मक्तेदारी, मागासलेल्या लोकांचे अज्ञान, अंधश्रद्धा, रुढीप्रियता या विषयांची चर्चा केली आहे.

**४) गुलामगिरी :** गुलामगिरी हा ग्रंथ इसवी सन १८७३ साली प्रकाशित करण्यात येऊन तो अमेरिकेतील गुलामगिरीविरुद्ध लढणाऱ्या लोकांना अर्पण करण्यात आला आहे. या ग्रंथात ब्रह्मदेवाच्या उत्पतीपासून ते भटपांड्यांच्या बंडापर्यंतचा समग्र इतिहास कथन केला आहे. या पुस्तकात पुरोहितांच्या मध्यस्थीवर कठोर टीका करण्यात आली आहे.

**५) शेतकऱ्यांचा आसूड :** शेतकऱ्यांचा आसूड हा ग्रंथ १८८३ मध्ये लिहिला गेला आहे. या ग्रंथात शेतकऱ्यांच्या दयनीय स्थितीचे वर्णन करून त्यावर उपाय सुचविण्यात आले आहेत.

**६) सत्सार :** सत्सार हे नियतकालिक असून त्यामध्ये सामाजिक प्रश्नांची चर्चा करण्यात आली आहे.

**७) इशारा :** इशारा हे पुस्तक महात्मा फुले यांचे असून त्यामध्ये जातीभेदाविषयी विचार मांडले गेले आहेत.

**८) सार्वजनिक सत्यधर्म :** सार्वजनिक सत्यधर्म हा महात्मा फुले यांचा शेवटचा ग्रंथ होय. या ग्रंथात धार्मिक, सामाजिक, नैतिक, व्यवहारिक अशा अनेक विषयांची चर्चा करण्यात आली आहे. सुख, पूजा, नामस्मरण, नैवेद्य, स्वर्ग, स्त्री, पुरुष, पाप, पुण्य जातीभेद, नीती, दैव इत्यादी प्रश्नांचा त्यांनी उहापोह केला आहे. कष्टकरी लोकांना एकत्र आणून ऐक्य भाव निर्माण करणे, अस्पृश्य बांधवांना बंधूभावाने वागवणे तसेच त्यांच्या गुलामगिरीमुक्तीसाठी सतत प्रयत्न करत राहिले पाहिजे ही त्यांच्या ग्रंथ लेखनामागील भूमिका असल्याचे दिसून येते.

**स्वयंअध्ययनासाठी प्रश्न – १**

**(अ) खालीलपैकी योग्य पर्याय निवडा.**

१. महात्मा फुले यांनी ..... समाजाची स्थापना केली.
   अ) प्रार्थना समाज  ब) सत्यशोधक समाज
   क) आर्य समाज  ड) रामकृष्ण मिशन

२. 'गुलामगिरी' हा ग्रंथ ..... यांनी लिहिला.
   अ) आगरकर  ब) महात्मा फुले
   क) लोकहितवादी  ड) महर्षी शिंदे

३. 'शेतकऱ्यांचा आसूड' हा ग्रंथ ..... यांनी लिहिला.
   अ) महर्षी कर्वे  ब) महर्षी शिंदे
   क) महात्मा फुले  ड) आगरकर

४. १८४८ मध्ये पुण्यात पहिली मुलींची शाळा ..... यांनी सुरू केली.
   अ) महात्मा फुले  ब) आगरकर
   क) महर्षी कर्वे  ड) विठ्ठल रामजी शिंदे

५. महात्मा फुले यांच्या पत्नीचे नाव ..... होय.
   अ) सावित्रीबाई  ब) लक्ष्मीबाई
   क) रमाबाई  ड) सगुनाबाई

## १.२.२ राजर्षी छत्रपती शाहू महाराज :

राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांनी आपल्या राजकीय सत्तेचा वापर करून अनेक सामाजिक सुधारणा घडवून आणल्या. त्यासाठी विविध प्रकारच्या उपाययोजना केल्या. उदा. आंतरजातीय विवाह, व्यवसाय स्वातंत्र्य, आरक्षण, महार वतन खालसा, वेठबिगारी प्रथेवर बंदी, हजेरी पद्धतीवर बंदी इत्यादी माध्यमातून बहुजन समाजाला मुख्य प्रवाहात आणण्याचा प्रयत्न केला. तसेच आपल्या संस्थानात शिक्षणाच्या सुविधा उपलब्ध करून दिल्या. त्यासाठी अनेक राजाज्ञा व जाहीरनामे काढले व त्यांची काटेकोरपणे अंमलबजावणी केली.

### १.२.२.१ छत्रपती शाहू महाराजांचे शैक्षणिक कार्य :

बहुजन समाजाच्या उन्नतीसाठी शिक्षणाची अत्यंत गरज आहे हे ओळखून शाहू महाराजांनी प्राथमिक शिक्षणापासून उच्च शिक्षणापर्यंत सर्व सोयी सुविधा उपलब्ध करून देण्याचे धोरण हाती घेतले. त्या संदर्भात ते म्हणतात की, ''शिक्षण हाच आमचा तरणोपाय आहे. असे माझे ठाम मत आहे. शिक्षणाशिवाय कोणत्याही देशाची उन्नती झाली नाही. असे इतिहास सांगतो. अज्ञानात बुडून गेलेल्या देशात उत्तम मुसद्दी व लढवय्ये वीर कधीही निपजणार नाहीत. म्हणून सक्तीच्या व मोफत शिक्षणाची हिंदुस्थानला अत्यंत आवश्यकता आहे.'' अशी छत्रपती शाहू महाराजांची विचारसरणी होती.

**१) प्राथमिक शिक्षणाला प्राधान्य :**

बहुजन समाजाचा शैक्षणिक विकास घडवून आणण्यासाठी शाहू महाराजांनी शिक्षणाचे कार्य हाती घेतले होते. प्राथमिक शिक्षणाच्या पायावरच उच्च शिक्षणाची इमारत उभी करण्याचा त्यांचा विचार होता. प्रत्येक गावामध्ये किमान एक तरी शाळा असावी, तसेच ती शाळा गावामध्ये बहुसंख्येने राहणाऱ्या जातीच्या व्यक्तीने चालवावी असे त्यांचे मत होते. त्यासाठी रोख पगारावर शिक्षकांची नेमणूक केली. खेडेगावातील मंदिरे, चावडी, धर्मशाळा इत्यादी ठिकाणी प्राथमिक शाळा सुरू केल्या. शाळेची देखरेख, दुरुस्ती इत्यादी कामासाठी पाटील, कुलकर्णी यांची नेमणूक केली. बहुजन समाजाच्या एकंदरीत सर्वांगीण विकासासाठी शाहू महाराजांनी शिक्षण संस्थांना आर्थिक साहाय्य केले. त्यामुळे कोल्हापूर संस्थानांमध्ये प्राथमिक शिक्षणाचा मोठ्या प्रमाणात विकास घडून आला.

**२) सक्तीचे शिक्षण :**

शाहू महाराजांनी १९१७ मध्ये जाहीरनामा काढून कोल्हापूर संस्थानात प्राथमिक शिक्षण सक्तीचे करण्यात आल्याचे जाहीर केले. त्यानुसार सक्तीच्या शिक्षणाची अंमलबजावणी सुरू केली. देवस्थानच्या उत्पनातून नित्यनैमित्तिक खर्च वजा करून उरलेले उत्पन्न शाळेला देण्याचे धोरण ठरविण्यात आले. शिक्षणासाठी योग्य वय असणाऱ्या मुला-मुलींना शाळेत पाठवण्याबद्दल पालक व गाव कामगार यांच्यावर कडक बंधने घातली. सक्तीच्या व मोफत शिक्षणामुळे शिक्षणाचा प्रसार झाला. शाहू महाराजांचे हे धोरण म्हणजे बहुजन समाजाला पद, प्रतिष्ठा व स्वतंत्र सामाजिक दर्जा मिळवून देण्याचा प्रयत्न होता.

**३) स्त्री शिक्षण :**

स्त्री शिक्षणाबाबतीत शाहू महाराज दक्ष होते. स्त्रियांच्या मागासलेपणाची त्यांना जाणीव होती. म्हणून त्यांनी राजाराम महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या स्त्रियांना फी माफीची सवलत जाहीर केली होती. आपल्या सुनबाई इंदुमती राणीसाहेब यांना वैधव्य प्राप्त झाल्यानंतर त्यांना शिक्षण देऊन कोल्हापूर संस्थानचे शिक्षण खाते त्यांच्याकडे सोपवण्याचा महाराजांचा विचार होता. तथापि राणीसाहेबांच्या मृत्यूमुळे तो पूर्ण झाला नाही. संस्थानच्या शिक्षणाधिकारी म्हणून त्यांनी श्रीमती रखमाबाई केळवकर यांची नेमणूक केली. यावरून महाराजांचा स्त्री शिक्षण विषयक दृष्टिकोन स्पष्ट होतो.

**४) अस्पृश्यांच्या शिक्षणाची व्यवस्था :**

शिक्षणाशिवाय अस्पृश्यांचा उद्धार होणार नाही. म्हणून शाहू महाराजांनी इ. स. १९०७ मध्ये भास्करराव

जाधव, महादेवराव, खंडेराव बागल, श्रीपतराव शिंदे यासारख्या लोकांच्यावर काही जबाबदारी सोपवली. या लोकांनी अस्पृश्यांच्यासाठी 'विद्या प्रसारक मंडळ' नावाची संस्था स्थापन केली. त्याचबरोबर दिनांक २४ ऑक्टोबर, १९११ रोजीच्या आदेशाने अस्पृश्यांना सर्व प्रकारचे शिक्षण मोफत करण्यात येऊन हुशार विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीची सोय करण्यात आली होती. १९१९ च्या आदेशाने अस्पृश्य लोकांची दैनावस्था लक्षात घेऊन त्यांच्या शिक्षणासाठी उत्तेजन द्यावे या हेतूने पाठ्यपुस्तके, पेन्सिल इत्यादी साहित्य मोफत देण्यासाठी अडीच हजार रुपयांची तरतूद करण्यात आली. याशिवाय महार जातीतील लोकांना गावोगावी तलाठी म्हणून नियुक्ती देण्याबरोबरच दलित समाजातील मुलांना आठ रुपये दरमहा शिष्यवृत्ती देण्यात येत होती. ज्याचा परिणाम म्हणजे दलित जातीतील व्यक्ती गावातील एक प्रमुख अधिकारी बनली. या पाठीमागे शाहू महाराजांचे फार मोठे योगदान होते.

शाहू महाराजांनी संस्थानातील अस्पृश्यांच्या स्वतंत्र शाळा बंद करून अस्पृश्य जातीतील मुलांना सरकारी शाळांमध्ये दाखल करून घ्यावे, तसेच सरकारी शाळेमध्ये शिवा-शिव न पाळता सर्व जातीच्या धर्माच्या मुलांना एकत्र बसू दिले जावे. असे स्पष्ट आदेश दिले होते. याशिवाय, इसवी सन १९२० साली महाराजांचे धाकटे पुत्र प्रिन्स शिवाजी यांच्या स्मरणार्थ महाराजांनी अस्पृश्य लोकांच्या विद्येला उत्तेजन देण्याकरता दहा हजार रुपयांच्या प्रॉमिसरी नोटा तयार करून ठेवल्या होत्या व त्याच्या व्याजातून दरमहा पाच रुपये प्रमाणे शिष्यवृत्ती दिली जात होती.

**५) उच्च शिक्षण :**

प्राथमिक शिक्षणाइतकेच महत्व शाहू महाराजांनी माध्यमिक व उच्च शिक्षणाला दिले होते. इसवी सन १८५१ मध्ये कोल्हापूर येथे सुरू झालेल्या एका इंग्रजी शाळेचे सन १८८० साली राजाराम महाविद्यालयात रूपांतर झाले. जागीरदार व सरकारकडून मिळणाऱ्या वर्षासनातून या महाविद्यालयाचा खर्च चालवला जात असे. वर्षासने बंद झाल्यानंतर दरबारातर्फे या महाविद्यालयास दरवर्षी ५० हजार रुपये देण्यास महाराजांनी सुरुवात केली. पुढील काळात आर्य समाजाचे धोरण सामाजिक सुधारणेला अनुसरून असल्यामुळे शाहू महाराजांनी ते महाविद्यालय आर्य समाजाकडे सोपविले. या समाजाच्या नियंत्रणाखाली महाविद्यालयाची प्रगती होत गेली.

**६) व्यवसाय शिक्षण :**

प्राथमिक, माध्यमिक व उच्चशिक्षणाप्रमाणे शाहू महाराजांनी व्यवसाय शिक्षणालाही महत्त्व दिले. त्यासाठी त्यांनी पाटील स्कूल, तलाठी स्कूल सुरू केले. या शाळांच्यामधून सर्वसाधारणपणे जमाखर्च, कायदे, शांतता, सुव्यवस्था, महसूल विषयक दक्षता इत्यादी विषयांचे शिक्षण दिले जात असे. त्याचप्रमाणे शिक्षकांच्यासाठी प्रशिक्षण केंद्रे सुरू करण्यात आली. तांत्रिक शिक्षणाची समाजात आवड निर्माण व्हावी म्हणून 'जयसिंगराव घाडगे टेक्निकल इन्स्टिट्यूटची' स्थापना करून, विद्यार्थ्यांना लोहारकाम, गवंडीकाम, सुतारकाम यासारख्या विषयांचे शिक्षण उपलब्ध करून दिले. तसेच 'इन्फंट्री स्कूल' सुरू करून विद्यार्थ्यांच्या लष्करी शिक्षणाची व्यवस्था केली. वरील विविध शिक्षणसंस्थांच्याद्वारे बहुजन समाजाला सर्व प्रकारच्या शिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्याचे महान कार्य शाहू महाराजांनी केले.

### १.२.२.२ शाहू महाराजांची वस्तीगृह चळवळ :

बहुजन समाजाच्या उन्नतीसाठी शिक्षणाशिवाय कोणताही पर्याय नाही हे ओळखून छत्रपती शाहू महाराजांनी बहुजन समाजातील मुला-मुलींच्यासाठी खास प्रयत्न केले. विशेषत: कोल्हापूर संस्थानांमध्ये त्यांनी सुरू केलेली 'वस्तीगृह चळवळ' ही अत्यंत महत्त्वाची मानली जाते. खेड्यापाड्यातील गरीब विद्यार्थ्यांना शिक्षण घेत असताना राहण्याची आणि जेवणाची सोय व्हावी, यासाठी त्यांनी वस्तीगृह निर्मितीचे धोरण हाती घेतले. सुरुवातीस इसवी सन १८९६ मध्ये सर्व जाती-जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी एकच वस्तीगृह सुरू करण्यात आले होते. पण या वस्तीगृहात केवळ ब्राह्मण विद्यार्थ्यांचाच समाविष्ट असल्याचे निदर्शनास आल्यामुळे शाहू महाराजांनी सर्व जातींच्यासाठी स्वतंत्र वस्तीगृह निर्माण करण्याचा निर्णय घेतला. त्यामध्ये विशेष करून व्हिक्टोरिया मराठा बोर्डिंग, दिगंबर जैन बोर्डिंग, वीरशैव लिंगायत विद्यार्थी वस्तीगृह, मुस्लिम बोर्डिंग, श्री. नामदेव बोर्डिंग, पांचाल ब्राह्मण वस्तीगृह, फिस क्लार्क हॉस्टेल, वैश्य बोर्डिंग, चांभार-ढोर बोर्डिंग, सुतार बोर्डिंग, नाभिक विद्यार्थी वस्तीग्रह, रावबहादूर सबनीस प्रभू बोर्डिंग इत्यादींचा समावेश होतो. या सर्व वस्तीगृहामधून विद्यार्थ्यांची राहण्याची व भोजनाची व्यवस्था करण्यात आलेली होती. त्यांचा थोडक्यात आढावा पुढीलप्रमाणे-

#### १. व्हिक्टोरिया मराठा बोर्डिंग (१९०१) :

इसवी सन १९०१ मध्ये कोल्हापूर येथे विक्टोरिया मराठा बोर्डिंग या वस्तीगृहाची स्थापना करण्यात आली. तसेच याच वर्षी शाहू महाराजांनी दिगंबर जैन बोर्डिंगचीही स्थापना केली. या वस्तीगृहांना शाहू महाराजांनी सढळ हस्ते अनुदान दिले. याशिवाय इतर मार्गानेही वस्तीगृहाच्या खर्चाची सोय करण्यात आली होती.

#### २. मुस्लिम बोर्डिंग (१९०६) :

मुस्लिम बोर्डिंगच्या स्थापनेतून शाहू महाराजांचे सर्वधर्मसमभावाचे धोरण स्पष्टपणे दिसून येते. शिक्षणाच्या अभावामुळे मुस्लिम समाजाची झालेली अधोगती लक्षात घेऊन शाहू महाराजांनी मुस्लिम समाजातील व्यक्तींना शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. तेव्हा मुस्लिम समाजानेही शाहू महाराजांच्या या विचारास पाठिंबा दिला. त्यामधून मुस्लिम विद्यार्थ्यांच्यासाठी इसवी सन १९०६ मध्ये स्वतंत्रपणे वस्तीगृहाची स्थापना करण्यात आली. या पाठीमागे शाहू महाराजांची दूरदृष्टी आणि त्यांचा राष्ट्रीय दृष्टिकोन दिसून येतो.

#### ३. मिस क्लार्क होस्टेल (१९०८) :

अस्पृश्य समाजातील विद्यार्थ्यांनी वस्तीगृहात राहून शिक्षण घ्यावे असे शाहू महाराजांना वाटत होते. त्या दृष्टीने त्यांनी प्रयत्नही चालवले होते. त्यांच्या या कार्यात त्यांना भास्करराव जाधव, श्रीपतराव शिंदे, खंडेराव बागल आदी व्यक्तींचे महत्त्वाचे सहकार्य मिळाले. या सर्वांच्या प्रयत्नातून इसवी सन १९०८ मध्ये कोल्हापुरात 'मिस क्लार्क हॉस्टेल' या वस्तीगृहाची निर्मिती झाली. तत्कालीन मुंबईचे गव्हर्नर सर 'जॉर्ज क्लार्क' यांची कन्या 'मिस व्हायोलेट क्लार्क' हिला अस्पृश्यांच्या विषयी कणव होती. शाहू महाराजांनी सुरू केलेल्या कार्यास आपणही हातभार लावावा या हेतूने तिने आपल्या नृत्याच्या कार्यक्रमातून जमा झालेली रक्कम वस्तीगृहास दिली. त्यामुळे शाहू महाराजांनी अस्पृश्य मुलांच्या वस्तीगृहास मिस क्लार्क होस्टेल असे नाव दिले.

**४. प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग (१९२०) :**

ब्राह्मण मुलांच्याप्रमाणेच मराठा जातीतील मुलेही माधुकरी मागून शिक्षण घेत असल्याची बातमी शाहू महाराजांना समजली. तेव्हा त्यांनी कोल्हापुरात शिक्षणाविषयी प्रेम असणाऱ्या लोकांच्याकडे अशा विद्यार्थ्यांच्या जेवणाची सोय केली. यामधूनच प्रिन्स शिवाजी बोर्डिंग नावारूपास आले. मात्र वाढती विद्यार्थी संख्या लक्षात घेता व विद्यार्थ्यांची होणारी ससेहोलपट पाहता शाहू महाराजांनी या वस्तीगृहास इमारत, जमिन व काही रक्कम देऊ केली. या वस्तीगृहाचे वैशिष्ट्य म्हणजे इथे मागास जातीतील मुलांनाही प्रवेश दिला जात होता.

वरील प्रमुख वस्तीगृहांच्याशिवाय विविध जाती-जमातींच्या विद्यार्थ्यांच्यासाठी शाहू महाराजांनी वस्तीगृहांची निर्मिती केली. तसेच या वस्तीगृहामधून विद्यार्थ्यांची राहण्याची व भोजनाची व्यवस्था करून एकप्रकारे शाहू महाराजांनी समाजसुधारणा चळवळीला गती दिलेली दिसून येते.

**१.२.२.३ अस्पृश्यता निर्मूलन चळवळ :**

छत्रपती शाहू महाराज हे अस्पृश्यांच्यामध्ये मुक्तपणे वावरत असत. त्यांच्या हातातून पाणी, चहा, जेवण घेत असत. म्हणजेच आपल्या आचरणांने इतरांना अस्पृश्यता न पाळण्याची शिकवण देत असत. एक राजा अस्पृश्यांशी इतक्या प्रेमाने वागतो हे पाहून इतर सर्वसामान्य लोकांच्यावर आणि सोबत असणाऱ्या सरकारी नोकरदारांच्यावर त्याचा परिणाम होऊन त्यांच्याही वर्तनामध्ये बदल होत असे. अस्पृश्यांना ते प्रेमाने सूर्यवंशी असेही म्हणत असत. अस्पृश्यता पाळणे आणि अस्पृश्य व्यवहार करणे हा त्यांनी कायद्याने गुन्हा ठरवला. तसेच अस्पृश्यता पाळणाऱ्याच्या विरोधात कठोर कायदे केले. कोल्हापूर संस्थानातील हजेरी पद्धतीवर बंदी घालून, महार वतने नष्ट केली. त्यामुळे वेठबिगारीसारख्या अमानुष प्रथेतून अस्पृश्यांची मुक्तता झाली. त्यांना तलवार बरोबर घेण्याचा, रथाचा सारथी तसेच माहुत होण्याचा मान मिळाला. शाहू महाराजांनी त्यांच्यासाठी काही जागा आरक्षित ठेवून आरक्षणाची व्यवस्था केली. अशा स्वरूपाचे आरक्षण देणारे छत्रपती शाहू महाराज हे भारतातील पहिलेच राजे होते. महार वतनाप्रमाणेच 'वेठरवळा' नावाची अमानुष पद्धत या काळात अस्तित्वात होती. ही वेठरवळाची पद्धत म्हणजे महारजातीच्या लोकांच्या पायातील बेडी होती. या पद्धतीमुळे महार जातीतील लोकांना गावातील पाटील-कुलकर्णी तसेच सरकारी अधिकारी यांची विनामोबदला कामे तसेच सेवा करावी लागत होती. त्यामुळे त्यांना गावाबाहेर पडता येत नव्हते. तेव्हा शाहू महाराजांनी वेठरवळाची प्रथा बंद करुन त्यांना या जाचातून मुक्त केले.

अस्पृशतेसाठी मनू धर्मशास्त्राचे कायदे कारणीभूत आहेत. कारण ते एकाच जातीचे वर्चस्व निर्माण करतात. ही गोष्ट शाहू महाराज यांच्या लक्षात आली होती. त्यामूळे जे कायदे इतर जातींना तुच्छ, कस्पटासमान लेखतात आणि केवळ ब्राह्मणांची सेवा करणारे व त्यांना मानसन्मान, प्रतिष्ठा मिळवून देणारे कायदे तसेच अनिष्ट रूढी, प्रथा, परंपरा नाहीशा करून सर्वांना समानतेची वागणूक देणारे कायदे निर्माण केले पाहिजेत, ही शाहू महाराजांची भूमिका होती. शाहू महाराजांचा हा समतावादी दृष्टिकोन अस्पृश्यता आणि जातिभेद कमी करण्यासाठी परिणामकारक ठरला. अस्पृश्यता नष्ट करायची असेल तर पहिल्यांदा जातीभेद नष्ट केला पाहिजे. आणि जातिभेद नष्ट करण्यासाठी आंतरजातीय विवाह झाले पाहिजेत. त्याशिवाय देशाची उन्नती होणार नाही. म्हणून भिन्न-भिन्न जातींच्यामध्ये रोटी-बेटी व्यवहार झाले पाहिजेत असा विचार शाहू महाराजांनी मांडला.

१९२० मध्ये कोल्हापूर-माणगाव येथे अस्पृश्यता विवरण परिषद झाली. त्यामध्ये छ. शाहू महाराज यांचा सक्रिय सहभाग होता. शेवटी अस्पृशतेच्या संदर्भात शाहू महाराज म्हणतात की, ''अस्पृश्य हा शब्द माणसाला वापरणे हा निंद्य प्रकार आहे. शिवाय अस्पृश्य लोक हे इतर लोकांच्यापेक्षा जास्त बुद्धिमान, पराक्रमी, सुविचारी आणि सर्व त्यागी आहेत. ते आपल्या हिंदी राष्ट्राचेच घटक अवयव आहेत. त्यामुळे मी त्यांना कधीच अस्पृश्य समजत नाही. त्यांचे आणि आपले हक्क समसमान आहेत. ही भावना सर्वांनीच आपल्या मनात ठेवली पाहिजे.'' शाहू महाराजांचा हा विचार राष्ट्रीय एकात्मतेच्या आणि राष्ट्रीय अखंडतत्त्वाच्या दृष्टिकोनातून महत्त्वाचा ठरला. ही गोष्ट आपण लक्षात घ्यायला हवी.

### १.२.२.४ महिला उद्धाराची चळवळ :

महिला उन्नतीची चळवळ खऱ्या अर्थाने महात्मा ज्योतिराव फुले यांनी इसवी सन १८४८ मध्ये स्त्रीशिक्षणाने सुरू केली होती. शाहू महाराजांनी हाच धागा पकडून आपल्या कोल्हापूर संस्थानात स्त्री शिक्षणाला प्रोत्साहन देऊन त्यांच्या नैसर्गिक हक्काचे संरक्षण करणारे अनेक कायदे त्यांनी केले त्यांचा आढावा पुढीलप्रमाणे –

**१. विधवा पुनर्विवाह कायदा :**

हिंदू धर्मातील उच्चवर्णीय, सुसंस्कृत समजणाऱ्या जातीतील स्त्रियांना पुनर्विवाहचा अधिकार नव्हता. त्यांच्यावर अनेक सामाजिक बंधने होती. केशवपन व इतर अनिष्ट रूढी, प्रथांना त्यांना सामोरे जावे लागत होते. त्यामुळे शाहू महाराजांनी आपल्या संस्थानात १९१७ मध्ये विधवांना पुनर्विवाह करण्याचा कायदेशीर अधिकार देणारा कायदा केला. या कायद्यामुळे विधवा विवाह संदर्भातील अनेक अडचणी दूर झाल्या.

**२. पडदा पद्धतीस विरोध :**

भारतातील उच्चवर्णीय जातीमध्ये विशेषत: राजघराणे, मराठा सरदार, वतनदार घराणे, वरिष्ठ घराणे यांच्यामध्ये पडदा पद्धतीचा अवलंब केला जात होता. ही पद्धत म्हणजे स्त्रियांच्या स्वातंत्र्यावर मर्यादा आणणारी होती. शाहू महाराजांनी कुर्मीक्षत्रि यांच्या सभेत या रूढीचा निषेध केला. एवढेच नाही तर त्यांनी राजमाता जिजाबाई, महाराणी ताराबाई, अहिल्याबाई आदी स्त्रियांनी राजकारभार केल्याचे सांगून ही पडदा पद्धत देशातील काही भागातच असल्याचे स्पष्ट केले. या पद्धतीमुळे स्त्रियांच्यामधील विविध गुणांचा नाश होत असल्याचे निदर्शनास आणून दिले.

**३. आंतरजातीय विवाह कायदा :**

कोल्हापूर संस्थानात शाहू महाराजांनी १९१९ साली आंतरजातीय विवाह कायदा पारित केला. या कायद्यानुसार विवाहसमयी पुरुषाचे वय १८ वर्षे पूर्ण व स्त्रीचे वय १४ वर्षे पूर्ण निश्चित करण्यात आले. या कायद्यानुसार १८ वर्षे पूर्ण असणाऱ्या स्त्रीला विवाहासाठी पित्याच्या अथवा पालकाच्या संमतीची आवश्यकता नसल्याचे स्पष्ट करण्यात आले. स्त्रीला स्वतःचा जोडीदार निवडण्याचे स्वातंत्र्य या कायद्याने दिले. तत्कालीन परिस्थिती लक्षात घेता शाहू महाराजांचे विवाहविषयक धोरण किती पुरोगामी स्वरूपाचे होते हे लक्षात येते.

**४. क्रूरपणाच्या वर्तनास प्रतिबंध करणारा कायदा :**

स्त्रीवरती तिच्या कुटुंबाकडून होणाऱ्या छळाला प्रतिबंध घालणारा कायदा शाहू महाराजांनी १९१९ साली

आपल्या संस्थानच्या गॅझेटमध्ये प्रसिद्ध केला. स्त्री आपल्यावरती होणाऱ्या अत्याचाराबद्दल कधीही तक्रार करत नाही. तिच्यावर होणाऱ्या अन्यायाला ती वाचा फोडत नाही. तेव्हा अशा स्त्रियांना संरक्षण देणारा हा कायदा महत्त्वाचा होता. या कायद्यात एकूण १२ कलमांचा समावेश असून स्त्रियांना क्रूरपणाची वागणूक देणाऱ्या व्यक्तीला सहा महिन्याचा कारावास आणि दोनशे रुपये दंड अशा शिक्षेची तरतूद करण्यात आली होती.

**५. घटस्फोटाचा कायदा :**

छत्रपती शाहू महाराजांनी आपल्या संस्थांनामध्ये घटस्फोटाचा कायदा संमत केला. या कायद्यानुसार स्त्रियांना घटस्फोटानंतर अन्न, वस्त्र खर्चाची व्यवस्था करणारा हा कायदा होता. त्याचबरोबर वैवाहिक संतती असेल तर त्याच्या पोटगीची आणि शिक्षणाची तरतूद या कायद्यात करण्यात आली होती. विशेष म्हणजे या कायद्याने जातपंचायतीकडील घटस्फोटाचे अधिकार काढून घेण्यात आले होते.

**६. वारसा हक्काचा कायदा :**

छत्रपती शाहू महाराजांनी इसवी सन १९२० मध्ये वारसा हक्क संदर्भात कायद्यात अनेक दुरुस्त्या केल्या. त्यानुसार ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र यांच्या अनौरस संतती यांना मिळणाऱ्या वारसा हक्कातील फरक काढण्यात आला होता.

**७. देवदासी प्रथा प्रतिबंध कायदा :**

धर्माच्या नावाखाली स्त्रियांना देवदासी म्हणून देवाच्या नावावर सोडले जात असे. अशा स्त्रियांचा त्यांच्या जनक घराण्याशी संबंध उरत नसे. परिणामी त्यांचा वारसा हक्क सुद्धा राहत नसे. शाहू महाराजांनी अशा स्त्रियांना त्यांच्या आई-वडिलांच्या संपत्तीमधील वारसा हक्क मिळवून देणारा कायदा १९२० मध्ये करून या अमानुष प्रथेला प्रतिबंध घातला.

राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांनी स्वातंत्र्यपूर्व काळात स्त्रियांच्यावरील अन्याय, अत्याचार कमी करून त्यांना स्वातंत्र्य देणारे अनेक कायदे केले. जे कायदे करण्याचे धाडस ब्रिटीश सरकारलासुद्धा दाखवता आले नाही. यावरूनच छत्रपती शाहू महाराज यांनी केलेल्या महिला कायद्यांचे महत्त्व लक्षात येते.

**१.२.२.५ शाहू महाराज आणि ब्राह्मणेत्तर चळवळ :**

बहुजन समाजाच्या उद्धारासाठी शाहू महाराजांनी आपल्या संस्थानांमध्ये शिक्षण प्रसार आणि जातीभेद निर्मूलनाचे कार्य हाती घेतले होते. पुढे बहुजनांना राजकीय हक्क मिळाल्याशिवाय त्यांचा उद्धार होणार नाही, हे लक्षात आल्याने शाहू महाराजांनी बहुजन समाजाच्या राजकीय हक्कासाठी ब्राह्मणेत्तर चळवळीला प्रोत्साहन, मार्गदर्शन व अर्थसहाय्य दिले. या चळवळीचे नेतृत्व करण्याची त्यांची इच्छा होती. परंतु संस्थानिक म्हणून त्यांच्यावर काही मर्यादा होत्या. असे असले तरी ब्राह्मणेत्तर समाजाच्या हिताचे रक्षण करण्याची उर्मी त्यांना स्वस्थ बसू देत नव्हती. त्यामुळे कधी पडद्याआड राहून, तर कधी ब्राह्मणेत्तरांच्या सभा, परिषदांच्यामध्ये प्रत्यक्ष भाग घेऊन त्यांनी आपल्या कारकिर्दीच्या अखेरीपर्यंत ब्राह्मणेत्तर चळवळीची सूत्रे आपल्या हाती ठेवली आणि त्याचे संचालन केले.

भारतीय जनतेला स्वराज्याचे हक्क देण्याची घोषणा मोंटेग्यू यांनी केल्यानंतर शाहू महाराजांनी नोव्हेंबर,

१९१७ मध्ये त्यांची भेट घेतली आणि अस्पृश्य व ब्राह्मणेत्तरांना स्वतंत्र मतदारसंघ मिळवावेत अशी मागणी केली. एवढेच नाही तर मागासवर्गीयासाठी स्वतंत्र जातवार मतदारसंघ का आवश्यक आहेत, हे त्यांनी वरिष्ठ ब्रिटिश अधिकाऱ्यांना पत्र व्यवहारातून स्पष्ट करून सांगितले. याशिवाय, शाहू महाराजांनी ब्राह्मणेत्तर वृत्तपत्रांना उत्तेजन दिले. कारण कोणतीही चळवळ वृत्तपत्राच्या पाठिंब्याशिवाय मोठी होऊ शकत नाही. त्यामुळे ब्राह्मणेत्तर पक्षाची बाजू समर्थपणे मांडणाऱ्या ब्राह्मणेत्तर वृत्तपत्रांची गरज महाराजांना भासू लागली होती. इसवी सन १९१७ पर्यंत मुकुंदराव पाटील यांचे 'दिनमित्र' हे एकच वृत्तपत्र ब्राह्मणेत्तरांच्या बाजूने लढत होते. याचवर्षी पुण्यात वालचंद कोठारींनी 'जागरूक' तर बडोद्यास भगवंतराव पाळेकरांनी 'जागृती' अशी ब्राह्मणेत्तरांची दोन वृत्तपत्र सुरू केली होती. पुढील पाच वर्षात महाराजांच्या उत्तेजनाने अशी अनेक वृत्तपत्र निघाली. त्यामध्ये लठ्ठे आणि कोठारी यांचे डेक्कन रयत (इंग्रजी), बळवंत पिसाळ यांचे विश्वबंधु, दत्ताजीराव कोण्यांचे भगवा झेंडा, दिनकरराव जवळकरांचे तरुण मराठा, बाबुराव यादवांचे गरिबांचा कैवारी, श्रीपतराव शिंदे यांचे विजयी मराठा, दत्तात्रय रणदिवे यांचे संजीवन, शामराव देसाई यांचे राष्ट्रवादी, केशवराव बागडे व कीर्ती वानराव निंबाळकर यांच्या शिवछत्रपती, गणेश आकाजी गवळी यांच्या बहिष्कृत भारत, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे मूकनायक अशी काही प्रमुख वृत्तपत्रे होती. या सर्वांच्या मागे महाराजांनी आपले नैतिक आणि आर्थिक पाठबळ उभे केले.

शाहू महाराजांनी ब्राह्मणेत्तर चळवळीला तात्विक अधिष्ठान तसेच आर्थिक पाठबळ देऊन राजकीय जीवनात या चळवळीला महत्त्वपूर्ण स्थान मिळवून दिले. परंतु ६ मे, १९२२ मध्ये शाहू महाराजांचे अकाली निधन झाले. त्यांच्या अशा अकाली निघून जाण्याने ब्राह्मणेत्तर चळवळीला जबरदस्त धक्का बसला.

**स्वयंअध्ययनासाठी प्रश्न – २**

**(अ) खालीलपैकी योग्य पर्याय निवडा.**

१. राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी ..... मध्ये जाहिरनामा काढून प्राथमिक शिक्षण सक्तीचे केले.
   अ) १९१७ ब) १९१८
   क) १९१९ ड) १९२०

२. राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी कोल्हापूर येथे अस्पृश्यांच्या मुलांसाठी ..... वस्तीगृह काढले.
   अ) व्हिक्टोरिया ब) मिस क्लार्क
   क) इंडियन ख्रिश्चन ड) प्रभू

३. राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी मुस्लीम बोर्डिंगची स्थापना ..... रोजी केली.
   अ) १९०६ ब) १९०९
   क) १९०७ ड) १९०८

४. १९२० मध्ये कोल्हापूर ..... येथे अस्पृश्यता निवारण परिषद झाली.
   अ) माणगाव ब) बांबवडे
   क) राधानगरी ड) मांगले

५. कोल्हापूर संस्थानात शाहू महाराजांनी ..... साली आंतरजातीय विवाह कायदा पारित केला.

अ)१९१८ ब)१९१९

क) १९२० ड) १९२१

### १.२.३ डॉ. बाबासाहेब आंबेडकर :

हजारो वर्षे गुलामगिरीचे जीवन जगणाऱ्या अस्पृश्य बांधवांना आत्मसन्मानाने जगण्याचा हक्क आणि अधिकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना मिळवून दिला. त्यासाठी त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य खर्ची घातले. अस्पृश्यांना संघटित करून त्यांना स्वतःच्या पायावरती उभे केले. त्यांना ताठ मानेने जगण्यास शिकवले. त्यासाठी विविध चळवळी आणि लढे या देशात उभे केले. विविध शिक्षण संस्थांची स्थापना करून त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणले. डॉ. आंबेडकरांनी केलेल्या कार्याला जगाच्या इतिहासात तोड नाही. त्यांना सामाजिक परिवर्तन नको होते त्यांना व्यवस्था परिवर्तन हवे होते. त्यासाठी त्यांनी भारतीय संविधानाच्या माध्यमातून आपले स्वप्न साकार केले. संविधानाच्या माध्यमातून संपूर्ण देशाला समतेच्या पायावरती उभे करण्याचे महान कार्य केले. याचे सर्व श्रेय डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनाच द्यावे लागते.

#### १.२.३.१ शैक्षणिक कार्य :

सामाजिक आणि धार्मिक गुलामगिरी नाहीशी करण्यासाठी शिक्षणासारखा दुसरा पर्याय नाही हे ओळखून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सुरुवातीपासून शिक्षण प्रसारावर भर दिला. अस्पृश्यांना योग्य संधी दिल्यास ते उच्च विद्याविभूषित होऊ शकतात हे स्वतःचे उदाहरण त्यांनी समाजासमोर ठेवले होते. त्यामुळे अस्पृश्यांना शिक्षण मिळाल्यास त्यांना, त्यांच्या हक्क आणि अधिकारांची जाणीव होईल. म्हणून १९२४ मध्ये डॉ. आंबेडकर यांनी 'बहिष्कृत हितकारणी सभा' या संस्थेची स्थापना केली. या संस्थेच्या माध्यमातून अस्पृश्य समाजासाठी वाचनालय, प्रौढांच्यासाठी रात्रशाळा सुरू केल्या. अस्पृश्य लोकांना शिक्षणासाठी प्रोत्साहित केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सुरू केलेल्या शिक्षण संस्थांच्यामध्ये मानवतेच्या दृष्टिकोनातून दलित विद्यार्थ्यांच्याकडे सहानुभूतीने पाहणाऱ्या आणि त्यांच्या उन्नतीसाठी प्रयत्न करणाऱ्या लोकांची शिक्षक म्हणून नियुक्ती केली. अस्पृश्यांना विशेष सवलती दिल्याखेरीज त्यांची प्रगती होणार नाही, याची जाणीव डॉ. आंबेडकरांना होती. त्यामुळे पुढील काळात जेव्हा घटना समितीमध्ये डॉ. आंबेडकर यांचा समावेश झाला, तेव्हा त्यांनी अस्पृश्य वर्गाच्या सर्वांगीण विकासासाठी आणि प्रगतीसाठी आवश्यक असणाऱ्या सर्व सवलती कशा मिळतील याची काळजी घेतली. इसवी सन १९४६ मध्ये त्यांनी 'पीपल्स एज्युकेशन सोसायटीची' स्थापना केली. या संस्थेच्या वतीने मुंबई येथे 'सिद्धार्थ महाविद्यालय' व औरंगाबाद येथे 'मिलिंद महाविद्यालयाची' स्थापना केली. त्याचबरोबर अस्पृश्य विद्यार्थ्यांच्यासाठी इतर संस्थांची सुद्धा निर्मिती केली. विविध वस्तीगृहांची स्थापना करून दलित विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक समस्या सोडवण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. आपले ग्रंथालय व महाविद्यालय त्यांना उपलब्ध करून दिले. शैक्षणिक प्रगती शिवाय दलित समाज संघटित होणार नाही, आणि त्यांची प्रगती होणार नाही याची जाणीव झाल्यामुळे त्यांनी दलित समाजाच्या शैक्षणिक प्रगतीसाठी विशेष प्रयत्न केल्याचे दिसून येते.

**वृत्तपत्रे :**

दलित समाजाच्या हक्क आणि अधिकारासाठी तसेच त्यांच्यावर होणाऱ्या अन्याय, आत्याचाराला वाचा फोडण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी विविध वृत्तपत्रे काढली व ती चालवली. अस्पृश्यांच्या मुक्ततेचा लढा चालवण्यासाठी वर्तमानपत्रांची नितांत आवश्यकता होती. वर्तमानपत्रे ही समाजाच्या विचाराला चालना देण्याचे काम करतात. अस्पृश्यांची दुःखे जगासमोर मांडून त्यांच्यामध्ये परिवर्तनाचा विचार रुजवणे हा वृत्तपत्र सुरू करण्यामागील डॉ. आंबेडकर यांचा हेतू होता. त्या अनुषंगाने त्यांनी १९२० मध्ये 'मूकनायक' नावाचे पाक्षिक सुरू केले. मूकनायक हे दलित चळवळीचे खऱ्या अर्थाने मुखपत्र बनले. खुद्द शाहू महाराजांनी या मुखपत्राला आर्थिक सहाय्य केले होते. तथापि डॉ. आंबेडकर इंग्लंडला गेल्याने मूकनायक बंद पडले. पुढे १९२७ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी 'बहिष्कृत भारत' हे पाक्षिक नव्याने सुरू केले. हे वृत्तपत्र दोन वर्षे चालले तथापि या पाक्षिकालाही लोकाश्रय न मिळाल्याने ते अल्पजीवी ठरले. पुढे इसवी सन १९२८ मध्ये समता संघातर्फे 'समता' पत्र सुरू झाले. त्यानंतर आंबेडकरांनी जनता, प्रबुद्ध भारत ही वृत्तपत्रे सुरु केली. तथापि ही सर्वच वृत्तपत्रे अल्पजीवी ठरली. असे असले तरी अस्पृश्यांच्या चळवळीला जिवंत ठेवण्याचे काम या वृत्तपत्रांनी केले. या वृत्तपत्रांच्या माध्यमातून त्यांनी दलित समाजाच्या उन्नतीचे कार्य केले. त्यांच्या विचारामुळे दलितांच्यामध्ये स्वाभिमान आणि आत्मसन्मान निर्माण झाला, ज्यामुळे तो संघर्ष करण्यासाठी तयार झाला.

**महत्वपूर्ण ग्रंथ :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समाजाच्या प्रबोधनासाठी आणि परिवर्तनासाठी अनेक ग्रंथांचे लेखन केले. विविध विषयांचा सखोल अभ्यास आणि चिंतन केले. त्यांनी लिहिलेला प्रत्येक ग्रंथ म्हणजे त्यांच्या विद्वतेचा पुरावा आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मराठी भाषेवर प्रभुत्व होते. तथापि त्यांनी सर्व ग्रंथ लेखन इंग्रजीत केले. या पाठीमागचा उद्देश म्हणजे ब्रिटिश राजकर्त्यांना भारतातील सत्य परिस्थितीचे ज्ञान व्हावे हा होता. त्यांचे काही महत्त्वपूर्ण ग्रंथ म्हणजे थॉट्स ऑन पाकिस्तान, इंडियन कॉन्स्टिट्यूशन, द प्रॉब्लेम्स ऑफ द रुपी, हू वेअर दि शुद्राज, लिंग्विस्टिक स्टेटस, बुद्ध अँड हिज धम्म, स्टेटस अँड मायनॉरिटीज इत्यादी. विविध ग्रंथांच्या माध्यमातून भारतातील सामाजिक आणि राजकीय परिस्थितीचे विश्लेषण त्यांनी केले. हिंदू धर्मग्रंथांची मीमांसा केली. याशिवाय, विविध शिक्षण संस्था, वाचनालये, वृत्तपत्रे, सभा, संमेलने, परिषदा इत्यादींच्या माध्यमातून अस्पृश्य समाजाला सुशिक्षित आणि संघटित करण्याचे कार्य केले. तसेच आपल्या हक्क आणि अधिकार प्राप्तीसाठी प्रसंगी संघर्ष करण्यास शिकविले.

### १.२.३.२ सामाजिक कार्य :

**महाडचा सत्याग्रह :**

१९ व २० मार्च, १९२७ रोजी महाड येथील चवदार तळ्याचा सत्याग्रह करण्यात आला. महाडचा सत्याग्रह ही दलितांच्या मुक्ती लढ्यातील महत्त्वपूर्ण घटना होती. हजारो वर्षे गुलामगिरीचे जीवन जगणारा समाज बाबासाहेबांच्या नेतृत्वाखाली प्रथमच इतक्या मोठ्या संख्येने एकत्र आला होता. महाडचा चवदार तळ्याचा सत्याग्रह हा पाण्यासाठी करण्यात आलेला जगातील पहिला सत्याग्रह होता. विशेष म्हणजे १९२३ मध्ये मुंबई विधिमंडळात सार्वजनिक पानवठे, विद्यालये, धर्मशाळा इत्यादी सार्वजनिक ठिकाणी अस्पृश्यना मुक्त

संचार असावा असा मांडलेला ठराव मंजूर करण्यात आला होता. त्यानुसार महाडच्या नगरपालिकेने या ठरावाची अंमलबजावणी सुद्धा केली होती. पण तेथील अस्पृश्य लोकांनी मात्र तळ्यावर जाऊन पाणी भरण्याचे किंवा पाणी पिण्याचे धाडस केले नव्हते. तेव्हा डॉ. आंबेडकर यांनी चवदार तळे हे सार्वजनिक असून ते अस्पृश्यांना खुले केल्याचा महानगरपालिकेचा ठराव आहे. तेव्हा आपण सर्व अस्पृश्य बांधव मिरवणुकीने चवदार तळ्यावर जाऊया व आपल्या बहुसंख्य अनुयायांसह तळ्याचे पाणी प्राशन करूया अशा पद्धतीचा विचार त्यांनी मांडला. डॉ. आंबेडकरांची ही कृती म्हणजे आपण माणूस असून आपणास माणसाचे सर्व अधिकार आहेत, हे देशाला सांगणारी ती एक प्रतीकात्मक कृती होती. परंतु सवर्ण हिंदूंना हे मान्य नव्हते. त्यांनी घरी परतणाऱ्या, एकत्र जेवण करत असलेल्या तसेच खरेदीमध्ये गुंतलेल्या अस्पृश्यांना मारहाण केली. इतकेच नाही तर महाड येथील सवर्ण हिंदूंनी चवदार तळ्यातून एक हजार कळशी पाणी बाहेर टाकून वेदोक्त पद्धतीने विधिपूर्वक तळ्याचे शुद्धीकरण केले. सवर्णांच्या या कृतीबद्दल डॉ. आंबेडकर म्हणतात की, ''आजवर गांधीप्रमाणे अस्पृश्यता हा हिंदू धर्मावरील मोठा कलंक आहे, असे आम्ही ही मानत होतो. पण आता आमची दृष्टी फिरली आहे. तो आमच्या नर देहावरील कलंक आहे असे आम्ही समजतो. त्यामुळे तो धुवून काढण्याचे पवित्र कार्य आता आम्हालाच करावे लागणार आहे.''

वरील घटनेनंतर महाडच्या नगरपालिकेने ४ ऑगस्ट, १९२७ रोजीच्या बैठकीत सार्वजनिक ठिकाणी अस्पृश्यना मुक्तसंचार संबंधित केलेला ठराव रद्द केला. तेव्हा डॉ. आंबेडकर यांनी सर्व शक्तिनिशी संघर्ष करण्याचे ठरवले. त्यासाठी त्यांनी २५ व २६ डिसेंबर, १९२७ रोजी महाड येथे सत्याग्रह परिषद घेण्याचे ठरवले. त्यासाठी गावा-गावातून सत्याग्रहींची नोंदणी सुरू केली. या अहिंसात्मक सत्याग्रहात प्रसंगी तुरुंगात जाण्याची तयारी ठेवावी असे त्यांनी सत्याग्रहींना सांगितले. डॉ. आंबेडकर यांच्या या घोषणेने सवर्ण हिंदू धास्तावले व त्यांनी चवदार तळे हे खाजगी असल्याचा दावा कोर्टात दाखल केला असता, न्यायाधीशांनी चवदार तळ्याकडे जाण्यास बंदी हुकूम काढला. असे असले तरी महाड येथे अस्पृश्यांचा प्रचंड समुदाय एकवटला होता.

यावेळी जमलेल्या अस्पृश्यांना संबोधित करताना डॉ. आंबेडकर म्हणाले की, ''या परिषदेचा उद्देश म्हणजे इतराप्रमाणे आपणही माणूस आहोत हे सिद्ध करण्याकरता या चवदार तळ्यावर जायचे आहे.'' हिंदू समाजातील विषमता नष्ट करून हिंदू समाजास सामाजिक समतेच्या पायावर उभा करणे किती आवश्यक आहे, ही बाब त्यांनी सर्वांच्या निदर्शनास आणून दिली. तसेच याच परिषदेमध्ये शूद्र जातींचा उपमर्द करणारी, त्यांची प्रगती थांबवणारी, त्यांचे आत्मबल नष्ट करणारी तसेच अस्पृश्यांना सामाजिक, राजकीय, आर्थिक गुलामगिरी करण्यास भाग पाडणारी मनुस्मृतीमधील वचने ध्यानात घेऊन 'मनुस्मृती' या धर्मग्रंथाचे दहन करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार मंडपाच्या दारात तयार केलेल्या वेदीवर मनुस्मृतीचे दहन करण्यात आले.

यावेळी कलेक्टर हूड यांनी अस्पृश्यना तळ्यावर जाण्यास बंदी हुकूम असल्याची कल्पना दिली. तथापि सत्याग्रहींचा उत्साह मोठा होता. कोर्टाचा अवमान करून सरकारचा रोष पत्करवायचा व अस्पृश्यांच्या शत्रुत्वात आणखीन सरकारची भर घालायची की, नाही हा परिषदेपुढचा पेच प्रसंग होता. शेवटी डॉ. आंबेडकर यांनी शांतपणे दोन्ही बाजूच्या सभेतील भाषणे ऐकून व प्राप्त परिस्थितीचा पूर्ण विचार करून सत्याग्रह स्थगित करण्याचा निर्णय घेतला. कारण सवर्ण हिंदू व सरकार या दोन्ही आघाड्यावरती एकाच वेळी लढून चालणार नाही याची त्यांना जाणीव होती. म्हणून त्यांनी सत्याग्रहींना आपण मिरवणूक काढू, चवदार तळ्याला वेडा

घालून संपूर्ण बाजारपेठेतून मिरवणूक सभास्थळी आणू असे सांगितले. डॉ. आंबेडकर यांचा हा निर्णय सर्वांनी स्वीकारला आणि मिरवणूक शांतपणे पार पडली. या सत्याग्रहांने अस्पृश्य लोक एकत्र येऊन आपल्या न्याय, हक्कासाठी लढवू शकतात हे सिद्ध झाले. त्याचबरोबर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नेतृत्व संपूर्ण समाजाने स्वीकारले.

**मंदिर प्रवेशाची चळवळ :**

दलितांना सामाजिक न्याय आणि हक्क प्राप्त करून देण्यासाठी या देशांमध्ये अनेक चळवळी निर्माण झाल्या. पण दलितांच्यामध्ये खऱ्या अर्थाने समानतेची आणि स्वाभिमानाची भावना ज्या चळवळीने उत्पन्न केली व ती वाढीस लावली ती चळवळ म्हणजे मंदिर प्रवेशाची चळवळ होय. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मूकनायक, बहिष्कृत भारत, समता, जनता, यासारख्या वृत्तपत्रातून परखडपणे आपले विचार व्यक्त केले. या वृत्तपत्रांच्या माध्यमातून त्यांनी मंदिर प्रवेशाची चळवळ उभी केली. या चळवळीचा केंद्रबिंदू हा 'दलित' होता. तोच या चळवळीचा नायक होता. त्यांना त्यांच्या हक्क आणि अधिकारांची जाणीव करून देण्याबरोबरच स्वतःचे हक्क व अधिकार मागून मिळत नसतील तर ते प्रसंगी हिसकावून घ्यावे लागतात. हा संघर्षवादी विचार या चळवळीद्वारे दलितांना दिला. ही चळवळ दलितांच्या आत्मउन्नतीसाठी होती. त्यामुळे ठिक-ठिकाणी दलितांनी मंदिर प्रवेशासाठी घेतलेली संघर्षाची भूमिका, यामुळे हिंदू धर्मातील विशेषत: सवर्ण हिदुंच्यामध्ये भीतीची भावना निर्माण झाली. हजारो वर्षे दलितांना मंदिर प्रवेशापासून वंचित ठेवलेल्या सवर्णांना मंदिरे खुली करून देण्याची मानसिकता अजून तयार झालेली नव्हती. त्यामुळे सवर्ण हिंदू आणि दलित यांच्यामध्ये संघर्ष घडून येणे अपेक्षित होते. अशा परिस्थितीत वेगवेगळ्या मार्गाने दलितांच्यावरती दबाव आणण्याचा प्रयत्न सुरू झाला होता. अनेक ठिकाणी मारहाण, बहिष्कार अशा घटना घडत होत्या.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारातून अंबादेवी मंदिर प्रवेश सत्याग्रह (१९२८), पुणे येथील पर्वती मंदिर प्रवेश सत्याग्रह (१९२९), काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रह (१९३०) हे महत्वाचे सत्याग्रह घडून आले. पण या सत्याग्रहाच्या वेळी दलित लोकांना मोठा विरोध करण्यात आला. तथापि ऑक्टोबर, १९२९ मध्ये पुण्यातील पर्वती मंदिरात प्रवेश करण्यासाठी पहिला सत्याग्रह करण्यात आला, त्यावेळी सत्याग्रहींना मारहाण करण्यात आली. पोलिसांमध्ये पडून ही दंगल नियंत्रणात आणली. नाशिकच्या मंदिर प्रवेशाची चळवळ महाराष्ट्रात गाजली. १९३१ साली नाशिक येथील प्रसिद्ध काळाराम मंदिरात प्रवेश मिळवण्यासाठी हजारोंच्या संख्येने सत्याग्रही एकत्र आले. तथापि मंदिर प्रवेशाचा निर्णय ताबडतोब लागला नाही. त्यामुळे १९३५ पर्यंत हा लढा चालू राहिला. एलिचपुर येथील दत्त मंदिर अस्पृश्यांसह सर्व हिंदूंना खुले करण्यात आले. अमरावतीचे आंबेचे देऊळ, सोलापूरचे सिद्धेश्वर देऊळ येथे सत्याग्रह करण्याच्या योजना आखल्या गेल्या. वरील मंदिर प्रवेश सत्याग्रह चळवळीतून अस्पृश्यांना आत्मबळ मिळाले.

**स्त्री उन्नतीचे कार्य :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी महाड मुक्कामी 'मनुस्मृती' या ग्रंथाचे दहन करुन मानव मुक्तीच्या कार्याला खऱ्या अर्थाने सुरुवात केली. त्यांनी भारतीय स्त्रीला तिच्या हक्काची आणि अधिकाराची जाणीव करुन दिली. तिच्या या परिस्थितीला तिचे अज्ञान जबाबदार असून तिला संघटीत करणे गरजेचे आहे. हे ओळखून डॉ.

बाबासाहेब आंबेडकर यांनी स्त्रीयांच्या काही सभा, परिषदा घेतल्या व स्त्रियांशी संवाद साधला. स्त्री स्वातंत्र्याचा प्रश्न हा जाती प्रश्नाशी निगडित आहे. याची पक्की खात्री झाल्यामुळे त्यांनी समाजात रोटी-बेटी व्यवहार झाले पाहिजेत. त्यासाठी लोकांनी मिश्र-विवाहाचा पुरस्कार करायला हवा अशी त्यांनी ठाम भूमिका घेतली.

स्त्रियांच्या उन्नतीच्यादृष्टीने अत्यंत महत्त्वाचे असणारे हिंदू-कोड बिल कायदामंत्री असताना डॉ. आंबेडकर यांनी संसदेत चार वेळा मांडले. हिंदू-कोड बिलामुळे स्त्रीयांना त्यांचे हक्क, अधिकार मिळणार होते. पण तत्कालीन पुरूषी मानसिकता असलेल्या लोकांनी या विधेयकास विरोध केला. त्यामुळे स्त्री हिताचे रक्षण करणारे हे बील पास होऊ शकले नाही. याची खंत डॉ. आंबेडकरांना होती. पण ही उणीव संविधान निर्माण करत असताना त्यांनी भरून काढली. त्यांनी भारतीय संविधानात महिलांना सक्षम करणाऱ्या कायद्यांची तरतुद करून ठेवली. ज्यामुळे महिलांना घटस्फोटाचा अधिकार, पोटगी मागण्याचा अधिकार, दत्तक घेण्याचा अधिकार, वडिलोपार्जित संपत्तीत हिस्सा मिळवण्याचा अधिकार, स्वतःच्या मिळकतीवरचा अधिकार, मुलीला वारसा घेण्याचा अधिकार, आंतरजातीय विवाह करण्याचा अधिकार, स्वतःचा वारसा निश्चित करण्याचा अधिकार प्राप्त झाला. ज्यामुळे स्त्रीयांचे सक्षमीकरण शक्य झाले. मजूरमंत्री असताना त्यांनी गरोदर मातांना आरोग्याच्या सोयी उपलब्ध व्हाव्यात तसेच त्यांच्या कामाच्या वेळाही निश्चित केल्या जाव्यात असा ठराव मांडला. इतकेच नाहीतर त्यांनी स्त्रियांच्याकडे माणूस म्हणून बघण्याचा आदर्श व परिवर्तनवादी दृष्टिकोन भारतीय समाजास दिला. स्त्री-पुरुष समानतेचा पाया त्यांनी भारतीय संविधानाद्वारे घातला. एक मत, एक मूल्य या विचाराने मतदानाचा अधिकार देऊन एका झटक्यात राजकीय समता प्रस्थापित केली. जगातील कोणत्याही देशात हा मतदानाचा अधिकार स्त्रीला संघर्षाविना मिळालेला नाही, हे लक्षात घ्यायला हवे. फक्त मतदानाचा अधिकारच नाही तर नोकरी, शिक्षण, संपत्ती यामध्ये समान अधिकार संविधानाने स्त्रियांना दिलेले आहेत. संविधानातील ७४ व्या घटनादुरुस्तीने स्त्रीयांना ३३ टक्के आरक्षण देण्यात आले. ज्यामुळे ग्रामपंचायत सदस्य पदापासून राष्ट्रपती पदापर्यंत भारतीय स्त्रियां विराजमान झाल्या आणि देशाची दिशा ठरवू लागल्या. सामजिक, राजकीय आणि आर्थिकदृष्ट्या ती सक्षम झाली. तिला माणूस म्हणून जगण्याचे सर्व हक्क आणि अधिकार प्राप्त झाले. तिच्या जगण्याच्या दाही दिशा स्वतंत्र, मुक्त झाल्या. भारतीय 'स्त्री स्वातंत्र्याचा हा जाहीरनामा' महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिला. याची जाणीव तमाम भारतीय स्त्रियांनी ठेवली पाहिजे.

### १.२.३.३ पुणे करार :

पुणे करार हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर व महात्मा गांधी यांच्यामध्ये १९३२ मध्ये घडून आला. विधिमंडळातील अस्पृश्यांच्या राखीव जागांसंबंधी हा करार झाला होता. इसवी सन १९३१ च्या अखेरीस झालेल्या दुसऱ्या गोलमेज परिषदेत अल्पसंख्यांकांच्या प्रतिनिधित्वाचा विचार झाला. त्यानुसार मुस्लिम व शीख यांना स्वतंत्र मतदारसंघ देण्याचे मान्य करण्यात आले होते. त्यामुळे अस्पृश्यांना देखील योग्य प्रतिनिधित्व व राजकीय हक्क मिळाले पाहिजेत. यासाठी डॉ. आंबेडकरांनी अस्पृश्यांच्या राखीव जागांचा व स्वतंत्र विभक्त मतदार संघाची मागणी लावून धरली. परंतु महात्मा गांधींनी त्यास विरोध केला. तेव्हा यासंदर्भातील निर्णय घेण्याची जबाबदारी ब्रिटिश पंतप्रधान 'रॅम्से मॅकडोनाल्ड' यांच्याकडे देण्यात आली. रॅम्से मॅकडोनाल्ड यांनी १४ ऑगस्ट, १९३२ रोजी जातीय निवाडा प्रसिद्ध करून डॉ. आंबेडकरांची मागणी मान्य केली. तेव्हा गांधींजीनी

याला प्रखर विरोध केला. अस्पृश्यांना हिंदूमधून फोडण्याचा हा ब्रिटिशांचा डाव आहे, असे मत देऊन या विरोधात त्यांनी २० सप्टेंबर, १९३२ पासून प्राणांतिक उपोषण सुरू केले. सुरुवातीस गांधी यांचे उपोषण म्हणजे राजकीय स्टंट आहे, असे समजून आंबेडकरांनी तडजोड करण्यास नकार दिला. परंतु गांधींजीच्या प्रकृतीची काळजी सर्वत्र निर्माण झाली. एका बाजूला डॉ. आंबेडकरांना गांधींचे प्राण मोलाचे वाटत होते. तर दुसऱ्या बाजूला सहा-सात कोटी अस्पृश्य बांधवांचे राजकीय भवितव्य अधिक महत्त्वाचे वाटत होते. त्यांच्या मनाची द्विधावस्था झाली होती. महात्मा गांधींच्या प्राणांतिक उपोषणामुळे डॉ. आंबेडकर यांच्यावर दबाव येत होता. त्यांच्यावर तारा, पत्रे, भेटी, निंदा, धमक्या यांचा वर्षाव होत होता. शेवटी. बॅरिस्टर मु. रा. जयकर, तेजबहादुर सप्रू, पंडित मदनमोहन मालवीय यांच्या मध्यस्थीनंतर ते तडजोडीस तयार झाले. डॉ. आंबेडकरांनी पुणे येथे १९३२ साली या करारास मान्यता दिल्यानंतर स्वतंत्र मतदारसंघाचे कलम रद्द करण्यात आले व राखीव मतदार संघ स्वीकारले गेले. डॉ. आंबेडकरांनी मोठ्या मनाने माघार घेऊन महात्मा गांधींचे प्राण वाचवले. यासंदर्भात धनंजय किर म्हणतात की, गांधीजींचे प्राण वाचवून आंबेडकर 'महात्मा' बनले.

### १.२.३.४ राजकीय पक्ष संघटना :

देशाच्या राजकारणात प्रत्यक्ष भाग घेतल्याशिवाय अस्पृश्य वर्गाचे दुःख दूर करता येणार नाही. यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १९३५ मध्ये 'स्वतंत्र मजूर पक्षाची' स्थापना केली. त्यांचे काम हे कष्टकरी जनतेच्या कल्याणासाठी असल्याने त्यांनी दलित शब्दाऐवजी मजूर हा शब्द आपल्या पक्षासाठी वापरला. या पक्षाची बांधणी आदर्श व काटक नियमावर केलेली होती. इसवी सन १९३७ च्या सार्वत्रिक निवडणुकीत या पक्षाने प्रथमच लढवलेल्या १७ जागा पैकी १३ जागा जिंकल्या. मुंबई प्रांतात या पक्षाला विरोधी पक्ष म्हणून मान्यता मिळाली. अल्पावधीत उदयास आलेल्या मजूर पक्षाने तत्कालीन भारतीय राजकारण प्रभावित केले. स्वत: डॉ. आंबेडकर या निवडणुकीत निवडून आले होते. त्यांनी या काळात विविध विषयावर आपली मते मांडून अस्पृश्यांच्या हिताचे रक्षण केले. पुढे १९३६ ते १९४२ या काळात मजूर पक्षाने कामगार, शेतकरी व शेतमजुरांचे प्रश्न याविषयी विधिमंडळात व बाहेर आवाज उठवला. तसेच औद्योगिक कलहबिल रद्द करण्यासाठी, वतनदारीची खोतीची पद्धत रद्द करण्यासाठी आवाज उठावला. मजूर मंत्री म्हणून काम करताना डॉ. आंबेडकरांनी कामगारांच्या हिताचे निर्णय घेतले. कामगारांच्या कामाचे तास आठ केले. मजुरांना निवारा व त्यांच्या मुलांच्या शिक्षणाची सोय केली. मोफत वैद्यकीय उपचारची पद्धत सुरू केली.

दलितांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टिकोनातून त्यांनी १९ जुलै, १९४२ रोजी अखिल भारतीय शेड्युल्ड कास्टस फेडरेशन ची स्थापना केली. १९५२ साली झालेल्या निवडणुकीत फेडरेशनने २२ जागांपैकी फक्त १३ जागा जिंकल्या. स्वतः बाबासाहेब मुंबईच्या राखीव जागेतून निवडून आले नाहीत. फेडरेशनला पराभव स्वीकारावा लागला. पुढे सर्व जाती धर्माच्या लोकांना सामावून घेणारा असा एखादा नवीन पक्ष असावा असे त्यांना वाटत होते, त्यामुळे या शेड्युल कास्टस फेडरेशनचे रूपांतर रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया या राजकीय पक्षात करण्याचा त्यांचा मनोदय होता. परंतु दुर्दैवाने तत्पूर्वी त्यांचे ०६ डिसेंबर, १९५५ रोजी महापरिनिर्वाण झाले. पण त्यांचे अपूर्ण स्वप्न त्यांच्या अनुयायांनी पूर्ण केले. इसवी सन १९५७ मध्ये रिपब्लिक पार्टी ऑफ इंडिया या पक्षाची स्थापना झाली.

### १.२.३.५ भारतीय घटनेचे शिल्पकार :

स्वतंत्र भारताच्या पहिल्या मंत्रिमंडळामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा कायदामंत्री म्हणून समावेश करण्यात आला होता. तसेच स्वतंत्र भारताच्या घटना समितीमधील मसुदा समितीची प्रमुख जबाबदारी त्यांच्यावर देण्यात आली होती. त्यांनी अत्यंत परिश्रम घेऊन ही जबाबदारी यशस्वीपणे पार पाडली. म्हणून त्यांना भारतीय घटनेचे शिल्पकार म्हटले जाते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय संविधानात स्वतंत्र भारताच्या कायदेशीर व्यवस्थेची रचना केली असून भारतीय संविधान हे जगातील कोणत्याही सार्वभौम देशाचे सर्वात मोठे लिखित संविधान मानले जाते. २६ नोव्हेंबर, १९४९ रोजी संविधान सभेने या संविधानास मान्यता दिली तर २६ जानेवारी, १९५० पासून ते अंमलात आले. अस्पृश्यतेचे निर्मूलन करणाऱ्या तरतुदी, दलित जाती-जमातींच्या राखीव जागांची सोय, लोकसभा-विधानसभेतील राखीव जागा, सरकारी नोकरी व इतर क्षेत्रात राखीव जागा, शैक्षणिक सोयी-सवलती, संरक्षणात्मक तरतुदी, त्यांच्या अंमलबजावणीसाठी स्वतंत्रपणे मूल्यमापनाची यंत्रणा इत्यादीमुळे अस्पृश्य, स्त्रिया, शेतकरी, कामगार, शेतमजूर, कष्टकरी इत्यादींची परिस्थिती सुधारण्यास मदत झाली. याचे सर्व श्रेय डॉ. आंबेडकर यांना जाते. त्यांनी केलेल्या या मानवतावादी कार्याबद्दल धनंजय कीर म्हणतात की, या युगातील पहिल्या श्रेणीतील अलौकिक पुरुषांमध्ये त्यांचे स्थान आहे. जे आजवर जगात दलितांचे रक्षणकर्ते व कैवारी होऊन गेले, मानवी स्वातंत्र्याचे शिल्पकार होऊन गेले, त्यात त्यांचे स्थान उच्च आहे.

**स्वयंअध्ययनासाठी प्रश्न – ३**

**(अ) खालीलपैकी योग्य पर्याय निवडा.**

१. दलितांच्या मुक्तीसाठी डॉ. आंबेडकरांनी १९२७ मध्ये ..... सत्याग्रह केला.
   अ) काळाराम मंदिर  ब) गोलमेज परिषद
   क) महाड  ड) पर्वती

२. डॉ. बाबासाहेब आंबेडकर भारतीय घटनेच्या ..... समितीचे अध्यक्ष होते.
   अ) आर्थिक  ब) न्याय
   क) मसुदा  ड) रचना

३. १९२० साली डॉ. आंबेडकरांनी ..... हे वृत्तपत्र सुरू केले.
   अ) मूकनायक  ब) जनता
   क) प्रबुद्ध भारत  ड) बहिष्कृत भारत

४. पुणे करार डॉ. आंबेडकर आणि ..... मध्ये झाला.
   अ) पंडित नेहरू  ब) महात्मा गांधी
   क) यशवंतराव चव्हाण  ड) राजर्षी शाहू महाराज

५. २६ जानेवारी, ..... पासून भारतीय घटनेची अंमलबजावणी झाली.

अ) १९५०　　ब) १९५१

क) १९४६　　ड) १९५५

## १.३ सारांश :

आधुनिक महाराष्ट्राच्या आणि देशाच्या जडणघडणीत महात्मा फुले, राजश्री छत्रपती शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान मोलाचे आहे. महात्मा फुलेंनी स्त्रिया आणि अस्पृश्यांच्या शिक्षणाचा पुरस्कार केला. त्यासाठी शाळांची स्थापना केली. स्वतःबरोबर सावित्रीबाई यांना साक्षर करून ज्ञानाची ही गंगा समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न केला. तर सत्यशोधक समाजाच्या माध्यमातून समाज जागृती घडवून आणली. पुढे शाहू महाराजांनी आपल्या संस्थानांमध्ये बहुजनांच्या उधाराची चळवळ हाती घेतली. त्यांनी अस्पृश्य, स्त्रिया आणि शेतकरी यांच्यासाठी प्राथमिक शिक्षणापासून उच्च शिक्षणापर्यंत सर्व सुविधा उपलब्ध करून दिल्या. त्यासाठी वस्तीगृह चळवळ हाती घेतली. स्त्री उद्धाराचे कायदे केले तसेच बहुजन समाजाच्या राजकीय हक्कासाठी ब्राह्मणेत्तर चळवळीला सक्रिय पाठिंबा दिला. पुढे विसाव्या शतकात डॉ. आंबेडकर यांनी खऱ्या अर्थाने दलितांच्या उन्नतीची चळवळ हाती घेतली. सामाजिक समतेसाठी त्यांनी चवदार तळे सत्याग्रह आणि मंदिर प्रवेश चळवळ उभी केली. दलितांना त्यांच्या हक्क आणि अधिकाऱ्यांची जाणीव करून दिली. त्यांच्या राजकीय हक्कासाठी स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना केली. पुढे स्वतंत्र भारताचे संविधान निर्माण करत असताना त्यांनी स्त्रिया, कामगार, शेतकरी, कष्टकरी मजूर यांच्या हिताचे कायदे करून सामाजिक आणि राजकीय समता प्रस्थापित केली. आधुनिक महाराष्ट्राच्या आणि देशाच्या इतिहासात सामाजिक सुधारणा चळवळींचे महत्त्व अन्यनसाधारण आहे. या चळवळींनी भावी स्वातंत्र्याची पार्श्वभूमी तयार करण्याचे काम केले असे म्हणता येईल.

## १.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ :

१) **अस्पृशता :** अवरुणता, अवर्णभाव, जातपात, अस्पृश्य, अपवित्रता इ.

२) **अनुष्ठान :** अभिषेक, पूजा, पाठ, होम, हवन इ.

३) **पुरोगामी :** आधुनिक

४) **निर्मिक :** निर्माता

५) **विषमता :** असमानता

६) **आपत्ती :** संकट

७) **मक्तेदारी :** वर्चस्व

८) **आसूड :** चाबूक

९) **निर्मूलन :** एखाद्या गोष्टी पासून मुक्त होण्याची प्रक्रिया

१०) **बहिष्कृत :** हद्दपार, दूर केलेला इ.

११) **उन्नती :** प्रगती

**१२) सार्वभौम :** कोणत्याही बाह्यशक्तीचा प्रभाव नसणे.

## १.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे :

**स्वयंअध्यनासाठी प्रश्न – १**

अ) खालीलपैकी योग्य पर्याय निवडा.

१) सत्यशोधक समाज २) महात्मा फुले ३) महात्मा फुले ४) महात्मा फुले ५) सावित्रीबाई फुले

**स्वयंअध्यनासाठी प्रश्न – २**

ब) खालीलपैकी योग्य पर्याय निवडा.

१) १९१७ २) मिस क्लार्क ३) १९०६ ४) माणगाव ५)१९१९

**स्वयंअध्यनासाठी प्रश्न – ३**

क) खालीलपैकी योग्य पर्याय निवडा.

१) महाड २) मसुदा ३) मूकनायक ४) महात्मा गांधी ५) १९५०

## १.६ सरावासाठी स्वाध्याय :

**अ) टिपा लिहा.**

१) सत्यशोधक समाज

२) महात्मा फुले यांनी शेतकऱ्यांसाठी केलेले कार्य

३) ब्रम्हणेत्तर चळवळ

४) शाहू महाराजांची महिला उद्धाराची चळवळ

५) काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रह

**ब) खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.**

१) महात्मा फुले यांचे साहित्य क्षेत्रातील कार्य सांगा.

२) राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचे अस्पृश्यता निर्मूलन कार्य विशद करा.

३) राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचे महिला उद्धाराचे कार्य स्पष्ट करा.

४) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सामाजिक कार्य स्पष्ट करा.

५) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे वृत्तपत्रीय कार्य सांगा.

**क) खालील प्रश्नांची सविविस्तर उत्तरे लिहा.**

१) महात्मा फुले यांचे सामाणिक व शैक्षणिक कार्याची सविस्तर माहिती द्या.

२) राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचे शिक्षण क्षेत्रातील योगदान स्पष्ट करा.

३) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे अस्पृश्यांच्या उन्नतीचे कार्य सविस्तर सांगा.

४) महात्मा फुले यांची ग्रंथसंपदा सविस्तर सांगा.

५) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक कार्याची सविस्तर माहिती लिहा.

## १.७ अधिक वाचनासाठी पुस्तके :


१. किर धनंजय, महात्मा ज्योतिराव फुले, पॉप्युलर प्रकाशन मुंबई, १९६८.

२. नरके हरी (संपा.) महात्मा फुले साहित्य आणि चळवळ, डॉ. आंबेडकर महात्मा फुले आणि राजर्षी शाहू चरित्र साधने प्रकाशन समिती, महाराष्ट्र शासन मुंबई, २००६.

३. फडके य. दी (संपा.), महात्मा फुले समग्र वाड:मय, महाराष्ट्र साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, १९९१.

४. गाठाळ एस. एस., महाराष्ट्रातील समाजसुधारक : विचारधारा व कार्य, कैलास पब्लिकेशन औरंगाबाद, २०१४.

५. पाटगावकर चंद्रकांत, समतेच्या दिंडीचे धारकरी, कल्पक प्रकाशन, कोल्हापूर, २०००.

६. नरके हरी, शोधाच्या नव्या वाटा, महात्मा ज्योतिराव फुले चरित्र साधने प्रकाशन समिती, महाराष्ट्र शासन, मुंबई, १९९८.

७. वैद्य प्रभाकर, महात्मा फुले आणि त्यांची परंपरा प्रेरणा : शिकवण-विपर्यास, लोकवाङ्मय गृह प्रकाशन, मुंबई, २०१६.

८. पवार जयसिंगराव, राजर्षी शाहू-एक दृष्टिक्षेप कोल्हापूर, १९८९.

९. पवार जयसिंगराव, राजर्षी शाहू छत्रपती -एक मागोवा, मेहता पब्लिकेशन हाऊस कोल्हापूर, २०१८.

१०. पवार जयसिंगराव, राजर्षी शाहू छत्रपती जीवन व कार्य, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर, २०१७.

११. पाटील अवनीश (संपा.), राजर्षी शाहू छत्रपती विचारवेध, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, २०२४

१२. किर धनंजय, प्रेषित राजर्षी छत्रपती शाहू, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, १९७०.

१३. पवार जयसिंगराव (संपा.), श्री शाहूंचे चरित्र, कुलसचिव शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, २००९.

१४. हरेल केशव, राजर्षी शाहू महाराज यांचे राजकीय विचार, निर्मिती विचारमंच, कोल्हापूर, २००५.

१५. किर धनंजय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर-चरित्र, पॉपुलर प्रकाशन, १९६६.

१६. पंतावणे ग., पत्रकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर, फातिमा प्रकाशन, पुणे, १९९६.

१७. आठलेकर मंगला, महापुरुषांच्या नजरेतून स्त्री, राजहंस प्रकाशन, पुणे, २००९.

१८. नरके हरी (संपा.), डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे खंड १९ (प्रथम आवृत्ती), डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समिती, उच्च आणि तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, २००५.

१९. साथी सत्यरंजन, भारताच्या राज्यघटनेची पन्नास वर्षे, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, २००२.

२०. काणे पी. व्ही., राजकीय सिद्धांत आणि राजकीय विचार, पिंपळापुरे प्रकाशन, पुणे, २०००.

२१. भोळे बी. एल., भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण, पिंपळापुरे प्रकाशन, नागपूर,२०१२.

❖❖❖

घटक २

# प्रजापक्षीय चळवळ विशेष संदर्भ दक्षिणेकडील संस्थाने

## (People's Struggle with Special Reference to Southern Maratha Country)

अनुक्रमणिका


२.० उद्दिष्टे

२.१ प्रास्ताविक

२.१.१ संस्थान म्हणजे काय?

२.१.२ भारतीय संस्थानांची संख्या

२.१.३ दक्षिणी संस्थाने (एस. एम. सी. स्टेटस्)

२.१.४ दक्षिणी संस्थानातील राजवटींचे स्वरूप

२.१.५ संस्थानातील जागृतीची कारणे

२.२ विषय विवेचन

२.२.१ कोल्हापूर

२.२.२ सांगली

२.२.३ फलटण

२.३ सारांश

२.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

२.५ स्वयं अध्ययन प्रश्न व उत्तरे

२.६ सरावासाठी स्वाध्याय

२.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ

## २.० उद्दिष्टे :

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला खालील माहिती स्पष्ट करता येईल.

१) संस्थांनी भारत व ब्रिटीश भारत म्हणजे काय हा फरक समजून येईल.

२) दक्षिणी संस्थाने हि संकल्पना स्पष्ट होईल.

३) प्रजापक्षीय चळवळ म्हणजे काय व संस्थानातील प्रजापक्षीय चळवळ सुरु होण्याची करणे समजून येतील.

४) कोल्हापूर संस्थानातील झालेली प्रजापक्षीय चळवळ समजून घेता येईल.

५) सांगली संस्थानातील चळवळीच्या मागण्या स्वरूप लक्षात येईल.

६) फलटण संस्थानातील चळवळ व राजाची भूमिका काय होती हे लक्षात येईल.

७) दक्षिणी संस्थानांचे भारतीय संघराज्यात झालेले विलीनीकरण समजून घेता येईल.

## २.१ प्रास्ताविक :

भारतातील वसाहतिक कालखंड हा युरोपियन देशांनी सत्ता प्रस्थापित करण्याचा कालखंड समजला जातो. सन १७५७ मधील प्लासीच्या लढाईने भारतात ब्रिटीश सत्तेचा पाया घातला गेला. त्यावेळी भारतामध्ये कोणतीही एकसंघ सत्ता नव्हती. भारत हा लहान मोठ्या राजकीय सत्तांमध्ये विभागला होता. ब्रिटीशांनी भारतीय प्रदेश आपल्या ताब्यात घेतले व आपल्या सोयीच्या दृष्टीने येथे वसाहतिक प्रशासन व्यवस्था निर्माण केली. ब्रिटीशांनी भारताची दोन भागामध्ये विभागणी केलेली होती. पहिल्या विभागात ब्रिटीशांनी जिंकलेला भारत 'खालसा भारत' (British India) ज्याच्यावर ब्रिटीशांचे थेट नियंत्रण होते व दुसरा विभाग म्हणजे संस्थानिकांच्या अधिपत्याखाली असलेला 'संस्थांनी भारत' (Princely India) असे दोन विभाग होते. ब्रिटिशांनी जिंकून घेतलेल्या खालसा प्रदेशापेक्षा संस्थांनी प्रदेश हा मागासलेला होता; शिवाय संस्थानिकांच्या जुलमाखाली संस्थांनी जनता भरडली जात होती. खालसा भारतामध्ये सन १८८५ मध्ये भारतीय राष्ट्रीय सभेच्या स्थापनेबरोबर ब्रिटीशांच्या विरोधात स्वातंत्र्य चळवळीची सुरुवात झाली होती. पण अशा स्वरुपाची कोणतीही चळवळ 'संस्थांनी भारत' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या प्रदेशात झालेली नव्हती. कालांतराने खालसा भारतातील स्वातंत्र्य चळवळीचा प्रभाव संस्थांनी जनतेवर ही पडला आणि संस्थानामध्ये प्रजा परिषदांची स्थापना होवून चळवळीसाठी पोषक वातावरण तयार झाले व आपल्या हक्क अधिकारासाठी लढा सुरु झाला.

### २.१.१ संस्थान म्हणजे काय?

भारतीय संस्थानांचा अभ्यास करताना संस्थान म्हणजे काय हे पाहणे आवश्यक आहे. देशी संस्थाने म्हणजे एक असा राजकीय समाज होता की, ज्याने निश्चित सीमा असलेला एकाद्या भारतातील प्रांत व्यापलेला आहे. या भागावर राजा म्हणून एका जबाबदार व्यक्तीची नियुक्ती झालेली असे. त्याला एका विशिष्ठ मर्यादेत काही हक्क व अधिकार प्राप्त झालेले असत. शिवाय या सर्वाना सर्वोच्च ब्रिटिश सरकारची मान्यता प्राप्त झालेली असे. तात्त्विकदृष्ट्या अनियंत्रित राजसत्ता हेच सर्व संस्थानाचे वैशिष्ट्य होते. प्रत्यक्षात ब्रिटीश सरकारच्या

अधिकाऱ्यांचे त्यावर नियंत्रण असे. १८५८ पर्यंत लहान संस्थानांवर जिल्हाधिकारीसुद्धा हे नियंत्रण ठेवी. कोणत्या ब्रिटिश अधिकाऱ्याचे कोणत्या संस्थानावर वा संस्थान समूहावर नियंत्रण असावे, हे ब्रिटिश राजकीय विभाग ठरवी. त्यात सतत बदल होत असत.

### २.१.२ भारतीय संस्थानांची संख्या :

भारतातील संस्थानांच्या संख्येबाबत भिन्नता आढळते. बटलर कमिटी व सायमन कमिशनने भारतीय संस्थानांची संख्या ही ५६२ इतकी दिली आहे. तर संसदीय कमिटीने भारतात असलेल्या संस्थानांची संख्या ६०० इतकी दिली आहे. याचबरोबर भारत सरकारच्या संस्थान मंत्रालयाने याच संस्थानांची संख्या ५८४ दिली आहे. या भारतीय संस्थानांमध्ये असा संख्यात्मक फरक जरी असला, तरी बटलर कमिटी व सायमन कमिशनने दिलेली ५६२ ही संस्थानांची संख्या अधिक ग्राह्य मानली जाते.

### २.१.३ दक्षिणी संस्थाने (एस. एम. सी. स्टेटस्) :

एकीकडे ब्रिटिश सत्ता संस्थानांना आपल्या वर्चस्वाखाली ठेवण्याचे प्रयत्न करीत होती, तर दुसरीकडे संस्थानी प्रजेत जागृती होऊन संस्थानांमध्ये जबाबदार राज्यपध्दतीची मागणी जोर धरत होती. विसाव्या शतकाच्या दुसऱ्या दशकाच्या शेवटी दक्षिणी संस्थानांमध्ये जागृतीस सुरूवात झाली व तिसऱ्या दशकात संस्थान हितवर्धक सभेची स्थापना होऊन दक्षिणी संस्थानांमधील आंदोलनास चालना मिळाली. या दक्षिणी संस्थानांमध्ये अक्कलकोट, औंध, भोर, जमखंडी, जंजिरा, जत, कुरूंदवाड थोरली पाती, कुरूंदवाड धाकटी पाती, मिरज, मिरजमळा, मुधोळ, फलटण, रामदुर्ग, सांगली, सावनूर, सावंतवाडी व कोल्हापूर या आठरा संस्थानांचा समावेश होत होता. या संस्थानांच्या गटाला इंग्रजीमध्ये Southern Maratha Country States म्हणजेच एस. एम. सी. स्टेटस् असेही म्हटले जात होते. त्यापैकी कोल्हापुर हे सर्वात मोठे व १९ तोफांचा सलामीचा मान असलेले असे मराठयांचे संस्थान होते. या संस्थानांचे साधारणत: तीन वर्ग पडतात ते खालीलप्रमाणे –

१. छत्रपतीशी संबंधीत असलेली

२. पेशवाईत उदयास आलेली

३. मुस्लीम सत्ताधिशांनी निर्माण केलेली

पेशवाईच्या ऱ्हासाच्या काळात या संस्थानांनी आपआपले स्वतंत्र अस्तित्व निर्माण केले होते. औंध व भोर या संस्थानांचे राज्यकर्ते हे ब्राम्हण होते. सातारच्या छत्रपतीकडून या संस्थानांच्या पुर्वजांना जहागीर दिलेल्या होत्या. सांगली, वाडीजहागिर, रामदुर्ग, जमखंडी, मिरज सिनियर, मिरज ज्युनियर, कुरूंदवाड सिनियर व ज्युनियर या संस्थानांना पटवर्धनी संस्थाने म्हणून ओळखले जाते. याही संस्थानांचे संस्थानिक ब्राम्हणच होते. यांचा उदय पेशव्यांच्या काळात झाला होता. जंजिरा आणि सावनूर या संस्थानांचे राज्यकर्ते हे मुस्लिम होते. याच्याशिवाय कोल्हापूर, फलटण, मुधोळ, अक्कलकोट, जत व सावंतवाडी या संस्थानाचे संस्थानिक हे मराठा होते.

### २.१.४ दक्षिणी संस्थानातील राजवटींचे स्वरूप :

भारतीय इतर संस्थानांच्या तुलनेत महाराष्ट्रातील संस्थानांमध्ये ब्रिटिश सरकारचा हस्तक्षेप इतका जास्त

नव्हता. क्वचित प्रसंगी संस्थानाचे वारसदार हे अज्ञानी असल्यासच प्रशासकीय प्रमुखाची नियुक्ती करून तेथील राज्यकारभार ब्रिटिशांकडून केला जात असे. सांगली संस्थानाचा राज्यकारभार हा सन (१९०५ ते १९१०) पर्यंत श्रीमंत चिंतामनराव पटवर्धन अज्ञानी असल्यामुळे कॅप्टन बर्क यांनी केला. तसाच प्रकार कुरूंदवाड थोरली पाती संस्थानामध्ये सन (१९२७ ते १९३९) पर्यंत पॉलिटिकल एजंट यांच्याकडे होता. प्रत्येक संस्थानांच्या राज्यकारभारावर देखरेख करण्याकरता पोलिटिकल एजंटची नियुक्ती केलेली होती.

दक्षिणी संस्थानांच्या बहुतेक संस्थानिकांनी स्वेच्छेनुसार राज्यकारभार केल्यामुळे दक्षिणी संस्थानातील राज्यव्यवस्थेला एकतंत्री राजेशाहीचे स्वरूप आले होते. म्हणून या दक्षिणी संस्थानातील प्रजा या एकतंत्री राजेशाही संबंधी असंतोषी व असमाधानी बनली होती. या दक्षिणी संस्थानिकांनी आपल्या प्रजेला त्यांच्या समाधानासाठी काही राजकीय सुधारणा टप्याटप्याने देण्याचा प्रयत्न केला. पण तरीही या असंतुष्ट असमाधानी असलेल्या संस्थानी प्रजेने आपल्या स्वत:च्या सामर्थ्यावर संघटीत होऊन आपल्या न्याय्य मागण्यांसाठी प्रजापरिषदेच्या माध्यामातून चळवळ उभी केली.

अठरा दक्षिणी संस्थानांनी आजच्या महाराष्ट्राचा बराचसा भाग व कर्नाटकचा काही भाग व्यापला होता. यातील वाडीजहागीरसारखे संस्थान केवळ १२ चौ. मैल क्षेत्रफळ असणारे व २०२२ लोकसंख्येचे तर वार्षीक उत्पन्न केवळ ९००० रूपये इतके होते. या दक्षिणी संस्थानामध्ये आकाराने मोठे असणारे कोल्हापूर संस्थान होते. त्याचे क्षेत्रफळ ३२१७ चौ. मैल, लोकसंख्या १०,९२,०४६ व वार्षीक उत्पन्न ५९,९३,५७८ हजार रूपये होते.

### २.१.५ संस्थानातील जागृतीची कारणे :

**१. वेगवेगळे कायदे :**

भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या स्थापनेनंतर प्रथम सन १९२० मध्ये काँग्रेसच्या नागपूर अधिवेशनात संस्थानिकांनी आपल्या संस्थानात जबाबदार राज्यपध्दतीने राज्यकारभार सुरू करावा असा ठराव करण्यात आला. यावेळेपर्यंत सर्वसाधारणपणे प्रत्येक संस्थानातील राजकीय चळवळ तेथील जनतेनेच करावी असे काँग्रेसचे धोरण होते.संस्थानातील लोकजागृतीस या काळात पास झालेले कायदेही कारणीभूत आहेत. १९०९ सालचा मोर्लेमिंटो सुधारणा आणि १९१९ साली मोंटेग्यू चेम्सफोर्ड सुधारणा कायदा हे दोन्ही कायदे खालसा भागासाठी होते. या कायद्यांमुळे ब्रिटिश खालसा भागातील जनतेला काही प्रमाणात का असेना सुधारणा देण्यात आल्या होत्या. या शिवाय १९३५ च्या कायद्याने तर खालसा मुलखातील जनतेला आपला प्रतिनिधी निवडण्याचे स्वातंत्र्य दिले होते. या सर्व बाबींचा प्रभाव संस्थानी जनतेवरही पडत होता. आपल्यालाही अशा सुधारणा मिळाव्यात ही भावना लोकजागृतीस कारणीभूत ठरत होती.

**२. महात्मा गांधींचा राजकारणातील प्रवेश :**

सन १९२० मध्ये महात्मा गांधीचा झालेला राजकारणातील प्रवेश आणि त्यामुळे संस्थानी जनतेत झालेली राजकीय जागृती आणि त्या जागृतीस महात्मा गांधीनी दिलेले सहकार्य हे एक कारण ठरले. शिवाय महात्मा गांधीनी ते संस्थानांच्या विरूध्द नाहीत तर ते केवळ संस्थानात लोकशाही स्वराज्य आणावे या भूमिकेचे आहेत हे सांगितले. संस्थानिकांनी संस्थानी जनतेला जबाबदार राज्यपध्दती देऊन त्यांचे विश्वस्त या नात्याने

संस्थानिकांनी कारभार करावा असा गांधीजींचा हा विचार  असल्याने संस्थानामध्ये प्रजापक्षीय चळवळीस प्रेरणा मिळाली.

**३. औंध संस्थानाचे उदाहरण :**

औंधसारख्या संस्थानाचे अधिपती पंतप्रतिनिधी यांनी स्वत:हून आपल्या संस्थानामध्ये जबाबदार राज्यपध्दती लागू केली होती. औंध संस्थानाची ही बाब इतर संस्थानातील जागृतीस कारणीभूत ठरली. ज्या संस्थानात अशा सुधारणा नव्हत्या, त्या संस्थानातील प्रजा आपल्या संस्थानातही अशा सुधारणा व्हाव्यात अशी मागणी त्यात्या संस्थानिकाकडे करू लागले.

**४. वृतपत्रांचे कार्य :**

या कालखंडातील वृत्तपत्रांनी तर संस्थानी प्रजेला त्यांच्या हक्कांबाबत अधिक जागृत बनविले. यामध्ये केसरी, ज्ञानप्रकाश यासारख्या वृत्तपत्रांचा समावेश होतो. याचबरोबर काही संस्थानातही वृत्तपत्रे निघू लागली व त्यांनीही त्यात्या संस्थानात संस्थानी जूलूमशाहीविरूध्द तेथील जनतेच्या मनामध्ये वातावरण निर्मिती केली. यामध्ये संस्थानी स्वराज्य, ज्ञानप्रकाश, काळ, वैनतैय, हंटर, अखंड भारत, विद्याविलास, पुढारी, सत्यवादी, तरूण भारत यासारख्या अनेक वृत्तपत्रांचा समावेश होतो.

**५. काँग्रेसची भूमिका :**

सन १९२० मध्ये काँग्रेसने नागपूर अधिवेशनात संस्थानी प्रजेच्या चळवळीला राष्ट्रीय चळवळीच्या प्रवाहात समाविष्ठ करून घेण्याचे पहिले पाऊल उचलले होते. संस्थानी प्रजाजनांना काँग्रेसचीद्वारे उघडी करण्यात आली होती. त्यामुळे राष्ट्रीय आंदोलनाचा देशव्यापी परिणाम संस्थानी चळवळीवर होणे अपरिहार्य होते. लाहोरच्या काँग्रेसने १९२९ मध्ये प्रजापरिषदेच्या सरंजामशाही विरोधी मागण्यांना पाठिंवा देणारा ठराव संमत केला होता. १९३८ च्या त्रिपूरा काँग्रेसने संस्थानी चळवळीत अधिक जवळून सामील व्हावे असे ठरवले. संस्थानी प्रजेनेही आपण राष्ट्रीय चळवळीचा अविभाज्य भाग आहोत या विचाराने १९३९ च्या अखिल भारतीय संस्थानी प्रजापरिषदेच्या अध्यक्षस्थानी पं.जवाहरलाल नेहरू यांची निवड केली. याचा परिणाम संस्थानातील जागृतीवर होत होता.

**६. दक्षिणी संस्थान हितवर्धक सभा :**

संस्थांनी प्रजेच्या प्रश्नांबाबत काँग्रेसकडून कोणताही ठोस कृति कार्यक्रम घेतला जाण्याची शक्यता नसल्याने विसाव्या शतकाच्या तिसऱ्या दशकाच्या सुरवातीला महाराष्ट्रातील काँग्रेसचे पुढारी न. चिं. केळकर, वामनराव पटवर्धन यांनी पुढाकार घेतला. दक्षिणी संस्थानातील प्रदेशातील प्रजापक्षीय चळवळ करण्यासाठी पहिली दक्षिणी संस्थान परिषद २४ व २५ मे १९२१ रोजी पुणे येथे सार्वजनिक सभेच्या दिवाणखान्यात भरली. २५० प्रतिनिधी हजर होते. या परिषदेचे काम पुढे चालू ठेवण्यासाठी  'दक्षिणी संस्थान हितवर्धक सभा' नावाची संस्था स्थापन करण्यात आली.  या 'दक्षिणी संस्थान हितवर्धक सभे'ने संस्थानिकांसाठी एक कृतिकार्यक्रम सुचविला होता. उदा. संस्थानिकांनी संस्थानात प्रजाप्रतिनिधी संस्था स्थापन करून त्यांना कायदे करण्याचा अधिकार द्यावा, नागरी स्वातंत्र्यावर घाला घालणारे कायदे रद्द करावेत इ. या सभेची एकूण अकरा अधिवेशने झाली. पुढे तिचे विसर्जन होऊन 'दक्षिणी संस्थान लोकपरिषद' या नव्या नावाने या परिषदेचे पुनःसंघटन झाले.

**७. इतर कारणे :**

सन १८८५ ते १९०५ या मवाळवादी काँग्रेसच्या कालखंडात संस्थानातील चळवळीसंबंधी फारसे कार्य होऊ शकले नाही. पण १९०५ ते १९२० या जहालवादी काँग्रेसच्या कालखंडात संस्थानी प्रजेमध्ये असंतोषाची बीजे रोवली गेली. सन १९१४ ते सन १९१९ या पहिल्या महायुध्दाच्या काळात सगळे संस्थानिक ब्रिटिशांच्या बाजूने राहीले होते. युध्दकालीन परिस्थितीमध्ये वाढती महागाई यामुळे संस्थानी जनता त्रासली होती. याचा परिणाम काँग्रेस कार्यकर्त्यानी संस्थानिकांच्या विरोधात वातावरण तयार केले. संस्थानांमध्ये स्वातंत्र्य चळवळीचा उदय झाला.

## २.२ विषय विवेचन :

### २.२.१ कोल्हापूर संस्थान :

**१. पूर्वइतिहास :**

भारतातील ५६२ संस्थानामध्ये कोल्हापूर संस्थान छत्रपती शिवाजी महाराजांच्या वंशजामुळे विशेष महत्त्वाचे आहे. कोल्हापूर संस्थानात स्वातंत्र्य चळवळ सन १८४४ पासून सुरू झाली ती सन १९४९ मध्ये कोल्हापूर संस्थान विलिन होईपर्यंत चालू होती. या संस्थानाचे क्षेत्रफळ ३२१७ चौ. मैल होते. लोकसंख्या १०,९२,०४६ व वार्षीक उत्पन्न ५९,९३,५७८ हजार रूपये होते. दक्षिणी संस्थानात असणाऱ्या आठरा संस्थानांपैकी कोल्हापूर संस्थान क्षेत्रफळ उत्पन्न व लोकसंख्या या सर्वांमध्ये मोठे होते. या संस्थानास १९ तोफांच्या सलामींचा मान होता.

कोल्हापूर संस्थानाची (राज्याची) स्थापना महाराणी ताराबाई यांनी सन १७१० ला पन्हाळ्यास केली. छत्रपती शाहु व महाराणी ताराबाई यांच्यातील वारसा हक्काचा वाद सुरू होता तो वाद १७३० मध्ये वारणेच्या तहाने मिटला व यातून स्वतंत्र अशा कोल्हापुर राज्याची निर्मीती झाली. पुढे सन १७८२ ला पन्हाळाहून कोल्हापूरला छत्रपत्तीची गादी हालविण्यात आली.

सन १८१२ साली पेशव्यांनी ब्रिटिशांबरोबर जो तह केला. त्याच वर्षी कोल्हापुरच्या छत्रपतीशी तह केला. या तहानुसार इंग्रज सरकारच्या सल्ल्याशिवाय कोल्हापुरकरांनी कोणाशीही लढाई करू नये असा करार झाला. या करारामुळे कोल्हापुरचे स्वातंत्र्य नष्ट झाले. सन १८१२, १८२७ व १८२९ या तीन वेळा इंग्रजांशी कोल्हापूरचे तह झाले. या तहामुळे कोल्हापुरकरांनी ब्रिटिशांना सर्वाधिकार बहाल केले व त्यांच्यानुसार कारभार चालविला गेल्याने कोल्हापुर राज्य टिकुन राहीले. या संस्थानालाही १८६२ मध्ये दत्तक घेण्याची परवानगी देणारी सनद देण्यात आली. सन १८५७ च्या उठावानंतर १८६२ मध्ये करवीरचे छत्रपती व इंग्रज यांच्यात एक करार होऊन कोल्हापूर छत्रपतींकडे देण्यात आले. या करारानुसार कोल्हापुरच्या छत्रपतीने रेसिडेंटच्या सल्ल्याने वागावे अशी अट घालण्यात आली.

**२. कोल्हापूर संस्थान प्रजापरिषद चळवळ :**

कोल्हापूर संस्थानात स्वातंत्र्य चळवळ सन १८४४ पासून सुरू झाली ती शेवटी सन १९४९ मध्ये कोल्हापूर संस्थान विलीन होईपर्यंत चालू होती. स्वातंत्र्य चळवळीत कोल्हापूरच्या प्रजापरिषदेचे योगदान

महत्वाचे आहे. राजाराम महाराजांच्या कारकीर्दीत कोल्हापूर प्रजा परिषद इ. स.१९३९ मध्ये स्थापन झाली. भाई माधवराव बागल व रत्नाप्पा कुंभार हे दोन प्रमुख पुढारी कोल्हापूर प्रजापरिषदेच्या स्थापनेमध्ये महत्वाचे होते. राजाराम महाराजांच्या घोडयाच्या शर्यतीच्या नादामुळे लाखो रूपये उडवीत आहेत अशी टिका ब्राम्हणेत्तर चळवळीच्या दिनकरराव जवळकरांनी केली होती. इतर संस्थानाप्रमाणेच कोल्हापूर संस्थानातही खालसा मुलखापेक्षा शेतसारा जास्त होता. कोल्हापूरच्या गादीवर राजाराम महाराज असले तरी या संस्थानाचा कारभार त्यांच्या भगिणी आक्कासाहेब चालवत होत्या. निरनिराळ्या गुप्त पटया व कर यामुळे प्रजा अगदी जेरीस आली होती. याचवेळी दरबाराने १८ ऑगस्ट १९३८ प्रजेला हक्कदान देण्याची घोषणा केली होती. त्यामुळे या घोषणेची माहिती प्रजेला करून द्यावी असे प्रजा पुढाऱ्यांना वाटू लागले म्हणून भाई माधवराव बागलांच्या नेतृत्वाखाली चळवळ करण्याचे दिनकरराव देसाई, नानासाहेब जगदाळे, रत्नाप्पा कुंभार, हवेरी सिदलिक्तगापा, रामभाऊ शेटे व मिणचे यासारख्या नेत्यांनी प्रचंड जनजागृती करून राजकीय लढा देण्याचे ठरवून शिरोळ पेट्यातील शेतकऱ्यांच्या जिव्हाळयाच्या प्रश्नावर लढा देण्याचे ठरविण्यात आले.

**३. प्रजापरिषदेची स्थापना :**

इ.स. १९३१ मध्ये करवीर काँग्रेसची स्थापना करण्यात आली. माधवराव बागल हे त्याचे अध्यक्ष होते. संस्थानात सभाबंदीचा कायदा होता. भाषण स्वातंत्र्य हा प्रजेचा मूलभूत हक्क असल्याने माधवराव बागल यांनी सभा स्वातंत्र्य मिळण्यासाठी राजदरबाराकडे विनंती अर्ज पाठविले; परतु दरबाराने त्यांची दखल घेतली नाही. या मागणीसाठी त्यांनी एक शिष्टमंडळही नेले. पण दिवाण सुर्वेयांनी शिष्टमंडळाची मागणी धुडकावून लावली. दरबाराकडून होणारा संभाव्य विरोध लक्षात घेऊन प्रजापरिषदेच्या सभा संस्थानाच्या सीमेपार घेण्याचे ठरविण्यात आले. त्यानुसार १९३८ मध्ये शिरोळ पेट्यातील शेतकऱ्यांनी मिरजेच्या घाटावर सभा घेण्याचे ठरविले होते. परंतु लोक जमा होताच मिरज दरबाराने सभाबंदी केली. त्याच दिवशी सातारा जिल्हयातील धामणी येथे दक्षिण संस्थान लोकसभेचे सरचिटणीस बा. वि. शिखरे यांच्या अध्यक्षतेखाली प्रचंड सभा भरून शेतकऱ्यांच्या दु:खाला वाचा फोडण्यात आली व कोल्हापूरच्या कारभाराविरूध्द लढा सुरू करण्यात आला. दुसरी सभा बेळगांव जिल्ह्यातील बोरगांव येथे तर तिसरी सभा २७ डिसेंबर रोजी उदगांव अंकली पुलाजवळ बा. वि. शिखरे यांच्या अध्यक्षतेखाली झाली.

या सभेचा परिणाम होऊन कोल्हापूर दरबाराने दि. ३० नोव्हेंबर १९३८ रोजी शिरोळ पेट्यातील शेतसारा सव्वा सहा टक्के कमी झाल्याचे जाहीर केले. मात्र शेतकऱ्याचे समाधान झाले नाही. ४ डिसेंबर १९३८ रोजी दिनकरराव देसाई याच्या अध्यक्षतेखाली अंकली येथे पाच हजार लोकांची सभा झाली. सभेत शेतसारा कमी केल्याबद्दल संस्थानचे आभार मानण्यात आले व इतर मागण्यासाठी रणनीती ठरविण्यात आली. दुसरीकडे संस्थानच्या कारभाऱ्यांनी सिदलिंगप्पा हविरे, दिनकरराव देसाई, उदगावचे दादा देसाई, शिरोळचे विष्णू देशिंगकर या पुढाऱ्यांना अटक केली. या सभेत शंकरराव देवांनी मार्गदर्शन केले. अन्यायी शेतसारा कमी करावा, लोकांना मुलभूत अधिकार मिळावेत, कोल्हापूर संस्थानात जबाबदार राज्यपध्दती स्थापन करावी या तीन मागण्यांसाठी २५ डिसेंबर १९३८ रोजी राजधानीवर मोर्चा नेण्याचे ठरविले.

**४. शेतकरी मोर्चा :**

कोल्हापूर संस्थानात सभाबंदी व मुद्रणबंदी होती. जनतेला नागरी स्वातंत्र्य मिळावे म्हणून सन १९३८

पर्यंत अर्ज विनंत्या दरबाराकडे केल्या पण त्याचा फारसा उपयोग झाला नाही. त्यामुळे ठरल्याप्रमाणे दि.२५ डिसेंबर १९३८ रोजी २५००० शेतकरी मोर्चासाठी कोल्हापूरात दाखल झाले. या मोर्चाचे नेतृत्व माधवराव बागल करत होते.

कोल्हापूरात काँग्रेसवर बंदी असल्याने काँग्रेस कार्यकर्त्यांच्या सभांवर निर्बंध होता. त्यामुळे अशी सभा व संमेलने कोल्हापूर संस्थानाच्या सीमेवर होत असत व त्यातून ब्रिटिश सरकार व दरबाराच्या कारभारावर टिका केली जात असे. प्रजेतील वाढत असलेली संघटन शक्ती दरबाराला सहन होत नव्हती. त्यामुळे लोकांमध्ये होणारे हे संघटन मोडून काढण्यासाठी कोल्हापूर दरबाराने अटकसत्र सुरू केले. काँग्रेसचे कार्यकर्ते सिदलिंगाप्पा हविरे, उदगांवचे दादा देसाई, शिरोळचे विष्णू देशिंगकर यांना इं. क्रि. प्रो. को. १०७ नुसार शांतता भंग केल्याच्या आरोपावरून अटक केली. यानंतर दिनकरराव देसाई यांनाही अटक करण्यात आले. त्यामुळे या अटकेच्या निषेधार्थ जयसिंगपूर, शिरोळ या ठिकाणी हरताळ पाळण्यात आले. या क्षणापर्यंत प्रजापरिषदेच्या नेतृत्वाने सनदशीर मार्गाचा अवलंब केला होता. पण त्याचा दरबारावर काहीही परिणाम झालेला नव्हता. त्यामुळे माधवराव बागल, रत्नाप्पा कुंभार, दिनकरराव देसाई, नानासाहेब जगदाळे यांनी राजधानीवर मोर्चा काढण्याचा निर्णय घेतला.

दि. १५ जानेवारी १९३९ रोजी चार हजार शेतकऱ्यांचा दुसरा मोर्चा निघाला. नानासाहेब जगदाळे यांनी मोर्चाचे नेतृत्व केले. चार हजार शेतकऱ्यांनी रेल्वे स्टेशनच्या हद्दीत तळ ठोकला. अखेर वाटाघाटी होऊन महाराजानी शेतसारा ब्रिटिश हद्दी इतका करण्याचे जाहीर केले, भाषण स्वातंत्र्यावरचे निर्बंध उठविण्यात आले. जबाबदार राज्यपद्धती आणण्याचही वचन दिले. २३ जानेवारी १९३९ रोजी भाई माधवराव बागल व इतर राजबंद्याची सुटका झाली.

अशा नकारात्मक पार्श्वभूमीवर १९३९ मध्ये जयसिंगपूर येथील श्रीराम ऑईल मिल्समध्ये प्रजापरिषदेच्या स्थापनेसाठी रत्नाप्पा कुंभार, दिनकरराव पाटील इत्यादींना बोलावले. त्यांच्यासह सुमारे दोन हजार कार्यकर्ते हजर होते. माधवराव बागल व रत्नाप्पा कुंभार यांनी प्रजापरिषदेमार्फत जनजागृती केली होती. पण ही संघटना मोडून काढण्याचे प्रयत्न सर्व थरातून झाले. संस्थानाच्या अधिकाऱ्यांनी त्याचवेळी माधवराव बागल यांना वॉरंट बजावून राजद्रोहाच्या आरोपाखाली अटक केली.

कोल्हापूर प्रजापरिषदेने पहिल्या अधिवेशनाच्या स्वागत मंडळाची सभा दि. २५ फेब्रुवारी १९३९ रोजी जयसिंगपूर येथील ऑईल मिलमध्ये काँग्रेस वर्किंग कमिटीचे सभासद शंकरराव देव यांच्या मार्गदर्शनाखाली घेतली व या सभेत माधवराव बागलांच्या अटकेचा निषेध करण्यात आला. याच काळात कोल्हापूर दरबाराने कोल्हापूर संस्थान प्रजापरिषद या संघटनेवर सन १९०८ च्या क्रिमिनल लॉअॅमिन्डमेन्ट अॅक्टच्या कलम १६ नुसार बंदी हुकुम जारी केला. पुढे जादा गॅझेट काढून कोल्हापूर दरबाराने ही प्रजा परिषद बेकायदा ठरविली.

**५. पहिले अधिवेशन :**

दि. १५ एप्रिल १९३९ रोजी करवीर संस्थानच्या हद्दीबाहेर कूपवाडला काँग्रेसचे पुढारी डॉ. पट्टाभिसीतारामय्या याच्या अध्यक्षतेखाली कोल्हापूर संस्थान प्रजापरिषदेचे अधिवेशन झाले. अधिवेशनात शंकरराव देव, ना. ग. गोरे, दा. वि. गोखले, गंगाधरराव देशपांडे, बा. वि. शिखरे याची भाषणे झाली. अधिवेशनात पारित झालेल्या

ठरावातून जबाबदार राज्यपद्धतीची मागणी करण्यात आली. शिवाय डोईजड शेतसारा कमी करावा, प्रजा परिषदेवर आणलेली बंदी उठवावी, छत्रपतींच्या शिकारीसाठी निर्माण करण्यात आलेल्या पार्कसाठी ताब्यात घेतलेल्या शेतकऱ्याच्या जमिनी परत कराव्यात इत्यादी मागण्या करण्यात आल्या. अधिवेशनाला दहा हजार लोक उपस्थित होते. राजाराम महाराजांच्या कारकीर्दीत भरलेल्या या अधिवेशनाला मोठ्या प्रमाणात शेतकरी, व्यापारी व ब्राम्हणेत्तर नेतृत्व उपस्थित होते. या अधिवेशनाचे स्वागताध्यक्ष दिनकरराव देसाई होते. म. दु. श्रेष्ठी उपाध्यक्ष व रत्नाप्पा कुंभार सरचिटणीस होते.

या अधिवेशनात संस्थानाच्या दडपशाहीस विरोध करून खालील ठराव मांडण्यात आले.

१. राजकीय हक्क त्वरित देण्यात यावेत.

२. डोईजड शेतसारा ताबडतोब कमी करण्यात यावा.

३. छत्रपतींचा खाजगी खर्च कमी करावा.

४. छत्रपतीनी शेतकऱ्यांच्या जमिनी सक्तीने काढून घेऊन शिकारीसाठी निर्माण केलेले पार्क बंद करण्यात यावेत.

५. जहागीर प्रजाजनांच्या सर्व मागण्या मान्य व्हाव्यात.

६. प्रजापरिषदेवरील बंदी उठविण्यात यावी.

७. स्थानिक स्वराज्य संस्था खऱ्या अर्थाने लोकाभिमूक करण्यात याव्यात.

८. जबाबदार राज्यपध्दती ताबडतोब स्थापन करण्यात यावी.

९. शेरी जमिनीची चौकशी व्हावी.

वरील ठराव या अधिवेशनात मांडून पास करण्यात आले. या अधिवेशनापुर्वी ९ एप्रिलला मिरज येथे प्रजापरिषदेच्या कार्यकर्त्यांची  मिटिंग होऊन परिषद कुपवाड येथे भरविण्याचे ठरविले होते. मिरजेतील संस्थान प्रजा पक्षीय चळवळीचे बा. वि. शिखरे यांचे पूर्ण सहकार्य व सहभाग कोल्हापूर प्रजापरिषदेस होता हे स्पष्ट होते. दरबाराचा विरोध असतानाही पहिली परिषद ब्रिटिश हद्दीत यशस्वी पार पडू शकली.

**६. अटक सत्र :**

दरबाराच्या दडपशाहीचा विचार न करता अधिवेशन यशस्वी झाल्यामुळे दरबाराचा राग वाढला. त्यामुळे अनेकांना अटक करण्यात आले. किसनाबाई शेटे या स्त्री स्वयंसेविकेने परिषदेची पत्रके वाटली म्हणून अटक केले. तसेच महादेव भुर्के कडोली येथील शंकरराव मिरगुडे, रामचंद्र कुलकर्णी, सासवड येथील पांडूरंग भस्मे, महंमद अत्तार, भुपाल पंडित, धोंडोपंत पोतदार यांना वेगवेगळया स्वरूपाच्या शिक्षा झाल्या. याशिवाय रत्नाप्पा कुंभार व दिनकरराव देसाई या दोघांवर इं. पी. को. क. १२४ अ नुसार आरोप ठेवून तीस दिवसाच्या आत कोर्टात हजर राहण्याबद्दल वॉरंट काढण्यात आला होता.

**७. रयत सभा :**

प्रजापरिषदेचा जोर वाढत होता दरबाराच्या कोणत्याही प्रकारच्या दडपशाहीला न जुमानता ही चळवळ

सुरु होती. १६ मार्च १९३९ रोजी चिखली येथे करवीर रयतेची सभा भरली. प्रजापरिषदेला प्रत्युत्तर देण्यासाठी कोल्हापुरातील दरबार धार्जिणी लोकांनी जून १९३९ मध्ये रयत सभा नावाची संघटना स्थापन केली. या सभेने प्रजापरिषदेस विरोध करण्याचा व छत्रपत्तींचे समर्थन करण्याची भूमिका घेतली. शिवाय प्रत्येक गावात रयत सभा स्थापन करणे हा ही हेतू या सभेचा होता. ही सभा प्रजापरिषदेवर जातीयवादाचा आरोप करीत होती. पुढे ही रयत सभा फारशी प्रभाव दाखवू शकली नाही.

**८. दलित प्रजापरिषद :**

३० डिसेबर १९३९ रोजी दादासाहेब शिर्के यांच्या पुढाकाराने कोल्हापूरात दलित समाजाच्या सर्वांगीण सुधारणांसाठी 'दलित प्रजापरिषद' स्थापन करण्यात आली. आपल्या सुधारणांसाठी कोणत्या सवलती हव्यात याचा विचार करण्यासाठी व मागण्यांसाठी संघटित कृतिकार्यक्रम ठरविण्यासाठी ही परिषद बोलविण्यात आली होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दलित प्रजापरिषदेच्या अध्यक्षीय भाषणात बोलताना छत्रपतींनी आपला कारभार नोकरशाहीच्या हाती देण्याऐवजी स्वतःच्या हाती घ्यावा व जनतेची नोकशाहीपासून सुटका करावी असे आवाहन केले. खरे तर छत्रपतींनी प्रजेला अधिकार देऊन लोकशाहीच स्थापन करावी, असेही डॉ. आंबेडकर यांनी आपल्या भाषणातून सूचित केले. या अधिवेशनाचे स्वागताध्यक्ष दादासाहेब शिर्के यांनी आपल्या भाषणात ही परिषद करवीर इलाख्यातील अखिल दलित समाजाची सर्वांगीण सुधारणा कशी करता येईल व त्याबाबत कोणत्या सवलतीची जरूरी आहे. याचा संघटीत विचार करण्याकरीता बोलावलेली आहे हे स्पष्ट केले. दलित प्रजा मंडळाचे कार्य स्वतंत्रपणे सुरू झाल्यापासून कोल्हापूर इलाख्यात नवचैतन्याचा प्रारंभ झाला.

**९. प्रजापुढाऱ्यांना शिक्षा :**

कोल्हापूर संस्थानात अनेकांवर राजद्रोहाच्या आरोपाखाली खटले भरले गेले होते. रत्नाप्पा कुंभार व दिनकरराव देसाई यांच्यावर रायबाग महालापैकी चिंचली या गावी माधवराव बागलांच्या अभिनंदन दौऱ्यात भाषण केल्याबद्दल खटला भरण्यात आला. रत्नाप्पा कुंभार व दिनकरराव देसाई यांच्यावर चार्ज ठेवण्यात आला. या प्रकरणाचा खटला चालून निकाल दिला. त्यानुसार दोघांनाही प्रत्येकी दोन वर्षे सक्तमजूरी व देसाई यांना ५०० रू तर कुंभारांना १००० रू दंड ठोठावण्यात आला. दंड न दिल्यास आणखी दोन वर्षे सक्त मजूरीची शिक्षा सांगण्यात आली.

**१०. प्रजापुढाऱ्यांची सुटका :**

प्रजापुढाऱ्यांच्या अटकेमुळे कोल्हापूर संस्थानातील राजकीय चळवळ काही काळ शांत होती. या दरम्यान छत्रपती राजाराम महाराजांचे दि. २६ नोव्हेंबर १९४० रोजी मुंबईत निधन झाले. त्यामुळे कोल्हापूर दरबाराने नमते घेऊन सर्व राजकैद्यांना बंधमुक्त केले. १८ डिसेंबर १९४० रोजी सनदशीर राजकीय चळवळ करणारे व अटकेत असलेले प्रजापुढारी माधवराव बागल, रत्नाप्पा कुंभार, नानासाहेब जगदाळे, अण्णासाहेब पाटील, रावबा मिणचे, शिरगुरकर पाटील, अण्णासाहेब मिणचे, जिन्नाप्पा माणगावे, सिदलिंगाप्पा हविरे, गायकवाड, बंडाप्पा घुगरे, शिवाप्पा संकपाळ अशा राज कैद्याची मुक्तता करण्यात आली. सुटकेनंतर प्रजापुढाऱ्यांनी महाराणी ताराबाई यांना राज्याधिकार द्यावेत व आपली संघटना बळकट करावी यासाठी प्रयत्न केला. त्यामुळे पुन्हा एकदा राजकीय हलचालींना सुरूवात झाली. या काळात दक्षिण महाराष्ट्रातील संस्थानी प्रजेच्या

चळवळीचे नेते बा. वि. शिखरे बेळगांव येथे जावून आण्णासाहेब लठ्ठेना भेटले आणि त्यांनी कोल्हापूरातील प्रजापरिषदेच्या कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करावे अशी विनंती केली.

**११. मराठा लीगचे राजकारण :**

अण्णासाहेब लठ्ठे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रजापरिषदेला नवी संजीवनी देण्याचा प्रस्ताव पुढे आला. कोल्हापूरच्या दरबारी राजकारणाचे समर्थन करण्यासाठी यापूर्वी १९४० साली स्थापन झालेल्या 'मराठा लीग' संघटनेच्या कार्यकर्त्यांचा अण्णासाहेब लढ्याच्या नावाला विरोध होता. ते जैन समाजाचे व बेळगाव निवासी असल्याने बऱ्याच लोकांना त्यांचे नेतृत्व मान्य नव्हते त्यामुळे 'मराठा लीग'च्या कोल्हापूर शाखेचे अध्यक्ष दत्ताजीराव माने व दासराम उर्फ रा. बा. जाधव, बी. टी सरनाईक या पुढाऱ्यांनी जाहीर पत्रक प्रसिद्ध करून अण्णासाहेब लठ्ठेना प्रजापरिषदेत सहभागी करून घेण्यास आपला विरोध असल्याचे घोषित केले. यामुळे प्रजापरिषदेच्या कार्यकर्त्यांमध्ये मराठा व मराठेतर असे दुहीचे वातावरण निर्माण झाले. या पार्श्वभूमीवर १९४१ मध्ये माधवराव बागल याच्या अध्यक्षतेखाली व अण्णासाहेब लठ्ठे यांच्या उपस्थितीत प्रजापरिषदेच्या कार्यकर्त्याची कोल्हापूरात अनौपचारिक बैठक झाली. बैठकीला सर्वश्री रत्नाप्पा कुभार, बाबुराव रुईकर, माधवराव शेटे उपस्थित होते.

माधवराव बागलांनी आण्णासाहेब लठ्ठेच्या उपस्थित कोल्हापूर प्रजापरिषदेच्या कार्यकत्र्यांची बैठक बाबुराव रूईकर यांच्या जागेत घेण्याचे ठरविले. यावेळी ही सभा उधळून लावण्याचा प्रयत्न झाला. पण माधवराव बागलांच्या अध्यक्षतेखाली ती पार पडली. या सभेस अण्णासाहेब लठ्ठे, रत्नाप्पा कुंभार, महादेव श्रेष्ठी, बाबुराव रूईकर यासारखे प्रजापक्षीय नेते हजर होते.

**१२. राज्य प्रजासंघ :**

बहुजन समाज म्हणजे मराठा समाज हे मराठा लीगचे संघटनात्मक सूत्र होते. पुढारीकार गणपतराव जाधव यांचा मराठा लीगला पाठिंबा होता. सरदार भीमराव पाटणकर, सरदार थोरात, वतनदार देशमुख-देसाई यांच्याकडे मराठा लीगचे नेतृत्व होते. १९४१ मध्ये वरील घटनेनंतर दुसऱ्याच दिवशी नानासाहेब जगदाळेंनी प्रजापरिषदेचे संस्थापक माधवराव बागल यांच्याशी असलेले संबंध तोडल्याचे दै. पुढारी मधून जाहीर केले. पाठोपाठ फेब्रुवारी महिन्यात श्रीपतराव शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली 'राज्य प्रजासंघ' नामक समांतर संस्था स्थापन करण्यात आली. रा. बा. जाधव यांनी नव्या संस्थेचे सरचिटणीसपद स्वतःकडे ठेवले.

**१३. करवीर स्थानिक स्वराज्य संघ :**

दरम्यान कोल्हापूर नगरपालिकेच्या निवडणुका घोषित झाल्या. प्रजापरिषदेची मान्यता रद्द झाल्याने पर्याय म्हणून बागल गटाने १९४१ मध्ये स्थानिक स्वराज्य संघाची स्थापना केली. १९४१ मध्ये झालेल्या नगपालिकेच्या निवडणुकीत स्थानिक स्वराज्य संघाने २५ पैकी २२ जागा जिंकल्या. या यशानतर महाराणी ताराबाई यांच्या इच्छेनुसार पेरी मंत्रिमडळाने प्रजापरिषदेवरची बदी उठवली. पंतप्रधान पेरी यांनी घटनात्मक सुधारणा जाहीर केल्या. ५० सदस्यांच्या कायदेमंडळात २५ सदस्य लोकनियुक्त असतील अशी तरतूद केली. लोकनियुक्त प्रतिनिधिपैकी निम्मे सदस्य अप्रत्यक्ष पद्धतीने निवडण्याची योजना होती. त्यासाठी सरदार व इनामदार, पदवीधर, व्यापारी व उद्योगपती, इलाखा पंचायत, नगरपरिषदा आणि सहकारी पतपेढ्या असे ६ मतदारसंघ ठरविण्यात

आले. पंतप्रधान हा कायदेमंडळाचा पदसिद्ध अध्यक्ष असणार होता; मात्र तो कायदे मंडळाला जबाबदार रहाणार नव्हता.

**१४. प्रजापरिषदेवरील बंदी उठविली :**

पंतप्रधान दादासाहेब सुर्वे निवृत्त झाल्यानंतर अनुक्रमे डब्ल्यू. एच. पेरी, मिचेल व धौमस ऑस्टीन याच्याकडे हा पदभार सोपविण्यात आला. पेरी यानी मंत्रीमंडळात पां. चिं. पाटील व केळवळकर यांना स्थान दिले होते. महाराणी ताराबाई यानी १८ डिसेंबर १९४० रोजी भाई माधवराव बागल, रत्नाप्पा कुंभार या प्रजापरिषदेच्या नेत्यांची कारावासातून सुटका केली व प्रजा परिषदेवरील बंदी उठविण्यात आली. सुटकेनतर पुन्हा एकदा प्रजापरिषद सघटित करण्याचे जोरदार प्रयत्न सुरू झाले. अण्णासाहेब लट्टे याच्या मार्गदर्शनाखाली प्रजापरिषदेला नवी संजीवनी देण्याचा प्रस्ताव पुढे आला.

**१५. प्रजापरिषदेचे दुसरे अधिवेशन :**

कोल्हापूर प्रजापरिषदेवरील बंदी उठविण्यात आल्यानंतर कोल्हापूरात दुसरे अधिवेशन भरविण्याचा निर्णय घेण्यात आला. या पार्श्वभूमीवर ९ जानेवारी १९४१ रोजी माधवराव बागल यांच्या अध्यक्षतेखाली व अण्णासाहेब लट्ठे यांच्या उपस्थितीत प्रजापरिषदेच्या कार्यकर्त्यांची कोल्हापूरात अनौपचारिक बैठक झाली. बैठकीला सर्वश्री रत्नाप्पा कुभार, बाबुराव रुईकर, माधवराव शेटे उपस्थित होते. यानुसार दुसरे अधिवेशन कोल्हापूर संस्थानाच्या हद्दीत २ व ३ जून १९४२ रोजी करवीर नगरीत भरविण्यात आले. या अधिवेशनास पन्नास हजार लोक जमा झाले होते. या अधिवेशनाचे अध्यक्ष बाळासाहेब खेर हे होते. यावेळी त्यांनी लहान संस्थानांनी जवळच्या खालसा प्रदेशात विलीन होणे अपरिहार्य असल्याचे स्पष्ट केले. या परिषदेत जबाबदार राज्यपध्दती स्थापन करण्याचा ठराव पास करण्यात आला व त्यानुसार एक घटना समिती परिषदेने नेमली. एकाद्या परिषदेने घटना तयार करण्यासाठी अशी समिती नेमणे हा कोल्हापूर संस्थानातील एकमेव प्रयोग होता. प्रजापरिषदेने नव्या घटनेचा मसुदा तयार करण्यासाठी नेमलेल्या कमिटीत अध्यक्ष बाळासाहेब खेर, अण्णासाहेब लट्ठे यांच्यासह सात सदस्य लोक होते. पण ही घटना समिती प्रत्यक्षात अस्तित्वात येऊ शकली नाही. या अधिवेशनासाठी राष्ट्रीय सेवा दल, शाहु मिल मजूर संघ या संघटनाही सहभागी होत्या.

**१६. प्रजापरिषदेत मतभेद :**

प्रजापरिषदेच्या निधीच्या जमाखर्चावरून इ. स. १९४१ मध्ये प्रजापरिषदेच्या वरिष्ठ नेत्यांमध्ये काही काळासाठी तणाव निर्माण झाला होता. या निधीच्या खर्चाची मागणी नानासाहेब जगदाळे यांनी केली होती. त्या काळातील चळवळीसाठी जनतेने गुप्त देणग्या दिल्या होत्या. पैशाच्या प्रचंड ओघामुळेच ही चळवळ चालविणे शक्य झाले होते. त्यामुळे या काळात गोळा झालेल्या पैशाची जबाबदारी बागलांची आहे. त्यामुळे बागलांनी प्रजापरिषदांसाठी झालेला खर्च व शिल्लक जाहिर करावी असे धोरण नानासाहेब जगदाळेंनी घेतले. या प्रकरणापासून प्रजापरिषदेत मतभेदास सुरूवात होऊन ती दुभंगायला सुरूवात झाली.

**१७. प्रजापरिषद व १९४२ चे आंदोलन :**

ऑगस्ट १९४२ मध्ये काँग्रेस राष्ट्रीय स्तरावर लढा पुकारणार असे वातावरण तयार होत होते. महात्मा गांधींनी 'चले जाव' चा ठराव पास करून भारतीय स्वातंत्र्य चळवळीत नवा उत्साह निर्माण केला. या

आंदोलनास कोल्हापूर संस्थानात कसा प्रतिसाद मिळेल याबाबत माधवराव बागलांना शंका वाटत होती. संस्थानातील जनतेने या लढयात सहभागी व्हावे. यासाठी प्रजापरिषदेच्या कार्यकारी मंडळाची बैठक घेऊन निर्णय घेण्याचे ठरले. प्रजापरिषदेच्या कार्यकारी मंडळाच्या बैठकीत काहींनी या आंदोलनात सहभागी होण्यास विरोध दाखविला. कारण संघटनात्मक स्वरूप विस्कळीत असल्यामुळे प्रजापरिषद प्रभावीपणे काम करू शकणार नाही ही त्यांची त्यामागची भूमिका होती. पण बागलांनी यावेळी जनतेतील जागृतीमुळे राष्ट्रीय चळवळ यशस्वी झाली तर संस्थानातील प्रश्न आपोआप सुटतील त्यामुळे या लढ्यात सहभागी होणे आवश्यक आहे हे सांगितले. त्यामुळे कार्यकारणीने या लढयात सहभागी होण्याचा बहुमताने निर्णय घेतला.

या आंदोलनामूळे प्रमुख राजकीय पुढाऱ्यांच्या अटक सत्रास सुरवात झाली. याचा परिणाम कोल्हापूर संस्थानातही झाला. माधवराव बागल, म. दु. श्रेष्ठी, रा. तु. बगाडे व इतर बारा पुढाऱ्यांना कोल्हापूर दरबाराने स्थानबध्द करून ठेवले. मात्र या काळात रत्नाप्पा कुंभारांनी भूमिगत राहुन ही चळवळ चालू ठेवली. १४ ऑगस्ट १९४२ रोजी कोल्हापूरात रविवार वेशीजवळ बंदी हुकूम मोडून रत्नाप्पानांनी सभा घेतली. यावेळी कोल्हापूर दरबाराने या जनसमुहावर लाठी हल्ला केला यामध्ये सोळा वर्षाचा बिंदु कुलकर्णी हा विद्यार्थी ठार झाला. या काळात सरकारी चावडया जाळणे, रेल्वे स्टेशन नष्ट करणे, सरकारी खजाना लुटणे यासारखे कार्यक्रम हाती घेण्यात आले होते. या काळात मोठया प्रमाणात विद्यार्थीही प्रजापरिषदेत सहभागी होऊ लागले.

**१८. प्रजापरिषदेचे तिसरे अधिवेशन :**

कोल्हापूर संस्थान प्रजापरिषदेच्या कार्यकत्यांचे संमेलन बाळासाहेब खेर यांच्या अध्यक्षतेखाली दि. ९ डिसेंबर १९४४ रोजी कोल्हापूरात भरले. या वेळी माधवराव बागलांनी दोन वर्षाच्या प्रजापरिषदेचा अहवाल सादर केला. कोल्हापूरच्या बाल छत्रपत्तीचे १ ऑक्टोंबर १९४६ मध्ये निधन झाले. त्यामुळे कोल्हापूरातील रिजनल कौन्सिल बरखास्त करण्यात आले. या काळात माधवराव बागलांनी कोल्हापूर दरबाराला डिसेंबर अखेर हंगामी सरकार अस्तित्वात न आल्यास प्रजापरिषद चळवळ सुरू करेल हे सांगितले. पण याचा दरबारावर कोणताही परिणाम झाला नाही. या प्रश्नाबाबत अखिल संस्थान लोकपरिषदेकडे परवानगी होती. पण कोल्हापूर संस्थानात लढा सुरू करण्यास या परिषदेने परवानगी दिली नाही. शिवाय आपल्याच राजाविरूध्द चळवळ करण्यास लोकांचा विरोध असल्याने प्रजापरिषदेत यावेळी दोन गट पडले.

कोल्हापूर संस्थान प्रजापरिषदेचे तिसरे अधिवेशन काकासाहेब गाडगीळ्यांच्या अध्यक्षतेखाली गारगोटी या ठिकाणी भरले. या अधिवेशनाचे उदघाट्क महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेसचे अध्यक्ष केशवराव जेधे हे होते. या अधिवेशनाचे स्वागत अध्यक्ष शंकरराव वारके होते. या अधिवेशनात काकासाहेब गाडगीळ यांनी संस्थानिकांना संस्थानी जनता सिंहासनावरून खाली उतरतील हे सांगून संस्थानात संपूर्ण जबाबदार राज्यपध्द्ती अस्तित्वात आली पाहिजे हेही स्पष्ट केले.

**१९. प्रजापरिषदेच्या नेतृत्वाखाली सरकार स्थापना :**

१५ ऑगस्ट १९४७ भारत स्वतंत्र झाला. त्यानंतर २ नोव्हेंबर १९४७ रोजी छत्रपतींबरोबर माधवराव बागल यांची बैठक झाली व यामध्ये प्रजापरिषदेच्या नेतृत्वाखाली सरकार स्थापण्याच्या प्रस्तावास छत्रपतींनी अनुकूलता दर्शविली. प्रजापरिषदेकडे अर्थ, न्याय, महसूल व पुरवठा खात्याचे मंत्रीपद देण्याचेही मान्य करण्यात

आले. ११ नोव्हेंबर १९४७ रोजी प्रजापरिषदेच्या कार्यकारिणीच्या बैठकीत माधवराव बागल यांनी मंत्रिमंडळ बनविण्याचा ठराव झाला. १५ नोव्हेंबरला हंगामी मंत्रिमंडळाचा शपथविधी झाला. माधवराव बागलांकडे गृह, डी. एस. खांडेकरांकडे महसूल खाते सोपविण्यात आले. रत्नाप्पा कुंभार यांनी पुरवठा खाते व म. दूं. श्रेष्ठी यांनी अर्थखाते स्वीकारण्यास नकार दिल्याने पेचप्रसंग निर्माण झाला. १७ नोव्हेंबरच्या प्रजापरिषदेच्या कार्यकारिणीत या विषयावर चर्चा होऊन मतदान झाले, त्यात बागल गटाचा पराभव झाला. प्रजापरिषदेत मराठा विरुद्ध लिंगायत अशी दुफळी माजली. कार्यकारिणीच्या १५ पैकी काही जणांनी राजीनामे दिले. दोन गटात समेट घडविण्याचे प्रयत्न अयशस्वी झाले.

प्रजापरिषदेच्या या दुफळीनंतर १ जानेवारी १९४८ पासून नवी राज्यघटना अंमलात आणून छत्रपतींनी हंगामी सरकार स्थापन केले. पूर्वीचे दिवाण सुर्वे यांना पंतप्रधान म्हणून घोषित केले. पण प्रजापरिषदेने मंत्रिमंडळात सामील होण्यास नकार दिला व नवी घटना मान्य नसल्याचेही जाहीर केले. पुढे ३० जानेवारी १९४८ रोजी म. गांधी यांची हत्या झाल्याने कोल्हापूरात त्याची मोठी प्रतिक्रिया उमटली. संस्थान स्वतंत्र न ठेवता भारतात विलीन करावे का यावर उलटसुलट चर्चा सुरू झाल्या. माधवराव बागल गटाला संस्थान स्वतंत्र राहावे असे वाटत होते, तर रत्नाप्पा कुंभार गटाचे संस्थानाचे भारतीय संघराज्यात विलीनीकरण व्हावे असे मत होते. कोल्हापूरच्या महाराजांचा खाजगी खर्च भरमसाठ असल्याने संस्थान विलीन होणे योग्य राहील असे म्हणणारा एक गट होता, तर विरोधी गटाने छत्रपतींचा खर्च कमी करता येईल, तेवढयासाठी विलीनीकरण थांबवू नये, असे मतप्रदर्शन केले होते. सप्टेंबर १९४८ रोजी प्रांतिक कॉंग्रेस बैठकीतही कोल्हापूर संस्थान विलीनीकरणाचा ठराव मंजूर करण्यात आला. शेवटी १ मार्च १९४९ रोजी कोल्हापूर संस्थान भारतीय संघराज्यात सामील झाले.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न :१**

**अ) योग्य पर्याय निवडून रिकाम्या जागा भरा.**

१. बटलर कमिटी व सायमन कमिशनने भारतीय संस्थानांची संख्या ..... इतकी दिली आहे.

(अ) ५१२ (ब) ५६२ (क) ५०० (ड) ४१२

२. Southern Maratha Country States म्हणजेच एस. एम. सी. स्टेटसमध्ये ..... हे संस्थान सर्वात मोठे होते.

(अ) सांगली (ब) फलटण (क) कोल्हापूर (ड) जत

३. १९२० मध्ये ..... अधिवेशनात संस्थानिकांनी आपल्या संस्थानात जबाबदार राज्यपध्दतीने राज्यकारभार सुरू करावा असा ठराव करण्यात आला.

(अ) नागपूर (ब) लाहोर (क) मुंबई (ड) कलकत्ता

४. पहिली दक्षिणी संस्थान परिषद ..... रोजी पुणे येथे सार्वजनिक सभेच्या दिवाणखान्यात भरली.

(अ) २४ व २५ मे १९२० (ब) २४ व २५ मे १९२२

(क) २४ व २५ मे १९२१ (ड) २४ व २५ मे १९२३

५. कोल्हापूर संस्थानाची (राज्याची) स्थापना ..... यांनी सन १७१० ला पन्हाळ्यास केली.

(अ) राजमाता जिजाऊ (ब) महाराणी ताराराणी (क) येसूबाई (ड) सोयराबाई

६. राजाराम महाराजांच्या कारकीर्दीत कोल्हापूर प्रजापरिषद इ.स.....मध्ये स्थापन झाली.

(अ) १९३९ (ब) १९४० (क) १९३५ (ड) १९१०

७. प्रजापरिषदेला प्रत्युत्तर देण्यासाठी कोल्हापुरातील दरबार धार्जिणी लोकांनी ..... नावाची संघटना स्थापन केली.

(अ) रयत सभा (ब) रयत पंचायत (क) शेतकरी संघ (ड) दलित प्रजापरीषद

८. दादासाहेब शिर्के यांच्या पुढाकाराने कोल्हापूरात .....स्थापन करण्यात आली.

(अ) दलित प्रजापरिषद (ब) मागासवर्गीय प्रजापरिषद

(क) ब्राह्मण प्रजापरिषद (ड) मराठा प्रजापरिषद

९. बहुजन समाज म्हणजे ..... समाज हे मराठा लीगचे संघटनात्मक सूत्र होते

(अ) मराठा (ब) ब्राम्हण (क) जैन (ड) दलित

१०. ..... रोजी कोल्हापूर संस्थान भारतीय संघराज्यात सामील झाले.

(अ) १ मार्च १९४९ (ब) १ मार्च १९४८

(क) १५ ऑगस्ट १९४७ (ड) २० डिसेंबर १९४७

**ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. वार्नरने कोणता ग्रंथ लिहिला आहे?

२. भारतीय संस्थानांची संख्या किती आहे ?

३. दक्षिणी संस्थानांमध्ये कोणकोणत्या संस्थानांचा समावेश होतो?

४. कोल्हापूर संस्थानाची स्थापना कोणी केली ?

५. कोणाच्या काळात कोल्हापूर संस्थानात प्रजापरिषदेची स्थापना झाली?

६. कोल्हापूर प्रजा परिषदेच्या पहिल्या अधिवेशनाचे अध्यक्ष कोण होते ?

७. कोल्हापूर संस्थानात दलित प्रजा परिषद कोणाच्या पुढाकाराने स्थापन झाली ?

८. छत्रपती राजाराम महाराजांचे निधन कोठे झाले ?

९. पुढारीकार गणपतराव जाधव यांचा कोणास पाठिंबा होता ?

१०. कोल्हापूर संस्थान भारतीय संघराज्यात केव्हा सामील झाले ?

## २.२.२ सांगली संस्थान :

### १. पूर्वइतिहास :

सांगली हे पटवर्धनी संस्थानातील महत्वाचे संस्थान होते. सांगलीपासून २५ मैलावर कवठेमहांकाळ, ७५ मैलांवर मंगळवेढा, तर १५५ मैलांवर शिरहट्टी, तर शहापूर बेळगावपासून केवळ १ मैलांच्या अंतरावरचा विखुरलेला प्रदेश या संस्थानात मोडत होता. मिरज, कवठेमहांकाळ, मंगळवेढ्याचा परिसर डोंगर-टेकड्यांचा, खडकाळ, खुरट्या झाडा-झुडपांचा आणि लाल मातीचा; तेरदळ, शिरहट्टी, शहापूरचा प्रदेश काळ्या मातीचा सुपीक प्रदेश, कृष्णा, भीमा, घटप्रभा, तुगभद्रा, मार्कडी या नद्या प्रवाहित होत्या. तेरदळ भागात तांब्यापितळ्याची भांडी घडवण्याचा उद्योग, शिरहट्टी, शहापूर तालुक्यात काचेच्या बांगड्याचे कारखाने, कावळी विणणे, कवठेमहांकाळला लोकरीचे गालीचे बनविण्याचा उद्योग-व्यवसाय चालत असे. शिरहट्टी भागातल्या मातीत सोने आणि पोलादाचे अंश होते. तर १९११ च्या जनगणनेनुसार लोकसंख्या २,२७,२८० होती.

१८०७ साली मिरज व सांगली संस्थान विभक्त झाल्यावर पहिले चिंतामणराव उर्फ आप्पासाहेब पटवर्धन (१७८३-१८५१) सांगलीचा राज्यकारभार पहात होते. १८१८ साली मराठी सत्तेच्या पाडावानंतर १८१९ मध्ये ईस्ट इंडिया कंपनी आणि सांगली संस्थानचे अप्पासाहेब पटवर्धन यांच्यात स्वतंत्र तह झाला होता. परिणामतः संस्थानास ब्रिटिशांनी अभय दिले, तसे संस्थानाकडूनही ब्रिटिशांविरोधी कुठलीही हालचाल झाली नाही. आप्पासाहेब पटवर्धन यांनी आपल्या कारकिर्दीत सतीबंदीचा कायदा लागू केला, ही त्यांची सर्वात मोठी जमेची बाजू होती. १८५१ मध्ये चिंतामणराव पटवर्धन (पहिले) यांचे निधन झाले. चिंतामणरावाच्या सुनेने दत्तक घेतला, त्यास १८३८ साली धुंडिराव तात्यासाहेब हा मुलगा झाला व तोच १८५१ साली चिंतामणरावांच्या नंतर संस्थानिक झाला. १९०१ मध्ये धुडिराव तात्यासाहेबाचे निधन झाले ते निपुत्रिक असल्यामुळे संस्थानचा कारभार ब्रिटिश सरकारने ताब्यात घेतले व चिंतामणरावांचा दत्तक मुलगा विनायकराव यांचा पणतू विनायकराव भाऊसाहेब यास चिंतामणराय आप्पासाहेब असे नाव देऊन, १५ जून १९०३ रोजी श्रीमंत चिंतामणराव धुंडिराव उर्फ आप्पासाहेब पटवर्धन (१८९०- १९६५) यांचा राज्याभिषेक झाला.

इ. स.१९०० नंतर सांगली संस्थानात स्वातंत्र्य चळवळीची सुरूवात होऊ लागली. संस्थानात असंतोषाचे कारण डोईजड कर, सभाबंदीचा कायदा हेच होते. सांगलीमध्ये सार्वजनिक कार्य करण्याच्या हौसेने प्रेरीत होऊन काही लोकांनी गो. श. बिनिवाले यांच्या नेतृत्त्वाखाली १९१६ मध्ये युनियन क्लबची स्थापना केली होती. तत्पूर्वी सन १९०८ मध्ये रयत सभेची स्थापना बर्क यांनी केली.

### २. अ. भा. देसाई यांची कारकीर्द :

विसाव्या शतकाच्या पहिल्या दशकात संस्थानाला सज्ञान वारस नसल्यामुळे ब्रिटिशांच्या राजकीय विभागाने नियुक्त केलेल्या प्रशासकांची कारकीर्द होती. १९०१ ते १९०५ या पहिल्या पाच वर्षांत रायबहादूर अच्युत भास्कर देसाई हे संस्थानाचा कारभार पाहत होते. त्यांनी आपल्या कारकिर्दीत रेल्वे आणि पाणीपुरवठ्याच्या योजनांचे काम सुरू केले. पोलिस प्रशासनाची पुनर्रचना करून नवी संरचना अस्तित्वात आणली. सशस्त्र पोलिसदल आणि निःशस्त्र पोलिसदल अशी दुपदरी रचना करण्यात आली. यांच्या काळात १८७६ पासून चालत आलेली संस्थानाच्या अर्थव्यवस्थेतली पाठक-फडणवीस पद्धतीच्या जागी १९०३ साली स्वतंत्रपणे

'कोषागार व लेखा विभाग' (ट्रेझरी व ऑडिट ऑफिस) या नावाने नवी व्यवस्था निर्माण करण्यात आली.

**३. कॅ. बर्क यांची कारकीर्द :**

१९०५ ते १९१० या पाच वर्षांसाठी सांगली संस्थानचे राज्याधिकारी म्हणून कॅ. आर. सी. बर्क यानी पदभार सांभाळला. त्यांनी आपल्या प्रशासकीय कारकिर्दीत सांगली नगरपालिकेतील शासननियुक्त सभासदाची संख्या कमी करून लोकनियुक्त सभासदाची संख्या वाढवली. १९०५ मध्ये त्यांनी सांगली म्युनिसिलापिटीच्या निवडणुका घेतल्या. सन १९०७ सालापासून म्युनिसिपालिटीचा अध्यक्षही लोकनियुक्त प्रतिनिधीमधून निवडण्याची तरतूद करण्यात आली. कॅ. बर्क यांनी राज्यकारभारात प्रजेच्या आकांक्षाची दखल घेतली जावी यासाठी १९०८ साली 'रयत सभे'ची स्थापना केली होती. दिवाणाच्या अध्यक्षतेखाली प्रत्येक तालुक्याचा मामलेदार व दोन लोकप्रतिनिधी आणि सांगली शहराचा एक प्रतिनिधी अशी रयतसभेची रचना होती. १५ जून १९०८ रोजी या रयत सभेची पहिली बैठक झाली होती.

**४. आप्पासाहेब पटवर्धन यांची कारकीर्द :**

कॅ. बर्क यांच्यानंतर श्रीमंत चिंतामणराव धुंडिराव उर्फ आप्पासाहेब पटवर्धन (१८९०-१९६५) यांनी सस्थान स्वतंत्र भारतात विलीन होईपर्यंत सांगली संस्थानांचा कारभार पहिला. श्रीमत चिंतामणराव पटवर्धन यांनी लोकतंत्री राज्यकारभाराला प्राधान्य दिले होते. त्यांना गोलमेज परिषदेतही छोट्या संस्थानांचे प्रतिनिधी म्हणून उपस्थित राहण्याची संधी मिळाली होती. १९३० साली सांगली स्टेट रयत असेंब्ली रेग्युलेशन १९३०अन्वये त्यानी जबाबदार राज्यपद्धतीचा पहिला हप्ता म्हणून रयतसभेला जादा अधिकार प्रदान केले. त्यात कायदे करणे, ठराव मांडणे, अंदाजपत्रकावर प्रश्न उपस्थित करणे इत्यादी अधिकारांचा समावेश होता, या नव्या घटनेप्रमाणे असेंब्लीचे पहिले अधिवेशन २२ जुलै १९३० रोजी सांगलीचे दिवाण रामचंद्र सदाशिव आठवले यांच्या अध्यक्षतेखाली झाले. ब्रिटिश मुलुखातील १९३५ च्या कायद्याला अनुसरून १९३८ साली 'रयतसभा' ('सांगली स्टेट एक्झिक्युटिव्ह कौन्सिल') स्थापन केली व निवृत्त आय. सी. एस. अधिकारी बी. एन. डे यांची अध्यक्षपदी नियुक्ती केली.

आप्पासाहेब पटवर्धन हे लोकशाही विचारप्रणालीचे पुरस्कर्ते होते. त्यांनी म्हैसूर, बडोदा, ग्वाल्हेर या प्रागतिक संस्थानातल्या सुधारणा, कायदा व न्यायव्यवस्थेचा अभ्यास करून सांगली संस्थानात नव्या सुधारणा करता याव्यात या उद्देशाने महाराजांनी मुख्य कारभाऱ्याच्या अध्यक्षतेखाली उच्च न्यायालयाचे न्यायाधीश, बार आसोशिएशनचे सदस्य व शासकीय अधिकारी याचा समावेश असलेले एक अभ्यासमंडळ नेमले होते. राज्य प्रशासनासाठी हुजूर ऑफिस, हुजूर दिवाणी कोर्ट आणि राज्याचा कारभारी व जिल्हा दंडाधिकारी अशी त्रिस्तरीय अधिकारमंडळे स्थापन करण्यात आली. सत्तेच्या विकेंद्रीकरणाच्या तत्त्वाला अनुसरून सस्थानात सांगली, मंगळवेढा, तेरदळ, बकानी, शहापूर व शिरहट्टी अशा ६ नगपालिका स्थापन करण्यात आल्या, नगरपालिकात ३/४ सदस्य लोकनियुक्त व नगराध्यक्षही लोकप्रतिनिधींनी निवडण्याची पद्धत सुरू केली.

सांगली संस्थानात कायदा व सुव्यवस्था नांदावी यासाठी आप्पासाहेब पटवर्धनानी नागरिकांना पोलिस संरक्षण पुरविणाऱ्या योजना कार्यान्वित केल्या. गावपातळीवर चोऱ्या-दरोड्यांना आळा बसावा म्हणून ग्रामपोलिसदल व ग्रामसंरक्षक समित्या स्थापन केल्या.

**५. प्रजापरिषदेची स्थापना :**

श्री. वामनरावजी पटवर्धन, श्री. न. चिं. केळकर वगैरे संस्थानी प्रश्नांबद्दल आस्थापूर्वक विचार करणाऱ्या नेतृत्वाने 'दक्षिणी संस्थान हितवर्धक सभा' ही संस्थाही स्थापन केली होती. याचा परिणाम म्हणून निरनिराळ्या संस्थानांत प्रजापरिषदा स्थापनेने झाला. त्यानुसार भोर आणि सांगली येथे पहिल्या परिषदा झाल्या.

'दक्षिणी संस्थान हितवर्धक सभे'च्या स्थापनेनंतर सांगली संस्थानात १९२२ साली प्रजापरिषदेची स्थापना करण्यात आली. १९२२ साली प्रजापरिषदेच्या अधिवेशनास सुरूवात झाली. सांगली प्रजापरिषदेची अधिवेशने ही संपूर्ण संस्थानातील तालुक्यात झालेली होती. त्यामुळे राजकीय जागृती ही खेडयापर्यंत पोहचली होती. संस्थानातील कारभार हा प्रजातंत्राने व प्रजेच्या हिताच्या दृष्टीने चालावा ही प्रमुख मागणी येथील प्रजापरिषद चळवळीची होती. १९२२ ते १९३९ या काळात सांगली संस्थानात प्रजापरिषदेची १४ अधिवेशने झाली. यापूर्वी कॅ. बर्क यांच्या कारकिर्दीत 'रयत सभा' स्थापन झाली होती; तरीही सांगलीच्या कार्यकत्यांनी प्रजापरिषदेमार्फत नव्या सुधारणांसाठी जनमताचा रेटा कायम ठेवण्याची कामगिरी बजावली.

**६. प्रजापरिषदेची अधिवेशने :**

८ फेब्रुवारी १९२२ साली झालेले सांगली प्रजापरिषदेचे पहिले अधिवेशन श्री. रामचंद्र मुंगळी यांच्या अध्यक्षतेखाली झाले. सांगली प्रजापरिषदेसमोर महत्त्वाचे मुद्दे होते, ते म्हणजे संस्थानाबाहेरील लोकांची सरकारी नोकरीतील नियुक्ती, वाढलेला कर, महसूल वसूल करताना सरकारचे असणारे सहानुभूतीशुन्य धोरण याचबरोबर प्रजापरिषदेने सार्वजनिक सभांवरील बंदी उठवावी हाही मुद्दा महत्त्वाचा मानुन संस्थानाच्या याविरोधी धोरणावर अभ्यंकर, मायनकर व छापखाने यासारख्या नेत्यांनी राज्यकर्त्यावर टिका केली. या प्रजापरिषदेमध्ये खालील महत्वाच्या प्रश्नांवर चर्चा करण्यात आली होती.

१. संस्थानाबाहेरील लोकांची संस्थानातील नोकरीमध्ये मोठ्या पदावर होणारी नेमणूक.

२. संस्थानातील जनतेवर वाढत चाललेला कराचा बोजा.

३. कर गोळा करत असताना जनतेवर होणारा अन्याय

४. सार्वजनिक सभावरील बंदी उठविणे.

५. प्रबोधनाचे माध्यम असणाऱ्या कीर्तने व जलशांना घालण्यात आलेली बंदी मागे घ्यावी.

या प्रश्नांवर चर्चा या परिषदेत करण्यात येऊन गणपराव अभ्यंकर माईनकर व छापखाने यांनी या संस्थानाच्या प्रतिगामी धोरणामुळे संस्थानिकांवर जोरदार टिका केली. या परिषदेतील प्रश्नांचा अनुषंगाने प्रजापक्षीय नेतृत्वाने राजेसाहेबांकडे पुढील मागण्या सादर केल्या.

१. प्रत्येक खेड्यामध्ये ग्रामपंचायतीची स्थापना करावी.

२. संस्थानातील नोकरीमध्ये जाती व धर्माच्या आधारावर भेदभाव केला जाऊ नये.

३. न्यायव्यवस्था व प्रशासन यामध्ये फारकत करण्यात यावी.

प्रजापरिषदेच्या १९२२ च्या पहिल्या अधिवेशनानंतर लगेचच १९२३ साली दुसरे अधिवेशन शहापूर या ठिकाणी ग. र. अभ्यंकर यांच्या अध्यक्षतेखाली भरले. या दुसऱ्या अधिवेशनात संस्थानाच्या जमा खर्चाच्यादृष्टीने काही ठराव करण्यात आले. तसेच अस्पृश्यता निवारण, औद्योगिक पाहाणी यासारखे ठराव पास करण्यात आले. सांगली प्रजापरिषदा निरनिराळया तालुक्यात भरल्यामुळे त्या त्या तालुक्यातील समस्यांचा विचार केला गेला उदा. जंगल हक्काबाबतचे ठराव, धरणाच्या पाणी प्रश्नाविरूध्द तक्रारींचे ठराव. याचबरोबर कन्नड भाषा संस्थानची राज्यभाषा म्हणून मान्य करणे असे ठराव पास करण्यात आले. शहापुरातील या परिषदेमध्ये इंग्लंडमध्ये जाऊन जे तीन लाख पंचाहत्तर हजार रूपये खर्च केले होते याबाबत विचारणा करणारा ठराव मांडला व तो पास करण्यात आला. डॉ. सरोजनी कमतनूर यांनी स्त्रियांना पुरूषांच्या बरोबरीने लेजस्लिटिव्ह असेंब्लीमध्ये प्रतिनिधीत्व द्यावे अशी मागणी केली होती.

या नंतरच्या बहुतेक प्रजापरिषदातून अशा स्वरूपाचेच ठराव मांडले गेले. ३० व ३१ मार्च १९२९ मध्ये मंगळवेढा येथे सांगली प्रजापरिषदेच्या सातव्या अधिवेशनात सांगली संस्थानाच्या अधिपतींच्या आवाढव्य खाजगी खर्चाचा निषेध करणारा ठराव मंजूर करण्यात आला. पाणी पुरवठा, रेल्वे, रस्ते, प्राथमिक शिक्षणाचा अभाव, शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा वगैरे विषयासंबंधी स्थानिकांचे प्रश्न मांडणारा ठराव एकमताने पास करण्यात आला.

संस्थानच्या हद्दीत सांगली संस्थान प्रजापरिषदेचे अधिवेशन भरविण्यास सांगली दरबाराने कधीच विरोध केला नाही. मात्र दक्षिण संस्थान प्रजापरिषदेचे सांगलीत अधिवेशन भरविण्यास दरबाराने परवानगी दिली नाही. त्यामुळे २८ व २९ मे १९२४ रोजी बॅ. जयकर यांच्या अध्यक्षतेखाली दक्षिण संस्थान प्रजापरिषदेचे चौथे अधिवेशन सांगली जवळच्या विश्रामबाग स्टेशनजवळील कुपवाड हद्दीत भरविणे संयोजकांना भाग पडले. या अधिवेशनाच्या वेळी ब्राम्हण ब्राम्हणेत्तर वाद पेटविण्यात आला. बलवंतराय धावत्यांच्या नेतृत्त्वाखाली सांगलीच्या जैन व्यापाऱ्यांनी परिषदेत गोंधळ घातला आणि हुल्लड माजवून परिषद उधळण्याचा प्रयत्न केला. या दंगलीचे निमित्त करून गणपतराव अभ्यंकरांसारख्या प्रजापरिषदेच्या प्रमुख नेतृत्त्वास बदनाम करण्यासाठी सांगली दरबाराने प्रयत्न केला. यावरून फोडा आणि झोडा ही ब्रिटिशांची निती सांगली दरबारानेही अवलंबली होती हे लक्षात येते.

याच दरम्यान १९२८ साली सांगली प्रजापरिषदेचे सहावे अधिवेशन तेरदाळ येथे श्री. पंडिताप्पा चिक्कोडी यांच्या अध्यक्षतेखाली भरले. तेरदाळ अधिवेशनात एकमताने जबाबदार राज्यपध्दतीची मागणी करण्यात आली. यापुढचे अधिवेशन मंगळवेढयास भरविण्यात आले.

**७. स्टेट रयत असेंब्ली रेग्युलेशन १९३० :**

प्रजा परिषद चळवळीची दखल घेवून संस्थानाने सन १९०८ साली स्थापन झालेल्या रयतसभेच्या कायद्यात सुधारणा करून जबाबदार राज्यपद्धतीचा पहिला हप्ता प्रदान केला. 'सांगली स्टेट रयत असेंब्ली रेग्युलेशन १/१९३०' या कायद्यात रयत असेंब्लीला कायदे करण्याचा, ठराव मांडण्याचा, काही विशिष्ट बाबी सोडून अंदाजपत्रकावर चर्चा करण्याचा व लोकहिताच्या मुद्यांवर प्रश्न विचारण्याचा अधिकार देण्यात आला. या सुधारणांनी प्रजापरिषदेच्या कार्यकत्यांच्या सर्वच मागण्या पूर्ण होऊ शकल्या नाहीत. मात्र

गणपतराव अभ्यंकर यानी राजकीय तडजोड म्हणून सुधारणांचा हा पहिला हप्ता पदरात पाडून घेण्यात शहाणपण असल्याचा कार्यकर्त्यांना सल्ला दिला. नंतरच्या प्रजापरिषदांतून उर्वरित मागण्यांचे सत्र पुढे चालू ठेवण्यात आले.

१९३० नंतर रयत असेंब्लीत लोकहिताचे काही चांगले निर्णय झालेत. उदाहरणार्थ, हिंदू विधवेच्या हक्क विस्तृत करणारा कायदा संमत झाला. विधवाना अविभक्त कुटुंबात इतराबरोबर हक्क देण्याचा कायदा झाला. अल्पवयीन मुलामुलींच्या विवाहाला प्रतिबंध करणारा कायदा संमत झाला. शेतकरी संरक्षण कायदा झाला. प्रजापक्षीय चळवळीने उभा केलेल्या लढयातील महत्वाची मागणीचा हा कायदा म्हणजे विजय होता. या १९३० मध्ये अस्तित्वात आलेल्या असेंब्लीचे अधिकार जरी मर्यादित असले, तरी या असेंब्लीत काम करणाऱ्या सभासदांनी कायदे कौन्सिलातील कामकाजाप्रमाणे पध्दतशीर काम करून सांगली कायदेमंडळ यशस्वीपणे राबविले. सन १९३० नंतरच्या ज्या प्रजापरिषदा झाल्या त्या रयत असेंब्लीच्या कामाला पुरक व हक्क वाढीच्या मागण्या करण्याच्यादृष्टीने झाल्या.

सन १९३१ साली दामोदर गोखले यांच्या अध्यक्षतेखाली उगार येथे नववे अधिवेशन पार पडले. सांगलीतील ही अधिवेशने त्यात्या वेळी निर्माण होणाऱ्या काही प्रासंगिक प्रश्नांमुळे महत्वाची ठरली. यावेळी मार्केट ॲक्ट सारख्या प्रश्नाने सांगलीचे वातावरण तापले असताना दहावे अधिवेशन सन १९३३ मध्ये भारत सेवक समाजाचे सदस्य वझे यांच्या अध्यक्षतेखाली भरले. मार्केट ॲक्टच्यावेळी व्यापाऱ्यांनी तेरा दिवस १९३८ उगार खुर्द व १९३९ हनगंडी येथे सांगली संस्थान प्रजापरिषदेची अधिवेशने झाली.

**८. १९३८ चे ऐतिहासीक सांगली अधिवेशन :**

सांगली येथे मे १९३८ मध्ये दक्षिण संस्थान लोकपरिषदेचे १२ वे अधिवेशन सरदार वल्लभभाई पटेल यांच्या अध्यक्षतेखाली भरते होते. संस्थान हद्दीत असे अधिवेशन भरविण्याचा पहिला मान सांगलीत मिळाला. ही राजकीय चळवळीच्या दृष्टीने महत्वाची बाब झाली. या निमित्त सांगलीत डॉ. पट्टाभिसीतारामय्या, सरदार वल्लभाई पटेल, दे. भ. गंगाधरराव देशपाडे व दे. भ. शंकरराव देव यासारखे अखिल भारतीय काँग्रेस पुढारी, तसेच श्री. वामनरावजी पटवर्धन, श्री. श्रीधरपंत वझे, श्री. राघवेंद्र शर्मा, वगैरे संस्थांनी चळवळीत सतत काम करणारे पुढारी हजर होते. सांगलीत भरलेल्या या परिषदेमुळे दक्षिणी संस्थानात एक प्रकारे नवचैतन्य निर्माण झाले. काँग्रेस कार्यकर्त्यांच्या मध्यस्तीमुळे मिरज, बुधगाव जमखिंडी वगैरे संस्थानात शेतकऱ्यांना सवलती देण्याचा सुधारणांचा उपक्रम सुरू झाला.

त्यामुळे १९३८ साली सांगलीच्या कार्यकत्यांनी दक्षिणी संस्थान लोकपरिषदेच्या १२ व्या अधिवेशनाचे यजमानपद स्वीकारून आपल्या संस्थानातील राजकीय सुधारणाचा दुसरा हप्ता पदरात पाडून घेण्यासाठी योग्य ती वातावरण निर्मिती केली. मे महिन्यात आलेल्या या अधिवेशनापाठोपाठ जुलै महिन्यात प्रजापरिषदेचे अधिवेशन घेऊन राजकीय सुधाणांच्या मागण्यांचा मसुदा पारित करण्यात आला. त्यानंतर २२ डिसेंबर १९३८ रोजी रयत असेंब्लीत श्रीमंत चिंतामणराय पटवर्धन यांनी राजकीय सुधारणेच्या मागण्या मान्य केल्याचे जाहीर केले. राजकीय सुधारणाच्या या दुसऱ्या हप्त्यात रयत असेंब्लीतील सभासद संख्या ४० वरून ४५ करण्यात आली व त्यापैकी दोन तृतींश सदस्य म्हपाजे ३० सदस्य हे लोकनियुक्त असतील अशी तरतूद करण्यात आली,

लोकनियुक्त सभासदानी निवडलेल्या एका सभासदाची मंत्री म्हणून नेमणूक करून त्याच्याकडे शिक्षण, आरोग्य, सहकार, स्थानिक स्वराज्य अशी खाती सोपविण्यात आली. या सुधारित कायद्यानुसार श्री. अश्वथामा महर्षी पहिले लोकनियुक्त मंत्री म्हणून निवडण्यात आले. अशा प्रकारे द्विदल राज्यपद्धतीचा प्रयोग सांगली संस्थानाने स्वीकारला. हे प्रजापरिषदेच्या लोकचळवळीचे मोठे यश म्हटले पाहिजे,

हनगंडी येथे दि. १९ व २०ऑगस्ट १९३९ रोजी सांगली प्रजा परिषदेचे १४ वे अधिवेशन झाले. यावेळी अध्यक्ष श्री.पंडिताप्पा चिक्कोडी हे होते. या अधिवेशनामध्ये पुढील ठराव पास झाले.

१. मतदान कमिटीने केलेल्या रिपोर्टवरून ग्रामिण मतदारांची संख्या शहरी मतदारांच्या संख्येच्या मानाने जास्त व्हावी.

२. फेडरेशनला संमती देऊन त्यात जनतेचे प्रतिनिधीत्व असावे.

३. दगड, माती, वाळू यावरील कर माफ करावा यासारखे ठराव या अधिवेशनात पास करण्यात आले.

१९४२ साली चलेजाव चळवळ सुरू झाली या पार्श्वभूमीवर सांगली प्रजापरिषदेचे अठरावे अधिवेशन माधवराव बागल यांच्या अध्यक्षतेखाली भरले. या अधिवेशनात संस्थानातून जबाबदार राज्यपध्दती स्थापन करणे व लहान संस्थानांचा सहकारी तत्त्वावर सामायिकपणे कारभार चालविणे असे ठराव पास केले. १९४२ च्या स्वातंत्र्यलढ्यानंतर बदललेल्या राजकीय पार्श्वभूमीवर संस्थानातल्या कार्यकर्त्यांनी एकजुटीने आंदोलनात पुढे राहिले पाहिजे, यावर सर्वांचे एकमत झाले. संस्थानांचे संघराज्य स्थापन करण्याविषयीही अनुकूल वातावरण तयार झाले.

भारतातील राजकीय घडामोडींचा परिणाम संस्थानी चळवळीवर होऊ लागला त्याचे प्रतिबिंब २० डिसेंबर १९४५ रोजी सांगलीस भरलेल्या सांगली संस्थान प्रजापरिषदेच्या अधिवेशनात पडलेले दिसते. त्यांत सांगली संस्थान नजिकच्या खालसा मुलुखात विलीन व्हावे हे ध्येय असल्याचा ठराव पास केला. आणि विलीनिकरणाच्या मार्गावरील टप्पा म्हणून संस्थानात संपूर्ण जबाबदार राज्यपध्दती ताबडतोब स्थापन करावी असा ठराव पास करण्यात आला.

**९. सांगली संस्थानाचे विलिनीकरण :**

महात्मा गांधींच्या हत्येनंतर निरनिराळ्या दंगलग्रस्त संस्थांनी भागात मुंबई प्रांताच्या अधिकाऱ्यांचा अंमल सुरु होणे अपरिहार्य झाले. दि. १९ फेब्रुवारी १९४८ रोजी मुंबई प्रांताचे मुख्य प्रधान श्री. बाळासाहेब खेर यांच्या अध्यक्षतेखाली अक्कलकोट, जत, फलटण, कुरूंदवाड, (थोरली व धाकटी पाती सांगली, रामदुर्ग, मिरज, मिरज मळा, मुधोळ, सावनूर, वाडी, औंध, भोर व जमखंडी या पंधरा संस्थानांच्या अधिपतिची सभा होउन विलिनीकरणाच्या करारनाम्यावर संस्थानाधिपतींच्या सह्या झाल्या. १९ फ़ेब्रुवारी १९४८ ला राजा ऑम सांगली व भारत सरकार यांच्यामध्ये विलिनीकरणा संबंधी पाच कलमी करार मुंबई या ठिकाणी झाला. त्यावर, चिंतामणराव पटवर्धन (दुसरे) यांनी सांगलीचे संस्थानिक म्हणून व व्ही. पी. मेनन यांनी भारत सरकारच्या संस्थानी मंत्री खात्याच्या सचीव म्हणून सह्या केलेल्या आहेत. त्यानुसार ८ मार्च १९४८ रोजी सांगली संस्थान भारतीय संघराज्यात विलीन झाले.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न : २**

**अ) योग्य पर्याय निवडून रिकाम्या जागा भरा.**

१. ..... मध्ये युनियन क्लबची स्थापना केली.

(अ) १९१६ (ब) १९२० (क) १९२२ (ड) १९३०

२. सन १९०८ मध्ये रयत सभेची स्थापना .....यांनी केली.

(अ) बर्क (ब) ग. र. अभ्यंकर

(क) व्ही. पी. मेनन (ड)चिंतामणराव पटवर्धन (दुसरे)

३. ८ फेब्रुवारी १९२२ साली झालेले सांगली प्रजापरिषदेचे पहिले अधिवेशन ..... यांच्या अध्यक्षतेखाली झाले.

(अ) रामचंद्र मुंगळी (ब) ग. र. अभ्यंकर

(क) विनायक माईनकर (ड) केशव छापखाने

४. १९०१ ते १९०५ या पहिल्या पाच वर्षांत रायबहादूर ..... हे संस्थानाचा कारभार पाहत होते.

(अ) अच्युत भास्कर देसाई (ब) विनायक माईनकर

(क) बर्क (ड) आप्पासाहेब पटवर्धन

५. सन १९०८ साली स्थापन झालेल्या रयतसभेच्या कायद्यात सुधारणा करून ..... पहिला हप्ता प्रदान केला.

(अ) जबाबदार राज्यपद्धतीचा (ब) द्विदल राज्यपद्धती

(क) भाषणस्वातंत्र्याचा (ड) शेतसारा कमी करण्याचा

६. 'दक्षिणी संस्थानहितवर्धक सभा' ही संस्थास्थापन करण्यात .....यांचा पुढाकार होता.

(अ) वामनरावजी पटवर्धन (ब) रामचंद्र मुंगळी

(क) आप्पासाहेब पटवर्धन (ड) बर्क

७. सांगली प्रजापरिषदेचे पहिले अधिवेशन .....साली झाले.

(अ) १९२२ (ब) १९२३ (क) १९२४ (ड) १९२५

८. सांगली संस्थान .....रोजी भारतीय संघराज्यात विलीन झाले

(अ) १ मार्च १९४९ (ब) ८ मार्च १९४८

(क) १५ ऑगस्ट १९४७ (ड) २० डिसेंबर १९४७

९. सांगली प्रजापरिषदेचे अठरावे अधिवेशन ..... यांच्या अध्यक्षतेखाली भरले

(अ) रत्नाप्पा कुंभार (ब) माधवराव बागल

(क) शंकरराव देव (ड) यापैकी नाही

१०. .....हे भारत सरकारच्या संस्थानी मंत्री खात्याच्या सचीव होते.

(अ) व्ही. पी. मेनन (ब) सरदार पटेल

(क) बर्क (ड) यापैकी नाही

**ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. ईस्ट इंडिया कंपनीचा कोणाशी स्वतंत्र तह झाला होता ?

२. कोणाच्या नेतृत्वाखाली युनियन क्लबची स्थापना करण्यात आली ?

३. कोणती नवी व्यवस्था सांगली संथानात निर्माण करण्यात आली ?

४. रयत असेंब्लीचे पहिले अधिवेशन कोणाच्या अध्यक्षतेखाली झाले ?

५. सांगली संस्थान दुसऱ्या प्रजा परिषदेचे अध्यक्ष कोण होते ?

६. स्त्रियांना पुरूषांच्याबरोबरीने लेजस्लिटिव्ह असेंब्लीमध्ये प्रतिनिधीत्व द्यावे अशी मागणी कोणी केली?

७. दक्षिण संस्थान प्रजापरिषदेचे चौथे अधिवेशनाचे अध्यक्ष कोण होते?

८. सांगली प्रजापरिषदेच्या अठराव्या अधिवेशनात कोणते ठराव पास केले.

९. मुंबई प्रांताचे मुख्य प्रधान कोण होते?

१०. सांगली संस्थानाचे प्रतिनिधी म्हणून विलीनीकरण करारावर कोणी सही केली?

## २.२.३ फलटण संस्थान :

### १. पूर्वइतिहास :

फलटण संस्थान हे मुंबई प्रांतातील सातारा जिल्हयाच्या ईशान्य भागात असणारे संस्थान आहे. या संस्थानाच्या उत्तरेला निरा नदी तर पूर्वेला सोलापूर जिल्हा, दक्षिणला सातारा जिल्हा आहे. या संस्थानाचे क्षेत्रफळ ३९७ चौ. मैल असून त्यात ७३ गावे येतात. १९४१ च्या जनगणनेनुसार फलटण संस्थानाची लोकसंख्या ७१,४७३ होती. या संस्थानावर नाईक-निंबाळकर घराण्याच्या वंशजांचे राज्य होते.

या घराण्यातील जानोजीराव दुसरा याच्या काळातच एलफिन्स्टनने पेशव्यांचा सर्व प्रदेश ताब्यात घेतला व पुर्वीचे जे पेशव्याचे सरदार होते. त्यांच्याशी तह करून त्यांना मांडलिक बनविले. या तहानुसार फलटणच्या नाईक-निंबाळकरांशी दि. २२ एप्रिल १८२० रोजी ब्रिटीशांचे मंडलिक बनले. जानोजीराव निपुत्रीक मरण

पावल्यानंतर १८२५ मध्ये सातारच्या महाराजांनी हे संस्थान जप्त केले होते. पुढे बजाजीला गादीवर बसवून संस्थान परत केले. पण तोही १८४१ ला मरण पावल्याने सातारकरांनी पुन्हा संस्थान जप्त केले. शेवटी डिसेंबर १८४१ मध्ये जानोजीरावाची पत्नी साहेबजीबाई उर्फ बयाबाई हिला सातारच्या महाराजांकडून संस्थानाला वारस दत्तक घेण्याची परवानगी मिळाली. यानुसार जानोजीरावाच्या भावाचा नातू महादजी याला दत्तक घेऊन त्याचे नांव मुधोजी ठेवले व तो अल्पवयीन असल्याने त्याच्या नावे राणीने १८५३ पर्यंत कारभार चालविला. दरम्यान राणीच्या मृत्यूमुळे १८५३ ते १८६० या काळातील संस्थानाचा कारभार ब्रिटिशांकडून चालविला गेला. मुधोजीराजांची आठरा वर्षेपुर्ण झाल्यानंतर बुधवार दि.१० फेबुवारीला १८६० मध्ये कारभाराची सुत्रे त्यांच्याकडे दिली गेली. त्यावेळेपासून १७ ऑक्टोंबर १९१६ रोजी त्यांच्या मृत्यूपर्यंत त्यांनी फलटणचे राजपद भूषविले होते.

यानंतर या संस्थानाची सुत्रे दत्तक पुत्र मालोजी नाईक-निंबाळकर याच्याकडे आली. मालोजीही अल्पवयीन असल्यामुळे या काळातील कारभारही ब्रिटिश सरकारने नेमलेल्या प्रशासकामार्फत चालू होता. मालोजी यांच्याकडे या संस्थानांचा पूर्ण अधिकार १५ नोव्हेंबर १९१७ रोजी आला.

**२ . फलटण संस्थान प्रजापरिषद चळवळ :**

फलटण संस्थानचे शेवटचे अधिपती श्रीमंत मालोजीराजे नाईक निंबाळकर यांच्या काळातच फलटण संस्थानात लोकशाहीची सुरवात झाली व तिचा विकास झाला.

**३. जबाबदार राज्यपद्धती :**

सन १९२१ पासून महाराष्ट्रातील अनेक संस्थानात प्रजापरिषदांची स्थापना होऊन अधिवेशनास सुरवात झाली होती. पण अशा स्वरूपाची चळवळ या संस्थानात झाली नाही, कारण या संस्थानाचा सुरवातीपासूनच कारभार लोककल्याणकारी अशा स्वरूपाचा होता. श्रीमंत मालोजी राजांनी त्यांच्या ३२ व्या वाढदिवसानिमित्त १७ सप्टेंबर १९२८ रोजी फलटण संस्थानात जबाबदार राज्यपध्दती स्थापन करण्याचे आपले ध्येय असल्याचे जाहीर केले व त्यानुसार १९२९ मध्ये विधिमंडळाची स्थापना केली. या पहिल्या विधिमंडळात ८ लोकनियुक्त, ५ बिनसरकारी व ४ सरकारी अधिकारी मिळून १७ सदस्य होते. फलटण संस्थानाचा राज्यकारभार पाहण्यासाठी एक कार्यकारी मंडळ नेमले. यामध्ये फलटणचे एक वकिल श्री. मा. दाणी यांची नेमणुक करण्यात आली.

सन १९२९ मध्ये दिलेल्या राजकीय सुधारणांना दहा वर्षे पूर्ण झाली असतानाच व इतर संस्थानाप्रमाणे येथील प्रजेची कोणतीही मागणी नसताना व प्रजापक्षीय चळवळही नसताना १९३९ मध्ये आणखी राजकीय हक्कदानाची घोषणा केली. यानुसार

१. कायदेमंडळातील लोकनियुक्त सदस्यांच्या प्रमाणात वाढ केली.

२. लोकनियुक्त सदस्यांपैकी एका सभासदास राजेसाहेबांच्या संमतीने दरबार कार्यकारी मंडळात नेमण्यात येईल.

३. मतदानाचा हक्क अधिक विस्तृत करण्यात येईल.

४. कायदेमंडळाचे अधिकार वाढविण्यात येतील.

यापैकी पहिल्या दोन सुधारणांची अंमलबजावणी कायदेमंडळाच्या पुढील बैठकीपासून अंमलात आणल्या.

**४. फलटण संस्थान लोकसभा :**

फलटणच्या संस्थानाधिपतीने प्रजेला आपणहुन लोकशाहीचा हक्क दिला होता.पण तरीही फलटण संस्थान कायदेमंडळाचे प्रथमपासून सभासद असणारे वि. अ. पटवर्धन यांनी फलटण येथील लोकपुढायांच्या साहयाने १९३८ मध्ये 'दक्षिण संस्थान लोकसभा फलटण केंद्राची' स्थापना केली. त्याचेच रूपांतर ११ डिसेंबर १९३९ रोजी 'फलटण संस्थान लोकसभेत' झाले. या सभेचे ध्येय व उद्देश संस्थानाधिपतीच्या अधिपत्याखाली शांततेच्या व न्यायाच्या मार्गानी संपुर्ण जबाबदार राज्यपध्दती प्राप्त करून घेणे तसेच फलटण संस्थानाच्या प्रजेच्या आर्थिक राजकीय सामाजिक अशा सर्वांगीण उन्नतीसाठी प्रयत्न करणे असा होता. या संस्थेच्या सल्ल्यानेच संस्थानात सुधारणेसंबंधी काही निर्णय घेतले गेले. जनावरांची वनचराई फी माफी, ब्रिटीश हद्दीतील शेतसाऱ्याशी सुसंगत शेतसाऱ्याची आकारणी अशा काही निर्णयांचा त्यामध्ये समावेश होता.

**५. शेतकरी संघ :**

फलटण संस्थान लोकसभा याशिवाय सुधारणावादी स्वतंत्र पक्ष व २५ फेब्रुवारी १९४० मध्ये शेतकरी संघ नावाच्या संघटनेची या संस्थानात स्थापना करण्यात आली.या संघटनेचा उद्देश शेतकयांच्या समस्या सोडविणे हा होता. शेतकऱ्यांच्या शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक सुधारणा घडवून आणून त्यांच्या अडचणी व गाऱ्हाणी दुर करणे हा या शेतकरी संघाचा उद्देश होता. या तीनही राजकीय संघटनांमध्ये परस्पर समन्वय होता.

**६. १९४२ चा कायदा :**

सन १९३९ ला घोषणा केल्याप्रमाणे सन १९४२ चा कायदा तयार करण्यात आला व त्यानुसार फलटण संस्थानच्या विधिमंडळातील १८ सभासदांपैकी १२ सभासद लोकनियुक्त होते. या नविन विधिमंडळाचे नियुक्त केलेले सर्व सभासद संस्थानाबाहेरील होते. या कायद्यानुसार निर्माण करण्यात आलेल्या कायदेमंडळाला सर्व बाबींवर चर्चा करण्याचा व राखीव बाबी सोडून इतर बाबीसंबंधी कायदा करण्याचा अधिकार होता. या कायदेमंडळाची मुदत तीन वर्षाची होती. ही मुदत वाढविण्याचा किंवा कायदेमंडळ बरखास्त करण्याचा अधिकार संस्थानाधिपतीला होता. या कायदेमंडळाच्या अध्यक्षाची निवड स्वत: राज्य करत असे व उपाध्यक्षाची निवड कायदेमंडळातील सभासदाकडून केली जात असे.

फलटण संस्थानात या काळापर्यंत कोणत्याही स्वरूपाची प्रजापक्षीय चळवळ नसताना व प्रजेच्या कोणत्याही मागण्या नसताना या संस्थानाच्या राजाने प्रजेला अशा स्वरूपाचे हक्क व अधिकार दिले होते. औंध संस्थानानंतर दक्षिणी संस्थानांमध्ये जबाबदार राज्यपध्दती स्थापन करणारे फलटण हे दुसरे संस्थांन होते. पण या संस्थानात करण्यात आलेले हे सत्तांतर जास्त काळ टिकले नाही, कारण या संस्थानचे मंत्री स. रा. भोसले यांनी आपल्या पदाचा गैरवापर मोठया प्रमाणावर केला. सहाजिकच त्यामुळे त्यांना मंत्री पदावरून काढून टाकण्यात आले. त्यामुळे फलटण संस्थानातील राजाने सुरू केलेल्या लोकशाही प्रयोगाला धक्का बसला व त्यामुळे फलटण संस्थानातील राजाने सुरू केलेले लोकशाही राजकारण मागे पडू लागले. याचा परिणाम म्हणून मार्च १९४५ मध्ये फलटण संस्थानाची राज्यघटना तहकुब करण्यात आली.

**७. प्रजा परिषदेची स्थापना :**

फलटण संस्थानातील राजाने स्वीकारलेल्या पुरोगामी धोरणामुळे येथे प्रजा परिषदेची स्थापना खूप उशीरा

झाली. फलटण संस्थान प्रजापरिषदेचे पहिले अधिवेशन १९४४ मध्ये महाराष्ट्र काँग्रेसचे पुढारी शंकरराव देव यांच्या अध्यक्षतेखाली झाले. या अधिवेशनाचे स्वागताध्यक्ष डॉ. दत्तात्रय बर्वे व सेक्रटरी र. ब. भगत हे होते. या अधिवेशनाला या संस्थानातील स्थानिक नेते मोठ्या संख्येने सहभागी होते. या अधिवेशनात जबाबदार राज्यपध्दती स्थापन करणे, संस्थानिकांस खाजगी खर्चास उत्पन्नाचा दहावा हिस्सा देणे, सामाईक हायकोर्टाची स्थापना असे ठराव पास करण्यात आले.

या अधिवेशनानंतर फलटण संस्थानाच्या राजाने प्रजापरिषदेचे अध्यक्ष व प्रमुख पाहुण्यांसाठी संध्याकाळचे जेवणाचे निमंत्रण दिले. या जेवणाच्या वेळी फलटण संस्थानातील संस्थानचे मंत्री स. रा. भोसले यांनी आपल्या पदाचा गैरवापर मोठ्या प्रमाणावर केला, सहाजिकच त्यामुळे त्यांना मंत्री पदावरून काढून टाकण्यात आले होते त्याच्या चौकशीसाठी एक कमिटी नेमावी अथवा पुन्हा एकदा लोकप्रतिनिधिच्या हाती कारभार सोपवावा अशी सुचना राजांना करण्यात आली. यामुळे राजेसाहेबांनी मुंबई हायकोर्टाचे जज्ज श्री. लोकुर, बॅ. आप्पासाहेब पंत व गणपतराव खरात या त्रीसदस्यीय लोकांची कमिटी नेमली. पण ही कमिटी काम करू शकली नसल्याने प्रजापरिषदेने आपली या चौकशीसाठी स्वतंत्र कमिटी नेमली. या कमिटिचे अध्यक्ष केशवराव जेधे हे होते. तर यशवंतराव चव्हाण, चुन्नुसिंग चेंडेल, वसंतराव बागल आणि ग. स. खरात हे सदस्य होते.

फलटण संस्थान प्रजापरिषदेच्या स्थापनेनंतर शेतकरी संघ व लोकसभा पार्टी या संस्थानातील दोन राजकीय संघटनांचे विलिनिकरण फलटण संस्थान प्रजापरिषदेत झाले. त्यामुळे फलटण संस्थान प्रजापरिषदेला बळकटी प्राप्त झाली. या संस्थानातील प्रजापरिषदेच्या कार्यामुळे व दिलेल्या लढयामुळे फलटण संस्थानाधिपतींनी मार्च १९४५ मध्ये जी फलटण संस्थानाची राज्यघटना तहकुब करण्यात आली होती ती पुन्हा लागू केली. याबरोबरच नागेश विश्वनाथ बावडेकर व र. ह. शहा या बडतर्फ केलेल्या मंत्र्यांची परत नियुक्ती केली. फलटण संस्थान प्रजापरिषदेचे पहिले व एकच अधिवेशन झाले पण तरीही या एकाच अधिवेशनाने बऱ्याच गोष्टी साध्य केल्या. यानंतर सन १९४६ पासून संस्थानांच्या विलिनिकरणाची प्रक्रिया साऱ्या भारतभर सुरू झाली.

दक्षिण संस्थानांच्या दिवाणांची बैठक मे १९४६ मध्ये कोल्हापूर रेसिडेन्सीमध्ये होऊन संघराज्याची कल्पना पुढे आली. या मान्यता देणारे फलटण हे ही संस्थान होते. १६ ऑगस्ट १९४६ रोजी मुंबई येथे फलटण संस्थानचे अधिपती श्रीमंत मालोजी राजे नाईक-निंबाळकर व त्यांचे दिवाण के. वी. गोडबोले यांनी सरदार वल्लभभाई पटेल व जवाहरलाल नेहरूंची भेट घेतली आणि दक्षिण संस्थानांच्या संघराज्याविषयी चर्चा केली. १९ फेब्रुवारी १९४८ रोजी दक्षिणेतील संस्थानिकांची मुंबईत बैठक बोलविण्यात आली. या बैठकीचे अध्यक्ष बाळासाहेब खेर हे होते. या बैठकीस हजर असणाऱ्या चौदा संस्थानिकांनी विलिनिकरणाच्या करारनाम्यावर सह्या केल्या. त्यानुसार ८ मार्च १९४८ रोजी संस्थान मुंबई राज्यात विलीन झाले.

फलटण संस्थानात प्रजापरिषद जरी उशीरा सुरू झाली असली तरी या ठिकाणच्या प्रजेला स्वत: राजानेच जास्तीत जास्त हक्क व अधिकार दिला होता. पण तरी शेवटच्या टप्यात याही संस्थानात प्रजापरिषदेची स्थापना करण्यात आली व आपले प्रश्न राजापुढे मांडले. फलटण संस्थानातील प्रजापरिषदेचे नेतृत्व शंकरराव देव, शहा, डॉ. दत्तात्रय बर्वे, र. ब. भगत, विश्वनाथ बावडेकर, केशवराव जेधे, यशवंतराव चव्हाण, चुन्नुसिंग चेंडेल, वसंतराव बागल आणि ग. स. खरात या संस्थानातील व संस्थानाबाहेरील पुढाऱ्यांनी केले.

फलटण संस्थानामध्ये प्रजेचा संघराज्यास विरोध होता. प्रजेला संस्थानाचे विलिनीकरण हवे होते. या संस्थानामध्ये विलिनीकरणासंदर्भात प्रभावीपणे प्रजापरिषद कार्य करू शकली नाही. या संस्थानातील चळवळीतील नेते स. रा. भोसले हे संस्थानांच्या संघराज्यास अनुकूल होते. तर उलट रा. ब. भगत हे विलिनीकरणास अनुकूल होते.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न : ३**

**अ) योग्य पर्याय निवडून रिकाम्या जागा भरा.**

१. फलटण संस्थान हे मुंबई प्रांतातील ..... जिल्ह्याच्या ईशान्य भागात असणारे संस्थान आहे.

(अ) कोल्हापूर (ब) पुणे

(क) सातारा (ड) सांगली

२. फलटण संस्थानावर ..... घराण्याच्या वंशजांचे राज्य होते.

(अ) नाईक-निंबाळकर (ब) भोसले

(क) पटवर्धन (ड) डाफळे

३. फलटण संस्थानात ..... रोजी विधिमंडळाची स्थापना केली.

(अ) ७ सप्टेंबर १९२९ (ब) ७ सप्टेंबर १९३०

(क) ७ ऑगस्ट १९२९ (ड) १५ ऑगस्ट १९४७

४. ..... मध्ये 'दक्षिण संस्थान लोकसभा फलटण केंद्राची' स्थापना केली.

(अ) १९३८ (ब) १९३८

(क) १९४७ (ड) १९३८

५. फलटण संस्थान प्रजापरिषदेचे पहिले अधिवेशन ..... यांच्या अध्यक्षतेखाली झाले.

(अ) शंकरराव देव (ब) गंगाधरराव गाडगीळ

(क) बाळासाहेब खेर (ड) यशवंतराव चव्हाण

६. ..... रोजी फलटण संस्थान भारतीय संघराज्यात विलीन झाले.

(अ) १ मार्च १९४९ (ब) ८ मार्च १९४८

(क) १५ ऑगस्ट १९४७ (ड) २० डिसेंबर १९४७

**ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. कोणत्या वर्षी फलटण संस्थान ब्रिटीशांचे मंडलिक बनले?

२. कोणाच्या काळात फलटण संस्थानात लोकशाहीची सुरवात झाली ?

३. फलटण संस्थानात कोणत्या वर्षी जबाबदार राज्यपद्धती सुरु झाली ?

४. कोणाच्या पुढाकाराने 'दक्षिण संस्थान लोकसभा फलटण केंद्राची' स्थापना करण्यात आली?

५. फलटण संस्थानातील विधिमंडळ सदस्य संख्या किती होती?

## २.३ सारांश :

दक्षिणी संस्थानांमध्ये अक्कलकोट, औंध, भोर, जमखंडी, जंजिरा, जत, कुरूंदवाड थोरली पाती, कुरूंदवाड धाकटी पाती, मिरज, मिरजममळा, मुधोळ, फलटण, रामदुर्ग, सांगली, सावनूर, सावंतवाडी व कोल्हापुर या आठरा संस्थानांचा समावेश होतो. भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा परिणाम या संस्थांनी जनतेवर झाल्याने त्यांनीही आपल्या संस्थानामध्ये ब्रिटीश मुलखाप्रमाणे जबाबदार राज्यपद्धतीची स्थापना करावी, डोईजड कर कमी करावेत अश्या स्वरूपाच्या मागण्या मागण्यास सुरवात केली. यातूनच संस्थांनी प्रजेच्या प्रश्नांबाबत काँग्रेसकडून कोणताही ठोस कृतिकार्यक्रम घेतला जाण्याची शक्यता नसल्याने न. चिं. केळकर, वामनराव पटवर्धन यांनी पुढाकार घेतला. पहिली दक्षिणी संस्थान परिषद २४ व २५ मे १९२१ रोजी पुणे येथे सार्वजनिक सभेच्या दिवाणखान्यात भरली. या परिषदेत संस्थांनी प्रजेच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी व संस्थानामध्ये जबाबदार राज्यपद्धती स्थापन करण्यासाठी 'दक्षिणी संस्थान हितवर्धक सभा' नावाची संस्था स्थापन करण्यात आली. यानंतर पुढे विविध संस्थानात प्रजा परिषदांची स्थापना होऊन संस्थानिकाकडे आपल्या मागण्या मागण्यास सुरवात झाली. हि चळवळ संस्थाने भारतीय संघराज्यात सामील होईपर्यंत सुरु राहिली.

## २.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ :

**खालसाभारत** (British India) **:** ज्याच्यावर ब्रिटीशांचे थेट नियंत्रण आहे असा प्रदेश

**संस्थांनी भारत** (Princely India) **:** संस्थानिकांच्या अधिपत्याखाली असलेला प्रदेश दोन

**एस. एम. सी. स्टेटस् :** Southern Maratha Country States

**सनद :** एखाद्या प्राप्त विशेषाधिकार किंवा कार्ये देणारा दस्तऐवज

**मराठा लीग :** कोल्हापूरच्या दरबारी राजकारणाचे समर्थन करणारी संघटना

## २.५ स्वयं अध्ययनासाठी उत्तरे :

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न : १**

**अ) योग्य पर्याय निवडून रिकाम्या जागा भरा.**

१) ब) ५६२ २) क) कोल्हापूर

३) अ) नागपूर ४) क) २४ व २५ मे १९२१

५) ब) महाराणी तारारणी ६) अ) १९३९

७) अ) रयत सभा ८) अ) दलित प्रजापरिषद

९) अ) मराठा १०) अ) १ मार्च १९४९

**ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. दि प्रोटेक्टड प्रिन्सेस ऑफ इंडिया

२. ५६२

३. अक्कलकोट, औंध, भोर, जमखंडी, जंजिरा, जत, कुरूंदवाड थोरली पाती, कुरूंदवाड धाकटी पाती, मिरज, मिरज मळा, मुधोळ, फलटण, रामदुर्ग, सांगली, सावनूर, सावंतवाडी व कोल्हापूर

४. महाराणी ताराबाई

५. राजाराम महाराज

६. डॉ. पट्टाभीसीतारामय्या

७. दादासाहेब शिर्के

८. मुंबई

९. मराठा लीग

१०. १ मार्च १९४९

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न : २**

**अ) योग्य पर्याय निवडून रिकाम्या जागा भरा.**

| | |
|---|---|
| १) अ) १९१६ | २) अ) बर्क |
| ३) अ) रामचंद्र मुंगळी | ४) अ) अच्युत भास्कर देसाई |
| ५) अ) जबाबदार राज्यपद्धतीचा | ६) अ) वामनरावजी पटवर्धन |
| ७) अ) १९२२ | ८) ब) ८ मार्च १९४८ |
| ९) ब) माधवराव बागल | १०) अ) व्ही. पी. मेनन |

**ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१.अप्पासाहेब पटवर्धन

२. गो. श. बिनिवाले

३. स्वतंत्रपणे 'कोषागार व लेखा विभाग' (ट्रेझरी व ऑडिट ऑफिस)

४. रोजी सांगलीचे दिवाण रामचंद्र सदाशिव आठवले

५. ग. र. अभ्यंकर

६. डॉ. सरोजनी कमतनूर

७. बॅ. जयकर

८. जबाबदार राज्यपध्दती स्थापन करणे व लहान संस्थानांचा सहकारी तत्त्वावर सामायिकपणे कारभार चालविण्याचा होय असे ठराव पास केले.

९. बाळासाहेब खेर

१०. चिंतामणराव पटवर्धन (दुसरे)

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न : ३**

**अ) योग्य पर्याय निवडून रिकाम्या जागा भरा.**

१) क) सातारा　　२. अ) नाईक-निंबाळकर

३) अ) ७ सप्टेंबर १९२९　　४) अ) १९३८

५) अ) शंकरराव देव　　६) ब) ८ मार्च १९४८

**ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. २२ एप्रिल १८२०

२. श्रीमंत मालोजीराजे नाईकनिंबाळकर

३. १७ सप्टेंबर १९२८

४. २४ एप्रिल १९३८

५. १८

## २.६ सरावासाठी स्वाध्याय :

**अ) टिपा लिहा.**

१. दक्षिणी संस्थाने

२. दक्षिणी संस्थान हितवर्धक सभा

३. दलित प्रजापरिषद

४. करवीर स्थानिक स्वराज्य संघ

५. आप्पासाहेब पटवर्धन

६. फलटण संस्थान लोकसभा

**ब) खालील प्रश्नांची विस्तृत उत्तरे लिहा.**

१. कोल्हापूर संस्थान प्रजापरिषद चळवळीची माहिती लिहा.

२. सांगली संस्थान प्रजापरिषद चळवळीची माहिती लिहा.

३. फलटण संस्थान प्रजापरिषद चळवळीची माहिती लिहा.

## २.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ :

१. पटवर्धन वि. अ., संपा. संस्थांनी लोकशाहीचा लढा, आर्यभूषण छापखाना, पुणे, १९४०

२. पटवर्धन वि. अ., दक्षिण महाराष्ट्रातील संस्थानांच्या विलीनीकरणाच्या कथा, पुणे १९६६

३. वरखडे र. ना., महाराष्ट्राच्या सामाजिक सांस्कृतिक स्थित्यंतराचा इतिहास, खंड २ (१९०१ – १९५० भाग १), महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई २०२३

४. देशपांडे दि. चि., संस्थानी राजकाराण, ग्रंथाली प्रकाशन, कोल्हापुर, १९३८

५. कुंभार रा. स., कोल्हापुर संस्थान प्रजा परिषदेतील रत्नाप्पा कुंभारांचा सहभाग, अभिनंदन प्रकाशन, पुणे २०१०

६. फडके. य. दी., विसाव्या शतकातील महाराष्ट्र, खंड ३, ४ व ५ केमसागर पब्लिकेशन, पुणे, २००८

७. शिखरे दा. न., संस्थानी प्रजेचे टिळक तात्या शिखरे चरित्र व कार्य, तात्या शिखरे चरित्र प्रकाशन समिती, पुणे, १९८०

८. फडके य. दि., अण्णासाहेब लठ्ठे, श्रीविद्या प्रकाशन, पुणे, १९८९

९. उदगावकर मे. दी., सांगली संस्थानचा राजकीय सामाजिक आणि आर्थिक इतिहास, भारती मुद्रणालय, कोल्हापूर, २०१२

१०. पोतदार माधव. रा., महाराष्ट्रातील लढे व लढवय्ये, अनुबंध प्रकाशन, पुणे, २००६

११. दोशी मा. म संपा., श्रीमंतमालोजीराजे सत्कार अंक १९५६

१२. घोडके ह. म., महाराष्ट्र गाथा, राजहंस प्रकाशन, पुणे, २००५

१३. पाटील भिकशेठ, संपा. कोल्हापूरची मोठी माणसं, कल्पक प्रकाशन, कोल्हापूर, १९८३

१४. बागल माधवराव जीवन संग्राम अगर सिंहावलोकन महाराष्ट्र ग्रंथ भांडार, कोल्हापूर,१९९८

१५. कुलकर्णी श. द., सांगली संस्थानाचे सोपे भू वर्णन सांगली, १९२५

❖❖❖

घटक ३

# संयुक्त महाराष्ट्र चळवळ

## (Samyukta Maharashtra Movement)

अनुक्रमणिका


३.० उद्दिष्टे

३.१ प्रास्ताविक

३.२ विषय विवेचन

- ३.२.१ संयुक्त महाराष्ट्र चळवळीची पार्श्वभूमी
- ३.२.२ संयुक्त महाराष्ट्र समितीचे कार्य
- ३.२.३ महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेपर्यंतच्या महत्त्वाच्या घटना

३.३ सारांश

३.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

३.५ स्वयं अध्ययन प्रश्न व उत्तरे

३.६ सरावासाठी स्वाध्याय

३.७ संदर्भ ग्रंथ

## ३.० उद्दिष्टे :

सदर घटकाच्या अभ्यासानंतर आपणास –

१. संयुक्त महाराष्ट्र चळवळीची पार्श्वभूमी समजेल.

२. संयुक्त महाराष्ट्र चळवळीची प्रमुख कारणे समजून घेता येतील.

३. महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेपर्यंतच्या महत्त्वाच्या घटना समजतील.

४. संयुक्त महाराष्ट्र समितीचे कार्य समजून घेता येईल.

५. जे. व्ही. पी. समिती अहवाल व त्यावर उमटलेल्या तिव्र प्रतिक्रिया समजून घेता येईल.

६. फजल अली आयोग (राज्य पुनर्रचना आयोग) याविषयी माहिती मिळेल.

## ३.१ प्रास्ताविक :

महाराष्ट्र हे भारतातील एक अग्रगण्य व बहुविधतेने नटलेले राज्य आहे. 'महाराष्ट्र' हा शब्द इतिहासात अनेक ठिकाणी वेगवेगळ्या अर्थांनी वापरला गेला आहे. या शब्दाची उत्पत्ती आणि अर्थ यासंदर्भात विविध मते आहेत. संस्कृत ग्रंथ महाभारत आणि पुराणे यामध्ये महा + राष्ट्र = मोठे किंवा महान राष्ट्र असा उल्लेख येतो. काही प्राचीन ग्रंथांमध्ये 'महाराष्ट्र' म्हणजे समृद्ध आणि प्रभावशाली राष्ट्र असा उल्लेख आहे. महाभारत, अग्निपुराण आणि बृहतसंहिता यांसारख्या ग्रंथांमध्ये 'महाराष्ट्र'चा उल्लेख सापडतो. सातवाहन काळात (इ. स. पूर्व २३० – इ. स. २२०) महारट्ठी किंवा महाभारती असा शब्द वापरण्यात आला. रट्ठी हा प्राकृत शब्द राष्ट्र या संस्कृत शब्दाचा अपभ्रंश मानला जातो. महारट्ठी म्हणजे महान राष्ट्र होय. प्राचीन भारतात १६ महाजन पदे होती, त्यातील एक राज्य 'अश्मक' होते. हे राज्य पुढे विस्तारत जाऊन महाराष्ट्र नावाने ओळखले जाऊ लागले असे मानले जाते. चालुक्य आणि राष्ट्रकूट काळात (७ वे –१० वे शतक) या प्रदेशाला महाराष्ट्र देश असे संबोधले जात होते. राष्ट्रकूट सम्राट अमोघ वर्ष (९ वे शतक) यांनी आपल्या लेखांमध्ये 'महाराष्ट्र' हा शब्द वापरला आहे.

मध्यप्रदेशातील एरणगांव येथील प्राचीन शिलालेखात 'महाराष्ट्र' असा उल्लेख सापडतो. ऐहोळ येथील इ. स. ७१२ मधील बदामी चालुक्य राजा पुलकेशी दुसरा याच्या शिलालेखात महाराष्ट्राचा उल्लेख सापडतो. दिल्लीच्या सुलतानांनी आणि मुघलांनी या प्रदेशाला बलाढ्य मराठ्यांचा प्रदेश म्हणून उल्लेख केला. मुस्लिम शाह्यांपासून मराठी स्वराज्याची स्वतंत्रपणे स्थापना करून छ. शिवाजीराजे महाराष्ट्र राज्याचे प्रेरणास्थान बनले. पेशवाई पर्यंतच्या अनेक सत्तांनी महाराष्ट्राची खास अशी स्वतंत्र सांस्कृतिक ओळख निर्माण केली. ऐतिहासिक आणि भाषिक दृष्टीने 'महाराष्ट्र' हा शब्द भारताच्या महान संस्कृती आणि परंपरेचा वारसा दर्शवतो.

महाराष्ट्र हे राज्य प्राचीन इतिहास, समृद्ध संस्कृती, औद्योगिक प्रगती आणि सामाजिक सुधारणांसाठी प्रसिद्ध आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमी इतिहासाने महाराष्ट्राला एक वेगळी ओळख दिली आहे. समाजसुधारक महापुरुषांनी येथे समाजात परिवर्तन घडवून आणले, तर उद्योगधंदे, शेती, माहिती तंत्रज्ञान आणि शिक्षणाच्या क्षेत्रात महाराष्ट्राने देशात आघाडी घेतली आहे. महाराष्ट्र हे ऐतिहासिक, सांस्कृतिक, औद्योगिक आणि कृषी क्षेत्रात समृद्ध असे राज्य आहे. देशाच्या विकासात महत्त्वाची भूमिका बजावणारे हे राज्य आपल्या परंपरा आणि आधुनिकतेचा संगम असलेले राज्य आहे.

मुंबई ही महाराष्ट्राची राजधानी व देशाचे आर्थिक केंद्र आहे. मराठी भाषा महाराष्ट्रातील जनतेसाठी मायबोली आहे. मराठी भाषिकांचे राज्य अस्तित्वात आणण्यासाठी १०५ हुतात्म्यांना रक्त सांडावे लागल्यानंतर संयुक्त महाराष्ट्र राज्य १ मे १९६० साली स्थापन झाले. तेव्हा पासूनच हे राज्य देशाच्या प्रगतीसाठी महत्त्वपूर्ण योगदान देत आले आहे. लेखक, कलावंत, पत्रकार विविध पक्ष-संघटना कामगार व विविध जातीधर्माच्या सर्वसामान्य लोकांनी स्वतंत्र भारतातील सर्वांत मोठा लोकलढा उभा करून मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राचे स्वप्न साकार केले.

## ३.२ विषय विवेचन :

### ३.२.१ संयुक्त महाराष्ट्र चळवळीची पार्श्वभूमी :

सर्व मराठी भाषा बोलणाऱ्या लोकांचे भाषावार प्रांतरचनेच्या तत्त्वाच्या आधारावर एक राज्य स्थापन करण्यासाठी करण्यात आलेल्या आंदोलनाला 'संयुक्त महाराष्ट्र आंदोलन' किंवा 'चळवळ' असे म्हणतात. संयुक्त महाराष्ट्र चळवळ ही महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीसाठी झालेली एक मोठी सामाजिक आणि राजकीय चळवळ होती. श्री. विठ्ठल वामन ताम्हणकर यांना संयुक्त महाराष्ट्राचे स्वप्न पाहण्याचे श्रेय जाते. त्यांनी त्यांच्या १९१७ मधील 'थ्री डिव्हिजन्स ऑफ महाराष्ट्र' या लेखात मराठी लोक हे मुंबई, महाराष्ट्र, विदर्भ, हैदराबाद व गोवा येथे पसरले आहेत, त्या सर्वांचा मिळून महाराष्ट्र व्हायलाच पाहिजे असे प्रतिपादन केले. श्री. जनार्दन विनायक ओक यांना या लेखाचे महत्त्व खूप पटले व त्यांनी त्यांच्या 'लोकशिक्षण' मधून याचा वेळोवेळी पाठपुरावा करावयास सुरुवात केली. संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या मुळाशी भाषिक आणि सांस्कृतिक अस्मितेचा मुद्दा होता. भारत स्वतंत्र झाल्यानंतर राज्य पुनर्रचनेचा प्रश्न निर्माण झाला. याच पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातील जनतेने स्वतंत्र महाराष्ट्र राज्यासाठी संघर्ष केला. महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली, परंतु त्यामागे दीर्घकाळ चाललेली संयुक्त महाराष्ट्र चळवळ होती. या चळवळीचे मूळ भाषावार प्रांतरचनेच्या मागणीशी संबंधित होते. स्वातंत्र्यपूर्व काळात हिचळवळ सुरू झाली. १९५० ते १९६० या काळामधील महाराष्ट्रातील हे सर्वांत व्यापक असे जनआंदोलन होते.

इंग्रजांच्या कालखंडात झालेली प्रांतरचना प्रशासनाच्या सोयीसाठी करण्यात आली होती. प्रांतरचना करत असताना कोणताही विशिष्ट विचार करण्यात आला नव्हता. महाराष्ट्र हा वेगवेगळ्या प्रांतांमध्ये विभागलेला होता. मुंबई प्रांतात कोकण, पश्चिम महाराष्ट्र आणि विदर्भाचा काही भाग होता. हैदराबाद संस्थान यात मराठवाडा- औरंगाबाद, बीड, लातूर, परभणी, नांदेड याचा समावेश होता. मध्य प्रांत आणि मद्रास प्रांतयामध्ये विदर्भ आणि उत्तर महाराष्ट्राचा काही भाग समाविष्ट होता. मराठी भाषिक लोक वेगवेगळ्या प्रशासकीय भागांत विभागले गेल्याने एकच भाषा बोलणारे लोक विविध प्रांतात विभागले गेले. ब्रिटीशांनी निर्माण केलेले प्रांत बहुसांस्कृतिक व बहुभाषिक होते. म्हणून 'लोकशाही स्वराज्य पक्षाने' भाषावार प्रांतरचनेचा आग्रह धरला. राष्ट्रपिता म. गांधीजींनी शालेय शिक्षणाचे माध्यम मातृभाषेतूनच असावे असा आग्रह धरला.

भारतीय स्वातंत्र्य दृष्टीपथात आल्यानंतर फुटिरतावादी वृत्ती वाढीस लागून भारतीय संघराज्याच्या एकात्मतेला धोका निर्माण झाला. पंडित जवाहरलाल नेहरूसारख्या राष्ट्रीय नेतृत्वांने एकसंघ भारत राहावा याकरिता भाषिकतत्त्वांवर प्रांतरचनेचा प्रश्न तुर्तास मागे ठेवून भारतीय राज्यघटना लिहिण्याचे काम सरू केले. यावेळी

भाषावार प्रांतरचना करावी की नको या मुद्यावर मतभेद झाले. भाषावार प्रांतरचना केल्यास प्रांताची भाषा व संस्कृती यांचे संरक्षण व संवर्धन होईल. भाषा एकच राहिल्यास परस्परातील आदान-प्रदान योग्य पद्धतीने होईल व भाषिक एकता प्रस्थापित होईल असा एक प्रवाह होता. तर दूसरा प्रवाह भाषावार प्रांतरचना करू नये कारण भाषावार प्रांतरचना केल्यास राज्याराज्यात फुटीरपणा बळावेल व राष्ट्रीय एकात्मतेस ते घातक ठरेल असा होता.

भाषावार प्रांतरचना व्हावी याकरिता महाराष्ट्रातील नेते मंडळी आग्रही होते. याचाच परिणाम म्हणजे भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या अहमदाबाद अधिवेशनात (१९२१) मराठी भाषिक राज्य होणे आवश्यक आहे, असा ठराव संमत करण्यात आला.

भाषावार प्रांतरचनेच्या प्रश्नावर अंतिम निर्णय घेण्यासाठी न्या. एस. के. दार यांच्या अध्यक्षतेखाली १९४७ साली एक आयोग नेमण्यात आला. या आयोगाने सन १९४८ साली आपला अहवाल सादर करून त्यामध्ये भाषावर प्रांतरचनेला विरोध केला. भाषावार प्रांतरचनेमुळे संकुचित राष्ट्रवादाला खतपाणी मिळून राष्ट्रीय एकात्मतेला तडे जातील अशी भिती सर्वांनाच वाटत होती. मात्र या अहवालाविरुद्ध तिव्र प्रतिक्रिया उमटल्या. मराठी अस्मितेचा आणि एकसंध महाराष्ट्राचा विचार पुढे आला. संयुक्त महाराष्ट्र चळवळ अधिक गतिमान झाली.

भारताला स्वातंत्र्य मिळाले परंतु भारतीय संविधानात भाषिक प्रदेश राज्यांची स्थापना करण्यासंबंधी नियमावली अंतर्भूत केली नव्हती. स्वातंत्र्यानंतर भारत सरकारने राज्य पुनर्रचना आयोग स्थापन केला. १९५६ मध्ये राज्य पुनर्रचना कायद्यानुसार महाराष्ट्र आणि गुजरात यांचा समावेश असलेले बृहन्मुंबई राज्य तयार करण्यात आले. परंतु, मुंबईसह स्वतंत्र महाराष्ट्राच्या मागणीसाठी मोठ्या प्रमाणावर संघर्ष सुरू झाला. संयुक्त महाराष्ट्र चळवळ उभी राहिली व मोठे जनआंदोलन सुरू झाले. संयुक्त महाराष्ट्र चळवळीची प्रमुख कारणे खालील प्रमाणे दिसून येतात.

### ■ संयुक्त महाराष्ट्र चळवळीची प्रमुख कारणे :

संयुक्त महाराष्ट्र चळवळ ही मुंबईसह महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीसाठी झालेली ऐतिहासिक चळवळ होती. या चळवळीमागे राजकीय, सामाजिक, आर्थिक आणि भाषिक कारणे होती.

#### १. भाषिक एकता आणि अस्मिता :

महाराष्ट्रात मराठी ही प्रामुख्याने बोलली जाणारी बोली भाषा होती. मराठी भाषेचा उगम प्राकृत भाषा व पैशाची आदि भाषेतून झाला आहे. विंध्य-सातपुडा पर्वतरांगा पासून ते कृष्णा-पंचगंगा बेळगांव पर्यंत प्रदेशात ही भाषा बोलली जात होती. मराठी भाषिकांना एकत्र आणण्याची गरज होती. महाराष्ट्रातील लोकांचे मुख्य संप्रेषण साधनमराठी भाषा होती. फजल अली आयोगाने मुंबईला महाराष्ट्रात समाविष्ट न करता केंद्रशासित प्रदेश करण्याचा प्रस्ताव दिला. यामुळे मराठी भाषिकांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला आणि आंदोलन पेटले.

#### २. मुंबई महाराष्ट्राची असावी – स्थानिकांचा आग्रह :

मुंबईमध्ये मोठ्या प्रमाणात मराठी भाषिक लोकसंख्या होती. उद्योगधंदे, शिक्षणसंस्था आणि प्रशासनात मराठी लोकांचा मोठा सहभाग होता. गुजराती व्यापाऱ्यांचा प्रभाव असलेल्या मुंबईस गुजरातमध्ये समाविष्ट

करण्याचा प्रयत्न सुरू होता. मुंबई गुजरातला जोडण्याचा किंवा केंद्रशासित करण्याचा प्रस्ताव महाराष्ट्रातील जनतेने पूर्णत: नाकारला. मुंबईसह महाराष्ट्र व्हावा याकरिता चळवळ सुरू झाली.

**३. मराठवाडा व विदर्भाचा समावेश :**

मराठवाडा व विदर्भ या भागांना स्वतंत्र ठेवण्याची चर्चा सुरू होती, परंतु मराठवाड्याचा ऐतिहासिक आणि विदर्भाचा सांस्कृतिक वारसा महाराष्ट्राशी जोडलेला होता. परिणामी मराठवाडा व विदर्भ यांच्यासह महाराष्ट्र व्हावा याकरिता चळवळ उभी राहिली.

**४. ऐतिहासिक कारणे – सातवाहन आणि मराठा साम्राज्याचा वारसा :**

प्राचीन काळापासून हा प्रदेश सातवाहन, राष्ट्रकूट, यादव आणि मराठ्यांच्या अधिपत्याखाली होता. छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्य स्थापनेसाठी याच भूमीत लढा दिला. इतिहासाचा अभिमान आणि महाराष्ट्राची स्वतंत्र ओळख निर्माण करण्याची भावना तीव्र झाली.

**५. औद्योगिक आणि आर्थिक कारणे :**

मुंबई हे औद्योगिक, आर्थिक आणि व्यापाराचे केंद्र होते. मुंबईमधील गिरण्या आणि उद्योगांमध्ये मोठ्या प्रमाणावर मराठी कामगार काम करत होते. मुंबई महाराष्ट्रातच असावी, अशी मागणी कामगार संघटनांनीही केली. औद्योगिक दृष्टिकोनातून संपन्न मुंबई महाराष्ट्रात असावी, ही लोकभावना होती. महाराष्ट्रात मुंबई ठेवल्यास आर्थिक समतोल साधने शक्य होणार होते.

**६. राजकीय कारणे – काँग्रेस पक्षातील मतभेद :**

मुंबईसह महाराष्ट्र निर्मितीस काँग्रेस पक्षात मतभेद होते. काही प्रमुख नेत्यांचा यास विरोध होता. मुंबई महाराष्ट्राला द्यावयास काही गुजराती आणि कोंकणी नेते तयार नव्हते. महाराष्ट्रातील नेत्यांनी याविरोधात लढा उभारला. प्रबोधनकार ठाकरे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सेनापती बापट, कॉम्रेड डांगे, एस. एम. जोशी यांसारख्या नेत्यांनी आंदोलन उभारले.

संयुक्त महाराष्ट्र चळवळीस विविध साधू-संत, समाज सुधारकांनी आपल्या वाणी-लेखणीने मराठी मन जागृत केले. कवी-नाटककार, साहित्यीक, विचारवंत व पुढाऱ्यांनी मायबोली मराठीद्वारे एकतेची व आपलेपणाची जाणीव निर्माण करून दिली. स्वातंत्र्य आंदोलनावेळी आपल्या मराठी भाषिकांचे एक राज्य असावे अशी मागणी त्यांनी सुरू केली. संयुक्त महाराष्ट्र चळवळ मराठी अस्मिता, आर्थिक समृद्धी, ऐतिहासिक वारसा आणि लोकशाही हक्क यांचा लढा होता. मुंबई महाराष्ट्राचीच असावी या मागणीसाठी लोकांनी मोठ्या प्रमाणावर आंदोलन केले. जनआंदोलनामध्ये १०५ हुतात्म्यांनी बलिदान दिले अखेर, जनतेच्या दबावामुळे १ मे१९६० रोजी महाराष्ट्र आणि गुजरात वेगळे करण्यात आले व महाराष्ट्र राज्य अस्तित्वात आले.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न : १**

**अ) योग्य पर्याय निवडा.**

१. मध्यप्रदेशातील ..... येथील प्राचीन शिलालेखात 'महाराष्ट्र' असा उल्लेख सापडतो.

अ) एरणगांव ब) नेवासे

क) अशोकनगर ड) खंडवा

२. 'रट्ठी' हा ..... शब्द राष्ट्र या संस्कृत शब्दाचा अपभ्रंश मानला जातो.

अ) इंग्रजी ब) प्राकृत

क) कन्नड ड) यापैकी नाही

३. संयुक्त महाराष्ट्र राज्य ..... साली स्थापन झाले.

अ) १ मे १९५५ ब) १ मे १९५८

क) १ मे १९६० ड) १ मे १९६२

४. ..... यांना संयुक्त महाराष्ट्राचे स्वप्न पाहण्याचे श्रेय जाते.

अ) श्री. विठ्ठल ताम्हणकर ब) पंडित नेहरू

क) महात्मा गांधी ड) यापैकी नाही

५. ..... मध्ये राज्य पुनर्रचना कायद्यानुसार महाराष्ट्र आणि गुजरात यांचा समावेश असलेले बृहन्मुंबई राज्य तयार करण्यात आले.

अ) १९५४ ब) १९५७

क) १९५६ ड) १९५८

### ३.२.२ संयुक्त महाराष्ट्र समितीचे कार्य :

संयुक्त महाराष्ट्र चळवळीत संयुक्त महाराष्ट्र समितीने महत्वाची भूमिका बजावली. संयुक्त महाराष्ट्र समितीने चालवलेली चळवळ केवळ महाराष्ट्रासाठीच नव्हे, तर संपूर्ण भारताच्या भाषावार प्रांतरचनेसाठी एक आदर्श ठरली. शंकरराव देव यांच्या नेतृत्वाखाली १९४६ साली स्थापन झालेली संयुक्त महाराष्ट्र परिषद चळवळीत अग्रेसर होती. मात्र ही परिषद निष्प्रभ ठरली. परिणामी, २३ ऑक्टोबर १९५५ साली ही परिषद बरखास्त करण्यात आली. परिषद बरखास्त करण्यापूर्वी परिषदेच्या सदस्यानी दिल्लीत जाऊन द्वैभाषिक राज्याचा पर्याय सुचविला. परिषदेने सुचवलेल्या या पर्यायास एस. एम. जोशी, श्रीपाद अमृत डांगे, दत्तो वामन पोतदार व यशवंतराव मोहीते यांनी तिव्र विरोध केला. यावेळी एस. एम. जोशी यांनी केलेले भाषण अत्यंत प्रेरणादायी होते. – 'आंध्र झाला तसा संयुक्त महाराष्ट्र होऊन जाईल' या कल्पनेत राहू नका. लक्ष्मीनारायण विरुद्ध दरिद्रीनारायण असा हा लढा आहे. तो सहजासहजी सल होणार नाही. राज्याशी असहकार करावा लागेल. ग्रामपंचायती पासून लोकसभेपर्यंत आपापल्या पदांचे राजीनामे द्यावे लागतील. संयुक्त महाराष्ट्र परिषदेतून फुटून निघण्याचा महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेसचा ठराव हा या चळवळीशी द्रोह आहे. पक्ष मोठा की लोक मोठे, लोकशाही राजवटीत पक्ष कधीही लोकांच्या डोक्यावर बसत नसतो. जेव्हा तो बसू लागतो, तेव्हा तो पक्ष हुकूमशाही दिशने वाटचाल करू लागतो.'

संयुक्त महाराष्ट्र परिषद बरखास्त झाल्यानंतर संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत सुसुत्रता आणण्यासाठी एका व्यासपीठाची गरज निर्माण झाली. या गरजेतूनच ६ फेब्रुवारी १९५६ रोजी केशवराव जेधे यांच्या

अध्यक्षतेखाली पुण्यात सर्व पक्षीय सभा होऊन त्यामध्ये संयुक्त महाराष्ट्र समितीची स्थापना झाली. या समितीमध्ये साम्यवादी, प्रजासमाजवादी, समाजवादी शेतकरी कामगार पक्ष, लाल निशाण गट, मजदूर किसान पक्ष, भारतीय जनसंघ, शेड्युल्ड कास्ट फेडरेशन, हिंदू महासभा, जन काँग्रेस व अपक्ष असे बिगर काँग्रेस पक्षाचे 'पक्ष' सामिल झाले. या समितीचे अध्यक्षपद भाई श्रीपाद अमृत डांगे बनले. आचार्य प्र. के. अत्रे, प्रबोधनकार ठाकरे, क्रांतिसिंह नाना पाटील, यशवंतराव मोहिते इत्यादी मातब्बर नेते समितीला लाभले. या समितीने आपली १५ कलमी घटना बनवून तिचे उद्देश साधने, घटकपक्ष, समितीची रचना, नियम व मार्ग स्पष्ट केले.

### ३.२.२.१ संयुक्त महाराष्ट्र समिती स्थापनेचा उद्देश :

संयुक्त महाराष्ट्र समितीही ६ फेब्रुवारी १९५६ मध्ये अधिकृतपणे स्थापन करण्यात आली. याचा मुख्य उद्देशखालील प्रमाणे होता –

१. मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची स्थापना – मुंबईला महाराष्ट्रात सामील करण्यासाठी लढा देणे. मराठी भाषिक लोकांची एकसंघ राज्यात बांधणी करणे.

२. फजल अली आयोगाच्या शिफारशींना विरोध – फजल अली आयोग (१९५३) याने मुंबईला स्वतंत्र ठेवण्याचा प्रस्ताव दिला. गुजरात आणि महाराष्ट्र वेगळे करण्याची योजना होती, पण मुंबई केंद्रशासित करण्याचा प्रस्ताव मराठी जनतेला मान्य नव्हता. त्यामुळे फजल अली आयोगास विरोध करणे.

३. मराठी भाषिकांचे हक्क व अस्मिता जपणे – महाराष्ट्रात असलेलेमराठी भाषिक भाग एकत्र ठेवणे. मराठी भाषा, संस्कृती आणि परंपरांचे संरक्षण करणे.

४. सत्याग्रह आणि बलिदानाच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी संघर्ष करणे – मुंबईत आणि महाराष्ट्रभर मोठ्या प्रमाणावर आंदोलने, मोर्चे आणि सत्याग्रह करणे. याचाच परिणाम म्हणजे दि. २१ नोव्हेंबर १९५६ रोजी झालेल्या आंदोलनात १०५ हुतात्म्यांनी बलिदान दिले, ज्यामुळे चळवळ अधिक तीव्र झाली.

५. औद्योगिक आणि आर्थिक कारणे – मुंबईत मोठ्या प्रमाणातमराठी कामगार आणि गिरणी कामगार होते, त्यांचे हक्क संरक्षित करणे. महाराष्ट्रात उद्योगधंदे आणि आर्थिक विकासाला चालना देणे.

एकंदरीत १९५६ मध्ये स्थापन झालेल्या संयुक्त महाराष्ट्र समितीचा उद्देश मुंबईसह स्वतंत्र महाराष्ट्र राज्याची निर्मिती करणे, मराठी भाषिकांचे हित जपणे आणि केंद्र सरकारच्या अन्यायकारक निर्णयाविरोधात संघर्ष करणे हा होता. हा उद्देश साध्य करण्यासाठी शांततामय, सनदशीर लोकशाही मार्गाचा अवलंब करण्याचे निश्चित झाले. जनजागृती व संघटन करून पर्यायी शक्ती निर्माण करणे. महाराष्ट्राच्या मूलभूत गरजा पूर्ण करणे. त्यासाठी निवडणुकांमध्ये भाग घेण्याचे निश्चित झाले. सहकार व समाजवाद यांचे जनतेला शिक्षण देणे असे ठरविण्यात आले. याकरिता पाच कलमी कार्यक्रम ठरविण्यात आला.

### ३.२.२.२ संयुक्त महाराष्ट्र समितीचा पाच कलमी कार्यक्रम :

संयुक्त महाराष्ट्र समितीने लोकांच्यापुढे पाच कलमी कार्यक्रम ठेवला तो पुढील प्रमाणे –

१. मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची स्थापना – मुंबई ही महाराष्ट्राची राजधानी असली पाहिजे अशी ठाम भूमिका घेणे. महाराष्ट्रातील सर्व मराठी भाषिक प्रदेश एकत्र ठेवून स्वतंत्र महाराष्ट्राची निर्मिती करणे.

२. विदर्भ, मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्र एकत्र आणणे – विदर्भ, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र आणि कोकण भाग एकत्र करून महाराष्ट्र राज्य स्थापन करणे. यामुळे सांस्कृतिक, सामाजिक आणि आर्थिक विकासाला चालना मिळेल.

३. गोवा आणि बेळगावसह मराठी भाषिक प्रदेशांचा समावेश – मराठी भाषिक बहुसंख्य असलेल्या गोवा, कारवार, निपाणी, खानापूर आणि बेळगावचा समावेश महाराष्ट्रात करावा. भाषिक एकतेच्या तत्त्वावर आधारित सीमांचे निर्धारण करणे.

४. औद्योगिक आणि आर्थिक धोरणांचा विकास – महाराष्ट्रातील उद्योगधंदे आणि गिरण्या यांचे संरक्षण करणे. मराठी मजूर आणि कामगारांच्या हक्कांसाठी लढा देणे. महाराष्ट्राचा आर्थिक विकास सुनिश्चित करणे.

५. लोकशाही मार्गाने सत्याग्रह आणि आंदोलन – लोकशाही मार्गाने सत्याग्रह आणि अहिंसक आंदोलनाच्या माध्यमातून लढा देणे. शासनाने अन्यायकारक निर्णय घेतल्यास शांततापूर्ण मार्गाने संघर्ष करणे.

संयुक्त महाराष्ट्र समितीच्या या पाच कलमी कार्यक्रमाने मराठी अस्मिता, आर्थिक स्वायत्तता, भाषिक एकता आणि लोकशाही संघर्षाचा स्पष्ट संदेश दिला. खेडापाडी व सिमावर्ती भागात समितीच्या शाखा उघडल्या. चळवळीचे लोन संपूर्ण महाराष्ट्रभर पसरले. समितीच्या कार्यकर्त्यांनी दिल्लीत मोर्चा काढला. मुंबई, बेळगांव, कारवार, निपाणी व डांगसह संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे या घोषणेने सर्व महाराष्ट्र निनादू लागला. केंद्र सरकार व पंडित नेहरू यांच्यावर दबाव वाढत गेला. समिती आणि महागुजरात जनता परिषद यांच्यामध्ये वाटाघाटी होऊन खेडेगाव हा आधारभूत घटक मानून दोन्हीही राज्यांनी सीमा आखाव्यात असे निश्चित झाले. जयप्रकाश नारायण यांनी पंडित नेहरू यांची भेट घेऊन मुंबई महाराष्ट्राला देण्याचा आग्रह धरला. हैद्राबाद काँग्रेस पक्षाने सुद्धा मुंबई केंद्रशासित न करता महाराष्ट्रात समाविष्ट करावी असे सांगितले. गांधी यांनी सुद्धा संसदेतील भाषणात मुंबई महाराष्ट्राला देण्याचा आग्रह धरला

### ३.२.२.३. संयुक्त महाराष्ट्र समितीचे प्रमुख नेते :

संयुक्त महाराष्ट्र समितीमध्ये राजकीय पक्ष, कामगार संघटना, विद्यार्थी चळवळी, साहित्यिक आणि सामाजिक कार्यकर्ते सहभागी झाले. संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील प्रमुख नेते पुढील प्रमाणे होते.

- प्रबोधनकार ठाकरे हे मराठी अस्मितेचे प्रवक्ते व समाजसुधारक होते त्यांनी मोठ्या प्रमाणात जनजागृती केली.

- कॉम्रेड एस. ए. डांगे साम्यवादी विचारसरणीचे व कामगार चळवळीतील प्रमुख नेते. एस. एम. जोशी समाजवादी नेते होते. सत्याग्रह आणि शांततापूर्ण आंदोलनाचे व सत्याग्रहाचे नेतृत्व यांनी केले.

- कृष्ण मेनन, दत्ता सामंत, जी. डी. बोरकर श्रमिक चळवळीतील महत्त्वाचे नेतृत्व होते.

- सेनापती बापट संघर्षशील नेता म्हणून ओळखले जातात त्यांनी आंदोलकांचे नेतृत्व केले.

- लोकनायक जयप्रकाश नारायण यांनी आंदोलनाला राष्ट्रीय पातळीवर समर्थन मिळवून दिले.

याशिवाय इतरही विविध पक्षाचे अनेक नेते चळवळीत सहभागी झाले होते

### ३.२.२.४. संयुक्त महाराष्ट्र समितीचे कार्य :

संयुक्त महाराष्ट्र समिती स्थापन झाल्यानंतर समितीने खालील प्रमाणे कार्य केले.

**१. महाराष्ट्रभर मोर्चे आणि सत्याग्रहांचे आयोजन –**

संयुक्त महाराष्ट्र समितीने मुंबई, पुणे, नाशिक, नागपूर, कोल्हापूर आणि औरंगाबादमध्ये मोठ्या प्रमाणावर सत्याग्रह झाले. शेतकरी, विद्यार्थी, व्यापारी आणि कामगारांनी सहभाग घेतला. मुंबई कुणाची? महाराष्ट्राची! हा नारा गाजला. रेल्वे रोको, सरकारी कार्यालयांसमोर निदर्शने आणि सभा घेण्यात आल्या. संयुक्त महाराष्ट्र समितीने विविध ठिकाणी आंदोलने केली. मुंबईत लाखो लोक रस्त्यावर उतरले. मुंबईतील आंदोलनादरम्यान (२१ नोव्हेंबर १९५६) पोलिसांनी गोळीबार केला. पोलिसानी केलेल्या गोळीबारात १०५ आंदोलक हुतात्मा झाले. याच स्मरणार्थ फ्लोरा फाउंटनचे नाव हुतात्मा चौक ठेवण्यात आले.

**२. कामगार संघटनांशी समन्वय आणि संपाचे आयोजन –**

संयुक्त महाराष्ट्र समितीने विविध कामगार संघटना बरोबर समन्वय साधण्याचे काम केले. याचाच परिणाम म्हणजे कामगार संपात मोठ्या प्रमाणात सहभागी झाले. कामगार संघटनांनी मुंबई महाराष्ट्राचीच हा नारा दिला. मुंबईतील मिल कामगारांनी संप पुकारला, उद्योग आणि वाहतूक क्षेत्र ठप्प करण्यात आले. ज्यामुळे सरकारवर मोठा दबाव निर्माण झाला.

**३. पत्रकार, साहित्यिक आणि कलाकारांचा सहभाग –**

संयुक्त महाराष्ट्र समितीने पत्रकार, साहित्यिक आणि कलाकारांचा सहभाग संयुक्त महाराष्ट्र चळवळीत करून घेतला. नाटक, गाणी, पोवाडे आणि लेखन यांद्वारे आंदोलनाला जनसंपर्क मिळाला. पु. ल. देशपांडे, वसंत बापट, प्रबोधनकार ठाकरे यांसारख्या साहित्यिकांनी पाठिंबा दिला. मुंबई कुणाची? – महाराष्ट्राची! हे नाटक आणि गाणे त्या काळात लोकप्रिय झाले.

**४. केंद्र सरकारवर दबाव –**

संयुक्त महाराष्ट्र समितीने मोठ्या प्रमाणावरील आंदोलने आणि सत्याग्रह केला. परिणामी केंद्र सरकार व पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांच्यावर दबाव वाढला. काँग्रेस पक्षाच्या अंतर्गतही संयुक्त महाराष्ट्राच्या बाजूने मतप्रवाह तयार झाला. सत्याग्रह, संप, आंदोलने आणि बलिदानाच्या लाटेमुळे अखेर केंद्र सरकारला झुकावे लागले. सततच्या आंदोलने आणि सत्याग्रहामुळे केंद्र सरकारला मुंबई महाराष्ट्रात सामील करण्याचा निर्णय घ्यावा लागला. महाराष्ट्र आणि गुजरात यांचे विभाजन झाले आणि महाराष्ट्र राज्याची अधिकृत स्थापना झाली.

**५. जनतेचे मोठे समर्थन मिळवले आणि एकजूट निर्माण केली –**

संयुक्त महाराष्ट्र समितीने महाराष्ट्रातील साहित्यिक, कलावंत, शिक्षक, लेखक आणि कवी यांना एकत्र आणले. मराठी भाषा आणि संस्कृतीच्या संरक्षणासाठी चळवळ अधिक व्यापक केली. सामान्य नागरिकांमध्ये संयुक्त महाराष्ट्राची गरज आणि महत्त्व याबद्दल जागरूकता निर्माण केली.

**६. फजल अली आयोगास तीव्र विरोध –**

भारतात स्वातंत्र्यानंतर प्रांतांचे पुनर्रचनात्मक विभाजन कसे करावे, याचा विचार करण्यासाठी जवाहरलाल नेहरू सरकारने १९५३ मध्ये राज्य पुनर्रचना आयोग नेमला. या आयोगाचे अध्यक्ष न्यायमूर्ती फजल अली होते, त्यामुळे याला 'फजल अली आयोग' असेही म्हणतात. आयोगाने भाषावार राज्ये बनवण्याची संकल्पना मान्य केली. तेलुगू भाषिकांसाठी आंध्र प्रदेश, कन्नड भाषिकांसाठी कर्नाटक, तमिळ भाषिकांसाठी तामिळनाडू आणि हिंदी भाषिकांसाठी विविध राज्ये बनवण्याची शिफारस केली. विदर्भाला स्वतंत्र राज्याचा दर्जा देण्याची सूचना केली. गुजराती भाषिकांसाठी स्वतंत्र गुजरात राज्य निर्माण करण्याचा प्रस्ताव मांडला. आयोगाने मुंबई महाराष्ट्रात समाविष्ट करण्यास नकार दिला. मुंबईला स्वतंत्र केंद्रशासित प्रदेशकरण्याची शिफारस केली. यामुळे संयुक्त महाराष्ट्र समितीने महाराष्ट्रभर तीव्र विरोध आणि आंदोलन केले.

**७. सन १९५७ च्या सार्वत्रिक निवडणूकेतील संयुक्त महाराष्ट्र समितीचे यश –**

संयुक्त महाराष्ट्र समितीने मुंबई द्वैभाषिक विधानसभा, लोकसभा, मुंबई व पुणे महानगरपालिकेच्या निवडणुकामध्ये सहभाग घेऊन आपले प्रश्न सोडवावेत असा ठराव संमत केला. १ मार्च व ११ मार्च १९५७ रोजी निवडणुका झाल्या. काँग्रेसच्या विरोधातील सर्व घटक पक्षांना एकत्र करून संयुक्त महाराष्ट्र समितीने निवडणूका लढविल्या. सातारा व पुणे महानगरपालिकेची सत्ता समितीने एकतर्फी मिळविली. मुंबई महानगरपालिकेत १३१ पैकी ७१ जागा मिळवून सत्ता हस्तगत केली. समितीने प्रथमच ६ दलित आमदार निवडून आणले. यशवंतराव चव्हाण कराडमधून अवघ्या १६२६ मतांनी निवडून आले. लोकसभा निवडणूकीत ४४ पैकी २३ जागा समितीने जिंकल्या. विधानसभेच्या २६४ जागापैकी १२९ जागांवर समितीने विजय मिळवला. काँग्रेसच्या बड्या दिग्गजांचा पराभव झाला. एस. एम.जोशी हे विधानसभेत विरोधी पक्ष नेते झाले. समितीचे हे अभुतपूर्व यश पाहून चळवळीच्या प्रखरतेची जाणीव केंद्र सरकारला झाली.

**८. संयुक्त महाराष्ट्र समितीचा संघर्ष –**

१६ जानेवारी १९५६ रोजी प्रतिबंधक स्थान बद्धतेच्या कायद्याखाली मोरारजी देसाई यांनी संयुक्त महाराष्ट्र समितीच्या अनेक नेत्याना अटक केली. यामध्ये क्रांतिसिंह नाना पाटील, कॉ. डांगे, कॉ. पाटकर, कॉ. जगताप कॉ. परुळेकर, कॉ. गणाचार्य यांचा समावेश होता. पालघर, डहाणू, जाव्हार आदि भागातील लाल बावट्याच्या आदिवासींनी सार्वजनिक हरताळ पाळून रहदारी बदं पाडली. ''मुंबई आमच्या हक्काची, नाही कुणाच्या बापाची'' अशा घोषणा दिल्या गेल्या. विधिमंडळातही याच्यावर आवाज उठविण्यात आला. मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीचा प्रश्न सोडविण्यासाठी सर्व पक्षीय गोलमेज परिषद भरविण्याची मागणी केली. ही सूचना अमान्य होताच २९ फेब्रुवारी १९५६ रोजी सत्याग्रह पुकारला. संयुक्त महाराष्ट्र समितीच्या प्रतिनिधींनी लोकसभा, विधानभा, नगरपालिका, ग्रामपंचायत व जिल्हा बोर्डाच्या सदस्यत्वाचे राजीनामे दिले.

हैद्राबाद विधानसभेने मुंबई महाराष्ट्रात समाविष्ट करावी असा ठराव पास केला गेला. शेतकरी–कष्टकरी, महिला– दलितांनी महाराष्ट्रातील विविध भागात संघर्ष केला. ९ मार्च ते ४ एप्रिल १९५६ या काळात अनेक सत्याग्रहिना अटक करण्यात आली. श्री. चिंतामणराव देशमुख यांनी लोकसभेत संयुक्त महाराष्ट्र संदर्भात

केंद्रिय अर्थमंत्रीपदाचा राजीनामा देऊन महाराष्ट्र निष्ठा दाखवून दिली. याचवेळी बेळगांव, कारवार व निपाणी हा भाग म्हैसूर राज्यात घातला गेला. त्यामुळे समितीने ९ मार्च १९५६ रोजी जयवंतराव टिळक यांच्या नेतृत्वाखाली बेळगावं येथे सत्याग्रह केला. दिल्लीत एस. एम. जोशी यांच्या नेतृवाखाली सत्याग्रह करण्यात आला.

राष्ट्रीय काँग्रेसचे वार्षिक अधिवेशन २ व ३ जून १९५६ रोजी भरले असता मुंबईतच शिवाजी पार्कवर सवर्पक्षीय परीषद व जनतेचा मेळावा समितीने आयोजित केला. काँग्रेस अधिवेशनास नेहरू आले असता काळे झेंडे दाखवून त्यांचा मुकनिषेध करण्यात आला. काँग्रेस अधिवेशनाला ५० हजार तर समितीच्या मेळाव्यास २ लाख लोकांची उपस्थिती होती. यांनतर चळवळ अधिक तिव्र करण्यासाठी एस. एम. जोशीनी करबंदी चळवळीचा इशारा दिला. पंडित नेहरुंनी त्यांना चळवळ थांबविण्याची सूचना केली. परंतु संयुक्त महाराष्ट्र समितीने आश्वासन दिल्याशिवाय चळवळ थाबंणार नाही असे त्यांनी स्पष्ट केले.

संयुक्त महाराष्ट्र समितीने लडंन येथे शाखा स्थापन करून गोळीबारात शहिद झालेले या सत्याग्रहींच्या कुटुंबियांसाठी मदत निधी गोळा केली. यावेळी लंडन येथे आलेल्या पंडित नेहरूना मुंबईचा समावेश महाराष्ट्रात करण्याचे निवेदन केले. दिल्ली येथे सत्याग्रह करण्यासाठी समितीचे अनेक नेते महाराष्ट्र, बेळगांव, निपाणी ते अमरावतीहून दिल्लीस पोहचले. महाराष्ट्रीयन व बिगर मराठी खासदारांच्या भेटी घेऊन संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्याची बाजू भक्कमपणे मांडली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, स्वामी रामानंद तिर्थ, हरिभाऊ पाटसकर, काकासाहेब गाडगीळ व जगन्नाथ भोसले या नेत्यांच्या भेटी घेऊन पाठींबा मिळविला. समितीच्या शिष्टमंडळाने पंतप्रधान नेहरुंची भेट घेऊन आपला प्रश्न मांडला. परंतु चर्चा निष्फळ ठरली. सत्याग्रहीं मोठ्या संख्येने दिल्लीत पोहचले. सुचेता कृपलानी यांनी सत्याग्रहीचे स्वागत केले. २६ जुलै १९५६ रोजी महाराष्ट्रमधून गेलेल्या सत्याग्रहीचे अत्यंत शिस्तीत व शांततेत अहिंसा मार्गाने मोर्चा यशस्वी झाला. समितीच्या प्रमुख नेत्यांनी राजघाटावर जाऊन गांधीजींच्या समाधीला वंदन केले. दिल्ली येथे झालल्या या सत्याग्रहात 'दिल्लीवालो साथ दो बंबई को न्याय दो।' 'मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे' अशा घोषणा देण्यात आल्या. शाहीर अमरशेख यांनी आपल्या पहाडी आवाजाने 'जाग मराठा आम जमाना बदलगे' या गीताने उपस्थित सत्याग्रहीमध्ये चैतन्य भरले.

प्रतापगडच्या पायथ्याशी पंडित नेहरू छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याच्या उद्घाटनास येणार होते त्यावेळी समितीने त्यांना काळे झेंडे दाखवून आंदोलन केले. १ नोव्हेंबर १९५८ साली भाई माधवराव बागल यांच्या नेतृत्वाखाली सीमा भागात सत्याग्रह करण्यात आला.

एकूणच संयुक्त महाराष्ट्र समितीचा मुख्य उद्देश मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची स्थापना करणे हा होता. राज्य पुनर्रचना आयोगाने (फजल अली आयोग) मुंबईला केंद्रशासित प्रदेश ठेवण्याची शिफारस केल्यानंतर महाराष्ट्रभर संतापाची लाट उसळली आणि या लढ्याला अधिक संघटित करण्यासाठी समितीने महत्वाची भूमिका बजावली. संयुक्त महाराष्ट्र समितीही महाराष्ट्राच्या स्थापनेतील कणा होती. संयुक्त महाराष्ट्र चळवळ ही चळवळ केवळ महाराष्ट्रासाठीच नव्हे, तर संपूर्ण भारताच्या भाषावार प्रांतरचनेसाठी एक आदर्श ठरली.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न : २**

**अ) योग्य पर्याय निवडा.**

१) संयुक्त महाराष्ट्र समिती ..... मध्ये अधिकृतपणे स्थापन करण्यात आली.

अ) ६ जानेवारी १९५६ ब) ६ फेब्रुवारी १९५६

क) ६ मार्च १९५६ ड) ६ एप्रिल १९५६

२) जवाहरलाल नेहरू सरकारने ..... मध्ये राज्य पुनर्रचना आयोग नेमला.

अ) १९५४ ब) १९५५

क) १९५३ ड) १९५२

३) संयुक्त महाराष्ट्र समितीचे अध्यक्षपद ..... यांना देण्यात आले होते.

अ) भाई श्रीपाद अमृत डांगे ब) आचार्य प्र. के. अत्रे

क) प्रबोधनकार ठाकरे ड) क्रांतिसिंह नाना

४) संयुक्त महाराष्ट्र समितीने ..... घटना बनवली होती.

अ) १५ कलमी ब)१० कलमी

क) ११ कलमी ड) १४ कलमी

५) पंडित नेहरू छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याच्या उद्घाटनास ..... येथे येणार होते त्यावेळी संयुक्त महाराष्ट्र समितीने त्यांना काळे झेंडे दाखवून आंदोलन केले.

अ) प्रतापगड ब) पन्हाळा

क) रायगड ड) विशाळगाड

### ३.२.२ महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेपर्यंतच्या महत्त्वाच्या घटना :

महाराष्ट्र राज्य निर्मिती हा अनेक वर्षांच्या संघर्ष, बलिदान आणि सातत्यपूर्ण चळवळींचा परिणाम होता. संयुक्त महाराष्ट्र चळवळीची सुरुवात २० व्या शतकाच्या पूर्वार्धात झाली. या टप्प्यात महाराष्ट्रातील विविध भागांतील मराठी भाषिकांना एकत्र आणण्याची मागणी मोठ्या प्रमाणावर होऊ लागली. ब्रिटिश राजवटीत महाराष्ट्र वेगवेगळ्या प्रांतांमध्ये विभागलेला होता, त्यामुळे मराठी भाषिक जनतेत असंतोष निर्माण झाला. संयुक्त महाराष्ट्र चळवळीचे प्रामुख्याने दोन टप्पे पडतात. प्रारंभिक टप्पा हा १९१९–१९४६ भाषिक एकतेची मागणीचा होता. तर दुसरा टप्पा स्वातंत्र्यानंतरचा १९४७–१९६० मानला जातो. या दोन्ही टप्प्यामध्ये घडलेल्या विविध घटनांची माहिती खालील प्रमाणे–

**१. मराठी भाषिक राज्याची पहिली मागणी –**

नागपूर येथे १९१९ मध्ये झालेल्या मराठी साहित्य संमेलनात प्रथमच भाषावार प्रांतरचनेची मागणी झाली. याच काळात मोंटेग्यू–चेम्सफोर्ड सुधारणालागू झाल्या, ज्यामुळे प्रांतिक स्वायत्ततेचा विचार पुढे आला.

**२. भाषावार प्रांत निर्मितीचा ठराव –**

नागपूर येथे १९२० मध्ये झालेल्या भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या अधिवेशनात भाषावार प्रांतरचनेची संकल्पना मांडण्यात आली. लोकमान्य टिळक आणि महात्मा गांधी यांनी यास पाठिंबा दिला. अखिल भारतीय काँग्रेसने नागपूर अधिवेशनात भाषावार प्रांत रचनेला पाठिंबा दिला. यामुळे मराठी भाषिक जनतेमध्ये आत्मनिर्णयाचा आत्मविश्वास निर्माण झाला.

**३. नेहरू अहवाल आणि मराठी भाषिक प्रांताचा मुद्दा –**

मोतीलाल नेहरू अहवालात १९२८ मध्ये भाषावार प्रांत निर्मितीचा विचार मांडला गेला. या अहवालातमराठी भाषिकांसाठी स्वतंत्र राज्याची संकल्पना सूचवण्यात आली.

**४. काँग्रेसचे हरिपुरा अधिवेशन –**

भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे ५१वे अधिवेशन, १९३८ मध्ये गुजरातच्या सूरत जिल्ह्यातील हरिपुरा या गावात झाले होते. या अधिवेशनाचे नेतृत्व सुभाषचंद्र बोस यांनी केले होते. काँग्रेसच्या हरिपुरा अधिवेशनात महाराष्ट्राच्या निर्मितीचा मुद्दा चर्चिला गेला. नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या अध्यक्षतेखालील काँग्रेसच्या हरिपुरा अधिवेशनात भाषावार प्रांत निर्मितीच्या मागणीला बळ मिळाले.यात मराठी भाषिक महाराष्ट्राची स्पष्टपणे मागणी करण्यात आली.

**५. मराठी साहित्य संमेलन –**

सन १९३८ साली मुंबई येथे भरलेल्या मराठी साहित्य संमेलनात वऱ्हाडसह महाराष्ट्राचा एकभाषी प्रांत बनवावा अशी प्रथमच मागणी करण्यात आली. सन १९३९ साली अहमदनगर येथे भरलेल्या मराठी साहित्य संमेलनामध्ये 'संयुक्त महाराष्ट्र' असा प्रथमच शब्द प्रयोग करण्यात आला.

**६. संयुक्त महाराष्ट्र सभेची स्थापना –**

मुंबई येथे श्री. रामराव देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली सन १९४१ मध्ये 'संयुक्त महाराष्ट्र सभा' ही संघटना स्थापन करण्यात आली. दरम्यान दुसरे महायुद्ध सुरू झाल्याने या संघटनेचे कामकाज थंडावले. महायुद्धानंतर महाराष्ट्राच्या मागणीचा जोर वाढू लागला परंतु ही सभा निष्प्रभ ठरली.

**७. 'मराठा महासंघ' आणि 'मराठी सेवा संघ' यांची मागणी –**

मुंबई मराठी भाषिकांचा भाग असूनही, तेथे गुजराती व इंग्रजी भाषिकांचा प्रभाव वाढत होता. मुंबईत मराठी भाषिकांना दुय्यम स्थान दिले जात असल्याने असंतोष वाढत गेला.'मराठा महासंघमआणि 'मराठी सेवा संघा'सारख्या संघटनांनी मुंबई महाराष्ट्रात असावी, अशी मागणी केली.

**८. बेळगाव मराठी साहित्य संमेलन (१९४६) –**

बेळगांव येथे १९४६ साली मराठी साहित्य संमेलन भरले. या संमेलनाचे अध्यक्ष ग. त्र्यं. माडखोलकर हे होते. श्री. केशवराव जाधव, श्री. शंकरराव देव, श्री. द. वा. पोतदार इ. सदस्य होते. या संमेलनात पुढील ठराव करण्यात आला. संयुक्त महाराष्ट्र निर्माण होईपर्यंत भाषिक, शैक्षणिक व सांस्कृतिक विकास होण्यासाठी मराठवाडा

व गोमंतक या प्रदेशांना प्रादेशिक स्वायत्तता असावी. संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती करीत असताना सिमेवरील बेळगांव, कारवार, गुलबर्गा, बिदर, निमाड इ. जिल्ह्यात मिश्र भाषिकांची वस्ती आहे. तेथील प्रत्येक खेड्यातील स्थानिक जनतेचा कौल प्रौढ व गुप्तमतदान पद्धतीने घेऊन ते भाग कोणत्या प्रांतात घालावयाचे हे ठरवावे.

या समितीने आपले उद्देश स्पष्टकरून लोकशाही पद्धतीने लोक आंदोलन करण्याचे निश्चित केले. कामगार, शेतकरी, कष्टकरी, महिला, युवक, पत्रकार व साहित्यिक यांच्या सहभागाने आंदोलनाची दिशा ठरविण्यासाठी पुणे येथे बैठक बोलावली. बैठकीत संयुक्त महाराष्ट्र परिषद भरविण्याचे ठरले.

**९. संयुक्त महाराष्ट्र परिषद (१९४६ ) –**

२८ जुलै १९४६ साली मुंबई येथे संयुक्त महाराष्ट्र एकीकरण परिषदेचे आयोजन करण्यात आले. या परिषदेचे अध्यक्ष श्री. शंकरराव देव हे होते. या परिषदेत 'संयुक्त महाराष्ट्र परिषदेची' स्थापना करण्यात आली. या परिषदेत पुढील ठराव पास करण्यात आले. ते म्हणजे सर्व सलग मराठी भाषिकांच्या प्रदेशांचा एकच मराठी भाषिक प्रांत शक्य तितक्या लवकर स्थापनकरावा. मराठी भाषिक प्रांत बनवताना मुंबई, वऱ्हाड, विदर्भ, मराठवाडा व गोमंतक या मराठी भाषिक प्रदेशांचा विचार करावा. श्री. शंकरराव देव यांच्या अध्यक्षतेखाली संयुक्त महाराष्ट्र परिषदेचे कार्य सुरू झाले. साहित्य परिषद, कम्युनिष्ठ पक्ष, शेतकरी कामगार पक्ष आदिंनी परिषदेची कायम पाठराखन केली. काँग्रेस व जनसंघाने या प्रश्नासंदर्भात सोयीस्कर भूमिका घेतली. सरदार पटेलांचा 'मुंबई' महाराष्ट्रात सामिल करण्यास विरोध होता. पटेलांच्या विरोधात ठाम भूमिका घेतल्यामुळे शंकरराव देव यांचे काँग्रेसमधील महत्त्व संपविण्यात आले.

**१०. दार कमिशन (१९४७) –**

इंग्रज भारताला स्वातंत्र्य देण्यास तयार झाले. भारताची घटना लिहाण्याचे काम सुरू झाले. भाषावार प्रांतरचना करावी की नको? या प्रश्नावरून घटना समितीमध्ये दोन गट पडले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर व घटना समितीचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी सुद्धा भाषावार प्रांतरचनबेद्दल सहानुभूती वाटत होती. म्हणून त्यांनी १७ जून १९४७ मध्ये जम्मू काश्मिरचे न्या. एस. के. दार यांच्या अध्यक्षतेखाली कमिशन नेले. दार कमिशनला भाषावार प्रांतरचना करणे योग्य आहे का? व प्रांतरचना करावयाचे ठरले तर भाषावार प्रांतरचना करताना कसे प्रांत बनवावेत यासंबंधी चौकशी करून अहवाल द्यायचा होता.

दार कमिशनर महाराष्ट्रात येणार आहे हे समजल्यावर ऑक्टोबर १९४८ साली मुबंई येथे श्री. रामराव देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली संयुक्त महाराष्ट्र परिषदेचे अधिवेशन भरले. या अधिवेशनात लोकशाहीर कॉ. आण्णाभाऊसाठे यांचे 'माझी मुंबई' हे लोकनाट्य सादर केले. यामध्ये मुंबई ही महाराष्ट्राची आहे हे ठामपणे सांगितले. मुंबई शहर हे महाराष्ट्राच्या जीवन-मरणाचा प्रश्न बनवला. शाहीर अमरशेख यांनी आपल्या शाहिरीने आंदोलकांच्यात रोमांच उभे केले. मराठी भाषिकांचा एक सलग असा प्रांत बनवावा असा ठराव पास झाला. तसे निवेदन दार कमिशनला दिले. अनेकांच्या साक्षी, निवेदने झाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दार कमिशनला एक निवेदन दिले. त्यामध्ये त्यांनी महाराष्ट्र आणि मुंबईचा संबंध अतुट असून महाराष्ट्रापासून मुंबई वेगळी करू नये असे स्पष्ट केले. यावेळी महात्मा गांधींनी भाषावार प्रांतरचनेला अनुकूल भूमिका घेतली. स. का. पाटील यांनी यावेळी संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीला कडाडून विरोध केला.

१० डिसेंबर १९४८ साली दार कमिशनने आपला अहवाल प्रसिद्ध केला त्यामध्ये म्हटले होते की, ''महाराष्ट्रीय लोक जुन्या आक्रमक सरंजामी वृत्तीचे आहेत. पुणेरी वृत्ती ही तर भयंकर स्वरूपाची आहे. मुंबईवर महाराष्ट्राचा मुळीच हक्क नाही. तिला कोणत्याही एका प्रांतात घालता येणार नाही. कारण ती सार्वदेशीय आहे.'' आत्तापर्यंत सहा राज्ये भाषावार प्रांतरचनेनुसार अस्तित्वात आली होती. महाराष्ट्र राज्य निर्मितीविषयी पुर्वग्रहदुषितपणा ठेवून देशाचे तुकडे होतील या भितीने कमिशनने महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीला विरोध केला. भाषावार प्रांतरचना भारताच्या ऐक्यास व एकात्मतेस मारक ठरेल असे स्पष्ट केले. दार कामिशनच्या अहवालानंतर महाराष्ट्रात मोठा जनक्षोभ उसळला. कारण महाराष्ट्रीय लोकांबद्दल दार कमिशनने विरोधी भूमिका घेतली होती. यानंतर मुंबईसह संयुक्त महाराष्ट्रासाठी आंदोलन जोर धरू लागले.

**११. जे. व्ही. पी. समिती अहवाल व तिव्र प्रतिक्रिया (१९४८) –**

महाराष्ट्रातील जनतेने दार कमिशन अहवाल स्विकारला नाही हे लक्षात येताच सन १९४८ साली जयपूर काँग्रेस अधिवेशनात या अहवालावर चर्चा झाली. पुन्हा परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी काँग्रेसने पंडित जवाहरलाल नेहरू, वल्लभभाई पटेल व पट्टाभीसितारामय्या या तिघांची त्रिसदस्यीय समिती नेमली. त्यालाच जे. व्ही. पी. समिती असे म्हटले जाते. केंद्र सरकार, पंडित नेहरू व समितीसमोर चार महत्त्वाच्या अडचणी होत्या त्या म्हणजे –

(१) भाषावार प्रांतरचनेचा निर्णय घाईघाईने घेतला जाऊ नये कारण शेकडो वर्षे एकसाथ राहणाऱ्या लोकांच्या जीवनपद्धतीत एकदम मोठा बदल घडवून आणणे इष्ट नसते.

(२) प्रत्येक भाषिक गटात अल्पसंख्याक भाषिक घटक आहेत. त्यांचा या मागण्यांना विरोध आहे. त्यांच्या आक्षेपांचा योग्य असा विचार झाला पाहिजे.

(३) देशापुढे विकासाचे व ऐक्याचे इतर महत्त्वाचे प्रश्न असताना भाषावार प्रांतरचनेसारखा लोकांचे विभाजन करणारा विषय अग्रक्रमाने रेटू नये. त्यामुळे हिंसक चळवळी व प्रतिचळवळी निर्माण होतील.

(४) भारतातील सांस्कृतिक विविधता हे देशाच्या राष्ट्रीयत्वाचे वैभव आहे. हैदराबादसारखे चार भाषा बोलणारे, सामायिक भारतीय संस्कृतीचा पुरस्कार करणारे राज्य आपण कायम टिकविले पाहिजे.

तीन महिने या समितीने अभ्यास करून आपला अहवाल प्रसिद्ध केला. परंतु या अहवालातही मुंबई वगळून महाराष्ट्राची मागणी मान्य केली होती. या समितीचा अहवाल प्रसिद्ध होताच महाराष्ट्रात तिव्र प्रतिक्रिया उमटल्या. श्री. भाऊसाहेब हिरे व सेनापती बापट यांनी महाराष्ट्रभर जनजागृतीस सुरूवात केली. सन १९४९ साली प्र. के. अत्रे यांनी मुंबई महापालिकेत मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राचा ठराव पास करून घेतला. याच प्रकारचा ठराव मुंबई विधानसभे पुढे श्री. यशवंतराव मोहिते यांनी मांडला. परंतु या ठरावाला मोरारजी देसाई यांनी विरोध केल्याने हा ठराव बारगळला. सेनापती बापट, संत गाडगेबाबा, लालजी पेंडसे, अमरशेख, केशवराव जेथे व शंकराव देव यांनी जनमत प्रचंड जागृत केले. 'जगेन आणि मरेन' फक्त संयुक्त महाराष्ट्रासाठी असा निर्धार श्री. माधवराव गायकवाड यांनी जाहीर केला. अशा धगधगत्या परिस्थितीत डांग जिल्हा गुजरातला जोडल्याने परिस्थिती स्पोटक बनली. सन १९५१ साली भरलेल्या अमरावती परिषदेने 'डांग दिन' साजरा करून या कृतीचा निषेध केला.

भाषावार प्रांताबाबत तत्कालीन नेहरू सरकारने नकारात्मक भूमिका स्वीकारली. सरकारने स्थापन केलेल्या दार समितीने भाषावार प्रांतरचना करण्यास नकार दिला. यावर विचार करण्यासाठी काँग्रेसने 'जेव्हीपी' समिती नेमली. या समितीत जवाहरलाल नेहरू, वल्लभभाई पटेल व पट्टाभिसीतारामय्या यांचा समावेश होता. या समितीने भाषावार प्रांतरचनेचा प्रश्न अग्रक्रमाने हाती घेतला जाऊ नये, अशी शिफारस केली.

**१२. समाजवादी पक्ष आणि प्रजा समाजवादी पक्ष यांचा पाठिंबा –**

संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीला राजकीय समर्थन मिळू लागले. सन. १९४९ मध्ये समाजवादी पक्ष आणि प्रजा समाजवादी पक्षाने मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र या मागणीला बळ दिले. काँग्रेसमधील काही नेत्यांनीही या मागणीला पाठिंबा दिला.

**१३. नागपूर करार (१९५३) –**

संयुक्त महाराष्ट्र चळवळीला अधिक गती देण्यासाठी तसेच महाराष्ट्राच्या विविध विभागातील नेत्यांच्या मनातील शंका-कुशंका दूर करण्यासाठी पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा व विदर्भ या तिन्ही विभागातील प्रमुख नेते मंडळी नागपूर येथे २८ सप्टेंबर १९५३ साली एकत्र जमली. त्यांच्यात ११ कलमी करार झाला. त्यास 'नागपूर करार' असे म्हणतात. यातील महत्त्वाची कलमे पुढीलप्रमाणे-

१. मराठी भाषिकांचे एक सलग राज्य निर्माण करताना सर्व विभागातील लोकांचा निर्णय घ्यावा.

२. मुंबई राज्य, मध्यप्रदेश आणि हैद्राबाद येथील मराठी भाषिकांचे सलग एक राज्य बनविण्यात यावे. त्याला महाराष्ट्र असे संबोधण्यात येवून त्याची राजधानी मुंबई असावी.

३. महाराष्ट्राच्या विकासासाठी व राज्यकारभाराच्या सोयीसाठी 'महाविदर्भ', 'मराठवाडा' व 'पश्चिम महाराष्ट्र' असे तिन विभाग असावेत.

४. प्रत्येक विभागाला लोकसंख्येच्या प्रमाणात विधानसभेत व मंत्रिमंडळात प्रतिनिधीत्व देण्यात यावे.

५. मुंबई व नागपूर येथे दोन उच्च न्यायालये असावीत.

६. विदर्भ व मराठवाड्यातील लोकांना लोकसंख्येच्या प्रमाणात सरकारी नोकऱ्या दिल्या जाव्यात.

७. राज्यात सत्तेचे विकेंद्रिकरण करण्यात यावे.

८. नागपूर ही महाराष्ट्राची उपराजधानी असावी, राज्याच्या विधानसभेचे किमान एक अधिवेशन दरवर्षी नागपूरला देण्यात यावे.

हा करार म्हणजे संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील अत्यंत महत्त्वाची घटना होय. तिन राज्यात विभागलेले मराठी भाषिक समान भाषा या तत्वावर एकत्र येऊन संयुक्त महाराष्ट्र राज्याची स्थापना करणार होते. महाराष्ट्रातील काँग्रेस श्रेष्ठी प्रथमच या मुद्यावर एकत्र येऊन त्यांनीच या करारावर स्वाक्ष्या केल्या. भाऊसाहेब हिरे यांनी अत्यंत महत्त्वाची भूमिका या करारात बजावली.

**१४. आंध्रप्रदेश निर्मितीने आंदोलनाला गती –**

आंध्र प्रदेशसाठी पोट्टीश्रीरामुलू यांनी उपोषण केले आणि त्यात त्यांचा मृत्यू झाला. परिणामी, १९५३ मध्ये आंध्र प्रदेश भाषावार विभाजित करण्यात आला.त्यामुळे महाराष्ट्राच्या मागणीला जोर मिळाला.

**१५. फजल अली आयोग (राज्य पुनर्रचना आयोग) –**

पंडित जवाहरलाल नेहरू यांनी भाषिक तत्वावर भारतातील प्रांताची रचना करण्यासाठी सर्वच्च न्यायालयाचे न्यायाधिश एस. फजल अली यांच्या अध्यक्षतेखाली सन १९५३ साली राज्य पुनर्रचना आयोगाची स्थापना केली. श्री. हृदयनाथ कुंझरु व सरदार के. एस. पण्णीकर यांचाही समावेश या समितीमध्ये समावेश होता. या कमिशनने जवळपास दिड वर्षे भाषावार प्रांत रचनेसंबंधी सर्वांगीण अभ्यास केला. २६७ पानांचा अहवाल १० ऑक्टोबर १९५५ मध्ये या आयोगाने सादर केला. त्यातील काही मुद्दे :

१. मुंबई महाराष्ट्राला जोडण्यात येऊ नये.

२. मुंबईत एक भाषा नाही, तर मुंबई ही द्वैभाषिक असावी.

३. मुंबई प्रांतात कच्छ व सौराष्ट्र सामील करुन घ्यावा.

४. मराठी विदर्भ, मध्य प्रदेशातील काही मराठी जिल्हे, मराठवाडा यांचा 'महाविदर्भ' तयार करण्यात यावा.

५. बेळगाव–कारवार कर्नाटकास जोडावेत.

मुंबई महाराष्ट्रापासून अलग केली. मराठी भाषिकांचा अपमान करण्यात आला. राष्ट्रीय राजकारणात महाराष्ट्राचे महत्त्व कमी करण्याचा हा कुटिल डाव आहे. महाराष्ट्रावर जाणून–बुजून अन्याय करण्यात येत आहे असे अनेक नेत्यांचे मत बनले. जनता संतप्त झाली व महाराष्ट्रात संतापाची लाट उसळली.

**१६. राज्य पुनर्रचना आयोगविरोधात तिव्र आंदोलन –**

संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नाने उग्र रूप धारण करताच जनमत प्रक्षुब्ध बनले. परिणामी महाराष्ट्रातील काँग्रेस नेते शंकरराव देव यांच्या नेतृत्वाखाली एकत्र आले. भारताचे पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरुंनी शंकरराव देव यांना विचारले, ''तुम्हाला मुंबई हवी की महाराष्ट्र हवा आहे?'' तेव्हा देव म्हणाले ''हा तुमचा प्रश्न शरीर हवे की आत्मा हवा? असा आहे, मुंबई शिवाय संयुक्त महाराष्ट्राची मी कल्पनाच करू शकत नाही.'' राष्ट्रीय काँग्रेस पक्ष श्रेष्ठींनी 'विदर्भ, मुंबई व गुजरात' सह द्विभाषिक मुंबई राज्याच्या निर्मितीचा प्रयोग पुढील पाच वर्षासाठी करण्याचा निर्णय घेतला. परंतु ही तडजोड काँग्रेस व्यतिरिक्त अन्य पक्षांच्या नेत्यानी अमान्य केली. ६ नोव्हेंबर १९५५ रोजी संयुक्त महाराष्ट्र दिन साजरा करावा असे ठरले. श्री. एस. एम. जोशी कोणत्याही तडजोडीस तयार नव्हते. सर्व मराठी आमदार, खासदारांनी राजीनामे द्यावेत अशी मागणी झाली. मुंबईच्या कॉ. श्रीपाद अमृत डांगे यांच्या अध्यक्षतेखाली कम्युनिष्ठ पक्ष, प्रजासमाजवादी, शेतकरी कामगार पक्ष, जनसंघ व विविध कामगार संघटना यात सहभागी झाल्या. मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राचा पुनरुच्चार करण्यात आला.

मराठी जनतेचा तिव्र विरोध पाहून भविष्यातील राजकारणाचा विचार करून काँग्रेस वर्किंग कमिटीने ०८ नोव्हेंबर १९५५ साली त्रिराज्याचा प्रस्ताव मांडला. त्यामध्ये –

१) गुजराथी भाषिकांचे एक राज्य असावे.

२) मुंबई व त्यांच्या उपनगराचे एक राज्य असावे.

३) मराठवाड्यासह महाराष्ट्र राज्य असावे.

त्रिराज्य प्रस्तावामुळे महाराष्ट्रात प्रचंड जनक्षोभ उसळला. मुंबई महाराष्ट्रापासून वेगळी करण्याचा हा कुटिलडाव होता. त्रिराज्य स्थापनेचे बिल विधानसभेत चर्चेला येणार होते. त्रिराज्य निर्माण करण्याच्या या आघाताविरुद्ध संघटित होऊन बिल हाणून पाहण्यासाठी एस. एम. जोशी यांच्या नेतृत्वाखाली कामगारांची ट्रेड युनियन व विविध राजकीय पक्षांचे प्रतिनिधी यांची एक सभा होऊन 'कृती समितीची' स्थापना करण्यात आली. १५ नोव्हेंबर १९५५ रोजी पुन्हा शिवाजी पार्क येथे एस. एम. जोशी यांच्या अध्यक्षतेखाली एका परिषदेचे आयोजन करण्यात आले. एक दिवसाचा लाक्षणिक संप पुकारुन मुंबई विधानसभेवर मोर्चे नेऊन तेथे निदर्शने करून त्रिराज्य योजनेचे बिल हाणून पाडण्याचे ठरविण्यात आले. १८ नोव्हेंबर १९५५ रोजी सेनापती बापट, आचार्य अत्रे, भाई मिरजकर, केशव सिताराम ठाकरे, क्रांतिसिंह नाना पाटील, के. एस. देसाई, कृष्णा देसाई, रसिकभट, लालजी पेंडसे, एम. जी. पाटकर यांच्या नेतृत्वाखाली विधानसभेवर ५०० सत्यागृहिंचा मोर्चा नेण्यात आला. एस. एम. जोशींनी विधानसभेत बिलास विरोध करून दुरुस्त्या सुचविल्या. सेनापती बापट, प्र. के. अत्रे व इतर नेत्यांना अटक झाली. या अटकेच्या निषेधार्थ २१ नोव्हेंबर १९५५ रोजी मुंबईत हरताळ-संप करण्याचे निश्चित झाले.

**१७. संयुक्त महाराष्ट्र समितीची स्थापना (१९५६) –**

शंकरराव देव यांच्या नेतृत्वाखालील संयुक्त महाराष्ट्र परिषद निष्प्रभ ठरु लागली. संयुक्त महाराष्ट्र परिषदेतून सन १९५६ साली काँग्रेसपक्षाने अंग काढून घेतल्याने परिषद फुटली. परिणामी तिचे २३ ऑक्टोबर १९५५ साली विसर्जन झाले. ही परिषद बरखास्त करण्यापूर्वी तिने दिल्लीत जाऊन द्वैभाषिकराज्याचा पर्याय सुचविला. अशा परिस्थितीत संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत सुसुत्रता आणण्यासाठी एका व्यासपीठाची गरज निर्माण झाली. या गरजेतूनच ६ फेब्रुवारी १९५६ रोजी केशवराव जेथे यांच्या अध्यक्षतेखाली पुण्यात सर्व पक्षीय सभा होऊन त्यामध्ये संयुक्त महाराष्ट्र समितीची स्थापना झाली. आचार्य अत्रे, सेनापती बापट, कॉम्रेड डांगे, प्रबोधनकार ठाकरे, एस. एम. जोशी, ना. ग. गोरे इत्यादी लोक समितीत होते. या समितीमध्ये विविध पक्ष सामील झाले होते. परिषदेचे विलीनीकरण या समितीत झाले. शाहीर अमर शेखांनी तर गावोगावी पोवाडे गाऊन जनजागरण चालवले. या समितीने आपली १५ कलमी घटना बनवून तिचे उद्देश साधने, घटकपक्ष, समितीची रचना, नियम वमार्ग स्पष्ट केले. २१ नोव्हेंबर १९५६ मुंबईत संयुक्त महाराष्ट्र समितीने मोठे आंदोलन छेडले. पोलिसांनी गोळीबार केला, १०५ आंदोलक हुतात्मा झाले. फ्लोरा फाउंटन येथे हे आंदोलन झाले. फ्लोरा फाउंटनचे नाव बदलून हुतात्मा चौक ठेवण्यात आले. या घटनेमुळे महाराष्ट्रभर तीव्र संताप पसरला आणि चळवळ अधिक तीव्र झाली.

**१८. विशाल द्विभाषिक राज्याची निर्मिती (१९५६) –**

महाराष्ट्रातील वाढता असंतोष कमी करण्यासाठी केंद्र सरकारने तात्काळ म्हणजे दि. ३१ ऑक्टोबर १९५६ रोजी द्विभाषिक मुंबई राज्याची घोषणा केली. १ नोंव्हेबर १९५६ रोजी गुजरात, महाराष्ट्र असे मुंबई द्वैभाषिक राज्य अस्तित्वात आले. या राज्याचे पहिले मुख्यमंत्री म्हणून यशवंतराव चव्हाण यांची निवड झाली.

संयुक्त महाराष्ट्र समितीने द्वैभाषिक राज्यास कडाडून विरोध केला. मुंबईतील शिवाजी पार्कवर द्वैभाषिक राज्य विरोधात परिषद आयोजित करून निषेध नोंदविण्यात आला. अनेक लोकांनी कारावास भोगला. गुजरात व महाराष्ट्रात या वर्षी दिवे न लावता काळी दिवाळी साजरी करण्यात आली. दोन्ही राज्यात भावनिक ऐक्य प्रस्थापित झाले नाही. जनतेच्या इच्छेविरुद्ध द्वैभाषिक राज्य लादण्यात आले. प्र. के. अत्रे यांनी 'मराठा' नावाचे दैनिक सुरू करून 'महाद्विभाषिक निषेध विशेषांक' काढला. त्यामध्ये परखड लिखाण केले. सन १९५७ च्या सार्वत्रिक निवडणूका जाहीर झाल्या. निवडणुकीत संयुक्त महाराष्ट्र समितीने सहभाग घेतला व अभूतपूर्व असे यश संपादन केले. समितीचे हे यश पाहून चळवळीच्या प्रखरतेची जाणीव केंद्र सरकारला झाली.

**१९. प्रतापगडावर समितीचे मोर्चा व निदर्शने –**

प्रतापगडावर उभारलेल्या छ. शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याचे अनावरण सन १९५६ मध्ये पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांच्या हस्ते करण्याचे मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी ठरविले. या प्रसंगी नेहरुंना काळे झेंडे दाखवून उग्र निदर्शने करण्याचे समितीने ठरविले. भाई माधवराव बागल यांच्या नेतृत्वाखाली प्रतापगडावर भव्य निदर्शन मोर्चा काढण्यात आला. पाचगणी, महाबळेश्वर व पसरणी घाटात रस्त्याच्या दोन्ही बाजूस उभे राहून पं. नेहरुंना काळे झडें दाखविले गेले. द्वैभाषिक राज्याच्या व नेहरुंच्या धिक्काराच्या घोषणा दिल्या गेल्या. परिणामी मराठी जनतेच्या मनातील संतापाची नेहरूना जाणीव झाली.

**२०. मुंबई पुनर्रचना कायदा व संयुक्त महाराष्ट्र राज्याची निर्मिती –**

मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र राज्य निर्माण करण्यात पं. नेहरू, इंदिरा गांधी, सरदार पटेल व काँगेसच्या श्रेष्ठींनी अनुकुलता दर्शविली. तयार होणाऱ्या नव्या राज्याला 'मुंबई राज्य' असे सुविण्यात आले. परंतु समितीने 'महाराष्ट्र' नावाचा आग्रह धरला. तो मान्य करण्यात आला. महाराष्ट्र व गुजरात द्वैभाषिक राज्य भंग करणारे बिल यशवंतराव चव्हाण यानी १४ मार्च १९६० रोजी मुंबई विधानसभेत मांडून ते मंजूर करून घेतले. २८ मार्च १९६० रोजी गृहमंत्री वल्लभभाई पटेल यांनी हेच बिल लोकसभेत मांडले. लोकसभेने २१ एप्रिलला तर राज्य सभेने २३ एप्रिलला ते मंजूर केले. राष्ट्रपतींनी त्यास मंजूरी दिली. केंद्र सरकारचा मुंबई पुनर्रचना कायदा पास झाला. त्यानुसार ०१ मे १९६० रोजी मुंबई राजधानी असणारे 'महाराष्ट्र' आणि गजुराथी भाषिकांचे स्वतंत्र 'गुजरात' अशी दोन स्वतंत्र राज्ये अस्तित्वात आली. नव्या महाराष्ट्र राज्याचे २६ जिल्हे 'महाराष्ट्र राज्य निर्मितीचा जाहीरनामा' केंद्र सरकारने प्रसिद्ध केला. त्यानुसार गुतराती भाषिक सर्व जिल्हे गुजरात राज्याला जोडण्यात आले. पश्चिम महाराष्ट्रातील १३ जिल्हे, मराठवाड्यातील ०५ जिल्हे, विदर्भातील ०८ जिल्हे महाराष्ट्रात जोडण्यात आले. अशाप्रकारे एकूण २६ जिल्हे महाराष्ट्रात जोडण्यात आले. या नव्या महाराष्ट्र राज्याचे ४ प्रशासकीय विभाग पाडण्यात आले ते म्हणजे मुंबई विभाग, नागपूर विभाग, औरंगाबाद विभाग व पुणे विभाग हे होय. महाराष्ट्राने डांग व उंबरगाव प्रदेशावर पाणी सोडले. गुजरातला राजधानीसाठी १० कोटी द्यावेत असे ठरले. परंतु बेळगांव, निपाणी व कारवारचा प्रश्न अनुत्तरीतच राहिला. १ मे, १९६० रोजी कामगार दिनी महाराष्ट्र राज्याची पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांनी मुंबईच्या शिवाजी पार्कवर घोषणा केली. त्याच दिवशी यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. संयुक्त महाराष्ट्र समितीच्या प्रदिर्घ लढ्याला यश प्राप्त झाले. सर्वत्र दिवाळी साजरी केली गेली. महाराष्ट्रा विषयीचे स्वप्न यशवंतराव चव्हाण यांच्याच शब्दात पुढील प्रमाणे ''मी, परमेश्वराची प्रार्थना करतो की देवा आम्हाला अशी दानत दे की, महाराष्ट्र

राज्य जनतेचेराज्य होईल. हे राज्य लोककल्याणाकरीता झटले आणि भारताच्या नकाशावरील ताऱ्यात एका नव्या तेजस्वीताऱ्याची भर टाकेल.....''

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न : ३**

**अ) योग्य पर्याय निवडा.**

१) सन १९१९ मध्ये ..... झालेल्या मराठी साहित्य संमेलनात प्रथमच भाषावार प्रांतरचनेची मागणी झाली.

अ) नागपूर ब) मुंबई

क) सातारा ड) पुणे

२) भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे ५१ वे अधिवेशन, १९३८ मध्ये गुजरातच्या सूरत जिल्ह्यातील ..... या गावात झाले होते.

अ) मंगरोल ब) बरडोली

क) उमरपाडा ड) हरिपुरा

३) २८ जुलै१९४६ रोजी 'संयुक्त महाराष्ट्र परिषदेची' स्थापना ..... येथे करण्यात आली.

अ) नागपूर ब) मुंबई

क) सातारा ड) पुणे

४) 'नागपूर करार' ..... रोजी झाला.

अ) २८ सप्टेंबर १९५० ब) २८ सप्टेंबर १९५३

क) २८ सप्टेंबर १९५४ ड) २८ सप्टेंबर १९६०

५) ..... यांनी महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली.

अ) यशवंतराव चव्हाण ब) यशवंतराव मोहिते

क) केशवराव जेधे ड) कॉ. एस. ए. डांगे

## ३.३ सारांश :

संयुक्त महाराष्ट्र चळवळ ही मराठी भाषिक जनतेच्या अस्मिता, हक्क आणि सांस्कृतिक एकतेसाठी लढलेली ऐतिहासिक चळवळ होती. या चळवळीमुळेच १ मे, १९६० रोजी मुंबईसह महाराष्ट्र राज्याची स्थापनाझाली. १ मे हा 'महाराष्ट्र दिन' म्हणून साजरा केला जातो. मुंबई ही महाराष्ट्राची अधिकृत राजधानी बनली. मराठी भाषिक एकता आणि अस्मितेचा विजय झाला. विदर्भ, मराठवाडा, कोकण आणि पश्चिम महाराष्ट्र एकत्र येऊन एक संघ महाराष्ट्र निर्माण झाला. मराठी भाषा, संस्कृती आणि अस्मितेला अधिकृत मान्यता मिळाली. २१ नोव्हेंबर १९५६ रोजी १०५ हुतात्म्यांनी बलिदान दिले, ज्यामुळे चळवळीला मोठी ताकद मिळाली. लोकशाही मार्गाने झालेल्या सत्याग्रह, आंदोलने आणि संघर्षामुळे महाराष्ट्राची निर्मिती शक्य झाली.

यशवंतराव चव्हाण हे महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री झाले. मराठी माणसाला आर्थिक, औद्योगिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात अधिक संधी मिळू लागल्या. मात्र सीमा प्रश्न अद्याप कायम राहीला आहे. बेळगाव, कारवार, निपाणी यांसारखे मराठी भाषिक भाग अद्याप महाराष्ट्रात समाविष्ट झाले नाहीत. आजही महाराष्ट्र-कर्नाटक सीमावाद सुरू आहे. महाराष्ट्राचा औद्योगिक आणि सांस्कृतिक विकास घडून आला. महाराष्ट्र आज देशातील सर्वात मोठ्या औद्योगिक, सांस्कृतिक आणि आर्थिक राज्यांपैकी एक आहे. अंतिमत: संयुक्त महाराष्ट्र चळवळ ही मराठी जनतेच्या स्वाभिमान, एकता आणि हक्कांची चळवळ होती.

## ३.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ :

**पुनर्रचना :** पुन्हा रचना करणे किंवा नव्याने तयार करणे. याचा उपयोग विविध संदर्भांमध्ये केला जातो.

**भाषावार प्रांतरचना :** भाषेच्या आधारे प्रदेशांची किंवा राज्यांची रचना करणे. याचा अर्थ असा की प्रशासनिक किंवा भौगोलिक विभागणी ही तेथील प्रमुख भाषेच्या आधारावर केली जाते.

**बृहन्मुंबई राज्य :** हे भारताच्या स्वातंत्र्यानंतर अस्तित्वात आलेले एक प्रमुख राज्य होते. याचा इतिहास महाराष्ट्र व गुजरात राज्यांच्या निर्मितीशी संबंधित आहे.

## ३.५ स्वयं अध्ययन प्रश्न उत्तरे :

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न : १**

**अ) योग्य पर्याय निवडा.**

१) अ) एरणगांव　　२) ब) प्राकृत

३) क) १ मे १९६०　　४) अ) श्री. विठ्ठल ताम्हणकर

५) क) १९५६

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न : २**

**अ) योग्य पर्याय निवडा.**

१) ब) ६ फेब्रुवारी १९५६　　२) क) १९५३

३) अ) भाई श्रीपाद अमृत　　४) अ) १५ कलमी

५) अ) प्रतापगड

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न : ३**

**अ) योग्य पर्याय निवडा.**

१) अ) नागपूर　　२) ड) हरिपुरा

३) ब) मुंबई　　४) ब) २८ सप्टेंबर १९५३

५) अ) यशवंतराव चव्हाण

## ३.६ सरावासाठी स्वाध्याय :

**अ) टिपा लिहा.**

१. सन १९५७ च्या सार्वत्रिक निवडणूकेतील संयुक्त महाराष्ट्र समितीचे यश

२. संयुक्त महाराष्ट्र समितीचा संघर्ष

३. संयुक्त महाराष्ट्र परिषद (१९४६)

४. दार कमिशन (१९४७)

५. जे. व्ही. पी. समिती(१९४८)

६. नागपूर करार (१९५३)

**ब) थोडक्यात उत्तरे लिहा.**

१. संयुक्त महाराष्ट्र चळवळीची प्रमुख कारणे स्पष्ट करा.

२. संयुक्त महाराष्ट्र समितीचा पाच कलमी कार्यक्रम सांगा.

३. फजल अली आयोग (राज्य पुनर्रचना आयोग) विषयी माहिती द्या.

४. संयुक्त महाराष्ट्र समिती (१९५६) विषयी माहिती दया.

**क) खालील प्रश्नाची सविस्तर उत्तरे लिहा.**

१. संयुक्त महाराष्ट्र चळवळीची पार्श्वभूमीस्पष्ट करा.

२. संयुक्त महाराष्ट्र समितीचे कार्य सांगा.

३. महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेपर्यंतच्या महत्त्वाच्या घटनांचा आढावा घ्या.

## ३.७ संदर्भ ग्रंथ :


१. Phadke Y. D., Social Reformers of Maharashtra, the University of Michigan, 1975

२. Phadke Y. D., Politics and Language, Mumbai, 1980.

३. Sunthankar B. R., History of Maharashtra - Vol. I and II, Popular Prakashan, Mumbai, 1993.

४. अत्रे आचार्य, कृऱ्हेचे पाणी, खंड ४ व५, मुंबई, १९६८.

५. चव्हाण रमेश (संपा.), यशवंतराव चव्हाण यांचे समाजकारण, रमेश राध चव्हाण, कोथरूड, पुणे, ऑक्टोबर २०१०.

६. चौधरी के. के., आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास, १८१८-१९४७ खंड २, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, २०१८.

७. देव, शंकरराव, संयुक्त महाराष्ट्र आंदोलन, पुणे, १९७९.

८. गडकरी माधव, संयुक्त महाराष्ट्र लढ्याचे महारथी, पुणे, १९८७.

९. गाडगीळ न. वि., पथिक, खंड २, १९६४.

१०. पेंडसे लालजी, संयुक्त महाराष्ट्राचे महामंथन, मुंबई, १९६५.

११. फडके य. दि., विसाव्या शतकातील महाराष्ट्र, खंड ६ व ७, मुंबई, २००६

१२. टिकेकर अरूण, १९९५ : सत्तांतर वर्षातील महाराष्ट्राच्या स्थितीचा आढावा, मुंबई, १९९६.

❖❖❖

घटक ४

# यशवंतराव चव्हाण यांचे कार्य

## (Role of Yashwantrao Chavan)

अनुक्रमणिका


४.० उद्दिष्टे

४.१ प्रास्ताविक

४.२ विषय विवेचन

- ४.२.१ कृषी
- ४.२.२ शिक्षण
- ४.२.३ उद्योगक्षेत्र

४.३ सारांश

४.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

४.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

४.६ सरावासाठी स्वाध्याय

४.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ

## ४.० उद्दिष्टे :

सदर घटकाच्या अभ्यासानंतर आपणास –

१. यशवंतराव चव्हाण यांनी कृषी क्षेत्रात हरित क्रांती, सिंचन प्रकल्प आणि सहकारी चळवळीला प्रोत्साहन दिले हे समजावून घेता येईल.

२. यशवंतराव चव्हाण यांनी शेतकऱ्यांसाठी कर्जसुविधा, शेतीपूरक व्यवसाय आणि बाजार व्यवस्थापन सुधारण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले याचे आकलन होईल.

३. यशवंतराव चव्हाण यांनी शिक्षण क्षेत्रात प्राथमिक ते उच्च शिक्षणाचा प्रसार, तांत्रिक शिक्षणाला चालना आणि ग्रामीण भागातील शिक्षण सुविधांचा विकास केला हे समजेल.

४. यशवंतराव चव्हाण यांनी औद्योगिकीकरणाला चालना देऊन सहकारी, सार्वजनिक आणि लघु-मध्यम उद्योगांच्या वाढीस हातभार लावला हे स्पष्ट होईल.

६. यशवंतराव चव्हाण यांनी रोजगार संधी निर्माण करून महाराष्ट्राच्या एकूण आर्थिक विकासात महत्त्वाची भूमिका बजावली याचे आकलन होईल.

## ४.१ प्रास्ताविक :

१ मे, १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव बळवंतराव चव्हाण यांनी आधुनिक महाराष्ट्राचा पाया घातला. महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासातील त्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. स्वातंत्र्यानंतरच्या पहिल्या दोन-तीन दशकात त्यांनी राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, कृषी, सहकार, औद्योगिक इत्यादी मानवी जीवनाच्या सर्व अंगाच्या विकासाला स्पर्श करणाऱ्या क्षेत्रांचा कायापालट करण्याचे कार्य दूरदृष्टी ठेवून केले व महाराष्ट्रातील सर्वाधिक मागासलेल्या घटकाला देखील विकासाच्या प्रवाहात आणले. देशातील स्थिर, पुरोगामी आणि सर्वच बाबतीत जागरूक असे राज्य अशी महाराष्ट्राची प्रतिमा त्यांच्यामुळेच भारतभर निर्माण झाली. त्यांच्या योगदानामुळेच महाराष्ट्राला पुरोगामी – प्रगतिशील महाराष्ट्र राज्य अशी उपाधी मिळून यशवंतराव 'आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार' ठरले.

## ४.२ विषय विवेचन :

### प्रारंभिक आयुष्य :

यशवंतराव यांचा जन्म १२ मार्च, १९१३ रोजी सांगली जिल्ह्यातील देवराष्ट्रे येथे झाला. त्यांच्या बालपणीच वडिलांचे निधन झाल्याने आईनेच प्रतिकूल परिस्थितीत त्यांना वाढवले. यशवंतरावांना आईकडूनच आत्मनिर्भरता आणि देशभक्तीची शिकवण मिळाली होती. त्यांचे प्राथमिक शिक्षण कराड येथे झाले. त्यांचे उच्च शिक्षण कोल्हापूर व पुणे येथे झाले. त्यांनी बी. ए., एल. एल. बी. पदवी संपादन केली. सन १९३० च्या सविनय कायदेभंग चळवळीत सहभागी झाल्यामुळे १९३२ साली त्यांना पहिला तुरुंगवास घडला. सन १९४२ च्या 'छोडो भारत' आंदोलन काळात सातारा जिल्ह्यातील भूमिगत चळवळीत त्यांनी महत्त्वाची कामगिरी बजावली. सन १९४८ मध्ये त्यांची महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसच्या चिटणीसपदावर नियुक्ती झाली. त्यानंतर त्यांनी

सन १९५६ ते सन १९६० पर्यंत द्विभाषिक मुंबई राज्याचे मुख्यमंत्री (महाराष्ट्र आणि गुजरात राज्यांचा समावेश) म्हणून तर, महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री म्हणून सन १९६० ते सन १९६२ या कालावधीत कार्यभार सांभाळला. त्यानंतर केंद्र सरकारमध्ये संरक्षण मंत्री (१९६२-१९६६), गृहमंत्री (१९६६-१९७०) आणि वित्तमंत्री (१९७०-१९७४) अशी महत्त्वाची खाती सांभाळली. जुलै १९७९ ते जानेवारी १९८० या काळात ते भारताचे नववे उपपंतप्रधान होते. २५ नोव्हेंबर, १९८४ रोजी दिल्ली येथे त्यांचा मृत्यू झाला.

मुख्यमंत्री म्हणून यशवंतराव यांनी महाराष्ट्राची सत्ता सूत्रे हाती घेतली तो काळ हा केवळ महाराष्ट्राच्याच नव्हे तर देशाच्या पायाभरणीचा काळ होता. सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक या साऱ्याच अंगांनी नव्या देशाची पायाभरणी सुरू होती. अशा परिस्थितीत महाराष्ट्राची अस्मिता जपून नवे आर्थिक स्त्रोत तयार करणे, सामाजिक उतरंडीत खाली राहिलेल्या वर्गांना नव्या रचनेत समान संधी मिळवून देणे, आधुनिक शिक्षण आणि उद्योग ही जगाची दिशा होती तीच महाराष्ट्राचीही दिशा असेल अशी आखणी करणे हे त्यांचे उद्दिष्ट होते. महात्मा फुले, राजर्षी शाहू, वि. रा. शिंदे यांच्या पुरोगामी आणि मानवतावादी विचारांचे प्रत्यक्ष उपयोजन करण्याची संधी या निमित्ताने त्यांना मिळाली. शेती, शिक्षण व उद्योग ही त्यांच्या शासकीय धोरणाची 'ट्रिनिटी' (Trinity ) होती. महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासाचे त्यांचे तत्त्वज्ञान या त्रिसूत्रीवर आधारित होते.महाराष्ट्राचे शासन चालविताना यशवंतरावांचा दृष्टिकोन नेहमीच पुरोगामी राहिला. गरीब, दलित आणि ग्रामीण जनता डोळ्यांपुढे ठेवून त्यांनी त्यांच्या हिताचे, प्रगतीचे निर्णय घेतले. शेती, शिक्षण, उद्योग आणि सहकार क्षेत्रांना नवीन दिशा देऊन या तिन्ही क्षेत्रांत त्यांनी क्रांतीकारक, सकारात्मक बदल केले व देशात महाराष्ट्राचा बोलबाला केला.

### ४.२.१ कृषी (Agriculture) :

देशाच्या तसेच राज्याच्या विकासाच्या प्रक्रियेत एका बाजूने शेतीची उत्पादकता वाढवणे आवश्यक असते, तर दुसऱ्या बाजूने शेती आणि शेतीस सहाय्यभूत क्षेत्रांच्या राष्ट्रीय उत्पन्नातील हिस्सा कमी होणे अभिप्रेत असते. यशवंतराव चव्हाण १९६० मध्ये महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री झाले, त्यावेळी महाराष्ट्रातील शेतीची परिस्थिती अत्यंत बिकट होती. त्या काळात बहुतांश शेतकऱ्यांची जमीन छोटी आणि तुटपुंजी होती, परिणामी उत्पादन क्षमताही कमी होती. भूसंपादनाच्या अभावामुळे कृषी विकासाला अनेक अडचणी सतावत होत्या. सिंचन प्रकल्पांची कमतरता त्यामुळे पाण्यासाठीच्या अपुऱ्या सुविधा आणि पारंपरिक पद्धतीने शेती करणे यामुळे उत्पादन कमी होत होते. मानवी तसेच पशुधन संसाधनांचा वापरही पूर्ण क्षमतेने केला जात नव्हता. यशवंतराव चव्हाण यांनी आपल्या कारकीर्दीत शेतीच्या विकासासाठी व शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेऊन त्यांची अंमलबजावणी केली. त्यामुळे शेतीच्या आधुनिकीकरणाला सुरुवात झाली.

यशवंतराव चव्हाण हे साहित्यिक आणि बहुश्रुत वाचक होते. त्यांनी विविध विषयांवर प्रदीर्घ वाचन केले होते. द ग्रेट डिप्रेशन, इरिग्रेशन इन इंडिया, ग्रिकल्चर स्टॅटिस्टिक्स ऑम इंडिया, इकॉनॉमिक्स प्रॉब्लेम्स ऑम मॉडर्न इंडिया इ. ग्रंथांचे सखोल वाचन केले होते. त्यातून शेतीसंबंधीचे त्यांचे अभ्यासपूर्ण वाचन, चिंतन आणि मनन झाले होते. महाराष्ट्राच्या कृषी व औद्योगिक धोरणाचा पाया घालताना त्यांना या ज्ञानाचा चांगलाच उपयोग झाला. कृषी व औद्योगिक वाढ परस्परांना पूरक व पोषक ठरेल हे सूत्र त्यांनी या अभ्यासातूनच स्वीकारले आणि ते सत्यातही उतरवले. शेतकरी हाच महाराष्ट्राचा प्राण असून ते महाराष्ट्राचे राज्यकर्ते आहेत अशी यशवंतरावांची पक्की धारणा होती.

◆ **महाराष्ट्राच्या कृषी विकासातील यशवंतराव चव्हाण यांचे योगदान :**

**१. कृषी शिक्षण व आधुनिकीकरण :**

यशवंतराव यांनी प्रथम ग्रामीण भागातील शेतकरी व मुले यांच्या शिक्षणाला प्राधान्य दिले. शेती विषयक ज्ञानाची कवाडे शेती महाविद्यालयाच्या माध्यमातून उपलब्ध करून दिली. पुस्तिका, शेतकरी मेळावे, कृषी चर्चासत्रे, मि ल्ड व्हिजिट्स (क्षेत्र अभ्यास), कार्यशाळा आदी अनौपचारिक शिक्षणाबरोबरच व्यावसायिक शिक्षणापर्यंतचे विविधांगी उपक्रम त्यांनी ठिकठिकाणी सुरू केले. ग्रामीण भागातल्या शेतकरी वर्गासाठी प्रौढ शिक्षणाची व्याप्ती वाढवली तसेच मूलोद्योग शिक्षणाला चालना दिली. अशा प्रकारे शेतीच्या क्षेत्रात शास्त्रीय दृष्टिकोन बाळगणारी पिढी निर्माण करण्याचा प्रयत्न त्यांनी केला.

अकोला येथे कृषी महाविद्यालयाची स्थापना तसेच राहुरी येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठाच्या विद्याशाखा इमारतीचे उद्घाटन त्यांच्या हस्ते झाले. पुढे अकोला कृषी महाविद्यालयाचेच कृषी विद्यापीठात रूपांतर झाले.

**२. दुष्काळ निवारणार्थ कार्य :**

दुष्काळाने कुठलाही शेतकरी आर्थिक संकटात जातो. त्या संकटातून शेतकऱ्याला बाहेर काढण्यासाठी दुष्काळ निर्मूलनाचे महत्त्वाचे काम हाती घेण्याची गरज यशवंतरावांना वाटत होती. सन १९५२-५३ मध्ये महाराष्ट्रात मोठा दुष्काळ पडून अन्नधान्याची टंचाई निर्माण झाली. त्यावेळी तत्कालीन केंद्रीय अन्नमंत्री किडवाई यांनी महाराष्ट्रातील दुष्काळी भागाचा लवकरात लवकर दौरा करावा व अर्थसहाय्य करावे यासाठी त्यांनी सातत्याने पाठपुरावा केला.

**३. कसेल त्याची जमीन :**

सन १९५६ मध्ये राज्यात नवीन कुळ – कायदा लागू करून 'कसेल त्याची जमीन' हे तत्व स्वीकारण्यात आले होते. त्यानुसार मुंबई राज्यातील सर्व कुळांनी त्यांच्याकडे असलेली सर्व जमीन एका विशिष्ट तारखेला म्हणजे १ एप्रिल, १९५७ रोजी खरेदी केलेली आहे असे समजण्यात आले. जमिनीचे कब्जे – हक्क काही अपवाद वगळता कुळांना देण्यात आले. यामुळे महाराष्ट्राच्या शेती – क्षेत्रात जमीन – मालकीच्या क्षेत्रात प्रचंड क्रांती झाली.

**४. तुकडेबंदी – तुकडेजोड :**

सन १९४७ मध्ये मुंबई तुकडेबंदी – तुकडेजोड कायद्याखाली राज्यात अनेक गावांमधून तुकडेजोड करण्यासंबंधीच्या कारवाया सुरू झाल्या होत्या. यशवंतरावांनी या कामाला गती दिली. त्यामुळे सन १९५८ पर्यंत सुमारे १८०० गावांना हा कायदा प्रत्यक्षात लागू झाला. १ एप्रिल, १९५९ पासून हा कायदा संपूर्ण राज्याला लागू झाला. शेतीसाठी जमिनीचे क्षेत्र सलग होण्याच्या दृष्टीने या कायद्याचा सकारात्मक परिणाम झाला.

**५. जमीनधारणेवर मर्यादा विधेयक :**

शेतजमिनीच्या कमाल धारणेवर मर्यादा घालण्याचा (सिलिंग) कायदा करून महाराष्ट्र हा खऱ्या अर्थाने

पुरोगामी असल्याचं देशात सर्वप्रथम प्रत्ययास आणून दिले गेले. जानेवारी १९६१ मध्ये जमीन धारणेवर मर्यादा घालणारे विधेयक मांडले गेले. १६ जून, १९६१ रोजी त्यास राष्ट्रपतीकडून संमती मिळाली. त्यानुसार राज्याचे ७४ विभाग पाडण्यात आले आणि शेतजमीन धारणेवर मर्यादा घालण्यात आली. मर्यादेहून अधिक असणारी जमीन ताब्यात घेऊन विधेयकात नमूद केल्याप्रमाणे अग्रहक्काने ती वाटण्याची तरतूद करण्यात आली. जिरायती जमिनीसाठी स्थानिक क्षेत्रानुसार ८४ ते १५६ एकर ही कमाल मर्यादा ठरली, तर बागायती जमिनीची मर्यादा १६ एकर निश्चित करण्यात आली.

**६. महार वतन पद्धत नष्ट :**

महाराष्ट्रात महार – वतन पद्धतीने महार समाजाचा कमालीचा अध:पात झाला होता. महाराला 'महारकी नावाची बिघा अर्धा बिघा टिचभर जमीन मिळत असे, त्यावरच त्याला आपल्या कुटुंबाची गुजराण करावी लागे. यशवंतरावांनी 'बॉम्बे इन्फिरिअर व्हिलेज वॉन्ट्स अबॉलिशन ॲक्ट १९५८' हा कायदा करून महार वतन पद्धतीला प्रतिबंध घातला. तसेच वतनी जमीन या पूर्ण शेतपट्टीच्या तिप्पट किंमत घेऊन वहिवाटदार मालकांना मालकी हक्काने परत ताब्यात दिल्या.

**७. भूमिहीनांना जमीन वाटप :**

महार वतन पद्धत नष्ट झाली तरी महारांचा व इतर मागासवर्गीयांच्या पोटाचा प्रश्न सुटला नव्हता. खा. दादासाहेब गायकवाड यांनी भूमिहीनांना जमीन दिली पाहिजे यासाठी संघर्ष सुरू केला होता. यशवंतरावांनी ही मागणी न्याय व रास्त मानून भूमीहीनांना जमीन वाटण्याचे काम सुरू केले.

**८. जलसिंचन योजना :**

शेती पिकवण्यासाठी पाणीपुरवठ्याची कायमची व्यवस्था करणे आवश्यक होते. त्यामुळे पाटबंधारे, पाणीपुरवठा, पाण्याची उपलब्धता आणि वीज निर्मिती अशा विविध हेतूने यशवंतरावांनी कामांची आखणी केली.

**(अ) जल–साधनसामग्री संशोधन विभाग (सर्कल)–**

जलविद्युत निर्मितीसाठी योग्य अशी जलसामग्री शोधण्याच्या कामावर लक्ष ठेवण्यासाठी हा विभाग निर्माण करून त्यामध्ये चार उपविभाग तयार केले.

**(ब) इरिगेशन डिव्हिजन –**

विदर्भ व मराठवाड्यातल्या पाटबंधारे यांच्या योजनांसाठी एक इरिगेशन डिव्हिजन व पाच सब डिव्हिजन स्थापन केल्या आणि उपलब्ध पाणीपुरवठ्याच्या सोयींची व्यापक पाहणी करण्यासंबंधीचे हुकूम दिले.

**(क) मुंबई राज्य इरिगेशन बोर्ड –**

शेतीसाठी पाणीपुरवठा करण्याबाबतच्या सर्वसाधारण धोरणासंबंधी व व्यवस्थेसंबंधी सरकारला सल्ला देण्यासाठी 'मुंबई राज्य इरिगेशन बोर्ड' याच काळात अस्तित्वात आले. सार्वजनिक बांधकाम खात्याचे मंत्री हे या बोर्डाचे अध्यक्ष होते. इरिगेशनसाठी ८८.१२ कोटींची तरतूद करण्यात आली.

**(ड) राज्य पाटबंधारे मंडळ –**

आणि जलसंपत्ती याबाबत महाराष्ट्राची संपूर्ण पाहणी करण्याच्या उद्देशाने स. गो. बर्वे यांच्या अध्यक्षतेखाली या मंडळाची स्थापना यशवंतराव यांनी केली. अभ्यासाअंती राज्यातील जास्तीत जास्त २२ ते २५ टक्के जमीन पाण्याखाली येऊ शकेल असे मत समितीने नोंदविले.

**(इ) ऑइल इंजिन आणि पंपिंग सेट्स पुरविणे –**

उपलब्ध असेल तिथून शेतीसाठी पाण्याचा उपसा करण्यासाठी राज्य सरकारने शेतकऱ्यांना ऑइल इंजिन आणि पंपिंग सेट्स पुरवण्याची योजना विदर्भ व मराठवाडा या विभागांना लागू केली. त्यामुळे असलेल्या पाण्याचा शेतीसाठी उपयोग करणे शेतकऱ्यांना सोयीचे ठरले.

**(ई) बंधारे –**

सोलापुरी पद्धतीच्या बंधाऱ्यांना त्यांनी चालना दिली. लहान नद्यांचे ओढा – नाल्यांचे वाहून जाणारे पाणी शेतकऱ्यांच्या जमिनीपर्यंत पोहोचून शेती बागायती होण्यास त्यामुळे मदत झाली.

**९) धरणे व जलविद्युत योजना :**

काही नव्या धरणांची, जलविद्युत योजनेची कामे यशवंतरावांनी आपल्या कारकीर्दीत पूर्ण केली. कोयना जलविद्युत योजनेच्या २०७ फूट उंचीच्या धरणाचा प्रारंभ १ मार्च, १९५८ रोजी यशवंतरावांच्या हस्ते सुरू झाला. महाराष्ट्राच्या आर्थिक उन्नतीत कोयनेचे मोठे योगदान आहे.

सोलापूर व अन्य दुष्काळी भागासाठी वरदान ठरणाऱ्या 'उजनी प्रकल्पाची' सुरुवात याच दरम्यान त्यांनी केली. नीरा नदीवर पीर येथे वीर धरण बांधण्याची योजना त्यांच्याच कारकिर्दीतील आहे. त्यामुळे संपूर्ण निरा खोऱ्याचा कायापालट घडून आला. १७ कोटी ५० लाख रुपये खर्चाच्या पूर्णा प्रकल्पाचा प्रारंभ ही त्यांनीच केला. या प्रकल्पाने मराठवाड्याचा कायापालट झाला. विदर्भातील पारस या ठिकाणी थर्मल पॉवर स्टेशन हा भव्य स्वरूपाचा प्रकल्प त्यांनी आपल्या कारकीर्दीत पूर्ण केला. विदर्भाच्या जीवनाचं आधुनिकीकरण करण्याच्या दिशेने टाकलेलं ते एक महत्त्वाचं पाऊल होत. शेती औद्योगिक प्रगतीस, अप्रत्यक्षपणे महाराष्ट्राच्या प्रगतीस हातभार लावणारी ही महत्त्वाची योजना होती.

**१०. गोवध बंदी विधेयकास विरोध :**

सन १९५३ मध्ये यशवंतराव मुंबई राज्याचे पुरवठा मंत्री असताना हे विधेयक बिल रूपाने विधानसभेत मांडले गेले होते. या विधेयकास सरकारतर्फे विरोध करताना आर्थिक दृष्टिकोनातून गोवध बंदी कशी अव्यवहार्य आहे हे यशवंतरावांनी ठामपणे स्पष्ट केले. या प्रश्नांची जी आर्थिक बाजू आहे तिचा विचार करताना धार्मिक चष्म्यातून या प्रश्नाकडे पाहिले जाऊ नये असे मतही त्यांनी व्यक्त केले. 'दुधासाठी गाय' ही यशवंतरावांची संकल्पना भारतीय कृषी संस्कृतीत आजही मानवी जीवन समृद्ध करणारी आणि पर्यावरण संवर्धनाला बळ देणारी आहे. यातून यशवंतरावांचे पुरोगामीत्व सिद्ध होते.

**११. कृषी प्रदर्शने :**

यशवंतरावांनी हरित क्रांतीवर अधिक भर दिला होता. त्याद्वारे ग्रामीण विकास साध्य करता येतो यावर त्यांचा विश्वास होता. त्यांनी कृषी खात्यातर्फे प्रथम सन १९६० मध्ये जळगाव जिल्ह्यातील पाचोरा या तालुक्याच्या गावी राज्यव्यापी कृषी प्रदर्शन भरविले. त्यानंतर महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांमध्ये कृषी संबंधित उत्पादने व तंत्रविषयक प्रदर्शने भरविण्याची परंपरा सुरू केली.

**१२.वित्तीय सहाय्य :**

यशवंतराव यांनी औद्योगिक शेतीसाठी वित्तीय सहाय्य उपलब्ध करण्यासाठी विविध योजनांचा आरंभ केला. सर्वोच्च बँक व प्राथमिक संस्था, प्रांतिक भूविकास बँक, प्राथमिक भूविकास बँक यासारख्या संस्थामार्फत कर्जपुरवठा करण्याची सोय उपलब्ध करून देण्यात आली. शेती उत्पादनाला उत्तेजन देण्यासाठी अधिक कर्ज पुरवठा करण्याबाबत उपाय योजना करण्यात आली. कृषी बँका आणि सहकारी संस्था यांच्यात सामंजस्याने कर्ज वितरणाचे धोरण तयार केले गेले.

**१३. कृषी औद्योगिक विकासाचे प्रारूप :**

स्वातंत्र्योत्तर काळात तरुण पिढीला रोजगाराचे साधन उपलब्ध करून देण्यासाठी त्यांना स्थानिक पातळीवर काम धंदा मिळवून देणे हे आर्थिक विकासाचे सूत्र असायला हवे हे यशवंतराव जाणून होते. आणि हाच त्यांच्या प्रारूपाचा गाभा होता. त्यांचे कृषी औद्योगिक विकासाचे प्रारूप कृषी मालावर प्रक्रिया करणाऱ्या उपयोगापासून, त्यासाठी लागणारी यंत्रसामग्री उत्पादन करणाऱ्या कारखान्यांचा समावेश करणारे होते. त्यासाठी एकाच वेळी स्थानिक साधनसंपत्ती, स्थानिक मनुष्यबळ, स्थानिक बाजारपेठेची उपलब्धता या घटकांना नियोजन पद्धतीने एकत्र आणणारी व्यवस्था त्यांना अभिप्रेत होती. या प्रारूपामध्ये मध्यमवर्गीय, उद्योजक, शेतकरी, बलुतेदार, कामगार या सर्वांना सारखेच स्थान होते. त्यांचे हे प्रारूप नंतरच्या काळात पंजाब, हरियाणा यासारख्या राज्यांमध्येही राबविले गेले आणि त्या राज्यांचीही प्रगती झाली.

**१४. कृषी उत्पादनाची विपणन व्यवस्था :**

कृषी उत्पादनांना वाजवी दर मिळावा आणि त्याचबरोबर ग्राहकांनाही योग्य किंमतीत उत्पादने मिळावीत या दृष्टीने व्यापारी व दलाल यांची मध्यस्थी नष्ट करण्यासाठी सहकारी किंवा नियंत्रित सहकारी पद्धतीची विपणन व्यवस्था यशवंतरावांच्या काळात स्वीकारली होती. त्यामुळे महाराष्ट्रात कृषी उत्पन्न बाजार समिती, सहकारी विपणन संस्था, राज्य सहकारी खरेदी विक्री संघ, कापूस सहकारी विक्री संघ, भाजीपाला व फळे विक्री सहकारी संघ, ऊस विक्री संघ इत्यादी संस्था अस्तित्वात आल्या. या संस्थांच्या माध्यमातून खरेदी विक्री चालू झाली.

**१५. कृषी आधारित उद्योगांना प्रोत्साहन :**

**फळप्रक्रिया उद्योग :** त्यांनी फळप्रक्रिया उद्योगांना विशेष प्रोत्साहन दिले, ज्यामुळे फळउत्पादक शेतकऱ्यांना योग्य बाजारपेठ मिळाली.

**ग्रामीण उद्योग :** ग्रामीण भागात शेतीवर आधारित लघु आणि कुटीर उद्योगांच्या विकासावर त्यांनी भर दिला.

**कृषी निर्यात :** शेतमालाच्या निर्यातीला प्रोत्साहन देण्यासाठी त्यांनी विशेष धोरणे आखली.

**१६. कृषी औद्योगीकरण :**

यशवंतरावानी कृषी – औद्योगीकरण समाज निर्माण करण्याचा अभिनव मंत्र महाराष्ट्रात दिला. शेती आणि उद्योग यांची सांगड घालून नवा सक्षम समाज निर्माण करून, विकासाचे उद्दिष्ट साधता येईल अशी त्यांची खात्री होती. या विचारामागे राज्य शासनाची ताकद उभी करण्याचा त्यांनी निर्णय घेतला. अल्पावधीतच शेती आणि उद्योगांना पुरेपूर न्याय देणारा स्वावलंबी सक्षम असा नवसमाज निर्माण करण्याची किमया यशवंतराव यांनी साधली.

शेतीसाठी पाणीपुरवठ्याच्या योजना, कमाल जमीन धारणा कायदा, दुग्धोत्पादकांच्या व दूध पुरवठा करणाऱ्यांच्या संघटना इत्यादी द्वारे त्यांनी ग्रामीण औद्योगीकरणाचा पाया घातला. अशाप्रकारे शहर व खेडी यांच्यातील अंतर कमी करणारे, शेतकऱ्यांना आधुनिक बनविणारे आणि त्यांचा सर्वांगीण विकास साधणारे कृषी औद्योगिक धोरण यशवंतराव यांनी अंमलात आणले व कृषी औद्योगिक समाजाची बांधणी केली.

यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्राच्या शेती क्षेत्रात केलेले कार्य अतुलनीय आहे. त्यांच्या दूरदृष्टीने राज्याच्या शेती आणि ग्रामीण विकासाचा पाया रचला. सहकारी चळवळ, जमीन सुधारणा, सिंचन प्रकल्प आणि कृषी शिक्षण या क्षेत्रातील त्यांच्या योगदानामुळे महाराष्ट्राची कृषी अर्थव्यवस्था बळकट झाली. अनेक दशकांनंतरही त्यांच्या विचारांचा प्रभाव महाराष्ट्राच्या कृषी धोरणांवर दिसून येतो. त्यांनी शेतकरी कल्याणासाठी केलेले कार्य आजही प्रेरणादायी आहे आणि आधुनिक शेती धोरणांसाठी मार्गदर्शक तत्त्वे म्हणून काम करते.

**स्वाध्याय – १**

**(अ) योग्य पर्याय निवडून रिकाम्या जागा भरा.**

१. मुख्यमंत्री यशवंतराव यांचा जन्म सांगली जिल्ह्यातील ..... येथे झाला.

अ) देवराष्ट्रे ब) मिरज

क) ताकारी ड) वाळवा

२. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्राचे ..... मुख्यमंत्री होते.

अ) चौथे ब) तिसरे

क) दुसरे ड) पहिले

३. सन ..... मध्ये राज्यात नवीन कुळ-कायदा लागू करून 'कसेल त्याची जमीन' हे तत्व स्वीकारण्यात आले.

अ) १९५२ ब)१९५३

क) १९५५ ड) १९५६

४. शेती, शिक्षण व उद्योग ही ..... यांच्या शासकीय धोरणाची 'ट्रिनिटी' (Trinity ) होती.

अ) यशवंतराव चव्हाण ब) शरद पवार

क) विलासराव पाटील ड) वसंतदादा पाटील

५. राहुरी येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठाच्या विद्याशाखा इमारतीचे उद्घाटन ..... यांच्या हस्ते झाले.

अ) वसंतदादा पाटील ब) यशवंतराव चव्हाण

क) वसंतराव नाईक ड) शरद पवार

६. तुकडेबंदी – तुकडेजोड हा कायदा १ एप्रिल, ..... पासून हा कायदा संपूर्ण राज्याला लागू झाला.

अ) १९५६ ब) १९५७

क) १९५८ ड) १९५९

७. यशवंतराव चव्हाण यांनी कृषी खात्यातर्फे प्रथम सन १९६० मध्ये ..... जिल्ह्यातील पाचोरा या तालुक्याच्या गावी राज्यव्यापी कृषी प्रदर्शन भरविले.

अ) उस्मानाबाद ब) अकोला

क) जळगाव ड) कोल्हापूर

८. स. गो. बर्वे यांच्या अध्यक्षतेखाली ..... मंडळाची स्थापना यशवंतराव चव्हाण यांनी केली.

अ) राज्य पाटबंधारे ब) राज्य शिक्षण

क) राज्य आरोग्य ड) यापैकी नाही

९. सन ..... मध्ये गोवध बंदी विधेयक बिल विधानसभेत मांडले गेले होते.

अ) १९५१ ब) १९५२

क) १९५३ ड) १९५४

१०. शेतजमिनीच्या कमाल धारणेवर मर्यादा घालण्याचा (सिलिंग) कायदा सर्वप्रथम ..... या राज्यात करण्यात आला.

अ) पंजाब ब) बंगाल

क) कर्नाटक ड) महाराष्ट्र

**(ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. कृषी – औद्योगीकरण समाज निर्माण करण्याचा अभिनव मंत्र महाराष्ट्राला कोणी दिला?

२. यशवंतराव चव्हाण यांनी कोणत्या भागासाठी वरदान ठरणाऱ्या उजनी प्रकल्पाची सुरुवात केली

३. 'मुंबई राज्य इरिगेशन बोर्ड' कशासाठी अस्तित्वात आले?

४. महाराष्ट्रात महार वतन पद्धत कोणी नष्ट केली?

५. महाराष्ट्रात भूमिहीनांना जमीन दिली पाहिजे यासाठी कोणी संघर्ष सुरू केला?

### ४.२.२ शिक्षण (Education) :

स्वातंत्र्यपूर्व काळात उत्तम शेती, मध्यम व्यापार व कनिष्ठ नोकरी अशी समाजाची धारणा होती. विविध गैरसमजुतींमुळे समाजाचा शैक्षणिक दृष्टिकोन फारसा सकारात्मक नव्हता. त्या काळात अगदी चार वर्ग शिकले तरी तलाठी, प्राथमिक शिक्षक अशा नोकऱ्या सहज मिळत म्हणून प्राथमिक शिक्षणाच्या पुढे शिक्षण घेण्याची फारशी गरज नाही अशी समाजाची पक्की धारणा होती. यशवंतराव यांचा शिक्षणाबाबतचा विचार सर्वांगीण विकासाचा होता. तसेच व्यक्ती, समाज व राष्ट्राच्या सर्वांगीण विकासासाठी राष्ट्रीय एकात्मता, मानवी मूल्ये, सामाजिक एकात्मता रुजविण्यासाठी शिक्षणाचे महत्त्व त्यांच्या लक्षात आले होते. म्हणूनच प्राथमिक शिक्षणापासून ते विद्यापीठीय शिक्षणापर्यंतच्या सुधारणा महाराष्ट्रात त्यांनी घडवून आणल्या.

शिक्षित व्यक्तीला स्वतःच्या भोवती घडणाऱ्या गोष्टी आणि जगामध्ये घडणाऱ्या इतर गोष्टी यांची ज्यामुळे काही संगती लावता येते, त्याचा योग्य अर्थ समजावून घेता येतो आणि त्याचा परिणाम आपल्या जीवनावर काय घडतो, आपल्या व्यक्तिमत्त्वावर काय घडतो हे समजावून घेता येते आणि समजावून देता येते त्याला मी शिक्षण मानत आलो आहे. अशी शिक्षणाची साधी सोपी व्याख्या यशवंतराव यांनी केली होती. शिक्षण ही व्यक्तिगत आणि सामाजिक गरज असली तरी ते आर्थिक विकासाचे मूलभूत साधन आहे, मनुष्यबळाला शिक्षणाची जोड दिल्याशिवाय समाजात नवे सामर्थ्य निर्माण होणार नाही. शिक्षणाची बिजली मनुष्यबळाच्या साधन संपत्ती जवळ घेऊन जाणे ही काळाची गरज असल्याचे त्यांचे म्हणणे होते. शिक्षणाची ही अनिवार्यता लक्षात घेऊन राष्ट्र विकासाच्या इतर योजनांबरोबरच शिक्षणाचा कार्यक्रम राबविणे त्यांना महत्त्वाचे वाटत होते. मुंबई राज्याचे व नंतर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाल्यानंतर बहुजन समाजाच्या शिक्षणासाठी सरकार म्हणून आपणास काय करता येऊ शकेल याचा सर्वांगीण विचार त्यांनी केला होता. विविध व्याख्याने, सभागृहात केलेल्या चर्चेतून व मंत्रिमंडळांच्या बैठकीतून शिक्षणाबद्दलचे विचार आणि कृती कार्यक्रम त्यांनी सातत्याने मांडले होते.

**महाराष्ट्राच्या शैक्षणिक विकासातील यशवंतराव चव्हाण यांचे योगदान :**

**१. प्राथमिक शिक्षण :**

प्राथमिक शिक्षण हे मूलभूत स्वरूपाचे असून व्यक्ती विकासाचा तो पाया असतो. हे शिक्षण सक्तीचे व मोफत असावे असे घटनेमध्ये स्पष्ट नमूद केले आहे. प्राथमिक शिक्षण हे तळागाळातील सर्वदूर पसरलेल्या ग्रामीण भागातील पिढ्यान पिढ्या शिक्षणापासून वंचित राहिलेल्या बहुजन समाजाला उपलब्ध करून देता आले तरच भारतात लोकशाहीची पाळेमुळे खोलवर रुजतील अशी यशवंतरावांची प्रामाणिक धारणा होती. महाराष्ट्राचा राजकीय, सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक विकास होण्यासाठी सर्वत्र प्राथमिक शिक्षणाचा प्रसार होणे आवश्यक आहे हे त्यांच्या शैक्षणिक विचाराचे सूत्र होते. पुढे कोठारी आयोगाने देखील याच भूमिकेचा विचार केल्याचे दिसून येते. समाजातील कोणतीही व्यक्ती शिक्षणापासून वंचित राहू नये यासाठी यशवंतरावांनी काही ठोस निर्णय घेतले. त्यातील काही बाबी पुढीलप्रमाणे

१. गाव तेथे प्राथमिक शाळा असावी.

२. प्राथमिक शाळेच्या इमारती स्वतंत्र बांधण्यात याव्यात.

३. मोफत व सक्तीचे शिक्षण देण्यात यावे.

४. शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी प्राथमिक शिक्षकांना प्रशिक्षण देण्यात यावे. त्यामुळे शिक्षकांचे समाजातील स्थान, महत्व व दर्जा उंचावण्यास मदत होईल.

मुंबई राज्याची दुसरी पंचवार्षिक योजना १४६.३१ कोटी खर्चाची असून उद्योग, दळणवळण, शेती, समाज विकास याचबरोबर शिक्षणावरही मोठ्या खर्चाची तरतूद करण्यात आली. पश्चिम महाराष्ट्रातल्या जिल्हा लोकल बोर्डाने प्राथमिक शाळा गावोगावी उघडल्या. मराठवाडा व विदर्भातही प्राथमिक शाळा मोठ्या संख्येने उघडण्याचा कार्यक्रम हाती घेण्यात आला. जिल्हा व तालुका शिक्षण मंडळामार्फत व्हॉलंटरी शाळा उघडून त्या माध्यमातून छोटी गावे, वाड्या, वस्त्या, पाडे इत्यादी ठिकाणी प्राथमिक शिक्षणाची सोय उपलब्ध करून देण्यात आली. सन १९६२ मध्ये स्थापन झालेल्या जिल्हा परिषद व पंचायत समित्यांनी या कामाला मोठी गती दिली. पंचायतराजची स्थापना झाल्यावर प्राथमिक शिक्षणाची जबाबदारी शहरी भागात नगरपालिका, नगरपरिषद, महानगरपालिका यांच्याकडे सोपविण्यात आली. ग्रामीण भागातही प्राथमिक शिक्षणाचा वेग वाढला. गाव तिथे प्राथमिक शाळा स्थापन होऊन महाराष्ट्रात शिक्षण प्रसाराचे कार्य प्रचंड प्रमाणात वाढले. त्यामागे यशवंतरावांच्या विचारांच्या प्रेरणा होत्या.

**२. माध्यमिक शिक्षण :**

प्राथमिक व उच्च शिक्षण यांना जोडणारा दुवा म्हणजे माध्यमिक शिक्षण होय. शिक्षणातील एक महत्त्वाचा टप्पा असलेल्या माध्यमिक शिक्षणाच्या सोयी व सवलती जनसामान्यांना उपलब्ध करून देणे आवश्यक आहे असा यशवंतरावांचा आग्रह होता. माध्यमिक शिक्षण हे अर्थपूर्ण व सर्वस्पर्शी असावे, समाजाच्या आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रातील अनेक प्रश्नांचा त्यात विचार असावा अशी त्यांची अपेक्षा होती. म्हणूनच माध्यमिक शिक्षणाच्या प्रसारासाठी त्यांनी पुढील निर्णय घेतले.

१. ग्रामीण भागातील अधिकाधिक विद्यार्थ्यांना माध्यमिक शिक्षणाची संधी प्राप्त व्हावी म्हणून खाजगी शिक्षण संस्थानांही शाळा उघडण्याची परवानगी देण्यात आली.

२. शिक्षण संस्थांना सरकारी अनुदान देण्याची योजना अंमलात आणली.

३. माध्यमिक शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी ७ मार्च, १९६० रोजी स्वतंत्र बोर्डाची स्थापना केली.

४. माध्यमिक शिक्षणात तांत्रिक शिक्षणाची सोय निर्माण करून शिक्षणात विविधता आणली.

५. शाळांमधून इंग्रजी विषय शिकवण्याबाबतचा सरकारचा नवा निर्णय यशवंतराव यांनी जारी केला.

इयत्ता पाचवीपासून इंग्रजी हा ऐच्छिक विषय म्हणून शिकवण्यात यावा असा त्यांनी निर्णय घेतला. ग्रामीण भागातल्या विद्यार्थ्यांना इंग्रजी शिकवण्याचे नाकारले जाणार नाही याची काळजीही त्यांनी घेतली. इयत्ता पाचवी ते सातवी पर्यंत ऐच्छिक विषयाच्या आधारावर इंग्रजी शिक्षण देण्याविषयी सरकारचा निर्णय अंमलात आणण्याच्या दृष्टीने त्यांनी एक समितीही नियुक्त केली.

**३. उच्च शिक्षण :**

मानवी मूल्यांची जपणूक करणे, बौद्धिक विकास साधणे यासाठी उच्च शिक्षणाचे महत्त्व आहे. उच्च

शिक्षण हा शिक्षणाचा तिसरा टप्पा असून तो प्रगल्भ होणे आवश्यक आहे, असे यशवंतरावांचे स्पष्ट मत होते. त्यांनी उच्च शिक्षणाकडे जाणीवपूर्वक लक्ष दिले त्यांच्या कारकीर्दीत पुढील प्रमाणे निर्णय घेण्यात आले.

१. औरंगाबाद, कराड व नागपूर येथे अभियांत्रिकी महाविद्यालये सुरू करण्यात आली.

२. सांगली, बार्शी, पंढरपूर, वेंगुर्ले, उरण, इस्लामपूर, वाई या ठिकाणी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालये सुरू करण्यात आली.

३. औरंगाबाद येथे स्वतंत्र वैद्यकीय महाविद्यालयाची स्थापना करण्यात आली.

**४. विद्यापीठीय शिक्षण :**

इंग्रज सरकारने सन १८५७ मध्ये भारतात मद्रास, मुंबई, कलकत्ता येथे विद्यापीठांची स्थापना केली. विद्यापीठीय शिक्षणातून सत्याचा शोध घेणे, बौद्धिक विकास साधणे, बौद्धिक भांडवलाचा विकास करणे आवश्यक आहे. या अर्थाने विद्यापीठीय शिक्षण महत्त्वाचे मानले जाते. विद्यापीठीय शिक्षणाचे हे महत्व ओळखून यशवंतरावांनी पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ, मराठवाडा आणि कोकण विभागातील शिक्षण संस्था चालकांच्या संपर्कात राहून कृषी, उद्योग, व्यवस्थापन, कायदा, कला, विज्ञान, वाणिज्य, सहकार इत्यादी प्रकारच्या शिक्षण व प्रशिक्षण संस्था सुरू करण्यास प्रोत्साहन दिले. ज्यांनी संस्था सुरू केल्या होत्या, त्यांना सहकार्य व मदत केली. त्यामुळे त्यांच्या काळात केवळ महाविद्यालयेच स्थापन झाली नाहीत तर विद्यापीठांची स्थापना देखील झाली. यशवंतरावांची 'बौद्धिक व्यवस्थापन' करण्याची हातोटी वाखाणण्याजोगी होती.

**(अ) मराठवाडा विद्यापीठ :**

हैदराबादच्या जुलमी राजवटीत भरडल्या गेलेल्या मराठवाड्याची फारशी प्रगती झाली नव्हती. मराठवाडा आर्थिक, औद्योगिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास राहिला होता. तेथील मुलांना उच्च शिक्षणाची संधी प्राप्त व्हावी यासाठी तिथे विद्यापीठ स्थापन करण्याचे यशवंतराव यांनी ठरवले. परंतु विद्यापीठ स्थापन करण्यासाठी किमान ६० महाविद्यालयांची आवश्यकता होती. या समस्येवर तोडगा काढण्यासाठी यशवंतरावांनी जस्टीस एस. एम. पळणीटकर यांच्या अध्यक्षतेखाली नऊ सदस्यांची समिती नियुक्ती केली. विद्यापीठाचे स्वरूप, विस्तार, कार्यक्षेत्र व खर्चाचा अंदाज यांसह या समितीने अहवाल सरकारला सादर केल्यानंतर २३ ऑगस्ट,१९५८ रोजी पंतप्रधान पंडित नेहरू यांच्या हस्ते मराठवाडा विद्यापीठाची स्थापना झाली. पुढील काळात मराठवाड्याचा झपाटाने झालेल्या शैक्षणिक विकासाचा पाया या विद्यापीठाने घातला आहे.

**(ब) शिवाजी विद्यापीठ :**

पश्चिम महाराष्ट्रात उच्च शिक्षणाचा प्रसार होण्यासाठी कोल्हापूर येथे शिवाजी विद्यापीठाची केलेली स्थापना हा यशवंतरावांचा एक महत्त्वाचा निर्णय होय. या योजनेसाठी त्यांनी ५० लाखांची तरतूद केली. राष्ट्रपती डॉक्टर राधाकृष्णन यांच्या हस्ते १८ नोव्हेंबर, १९६२ रोजी शिवाजी विद्यापीठाची स्थापना झाली. या विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील शेकडो महाविद्यालयांतून लाखो युवा वर्ग अनेक विद्याशाखांचे शिक्षण घेत आहे. त्यांच्यामुळेच विद्यापीठीय शिक्षण सर्वांसाठी खुले होऊन गरीब शेतकऱ्यांची मुले उच्च शिक्षण घेऊ लागली.

**५. ग्रामीण शिक्षण :**

महाराष्ट्रातील ग्रामीण जनता शैक्षणिक चळवळीच्या प्रवाहात आणण्यासाठी यशवंतरावांनी शिक्षणाचे सार्वत्रिकरण व बहुजनीकरण करण्याचा प्रस्ताव मांडला. ग्रामीण भागासाठी केवळ मोफत शिक्षणाची सोय करून चालणार नाही हे लक्षात घेऊन त्यांनी खाजगी शिक्षण संस्था सुरू करण्यास सढळ हाताने मदत केली. त्या त्या भागातील मुला मुलींना शिक्षण उपलब्ध करून देण्यासाठी खाजगी शिक्षण संस्थांना उत्तेजन दिले. खेड्यापाड्यातून शाळा महाविद्यालये यांना परवानगी देण्याचे धोरण प्रभावीपणे राबविले.

ग्रामीण भागात त्यांनी पुढील कृती कार्यक्रम घोषित केला.

१. माध्यमिक शिक्षणात व्यावसायिक शिक्षणावर भर.

२. हुशार विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी शिष्यवृत्ती

३. ग्रामीण भागातील मुला-मुलींना शिक्षणासाठी ई. बी. सी. सवलत

४. कृषी, तंत्रशिक्षण यावर भर

**६. कृषी शिक्षण :**

यशवंतरावांनी कृषी शिक्षणालाही महत्त्व दिले होते. उच्च शिक्षण देताना शेतीच्या शिक्षणाची गरज त्यांना जाणवली होती. मागासलेल्या शेतीत सुधारणा घडवून आणायची असेल तर शेतीच्या शास्त्रीय शिक्षणाचा दृष्टिकोन लोकांमध्ये निर्माण झाला पाहिजे असा त्यांचा आग्रह होता. अकोला व परभणी येथील कृषी महाविद्यालये त्यांच्याच काळात स्थापन करण्यात आली.

आरे दुग्धालय डेअरी टेक्नॉलॉजी संस्थेमध्ये भारतीय दुग्धालय डिप्लोमा अभ्यासक्रम त्यांच्या कारकीर्दीत सुरू करण्यात आला. संयुक्त राष्ट्रसंघाच्या अन्न व कृषी संघटनेच्या विद्यमाने डेन्मार्क सरकार आणि भारत सरकार यांनी संयुक्तरीत्या पुरस्कारलेल्या दुधाच्या धंद्याबाबतचा दुसरा शिक्षण वर्गही त्यांनी आरे दूधवाडीत आणला.

**७. आदिवासी शिक्षण :**

यशवंतरावांचा शैक्षणिक दृष्टिकोन व्यापक, सर्वस्पर्शी व काळाच्याही पुढे जाणारा होता. आदिवासी मुलांना शिक्षण मिळावे परंतु त्यांच्या मनावर शहरी कल्पनांचा पगडा बसून स्वतःच्या जीवनाविषयी व संस्कृती विषयी त्यांच्या मनात न्यूनगंड निर्माण होऊ नये यासाठी ते प्रयत्नरत होते. आदिवासी मुलांना शहरी शाळेत आणण्याऐवजी त्यांच्या दारीच शैक्षणिक सोयी नेऊन पोहोचवाव्यात या कल्पनेतून आश्रमशाळांची योजना साकार झाली. आश्रमशाळांच्या रूपाने आदिवासीच्या दारापर्यंत शिक्षणाची सुविधा पोहोचविण्याचे उल्लेखनीय कार्य यशवंतराव यांनी केले.

**८. विधी शिक्षण :**

यशवंतरावांनी स्वतः वकिलीची पदवी मिळवली होती. सर्वसामान्य शिक्षणाबरोबरच कायद्याचे शिक्षण देणे त्यांना गरजेचे वाटत होते. आपल्या भाषणांतून त्यांनी वेळोवेळी कायद्याच्या शिक्षणाची आवश्यकता व्यक्त केली होती.

**९. तांत्रिक शिक्षण :**

राष्ट्राला स्वावलंबी बनविण्याचे प्रभावी साधन म्हणजे तांत्रिक शिक्षण होय, ही यशवंतरावांची भूमिका होती. सन १९५५ पर्यंत देशात तांत्रिक शिक्षणाचे पदवीधर अभ्यासक्रमात अस्तित्व नव्हते. यशवंतरावांनी आपल्या मुख्यमंत्रीपदाच्या काळात तांत्रिक शिक्षणाकडे लक्ष दिले व वेळोवेळी त्याबाबत आपले विचार स्पष्ट केले. तांत्रिक शिक्षणाच्या प्रगतीसाठी प्रत्येक जिल्ह्यात एक तरी पॉलिटेक्निक व इंजिनिअरिंग कॉलेज असावे अशी व्यवस्था त्यांनी केली. त्यांच्या दूरगामी धोरणामुळेच आज ग्रामीण व आदिवासी भागातील विद्यार्थी अभियांत्रिकी वैद्यकीय आणि तंत्रविषयक क्षेत्रात नाम कमवीत आहेत.

**१०. स्त्री शिक्षण :**

महात्मा फुले, शाहू, महर्षी कर्वे इत्यादींचा वैचारिक प्रभाव यशवंतराव यांच्यावर असल्याने स्त्री शिक्षणाचे महत्त्व त्यांनी ओळखले होते. स्त्रियांचे प्रश्न, कौटुंबिक समस्या, वैचारिक अपरिपक्वता, स्वयंनिर्णय इत्यादी समस्यांची सोडवणूक शिक्षणाद्वारे होऊ शकते हे त्यांनी जाणले होते. महाराष्ट्रात माध्यमिक आणि उच्च शिक्षणासाठी स्वतंत्र शाळा, महाविद्यालये होती. यशवंतरावांनी मुलींना मोफत गणवेश, शिष्यवृत्ती ई. सुविधा दिल्या. तसेच मुलींच्या मानसिक, शारीरिक आणि सामाजिक जडणघडणीसाठी मुलींच्या शाळा आणि विद्यापीठांच्या स्थापनेसाठी मंजुरी दिली.

**११. सैनिक स्कूलची स्थापना :**

सातारा येथील सैनिक स्कूलची स्थापना हे यशवंतरावांचे सैनिकी शिक्षण क्षेत्रातील एक चिरंजीव कार्य होय. ग्रामीण भागातील बहुजन समाजातील विद्यार्थी देशाच्या सैन्यदलात सहभागी व्हावेत त्यासाठी त्यांना सैनिकी शिक्षण मिळावे या हेतूने सातारा येथे सैनिक स्कूल सुरू करून नॅशनल डिफेन्स अकादमीसाठी शिक्षण मिळण्याची व्यवस्था त्यांनी केली. भारतातील अशा प्रकारचे हे पहिले सैनिक स्कूल ठरले. २३ जून, १९६१ रोजी तत्कालीन भारताचे संरक्षण मंत्री कृष्णमेनन यांच्या हस्ते सैनिक स्कूलची स्थापना झाली. या शाळेमध्ये माजी सैनिकांच्या मुलांसाठी १० जागा राखून ठेवण्याची तरतूदही करण्यात आली. या सैनिक शाळेमुळे महाराष्ट्रातील अनेक तरुण भारतीय संरक्षण दलात नौदल, हवाई दल येथे अधिकारी झाले.

**१२. ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी मोफत शिक्षणाचा क्रांतिकारी निर्णय :**

शिक्षणाची गंगा खेडापाड्यातील गोरगरिबांच्या दारापर्यंत पोहोचली पाहिजे यासाठी यशवंतरावांनी विशेष प्रयत्न केले. मुख्यमंत्री होताच सन १९५९ मध्ये त्यांनी वार्षिक ९०० रुपये व त्याहून कमी उत्पन्न असलेल्या पालकांच्या मुलांना प्राथमिक ते विद्यापीठीय शिक्षण मोफत देण्याची योजना मंत्रिमंडळात मांडली व आग्रहाने मंजूर करून घेतली. आर्थिकदृष्ट्या मागास विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण देण्याची सवलत मंजूर झाली हा शैक्षणिक क्षेत्रातील त्यांचा क्रांतिकारी निर्णय होय. पुढे त्यांच्याच काळात वार्षिक १२०० रुपये व त्याहून कमी उत्पन्न असलेल्या पालकांच्या मुलांना मोफत शिक्षण देण्याची योजनाही मंजूर झाली. त्यामुळे शिक्षणाची दारे सर्वांसाठी उघडी झाली. परिणामी महाराष्ट्रात एक आगळी क्रांती घडून शिक्षणाचा प्रसार मोठ्या प्रमाणात झाला. शैक्षणिक क्षेत्रात असा क्रांतिकारी निर्णय घेणारे मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण हे पहिले मुख्यमंत्री होते तर, अशा निर्णयाची अंमलबजावणी करणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य होते.

**१३. लोकभाषा ही ज्ञानभाषा :**

विद्यापीठीय शिक्षण हे सर्वांना मिळायचे असेल तर माध्यम मातृभाषा असावी असा यशवंतरावंचा आग्रह होता. महाराष्ट्रातील विद्यापीठांनी उच्च शिक्षणाचे माध्यम म्हणून मराठीचा अवलंब करण्याच्या दृष्टीने पावले उचलावीत अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली होती. ज्ञानभाषा ही लोकभाषेपेक्षा भिन्न असेल तर बहुजन समाज शिक्षणापासून वंचित राहील हे त्यांनी ओळखले होते. म्हणूनच त्यांनी प्रयत्न करून शिक्षणाचे माध्यम मराठी केले. मातृभाषेबरोबरच हिंदी आणि इंग्रजीची आवश्यकताही त्यांनी व्यक्त केली होती.

**१४. यशवंतराव व रयत शिक्षण संस्था :**

यशवंतराव कर्मवीर अण्णानंतर रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष झाले. सामाजिक परिवर्तनाचे माध्यम म्हणजे शिक्षण, या विचारातून त्यांनी रयत शिक्षण संस्थेची धुरा अखेरपर्यंत सांभाळली. सन १९५८- ५९ मध्ये रयत शिक्षण संस्थेच्या सुवर्ण महोत्सवावेळी त्यांनी शासनाच्या वतीने दोन लाख रुपये देणगी दिली.

**१५. कराडचा शैक्षणिक विकास :**

यशवंतरावांनी आपली मातृभूमी कराडमध्ये श्री शिवाजी शिक्षण संस्था स्थापन करून कराड, मसूर, पाटण अशा ठिकाणी माध्यमिक विद्यालये सुरू केली. सायन्स कॉलेजही सुरू केले. तसेच गव्हर्मेंट पॉलिटेक्निक कॉलेज सुरू केले. अशा प्रकारे कराड नगरीचा शैक्षणिक चेहरा बदलण्याचे व त्यास आधुनिक तंत्रवैज्ञानिक रूप प्राप्त करून देण्याचे काम यशवंतरावांनी केले.

यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री म्हणून शैक्षणिक क्षेत्रात क्रांतिकारी योगदान दिले. त्यांनी ग्रामीण भागात शिक्षणाचा प्रसार केला. नवीन वैद्यकीय, अभियांत्रिकी महाविद्यालये आणि कृषी विद्यापीठे स्थापन करून उच्च शिक्षणाचा पाया मजबूत केला. मागासवर्गीय विद्यार्थी आणि मुलींसाठी शिष्यवृत्ती योजना आणि विशेष सुविधा उपलब्ध करून दिल्या. त्यांच्या दूरदृष्टीमुळे महाराष्ट्र आज शैक्षणिक क्षेत्रात अग्रगण्य आहे.

**स्वाध्याय – २**

**(अ) योग्य पर्याय निवडून रिकाम्या जागा भरा.**

१. ..... शिक्षण सक्तीचे व मोफत असावे असे घटनेमध्ये स्पष्ट नमूद केले आहे.

अ) प्राथमिक ब) माध्यमिक

क) उच्च माध्यमिक ड) विद्यापीठीय

२. महाराष्ट्रात ७ मार्च, ..... रोजी स्वतंत्र SSC बोर्डाची स्थापना करण्यात आली.

अ) १९६० ब) १९६२

क) १९६४ ड) १९६६

३. यशवंतराव चव्हाण मुख्यमंत्री असताना ..... येथे स्वतंत्र वैद्यकीय महाविद्यालयाची स्थापना करण्यात आली.

अ) मुंबई ब) कराड

क) नागपूर ड)औरंगाबाद

४. २३ ऑगस्ट,१९५८ रोजी पंतप्रधान ..... यांच्या हस्ते मराठवाडा विद्यापीठाची स्थापना झाली.

अ) डॉ. राजेंद्र प्रसाद ब) पंडित नेहरू

क) इंदिरा गांधी ड) यापैकी नाही

५. सातारा येथील ..... स्कूलची स्थापना हे मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांचे शिक्षण क्षेत्रातील एक चिरंजीव कार्य होय.

अ) प्राथमिक ब) माध्यमिक

क) सैनिक ड) यापैकी नाही

६. ..... माध्यमातून आदिवासीच्या दारापर्यंत शिक्षणाची सुविधा पोहोचविण्याचे उल्लेखनीय कार्य मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी केले.

अ) आश्रमशाळांच्या ब) रात्रशाळांच्या

क) कुरणशाळांच्या ड) साखरशाळांच्या

७. यशवंतराव चव्हाण यांनी ..... भागातील मुला-मुलींना शिक्षणासाठी ई.बी.सी. सवलत सुरू केली.

अ) नागरी ब) आदिवासी

क) ग्रामीण ड) यापैकी नाही

८. कर्मवीर अण्णानंतर यशवंतराव चव्हाण हे ..... शिक्षण संस्थेचे अध्यक्ष झाले.

अ) रयत ब) शिवाजी

क) कोयना ड) शाहू

९. महाराष्ट्रातील विद्यापीठांतील उच्च शिक्षणाचे माध्यम म्हणून ..... अवलंब यशवंतराव चव्हाण यांनी केला.

अ) हिंदीचा ब) मराठीचा

क) इंग्रजीचा ड) यापैकी नाही

१०. महाराष्ट्रात ..... येथे शिवाजी विद्यापीठाची स्थापना करण्यात आली.

अ) सोलापूर ब) कोल्हापूर

क) मलकापूर ड) नागपूर

**(ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. गाव तेथे प्राथमिक शाळा हा निर्णय कोणी घेतला?

२. शिवाजी विद्यापीठाची स्थापना केव्हा झाली?

३. वार्षिक १२०० रुपये व त्याहून कमी उत्पन्न असलेल्या पालकांच्या मुलांना मोफत शिक्षण देण्याची योजनाही कोणत्या मुख्यमंत्र्यांच्या काळात मंजूर झाली?

४. विद्यापीठीय शिक्षण हे सर्वांना मिळायचे असेल तर माध्यम मातृभाषा असावी असा आग्रह कोणाचा होता?

५. यशवंतरावांनी आपली मातृभूमी कराडमध्ये कोणत्या शिक्षण संस्थेची स्थापना केली?

### ४.२.३ उद्योगक्षेत्र (Industry) :

महाराष्ट्र राज्याची राजधानी मुंबई औद्योगिकदृष्ट्या पुढारलेली असली तरी तिच्या लगतचे फार मोठे क्षेत्र वर्षानुवर्षे अविकसित अवस्थेत राहिले होते. त्याकाळी मुंबई प्रदेशात विशिष्ट जाती जमातींचे उद्योगधंद्यात वर्चस्व होते. राज्याच्या एकूण क्षेत्रात औद्योगीकरणाबाबत विरोधाभासाची परिस्थिती होती. हा विरोधाभास दूर करण्यासाठी यशवंतराव यांनी राज्याच्या औद्योगीकरणावर भर देण्याचे निश्चित केले.

यशवंतराव यांनी मराठी तरुणांनी स्वतः उद्योगधंदे सुरू करावेत यासाठी तंत्रशिक्षणाच्या सोयी उपलब्ध करून दिल्या. त्यांनी शेती आणि उद्योगधंदे यांची सांगड घालण्याचा तसेच शेतीतून कच्च्या मालाचे पक्क्या मालात रूपांतर करणारे उद्योगधंदे सुरू करण्याचा विचार समाजाच्या तळापर्यंत पोहोचवला.

शेती हा ग्रामीण विकासाचा गाभा असल्यामुळे त्या गाभ्याभोवती छोट्या उद्योगधंद्यांची इमारत उभारण्यावर त्यांनी भर दिला. शेतीला उद्योगधंद्यांची जोड दिल्यानंतर या कार्यक्रमाला गती आणण्यासाठी ग्रामीण विद्युतीकरणाला प्राधान्य देणारे उद्योग विकास कार्यक्रमाचे वेळापत्रक त्यांनी तयार केले.

औद्योगीकरण आणि जमीन सुधारणा क्षेत्रात उत्पादन कार्याला चालना मिळेल अशा रीतीने धोरण तयार करणे आणि त्याबरोबर सर्वांना समान न्याय मिळवून देणे हे यशवंतराव यांनी आपले कर्तव्य मानले. त्यांनी औद्योगीकरणाची एक सर्वंकष योजना आखली, ज्यात उत्पादनाचा लाभ मालक, कामगार व जनता या सर्वांना समानतेने मिळावा व त्यामध्ये एकसूत्रीपणा असावा यावर त्यांनी भर दिला.

**◆ महाराष्ट्राच्या औद्योगिक विकासातील यशवंतराव चव्हाण यांचे योगदान :**

**१. डव्हायझरी प्लॅनिंग बोर्ड :**

सन १९४७ मध्ये विशिष्ट भाग निवडून तेथे वीज, पाणी इत्यादी सुविधा करून औद्योगिक सहकारी संस्था स्थापन करण्याची आणि छोट्या उद्योगधंद्यांना चालना देण्याची कल्पना मांडण्यात आली होती. त्यावेळी भारत सरकारने फक्त 'डव्हायझरी प्लॅनिंग बोर्ड' नेमले होते. सन १९५५ मध्ये छोट्या उद्योगधंद्यासंबंधीच्या बोर्डाने औद्योगिक वसाहतीच्या कल्पनेचा विचार करून अशा वसाहती स्थापन करण्यासाठी राज्य सरकारांना शिफारस केली होती. यशवंतराव यांच्या सरकारने त्याचा जोरदार पाठपुरावा केला.

**२. औद्योगिक वसाहतींना प्रोत्साहन :**

मुंबई राज्यात औद्योगिक वसाहती स्थापन करण्याची सर्वांगीण विकासाची योजना मुंबई सरकारने सुरू करण्याचे ठरविले. जो प्रदेश मागासलेला असेल तिथे औद्योगिक वसाहत स्थापन करण्याच्या बाबतीत सरकारने पुढाकार घ्यावा, परंतु हे काम प्रामुख्याने पुढारलेल्या व प्रगतीशील अशा नगरपालिकांनी, सहकारी संस्थांनी व खाजगी उद्योगधंदेवाल्यांनी हाती घ्यावे असा यशवंतरावांचा दृष्टिकोन होता, बिन सरकारी संस्थांनी औद्योगिक वसाहती उभारण्यात आपला वाटा उचलला पाहिजे या कल्पनेचा पुरस्कार करणारे मुंबई हे पहिलेच राज्य होते. गलिच्छ वस्त्या व बेकारी दूर करण्याच्या दृष्टीने दाट लोकवस्तीच्या शहरांमध्ये वसाहत स्थापन करण्याची ही योजना होती. त्यानुसार पाणी, गटारी, रेल्वे, साईंडिंग रस्ते, वीज वगैरे सोयी या वसाहतींमधून करावयाच्या होत्या. कोल्हापूर येथे उद्यमनगर व पुण्यातील हडपसर भागात वसाहत स्थापनेची योजना साकारली. लवकरच पुण्याजवळ चिंचवड, पिंपरी, भोसरी तसेच कराड, नागपूर, अमरावती आणि औरंगाबाद इत्यादी भागात वसाहती उभारण्यात आल्या.

**३. बॉम्बे स्टेट फायनान्शियल कार्पोरेशन :**

छोट्या व घरगुती उद्योगधंद्यांसाठी राज्य सरकारच्या आर्थिक मदतीबाबतच्या नियमानुसार कर्ज लवकर मंजूर करून ते ताबडतोब देता यावे यासाठी उद्योगपतींना व कंपन्यांना काही अटी व शर्तींवर कर्ज देण्यासाठी यशवंतराव यांच्या प्रयत्नांतुन मुंबई सरकारने 'बॉम्बे स्टेट फायनान्शियल कार्पोरेशनची' एजन्सी विषयक व्यवस्था केली.

**४. मुंबई राज्य फायनांशियल कार्पोरेशन :**

यशवंतरावांनी राज्याच्या सर्व भागातील औद्योगिक कंपन्यांच्या उद्योग धंद्याबाबतच्या आर्थिक गरजा भागविण्यासाठी 'मुंबई राज्य फायनांशियल कार्पोरेशनची' स्थापना केली. तसेच नव्या प्रदेशाची औद्योगिक कुवत आजमावण्याचे कामही सुरू केले.

**५. सत्तेचे विकेंद्रीकरण :**

ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद या संस्थांमार्फत लोकांचे स्थानिक, उद्योगविषयक आणि अन्य प्रश्न सोडविणे सुलभ होईल अशी यशवंतराव यांची धारणा होती. म्हणूनच त्यांनी पंचायत राज्याच्या स्थापनेला अग्रक्रम दिला आणि जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अस्तित्वात आणल्या. जिल्हा परिषदांना विशिष्ट अधिकार बहाल केले. विकासाच्या कामात अग्रभागी राहून निर्णय घ्यावे आणि त्याची प्रत्यक्ष कार्यवाही करता यावी असे कायदे केले. त्यामुळे ग्रामीण भागातून औद्योगिक व आर्थिक विकासाला चालना मिळाली.

**६. प्रशासकीय सुधारणा :**

**(अ) राज्याची विभागणी :**

यशवंतराव यांनी राज्याची सहा विभागामध्ये विभागणी केली. त्यामुळे लाल फितीच्या कारभारातील दिरंगाई कमी झाली. छोट्या कामासाठी मुंबई या राजधानीच्या ठिकाणी जाण्याचा लोकांचा त्रास वाचला.

**(ब) सचिवालयाचा विस्तार :**

सचिवालयात राज्याच्या प्रचंड विस्तारामुळे कामाचा विलक्षण ताण पडत होता. त्यामुळे सर्वच खात्यांची आणि खातेप्रमुखांची या कार्यालयाची २५% वाढ करण्यात आली. परिणाम कारभारात सुलभता व सुसूत्रता आली. सर्व खाती आणि कार्यालये एकत्रित आणणाऱ्या एकच सचिवालय या इमारतीची बांधणी केली.

**(क) प्रवास वाहतुकीचे राष्ट्रीयकरण :**

सन १९५३ मध्ये परिवहन खात्याचे राष्ट्रीयकरण करण्याचा निर्णय यशवंतराव यांनी अंमलात आणला.

**७. लाचलुचपत निर्मूलन :**

यशवंतराव यांनी महसूल खात्यातील लाचलुचपतीस आळा घालण्यासाठी कलेक्टर यांना दक्ष राहण्याचे आदेश दिले. पोलीस अधिकाऱ्यांनाही सतर्क केले. त्यामुळे छोट्या उद्योजकांची स्थिती सुसह्य झाली.

**८. जिल्हा संपर्क मंत्री :**

प्रत्येक जिल्ह्याचे प्रश्न नीटपणे समजून घेऊन तेथील जनतेच्या तक्रारींची प्रत्यक्षात दाद घेण्यासाठी मंत्र्यांना जिल्हे वाटून देण्याचा उपक्रम त्यांनी सुरू केला. अशा मंत्र्यास 'जिल्हा संपर्कमंत्री' असे म्हटले जाऊ लागले. त्यामुळे जनतेच्या आर्थिक व इतर समस्या समजून घेण्यासाठी त्यांच्याशी संपर्क साधण्याचा हेतू सिद्ध झाला.

**९. मुख्यमंत्री निधी :**

महाराष्ट्रात उद्योग व इतर क्षेत्रात सेवाभावी संस्था कार्य करतात. अशा संस्थांना मदत करण्यासाठी तसेच नैसर्गिक आपत्तीत सापडलेल्यांना मदत करण्यासाठी यशवंतराव यांनी महाराष्ट्रात प्रथमच 'मुख्यमंत्री निधीची' स्थापना केली.

**१०. सुतकताई सहकारी गिरणी :**

विदर्भातील विणकर समाजाची स्थिती सुधारण्यासाठी यशवंतराव यांनी विणकारांची एक सूतकताई सहकार गिरणी नागपूर येथे सुरू करण्याचे ठरवले. त्यासाठी ५० लाख रुपये खर्चाच्या योजनेला चालना देण्यात आली.

**११. रस्ते विकास :**

उद्योगाच्या विकासातील महत्त्वाचा भाग म्हणून राज्यातल्या रस्त्यांच्या विकासाचा कार्यक्रम यशवंतरावांनी हाती घेतला. त्यानुसार मुंबई – अहमदाबाद, मुंबई – कोकण – गोवा आणि मुंबई बाहेर जाणाऱ्या दोन एक्सप्रेस सडका तयार करण्यात आल्या. सन १९५७–५८ च्या अंदाजपत्रकात सडकांसाठी यशवंतरावांनी ४.२ कोटींची तरतूद करून ठेवली.

**१२. कोकण रेल्वेचा आरंभ :**

कोकण भागात दिवा – दासगाव मार्गावर रेल्वे सुरू करून कोकणात रेल्वे आणण्याचे काम यशवंतराव यांनीच केले. दिवा– पनवेल या रेल्वे मार्गाचे काम त्यांनी भारत सरकारची मान्यता मिळवून आपल्याच कारकीर्दीत सुरू केले.

**१३. मुख्यमंत्री निधीची स्थापना :**

आर्थिक मदती अभावी कुचंबणा होणाऱ्या सेवाभावी संस्था आणि संघटना यांना मदत करण्यासाठी महाराष्ट्रात प्रथमच मुख्यमंत्र्यांचा निधी म्हणून एक वेगळ्या निधीची स्थापना यशवंतरावांनी केली. या निधीचा आजही अनेक सेवाभावी संस्थांना लाभ होतो.

**१४. सफाई कामगारांना प्रतिष्ठा :**

यशवंतराव यांनी संपूर्ण देशात प्रथमच डोक्यावरून मैला वाहून नेण्याची कूप्रथा २० सप्टेंबर, १९६२ रोजी महाराष्ट्रात कायदा करून बंद केली. त्यांचा हा अत्यंत महत्त्वाचा निर्णय होता. त्यामुळे सामाजिक अभिसरण प्रक्रियेत गावकुसाबाहेरच्या जातींतील कामगारांना प्रतिष्ठितपणे सामावून घेणे शक्य झाले.

**१५. सामुदायिक विकास योजना :**

संपूर्ण समाजाचा सांस्कृतिक, आर्थिक, सामाजिक आणि औद्योगिक विकास घडवून आणणारी योजना म्हणजेच 'सामुदायिक विकास योजना' होय. ग्रामीण जनतेला सहभागी करून आर्थिक मदत देऊन त्यांच्या आर्थिक आणि सामाजिक प्रगतीसाठी कार्यक्रम आखून व राबवून त्यांचे राहणीमान उंचावणारी ही योजना होती. यशवंतराव यांनी हा कार्यक्रम २ ऑक्टोबर, १९५२ पासून राज्यात सुरु केला.सन १९६१ मध्ये महाराष्ट्रात २२,४०० ग्रामपंचायतींची वाढ झाली. ग्रामीण विकासाचे काम करणाऱ्या भिन्न संघटनांमध्ये त्यामुळे सूत्रबद्धता आली.

**१६. कामगार प्रश्नांसंबंधी भूमिका :**

मुख्यमंत्री यशवंतराव यांच्यासमोर कामगारांचे विशेषत: गिरणी कामगारांचे काही प्रश्न आले. सोलापूरची गिरणी बंद पडून हजारो कामगार बेकार झाले होते. यशवंतरावांनी या कामगारांना काम कसे मिळेल याकडे लक्ष दिले. कामगारांच्या संपात त्यांच्या हिताची सर्वमान्य तडजोड घडवून आणली. एस. टी. कामगारांचे कामाचे तास कमी करुन त्यांना योग्य तो न्याय मिळवून दिला. परळ येथे त्यांच्यासाठी घरे बांधून दिली. कामगारांचे हित आणि सोय यांना त्यांनी नेहमीच प्राधान्य दिले.

**१७. सांस्कृतीक व करमणुक क्षेत्रांतील उद्योग :**

साहित्य व संस्कृती यांच्या वृद्धीसाठी यशवंतराव यांनी विशेष प्रयत्न केले. २१ डिसेंबर,१९६० रोजी महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाचे उद्घाटन त्यांच्या हस्ते झाले. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या अध्यक्षतेखाली विद्वज्जनांची एक यंत्रणा त्यांनी उभारली. त्यातून करमणूक क्षेत्रांत दर्जेदार निर्मितीस चालना मिळाली.

**१८. सिनेमा, नाट्य उद्योगातील करमणुक करात सूट :**

सिने व नाट्य उद्योगाला प्रोत्साहन देण्यासाठी एप्रिल १९५७ पासून चित्रपटांना करमणूक करात सूट देण्याची नवी पद्धत यशवंतरावांनी सुरू केली. वृद्धावस्थेत असलेल्या कलावंतांना आर्थिक सहाय्य तसेच मानधन सुरू केले. मराठी, गुजराती भाषेतील सर्वोत्कृष्ट नाटकांकरिता शिक्षण संस्थांच्या पातळीवर नाट्यमहोत्सव

संघटित करून नाट्यकलेची शिबिरे सुरू करण्याची योजना आखली. त्यांच्या या प्रयत्नांमुळे महाराष्ट्रातील नाट्य आणि सिनेसृष्टी उद्योगक्षेत्रे चांगली विकसित झाली.

**१९. दूध डेअरी योजना :**

राज्याची सर्वांगीण प्रगती करण्याच्या हेतूने तसेच मुंबई शहराला दूध पुरवठा करण्यासाठी मुंबई दूध योजनेखाली वरळी इथल्या दूध डेअरीची योजना यशवंतराव यांनी तयार केली. ३ कोटी रुपये खर्चाच्या योजनेचे काम ७ नोव्हेंबर, १९६१ रोजी सुरू झाले. याच काळात आरे दुग्धालयात डेअरी टेक्नॉलॉजी संस्थेमध्ये पहिला भारतीय दुग्धालय डिप्लोमा अभ्यासक्रम त्यांनी सुरू केला.

**२०. साखर कारखाने :**

साखर कारखान्यांची उभारणी हा यशवंतरावांचा औद्योगिक क्षेत्रासाठीचा महत्त्वपूर्ण निर्णय होय. केंद्र सरकारने अधिक लायसन्स देण्याचे धोरण जाहीर केले, त्यावेळी मुंबई राज्यात फार थोडे सहकारी साखर कारखाने होते. परवाने किती द्यायचे हे केंद्र शासन ठरवू शकत असे. राज्य सरकार ऊसाची उपलब्धता व इतर बाबींचा विचार करून परवाने कोणाला द्यायचे हे ठरवीत असे. यशवंतराव यांनी शांतपणे आपल्या सहकाऱ्यांना ही वस्तुस्थिती समजावून सांगून नवीन धोरणामुळे ग्रामीण जनतेचा कसा लाभ होईल हे पटवून दिले. यशवंतरावांच्या नेतृत्वाखाली मुंबई राज्याने केंद्राच्या या धोरणाचा अवलंब केला आणि सहकारी साखर कारखाने स्थापन करून अनेक खेड्यांना संपन्नता मिळवून दिली.

**२१. ग्रामीण भागात औद्योगिक विकासाला चालना :**

तिसऱ्या पंचवार्षिक योजनेचा उद्देश कृषी औद्योगिक समाजाचा पाया घालणे हा होता. त्या अनुषंगाने यशवंतरावांनी ग्रामीण भागात उद्योगधंदे सुरू करण्यास प्रोत्साहन दिले. आधुनिक उद्योगधंदे ग्रामीण भागात सुरू करण्याचे किफायतशीर क्षेत्र म्हणजे सहकारी पायावर, शेत-मालावर प्रक्रिया करणारे धंदे होय. जिथे कच्च्या मालाच्या उत्पादकांच्या सहकारी संस्था नवे उद्योगधंदे सुरू करू शकत नसतील तिथे संयुक्त क्षेत्रांद्वारे म्हणजेच राज्य आणि खाजगी क्षेत्र यांच्या सहकार्याने ग्रामीण भागात मोठे उद्योगधंदे सुरू करण्याच्या विचाराला त्यांनी चालना दिली.

**२२. इतर सुविधा :**

शेतमालाची विक्री करणे, शेतीसाठी व घरगुती उपयोगासाठी लागणाऱ्या वस्तूंची विक्री करणे, दूध पुरवठा करणाऱ्यांच्या संघटना स्थापन करणे अशी विविध प्रकारची कामे यशवंतराव यांनी सुरू केली. घर - बांधकाम सोसायट्यांना चालना दिली. त्यामुळे सहकारी चळवळ खेड्याकडून, छोट्या शहराकडे आणि तिथून मोठ्या शहरापर्यंत पसरली.

महाराष्ट्राचा औद्योगिक विकास व्हावा म्हणून त्यांनी गरवारे, नीळकंठ, कल्याणी, फिरोदिया, बजाज इत्यादी महाराष्ट्रातील उद्योग समूहांना प्रोत्साहन दिले. त्यामुळे या कारखानदारांनी मोठी कारखानदारी महाराष्ट्रात उभी केली. उद्योगपतींना प्रोत्साहन देण्यासाठी एम. आय. डी. सी.च्या स्थापनेत यशवंतरावांचा पुढाकार म्हणजे महाराष्ट्राच्या औद्योगिक विकासाचे स्वप्न पूर्णत्वास नेण्याच्या दिशेने टाकलेले त्यांचे महत्त्वाचे पाऊल होय.

अशाप्रकारे यशवंतरावांनी अंमलात आणलेल्या औद्योगिक विकासाच्या धोरणामुळे उद्योगांचे लोण खाजगी आणि सहकारी क्षेत्रांच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात पोहोचले. महाराष्ट्रात औद्योगीकरणाचा पाया निर्माण होऊन पुढील काळात औद्योगिक क्षेत्राची झपाट्याने वाढ झाली. यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्राच्या औद्योगिक विकासाच्या पायाभरणीत महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. त्यांच्या दूरदृष्टीमुळे महाराष्ट्र आज देशातील अग्रगण्य औद्योगिक राज्य म्हणून ओळखले जाते. त्यांची धोरणे केवळ औद्योगिक विकासापुरती मर्यादित नव्हती, तर त्यांनी सामाजिक न्याय आणि समतोल विकासावर भर देऊन सर्वसमावेशक विकासाचे धोरण राबवले. त्यांच्या या कार्याचा वारसा आजही महाराष्ट्राच्या औद्योगिक धोरणात प्रतिबिंबित होतो.

**स्वाध्याय – ३**

**(अ) योग्य पर्याय निवडून रिकाम्या जागा भरा.**

१. मुंबई राज्यात औद्योगिक वसाहती स्थापन करण्याची सर्वांगीण विकासाची योजना ..... सरकारने सुरू करण्याचे ठरविले.

अ) आंध्र ब) मुंबई

क) मध्यप्रदेश ड) कर्नाटक

२. पंचायत राज्याच्या स्थापनेला ..... यांनी अग्रक्रम दिला.

अ) वसंतदादा पाटील ब)वसंतराव नाईक

क) यशवंतराव चव्हाण ड) शरद पवार

३. यशवंतराव चव्हाण यांनी राज्याची ..... विभागामध्ये विभागणी केली.

अ) ४ ब) ६

क) ८ ड) १०

४. ..... मध्ये परिवहन खात्याचे राष्ट्रीयकरण करण्याचा निर्णय यशवंतराव यांनी अंमलात आणला.

अ) सन १९५३ ब) १९५५

क) सन १९५७ ड)सन भं१९५९

५. ..... यांनी संपूर्ण देशात प्रथमच डोक्यावरून मैला वाहून नेण्याची कूप्रथा २० सप्टेंबर, १९६२ रोजी महाराष्ट्रात कायदा करून बंद केली.

अ) यशवंतराव चव्हाण ब) वसंतराव नाईक

क) वसंतदादा पाटील ड) विलासराव पाटील

६. सिने व नाट्य उद्योगाला प्रोत्साहन देण्यासाठी एप्रिल १९५७ पासून चित्रपटांना ..... करात सूट देण्याची नवी पद्धत यशवंतराव चव्हाण यांनी सुरू केली.

अ) करमणूक ब) आयात

क) निर्यात ड)यापैकी नाही

७. मुंबई शहराला दूध पुरवठा करण्यासाठी मुंबई दूध योजनेखाली ..... इथल्या दूध डेअरीची योजना यशवंतराव यांनी तयार केली.

अ) दादर ब) ठाणे

क) कुर्ला ड)वरळी

८. ..... पंचवार्षिक योजनेचा उद्देश कृषी औद्योगिक समाजाचा पाया घालणे हा होता.

अ) तिसऱ्या ब) चौथ्या

क) पाचव्या ड) सहाव्या

९. यशवंतराव चव्हाण यांना ..... असे म्हणतात.

अ) भारतीय घटनेचे शिल्पकार ब) आधुनिक भारताचे शिल्पकार

क) आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार ड) यापैकी नाही

१०. ..... शतकातील महाराष्ट्रातील आधुनिक नेत्यांमध्ये यशवंतराव चव्हाण यांचे स्थान अग्रगण्य असे आहे.

अ) विसाव्या ब) एकोणिसाव्या

क) अठराव्या ड) यापैकी नाही

**(ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. बॉम्बे स्टेट फायनान्शियल कार्पोरेशनची स्थापना कशासाठी करण्यात आली?

२. यशवंतराव यांनी महाराष्ट्रात प्रथमच 'मुख्यमंत्री निधीची' स्थापना का केली?

३. कोकणात रेल्वे आणण्याचे काम कोणी केले?

४. महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाचे उद्घाटन केव्हा झाले?

५. 'देशातील सर्वोत्तम मुख्यमंत्री' म्हणून यशवंतराव चव्हाण यांची प्रशंसा कोणी केली?

## ४.३ सारांश :

स्वातंत्र्यानंतरच्या पहिल्या दोन तीन दशकांत यशवंतरावांनी महाराष्ट्रात राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, कृषी, सहकार, औद्योगीकरण इत्यादी मानवी जीवनाच्या सर्व अंगांना स्पर्श करणारे, त्यांचा कायापालट करण्याचे धोरण अवलंबिले. आणि दूरदृष्टी ठेवून समाजातील सर्वाधिक मागासलेल्या घटकाला विकास प्रवाहात आणले. म्हणूनच त्यांना 'आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार' असे म्हटले जाते. विसाव्या शतकातील महाराष्ट्रातील आधुनिक नेत्यांमध्ये यशवंतराव चव्हाण यांचे स्थान अग्रगण्य असे आहे. महाराष्ट्रातील मुख्यमंत्री पदापासून ते भारताचे उपपंतप्रधान पदापर्यंत आंतरराष्ट्रीय पातळीवर कार्य करताना जगातील मुत्सद्दी, राजकीय,

प्रज्ञावंत, अर्थशास्त्रज्ञ इत्यादींमध्ये त्यांचे व्यक्तिमत्व खुलून उठले. त्यांची मुख्यमंत्री पदाची कारकीर्द खूप गाजली. त्यांनी मुख्यमंत्री म्हणून केलेल्या कार्याचा गौरव पंडित जवाहरलाल नेहरू यांनी जाहीर भाषणांतून केला, तर लोकनायक जयप्रकाश नारायण यांनीही त्यांची 'देशातील सर्वोत्तम मुख्यमंत्री' म्हणून प्रशंसा केली.

## ४.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ :

**१. कृषी :** शेती

**२. ट्रिनिटी :** त्रिसूत्री

**३. महार वतन :** महार वतन म्हणजे महार समाजातील लोकांना देण्यात आलेले जमीन अनुदान

**४. जमीन धारणा :** जमीन धारणा म्हणजे जमिनीवर मालकी हक्क असणे आणि तिच्याशी संबंधित निर्णय घेण्याचे अधिकार असणे.

**५. हरित क्रांती :** कृषी क्षेत्रात तंत्रज्ञानाच्या साहाय्याने आणि नवीन संकरित बियाणांच्या संशोधनामुळे झालेल्या क्रांतीला हरित क्रांती म्हणतात.

**६. विधी शिक्षण :** कायद्याच्या (law) अभ्यासाला किंवा कायद्याचे ज्ञान मिळवण्याला विधी शिक्षण म्हणतात.

## ४.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे :

**स्वाध्याय : १**

**अ) योग्य पर्याय.**

| | |
|---|---|
| १. अ) देवराष्ट्रे | २. ड) पहिले |
| ३. ड) १९५६ | ४. अ) यशवंतराव चव्हाण |
| ५. ब यशवंतराव चव्हाण | ६. ड) १९५९ |
| ७. क) जळगाव | ८. अ) राज्य पाटबंधारे |
| ९. क) १९५३ | १०. ड) महाराष्ट्र |

**ब) एका वाक्यात उत्तरे.**

१. यशवंतराव चव्हाण.

२. सोलापूर

३. शेतीसाठी पाणीपुरवठा करण्याबाबतच्या सर्वसाधारण धोरणासंबंधी व व्यवस्थेसंबंधी सरकारला सल्ला देण्यासाठी

४. यशवंतराव चव्हाण

५. खा. दादासाहेब गायकवाड

**स्वाध्याय : २**

**अ) योग्य पर्याय.**

१. अ) प्राथमिक　　२. अ) १९६०

३. ड) औरंगाबाद　　४. ब) पंडित नेहरू

५. क) सैनिक　　६. अ) आश्रमशाळांच्या

७. क)ग्रामीण　　८. अ) रयत

९. ब) मराठीचा　　१०. ब) कोल्हापूर

**ब) एका वाक्यात उत्तरे.**

१. मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण

२. १८ नोव्हेंबर, १९६२ रोजी

३. यशवंतराव चव्हाण

४. यशवंतराव चव्हाण

५. श्री शिवाजी शिक्षण संस्था

**स्वाध्याय : ३**

**अ) योग्य पर्याय.**

१. ब) मुंबई　　२. क) यशवंतराव चव्हाण

३. ब) ६　　४. अ) सन १९५३

५. अ) यशवंतराव चव्हाण　　६. अ) करमणूक

७. ड) वरळी　　८. अ) तिसऱ्या

९. क) आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार　१०.अ) विसाव्या

**ब) एका वाक्यात उत्तरे.**

१. उद्योगपतींना व कंपन्यांना काही अटी व शर्तींवर कर्ज देण्यासाठी

२. नैसर्गिक आपत्तीत सापडलेल्या आपद्ग्रस्तांना मदत करण्यासाठी

३. यशवंतराव चव्हाण यांनी

४. २१ डिसेंबर,१९६० रोजी

५. लोकनायक जयप्रकाश नारायण

## ४.६ सरावासाठी स्वाध्याय :

**अ) टिपा लिहा.**

१. मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी शेतीसाठी सुरू केलेल्या जलसिंचन योजना

२. मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांचे शिक्षण विषयक विचार

३. मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांची ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी मोफत शिक्षणाची योजना

४. मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी केलेल्या प्रशासकीय सुधारणा

५. मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी विद्यापीठीय शिक्षण क्षेत्रात केलेल्या सुधारणा

६. मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी रस्ते विकासासाठी कोणते प्रयत्न केले

**ब) थोडक्यात उत्तरे लिहा.**

१. आदिवासींच्या शिक्षणासाठी मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी कोणती अभिनव योजना अंमलात आणली?

२. मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी महार वतनाबाबत कोणते धोरण अवलंबले?

३. 'कसेल त्याची जमीन' हे धोरण मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी कसे राबविले?

४. महाराष्ट्राचा औद्योगिक विकास व्हावा म्हणून मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी कोणत्या उद्योजकांना पाठिंबा दिला?

**क) खालील प्रश्नांची विस्तृत उत्तरे लिहा.**

१. मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांचे महाराष्ट्राच्या कृषी क्षेत्रातील विकास कार्य विशद करा.

२. मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांचे शैक्षणिक विचार व कार्य स्पष्ट करा.

३. मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्राच्या औद्योगिक विकासासाठी केलेल्या प्रयत्नांचे व उपक्रमांचे परीक्षण करा.

## ४.७ संदर्भ ग्रंथ :


१. चव्हाण यशवंतराव, सह्याद्रीचे वारे, रोहन प्रकाशन, पुणे, २०१४

२. चव्हाण यशवंतराव, कृष्णाकाठ, प्रेस्टीज प्रकाशन, पुणे, १९८४

३. जोशी रामभाऊ, यशवंतराव – इतिहासाचे एक पान, केसरी प्रकाशन पुणे, १९७६

४. डॉ. मेहेंदळे विश्वास, यशवंतराव ते विलासराव, अनुबंध प्रकाशन, पुणे, २००७

५. भावे मधुकर, सह्याद्री ते हिमालय, मनीषा प्रकाशन, मुंबई

६. वाघ रामनाथ (संपा.) महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय, पुणे,२००८

७. बाबर कृ. भा., यशवंतराव चव्हाण व्यक्ती आणि कार्य, ठोकळ प्रकाशन, पुणे, १९६०

८. खोबरेकर व्ही. जी.(संपा.) यशवंतराव चव्हाण विधिमंडळातील निवडक भाषणे, १९४६- १९६२, खंड पहिला, प्रकाशन - यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई, १९८९

९. Maharashtra Legislative Council Debates,Vol.II

१०. डॉ. क्षिरसागर उर्मिला, अप्रकाशित पी.एच.डी.

शोधप्रबंध, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांचे योगदान : ऐतिहासिक अभ्यास, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर,२०१८

❖❖❖

घटक १

# सहकारी चळवळ

## (Co-operative Movement)

अनुक्रमणिका


१.० उद्दिष्टे

१.१ प्रास्ताविक

१.२ विषय विवेचन

१.२.१ सहकारी चळवळ

१.२.२ साखर उद्योग : (प्रवरा सहकारी साखर कारखाना)

१.२.३ दुग्धव्यवसाय (कोल्हापूर जिल्हा सहकारी दुध संघ–गोकुळ दूध)

१.२.४ सूतगिरणी (डेक्कन सहकारी सूतगिरणी इचलकरंजी)

१.३ सारांश

१.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

१.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१.६ सरावासाठी स्वाध्याय

१.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ

## १.० उद्दिष्टे :

१. सहकाराचा व्यापक अर्थ व संकल्पना समजावून घेता येईल.

२. भारतातील सहकारी चळवळीची पार्श्वभूमी समजेल.

३. महाराष्ट्रातील सहकारी साखर उद्योगाची माहिती करून घेता येईल.

४. प्रवरा सहकारी साखर कारखान्याचे महत्त्व समजून घेता येईल.

५. ग्रामीण विकासात सहकारी दूध संस्थाची भूमिका समजेल.

६. महाराष्ट्रातील दुग्धव्यवसायातील गोकुळ दूध संघाच्या योगदाची माहिती मिळेल.

७. इचलकरंजीमधील सहकरी सूतगिरणी चळवळीची माहिती घेता येईल.

८. डेक्कन सहकारी सूतगिरणीचे इचलकरंजी परिसरासाठीचे योगदान जाणून घेता येईल.

## १.१ प्रास्ताविक :

प्राचीन काळापासून 'सहकार' हा मानवी जीवनाचा एक महत्त्वाचा अविभाज्य भाग आहे. एकत्रितपणे काम करणे ही मानवाची सहज आणि नैसर्गिक प्रवृत्ती आढळते. व्यक्तीच्या सामाजिक विकासाच्या प्रवाहातील एक प्रमुख घटक 'सहकार' आहे. सहकार म्हणजे एकमेकांना मदत करणे. सहकार आणि मानवी सहजीवन यांचा जवळचा संबंध आहे. महाराष्ट्रातील कृषिविकासात सहकारी चळवळीने एक आपला वेगळा ठसा उमटविला आहे. सहकारी साखर कारखाने, सूतगिरण्या, दुग्धव्यवसाय अशा अनेक क्षेत्रातील सहकारी संस्थानी महाराष्ट्राच्या आर्थिक, राजकीय, सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात महत्त्वाचे स्थान प्राप्त केले आहे.

## १.२ विषय विवेचन :

### १.२.१ सहकारी चळवळ :

**अ) अर्थ व व्याख्या :**

सहकाराला इंग्रजी मध्ये Co-operation असे म्हणतात व Co-operation हा शब्द लॅटिन भाषेतील co म्हणजे 'सह' किंवा एकत्र आणि operari म्हणजे कार्य करणे अशा अर्थ आहे. त्यामुळे Co-operation म्हणजे एकत्रितपणे कार्य करणे होय.

'सहकार' या शब्दाला जो व्यापक अर्थ प्राप्त झाला आहे. त्यानुसार समूहात राहून कार्य करणे किंवा एकत्रितपणे कार्य करणे किंवा परस्पर सहाय्याने कार्य करणे किंवा सर्वाच्या हितासाठी एकत्रितपणे कार्य करणे म्हणजे सहकार होय. भारतातील सहकारी चळवळीचे प्रणेते वैकुंठलाल मेहता यांच्या मते, ''समान गरजा असलेल्या व्यक्तीनी एकत्र येऊन आपल्या समान आर्थिक उद्दिष्टे साध्य करण्यासाठी स्वेच्छेने स्थापन केलेले संघटन म्हणजे सहकारी संस्था होय.'' तसेच एच. कॅल्व्हर्त यांच्या मते, ''आपल्या आर्थिक हिताच्या वृद्धीसाठी समानतेच्या तत्वावर मानवी भूमिकेतून व्यक्तींनी स्वेच्छेने एकत्र येऊन स्थापन केलेली संघटना म्हणजे सहकरी संस्था होय.'' सहकार ही एक व्यापक स्वरुपाची संकल्पना आहे. सामाजिक हिताच्या अनेक साधनापैकी एक महत्त्वाचे साधन आहे.

**ब) सहकारची प्रमुख उद्दिष्टे :**

१. दुर्बलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनिविणे.

२. जनतेच्या सामाजिक आणि आर्थिक हिताची जपणूक करणे.

३. ग्रामीण भागात रोजगाराच्या संधी निर्माण करणे.

४. विविध कार्यातून आणि योजनेतून जनकल्याण साधने.

५. ग्रामीण जीवन आणि राहणीमान उंचाविणे.

**सहकारी चळवळ :**

भारतात ग्रामीण भागातील जनतेच्या गरिबीतून आणि आर्थिक शोषणातून सहकारी चळवळीची सुरवात झाली. ब्रिटीश राजवटीत ग्रामीण भागात बेकारी, कर्जबाजारीपणा, दारिद्र्य यात वाढ होऊन ग्रामीण अर्थव्यवस्थेला तडा गेला. ग्रामीण भागात निर्माण झालेले निराशाजनक चित्र बदलण्यासाठी सावकाराचे महत्त्व कमी करून शेतकऱ्यांना वित्तपुरवठा करण्याचा विचारामुळे सहकारी तत्वाचा पुरस्कार करण्यात आला. भारतात १९०४ मध्ये 'सहकारी पतपुरवठा कायदा' संमत करण्यात आला. या कायद्यामुळे भारतातील सहकारी चळवळीची वाटचाल सुरु झाली. सहकार क्षेत्राचा विस्तार करण्यासाठी या कायद्यात व्यापक सुधारणा करण्याची आवश्यक होते म्हणून सन १९१२ मध्ये 'भारतीय सहकारी सोसायट्याचा कायदा' अस्तित्वात आला. यानुसार सहकारी तत्वानुसार आपल्या सभासदांचे आर्थिक हितसंवर्धन करणारी संस्था होय. अशी सहकारची व्याख्या मांडण्यात आली. या कायद्यामुळे ग्रामीण भागात सहकारी संस्थाच्या विस्तारास चालना मिळाली.

**अ) महाराष्ट्रातील सहकार चळवळीची पार्श्वभूमी :**

महाराष्ट्रातील सहकार चळवळीला एका शतकाहून अधिक कालावधीचा वारसा लाभलेला आहे. तत्कालीन मुंबई प्रांतात प्रा. विठ्ठल कवठेकर यांनी इ. स. १८८९ मध्ये 'अन्योन्य साहाय्याकारी मंडळी' या नावाची सहकारी संस्था स्थापन केली. मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी संस्थेची स्थापना १९२३ मध्ये झाली. पुढील काळात या बँकेचे रुपांतर राज्य शिखर बँकेत होऊन ती सध्या 'महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लिमिटेडम या नावाने कार्यरत आहे.

महाराष्ट्र राज्याच्या निर्मिती १ मे १९६० मध्ये होऊन यशवंतराव चव्हाण हे पहिले मुख्यमंत्री बनले. त्यांनी आपल्या खंबीर नेतृत्वाने सहकार आणि पंचायती राज या माध्यमातून राज्याच्या विकासाला गती दिली. त्यांच्या या कार्याला तत्कालीन सहकारातील कार्यकर्त्यांनी भरघोस पांठिबा दिला. त्यात प्रामुख्याने वैकुंठलाल मेहता, भाऊसाहेब हिरे, विठ्ठलराव विखे पाटील, डॉ. धनंजयराव गाडगीळ, वसंतदादा पाटील, यशवंतराव मोहिते, डॉ. पंजाबराव देशमुख, तात्यासाहेब कोरे यांचा उल्लेख करावा लागेल. पुढील काळात त्यांनी आप आपल्या परिसरात सहकाराच्या माध्यमातून केलेल्या कार्यामुळे त्यांना सहकार महर्षी म्हणून ओळखले गेले. या सर्वांच्या प्रयत्नामुळे महाराष्ट्रात सर्वत्र सहकारचे जाळे निर्माण होण्यास मदत झाली.

महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा १९६० मध्ये संमत करण्यात आली. या कायद्यानुसार सहकारी संस्थाचे

नियमन व नियंत्रण केले जाऊ लागले. त्यामुळे सहकारी चळवळीला एक निश्चित दिशा प्राप्त होऊन सहकार तत्त्वावरील अनेक संस्थाची उभारणी पुढील काळात झाली. सन १९६० ते १९९० हा कालखंड महाराष्ट्रातील सहकारी चळवळीचा सुवर्ण कालखंड म्हणून ओळखला जातो. १९६० ते १९८० या काळात सहकारी संस्थाची संख्या ही दुप्पटीने वाढली. त्यामुळे सहकार चळवळीचा चौफेर विकास झालेला दिसतो. तत्कालीन महाराष्ट्रातील बहुतांशी जनता ही कृषी क्षेत्राशी निगडीत असल्याने शेतीशी संबधित अनेक सहकारी संस्था उदयास आल्या. कृषी पतपुरवठा संस्था, पाणीपुरवठा सहकारी संस्था, दुग्ध सहकारी संस्था स्थापन होण्यास चालना मिळाली. त्याच बरोबर शेतमालावर आधारित उद्योगाचाही विकास झाला. अनेक भागात सहकारी साखर कारखाने व सहकारी सुत गिरण्या स्थापन झाल्या. या उद्योगाच्या विकासामुळे महाराष्ट्रातील शेतीच्या विकासाला गती मिळाली. त्यामुळे शेतीच्या उत्पादनात वाढ झाली, शेतकऱ्याच्या हितासाठी स्थानिक पातळीवर अनेक लहान मोठ्या सहकारी संस्था विस्तारल्या. त्यामुळे शेतकऱ्याचे जीवनमान उंचावण्यास मदत झाली. महाराष्ट्र राज्याच्या निर्मिती नंतर सहकारी संस्थाची झालेली वाढ आपणास खालील तक्त्यावरून स्पष्ट होते.

| **सहकारी संस्था प्रकार** | **वर्ष** | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | **१९६१** | **१९७१** | **१९८१** | **१९९१** | **२००१** |
| प्राथमिक कृषी पतपुरवठा | १८९९८ | २००१४ | १८३८९ | १९४११ | २०५२४ |
| प्राथमिक सहकारी बँक | --- | २६५ | ३४५ | ३८१ | ६५४ |
| पगारदार नोकरांची संस्था | --- | २२२० | ४१८७ | ६११७ | ७०७९ |
| नागरी पतपुरवठा संस्था | --- | ४९४ | ९५२ | ४७८४ | १४२७७ |
| प्राथमिक विपणन संस्था | ३२७ | ३८४ | ३९१ | ९०१ | १०८८ |
| दुग्ध सहकारी संस्था | ४३१ | २०२१ | ७८१९ | १४२८४ | २२४६६ |
| प्राथमिक गृहनिर्माण संस्था | १४९५ | ७४२५ | १५६४० | ३३९१३ | ५२३३० |
| पाणीपुरवठा संस्था | ११९ | ३०१ | ११८८ | ३२२४ | ४७९६ |
| कामगार सहकारी संस्था | ३७१ | १११५ | ३३३४ | ४४३४ | ८१२७ |
| सहकारी साखर कारखाने | १० | ३० | ७८ | १३८ | १९७ |
| सहकारी सुत गिरण्या | ०३ | --- | --- | १२५ | २३३ |

**संदर्भ :** (महाराष्ट्रातील सहकार चळवळ एका दृष्टीक्षेपात - २००१)

तक्त्यावरून आपणास महाराष्ट्रातील सहकारी संस्थाची संख्या वाढलेली दिसते. तसेच महाराष्ट्रातील सहकारी चळवळ विकसित झालेली दिसते. शेतीला पतपुरवठा करणाऱ्या संस्था बरोबरच शेतमालावर आधारित अनेक सहकारी उद्योगाचाही मोठ्या प्रमाणात विकास झालेला दिसतो. तसेच शहरी भागात नोकरदार आणि नागरी सहकारी संस्थाच्या विकासालाही चालना मिळालेली दिसते.

**ब) महाराष्ट्रातील प्रमुख सहकारी संस्था :**

महाराष्ट्रातील सहकार चळवळ हळूहळू विकसित होत गेले. महाराष्ट्रातील ग्रामीण भागाबरोबरच शहरी भागातही मोठ्या प्रमाणत याचा विकास झालेला दिसतो. महाराष्ट्रातील ग्रामीण भागाचे आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक परिवर्तनात सहकार चळवळीची भूमिका अत्यंत मोलाची ठरली आहे. सहकारी बँका, साखर कारखाने, गृहनिर्माण आणि विपणन या क्षेत्रात सहकारी संस्थेने केलेला विकास उल्लेखनीय आहे. ग्रामीण भागात कृषी पतपुरवठा बरोबरच पाणीपुरवठा करणाऱ्या संस्थाची संख्या लक्षणीय आढळते. प्रत्येक जिल्हास्तरावर जिल्हा मध्यवर्ती बँका प्रमुख सहकारी संस्था म्हणून कार्यरत आहेत. सहकारी खरेदी विक्री संघ ग्रामीण व शहरी भागात वस्तू व सेवा पुरवित आहेत. शेतीला पूरक असणारा पशुपालन हा जोडधंदा विकसित होण्यासाठी दुग्धविकास सहकारी संस्थाचे योगदान महत्त्वपूर्ण ठरले. शेत मालावर आधारित अनेक उद्योगाचा विकास झाला. त्यात प्रामुख्याने साखर कारखाने आणि सूतगिरणी यांचा समावेश होतो. या क्षेत्राचा विस्तृत आढावा या घटकात घेतलेला आहे.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न – १**

**(अ) खालील पैकी योग्य पर्याय निवडा.**

१. भारतात सर्वप्रथम सहकारा संबधित १९०४ मध्ये ..... कायदा समंत झाला.
   अ) सहकारी पतपुरवठा ब) सहकारी गृहनिर्माण
   क) सहकारी बँक ड) सहकारी प्रक्रिया

२. भारतीय सहकारी सोसायट्याचा कायदा ..... मध्ये अस्तित्वात आला.
   अ) १९१० ब) १९१२
   क) १९१४ ड) १९१५

३. मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी संस्थेची स्थपना ..... मध्ये झाली.
   अ) १९२० ब) १९२२
   क) १९२३ ड) १९२५

४. महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री ..... हे होते.
   अ) यशवंतराव मोहिते ब) पंजाबराव देशमुख
   क) शंकरराव नाईक ड) यशवंतराव चव्हाण

**(ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. सहकार म्हणजे काय?

२. महाराष्ट्रात कोणती शिखर बँक आहे?

३. महाराष्ट्रातील सहकाराचा सुवर्ण कालखंड कोणता?

## १.२.२ साखर उद्योग – (प्रवरा सहकारी साखर कारखाना) :

महाराष्ट्रातील ग्रामीण भागात नवसमाज निर्मितीचे एक नवे दालन सर्वांच्यासाठी खुला करणारा उद्योग म्हणून साखर कारखानदारीकडे पहिले जाते. सहकारी साखर उद्योग हे शेतीमाल प्रक्रियाकरण संस्थेतील एक एक महत्त्वाचे क्षेत्र आहे. महाराष्ट्रात फार पूर्वीपासूनच ऊस लागवडीचा उल्लेख ऐतिहासिक नोंदीत आढळतो. वाढत्या ऊस उत्पादनाबरोबरच या साखर उद्योगाचा विकास घडून आलेला दिसतो. ग्रामीण भागातील आर्थिक विकासाला खऱ्या अर्थाने चालना देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य साखर उद्योगातून झालेले दिसते. सहकारी साखर उद्योगामुळे ग्रामीण भागात अनेक पूरक उद्योग निर्माण झाले. ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या संधी यातून उपलब्ध झालेले दिसतात. या साखर उद्योगातील आर्थिक उलाढाली वरूनच ग्रामीण भागात बँका, शैक्षणिक संस्था आणि आरोग्याच्या सुविधा निर्माण होऊन ग्रामीण जनतेचे जीवनमान उंचविण्यात महत्त्वाचे योगदान दिले आहे. ग्रामीण क्षेत्रातील 'विकासाचा महामेरू' म्हणून या सहकारी साखर उद्योगाकडे पाहिले जाते.

महाराष्ट्रात स्वातंत्र्यपूर्व काळात ब्रिटीशांनी १९१९ मध्ये अहमदनगर जिल्ह्यातील बेलापूर जवळील 'हरेगाव' येथे एक साखर कारखाना सुरु केला. १९३२ मध्ये ब्रिटीश सरकारने साखर उद्योगाला करविषयक संरक्षण दिल्याने सन १९३०-४० च्या दशकात महाराष्ट्रात अनेक खाजगी कारखाने सुरु झाले. १९४१ पर्यंत १२ साखर कारखाने कार्यरत झालेले होते. खाजगी साखर कारखान्याच्या वाढीबरोबरच सहकारी तत्त्वावर साखर कारखाना सुरु करण्याचा विचार स्वातंत्र्योत्तर काळात लगेच सुरु झाला आणि त्याला लगेच मूर्त स्वरूपही अल्पावधीतच प्राप्त झाले.

**अ) सहकारी साखर उद्योग : (विशेष संदर्भ प्रवरा सहकारी साखर कारखाना)**

महाराष्ट्रातील ग्रामीण भागात नवसमाज निर्मितीचे एक नवे दालन सर्वांच्यासाठी खुला करणारा उद्योग म्हणून साखर कारखानदारीकडे पहिले जाते. सहकारी साखर उद्योग हे शेतीमाल प्रक्रियाकरण संस्थेतील एक एक महत्त्वाचे क्षेत्र आहे. महाराष्ट्रात फार पूर्वीपासूनच ऊस लागवडीचा उल्लेख ऐतिहासिक नोंदीत आढळतो. वाढत्या ऊस उत्पादनाबरोबरच या साखर उद्योगाचा विकास घडून आलेला दिसतो. ग्रामीण भागातील आर्थिक विकासाला खऱ्या अर्थाने चालना देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य साखर उद्योगातून झालेले दिसते. सहकारी साखर उद्योगामुळे ग्रामीण भागात अनेक पूरक उद्योग निर्माण झाले. ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या संधी यातून उपलब्ध झालेले दिसतात. या साखर उद्योगातील आर्थिक उलाढाली वरूनच ग्रामीण भागात बँका, शैक्षणिक संस्था आणि आरोग्याच्या सुविधा निर्माण होऊन ग्रामीण जनतेचे जीवनमान उंचविण्यात महत्त्वाचे योगदान दिले आहे. ग्रामीण क्षेत्रातील 'विकासाचा महामेरू' म्हणून या सहकारी साखर उद्योगाकडे पाहिले जाते.

महाराष्ट्रात स्वातंत्र्यपूर्व काळात ब्रिटीशांनी १९१९ मध्ये अहमदनगर जिल्ह्यातील बेलापूर जवळील 'हरेगाव' येथे एक साखर कारखाना सुरु केला. १९३२ मध्ये ब्रिटीश सरकारने साखर उद्योगाला करविषयक संरक्षण दिल्याने सन १९३०-४० च्या दशकात महाराष्ट्रात अनेक खाजगी कारखाने सुरु झाले. १९४१ पर्यंत १२ साखर कारखाने कार्यरत झालेले होते. खाजगी साखर कारखान्याच्या वाढीबरोबरच सहकारी तत्त्वावर साखर कारखाना सुरु करण्याचा विचार स्वातंत्र्योत्तर काळात लगेच सुरु झाला आणि त्याला लगेच मूर्त स्वरूपही अल्पावधीतच प्राप्त झाले.

**आ) विठ्ठलराव एकनाथराव विखे पाटील :**

आशिया खंडातील पहिल्या सहकार तत्त्वावरील साखर कारखान्याचे जनक म्हणून विठ्ठलराव विखे पाटील यांचा उल्लेख केला जातो. महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखान्याचे आद्यप्रवर्तक आणि बहुजनाच्या हितासाठी आपले आयुष्य वेचणारे सर्व सामन्याचे नेते म्हणजे विठ्ठलराव विखे पाटील होय. यांचा जन्म १२ ऑगस्ट १८९७ मध्ये अहमदनगर जिल्ह्यातील 'लोणी बुद्रुक' खेड्यात एका सामान्य शेतकरी कुटुंबात झाला होता. लोणी खुर्दच्या शाळेत चौथी पर्यंतचे शिक्षण घेतले. तत्कालीन परिस्थितीत ग्रामीण भागातील सावकारीमुळे कर्जबाजारी झालेल्या शेतकरीच्या हितासाठी त्यांनी कार्याला सुरुवात केली.

सन १९२३ मध्ये त्यांनी 'लोणी बुद्रुक सहकारी पतपेढी'ची स्थापना करून आपल्या सार्वजनिक कार्याला प्रारंभ केला. खेडे गावातील गोरगरीब मजुरांना एकत्रित करून 'मजूर सहकारी सोसायटी'ची स्थापना केली. यामधूनच शेतकरी आणि मजूर यांच्यासाठी लढा देण्याचे नेतृत्व त्यांच्यात विकसित होत गेले. आपल्या अथक परिश्रमाने आणि दूरदृष्टीने लोणी जवळील 'प्रवरानगर' येथे १९५० मध्ये कारखान्याची मुहूर्तमेढ रोवली. देशातील पहिले सहकार महर्षी म्हणून त्यांचे कार्य सहकार क्षेत्रात उल्लेखनीय आहे. महाराष्ट्रात सहकार क्षेत्राला आज जे महत्त्व प्राप्त झालेले आहे त्याचे खरे श्रेय विठ्ठलराव विखे पाटील यांना द्यावे लागते. भारतासारख्या कृषिप्रधान देशाला सहकारच्या माध्यमातूनच पुढे घेऊन जाता येईल आणि समाजाचा खरा विकास साधणे शक्य होईल अशा दूरदृष्टीकोन त्यांच्याकडे होता.

सहकारी क्षेत्रात साखर कारखाना उभारण्याची कल्पना श्री. आर. एन. हिरेमठ आणि जी. एन. सहस्त्रबुद्धे यांनी मांडली. विठ्ठलराव विखे पाटील यांनी शेतकऱ्यांच्या मालाला बाजार मूल्य प्राप्त व्हावे, शेतकऱ्यांच्या हिताची जपणूक व्हावी, त्यांना स्वाभिमानाने आणि स्वयंपूर्ण जीवन जगता यावे, या हेतूने हा कारखाना पूर्णत्वास नेला. १५ मे १९५२ रोजी तत्कालीन भारताचे पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु यांच्या शुभहस्ते समारंभपूर्वक उदघाटन घडवून आणले. अनेक खडतर परिस्थितीतून मार्ग काढून हा कारखाना सहकारी तत्त्वावर उभा केला. कारखाना परिसरातील लोकांना रोजगार आणि उसाला योग्य भाव दिल्याने या भागातील आर्थिक विकासाला चालना मिळाली. महाराष्ट्राच्या एकूणच विकास प्रक्रियेत सहकार क्षेत्राचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. विठ्ठलराव विखे पाटील यांच्या कार्यापासून प्रेरणा घेऊन अनेक दूरदृष्टीचे नेते आणि सहकार महर्षी या क्षेत्राला लाभले. या प्रवरा सहकारी संस्थेच्या धर्तीवर पुढच्या काळात संपूर्ण महाराष्ट्रात अनेक सहकारी संस्था निर्माण झाल्या. त्यामुळे शेतकरी विकासाला चालना मिळून ग्रामीण जीवनसमृद्ध होण्यास मदत झाली. प्रवरा सहकारी साखर कारखाना हा महाराष्ट्राच्या सहकार क्षेत्राच्या विकासातील मैलाचा दगड म्हणून महत्त्वाचा ठरला आहे.

**इ) प्रवरा सहकारी साखर कारखाना :**

तत्कालीन महाराष्ट्रातील सहकार क्षेत्रातील आघाडीचे नेते डॉ. धनंजयराव गाडगीळ यांच्या मार्गदर्शनाखाली विठ्ठलराव विखे पाटील यांनी ३० डिसेंबर १९५० रोजी अहमदनगर जिल्ह्यातील लोणी येथील प्रवरानगर येथे 'प्रवरा सहकारी साखर कारखाना' स्थापन केला. 'प्रवरा' हा आशिया खंडातील पहिला सहकारी साखर कारखाना म्हणून ओळखला जातो. विठ्ठलराव विखे पाटील यांनी महाराष्ट्रातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना एक नवी दिशा देऊन सहकारी क्षेत्रातील साखर कारखान्याची मुहूर्तमेढ रोवली गेली. तसेच महाराष्ट्रातील कृषी क्षेत्रातील ओद्योगिक क्रांतीचा पाया रचला गेला. या साखर कारखान्याचे वैशिष्ट्य म्हणजे सरकारने या कारखान्याच्या भागभांडवलात भागीदारी स्वीकारली होती.

विठ्ठलराव विखे पाटील या एका शेतकरी कुटुबातील नेत्याने अनेक अडचणीवर मात करीत सहकारी साखर कारखाना उभारून सामान्य शेतकऱ्यांच्या मदतीने नेटाने चालविला, यामुळे इतरांना यापासून प्रेरणा मिळाली. वसंतदादा पाटील यांनी सांगली येथे 'शेतकरी सहकारी साखर कारखाना' स्थापन करून महाराष्ट्रातील साखर उद्योगाला प्रोत्साहन दिले. पुढील काळात पश्चिम महाराष्ट्र, खानदेश, मराठवाडा व विदर्भात सहकारी साखर कारखाने सुरु झाले. सन १९६० मध्ये महारष्ट्रात १३ सहकारी साखर कारखाने होते, सन २००१ अखेर कारखान्याची संख्या २०१ वर पोहोचली आहे. या कारखान्याची सभासद संख्याही जवळपास ५० लाखाच्या वर पोहोचली आहे. देशातील एकूण साखर उत्पादनापैकी ३३ % साखरेचे उत्पादन एकट्या महाराष्ट्रातून होते. देशातील सहकारी साखर कारखान्यापैंकी महाराष्ट्रात सर्वांत जास्त साखर कारखाने सहकारी तत्वावर कार्यरत आहेत. एकूणच ऊस व साखर यांच्या उत्पादनात महाराष्ट्राचा प्रथम कमांक लागतो.

**ई) प्रवरा सहकारी साखर कारखाना अंर्तगत इतर उद्योग :**

प्रवरा सहकारी साखर कारखाना केवळ उसाचे गाळप करून साखर उत्पादन करणारा उद्योग न राहता या कारखान्याशी पूरक असे अनेक उद्योग या कारखाना अंतर्गत सुरु करण्यात आले. साखर उत्पादने बरोबरच इतर सहउत्पादनाची निर्मिती सरू केली. त्यातील काही उद्योग आणि उत्पादने पुढीलप्रमाणे आहेत.

१. मळीपासून अल्कोहोल निर्मितीचा कारखाना
२. अल्कोहोलपासून इथेनॉल निर्मितीचा उद्योग
३. कचऱ्यापासून बायोगॅस निर्मिती
४. बगॅसेस पासून वीजनिर्मिती
५. कागद उद्योग
६. मद्यार्क निर्मिती प्रकल्प

यासारखे अनेक प्रवरा सहकारी साखर कारखान्याच्या माध्यमातून सहउत्पादने करणारे उद्योग निर्माण झाले. यामुळे कारखान्याच्या वाढीबरोबरच या परिसरात रोजगाराच्या अनेक संधी निर्माण होऊन सर्वागीण विकासाला चालना मिळाली.

**उ) कारखान्याच्या कृषी विकासाच्या योजना :**

प्रवरा सहकारी साखर कारखान्याच्या पुढाकाराने शेतीच्या विकासासाठी अनेक योजना सुरु केल्या. त्यात प्रामुख्याने सिंचन प्रकल्पांतर्गत पाझर तलाव, बंधारे, पाणी उपसा योजना राबवून शेतीला पाणीपुरवठ्याची सोय केली. शेतीमधील उत्पादन वाढविण्यासाठी माती परिक्षण प्रयोगशाळा स्थापन करण्यात आले. उच्च प्रतीचे ऊस आणि इतर बियाणे यांचा पुरवठा करण्यासाठी बी-बियाणे निर्मितीचा प्रकल्प सुरु केला. ऊस संशोधन केंद्राच्या माध्यमातून ऊसाचे नमुने, रोप प्रजनन, खतांचा वापर याबाबतीत मार्गदर्शन केले जाते. आधुनिक तंत्राचा वापर करण्यासाठी शेती अवजारे आणि यंत्रे खरेदीसाठी वित्त पुरवठा केला जातो. यासारख्या योजनेद्वारे शेतीच्या विकासाला प्रोत्साहन दिले जात आहे.

**ऊ) अन्य समाजोपयोगी सुधारणा :**

प्रवरा सहकारी साखर कारखान्याच्या मदतीने ग्रामीण जीवनात विकासाचे एक नवे पर्व सुरु झाले. या सहकारी कारखान्यातून केवळ नफा हा उद्देश न बाळगता अनेक सामाजिक उपक्रम सुरु करून ग्रामीण जीवन सुधारण्याचा प्रयत्न सहकारातून करण्यात आला.

**१. प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्था :** ग्रामीण भागातील शेतकऱ्याच्या आणि या परिसरातील बहुजनांच्या शैक्षणिक विकासासाठी 'प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्था' १९६४ मध्ये स्थापन केली. या संस्थेच्या माध्यमातून प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च शिक्षणासाठी शाळा व महाविद्यालय सुरु करून शिक्षणाची सोय केली.

**२. प्रवरा सहकारी बँक :** शेतकरी, ग्रामीण व्यवसायिक, व्यापारी, उद्योजक यांना कर्जपुरवठा करण्यासाठी व इतर आर्थिक मदत करण्यासाठी 'प्रवरा सहकारी बँके'ची स्थापना १९७५ मध्ये झाली. कारखान्याच्या कार्यक्षेत्रातील सात शाखेच्या मदतीने आर्थिक व्यवहार सुरु आहेत.

**३. प्रवरा मेडिकल ट्रस्ट :** शैक्षणिक संस्थेच्या विकासाबरोबरच आरोग्यविषयक सुविधांचा लाभ ग्रामीण जनतेला उपलब्ध करून देण्यासाठी सन १९७४ मध्ये 'प्रवरा मेडिकल ट्रस्ट'ची स्थापना करून अत्याधुनिक सुविधांनी युक्त असे भव्य इस्पितळ आणि मेडिकल कॉलेज लोणी येथे सुरु केले.

**४. दुग्ध व पशुधन विकास :** प्रवरा सहकारी दुग्ध संस्थेची स्थापना करून ग्रामीण भागातील शेतकरी दुध उत्पादन वाढीसाठी प्रोत्साहन दिले. गाय, म्हैस, शेळी आणि मेढीपालन वाढविण्यासाठी प्रयत्न सुरु केले. दुभत्या जनावरांच्या चांगल्या प्रजाती निर्माण करून दूध उत्पादन वाढीसाठी लक्ष केंद्रित केले. तसेच जनावरांचा दवाखानाही सुरु करून पशुपालनाच्या व्यवसायाला प्रोत्साहन दिले.

**५. गृहनिर्माण व इतर सुधारणा :** शेतकरी, मजूर, कामगार यांच्यासाठी घराची गरज ओळखून १९८१मध्ये 'पद्मश्री डॉ. विखे पाटील ग्रामीण सहकारी गृहतारण संस्था' स्थापन करण्यात आली. या योजनेतून योग्य किमतीत २५०० पेक्षाही अधिक घरांची पूर्तता करण्यात आली. याशिवाय विवाहावरील वाजवी खर्च टाळण्यासाठी 'सामुदायिक विवाह योजना' सुरु केली. कारखाना कार्यक्षेत्रातील सर्व गावांना जोडणाऱ्या रस्त्यांची बांधणी, गरीब विद्यार्थांना आर्थिक मदत, वैद्यकीय शिबिरातून मोफत उपचार इत्यादी जनकल्याणकारी योजना राबविण्यात येऊन याभागातील विकासाला चालना दिली.

सन १९६२ पासूनच विठ्ठलराव विखे पाटील यांचे पुत्र बाळासाहेब विखे पाटील यांनी सार्वजनिक कार्यात सक्रिय सहभागी होऊ लागले. विविध संस्थेच्या माध्यमातून आपल्या वडिलांची धुरा त्यांनी पुढील काळात समर्थपणे संभाळली. विठ्ठलराव विखे पाटील फौंडेशनच्या माध्यमातून समाजपयोगी जनकल्याणाची अनेक कार्ये या परिसरात केल्याने त्याच्या या कार्याची दखल भारत सरकारने घेतली आणि विठ्ठलराव विखे पाटील यांना 'पद्मश्री' या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. अशा या कर्तुत्वान व्यक्तीचे वयाच्या ८४ व्या वर्षी २७ एप्रिल १९८०मध्ये निधन झाले. संपूर्ण महाराष्ट्रातील सहकार क्षेत्रात मात्र त्याच्या कार्याने एक वेगळा ठसा निर्माण केला.

**ए) सहकारी साखर कारखान्याची कार्य प्रणाली :**

**१. सभासदत्व :** सहकारी साखर कारखान्याचे सभासदत्व मिळविण्यासाठी ती व्यक्ती ऊस उत्पादक किवा त्याच कारखान्यात काम करणारी असली पाहिजे. अलीकडील काळात भागभांडवल निर्माण करण्यासाठी बिगर ऊस उत्पादक व्यक्तींनाही सभासदत्व दिले जात आहे.

**२. स्थानियीकरण :** ऊस क्षेत्राच्या परिसरातच साखर कारखान्याचे ठिकाण निश्चित करावे, तसेच पाणीपुरवठा, वीज, रस्ते, वाहतुकीची सोय, मजुरांचा पुरवठा इत्यादी गोष्टी विचारात घेऊनच स्थान ठरविणे आवश्यक असते.

**३. भांडवल उभारणी :** सहकारी साखर कारखान्यास आवश्यक असणारे भांडवल शेअर्सची विक्री करून उभे केले जाते, कारखाना कार्यक्षेत्रातील ऊस उत्पादक शेतकरी सभासद, राज्य सरकार आणि विविध वित्तीय संस्था यांच्या माध्यमातून भांडवलाची निर्मिती केली जाते.

**ऐ) सहकारी साखर कारखान्याचे योगदान :**

महाराष्ट्रातील विविध भागात सहकारी साखर कारखान्याच्या स्थापनेनंतर त्या ठिकाणी अमुलाग्र असा बदल झालेला आढळतो. शेतीच्या विकासाबरोबरच रोजगार निर्मिती, पूरक उद्योगधंदे, वित्तीय व शैक्षणिक संस्था यामुळे ग्रामीण जीवनात कायापालट होण्यास मदत झाली आहे.

**१. कृषिविकास :** सहकारी साखर कारखान्यामुळे कारखान्यास नियमितपणे ऊस पुरवठा करावा लागत असल्याने उसाच्या उत्पादन वाढीसाठी ऊस लागवड, बियाणे पाणीपुरवठा, खतांचे व्यस्थापन, यंत्र सामुग्री यासाठी मार्गदर्शन व प्रयत्न केले जाते.

**२. आर्थिक पाठबळ :** सहकारी साखर कारखान्यामुळे सभासद शेतकऱ्याच्या उसाला निश्चित भाव मिळू लागले. शिवाय शेतकऱ्याने काढलेल्या कर्जाची वसुली उसाच्या बिलातून होत असल्याने थकबाकीचे प्रमाण कमी झाले. त्यामुळे ऊस उत्पादक सभासद शेतकरी आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्यास मदत झाली.

**३. रोजगार निर्मिती :** सहकारी साखर कारखान्याच्या निर्मितीमुळे प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रित्या राज्यातील बेरोजगारीची प्रश्न सोडविण्यासाठी मोठ्या प्रमाणात हातभार लागला. ऊस लागवड व ऊस तोडणीसाठी मजूर, ऊस वहातुक, कारखान्यातील कामगार अशा स्वरुपात रोजगार निर्मिती होत असल्याचे दिसते.

**४. पूरक उद्योगाची वाढ :** साखर कारखान्यातील टाकाऊ पदार्थापासून अनेक पूरक उद्योग आणि

व्यवसाय सुरु केले आहेत. उदा. उसाच्या मळीपासून मद्य, स्पिरीट व रसायने तयार करणे, उसाच्या चिपाडापासून बगेसची विक्री करणे, वीजनिर्मिती करणे यासारख्या पूरक उद्योगातून कारखान्याच्या उत्पनात भर पडत आहे.

**५. ग्रामीण विकासाचे केंद्र :** ग्रामीण भागात आर्थिक कार्याबरोबरच अनेक सामाजिक उपक्रम हाती घेतले. कारखाना परिसरात शाळा व महाविद्यालय स्थापन करून शिक्षणाची सोय केली. आरोग्याच्या सुविधा उपलब्ध केल्या. ग्राहक भांडरची सोय, रस्ते व वहातुक सुधारणा यामुळे सहकारी साखर कारखाने हे विकासाचे केंद बनले.

**ओ) साखर आयुक्तालय :**

महाराष्ट्रातील साखर उद्योगाची संघात्मक व गुणात्मक वाढ, त्यांच्या गुंतवणुकीच्या समस्यांची सोडवणूक, आजारी साखर कारखान्यांचे पुनर्वसनासाठी मदत, पूरक व्यवसायाची वाढ इत्यादींचे सुयोग्य नियोजनासाठी शासनाकडून १९७१ मध्ये स्वतंत्र साखर संचालनालयाची स्थापना केली. या संचालनालयाची सन १९९१ मध्ये पुनर्रचना होऊन साखर आयुक्तालय म्हणून घोषित करण्यात आले. महाराष्ट्रात सात ठिकाणी याची प्रादेशिक कार्यालये असून यांचे प्रमुख म्हणून सहसंचालक हे कार्य पाहतात. या कार्यालयामार्फत साखर उद्योगाला अर्थ सहाय्य करणे, साखर संशोधनासाठी प्रोत्साहन देणे, नव्याने स्थापन होणाऱ्या साखर कारखान्यांना भागभांडवल उभारण्यासाठी मदत करणे इत्यादी माध्यामातून साखर उद्योगाला सहाय्य केले जात आहे.

**औ) सहकारी साखर कारखान्याच्या समस्या :**

**१. सदोष परवाना पद्धती :** साखर कारखाना स्थापन करताना शासनाकडून राजकीय दृष्टीकोनातून परवाना दिला जातो. संबधित क्षेत्रातील कारखान्यासाठी अनुकूल बाबींचा विचार न करता कारखाण्याला सुरवात झाल्याने पुढील काळात कारखाण्यात पूर्ण क्षमतेने गाळप होत नसल्याने तोटा सहन करावा लागतो.

**२. अकार्यक्षम वहातुक :** साखर कारखान्यासाठी लागणारा ऊस कारखान्याच्या परिक्षेत्रातील असेल आणि रस्ते वाहतुकी योग्य असेल तर त्याची वाहतूक वेळेत होण्यासाठी मदत होते. मात्र खराब आणि दूरच्या अंतरावरील वाहतुकीला वेळ अधिक लागल्याने उसाच्या वजनात आणि उताऱ्यात घट होते परिणामी त्याचा साखर उत्पादनावर प्रभाव पडतो.

**३. ऊस उत्पादन वाढीकडे दुर्लक्ष :** काही साखर कारखाने परिक्षेत्राबाहेरील ऊस आणत असल्याने सभासद शेतकऱ्याच्या ऊस उत्पादन वाढीकडे दुर्लक्ष केले जाते. उसाच्या नवीन प्रजातींची लागवड करणे, पाणी व खतांचे योग्य व्यस्थापनकरणे याबाबत अपेक्षित मागर्दर्शन उपलब्ध न झाल्याने उत्पादन वाढीवर परिणाम होतो.

**४. अयोग्य व्यवस्थापन :** सहकारी साखर कारखान्यात वाशिलाबाजी व राजकीय हस्तक्षेपामुळे नोकर भरती होत असल्याने तज्ञ, कुशल व अनुभवी मनुष्यबळाच्या अभावी कारखान्याचे व्यस्थापन योग्य रीतीने होत नाही.

**५. लेव्ही साखर :** सहकारी साखर कारखान्यांना आपल्या एकूण साखर उत्पादनापैकी ४०% साखर हे सरकारला लेव्ही साखर म्हणून द्यावे लागते त्याची किंमत बाजार भावापेक्षा कमी असतो त्यामुळे कारखान्यांना आर्थिक तोटा सहन करावा लागतो.

**६. कर्जाचा वाढता बोजा :** साखर कारखान्यांना सुरुवातील काही बाबतीत सवलतीचा लाभ मिळतो मात्र नंतर घेतलेल्या कर्जाची वेळेत परतफेड न केल्यास कर्जावरील व्याज वाढत जाऊन कर्जाचा बोजा कारखान्यांना सहन करावा लागतो.

**७. इतर कारणे :** सहकारी साखर कारखान्याच्या अनेक समस्या आढळतात जुनी यंत्रसामग्री, आधुनिकतेचा आभाव, शासनाला जमा करावा लागणाऱ्या महसुलातील अनिमितता, अवास्तव खर्च, राजकारणाचा वाढता प्रभाव, साखर उद्योगातील वाढती स्पर्धा, भ्रष्टाचाराची लागण यासारख्या अनेक अडचणीचा सामना सहकारी साखर कारखान्याना करावा लागत आहे.

अशा प्रकारे सहकारी साखर कारखान्याना विविध समस्यांना सामोरे जावे लागत असले तरी काही सहकारी साखर कारखाने हे 'सहकार' हे तत्व बाळगून अविरतपणे शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रात वेगळा ठसा उमटविला आहे.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न – २**

**(अ) खालील पैकी योग्य पर्याय निवडा.**

१. आशिया खंडातील पहिला सहकारी साखर कारखाना ..... यांनी सुरु केला.
   अ) वसंतराव दादा पाटील  ब) विठ्ठलराव विखे पाटील
   क) यशवंतराव मोहित  ड) पंजाबराव देशमुख

२. महाराष्ट्रातील पहिला सहकारी साखर कारखाना ..... येथे सुरु झाला.
   अ) प्रवरानगर  ब) वारणानगर
   क) सांगली  ड) सातारा

३. प्रवरा सहकारी साखर कारखान्याची स्थापना ..... मध्ये करण्यात आली.
   अ) १९४५  ब) १९५०
   क) १९५५  ड) १९६०

४. स्वतंत्र साखर संचालनालयाची स्थापना ..... मध्ये करण्यात आली.
   अ) १९६५  ब) १९७०
   क) १९७१  ड) १९७५

५. साखर कारखान्यांना ..... टक्के लेव्ही साखर सरकारला द्यावे लागते.
   अ) २५%  ब) ३०%
   क) ३५%  ड) ४०%

**(ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. ब्रिटीशांनी १९१९मध्ये कोणत्या ठिकाणी साखर कारखाना सुरु केला ?

२. प्रादेशिक साखर आयुक्तालयाचे प्रमुख कोण असतात ?

३. साखर संचालनालयाचे पुनर्रचित नाव काय आहे ?

४. प्रवरा सहकारी साखर कारखान्याचे उद्घाटन कोणाच्या हस्ते झाले?

५. विठ्ठलराव विखे यांना कोणत्या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले?

### १.२.३ सहकारी दुग्धव्यवसाय (कोल्हापूर जिल्हा सहकारी दुध संघ–गोकुळ डेअरी) :

दुध हे पूर्णान्न म्हणून ओळखले जाते. त्यामुळे मानवाच्या आहारातील एक घटक म्हणून दुग्धजन्य पदार्थाचा समावेश केला जातो. ग्रामीण भागातील शेती क्षेत्रातील अतिरिक्त लोक संख्येचा ताण आणि जलसिंचन अभावी हंगामी स्वरूपाचा शेती व्यवसाय यामुळे ग्रामीण जनतेचे उत्पन्न अल्प प्रमाणत होते. अशा परिस्थितीत सहकारी दुग्धव्यवसाय संस्थेने ग्रामीण जनतेला शेती बरोबरच दुग्धव्यवसायाची जोड दिल्याने अमुलाग्र असा बदल ग्रामीण भागात घडून आला.

भारतात सर्व प्रथम गुजरात मधील खेडा जिल्ह्यात १९४६ ला सहकरी दुग्ध संस्था स्थापन झाली. त्यानंतर गुजरात मधील आणंद येथे 'कैरा मिल्क युनियन'ची स्थापना करण्यात आली या संघामार्फत प्राथमिक संस्थेकडून दूध घेऊन शिलकी दुधापासून अनेक पदार्थ बनविण्यास सुरुवात झाली, आज हे दुग्धजन्य पदार्थ 'अमूल' या नावाने संपूर्ण देशात प्रसिद्धीस आले आहे.

**अ) राष्ट्रीय दुग्ध विकास मंडळ** (National Dairy Development Board) **:**

राष्ट्रीय दुग्ध विकास मंडळ या महत्त्वाच्या संस्थेची स्थापना १६ जुलै १९६५ मध्ये डॉ. वर्गीज कुरियन यांच्या पुढाकाराने आणंद येथे झाली. या राष्ट्रीय स्तरावरील संस्थेच्या माध्यमातून दुग्ध व्यवसाय संस्थाना भक्कम आधार देणे, वित्तपुरवठा करणे, सल्ला व मार्गदर्शन करणे, दुग्ध व्यवसायाशी संबधित प्रकल्पांना प्रोत्साहन देणे इत्यादी बाबतीत कार्य करीत आहे. याच्या मार्फतच राष्ट्रीय स्तरावर 'दूध महापूर योजना' राबविण्यात आली. परिणामी दुधाच्या दरडोई उपलब्धता वाढून भारत जगात दूध उत्पादनात प्रथम क्रमांकवर पोहचला.

**ब) महाराष्ट्रातील सहकारी दुग्धव्यवसायाची पार्श्वभूमी :**

महाराष्ट्रात सरकारी दुग्धव्यवसाय मुंबईला १९५१ मध्ये 'आरे' येथे सुरु करण्यात आला. महाराष्ट्र सरकारने १९५८ मध्ये 'दुग्धव्यवसाय विकास विभाग' स्थापन केला. या विभागाच्या पुढाकाराने १९६०–६२ या काळात मिरज, कोल्हापूर, धुळे, अहमदनगर, नागपूर, औरगाबाद, इत्यादी ठिकाणी शासकीय दुध योजना सुरु झाल्या. सन १९६४ मध्ये हा दुग्धव्यवसाय सहकारी तत्वावर सुरु करण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात आले. त्यानुसार ग्रामीण भागात प्राथमिक सहकारी दुध उत्पादक संस्था, तालुका व जिल्हास्तरावर मध्यवर्ती संस्था आणि राज्य स्तरावर शिखर संस्था म्हणून 'महाराष्ट्र राज्य सहकारी दूध महासंघाची' स्थापना १९६७ मध्ये करण्यात आली.

महाराष्ट्रातील दूध सहकारी संस्थाची रचना

महाराष्ट्र राज्य सहकारी दूध महासंघ

↓

तालुका /जिल्हास्तरावर दूध संघ

↓

प्राथमिक सहकारी दूध उत्पादक संस्था

**क) महाराष्ट्रातील सहकारी दुग्धव्यवसायाची प्रगती :**

सन १९६० नंतर महाराष्ट्रात खऱ्या अर्थाने सहकारी दुग्धव्यवसायाला सुरुवात झाली. प्राथमिक दूध सहकारी संस्था ग्रामीण भागात सकाळी आणि सायंकाळी असे दोन सत्रात दुधाचे संकलन करतात, हे संकलित दूध तालुका आणि जिल्हास्तरावरील संस्थेकडे सुपूर्द करतात. काही संस्था संकलित केलेल्या दुधावर प्रक्रिया करून दुग्धजन्य पदार्थ तयार करतात, तसेच आपल्या वितरण प्रणालीमार्फत दुधाची विक्रीही करतात.

**प्राथमिक सहकारी दूध संस्थाची प्रगती**

| अ.न. | बाब | १९६१ | १९७१ | १९८१ | १९९१ | २००१ |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | संस्था | ४३१ | २०२१ | ७८१९ | १४२८४ | २२४६६ |
| २. | सभासद | १५५ | १२६३ | ७०३० | १३१०१ | १५१८२ |
| ३. | भागभांडवल (लाखात) | ९ | ६२ | २८८ | ३१३१ | ७२४५ |
| ४. | दूध संघ | १९ | ४६ | ६० | ७१ | ७८ |

**संदर्भ :** महाराष्ट्रातील सहकारी चळवळ एका दृष्टीक्षेपात (२००१)

वरील तक्त्यावरून स्पष्ट होते की, महाराष्ट्रात प्राथमिक सहकारी दूध संस्थेच्या संख्येत आणि सभासद संख्येतही सातत्याने वाढ झालेली आढळते. तसेच तालुका आणि जिल्हास्तरावरील सहकारी दूध संघाची संख्या ७८ पर्यंत पोहचली आहे. कोल्हापूर, वारणानगर, सांगली, कराड, पुणे, पंढरपूर, अकलूज, बारामती अहमदनगर, नाशिक या भागात या सहकारी दूध व्यवसायाचा मोठ्या प्रमाणात विकास झालेला आहे. नगदी व्यवसाय म्हणून याला महत्त्व प्राप्त झाले आहे. ग्रामीण भागातील शेतकरी, अल्प भूधारक आणि शेतमजुरांना या दुग्धव्यवसायामुळे हातभार लागला आहे. एक पूरक जोडधंदा म्हणून या दुग्धव्यवसायाकडे पाहिले जाते. त्यामुळेच दिवसेंदिवस दूध उत्पादकाच्या संख्येत वाढ होत आहे. महाराष्ट्रात सर्वात जास्त दूध सहकारी संस्था कोल्हापूर विभागात आहेत. या सहकारी दूध संस्थाच्या माध्यामातून दूध, दही, ताक, लस्सी, लोणी, तूप, श्रीखंड, बासुंदी, दूध बुकटी इत्यादी विविध प्रकारच्या पदार्थाची विक्री केली जाते. त्यामळे दुग्धव्यवसायाला अधिकाधिक महत्त्व प्राप्त होत आहे.

**ड) दूध महापूर योजना :**

राष्ट्रीय दुग्धोत्पादन विकास मंडळाने देशात दुध उत्पादनात वाढ करण्याच्या उद्देशाने 'दुध महापूर योजना' सुरु केली. महाराष्ट्रात 'दूध महापूर' योजनेची अंमलबजावणी मार्च १९७० पासून सुरु केली. प्रारंभी ही योजना पहिल्या टप्प्यात कोल्हापूर आणि जळगाव या जिल्हासाठी राबविण्याचे ठरविले. त्यासाठी राष्ट्रीय दुग्धोत्पादन विकास मंडळाने १८ कोटी रु. निधी उपलब्ध करून दिला. याच कालावधीत मुंबईतील 'आरे' आणि 'वरळी' या शासकीय दुग्धशाळाचा विस्तार करण्यात आला. सन १९८१ च्या दुसऱ्या टप्प्यात महाराष्ट्र राज्य पातळीवर दुग्धव्यवसाय विकासासाठी मुंबई येथे 'महाराष्ट्र राज्य सहकारी दूध महासंघ मर्यादित' (महानंदा) स्थापन करण्यात आली. शासन व दुग्ध सहकारी संस्था यांच्यात समन्वय साधण्याचे कार्य ही संस्था करते. तर सन १९८५ पासून तिसऱ्या टप्प्यात ग्रामीण भागातील दूध संकलनास प्राधान्य दिल्याने दुग्धव्यवसायास अधिक चालना मिळाली. दूध उत्पादनाच्या क्षेत्रात महाराष्ट्रातील सहकारी दूध संस्थानी दुसरा क्रमांक पटकाविला आहे. महाराष्ट्रात सहकारी संस्थाकडून जवळपास ८५% दुधाचे संकलन केले जाते. त्यामळे महाराष्ट्रातील सहकारी चळवळीतील सहकारी दुग्धव्यवसायाला एक वेगळी प्रतिष्ठा प्राप्त झाली आहे.

**कोल्हापूर जिल्हा सहकारी दुध संघ :**

महाराष्ट्रात विविध भागात तालुका आणि जिल्हा स्तरावर अनेक सहकारी दुग्धव्यवसाय संस्था स्थापन झाल्या, त्यापैकीच एक महत्त्वाचा सहकारी दुध संघ म्हणून 'कोल्हापूर जिल्हा दुध उत्पादक सहकारी संघ' ओळखला जातो. या दुध संघाने 'गोकुळ दुध संघ' म्हणून नावलौकिक प्राप्त केला आहे. या संघामार्फत उत्पादित सर्व पदार्थ गोकुळ या ब्रँडच्या नावाने संपूर्ण भारतात वितरीत केले जाते.

**अ) स्थापना :**

गोकुळ डेअरी किंवा गोकुळ दूध संघ या नावाने प्रसिद्ध असलेला हा दूध संघ पुणे-बंगळूर राष्ट्रीय महामार्गावर कोल्हापूर शहरापासून दक्षिण पुर्वेस शिरगाव एमआयडीसी परिसरात आहे. १९६३ मध्ये 'कोल्हापूर जिल्हा दुध उत्पादक सहकारी संघ लिमिटेड' या नावाने स्थापना करण्यात आली १६/०३/१९६३ रोजी नोंदणी क्रमांक केपीआर/पीआरडी/(ए) १०२ द्वारे कोल्हापूर जिल्हा, सहकारी संस्थाच्या निबंधक यांच्याकडे नोंदणीकृत करण्यात आलेले आहे.

मार्च १९७८ मध्ये राष्ट्रीय दुग्धोत्पादन विकास मंडळाने दुधाच्या उत्पादनात मोठ्या प्रमाणात वाढ घडवून आणण्यासाठी महाराष्ट्रात 'दुध महापूर' योजेनेची कोल्हापूर आणि जळगाव या जिल्ह्यात अंमलबजावणी सुरु केली. कोल्हापूर जिल्ह्यातील दूध व्यवसायतील विकासाच्या दृष्टीने एक महत्त्वाचा टप्पा होता. या योजेने अंतर्गत १९८५ च्या अखेरीस गोकुळ शिरगाव येथील दूध संघाच्या परिसरात एक स्वतंत्र दूध प्रकल्पाची निर्मिती करण्यात आली. त्यामळे संघाच्या कार्याला गती मिळाली. कारण यापूर्वी गोकुळ डेअरीचे शीतकरण केंद्रे ही गडहिंग्लज आणि बिद्री या ठिकाणी होती. त्यामुळे दूरच्या अंतरावरून दूध वहातुक करावी लागत असल्याने अनेक अडचणी निर्माण होत असत. गोकुळ डेअरी ही 'महाराष्ट्र ओद्योगिक विकास महामंडळाने' विकसित केलेल्या गोकुळ शिरगाव क्षेत्रातील सर्वांत मोठ्या संस्थापैकी एक आहे. चांगल्या दर्जाच्या दूध आणि दुग्धजन्य पदार्थासाठी प्रसिद्ध आहे. या दुध संघाची मुख्य प्रशासकीय इमारत गोकुळ शिरगाव येथील औद्योगिक क्षेत्रात तालुका करवीर, जिल्हा कोल्हापूर येथे आहे.

**ब) गोकुळ दूध संघाची उद्दिष्टे :**

१. ग्रामीण भागातील दूध खरेदीसाठी पायाभूत सुविधा विकसित करणे.

२. दुध उत्पादकांना खात्रीशीर बाजरपेठ व सर्वोत्तम किफायतशीर भाव मिळवून देणे.

३. ग्राहकांच्या दूध आणि दुग्धजन्य पदार्थांच्या वाढत्या गरजा पूर्ण करणे.

४. दूध उत्पादन वाढविण्यासाठी दुधाळ जनावरची पैदास वाढविणे आणि गुराच्या चारा व खाद्य या संदर्भात मार्गदर्शन करणे.

५. ग्रामीण भागात सहकारी संरचना मजबूत करण्यासाठी मानवी संसाधने विकसित करणे आणि त्यांना प्रशिक्षण देणे.

६. सहकारी संस्थेचे योग्य व्यवस्थापन होण्यासाठी लोकशाहीच्या दृष्टीने जागरुकता निर्माण करणे.

७. या व्यवसायात महिलांचा सक्रीय सहभाग वाढविण्यासाठी कक्ष चालविणे.

८. संसाधनाचा प्रभावीपणे वापर करून सर्व कर्मचाऱ्यांच्या सेवेत सुधारणा करणे.

९. दूध सेवा संघाचा विस्तार करून त्यावर नियंत्रण ठेवणे.

१०. उत्पादनाचा दर्जा सातत्यपूर्ण राखून ग्राहकांचे समाधान करणे.

**क) गोकुळ दूध संघाची कार्ये :**

गोकुळ डेअरीचे मुख्य काम दुध संकलन, प्रक्रिया आणि विक्री करणे आहे. डेअरी अतिरिक्त दुधापासून लोणी, तूप, मिल्क पावडर इत्यादी पदार्थ तयार केले जातात. गोकुळ संघाचे प्रशासन, उत्पादन, दुध संकलन, वाहतूक, शीतकरण, बर्फ कारखाना, प्रशिक्षण इत्यादी विविध कार्यामध्ये विभागलेले आहे.

**१. दूध संकलन :** गोकुळ दूध संघाचे सर्वात मुख्य काम म्हणजे ग्रामीण भागातील खेडे, वाड्या वस्ती मधून दूध संकलन करणे, हे महत्त्वाचे काम प्राथमिक स्तरावरील दूध संकलन केंद्रातून केले जाते. हे संकलित केलेले दूध वहातुकीद्वारे शीतकरण केंद्रापर्यंत पोहच केले जाते.

**२. दुग्धजन्य पदार्थाचे उत्पादन :** या संस्थेमार्फत दुधावर प्रक्रिया करून त्याची विक्री केली जाते, अतिरिक्त दुधापासून विविध प्रकारचे पदार्थ तयार करून त्याची विक्री केली जाते. त्यात प्रामुख्याने लोणी, तूप, दही, बटर, श्रीखंड, आम्रखंड, लस्सी, क्रीम, दूध भुकटी (पावडर) तयार केली जाते. या माध्यामातून ग्राहकांना दर्जेदार दुग्धजन्य पदार्थाचा पुरवठा केला जातो.

**३. पशुखाद्य निर्मिती :** दुधाचे उत्पादन वाढविण्यासाठी दुधाळ गुरांसाठी पौष्टिक पशुखाद्य पुरवठा करणे आवश्यक होते. त्यासाठी संस्थेने १९८५ मध्ये १०० मेट्रिक टन दररोज पशुखाद्य निर्माण करण्यास सुरवात केली. 'महालक्ष्मी' या ब्रांडने हे पशुखाद्य दूध उत्पादकांपर्यंत पोचविले जात आहे. या पशुखाद्याची वाढती मागणी लक्षात घेऊन दररोज २०० मेट्रिक टनापर्यंत उत्पादन वाढविण्यासाठी संस्था प्रयत्नशील आहे.

**४. गोकुळ ग्राम विकास योजना :** गोकुळ दूध संघ सातत्याने आपल्या गुणवत्ता वाढीबरोबरच इतर उपक्रमही प्राधान्याने राबविते. त्यापैकीच एक महत्त्वपूर्ण योजना म्हणजे गोकुळ ग्रामविकास योजना होय. मार्च

१९९० मध्ये राष्ट्रीय दुग्धोत्पादन विकास मंडळाच्या मदतीने हा प्रकल्प कार्यान्वित करण्यात आला. या प्रकल्पांतर्गत दूध उत्पादक सभासदांना माहिती देणे, मार्गदर्शन करणे, महिला आणि युवकांचे गट स्थापन करून गटचर्चा, उद्‌बोधन याद्वारे नेतृत्व विकसित करणे, तसेच प्रशिक्षण देऊन कुशल मनुष्यबळ घडविणे इत्यादीसारख्या कार्यक्रमांतून ग्रामीण विकासासाठी गाव दत्तक घेण्याची योजना होती. त्यानुसार सुरुवातीला १७५ गावाचा समावेश या योजनेत करण्यात आला.

**५. वाढ व विस्तार :** गोकुळ दूध संघाचे कार्यक्षेत्र हे प्रारंभी मर्यादित स्वरुपात होते. दुधाच्या वाढत्या उत्पादन आणि मागणी बरोबरच त्याच्या कार्य क्षेत्राच्या कक्षाही विस्तारत गेल्या. त्यात कोल्हापूर जिल्ह्यातील करवीर, कागल, हातकणंगले, शिरोळ, पन्हाळा, शाहुवाडी, गगनबावडा, राधानगरी, भुदरगड, चंदगड आजरा गडहिंग्लज या १२ तालुक्याचा समावेश होतो. या तालुक्यातून दूध संकलन आणि वितरणाचेही कार्य चालते. सन १९८८ पासून मुंबईत दूध विक्री सुरु केली. प्रारंभी दररोज १६००० लिटर दूध वितरित केले जात होते, त्यात वाढ होऊन सद्यस्थितीत दररोज ३,००,००० लिटर दूधाचे वितरण होत आहे. सन १९९३ पासून पुण्यात गोकुळची दूध विक्री सुरु झाली. आज जवळपास दररोज दोन लाख लिटरच्यावर दुध पुरवठा केला जातो. तसेच महाराष्ट्र राज्य दुध महासंघ आणि गोवा संघराज्य यांच्यातील करारानुसार गोव्यातही नियमितपणे दुध वितरण केले जात आहे.

**६. निर्यात :** गोकुळ दूध संघाने आपल्याकडील अतिरिक्त दुधावर प्रक्रिया करून सिक्म्ड दुधाची भुकटी (पावडर) उत्पादन सुरु केले आहे. ही दुधाची पूड आंतरराष्ट्रीय मानकांनानुसार बनविले जात असल्याने विविध देशात त्याची निर्यात होत आहे. या माध्यमातून गोकुळ दूध संघाने जागतिक बाजारपेठेत यशस्वीपणे आपले पदार्पण केले आहे.

**ड) प्रशासकीय कामकाज :**

कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध संघाची विविध कार्येपार पाडण्यासाठी आणि योग्य व्यस्थापन करण्यासाठी संचालक मंडळ व प्रशासन परस्परांना सहकार्य करून या दूध संघाच्या विकासासाठी महत्त्वाची भूमिका पार पाडत आहेत.

**सभासदत्व :** गोकुळ दूध संघाचे सभासदत्व हे दोन वर्गात विभागलेले आहे. 'अ' वर्गात दूध उत्पादक सहकारी संस्था आहेत तर 'क' वर्गातील सभासद हे व्यक्तिगत रित्या दिले जाते. 'अ' वर्गातील सभासदाची संख्या ही अधिक असून व्यक्तिगत सभासद संख्या ही मर्यादित आहे.

**प्रशासन :** गोकुळ दूध संघाचा विस्तार खूप मोठा असल्याने त्याचा कारभार व्यवस्थितपणे चालविण्यासाठी उत्तम प्रशासन व्यवस्था निर्माण करण्यात आलेली आहे. संचालक मंडळ, व्यवस्थापकीय संचालक, उपमहाव्यवस्थापक, सहाय्यक व्यवस्थापक, वरिष्ठ अधिकारी, विभागीय अधिकारी, वरिष्ठ लिपिक, लिपिक, शिपाई आणि कामगार या श्रेणी नुसार गोकुळ दूध संघाचे कामकाज चालते

**इ) गोकुळ दूध संघाची प्रगती :**

कोल्हापूर जिल्हा दुध उत्पादक सहकारी संघ म्हणजेच गोकुळ दूध संघ याची स्थापनेपासून ते आतापर्यंतच्या प्रगतीची वाटचाल ही अन्य दूध सहकारी संघापेक्षा विशेष उल्लेखनीय अशा स्वरुपाची आहे. गोकुळ दूध संघाने

दूध उत्पादक आणि ग्राहकांच्या हिताबरोबरच आपल्या कर्मचारी आणि सेवक वर्गाचीही जपणूक करून आपला प्रगतीचा आलेख सातत्याने उंचावत ठेवल्याचे आढळते.

| वर्ष | सभासद | | एकूण | भांडवल | दूध संकलन | दैनदिन सरासरी | नफा | तोटा | लाभांश |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | अ | क | | | | | | | |
| १९६४ | २६ | ४१ | ६७ | १७,४०० | १८,८७३ | ७२६ | – | १४६३ | – |
| १९७४ | १५८ | ८० | २३८ | १,४०, ६०० | ८९,१७,३६० | २७,४७९ | १९,२०७ | – | ९ |
| १९८४ | ६१५ | ८२ | ६९७ | ५२,६१,७०० | ३,८१,१३,१९६ | १,०४,४२० | – | ६३०४२ | – |
| १९९४ | १४३७ | ८० | १५१७ | ११,५५,८३,३०० | १३,६१,७०,९८४ | ३,७५,१२६ | १,४६,०३,५९३ | | ११ |
| २००० | २१८८ | ८० | २४२३ | २०,८०,६४,५०० | १६,४५,२०,७०६ | ४,४९,५१० | २,१९,४०,३७२ | | ११ |

प्रारंभी केवळ ६७ सभासदाच्या मदतीने स्थापन झालेली ही संस्था आज २५०० पेक्षा अधिक सभासद संख्येच्या वर पोहचली आहे. सुरवातीला दररोज काही हजार लिटर दूध संकलन करणारी संस्था आज दैनदिन पाच लाख लिटर सरासरीपेक्षा अधिक दूध संकलन करीत आहे. यावरून या संस्थेची प्रगती दिसून येते. तसेच संस्थेने काही अपवादात्मक वर्ष वगळता सभासदाना दरवर्षी ९ ते ११% दराने लांभाश वितरीत केले आहे. यावरून संस्थेची आर्थिकदृष्ट्या वाटचाल स्पष्ट होते.

**पुरस्कार :** दुध उत्पादनाचा उच्च दर्जा आणि उत्कृष्ट गुणवत्तापूर्ण कामगिरीमुळे गोकुळला राष्ट्रीय दुग्धोत्पादन विकास मंडळाकडून अनेक वेळा पुरस्कराने गौरविण्यात आले आहे. पहिला पुरस्कार १९८८-८९ मध्ये सर्वोत्तम दुग्धजन्य पदार्थांच्या श्रेणीतील मिळाला होता. दुसरा पुरस्कार १९९२-९३ मध्ये उत्कृष्ट द्रव दूध श्रेणीतील होता. तिसरा आणि चौथा पुरस्कार सर्वोत्तम दुग्धप्रक्रिया उद्योग आणि सर्वोत्तम दुग्ध विकास आणि उत्पादन या श्रेणीतील होता. गोकुळला राष्ट्रीय उत्पादन संस्थेकडून पशुखाद्य प्रक्रियेतील सर्वोत्तम कामगिरीसाठी दोन वेळा राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित केले आहे. जागतिक गुणवत्तापूर्ण नियंत्रण उपक्रमात जागतिक व्यापार संघटना (डब्लू. टी. ओ.) ने भारतातील निवडलेल्या ३० दूध संघापैकी महाराष्ट्रातील एकमेव दूध संघ 'गोकुळम ठरला आहे.

**ई) सहकारी दुग्धव्यवसाय संस्थाचे महत्त्व :**

महाराष्ट्रातील शेतीप्रधान अर्थव्यवस्थेमध्ये सहकारी दुग्धव्यवसाय संस्थाचे महत्त्व आपणास पुढीलप्रमाणे स्पष्ट मांडणी करता येते.

**१. आहारातील दुधाचे महत्त्व :** आहारतज्ञाच्या मते प्रत्येक प्रौढ व्यक्तीला दैनदिन समतोल आहारासाठी किमान १० औंस दुधाची गरज असते. ही गरज लक्षात घेता दुग्ध उत्पादनात वाढ होणे अपेक्षित आहे त्यासाठी दुग्धव्यवसाय संस्थाची भूमिका खूप महत्त्वाची ठरणार आहे.

**२. रोजगाराच्या संधी :** सहकारी दुग्धव्यवसायामुळे ग्रामीण भागात रोजगार उपलब्ध झाले आहेत. काही भागात शेती व्यवसाय हंगामी स्वरूपाचा असल्याने रोजगारावर मर्यादा पडतात, शेतीस पूरक व्यवसाय म्हणून या सहकारी दुग्धव्यवसायास प्राधान्याने अग्रक्रम दिल्यास या व्यवसायातून विस्तृत रोजगाराच्या संधी प्राप्त करता येतात.

**३. उत्पनात वाढ :** जलसिंचन अभावी बहुतांश शेती ही हंगामी स्वरुपाची असल्याने शेतीचे उत्पन्न मर्यादितच राहते. शेतीबरोबरच जोड व्यवसाय म्हणून दुग्धव्यवसायामुळे निश्चितपणे ग्रामीण भागातील जनतेचे उत्पन्नात वाढ होण्यास हातभार लागतो. दुग्धव्यवसायातून अल्प व अत्यल्प भूधारक आणि भूमिहीन शेतमजुरांना आपल्या उत्पन्नात भर घालण्यास मदत होत आहे.

**४. बचतीस प्रोत्साहन :** ग्रामीण भागात उत्पन्नाची साधने मर्यादित स्वरुपात असल्याने बचतीचे प्रमाण खूपच कमी राहते, अशा परिस्थितीत दुग्धव्यवसायातून ग्रामीण जनतेच्या उत्पन्नात भर पडल्याने बचत करण्यासाठी प्रोत्साहन मिळाले.

**५. भांडवलाची उपलब्धता :** कोणताही उद्योग किंवा व्यवसाय करण्यासाठी भांडवलाची आवश्यकता

असते, ग्रामीण भागात असे भांडवल उभारणे अवघडच होते. मात्र सहकारी दुग्ध संस्थाच्या माध्यमातून सहजपणे भांडवल उपलब्ध होते. त्यामुळे आवश्यक साधने आणि दुभत्या पशुपालनाची पूर्तता करता येते.

**६. पूरक व्यवसाय :** दुग्धव्यवसायास ग्रामीण भागात प्रोत्साहन दिल्याने या व्यवसायाला लागणारा कच्चा माल चारा, पशुखाद्य आणि गुरासाठी लागणारा गोठा या गोष्टी सहज उपलब्ध होतात. तसेच या गुरांच्या पासून तयार होणाऱ्या खताचा वापर शेतीसाठी करता येते. त्यामुळेच दुग्धव्यवसाय हा शेतीला पूरक असा व्यवसाय आहे.

**७. योग्य मोबदला :** दुधाचे उत्पादन ग्रामीण भागातून मोठ्या प्रमाणात होते. मात्र दुधाला शहरी भागात मागणी अधिक आढळते अशा परीस्थितीत दुधाचा व्यवसाय करणारे खाजगी मध्यस्थ, दलाल व व्यापारी दूध उत्पादकांकडून कमी भावात दूध खरेदी करून शहरी भागात जास्त किंमतीला विक्री करून स्वत: नफा मिळवतात. परंतु सहकारी दूध संस्थाच्या माध्यामातून उत्पादकांना किफायतशीर मोबदला मिळण्याची हमी असते.

**८. प्रक्रिया व वितरण :** दूध हे नाशवंत पदार्थ असल्याने त्यावर प्रक्रिया करणे त्याचे योग्य पद्धतीने संकलन आणि वितरण करणे यासाठी एक निश्चित स्वरुपाची यंत्रणा असावी लागते, त्यासाठी सहकारी दूध व्यवसायाच्या माध्यमातून अशी यंत्रणा उभारता येते.

**९. सहकार्य व मार्गदर्शन :** दूध उत्पादक शेतकऱ्यांना अनेक अडचणीवर मात करण्यासाठी विविध माध्यमातून वेळोवेळी सहकार्य व मार्गदर्शन केले जाते, दुभत्या गुराच्या सुधारित जातीची शिफारस करणे, सकस चाऱ्याची निर्मिती व पुरवठा करणे इत्यादीसारख्या सेवा या सहकारी संस्था मार्फत उपलब्ध होतात.

**१०. राहणीमानात सुधारणा :** शेतीमधील अपुऱ्या उत्पन्नामुळे काही भागात ग्रामीण जीवन निकृष्ट प्रतीचे आढळते, मात्र ज्या भागात दुग्धव्यवसाय विकसित झालेला आहे त्या भागातील राहणीमानात सुधारणा होऊन जीवनमान उंचाविले आहे.

अशा प्रकारे दुग्धव्यवसाय सहकारी संस्थाचे महत्त्व ग्रामीण भागात वाढत आहे. या दुग्धव्यवसायामुळे ग्रामीण भागात रोजगाराच्या संधी निर्माण होऊन तेथील जनतेच्या उत्पन्नात वाढ होऊन निश्चितपणे त्याचे जीवनमान उंचविण्यास हातभार लागला आहे.

**म ) दुग्धव्यवसाय सहकारी संस्थाच्या समस्या :**

ग्रामीण भागात दुग्धव्यवसाय सहकारी संस्थाचे महत्त्वाचे स्थान असले तरी या व्यासायालाही इतर सहकारी संस्थाप्रमाणे अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. यातील काही प्रमुख समस्येची मांडणी पुढीलप्रमाणे केली आहे.

**१. व्यवस्थापनेचा अभाव :** दूध हे नाशवंत पदार्थ असल्याने त्यावर योग्य प्रक्रिया करून त्याचे वितरण वेळेत करणे आवश्यक असते. त्यासाठी उत्तम प्रकारे व्यस्थापन करावे लागते. योग्य व्यस्थापनेच्या अभावामुळे अपुरा दूधपुरवठा, उत्पादित दुग्धजन्य पदार्थाचे वितरण, वहातुक व्यवस्था या बाबतीत अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते.

**२. अपुरा वित्तपुरवठा :** दुग्धव्यवसायासाठी आवश्यक ते भांडवल वेळेत उपलब्ध होत नाही. अल्पभूधारक, शेतमजुरांना कर्जपुरवठा होत नाही. तसेच प्राथमिक दूध संस्थाना संघाकडून अपुरा वित्त पुरवठा होत असल्यामुळे या संस्थेच्या कार्यक्षमतेवर मर्यादा येत आहेत.

**३. दूध दरात तफावत :** शासनाकडून दुधाचा प्रति लिटर दर ठरवून दिला जातो. पण गाव पातळीवर दराच्या बाबतीत तफावत आढळते. काही संस्था किमान दरही देत नाहीत. त्यामुळे दूध उत्पादक खाजगी संस्थाकडे आकर्षित होत आहेत.

**४. भेसळ व गैरप्रकार :** दुधाला चांगली किंमत मिळत असल्याने भ्रष्ट प्रवृत्तीमुळे दुधात भेसळ करण्याचे प्रमाण वाढत आहे. सोडा, मीठ, साखर यासारख्या घटकांचा वापर करून अनेक गैरप्रकार केले जातात. परिणामी असे भेसळयुक्त दूध आरोग्यास हानीकारक ठरत आहे.

**५. पशुधनात घट :** बदलत्या हवामानामुळे पिक परिस्थितीत बदल होत आहेत परिणामी सुका व हिरव्या चाऱ्याच्या कमतरतेमुळे त्याच्या किंमतीत वाढ होत आहे. दुधाचे उत्पादन आणि त्यावरील खर्च हा परवडत नसल्याने पशुधनात घट होत आहे.

**६. यंत्रसामुग्री व साधनाचा अभाव :** दूध संकलनासाठी आवश्यक ती यंत्र सामुग्री ग्रामीण भागात उपलब्ध होत नाही, विजेच्या अभावी शीतगृहे निकामी ठरतात. तसेच दुग्धजन्य पदार्थ बनविण्यासाठी आवश्यक साधने मुबलक प्रमाणात उपलब्ध नसल्यामुळे दुधाची नासडी होते.

**७. खाजगी संस्थाशी स्पर्धा :** अलीकडील काळात अनेक खाजगी दूध व्यवसायिक ग्रामीण भागात आपले जाळे निर्माण करीत आहेत परिणामी सहकारी दूध संस्थाना अशा खाजगी व्यवसायिकांशी स्पर्धा करावी लागत आहे.

अशा प्रकारच्या अनेक समस्या या दुग्धव्यवसाय सहकारी संस्था समोर आहेत. तरी यावर सक्षमपणे मात करून निश्चितच ग्रामीण भागातील जीवनमान उंचविण्यासाठी सहकारी दूध संस्थाचे योगदान खूप मोठे आहे. शहरी भागातील जनतेला किफायतशीर दरात दूध उपलब्ध करून देण्याचे सहकाराचे कार्य या संस्था करीत आहेत.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न – ३**

**(अ) खालील पैकी योग्य पर्याय निवडा.**

१. भारतात सर्व प्रथम ..... जिल्ह्यात सहकारी दूध संस्था स्थापन झाली.

अ) सूरत ब) आणंद

क) खेडा ड) बडोदा

२. महाराष्ट्र राज्य सहकारी दूध महासंघाची स्थापना ..... मध्ये झाली.

अ) १९६६ ब) १९६७

क) १९६८ ड) १९६९

३. कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध संघ ..... दुध संघ या नावाने ओळखली जाते.

अ) अमूल ब) कुष्णा

क) वारणा ड) गोकुळ

४. कोल्हापूर जिल्हा दूध उत्पादक सहकारी संघाची स्थापना ..... मध्ये झाली.

अ)१९६३ ब) १९६५

क) १९६६ ड) १९६८

५. महाराष्ट्रात दूध महापूर योजना ..... पासून अंमलात आली.

अ) मे १९७५ ब) मार्च १९७८

क) एप्रिल १९८० ड) जून १९८२

**(ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. राष्ट्रीय दुग्ध विकास मंडळाची स्थापना कोणाच्या पुढाकाराने झाली ?

२. महाराष्ट्रात सरकारी दुग्धव्यवसाय केंद्र सर्वप्रथम कुठे सुरु करण्यात आला ?

३. महाराष्ट्रात राज्य पातळीवर दुग्ध विकासासाठी कोणती संस्था स्थापन झाली ?

४. गोकुळ दूध संघामार्फत कोणत्या ब्रान्डने पशुखाद्य निर्मिती केली जाते?

५. गोकुळ ग्राम विकास योजनेला केव्हा सुरुवात झाली ?

### १.२.४ सहकारी सूतगिरणी (डेक्कन सहकारी सूतगिरणी इचलकरंजी) :

कापूस या नगदी पिकावर प्रक्रिया करून कापडाच्या निर्मितीसाठी आवश्यक असणाऱ्या सुताचे उत्पादन करणारी प्रक्रिया संस्था म्हणजे 'सूतगिरणी' होय. सहकारी प्रक्रिया संस्था मध्ये सहकारी सूतगिरणी उद्योगाचा दुसरा क्रमांक लागतो. सहकारी चळवळी मध्ये साखर कारखान्या इतकेच महत्त्व सहकारी सूतगिरणी संस्थाना आहे. महाराष्ट्र, गुजरात, आंध्रप्रदेश, तामिळनाडू या कापूस उत्पादन करणाऱ्या राज्यात प्रामुख्याने सहकारी सूतगिरण्या अधिक प्रमाणात स्थापन झालेल्या आपणास आढळतात.

**अ) महाराष्ट्रातील सूतगिरणी उद्योग :**

भारतात पहिली सूतगिरणी सन १९५४ मध्ये मुंबई येथे कावसजी नानाभाई दावर यांनी सुरु केली. कापूस विणकरांनी एकत्रित येऊन पहिली सूतगिरणी आंध्रप्रदेश मध्ये स्थापन केले. आपल्या सभासदाच्या कापसाला योग्य किंमत मिळावी म्हणून त्याचे सूत काढणे व विकणे या उद्देशाने कापूस उत्पादकांनी सूतगिरण्या स्थापन केल्या. महाराष्ट्रात पहिली सूतगिरणी इचलकरंजी येथे 'कोल्हापूर जिल्हा शेतकरी विणकर सहकरी संस्था' या नावाने स्थापन झाली. महाराष्ट्रात सहकारी सूतगिरणी संस्थेने उल्लेखनीय असे कार्य केले आहे. सन १९६१ मध्ये केवळ दोन सूतगिरण्या होत्या. त्याचे सभासद ३०० होते. २००१ पर्यंत ही संख्या २०० पर्यंत पोहचली. महाराष्ट्रात परळ, दादर, (मुंबई) ठाणे, नागपूर, वर्धा, अकोला, धुळे, जळगाव, येवला, मालेगाव, औरंगाबाद, नांदेड, सोलापूर, बार्शी, कोल्हापूर, इचलकरंजी इत्यादी ठिकाणी कापड गिरण्यांची केंद्रे निर्माण झाली.

शेतकऱ्याने उत्पादित केलेल्या कापसाचे पिंजण करणे, कापसाच्या गासड्या बांधणे, बांधलेल्या गासड्याचे सुत तयार करणे, ते सुत कापड गिरण्यांना विकणे इत्यादी कार्ये सूतगिरण्यांना करावी लागतात. त्याशिवाय कापसाच्या सरकीपासून खाद्यतेल आणि पशुखाद्य (पेंड) तयार करण्याचा उद्योग सहकार क्षेत्रात चालतो. सुतापासून तयार केलेल्या कापडाची निर्यात मोठ्या प्रमाणात केली जाते.

कापूस उत्पादकांना हमीभाव मिळावा म्हणून महाराष्ट्र शासनाने १९७२ मध्ये कापूस खरेदीच्या संदर्भात 'कापूस एकाधिकार खरेदी योजना' सुरु केली. सरकीपासून तेल काढण्याचे कारखाने सुरु करण्यात आले आहेत. भारताच्या निर्यात व्यापारात कापड उद्योगाला महत्त्वाचे स्थान आहे. कापूस उत्पादकांनी स्थापन केलेल्या गिरण्या तसेच जिनिग-प्रेसिंग सहकारी संस्था आपल्या सभासदासाठी सुताचे उत्पादन आणि पुरवठा करण्यासाठी विणकरांनी एकत्र येऊन सूतगिरण्या स्थापन केल्या. महाराष्ट्रामध्ये गेल्या ५० वर्षात सहकारी सूतगिरणी संस्थांनी उल्लेखनीय अशी प्रगती केली आहे. कापूस उत्पादक शेतकऱ्याच्या हितासाठी 'महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक पणन महासंघ' ही शिखर संस्था नागपूर येथे स्थापन करण्यात आली आहे.

**ब) इचलकरंजीमधील सहकारी चळवळ :**

मराठा राजवटीत नारो महादेव जोशी यास संताजी घोरपडे याच्याकडून इनाम म्हणून इचलकरंजी हे ठिकाण मिळाले, नारोनी आपल्या धन्याची सतत आठवण ठेवण्याच्या हेतूने घोरपडे हे आडनाव स्वीकारले. या घराण्यातील आठवे वंशज श्रीमंत नारायणराव हे १८९२ मध्ये इचलकरंजी जहागिरी पदावर आले. त्यांनी आपला युरोपचा दौरा करून आल्यानंतर आपल्या जनतेच्या हितासाठी अनेक नवीन प्रशासकीय आणि भौतिक सुधारणा केल्या. येथील विणकरांना आर्थिक मदत करून वस्त्रोद्योगाला चालना दिली. प्रारंभी किरकोळ स्वरुपात हातमागाचा व्यवसाय चालत होता. हातमाग चालविणाऱ्या विणकरांना भांडवल पुरवठा करून सूत व रेशीम रंगविण्याचे कामाला गती दिली. आधुनिक इचलकरंजीची पायाभरणी आणि औद्योगिक केंद्र स्थापन करण्याचे श्रेय श्रीमंत नारायणराव यांना दिले जाते. श्रीमंत नारायणराव मुंबई येथील राज्य परिषदेत आर्यलंड मधील सहकारी चळवळीवर अभ्यासपूर्ण भाषण केले. त्यांनी सहकाराचे महत्त्व ओळखले होते म्हणून इचलकरंजी मध्ये सहकाराची मुहर्तमेढ रोवली.

**क) इचलकरंजीमधील सूतगिरणी उद्योग :**

कोल्हापूर जिल्ह्यातील पंचगंगा नदीच्या काठावर इचलकरंजी हे शहर वसलेले आहे. महाराष्ट्राचे 'मँचेस्टर' म्हणून प्रसिद्ध असलेल्या इचलकरंजी येथे मोठ्या प्रमाणात सूतगिरणी आढळतात. दक्षिण महाराष्ट्रातील कापड उद्योगाचे एक महत्त्वाचे केंद्र आहे. इचलकरंजीला वस्त्रोद्योग क्षेत्रात विशिष्ट ओळख निर्माण करण्यात सहकारी सूतगिरण्याचे योगदान खूप मोठे आहे. या भागात कापसाचे उत्पादन फारसे होत नसतानाही कापसावर आधारित वस्त्रोद्योग निर्माण होऊन त्याचा मोठ्या प्रमाणात विस्तार होणे ही विशेष बाब मानली जाते. जवळपास ५० हजारपेक्षा अधिक विणकर कामगार यात गुंतलेले आहेत.

श्रीमंत नारायणराव यांनी सन १९०२ मध्ये तरुण यंत्रमाग व्यासायिक विठ्ठल दातार यांना मुंबई येथील यंत्र सामुग्री प्रदर्शनास पाठवून 'शेफिल्ड' हे आधुनिक यंत्रमाग इचलकरंजीत आणले. सन १९०४ मध्ये श्रीमंत नारायणराव यांच्या मदतीने विठ्ठल दातारांनी 'व्यंकटेश रंगू तंतू मिल' या नावाने ओळखला जाणारा पहिला

पाँवरलूम कारखाना सुरु केला. आधुनिक यंत्रमाग गिरणीचा पाया इचलकरंजीत घातला गेला. या गिरणीला मिळालेले यश पाहून इतरांनी प्रेरणा घेऊन अनेक यंत्रमाग सुरु केले. सन १९०७ मध्ये श्रीमंत घोरपडे यांनी जिनिग कारखाना सुरु करून इचलकरंजीमधील वस्त्रोद्योगाला प्रोत्साहन दिले. यासाठी कसबी कारागीर बाहेरून आणले. बुगड, कांबळे, मराठे, सांगले या सारख्या कुटुंबानी आपल्या योगादानाद्वारे हा व्यवसाय वाढविला.

प्रारंभी केवळ पांढरे धोतर तयार केले केले जात होते. पहिल्या महायुद्धा नंतर रंगीत कापड तयार करण्यास सुरुवात झाली. या उद्योगांना पतपुरवठा नियमितपणे व्हावा या हेतूने 'इचलकरंजी अर्बन बँकेची स्थापना करण्यात आली.२० व्या शतकाच्या प्रारंभी ३०० च्या आसपास यंत्रमाग होते १९२० सालापर्यंत ही संख्या सुमारे १४०० च्या वर गेली. बाबासाहेब खंजिरे, दत्ताजीराव कदम, रत्नाप्पा कुंभार या सारख्या नेत्यांनी इचलकरंजीत सहकार चळवळीचा अधिक विस्तार केला. त्यामळे नंतरच्या काळात या परिसरात अनेक सहकारी सूतगिरण्याबरोबरच सायझिंग प्रोसेसिंग कारखाने देखील सहकारी तत्वावर उभे राहिले. याचे सर्वस्वी श्रेय हे सहकारी चळवळीला दिले जाते.

**ड) सहकारी सूतगिरणी चळवळ :**

महाराष्ट्रातील सहकारी सूतगिरणीच्या विकासात इचलकरंजीमधील सहकारी सूतगिरणी चळवळीचे खूप मोठे योगदान आहे म्हणून इचलकरंजीमधील सूतगिरणीशी संबधित काही प्रमुख सहकारी संस्था आणि संघटना यांचा आढवा घेणे महत्त्वाचे आहे.

इचलकरंजीमधील हातमाग विणकरांना प्रामुख्याने नियमितपणे सूत पुरवठा करणे आणि सभासदांना विणकामासाठी आवश्यक असणारे कच्चा माल वाजवी किंमतीत उपलब्ध करून देण्याच्या हेतूने काही हातमाग धारक एकत्रित येऊन 'इचलकरंजी हातमाग सहकारी संघटना मर्यादित' या संस्थेची स्थापना २६ जुलै १९४५ मध्ये करण्यात आली. तसेच हातमाग धारकांना तारण वस्तूवर कर्ज पुरवठा करून येथील हातमाग विणकामाला प्रोत्साहन देणे हे या संस्थेचे उदिष्ट होते. प्रारंभी केवळ ४१ सभासद आणि १०००० भागभांडवलावर या संस्थेने आपले कार्य सुरु केले.

इचलकरंजीमध्ये विणकाम करणाऱ्या मध्ये 'साळी' या जातीचे लोक मोठ्या प्रमाणात होते. या जातीतील लोकांनी आपल्या हितासाठी १९४५ मध्ये 'श्री स्वकुळ साळी सहकारी विणकरी संघ' स्थापन केला. तसेच इचलकरंजीमधील इतर हातमाग विणकर एकत्रित येऊन १३ ऑगस्ट १९४५ मध्येच 'मध्यवर्ती सहकारी हातमाग विणकर संघ मर्यादित' या नावाची संस्था स्थापन केली. विणकरांना किफायतशीर किंमतीत कच्चा माल उपलब्ध करून देणे, तयार मालावर कर्ज देणे, योग्य मोबदल्यात सूताची खरेदी आणि विक्री करण्याच्या हेतूने या संस्थेची स्थापना करण्यात आली. हातमाग उद्योगाला उत्तेजन देण्यासाठी सन १९४८ मध्ये मध्यवर्ती हातमाग विणकर सहकारी संघ लि. कोल्हापूर जिल्हा या संस्थेचे प्रधान कार्यालय इचलकरंजी येथे सुरु करण्यात आले. दुसऱ्या महायुद्धानंतर जगातिक स्तरावर अनेक बदल घडून आले. इचलकरंजीमधील यंत्रमागधारकांनी आपल्या अडचणी सोडविण्यासाठी आणि यंत्रमाग उद्योगाला चालना देण्याच्या हेतूने ऑगस्ट १९४८ मध्ये 'इचलकरंजी यंत्रमाग विणकर संघटनेची' स्थापना केली. या संघटनेच्या माध्यमातून यंत्रमागधारकांना वाजवी किंमतीत कच्चा माल आणि इतर साहित्य उपलब्ध करून दिले, तसेच अर्थ पुरवठा करण्यासाठी सहाय्य केले. यामुळे या

उद्योगाचा विकास झाला. इचलकरंजीमधील विविध हातमाग आणि यंत्रमागधारकांनी उत्पादित केलेल्या सुतावर प्रक्रिया करण्यासाठी मुंबई सहकारी संस्था कायद्या अंतर्गत 'लक्ष्मी प्रक्रिया सहकारी संस्था मर्यादित इचलकरंजी' या संस्थेची स्थापना ऑगस्ट १९५८मध्ये करण्यात आली.

**दि. डेक्कन को–ऑम रेटिव्ह स्पिनिग मिल्स लिमिटेड :**

इचलकरंजीमधील ही एक आघाडीची स्पिनिग मिल म्हणून ओळखली जाते. सूतगिरणीच्या उद्योगात या मिलने महत्वाची भूमिका बजावली आहे. इचलकरंजी येथील पहिली सहकारी सूतगिरणीची स्थापना ही एका विशेष अशा घटनेवरून झालेली आहे. सन १९५९ मध्ये दिवाळीच्या काळात मिरज रेल्वे स्टेशनवर अचानक रामचंद्र दत्तात्रय गोवंडे यांची आबासाहेब खेबुडकर यांच्याशी झाली हे दोघे पूर्वीचे शालेय मित्र होते. गोवंडे हे गुलबर्गा येथील एका मोठ्या स्पिनिग मिलचे जनरल मॅनेजर म्हणून कार्यरत होते, तर खेबुडकर हे खासदार होते. या दोघाची पुन्हा सांगलीतील भेटी दरम्यान आपल्या भागातच मिल काढण्यासाठी परस्पराच्या सहकार्याने प्रयत्न करण्याचे ठरले. त्यानुसार आबासाहेब खेबुडकरनी इचलकरंजी येथील आपले सहकारी मित्र दत्ताजीराव कदम, अनंतराव भिडे, पंडितराव सावनुरे, ताराचंदजी बोहरा, वसंतराव दातार या प्रमुख व्यक्तीची बैठक आयोजित केली या बैठकीतील चर्चेनुसार सहकारी तत्वावर मिल काढण्याचे निश्चित झाले.

**अ) डेक्कन मिल स्थापना :**

इचलकरंजी मध्ये सहकारी तत्वावर सर्वात मोठी मिल उभी करण्यासाठी मोठ्या जागेचा प्रश्न होता. वसंतराव दातार यानी आपली २६ एकर जमीन या मिलसाठी मोफत देऊन जागेची अडचण दूर केली. अनंतराव भिडे आणि त्यांचे सहकारी यांनी सायकलवरून फिरून शेअर्स गोळा केले. दि. डेक्कन को–ऑम रेटिव्ह स्पिनिग मिल्स लिमिटेड इचलकरंजी या संस्थेची नोंदणी क्रमांक पी.२९७५/१९६० दिनांक ३/१०/१९६० नोंदणीकृत करण्यात आले. अशा रीतीने विविध व्यक्तीच्या प्रयत्नाने या नव्या मिलची मुहूर्तमेढ रोवण्यात आली. पूर्वीच ठरल्याप्रमाणे रामचंद्र गोवंडे यांनी गुलबर्गा येथील आलिशान कार्यालयातील जनरल मॅनेजरच्या नोकरीचा त्याग करून आपल्या भागाच्या विकासासाठी या नव्याने स्थापन झालेल्या मिलचे पहिले संथापक मॅनेजर बनले. या मिलचे १९६१ मध्ये तत्कालीन भारताचे राष्ट्रपती डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. अशा प्रकारे 'दि. डेक्कन को–ऑपरेटिव्ह स्पिनिंग मिल्स लिमिटेड' या भारतातील सहकारी तत्वारील पहिल्या मोठ्या सूतगिरणीची स्थापना झाली.

**ब) उत्पादन आणि विस्तार :**

इचलकरंजीमध्ये या सूतगिरणी मध्ये प्रारंभी १२००० स्पिंडलच्या क्षमतेसह उत्पादन १८ नोव्हेंबर १९६२ रोजी सुरु केले. आज ८०००० हून अधिक स्पिंडल आणि ५०० च्या वर रोटर आहेत. एवढ्या मोठ्या प्रमाणात झालेला हा विस्तार आश्चर्यकारक असा आहे. केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण भारतात सहकारी क्षेत्रात अग्रेसर संस्था मानली जाते. सन १९६१ ते १९७५ या दरम्यान दि डेक्कन मिलने खूप मोठी भरारी घेतली. हा काळ इचलकरंजीमधील वस्त्रोद्योगाच्या दृष्टीने सुवर्णकाळ मानला जातो.या मिल पासून प्रेरणा घेऊन अनेक सहकारी सूतगिरणीचा जन्म झाला म्हणून या संस्थेला इचलकरंजीतील सहकारी सूतगिरणीची जननी मानली जाते. भारतातील कापड उद्योगात सहकारी क्षेत्रातील पहिले आणि सर्वात मोठी सूतगिरणी म्हणून या गिरणीला

विशेष प्रतिष्ठा आहे.या सूतगिरणीने आपले व्यवस्थापन योग्य प्रकारे करून सूत उद्योगातील विविध प्रक्रियेत लक्षणीय अशी प्रगती केली आहे. शिवणकामाच्या विविध श्रेणीतील दर्जेदार धाग्याचे उत्पादन केले. आर्थिक मंदीच्या काळातही उत्पादन प्रकियेत विविधता आणून आर्थिकदृष्ट्या संस्थेला सक्षम बनविले. यांचे श्रेय निश्चितपणे या संस्थेच्या सभासदांना व व्यवस्थापन समितीला दिले जाते.

**क) निर्यात :**

डेक्कन मिल मध्ये उत्पादित झालेल्या मालाला योग्य बाजारपेठ निर्माण होणे हे अत्यंत आवश्यक होते. मुंबई, सूरत आणि कलकत्ता या सारख्या मोठ्या बंदराच्या ठिकाणापासून दूर असलेल्या इचलकरंजीमधील मालासाठी मागणी असणे आव्हानात्मक होते, मात्र केवळ दर्जेदार आणि उत्कृष्ट गुणवत्तापूर्ण उत्पादनाच्या जोरावर आंतरराष्ट्रीय स्तरावर बाजारपेठेत या मिलने आपली ओळख निर्माण केली. या संस्थेने मोठ्या प्रमाणात मालाची निर्यात करून देशाच्या आर्थिक विकासात मोलाचे योगदान दिले आहे. सन १९८० ते ९० या दशकात या संस्थेने कापसाच्या धाग्याच्या निर्यातीमधून परकीय चलनाचे मूल्य दर्शविले आहे.

| अ. न. | वर्ष | प्रमाण (टनात) | मूल्य (कोटीत) |
|---|---|---|---|
| १. | १९८०-८१ | ६४० | २.२३ |
| २. | १९८३-८४ | ९९४ | ३.८० |
| ३. | १९८५ -८६ | १८४५ | ६.१८ |
| ४. | १९८७ -८८ | २९९८ | १३.७७ |
| ५. | १९८९-९० | २७८४ | १७.७० |

या मिलमधील धाग्याची निर्यात मोठ्या प्रमाणात केली जाते एकूण उत्पादनाच्या १५% इतके प्रमाण आहे. मिलमधील व्यवस्थापनाने दूरदृष्टीने नियोजनबद्ध उत्पादनात विविधता निर्माण केल्यानेच निर्यातीला चालना मिळाली. परिणामी सभासदाच्या जबाबदारी बरोबरच लहान मोठे यंत्रमाग आणि हातमागधारक यांच्या हिताची जोपासना केली जाते.

**ड) आधुनिकीकरण :**

या मिलने सातत्याने आपले उत्पादन आणि बाजारपेठ टिकविण्यासाठी नूतनीकरण आणि आधुनिकीकरणास प्राधन्य दिले आहे. बाजारपेठेतील आपली गुणवत्ता अबाधित ठेवण्याकरिता विविध प्रकारचे आधुनिक यंत्रणा विकसित करून कमी खर्चात अधिक चांगले दर्जेदार निर्यातक्षम धागा उत्पादनाला महत्त्व दिलेले आहे. खर्चावर नियंत्रण ठेवून विविधतापूर्ण मालाचे उत्पादन वाढविण्यासाठीयेथील व्यवस्थापन सतत प्रयत्न करीत आहे.

**इ) कामगार हितरक्षण :**

या संस्थेच्या कामकाजाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे संस्था चालक आणि कामगार यांच्यातील

सलोख्याचे संबध होय. या मिलचे संस्थापक संचालक दत्ताजीराव कदम याच्यासारख्या कुशल नेतृत्वामुळे कामगाराच्या हिताची जोपासना झाल्यामुळे वाद-विवाद, संप, आंदोलन यासारखे प्रश्न कधी निर्माण झाले नाहीत. मिल व्यवस्थापनाला अखंडपणे पांठिबा देणाऱ्या निष्ठावान कामगारांचेही योगदान मोठे आहे. येथील प्रतिनिधी संघटना, पदाधिकारी, कामगार या सर्वाच्या सहकार्यामुळे एक वेगळेपण या संस्थेने जोपासले आहे.

**ई) डेक्कन सूतगिरणीचे योगदान :**

सहकार क्षेत्रातील इतर सहकारी संस्थे प्रमाणेच डेक्कन सहकारी सूतगिरणी संस्थेने सामाजिक जाणिवेचे भान ठेवून इचलकरंजी परिसरातील विकासाबरोबरच सूतगिरणी उद्योगाच्या वाढीसाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे.

**१. डेकोस्पिन चॅरिटेबल ट्रस्ट :** इचलकरंजीमधील सामाजिक आणि आर्थिक जाणीवेतून समाजामधील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी मदत करण्याच्या हेतूने 'डेकोस्पिन चॅरिटेबल ट्रस्ट' या नावाने संस्था स्थापन करून सामान्य जनतेच्या हितासाठी अनेक उपक्रम आणि योजना सुरु केल्या आहेत.

**२. डेकोस्पिन रिसर्च फाउंडेशन :** यंत्रमाग उद्योगाच्या प्रसार आणि विकासासाठी 'डेकोस्पिन रिसर्च फाउंडेशन'ची स्थापना करण्यात आली. याच्या माध्यामातून लहान यंत्रमागधारकांना तांत्रिकदृष्ट्या सक्षम बनविणे, उत्पादनात विविधतापूर्ण कौशल्य विकसित करणे, वाढत्या स्पर्धा आणि समस्यांबाबत सल्ला देणे इत्यादी बाबतीत ही संस्था मार्गदर्शक म्हणून कार्यरत आहे. सूतगिरणी उद्योगातील संशोधनासाठी अत्याधुनिक प्रयोगशाळेतून प्रयत्न होत आहेत.

**३. 'दत्ताजीराव कदम टेक्निकल एज्युकेशन' :** इचलकरंजी आणि आसपासच्या परिसरात वाढत्या सूतगिरणी उद्योगासाठी कुशल मनुष्यबळाची आवश्यकता होती. कर्मचारी वर्ग, प्रशिक्षित पर्यवेक्षक याची गरज भागविण्यासाठी या सहकारी सूतगिरणीच्या पुढाकाराने 'दत्ताजीराव कदम टेक्निकल एज्युकेशन' सोसायटीची स्थापना करण्यात आली.

इचलकरंजीसारख्या ग्रामीण भागात ओद्योगिक विकासाबरोबरच आर्थिक प्रगती साधण्यासाठी या मिलने महत्वाची भूमिका पार पाडली आहे. या मिलच्या विस्ताराचा इचलकरंजी आणि आसपासच्या भागावर दूरगामी परिणाम झाला. या भागात सहकार चळवळीला चालना मिळाली, या संस्थेच्या प्रेरणेने सहकार क्षेत्रात बँकिग, गृहनिर्माण, ग्राहकसंस्था यांचा विस्तार झाला. थोडक्यात इचलकरंजी भागात सहकारी चळवळीने केलेल्या सर्वांगीण विकासात या मिलचे फार मोठे योगदान आहे.

अशा प्रकारे श्रीमंत नारायणराव यांच्या दूरदृष्टी आणि आधुनिक विचारामुळे इचलकरंजी नगरीचा पाया घातला गेला, सहकारी तत्वाने प्रेरित होऊन विविध संस्था स्थापन करण्यासाठी लाभलेले कुशल नेतृत्व, संस्थाच्या विकासासठी झटणारे कार्यकर्तेयामुळे सहकारी चळवळीचा विस्तार मोठ्या प्रमाणात झाला. इचलकरंजी आणि आसपासच्या परिसरात सहकारी सूतगिरणीच्या माध्यामातून कायापालट झालेला आहे. सूतगिरणी उदोयागाच्या वाढीबरोबरच वाढत्या लोकसंख्येमुळे या शहराचा झपाट्याने विस्तार झाला आहे. त्यामुळेच इचलकरंजी हे पश्चिम महाराष्ट्रातील वस्त्रोद्योगाबरोबरच सहकारचे एक प्रमुख केंद्र बनले आहे.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न – ४**

**(अ) खालील पैकी योग्य पर्याय निवडा.**

१. भारतात पहिली कापड गिरणी ..... मध्ये स्थापन करण्यात आली.

अ) मुंबई ब) कलकत्ता

क) सुरत ड) दिल्ली

२. महाराष्ट्राचे 'मँचेस्टर' म्हणून ..... हे शहर प्रसिद्ध आहे.

अ) मालेगाव ब) सोलापूर

क) नाशिक ड) इचलकरंजी

३. डेक्कन सहकारी सूतगिरणीच्या विकासासाठी ..... यांचे कुशल नेतृत्व लाभले.

अ) रत्नाप्पा कुंभार ब) बाळासाहेब माने

क) दत्ताजीराव कदम ड) यापैकी नाही

४. श्रीमंत नारायणराव घोरपडे यांनी ..... मध्ये जिनिंग कारखाना सुरु केला.

अ) १९०५ ब) १९०७

क) १९०९ ड) १९१०

५. डेक्कन मिलचे पहिले संथापक मॅनेजर ..... होते.

अ) विठ्ठल दातार ब) दत्ताजीराव कदम

क) रामचंद्र गोवंडे ड) यापैकी नाही

**(ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. आधुनिक इचलकरंजीचा पाया कोणी घातला ?

२. इचलकरंजी येथे कुशल मनुष्यबळ विकासासाठी कोणत्या संस्थेची स्थापना झाली?

३. इचलकरंजी मधील पहिला पॉवरलूम कोणत्या नावाने सुरु झाला ?

४. इचलकरंजी येथे यंत्रमाग उद्योगाच्या प्रसार आणि विकासासाठी कशाची स्थापना केली ?

५. इचलकरंजीमधील विणकाम करणाऱ्या साळी समाजाने कोणती संस्था सुरु केली ?

## १.३ सारांश :

सहकारी साखर कारखाने, सहकारी दूध संघ आणि सहकारी सूतगिरणी या तीन क्षेत्रातील उद्योग व्यवसायामुळे महाराष्ट्रातील ग्रामीण भागात विकासाचे एक नवे पर्व निर्माण झाले. ग्रामीण भागात रोजगार निर्मिती आणि ग्रामीण राहणीमान सुधारणेसाठी सहकार चळवळीची उल्लेखनीय कामगिरी आढळते. साखर कारखान्याच्या माध्यामातून अनेक सहकारी पतसंस्था, बँका, पाणीपुरवठा संस्था, शैक्षणिक संस्था स्थापन झाल्याने त्या

कारखान्यांच्या परिक्षेत्रातील विकासाला हातभार लागला. तसेच विविध ठिकाणी सामाजिक जाणिवेतून आरोग्य सुविधा पुरविण्याससाठी ट्रस्टच्या माध्यमातून इस्पितळाची निर्मिती केली. निश्चितच ग्रामीण भागातील जीवनमान उंचविण्यासाठी सहकारी साखर कारखाने, सहकारी दूध संस्था आणि सहकारी सूतगिरणी यांचे योगदान खूप मोठे आहे.

एकंदरीत आधुनिक महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी सहकार चळवळीचे योगदान फार मोठे आहे. सहकारी चळवळीतून निर्माण झालेल्या उद्योग आणि व्यवसायाने दर्जेदार आणि उत्कृष्ट गुणवत्तापूर्ण उत्पादनाच्या जोरावर आंतरराष्ट्रीय स्तरावर बाजार पेठेत आपली ओळख निर्माण केली. तसेच मोठ्या प्रमाणात मालाची निर्यात करून देशाच्या आर्थिक विकासात मोलाचे योगदान दिले आहे. महाराष्ट्रातील सामाजिक, राजकीय, आर्थिक आणि शैक्षणिक विकासात सहकारची भूमिका महत्वाची ठरली आहे.

## १.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ :

**सहकार :** सह+ कार, सर्वांच्या हितासाठी एकत्रीतपणे कार्य करणे म्हणजे सहकार.

**सहकारी संस्था :** सहकारी तत्वानुसार सभासदांचे आर्थिक हितसंवर्धन करणारी संस्था होय.

**फौंडेशन :** सामाजिक सहाय्य किवां आधार देणारी संस्था

**पद्मश्री :** उत्कृष्ट सेवा व कार्या बद्दल भारत सरकारकडून सन्मानित केले जाणारे पदक

**डेअरी :** दूध संकलित व वितरीत करणारे केंद्र

**अमूल :** आणंद मिल्क युनियन लिमिटेड, या ब्रांडने दुग्धजन्य पदार्थ विक्री

**दूध महापूर योजना :** दूध उत्पादन वादविण्यासाठी 'राष्ट्रीय दुग्धोत्पादन विकास मंडळ'कडून राबविण्यात आलेली योजना.

**औंस :** द्रव पदार्थ मोजण्याचे एकक

**जीनिग :** कापसाच्या बोंडापासून सरकी व कापूस वेगळा करण्याची यांत्रिक प्रक्रिया

**स्पिनिंग :** कापसाच्या कच्च्या तंतूपासून धागा तयार करण्यासाठीची प्रक्रिया

## १.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे :

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न : १**

**अ) योग्य पर्याय.**

१. अ. सहकारी पतपुरवठा

२. ब. १९१२

३. क. १९२३

४. ड. यशवंतराव चव्हाण

**ब) एका वाक्यात उत्तरे.**

१. सर्वाच्या हितासाठी एकत्रितपणे कार्य करणे म्हणजे सहकार होय.

२. 'महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लिमिटेड'

३. सन १९६० ते १९९० हा कालखंड सुवर्ण कालखंड म्हणून ओळखला जातो.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न : २**

**अ) योग्य पर्याय.**

१. ब. विठ्ठलराव विखे पाटील

२. अ. प्रवरानगर

३. ब. १९५०

४. क. १९७१

५. ड. ४० %

**ब) एका वाक्यात उत्तरे.**

१. अहमदनगर जिल्ह्यातील बेलापूर जवळील 'हरेगाव' येथे

२. सहसंचालक

३. साखर आयुक्तालय

४. पंडित जवाहरलाल नेहरु

५. पद्मश्री

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न : ३**

**अ) योग्य पर्याय.**

१. क. खेडा

२. ब. १९६७

३. ड. गोकुळ

४. अ. १९६३

५. ब. मार्च १९७८

**ब) एका वाक्यात उत्तरे.**

१. डॉ. वर्गीज कुरियन

२. मुंबईला १९५१ मध्ये 'आरे' येथे सुरु करण्यात आला.

३. महाराष्ट्र राज्य सहकारी दूध महासंघ मर्यादितम (महानंद)

४. 'महालक्ष्मी'

५. १९९०

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न : ४**

**अ) योग्य पर्याय.**

१. अ. मुंबई

२. ड. इचलकरंजी

३. क. दत्ताजीराव कदम

४.ब. १९०७

५. क. रामचंद्र गोवंडे

**ब) एका वाक्यात उत्तरे.**

१. श्रीमंत नारायणराव घोरपडे

२. 'दत्ताजीराव कदम टेक्निकल एज्युकेशन' सोसायटीची

३. 'व्यंकटेश रंगू तंतू मिल'

४. 'डेकोस्पिन रिसर्च फाउंडेशन'

५. 'श्री स्वकुळ साळी सहकारी विणकरी संघ'

**१.६ सरावासाठी स्वाध्याय :**

**अ) टिपा लिहा.**

१. विठ्ठलराव विखे पाटील

२. साखर आयुक्तालय

३. दूध महापूर योजना

४. डेक्कन मिलची स्थापना

५. गोकुळ दूध संघाची कार्ये

६. इचलकरंजीमधील सूतगिरणी उद्योग

**ब) खालील प्रश्नाची थोडक्यात उत्तरे लिहा.**

१. महाराष्ट्रातील सहकारी चळवळीची पार्श्वभूमी थोडक्यात स्पष्ट करा.

२. प्रवरा सहकारी साखर कारखान्याचे महत्त्वस्पष्ट करा.

३. महाराष्ट्रातील सहकारी दुग्धव्यवसायाची वाटचाल स्पष्ट करा.

४. ग्रामीण विकासात सहकारी दुग्धव्यवसाय संस्थाचे योगदान सांगा.

५. इचलकरंजीमधील सहकारी सूतगिरणी चळवळीचा थोडक्यात आढावा घ्या.

**क) खालील प्रश्नाची सविस्तर उत्तरे लिहा.**

१. महाराष्ट्रातील सहकारी चळवळीच्या प्रगतीचा आढावा घ्या.

२. महाराष्ट्राच्या सहकारी चळवळीतील साखर उद्योगाची माहिती लिहा.

३. महाराष्ट्रातील सहकारी दुग्धव्यवसायातील गोकुळ दूध संघाचे महत्त्व स्पष्ट करा.

४. इचलकरंजीच्या विकासात डेक्कन सहकारी सूतगिरणीच्या योगदानाविषयी चर्चा करा.

## १.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ :


१. पाटील प्रताप, महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखान्यांचा जनसंपर्क एक अभ्यास, जयदत्त प्रकाशन कोल्हापूर १७ जानेवारी २०००.

२. सावंत शिवाजी, महाराष्ट्रचे शिल्पकार पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील, महाराष्ट्र साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, एप्रिल २००२.

३. डॉ. शहा रूपा, डॉ. दामजी बी. एच. सहकाराचा विकास, फडके प्रकाशन, कोल्हापूर,२०२०.

४. फडके य. दि. विसाव्या शतकातील महाराष्ट्र खंड १ – ८ श्रीविद्या प्रकाशन, पुणे २००६.

५. दास्ताने संतोष, महाराष्ट्र २०११, दास्ताने रामचंद्र आणि कंपनी, पुणे,२०११.

६. Ingavale Deppa, "Effectiveness of marketing Polices of Dairy Industry" - Study Conducted in Kolhapur District, Shivaji University Kilhapur, 2015.

७. PatilSudhir - Study of manage rid aspects of Co- Operative Spinning Mills in Inchalkaranji, Shivaji University Kolhpaur, 2017 .

८. Nike Chandravdan, Glimpses of Ichalkaranji City, (Lalu Pub. US) Laxmi Book Publication, Solapur, 2016.

९. https://www.gokulmilk.coop


❖❖❖

घटक २

# पश्चिम महाराष्ट्रातील शैक्षणिक विकास

## (Educational Development in Western Maharashtra)

अनुक्रमणिका


२.० उद्दिष्टे

२.१ प्रास्ताविक

२.२ विषय विवेचन

- २.२.१ रयत शिक्षण संस्था
- २.२.२ स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था
- २.२.३ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

२.३ सारांश

२.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

२.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

२.६ सरावासाठी स्वाध्याय

२.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ

## २.० उद्दिष्टे :

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला –

१. रयत शिक्षण संस्थेचे कार्य समजेल.

२. रयत शिक्षण संस्थेच्या स्थापने मागील उद्देश समजण्यास मदत होईल.

३. स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्य समजेल.

४. स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे मराठवाड्यातील कार्य समजून येईल.

५. रयत शिक्षण संस्थेचे व स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेची सामाजिक बांधिलकी समजेल.

६. ग्रामीण भागातील विद्यापीठ म्हणून शिवाजी विद्यापीठाचे कार्य समजेल.

७. शिवाजी विद्यापीठाच्या स्थापने पाठीमागील उद्देश विशद करता येईल.

## २.१ प्रास्ताविक :

शिक्षण हे परिवर्तनाचे प्रभावी साधन आहे. स्वातंत्र्योत्तर काळात महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात जे स्थित्यंतर झाले. त्याला महाराष्ट्रातील शैक्षणिक विकास फार मोठ्या प्रमाणात कारणीभूत ठरला आहे. १९ व्या शतकात महाराष्ट्रात पाश्चात्यज्ञानाने प्रभावित झालेल्या अनेक समाजसुधारकांनी बहुजन समाजामध्ये शिक्षण प्रसार केला. महाराष्ट्रातील सामाजिक क्रांतीचे जनक महात्मा फुले यांनी सर्वप्रथम मोफत आणि सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा पुरस्कार केला. त्यांनी स्थापन केलेल्या सत्यशोधक समाजाने बहुजन समाजात जागृती निर्माण करून शिक्षण प्रसाराची एक प्रभावी चळवळ सुरू केली. महात्मा फुले यांच्या सामाजिक व शैक्षणिक कार्याचा प्रभाव कोल्हापूरचे राजर्षी शाहू महाराज यांच्यावर पडला व त्यांनी आपल्या संस्थानात महात्मा फुले यांचे कार्य पुढे चालू ठेवले. परिणामी पश्चिम महाराष्ट्रात कोल्हापूर हे एक महत्त्वाचे शैक्षणिक केंद्र बनले. महात्मा फुले व राजर्षी शाहू महाराज यांच्यानंतर महर्षी वि. रा. शिंदे, महर्षी धोंडो केशव कर्वे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ. पंजाबराव देशमुख इत्यादी समाज सुधारकांच्या प्रयत्नामुळेच महाराष्ट्रात ग्रामीण भागात राहणाऱ्या बहुजन समाजाला शिक्षणाची दारे खुली झाली.

कर्मवीर भाऊराव पाटील यांनी सन १९१९ मध्ये काले ता. कराड जि. सातारा येथे 'रयत शिक्षण संस्थेची' स्थापना करून खेड्यापाड्यातील गरीब, अज्ञानी व कष्टकरी अशा बहुजन समाजापर्यंत ज्ञानाची गंगा पोहोचविली. त्यांनी एक प्रभावी शैक्षणिक चळवळ निर्माण केली.

रयत शिक्षण संस्थेत श्री गो. ज्ञा. उर्फ बापूजी साळुंखे यांनी प्रारंभी काही वर्ष काम केले. कर्मवीर भाऊराव पाटील यांचेपासून प्रेरणा घेऊन ते रयत शिक्षण संस्थेतून बाहेर पडले व सन १९५४ मध्ये त्यांनी 'श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेची' स्थापना केली. महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातील बहुजन समाजात शिक्षण प्रसार करण्याचे कार्य ते आपल्या संस्थेमार्फत करू लागले.

पदव्युत्तर शिक्षणासाठी पश्चिम महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील विद्यापीठ म्हणून शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूरची ओळख आहे. कोल्हापूर संस्थानचे छत्रपती राजाराम महाराज, प्राचार्य डॉ. बाळकृष्ण आणि डॉ. सी. आर. तावडे यांनी शिवाजी विद्यापीठाची कल्पना प्रथम मांडली. हे स्वप्न साकारण्यासाठी महाराष्ट्र राज्याचे

पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण, लोकनेते बाळासाहेब देसाई आणि परिसरातील अनेक शिक्षणप्रेमी मान्यवरांनी प्रयत्न केले. त्यांच्या प्रयत्नातून महाराष्ट्र शासनाने १९६२ मध्ये 'विद्यापीठ कायदा' मंजूर करून शिवाजी विद्यापीठाची स्थापना १८ नोव्हेंबर १९६२ रोजी केली. विद्यापीठाची कोनशिला भारताचे तत्कालीन राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या हस्ते बसविली. 'ज्ञानमेवामृतम' हे बोधवाक्य आणि 'विद्यापीठ लोकाप्रत' हे ध्येयाचे प्रमुख सूत्र विद्यापीठाच्या वाटचालीसाठी स्वीकारले गेले. डॉ. आप्पासाहेब पवार हे विद्यापीठाचे पहिले कुलगुरू होते. त्यांनी विद्यापीठाच्या उभारणीत अव्याहत परिश्रम घेतले.

विद्यापीठ परिक्षेत्राबरोबरच देशाच्या शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक गरज पूर्तीसाठी मानवी समाज निर्माण करण्यासाठी शिवाजी विद्यापीठ बांधील आहे. गुणवत्ता हाच उच्च शिक्षणाचा मापदंड मानून गुणवत्तापूर्ण अध्ययन – अध्यापन, संशोधन व विस्तारसेवा याद्वारे दर्जेदार शिक्षण संस्कृती जोपासणे व त्याद्वारे सामाजिक गरजांची परिपूर्ती करण्यास शिवाजी विद्यापीठ प्रयत्नशील आहे.

अशा या पश्चिम महाराष्ट्रातील शैक्षणिक संस्थांनी आपला कार्यविस्तार कसा केला ते पुढीलप्रमाणे पाहता येईल.

## २.२ विषय विवेचन :

### २.२.१ रयत शिक्षण संस्था :

पश्चिम महाराष्ट्रातील शैक्षणिक विकासात रयत शिक्षण संस्थेचे कार्य अनन्यसाधारण मानले जाते. या संस्थेची स्थापना कर्मवीर भाऊराव पाटील यांनी केली. महाराष्ट्रातील तळागाळातील बहुजन समाजातील मुलांच्या शिक्षणाची व्यवस्था रयत शिक्षण संस्थेमुळे झाली. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी लावलेल्या रोपाचे रूपांतर मोठ्या वटवृक्षामध्ये झाल्याचे दिसून येते. अशा या रयत शिक्षण संस्थेच्या कार्याचा आढावा घेणे क्रमप्राप्त ठरते.

**१. कर्मवीर भाऊराव पाटील(१८८७ – १९५९) :**

विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात महाराष्ट्रात ज्यांनी लोकशिक्षणासाठी किंवा विशेषतः बहुजनांच्या शिक्षण प्रसारासाठी अविश्रांत कष्ट घेतले त्यात सातारचे कर्मवीर भाऊराव पाटील यांचे स्थान महत्त्वाचे आहे. सत्यशोधक चळवळीतील ते एक आघाडीचे कार्यकर्ते होते. भाऊराव पाटील स्वतः फारसे शिकलेले नव्हते. परंतु ते गरिबांची, दलितांची दुःखे जाणणारे होते. जनतेचा उद्धार करण्याचा शिक्षण प्रसार हा एकमेव प्रभावी मार्ग आहे हे जाणून त्यांनी होतकरू गरीब विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह स्थापन करून मागासलेल्या ग्रामीण भागातील मुलांच्या शिक्षणास प्रोत्साहन दिले. स्वतःच्या वैशिष्ट्यपूर्ण पद्धतीने त्यांनी महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात आपल्या कार्याचा खूपच मोठा विकास करून दाखविला.

कोल्हापुरातील कुंभोज या गावी सन १८८७ मध्ये कर्मवीरांचा जन्म झाला. त्यांचे वडील तलाठी असल्याने वेगवेगळ्या गावी त्यांच्या सतत बदली होत गेल्यामुळे भाऊरावांचे प्राथमिक शिक्षण व्यवस्थितपणे होऊ शकले नाही. परंतु समाजातील खालच्या थरातील लोकांची हलाखीची परिस्थिती व लाचारी लहानपणापासूनच भाऊरावांना पहावयास मिळाली. प्राथमिक शिक्षणानंतर कोल्हापूरच्या राजाराम हायस्कूलमध्ये त्यांनी प्रवेश

घेतला. शारीरिक कष्टाची व तालमीची त्यांना फार आवड होती. तारुण्यात शरीर संपत्ती कमवण्याकडेच सर्व लक्ष पुरविले गेल्याने त्यांनी अभ्यासाकडे दुर्लक्ष केले. राजाराम हायस्कूलमध्ये शिकत असताना ते जैन वस्तीगृहात राहत असत. पण तेथील काटेकोर नियमांचे पालन करण्यास त्यांनी नकार दिल्याने रूढींचा भंग करणारा एक बंडखोर विद्यार्थी म्हणून त्यांना ओळखले जाऊ लागले. वसतिगृहातील व्यवस्थापकाबरोबर त्यांचा संघर्ष झाला. परिणामी त्यांना वसतिगृहातून बाहेर काढले. वस्तीग्रहातून बाहेर पडल्यानंतर योगायोगाने छत्रपती शाहू महाराजांचे लक्ष अंगापिंडाने बळकट असलेल्या भाऊरावांकडे गेले. त्यांनी भाऊरावांच्या राहण्याची सोय राजवाड्यावरील वसतीगृहात केली. परंतु भाऊरावांचे शिक्षणाकडे लक्ष कमीच होते. कसेतरी ते मॅट्रिक पर्यंत पोहोचले. पण तेथे नापास झाल्यामुळे त्यांना शिक्षण सोडावे लागले.

कोल्हापूर संस्थानातील वास्तव्य काळात महाराजांच्या सहवासात भाऊरावांचा जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोनच बदलला. छत्रपती शाहूंची आधुनिक विचारसरणी, सर्वधर्मसमभाव यामुळे ते प्रभावित झाले. छत्रपती शाहूंची बहुजन समाजाबद्दल असणारी तळमळ त्यांना दिसून आली.

त्यानंतर सोन्याचे व्यापारी व शाहू महाराजांच्या बरोबरीने असणारे जैन बोर्डिंगचे संस्थापक माणिकचंद हिराचंद जव्हेरी यांच्याबरोबर ते मुंबईला गेले. मुंबईत त्यांनी दावर्स कॉलेज ऑफ कॉमर्स येथे प्रवेश घेतला. तसेच ते माणिकचंद यांच्या व्यवसायात काम देखील करू लागले. परंतु काही दिवसांतच ते आपल्या मूळ गावी परत आले. मुंबईतील वास्तव्यात माणिकचंदाच्या जीवनाबद्दलचा होकारात्मक दृष्टिकोन पाहून ते प्रभावित झाले.

भाऊरावांच्या पुढे उपजीविकेचा प्रश्न उभा राहिला म्हणून त्यांचे शालेय मित्र श्री. आत्मारामपंत ओगले यांच्या काच कारखान्याचे फिरते विक्रेते म्हणून ते नोकरीस लागले. याच वेळी लक्ष्मणराव किर्लोस्कर यांचा लोखंडी नांगराचा कारखाना सुरू झालेला होता. ओगले यांच्या सांगण्यावरून भाऊरावांना किर्लोस्करांनी आपल्याकडे विक्रेते म्हणून घेतले. किर्लोस्करांचे लोखंडी नांगर खपविण्याकरिता भाऊरावांनी सातारा जिल्हा पायाखाली घातला. त्यावेळी त्यांना शेतकऱ्यांची परिस्थिती प्रत्यक्ष पाहावयास मिळाली. शेतकरी हा अज्ञान, दारिद्र्य, कर्जबाजारीपणा यामध्ये गुरुपटला होता. नवीन विचार ग्रहण करण्याची त्यांची तयारी नव्हती. शेतकऱ्यांच्या या सर्व दुःखाचे कारण त्यांच्या अज्ञानात होते. म्हणून शेतकरी हा सुशिक्षित झाला पाहिजे या विचारांनी भाऊरावांच्या मनात जोर धरला.

किर्लोस्करांकडे काम करीत असतानाच भाऊराव सत्यशोधक चळवळीचे काम ही करीत होते. सुप्रसिद्ध समाज सुधारक महात्मा ज्योतिराव फुले यांनी स्थापन केलेल्या सत्यशोधक समाजाचे भाऊरावांना मोठे आकर्षण होते. ते स्वतः सत्यशोधक समाजाचे एक क्रियाशील सभासद बनले. जत्रा, सभा, संमेलने इत्यादी मार्फत निरनिराळ्या ठिकाणी प्रचारदौरे काढून त्यांनी सत्यशोधक समाजाच्या कार्यक्रमाचा बहुजन समाजात खूपच मोठा प्रचार केला. महात्मा ज्योतिबा फुले यांनी दाखविलेल्या शैक्षणिक प्रगतीच्या मार्गाने जाण्याने समाजात जागृती होईल असे त्यांचे मत बनले. छत्रपती शाहू महाराजांचे बहुजन समाजाच्या उद्धाराचे कार्यही त्यांनी जवळून पाहिले व अनुभवले होते. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या शांततामय कार्याचा परिणाम ही भाऊराव पाटलांच्या ध्येयावर झाला. या सर्वांनी शिक्षण प्रसाराच्याद्वारे सामाजिक जागृती करण्याचा यशस्वी प्रयत्न केला होता. भाऊरावांनीही समाज क्रांतीकरिता लोकशिक्षणाचा मार्ग हाच रामबाण उपाय होय हे जाणले व बहुजन

समाजाच्या शैक्षणिक प्रगतीसाठी विस्तृत प्रमाणात शैक्षणिक संस्था काढून प्रयत्नांची पराकाष्टा केली व आश्चर्यकारक समाज जागृती घडवून आणली.

**२. कर्मवीर भाऊराव पाटलांचे शैक्षणिक तत्त्वज्ञान :**

कर्मवीरांनी कोणत्याही विद्यापीठाची पदवी घेतलेली नव्हती. शिक्षणशास्त्रातील ग्रंथांचे मंथन केले नव्हते. मात्र त्यांनी बहुजन समाजाची आर्थिक, धार्मिक, सांस्कृतिक व शैक्षणिक परिस्थिती जवळून पाहिली होती. समाजात बदल व्हावयाचे असतील तर समाजशिक्षण गरजेचे आहे हे त्यांनी ओळखले होते. कर्मवीरांनी बहुजन समाजाला ज्ञानाची संजीवनी देण्याचे ठरविले. गरिबांच्या झोपडीपर्यंत ज्ञानगंगा नेण्याचा निर्णय घेतला. स्वावलंबन, स्वाभिमान, स्वाध्याय व स्वातंत्र्य या चतुःसूत्रीवर त्यांच्या शैक्षणिक तत्त्वज्ञानाची उभारणी झालेली होती. 'स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद' या कर्मवीरांच्या रयत शिक्षण संस्थेच्या ब्रीद वाक्यातच त्याच्या तत्त्वज्ञानाचे सार आहे. बॅरिस्टर पी. जी. पाटील यांनी कर्मवीरांचे शैक्षणिक तत्त्वज्ञान मोठ्या सूत्रमय भाषेत पुढीलप्रमाणे सांगितले आहे ते असे; 'वसतिगृह जीवनावर भर, जातीय, स्वावलंबन व स्वाभिमान, श्रमप्रतिष्ठा व श्रमपावित्र्य, भूमातेशी प्रत्यक्ष संबंध, मानवतावाद, बंधुत्व, स्वातंत्र्यचिंतन व स्वातंत्र्यासाठी प्रयत्न, आदर्श ग्रामसेवक, त्यागी व सेवामय असे तपःपूत जीवनध्येय, साधेपणा, जनतेशी एकरूपता, प्रसिद्धीपासून मुद्दाम चार पावले दूर राहून अज्ञानांधकारात पिचत पडलेल्या रयतेसाठी नंदादीपाप्रमाणे सतत तेवत राहून मार्ग उजळून टाकण्याची शिकवण, 'मोडेन पण वाकणार नाही' हे ब्रीद, जीवनात तत्त्वाबद्दल केव्हाही तडजोड नाही, न्यायाची चाड, अन्यायाची चीड व त्याविरुद्ध बंड करून उठणे आणि हे सर्व करीत असताना पैशामुळे आपले काम केव्हाही अडून राहणार नाही हा दुर्दम्य आशावाद. शिक्षण हे माणसाच्या विकासाचे मूळ आहे व शिक्षणानेच माणूस बहुश्रुत व विवेकी बनतो, अशी त्यांची विचारसरणी होती.

**३. शैक्षणिक कार्याची सुरुवात :**

दुधगाव ता. मिरज जि. सांगली याठिकाणी सन १९१० मध्ये तरुणांनी दुधगाव शिक्षण प्रसारक संस्था स्थापन केली. या संस्थेमार्फतच 'विद्यार्थीश्रम' नावाचे एक वसतिगृह सुरु केले. या वसतीगृहाशी एक देणगीदार व कार्यकारी मंडळाचा सभासद म्हणून भाऊराव पाटील यांचा संबंध होता. हाच त्यांच्या शैक्षणिक कार्याचा श्रीगणेशा होता.

दुधगाव शिक्षण प्रसारक संस्थेची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे होती –

१. जैन लोकामध्ये ग्रंथ आणि उपदेशाव्दारे शिक्षणाविषयी अभिरुची निर्माण करणे.

२. जैन विद्यार्थ्यांना स्कॉलरशिप व देणगी रूपाने मदत करणे.

३. शिक्षण प्रसारार्थ स्थापन झालेल्या इतर जैन संस्थाना देणगी रूपाने मदत करणे

४. प्रसंगी जैनेतरातही शिक्षण प्रसारार्थ प्रयत्न करून त्या विद्यार्थ्यास शक्य ती मदत करणे

दुधगाव शिक्षण संस्थेमार्फत चालविण्यात येत असलेल्या 'विदयार्थीश्रमाची' उद्दिष्टे पुढीलप्रमाणे –

१. कोणत्याही जातीच्या निराश्रित व गरीब विद्यार्थ्यांच्या पोषणाची व शिक्षणाची सोय करणे.

२. सरकारी शाळातून प्राथमिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना गावात घडणाऱ्या अनितीमुलक कृत्यापासून दूर ठेवणे

३. विद्यार्थ्यांच्या चालू अभ्यासाचे शक्य तितके संवर्धन करणे

४. विद्यार्थ्यांच्या ठायी आरोग्य, विद्याभिरुची, उद्योगप्रीयता व शिस्त हे गुण उत्पन्न होण्यास प्रयत्न करणे.

उच्च शिक्षणासाठी परगावी गेलेल्या विद्यार्थ्यांना आर्थिक मदत देणे हेही कार्य या मंडळामार्फत केले जात असे. या मंडळाच्या जाती भेदातीत कार्याने भाऊराव पाटील यांच्या विचाराला अधिक चालना मिळाली. या शैक्षणिक कार्याची योजना निश्चित झाली.

**४. रयत शिक्षण संस्थेची स्थापना :**

दिनांक ५ सप्टेंबर १९१९ रोजी काले, तालुका कराड जिल्हा सातारा येथे सत्यशोधक समाजाची राज्यव्यापी परिषद भरली होती. या परिषदेकरिता महाराष्ट्राच्या सर्व भागातून कार्यकर्ते मोठ्या संख्येने आलेले होते. केशवराव बागडे पुण्याचे नामवंत कायदे पंडित व सत्यशोधक चळवळीचे खंदे कार्यकर्ते या परिषदेचे अध्यक्ष होते. या परिषदेमध्ये भाऊरावांनी शिक्षणाचे महत्त्व स्पष्ट केले. तसेच हे कार्य करण्यासाठी नियमबद्ध कार्य करणारी संस्था असावी असे ठरविण्यात आले. व या संस्थेचे नाव रयत शिक्षण संस्था राहील हेही निश्चित करण्यात आले. संस्थेच्या कार्याची सुरुवात करण्यापूर्वी संघटनेचे काम करण्याची जबाबदारी भाऊरावांच्या बरोबरीने काले येथील दाजी पाटील, नरू काका, भाऊराव चौगुले इत्यादी लोकांनी उचलली व चार ऑक्टोबर १९१९ रोजी विजयादशमीच्या मुहूर्तावर रयत शिक्षण संस्थेची स्थापना झाली. संस्थेच्या शैक्षणिक कार्याला काले येथे वसतिगृह स्थापन करून प्रारंभ करण्यात आला.

**◆ संस्थेची उद्दिष्टे :**

रयत शिक्षण संस्थेने पुढील उद्दिष्टे समोर ठेवून आपल्या कार्यास सुरुवात केली.

१. मागासलेल्या वर्गात शिक्षणाची अभिरुची निर्माण करणे.

२. मागासलेल्या जातीतील अत्यंत गरीब विद्यार्थ्यास शक्यतो मोफत शिक्षण देण्याचा प्रयत्न करणे.

३. मागासलेल्या वर्गातील निरनिराळ्या जातीतील विद्यार्थ्यांमध्ये प्रेमभाव निर्माण करणे

४. पूर्वकाळातील अनुचित रूढीस फाटा देऊन खऱ्या मार्गाचा अवलंब करण्याचे वळण देणे.

५. मिळून मिसळून वागण्यापासून संघशक्ती निर्माण होते तिचे महत्त्व प्रत्यक्ष कृतीने पटविणे.

६. मुले काटकसरी, नियमित, स्वावलंबी, उद्योगी, उत्साही व शीलवान बनविण्याचा प्रयत्न करणे.

७. संस्थेच्या शिक्षणाच्या बाबतीत कार्यक्षेत्र वाढविणे.

**५. रयत शिक्षण संस्थेच्या शैक्षणिक कार्याची व्यापकता :**

कर्मवीर भाऊराव पाटील इसवी सन १९२१ मध्ये किर्लोस्कर कारखान्यातून बाहेर पडले. त्यानंतर धनजीशा कुपर यांनी भाऊरावांच्या मदतीने सातारा रोड पाडळी येथे लोखंडी नांगराचा कारखाना सुरू केला. भाऊरावांनी या कारखान्याच्या उभारणीमध्ये व नांगरांच्या विक्रीमध्ये महत्त्वाचा भाग घेतला तथापि कारखान्याच्या नफ्यापैकी दहा टक्के रक्कम बहुजन समाजाच्या शिक्षणावर खर्च केली जावी. या भाऊरावांच्या मताला कुपर यांनी दाद दिली नाही. तेव्हा त्यातून मतभेद होऊन भाऊराव त्या कारखान्यातून बाहेर पडले. यानंतर मात्र भाऊरावांनी आपले सर्व आयुष्य शिक्षण प्रसारासाठी खर्च केले.

रयत शिक्षण संस्थेची महत्त्वाची उद्दिष्टे डोळ्यासमोर ठेवून कर्मवीर भाऊराव पाटलांनी आपल्या आयुष्यात अनेक शैक्षणिक शाखा काढून पश्चिम महाराष्ट्रात शैक्षणिक चळवळ संघटित केली. त्यांचे हे कार्य टप्प्याटप्प्यानेच प्रगत झाले हे पुढील टप्प्यावरून दिसून येईल.

◆ **वसतिगृहे :**

व्यवसायानिमित्त खेड्यापाड्यातून हिंडत असताना योग्य जागेअभावी आणि अनुकूल वातावरणाच्या अभावी शिक्षण पूर्ण करता येत नाही. असे अनेक विद्यार्थी भाऊरावांना भेटले या ग्रामीण मुलांच्या अभ्यासासाठी काही सोय केल्यास त्यांना आपला शिक्षणक्रम पूर्ण करता येईल व ते पुढे स्वावलंबी होऊ शकतील या कल्पनेतून त्यांनी वसतिगृहे सुरू केली भाऊरावांनी आपल्या कार्याची सुरुवातच वसतिगृहापासून केली. काले येथे १९१९ मध्ये संस्थेचे पहिले वसतिगृह सुरू केले. इसवी सन १९२१ मध्ये नेरले तालुका वाळवे जिल्हा सांगली येथे दुसरे वसतिगृह सुरू करण्यात आले.

सन १९२४ मध्ये भाऊरावांनी रयत शिक्षण संस्था सातारा येथे आणली व तेथे वसतिगृह सुरू केले कारण साताऱ्यासारख्या जिल्ह्याच्या ठिकाणी येऊन बहुजन समाजातील विद्यार्थ्यांनी माध्यमिक शिक्षण किंवा व्यावसायिक शिक्षण घ्यावयाचे झाले तर तेथे त्यांच्या राहण्याची आणि जेवणाची सोय अल्प खर्चात होण्याची आवश्यकता होती. या वसतिगृहात जाती धर्म निरपेक्ष वृत्तीने विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येऊ लागला. विद्यार्थ्यांना रात्री अभ्यासासाठी कंदील, रॉकेल तेल इत्यादी आवश्यक वस्तूंच्या पुरवठा करून रात्री विद्यार्थ्यांच्या अभ्यासावर भाऊरावांनी जातीने लक्ष ठेवले. इसवी सन १९२७ मध्ये महात्मा गांधी यांनी या वस्तीगृहास भेट दिली तेव्हा झालेल्या साध्या समारंभात या वसतिगृहास श्री छत्रपती शाहू बोर्डिंग हाऊस असे नाव देण्यात आले. वसतीगृहात सर्व जाती-धर्माचे विद्यार्थी गुण्यागोविंदाने एकत्र राहत असत. एकत्र अन्न तयार करतात व एका पंक्तीला बसून जेवतात या कल्पनेने महात्मा गांधीजी अतिशय प्रभावीत झाले. सन १९३३ पासून त्यांनी वसतिगृहाकरिता हरिजन सेवक फंडातून भाऊरावांना पाचशे रुपयाची देणगी सलग तीन वर्षे दिली. भाऊरावांनी सातारा येथे राजघराण्याच्या मालकीची धनिणीची बाग या वसतिगृहाकरिता भाड्याने घेतली.

शाहू बोर्डिंगमधील विद्यार्थी मॅट्रिकपर्यंतचे शिक्षण पूर्ण केल्यानंतर उच्च शिक्षणाकरिता कोल्हापूर, सांगली, बडोदा व पुणे या ठिकाणी जाऊ लागले. कोल्हापूर व बडोदा या ठिकाणच्या संस्थानिकांनी दिलेल्या सवलतीमुळे विद्यार्थ्यांना फारशा आर्थिक अडचणी आल्या नाहीत. तथापि पुण्याला शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी इसवी सन १९३२ मध्ये भाऊरावांनी युनियन बोर्डिंग हाऊस हे वसतिगृह सुरू केले. यामुळे संस्थेच्या विद्यार्थ्यांना शेती इंजिनिअरिंग मेडिकल यांचे उच्चशिक्षण देणाऱ्या कॉलेजमध्ये प्रवेश घेणे आणि शिक्षण पूर्ण करणे सुलभ झाले.

विद्यार्थ्यांना वसतिगृहात प्रवेश देताना त्यांच्या आर्थिक परिस्थितीचा विचार करून सवलती दिल्या जात असत. त्यामुळे वसतिगृहात नादार, अर्धनादार व पूर्ण पैसे भरणारे असे तीन प्रकारचे विद्यार्थी होते. परंतु सर्वांना समान वागणूक व समान जेवण दिले जात असे.

इसवी सन १९४२ मध्ये भाऊरावांनी मुलींच्या वसतिगृहाची सातारा येथे सुरुवात केली. या वसतीगृहास 'लक्ष्मीबाई भाऊराव पाटील' असे नाव देण्यात आले. पुढे संस्थेने सातारा व कराड येथे महाविद्यालयांना जोडून मुलींची वसतिगृहे सुरू केली. सध्या महाराष्ट्रात संस्थेची ८३ वसतिगृहे आहेत.

◆ **प्राथमिक शिक्षकांसाठी अध्यापक विद्यालये :**

सातारा येथे सुरू केलेल्या वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांना आपल्या शिक्षणासाठी निरनिराळ्या स्थानिक शिक्षण संस्थांतून जावे लागे. परंतु आपल्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी आपण स्वतःच्याच शाळा काढल्या तर आपले कार्य अधिक सुकर होईल असे भाऊरावांना वाटले. तसेच ग्रामीण भागातील बहुजन समाजातील मुलांना त्यांच्या मायभूमीपासून दूर न करता कमीत कमी खर्चामध्ये शिक्षण देणे आवश्यक आहे. शिक्षण ही सार्वत्रिक विकासाची गुरुकिल्ली आहे. या भूमिकेतून सातारा जिल्ह्यातील प्रत्येक खेड्यामध्ये एक शाळा आणि एक शाळा मास्तर निर्माण करण्याचा त्यांनी चंग बांधला.

आपल्या स्वतःच्या संकल्पित शाळातून शिक्षण देणारे भावी शिक्षक आपणच प्रथम आपल्या तत्त्वप्रणालीनुसार तयार करावेत व मग त्यांनाच आपल्या संस्थांतून शिक्षक म्हणून नेमावे. या नव्या कल्पनेनुसार प्रशिक्षण महाविद्यालय काढण्याचा त्यांनी निर्णय घेतला. ब्रिटिश साम्राज्यातील भारताचे बादशहा पंचम जॉर्ज यांच्या राज्यरोहणास सन १९२५ मध्ये २५ वर्ष पूर्ण होत असल्याने राज्यारोहणाचा रौप्य महोत्सवी प्रसंगी रयत शिक्षण संस्थेची प्रशिक्षण देणारी पहिली शाखा सुरू करण्यात आली व तिला सिल्वर जुबली रुरल ट्रेनिंग कॉलेज असे नाव देण्यात आले. खाजगी संस्थेने काढलेले अशा प्रकारचे त्यावेळच्या मुंबई प्रांतातले हे पहिलेच महाविद्यालय होते. प्रशिक्षण घेणाऱ्या शिक्षकांच्या सोयीसाठी आवश्यक ती प्राथमिक शाळा ही सन १९३६ मध्ये काढण्यात आली. संस्थेचे सहाय्यकर्ते रावबहादूर काळे यांच्या निधनानंतर भाऊरावांनी या शाळेला रावबहादूर काळे प्रॅक्टिसिंग स्कूल हे नाव दिले. स्वातंत्र्यानंतर मात्र प्राथमिक शिक्षणाच्या विकासास गती आली व त्यासाठी अधिकाधिक प्रशिक्षण महाविद्यालय उघडण्यात आली. ही महाविद्यालय मुख्यतः तालुक्याच्या गावी किंवा कधी कधी त्याहूनही लहानशा गावी काढण्यात आली. त्याचा फायदा ग्रामीण भागातून निघणाऱ्या शाळांनाच मोठ्या प्रमाणात होऊ लागला.

सन १९८० – ८१ मध्ये संस्थेची ७ अध्यापक विद्यालय होती. सरकारच्या नवीन धोरणानुसार या सर्व अध्यापक विद्यालयांना आता ज्युनियर ट्रेनिंग कॉलेज असे म्हटले जाऊ लागले. या सर्व अध्यापक विद्यालयात प्रथम व द्वितीय वर्ष डी. एड. चे वर्ग सुरू आहेत. या विद्यालयात मुला-मुलींना सहशिक्षण दिले जाते.

◆ **प्राथमिक शाळा :**

ग्रामीण भागातील प्रत्येक तरुण शिक्षित झाला पाहिजे ही भाऊरावांची तळमळ होती. या तळमळीतून प्रत्येक गावी एक शाळा व कमीत कमी एक शिक्षक मिळालाच पाहिजे. या महत्त्वाकांक्षेचा उगम झाला. या नव्या निश्चयास अनुसरूनच भाऊरावांनी पश्चिम महाराष्ट्रात जिकडे तिकडे अनेक प्राथमिक शाळा उघडण्याची मोहीम हाती घेतली. मुंबई सरकारची 'होर्लेटरी स्कूल योजना' म्हणजे 'वस्ती तेथे शाळा' ही योजना राबविण्यासाठी भाऊरावांनी ३ ऑक्टोबर १९३८ रोजी प्राथमिक शिक्षण समितीची स्थापना केली. यामुळे शाळांची संख्या जोमाने वाढली.

इसवी सन १९३८ ३९ मध्ये संस्थेच्या ६० प्राथमिक शाळा होत्या तर सन १९४९ – ५० पर्यंत हीच संख्या ५७८ पर्यंत पोहोचली. सन १९४९ पासून सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा कायदा करण्यात आला. या कायद्यानुसार प्राथमिक शिक्षणाची जबाबदारी सरकारने स्वीकारली. यामुळे खाजगी संस्थांना प्राथमिक शिक्षणाच्या

क्षेत्रात वाव राहिला नाही. अर्थातच या संस्थेने आपल्या सर्व प्राथमिक शाळा सरकारच्या स्वाधीन केल्या.

**◆ माध्यमिक शाळा :**

प्राथमिक शाळा व त्यासाठी आवश्यक असणाऱ्या शिक्षकांना प्रशिक्षण देणारी विद्यालय स्थापन केल्यानंतर माध्यमिक शाळा उघडण्याची नितांत गरज भासू लागली. कारण भाऊरावांना असे आढळून आले की प्राथमिक शाळांमधून पास होणाऱ्या मुलांपैकी बरीच मुले आर्थिक परिस्थिती चांगली नसल्याने माध्यमिक शाळेत प्रवेश घेऊ शकत नाहीत. तसेच केवळ संपूर्ण सातारा जिल्ह्यात सन १९४० पर्यंत दहा-बाराच माध्यमिक शाळा अस्तित्वात होत्या. त्याही बहुदा मोठ्या शहरातच विद्यादानाचे काम करीत होत्या. त्यामुळे ग्रामीण जनतेस त्याचा काहीच फायदा होत नसे. रयत शिक्षण संस्थेने ही अडचण लक्षात घेऊन सन १९४० मध्ये सातारा शहरात महाराज सयाजीराव विद्यालय स्थापन करून तेथील शिक्षण वसतिगृहयुक्त व मोफत ठेवल्याचे जाहीर केले. प्रवेशासाठी जाती-धर्माचे कोणतेही बंधन न घालता वसतिगृहात राहून मोफत माध्यमिक शिक्षण देणारी ही संस्था अखिल भारतात पहिलेच असावी. अशा तऱ्हेची अनेक विद्यालये महाराष्ट्रातील निरनिराळ्या ठिकाणी उघडण्यात आली. सन १९४७ मध्ये कर्मवीरांनी एका जाहीर सभेत महाराष्ट्रात १०१ माध्यमिक विद्यालय स्थापन करून दाखवू अशी जाहीर घोषणा केली. सन १९६० पर्यंत ती प्रत्यक्ष कृतीतही आली.

संस्थेकडून चालविल्या जाणाऱ्या सर्वच माध्यमिक शाळांची संस्थेकडून स्थापना झालेली नव्हती. परंतु अप्रत्यक्षरीत्या कर्मवीर भाऊराव पाटील आणि त्यांची संस्था यांनी अव्यहातपणे केलेले प्रयत्न हीच त्या शाळांच्या स्थापने मागील प्रमुख प्रेरणा होती.

**◆ रयत शिक्षण संस्थेची महाविद्यालये :**

संस्थेच्या माध्यमिक शाळांमध्ये शिकून बाहेर पडलेल्या आणि ज्यांना उच्च शिक्षण घेण्याची इच्छा आहे. अशा विद्यार्थ्यांसाठी उच्च शिक्षणाची सोय करण्याची आवश्यकता होती. रयत शिक्षण संस्थेने स्वतःचे महाविद्यालय सुरू करण्यापूर्वी संस्थेतून मॅट्रिक पास झालेले विद्यार्थी पुणे, बडोदा, सांगली, कोल्हापूर अशा ठिकाणी उच्च शिक्षणासाठी पाठविले होते. त्यांना त्या ठिकाणी फी सवलती मिळविणे, कमी खर्चात राहण्याची सोय करणे, आवश्यकतेप्रमाणे आर्थिक मदत करणे या बाबी संस्थेमार्फत कर्मवीर भाऊराव पाटील करीत असत. मॅट्रिक पास होणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या वाढू लागल्यामुळे या विद्यार्थ्यांकरिता स्वतःचेच कॉलेज काढण्याचे भाऊरावांनी निश्चित केले. तरुण पिढीच्या गरजा लक्षात घेऊन त्यांना योग्य आणि कार्यक्षम शिक्षण देणे हे त्यांचे ध्येय होते.

जून १९४७ मध्ये सातारा येथेच छत्रपती शिवाजी कॉलेज हे संस्थेचे पहिले महाविद्यालय उघडण्यात आले. हे महाविद्यालय फी विरहित व वसतिगृहयुक्त म्हणून सुरू करण्यात आले. या महाविद्यालयांमध्ये संस्थेच्या ध्येय धोरणाप्रमाणे कडक शिस्तीचे पालन, साधेपणा आणि सक्तीचे श्रमदान या अटी पूर्ण पाळणाऱ्यांनाच प्रवेश दिला जात असे.

बाहेरच्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयामध्ये प्रवेश देता यावा यासाठी भाऊरावांनी तडजोडीचा मार्ग स्वीकारला. विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण देणे भाऊरावांना जास्त काळ परवडणारे नव्हते. विद्यार्थ्यांनी स्वकष्टार्जित पैशातून शिक्षण घ्यावे याकरिता गरीब व होतकरू विद्यार्थ्यांकरिता श्रमाच्या मोबदल्यात शिक्षण ही योजना आखण्यात

आली. या योजनेतून आपले उच्च शिक्षण पूर्ण केलेले शेकडो विद्यार्थी आज या संस्थेत व संस्थेबाहेर जबाबदारीच्या जागेवर काम करीत असलेले पाहावयास मिळतात. सर्वसाधारण परिस्थितीत ज्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयाचे नाव घेणे ही अवघड झाले असते असे अनेक विद्यार्थी येथून शिक्षण पूर्ण करून बाहेर पडलेले आहेत. सन १९८६-८७ अखेर संस्थेकडून चालविल्या जाणाऱ्या महाविद्यालयाची संख्या २९ होती. आज संस्थेची ४१ महाविद्यालये कार्यरत आहेत. आज या संस्थेतील महाविद्यालयात कला, वाणिज्य, विज्ञान या शाखेतील विविध विषयाचे पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम शिकविले जात असून एकूण ८३५६ इतके विद्यार्थी आज शिक्षण घेत आहेत.

**◆ स्त्री शिक्षण :**

स्त्री शिक्षक तयार करण्यासाठी इसवी सन १९४२ मध्ये सातारा येथे भाऊरावांनी जिजामाता अध्यापिका महाविद्यालयाची स्थापना केली. इसवी सन १९६० मध्ये संस्थेने आपल्या संस्थेमध्ये माध्यमिक व उच्च शिक्षण घेतलेल्या मुलींसाठी व स्त्रियांसाठी वसतिगृहाची स्थापना केली. सन १९५९ मध्ये भाऊरावांच्या मृत्यूनंतर देखील संस्थेने स्त्री शिक्षणाचे त्यांचे कार्य जोमाने पुढे चालवले. इसवी सन १९७६-७७ मध्ये १७७ विद्यार्थिनी संस्थेच्या विविध वसतिगृहाचा फायदा घेत होत्या. इसवी सन १९७६-७७ मध्ये संस्थेच्या एकूण एक लाख २४ हजार चार विद्यार्थ्यांपैकी मुलींची संख्या २८ हजार ४७४ होती.

**५. रयत शिक्षण संस्थेचे विवध उपक्रम :**

संस्थेच्या विविध शाखांचा संख्यात्मक, गुणात्मक आणि भौतिक विकास साधण्यासाठी संस्थेच्या मध्यवर्ती कार्यालयामार्फत विविध उपक्रम राबविले जातात विशेषतः दुर्बल शाखांना निधी उपलब्ध करून देवून त्याचा भौतिक विकास साधण्याबरोबरच सेवक विमा योजना, विद्यार्थी दत्तक - पालक योजना, सावित्रीबाई फुले दत्तक - पालक योजना, रयत माउली लक्ष्मीबाई पाटील निराश्रित विद्यार्थिनी निधी, संगणकीकृत प्रशासन व्यवस्था, अकौंट व्यवस्थापन, रयत क्वालिटी मॅनेजमेंट सिस्टम, शेळी पालन प्रकल्प, डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील इंन्स्टीटयूट ऑम इन्फोर्मेशन टेक्नोलॉजी, सातारा इ. तसेच विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय शिक्षण व संशोधन संस्थाबरोबर सहकार्य करार यासारख्या योजना प्रभावीपणे राबविल्या जातात. त्याचबरोबर विभागीय सल्लागार मंडळाच्या माध्यमातून गुणवत्ता वाढीसाठी विशेष प्रयत्न केले जातात.

**◆ कर्मवीर विद्याप्रबोधिनी उपक्रम :**

रयत शिक्षण संस्थेने सन १९७४ पासून कर्मवीर विद्याप्रबोधिनीच्या माध्यमातून अनेक शैक्षणिक प्रयोग हाती घेतलेले आहेत. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी बहुजन समाजातील दीनदलित, उपेक्षित, दुर्बल घटकासाठी शिक्षणाच्या माध्यमातून उभी केलेली शैक्षणिक चळवळ प्रामुख्याने ग्रामीण भागात केंद्रित झालेली आहे. तिचा प्रवास गुणवत्तेकडे सुरु झाला असून या ग्रामीण भागातील विद्यार्थ्याच्या गुणवत्ता वाढीसाठी, व्यक्तिमत्व विकासासाठी संस्था सातत्याने प्रयत्न करते आहे.

कर्मवीर विद्याप्रबोधिनीच्या माध्यमातून विविध उपक्रम राबविले जातात ते पुढीलप्रमाणे -

१. कर्मवीर विद्याप्रबोधिनी प्रमाणपत्र परीक्षा

२. कर्मवीर जीवन चरित्र परीक्षा

३. रयत प्रज्ञाशोध परीक्षा

४. स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र

५. भरतीपूर्व प्रशिक्षण

६. करिअर गायडन्स व कौन्सलिंग प्रकल्प इ.

अशा प्रकारे कर्मवीर भाऊराव पाटील व त्यांनी स्थापन केलेली रयत शिक्षण संस्था आज महाराष्ट्रातील १५ व कर्नाटकातील ०१ अशा एकूण १६ जिल्ह्यात कार्यरत आहे. असा प्रचंड विस्तार संस्थेने केला आहे. यांच्या प्रयत्नाने महाराष्ट्रात बलवान शैक्षणिक चळवळ निर्माण झाली आणि महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातील बहुजन समाजात अभूतपूर्व जागृती होवून तो वर्ग शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात येण्यास मदत झाली.

**स्वयं अध्ययन प्रश्न –१ :**

**अ) रिकाम्या जागा भरा.**

१. स्त्री शिक्षक तयार करण्यासाठी ..... साली सातारा येथे जिजामाता अध्यापिका महाविद्यालयाची स्थापना केली.

अ) १९४२ ब) १९४३

क) १९४४ ड) १९४५

२. संस्थेचे पहिले महाविद्यालय ..... येथे उघडण्यात आले.

अ) सांगली ब) काले

क) सातारा ड) कोल्हापूर

३. सन १९८०–८१ मध्ये संस्थेची ..... अध्यापक विद्यालय होती.

अ) ५ ब) ६

क) ७ ड) ८

४. इसवी सन ..... मध्ये भाऊरावांनी युनियन बोर्डिंग हाऊस हे वसतिगृह सुरू केले.

अ) १९३२ ब) १९३३

क) १९३४ ड) १९३५

५. ..... येथे १९१९ मध्ये संस्थेचे पहिले वसतिगृह सुरू केले.

अ) सांगली ब) सातारा

क) काले ड) कराड

## २.२.२ स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था :

महाराष्ट्रातील शैक्षणिक विकासाचा इतिहास लिहिताना शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांनी शिक्षणक्षेत्रात

केलेल्या प्रचंड कार्याचा आढावा घेतल्याशिवाय, त्याची नोंद घेतल्याशिवाय तो पूर्ण होऊच शकत नाही. त्यांचे या क्षेत्रातील कार्य फार महत्त्वाचे व अद्वितीय आहे. मानवाचा व मानवी समाजाचा शैक्षणिक विकास म्हणजे सर्वांगीण विकास होय. महाराष्ट्राच्या शैक्षणिक विकासासाठी अनेक समाजसुधारकांनी, शिक्षणक्षेत्रातील धुरिणांनी आपले सर्व आयुष्य वेचलेले आहे. गरीब, गांजलेल्या व मागासलेल्या बहुजन समाजासाठी महात्मा जोतीराव फुले, महर्षी धोंडो केशव कर्वे, राजर्षी छत्रपती शाहू महाराज, कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पंजाबराव देशमुख व शिक्षण महर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांनी मोलाचे कार्य केले आहे. दारिद्र्य, अज्ञान व अंधश्रद्धा यात पिचत पडलेल्या दुःखी समाजाचा उद्धार करावयाचा असेल तर शिक्षणासारखे दुसरे प्रभावी साधन नाही हे डॉ. बापूजी साळुंखे यांनी ओळखले होते. आणि म्हणूनच त्यांनी शिक्षणाचा प्रचार व प्रसार करण्यासाठी स्वतःला झोकून दिले. तन, मन व धन अर्पण केले. अपार कष्ट उपसले. कठोर परिश्रम घेतले. अशा थोर व्यक्तीचे जीवनचरित्र अभ्यासणे आवश्यक ठरते.

- **शिक्षण महर्षी डॉ. बापूजी साळुंखे (इ. स. १९१९ ते १९८७) :**

◆ **जीवन वृत्तांत :**

शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांचा जन्म ९ जून, १९१९ रोजी सातारा जिल्ह्यातील रामापूर नावाच्या गावात झाला. रामापूर हे पाटण तालुक्यातील छोटे खेडेगाव. हे गाव कराड-चिपळूण या राजमार्गावर निसर्गसंपन्न अशा डोंगर उतारावर असून जवळून कोयना नदी वाहते. पूज्य बापूजींच्या वडिलांचे नाव ज्ञानोजी व आईचे नाव तानूबाई. त्यांचे बालपणचे नाव गोविंदराव त्यांना चार बंधू व दोन बहिणी. गोविंदा एक वर्षाचा असतानाच आई तानुवाई देवाघरी निघून गेली. पित्याने त्यांना मायेची ऊब दिली. जिवापाड प्रेम देऊन जोपासलं पण १२ व्या वर्षी पितृछत्रही मावळले. गोविंदा 'मातृ-पितृ' सुखास पारखा झाला. लहान वयातच नियतीचे आघात सोसावे लागले. यातूनच गोविंदा घडत गेला. कुशाग्र बुद्धिमत्ता, जिज्ञासू वृत्ती, सहनशीलता, कठोर परिश्रम व चिकाटी यामुळे गोविंदाचे चरित्र उत्तरोत्तर विकास पावत गेले.

मॅट्रिकची परीक्षा इस्लामपूर येथून पास झाल्यानंतर गोविंदास नोकरी लागत होती. पण त्याने महाविद्यालयीन शिक्षण घेण्याचा निर्णय घेतला. वडील बंधू परशुरामभाऊंच्या साहाय्याने ते 'राष्ट्रवीर'चे संपादक शामराव देसाई व डॉ. आप्पासाहेब पवार यांना भेटले. त्यांच्या कृपेने कोल्हापूरमधील 'राजाराम कॉलेज'मध्ये प्रवेश घेतला. राहण्याची सोय 'प्रिन्स शिवाजी बोर्डिंग'मध्ये झाली. महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना गोविंदाने आपल्या मित्रमंडळीबरोबर महात्मा गांधी, छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती शाहू महाराज, रामकृष्ण परमहंस, विवेकानंद, स्वातंत्र्यवीर सावरकर आदी युगपुरुषांच्या व नेत्यांच्या जीवनचारित्र्याचा विचारसरणीचा जबरदस्त प्रभाव त्यांच्यावर पडला. भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी लो. टिळकांच्या नंतर म. गांधीजींचे नेतृत्वच देशाला कसे उपयुक्त आहे याची जाणीव गोविंदरावांना याच काळात झाली. त्यांच्या आचार व विचारात समाजाच्या बांधीलकीचे बिजारोपण याच काळात झाले. त्यांची साधी राहणी, उच्च विचारसरणी व सेवावृत्ती इ. पाहून प्रिन्स शिवाजी बोर्डिंगमधील गोविंदरावांचे परममित्र श्री. आर. डी. पाटील यांनी त्यांना सर्वप्रथम 'बापूजी' या नावाने संबोधले. गोविंदा बापूजी झाले. सर्वच मित्र व विद्यार्थी त्यांना बापूजी म्हणून संबोधू लागले. आज सारा महाराष्ट्र त्यांना 'बापूजी' या नावाने ओळखतो आहे.

शिक्षण सुरू असतानाच १५ डिसेंबर, १९४० रोजी बेळगाव येथे बापूजींचा विवाह एका मारुती मंदिरात अत्यंत साध्या पद्धतीने पार पडला. पत्नीचे नाव सुशीला. बेळगावचे गरीब पण घरंदाज गृहस्थ नानासाहेब पाटील यांची ती कन्या. विवाहानंतर बापूजी कोल्हापुरात आले. पूज्य बापूजींचे गुरू थोर इतिहास संशोधक डॉ. आप्पासाहेब पवार यांनी बापूजींवर घोरपड्यांच्या सोंडूर संस्थानातील ऐतिहासिक कागदपत्रांचे संशोधन करण्याचे काम सोपविले. ते काम त्यांनी उत्तमरीतीने पूर्ण केले. त्यांची ही कामगिरी, हुशारी व चिकाटी पाहून सोडूर संस्थानचे संस्थानिक यशवंतराव घोरपडे यांनी आपले राजपुत्र व राजकन्या यांना इंग्रजी, मराठी व गणित शिकवण्याची जबाबदारी बापूजींवर सोपवली. बापूजी 'राजगुरू' झाले. तो काळ १९४२ च्या आंदोलनाचा होता. युवराज मुरारराव घोरपडे यांच्या शिक्षणासाठी बापूजींनी त्यांच्याबरोबर परदेशी जावे असा विचार संस्थानिकांनी त्यांना बोलून दाखवला. परदेशगमन, सर्व सुखे यांचा त्याग करून बापूजींनी १९४२ च्या क्रांतिकारी लढ्यात भाग घेतला.

बापूजी नेहमी म्हणत, 'केवळ स्वराज्य नको तर सुराज्य हवे. मी देशाला असे नागरिक देऊ इच्छितो की, जे आत्मविकसित असतील आणि ज्यांच्यात राष्ट्रीय विकासाची सक्रिय तळमळ असेल.' बापूजींनी संस्थेची जी घटना तयार केली त्यातील काही मुद्द्यांतून त्यांचे शैक्षणिक तत्त्वज्ञान स्पष्ट होते. काही मुद्दे --

(१) ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षणप्रसार

(२) सत्य, शील, प्रामाणिकता, त्याग व पिळवणुकीस आळा ही पंचतत्त्वे शिक्षणातून जीवनात उतरविणे.

(३) समाजाचा सांस्कृतिक विकास साधणे.

(४) आचार, विचार व उच्चार यांच्या पावित्र्यावर भर देणे.

(५) राजकारण आणि भेदाभेद यापासून सर्वस्वी अलिप्त राहणे.

महाराष्ट्र शासनाने 'दलितमित्र' शिवाजी विद्यापीठाने 'डिलिट' (११-२-१९८६) पदवी देवून सन्मान केला आहे. दि. ०८ ऑगस्ट १९८७ रोजी त्यांचा मृत्यू झाला

**१. श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचा प्रारंभ :**

३१ डिसेंबर १९५४ रोजी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था सोसायटी रजिस्ट्रेशन कायद्याप्रमाणे सरकारमान्य झाली. ६ जून १९५५ रोजी कोल्हापूर, तासगाव, चाफळ, तारळे आणि उंडाळे या पाच ठिकाणी माध्यमिक विद्यालय तर कराड येथे एक स्त्रियांचे अध्यापक विद्यालय आणि कोल्हापूर येथे एक व चाफळ येथे एक अशी दोन विद्यार्थी वसतिगृहे एवढ्या शाखांनिशी संस्थेच्या कार्याचा शुभारंभ झाला.

सुरुवातीला बापूजी साळुंखे यांची संस्थेचे सेक्रेटरी आणि मुख्याध्यापक, छत्रपती विद्यामंदिर, कोल्हापूर, श्री काकडे शा. मा. यांची प्राचार्य म्हणून कमला नेहरू अध्यापक विद्यामंदिर कराड नियुक्ती केली, श्री माने दि. रा. यांची स्वामी रामानंद भारती विद्यामंदिर तासगाव येथे मुख्याध्यापक म्हणून नियुक्ती केली. श्री रा. मा. साळुंखे यांची छत्रपती विद्यामंदिर उंडाळे येथे मुख्याध्यापक म्हणून नेमणूक केली. या सर्वांनी सुरुवातीला अनुदान नसताना स्वतःचे पैसे खर्च करून विद्यालय उभी केली.

बापूजींनी प्रथमतः स्वतः जवळचे ९००/- रुपये आणि रूकडी येथील हायस्कूलमधील विद्यार्थ्यांनी त्यांना दिलेले १०००/- रुपये असे एकूण १९००/- रुपये सर्व संस्थेसाठी खर्च केले.

अशा प्रकारे श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेची स्थापना ही अचानकपणे न होता पूर्ण विचारांती झालेली दिसून येते.

**२. स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या शैक्षणिक कार्याचा विस्तार :**

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेने प्रारंभीच ६ जून १९५५ रोजी सातारा, सांगली, कोल्हापूर या तीन जिल्ह्यात एकाच वेळी ५ हायस्कूल, १ महिलांचे ट्रेनिंग कॉलेज व २ वसतिगृहे सुरू केले. संस्थेच्या शैक्षणिक कार्याचा विस्तार हा पहिल्या वर्षापासूनच सुरू झाला. इसवी सन १९४९ च्या सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाच्या कायद्यानुसार प्राथमिक शिक्षणाची जबाबदारी सरकारने स्वीकारली. त्यामुळे इसवी सन १९४९ नंतर खाजगी शिक्षण संस्थांना प्राथमिक शिक्षणाच्या क्षेत्रात प्रसार करण्याची गरज राहिली नाही. म्हणून श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेने आपल्या शैक्षणिक कार्याचा विस्तार प्रारंभी वसतिगृहे आणि माध्यमिक विद्यालयांच्या क्षेत्रातच केला.

**२.१ वसतिगृहे :**

६ जून १९५५ या दिवशी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचा कार्यारंभ झाला. या दिवशी कोल्हापूर येथे एक व चाफळ येथे एक अशी दोन वसतिगृह संस्थेमार्फत सुरू करण्यात आली. अशा या संस्थेच्या विविध वसतिगृहांचा वृत्तांत खालीलप्रमाणे देता येईल.

**२.१.१ कोल्हापूर जिल्ह्यातील वसतिगृहे :**

कोल्हापूर येथे जुन्या बुधवार पेठेतील भुसारवाड्यात बापूजींनी ६ जून १९५५ रोजी हायस्कूल सुरू केले. या हायस्कूलच्या स्थापनेबरोबरच भुसारवाड्याच्या एका खोलीत बापूजींनी गरीब विद्यार्थ्यांकरिता एक वसतिगृह सुरू केले. अवघ्या दीड - दोन वर्षातच कोल्हापूर येथील माध्यमिक विद्यालय व वसतीगृह यातील विद्यार्थ्यांची संख्या वाढली व भुसारवाडा कमी पडू लागला. त्यामुळे हे छत्रपती विद्यार्थी वसतीगृह बाबू जमाल जवळील जिवबा नाना जाधव यांच्या वाड्यात हलविले. परंतु पुढे तेथील जागा देखील अपुरी पडू लागली. यानंतर सरकारी अनुदानाच्या मदतीने ताराबाई पार्क येथे छत्रपती वस्तीगृहाची भव्य इमारत बांधण्यात आली. हे वसतिगृह मागासवर्गीय मुलांसाठी होते. ९ एप्रिल १९५६ रोजी समाजातील अनाथ गरीब व कोर्ट कमिटेड मुलांच्याकरिता शासनाच्या परवानगीने संस्थेने 'फिटपर्सन इनस्टीट्यूशन' नावाचे वसतीगृह सुरू केले. या वस्तीगृहात सुरुवातीला २५ तर १९८७-८८ मध्ये २७५ विद्यार्थी होते. छत्रपती वसतिगृहात सुरुवातीला २० तर सन १९८७ मध्ये ६० विद्यार्थी होते.

इसवी सन १९५७ मध्ये कोल्हापूर जिल्ह्यात हातकणंगले तालुक्यात इचलकरंजी येथे संस्थेने महात्मा गांधी वसतिगृह सुरू केले. या तालुक्यातच पारगाव येथे इसवी सन १९६० मध्ये संस्थेच्या पराशर हायस्कूलला जोडूनच पराशर वसतिगृह सुरू करण्यात आले.

कोल्हापूर जिल्ह्यातील गडहिंग्लज तालुक्यात संस्थेने १९५९ मध्ये गडहिंग्लज वसतीगृह तर १९६९ मध्ये गडहिंग्लजलाच मुलींचे वसतिगृह सुरू केले. या मुलींच्या वसतिगृहात एकूण २० विद्यार्थ्यांनी होत्या.

इसवी सन १९७५ मध्ये शाहूवाडी तालुक्यात कापशी येथे संत गाडगेबाबा विद्यार्थी वसतीगृह सुरू करण्यात आले. तेथे ४० विद्यार्थी संख्या होती.

### २.१.२ सातारा जिल्ह्यातील वसतिगृहे :

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेची सर्वात जास्त वसतीगृह सातारा जिल्ह्यामध्ये आहेत. सातारा जिल्ह्यातील कराड येथील कमला नेहरू अध्यापिका विद्यालय हे संस्थेचे स्त्रियांचे सर्वात पहिले अध्यापिका विद्यालय आहे. या अध्यापिका विद्यालयाचे वसतीगृह सन १९५५ मध्ये स्थापन करण्यात आले. श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेने खेड्यापाड्यातून प्राथमिक व माध्यमिक शिक्षण घेतलेल्या मुलींनी स्वतःच्या पायावर उभे राहून अर्थार्जन करावे याकरिता कमला नेहरू अध्यापक विद्यालय व वसतिगृह सुरू केले. या वसतीगृहात सुरुवातीला ७८ विद्यार्थिनी होत्या. कराड या ठिकाणी संस्थेने इ. स. १९५८ मध्ये 'संत तुकाराम मुलींचे वसतीगृह' आणि मुलाकरिता 'संत तुकाराम मुलांचे वसतीगृह' सुरू केले.

पाटण तालुक्यातील श्री छत्रपती विद्या मंदिर तारळे या संस्थेच्या सुरुवातीच्या हायस्कूलला जोडूनच १९५८ मध्ये तारळे येथे छत्रपती वसतिगृहाची स्थापना करण्यात आली.

सातारा जिल्ह्यात चाफळ येथे समर्थ विद्या मंदिर हे श्री. बंडो गोपाळ मुकादम यांनी सुरू केलेले हायस्कूल श्री. आप्पासाहेब साळुंखे यांनी सन १९५५ मध्ये संस्थेला जोडले. तेथेच समर्थ विद्यामंदिर वसतिगृह त्यावेळेस सुरू करण्यात आले.

सातारा जिल्ह्यातील पाटण येथे सन १९५९ मध्ये गुरुजन ज्युनियर कॉलेज ऑफ एज्युकेशनला जोडून वसतिगृह सुरू करण्यात आले. तेथे ५४ विद्यार्थी संख्या होती. सन १९६४ मध्ये कै. ज्ञानोजीराव साळुंखे वसतिगृह पाटण येथे सुरू करण्यात आले. तिथे विद्यार्थी संख्या ३९ एवढी होती.

सातारा जिल्ह्यात कोंडवे या ठिकाणी सन १९६० मध्ये स्थापन झालेल्या न्यू इंग्लिश स्कूल कोंडवे या संस्थेच्या हायस्कूलच्या वतीने चालविले जाणारे मागासवर्गीय विद्यार्थी वसतिगृह आहे. हे वसतिगृह १५ ऑगस्ट १९८६ मध्ये सुरू करण्यात आले.

### २.१.३ सांगली जिल्ह्यातील वसतिगृहे :

सांगली जिल्ह्यात प्रारंभी तासगाव येथे तासगाव नगरपालिका व परमपूज्य स्वामी रामानंद भारती यांच्या साह्याने सन १९५५ मध्ये संस्थेचे स्वामी रामानंद भारती विद्यामंदिर सुरू करण्यात आले. या विद्या मंदिराला जोडूनच सन १९५८ मध्ये भारतीय विद्यामंदिर वसतिगृह सुरू करण्यात आले. सन १९८७ मध्ये तेथे ५१ विद्यार्थी होते. तासगाव येथील सन १९६० मध्ये स्थापन झालेल्या जुनियर कॉलेज ऑफ एज्युकेशन या अध्यापक विद्यालयाला जोडून त्याच वर्षी वसतिगृह सुरू करण्यात आले. सध्या हे वसतिगृह बंद आहे.

सांगली जिल्ह्यात जत तालुक्यात बिळूर येथे सन १९६१ मध्ये गुरु बसवेश्वर हायस्कूल सुरू करण्यात

आले. या हायस्कूलला जोडूनच सन १९६७ मध्ये तेथे श्री गुरु बसवेश्वर वसतिगृह सुरू करण्यात आले. सन १९८०-८१ मध्ये त्या वसतिगृहातील विद्यार्थी संख्या ३० होती.

### २.१.४ सोलापूर जिल्ह्यातील वसतीगृहे :

सोलापूर जिल्ह्यात दक्षिण सोलापूर तालुक्यात बंकलगी या ठिकाणी असणाऱ्या हनुमान विद्या मंदिराला जोडून सन १९६० मध्ये वसतिगृह सुरू करण्यात आले. या वसतिगृहात विद्यार्थी संख्या ४२ होती.

सन १९६१ मध्ये सोलापूर जिल्ह्यातील केम तालुका करमाळा येथील उत्तरेश्वर हायस्कूलला जोडून श्री उत्तरेश्वर वसतिगृह सुरू करण्यात आले. येथील विद्यार्थी संख्या ४० इतकी होती.

### २.१.५ ठाणे जिल्ह्यातील वसतिगृहे :

ठाणे जिल्ह्यातील आशागड या आदिवासी भागात बापूजींच्या नेतृत्वाखाली स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेने संतोषी मातेच्या पायथ्याला एका झोपडीत आदिवासी मुलांच्यासाठी आश्रम शाळा सुरू केली. महाराष्ट्र शासनाने आश्रम शाळेसाठी संस्थेला आर्थिक मदत दिली. ही मदत व संस्थापकांचे प्रयत्न यातून संस्थेने शाळेसाठी १९ एकराचे एक दरड माळ जमीन संपादन केली. तेथे एक लाखाची शाळेची सुंदर इमारत उभी केली. या आश्रम शाळेला जोडूनच आश्रम छात्रालय ही सुरू करण्यात आले. संस्थेने मिळवलेल्या जमिनीतील १५ एकर जमीन वसतिगृहातील मुलांनी श्रमाने लागवडीस योग्य केली. या जमिनीत आदिवासींची मुले मोठ्या आत्मियतेने काम करतात. या जमिनीतून तांदूळ, भाजीपाला व डाळीचे उत्पादन काढले जाते. बापूजी या मुलांबरोबर स्वतःही केव्हा केव्हा काम करीत असत. या वस्तीगृहा मध्ये १२० विद्यार्थी होते. याच आशागड मध्ये संस्थेने सन १९७४ ला पोस्ट बेसिक माध्यमिक विद्यामंदिर सुरू केले. त्याला जोडूनच पोस्ट बेसिक छात्रालय ही सुरू करण्यात आले.

रत्नागिरी जिल्ह्यामध्ये सन १९७४ मध्ये श्री विवेकानंद वसतिगृह सुरू करण्यात आले. तेथे सन १९८० - ८१ मध्ये ७५ विद्यार्थी राहत होते.

अशा प्रकारे पहिल्या पंचवीस वर्षात श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेची २५ वसतिगृह होती. यामध्ये २२ मुलांची व ३ मुलींची वसतिगृहे होती.

## २.२ माध्यमिक विद्यालय :

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या शिक्षण प्रसाराच्या कार्याचा शुभारंभ पाच माध्यमिक विद्यालय यांच्या स्थापनेने झाला. दिनांक ६ जून १९५५ या दिवशी बापूजी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी कोल्हापूर, तासगाव, चाफळ, तारळे आणि उंडाळे या पाच ठिकाणी माध्यमिक विद्यालय सुरू केली. संस्थेच्या प्रारंभीच्या पाच आणि नंतर विविध ठिकाणी माध्यमिक विद्यालयाची स्थापना झाली.

### २.२.१ छत्रपती शाहू हायस्कूल कोल्हापूर :

कोल्हापुरात जुन्या बुधवार पेठेतील भुसार वाड्यात दिनांक ६ जून १९५५ रोजी हायस्कूल सुरू झाले. या हायस्कूलचे उद्घाटन प्रसिद्ध शिक्षण तज्ञ जे. पी. नाईक यांच्या शुभहस्ते झाले.

### २.२.२ स्वामी रामानंद भारती विद्यामंदिर, तासगाव :

संस्थेचे दुसरे माध्यमिक विद्यालय सांगली जिल्ह्यातील तासगाव येथे सुरू करण्यात आले. तासगाव नगरपालिकेचे अध्यक्ष श्रीमान रामभाऊ लुगडे, श्री भगवानराव कदम, स्वामी रामानंद भारती यांच्या सहकार्याने तासगाव येथे स्वामी रामानंद भारती विद्यामंदिर सुरू करण्यात आले.

### २.२.३ श्री समर्थ विद्यामंदिर चाफळ :

संस्थेचे तिसरे माध्यमिक विद्यालय चाफळ येथे सुरू झाले.

सन १९६७ – ६८ मध्ये संस्थेमधील अंतर्गत वादात हे विद्यालय संस्थेपासून तोडून स्थानिक लोकांनी चालविण्यास घेतले होते. परंतु सन १९७१ नंतर पुन्हा हे विद्यालय संस्थेने आपल्या ताब्यात घेतले.

### २.२.४ छत्रपती विद्यामंदिर तारळे :

पाटण तालुक्यातील तारळे या गावी दुसऱ्या एका संस्थेने माध्यमिक विद्यालय सुरू केले होते. परंतु ते बंद पडले. बापूजींनी हे माध्यमिक विद्यालय पुन्हा सुरू केले. श्री. खराडे हे तेथे मुख्याध्यापक म्हणून काम पाहू लागले. सन १९८७ मध्ये या विद्यालयाची स्वतःची इमारत असून विद्यार्थी संख्या ७८९ होती.

### २.२.५ श्री छत्रपती विद्यामंदिर उंडाळे :

कराड तालुक्यातील उंडाळे या गावी बापूजींनी तेथील ग्रामस्थांच्या मदतीने जून १९५५ मध्ये श्री छत्रपती विद्यामंदिर हे माध्यमिक विद्यालय सुरू केले.

### २.२.६ महर्षी शिंदे विद्यामंदिर वाई :

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या स्मरणात दिनांक ११ जून १९५६ पासून 'महर्षी शिंदे विद्यामंदिर' नावाने श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे हायस्कूल सुरू झाले. यामुळे बहुजन समाजातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची सोय झाली.

### २.२.७ न्यू इंग्लिश स्कूल इचलकरंजी :

जून १९५६ पासून इचलकरंजी नगरपालिकेच्या शाळा क्रमांक दोन समोर श्री सिद्धनाथ जाधव यांच्या वाड्यात माडीवरील एका खोलीत हायस्कूल सुरू करण्यात आले. सन १९५९ – ६० मध्ये संस्थेने सध्याच्या जकात नाक्यासमोर जागा खरेदी केली. आज तेथे संस्थेची हायस्कूल साठी बांधलेली प्रशस्त इमारत उभी आहे. सन १९८७ मध्ये हायस्कूलची विद्यार्थी संख्या १९६८ होती.

सन १९५६ मध्ये संस्थेने सांगली जिल्ह्यातील मनेराजुरी येथे महावीर पांडुरंग साळुंखे हायस्कूल सुरू केले.

### २.२.८ श्री उत्तरेश्वर हायस्कूल केम :

सन १९५७ मध्ये श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेने सोलापूर जिल्ह्यातील करमाळा तालुक्यातील केम या गावी श्री उत्तरेश्वर हायस्कूल सुरू केले.

### २.२.९ वसंतराव पाटील विद्यामंदिर मांजर्डे :

सन १९५७ मध्ये सांगली जिल्ह्यातील तासगाव तालुक्यातील मांजर्डे या गावी वसंतराव पाटील विद्यामंदिराची स्थापना करण्यात आली.

सन १९५८ मध्ये श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेने सातारा जिल्ह्यात सातारा तालुक्यात सातारा व नागठाणे, कराड तालुक्यात पाल तर पाटण तालुक्यात तळमावले या ठिकाणी माध्यमिक विद्यालय सुरू केली.

**२.२.१० भवानी विद्यामंदिर सातारा :**

सन १९५८ मध्ये सातारा जिल्ह्याचे शिक्षण अधिकारी श्री बी. आर. पाटील, नामदार दादासाहेब जगताप व महाराष्ट्र राज्याचे शिक्षण संचालक डॉ. आप्पासाहेब पवार यांच्याशी बापूजींनी स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे सातारा शहरात एक हायस्कूल काढण्याच्या संदर्भात संपर्क साधला. त्यांच्या परवानगी नंतर प्रतापगंज पेठेतील श्री. पी. जी. जाधव यांच्या वाड्यात भवानी विद्यामंदिर या नावाने जून १९५८ मध्ये हे हायस्कूल सुरू झाले. या विद्यालयाचे उद्घाटन सातारच्या राजमाता श्रीमंत छत्रपती सुमित्रादेवीराजे भोसले यांच्या हस्ते झाले.

**२.२.११ श्री म्हाळसाकांत विद्यामंदिर पाल :**

कराड तालुक्यात पाल या गावी संस्थेने १९५८ मध्ये या विद्या मंदिराची स्थापना केली. या हायस्कूलची १९८७-८८ मध्ये विद्यार्थी संख्या ६०४ इतकी होती.

**२.२.१२ वाल्मिकी विद्यामंदिर तळमावले :**

कराड पासून सुमारे १२-१३ मैलावर पाटण तालुक्यात तळमावले हे गाव वसले आहे. काकासाहेब चव्हाण यांनी तळमावले या ठिकाणी एक हायस्कूल सुरू केले होते. परंतु त्याकडे त्यांना आवश्यक तेवढे लक्ष देता येत नव्हते. हे हायस्कूल सन १९५८ मध्ये श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेकडे सुपूर्द केले.

**२.२.१३ श्री संत घाडगेनाथ विद्यामंदिर कोळे :**

संस्थेने कराड येथे श्री संत तुकाराम विद्यामंदिर, वसंतगड येथे श्री संत ज्ञानेश्वर विद्यामंदिर तसेच कोळे येथे श्री संत गाडगेनाथ विद्यामंदिर या विद्यालयाची स्थापना केली.

वाई तालुक्यात सन १९५९ मध्ये कीकली, धोम व बावधन या ग्रामीण भागातील तीन ठिकाणी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेने माध्यमिक विद्यालय सुरू केली.

**२.२.१४ न्यू इंग्लिश स्कूल किकली :**

किकली हे वाई तालुक्यातील एक खेडेगाव या ठिकाणी एकही माध्यमिक शाळा नव्हती मुलांना माध्यमिक शिक्षणासाठी वाई पाचवड किंवा सातारा येथे जावे लागेल. तेव्हा किकली येथे जिल्हा लोकल बोर्डाचे प्रेसिडेंट श्री. विठ्ठल राव बाबर यांच्या सहकार्याने व लोकवर्गणीतून बापूजींनी ८ जून १९५९ रोजी न्यू इंग्लिश स्कूलची स्थापना केली.

**२.२.१५ श्री नरसिंह हायस्कूल धोम :**

स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे हे हायस्कूल वाई तालुक्याच्या पश्चिम भागात येते. संस्थेने धोम या

ठिकाणी आठ जून १९५९ रोजी श्री नरसिंह हायस्कूल सुरू केले. अत्यंत मागासलेल्या भागात असलेली ही शाळा या विद्यालयाचे वैशिष्ट्य होते.

**२.२.१६ इतर संस्था :**

खटाव तालुक्यात सन १९५९ मध्ये बुधगावि संस्थेने नागनाथ विद्यामंदिर तर कोरेगाव येथे वाठार किरोली या ठिकाणी श्री अंबामाता विद्यालय सुरू केले. सातारा तालुक्यात परळी येथे श्री शिवाजी माध्यमिक विद्यालय तर जावळी तालुक्यात मेढा येथे श्री वेन्ना विद्यामंदिर सुरू केले.

सातारा जिल्हा व्यतिरिक्त संस्थेने १९५९ मध्ये कोल्हापूर जिल्ह्यात हातकणंगले तालुक्यातील पारगाव येथे पराशर माध्यमिक विद्यालय, सुरू केले. गडहिंग्लज तालुक्यात गडहिंग्लज येथे व पन्हाळा तालुक्यात सातवे येथे माध्यमिक विद्यालय सुरू केली.

रत्नागिरी जिल्ह्यात ही सन १९५९ मध्ये बापूजींनी त्या जिल्ह्यातील लोकप्रिय आमदार श्री शामराव पेजे यांच्याशी संपर्क साधून झाडगाव या ठिकाणी छत्रपती शिवाजी माध्यमिक विद्यालय स्थापन केले.

सन १९६० मध्ये श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थांनी सर्वात जास्त माध्यमिक विद्यालय उभारली. यापैकी सर्वाधिक माध्यमिक विद्यालय सातारा जिल्ह्यातच उभारली आहेत.

सातारा तालुक्यात १९६० मध्ये श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेने सातारा येथे गर्ल्स हायस्कूल, कोंडवे येथे न्यू इंग्लिश स्कूल, शेत्र माऊली येथे श्रीराम हायस्कूल, नने येथे शिवाजी हायस्कूल, खोजेवाडी येथे महाराष्ट्र हायस्कूल अशी माध्यमिक विद्यालय स्थापन केली.

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेने वाई तालुक्यात १९६० मध्ये पाचगणी येथे महात्मा फुले हायस्कूल व ओझर्डे येथे पतीत पावन हायस्कूल सुरू केले.

कोरेगाव तालुक्यात सन १९६० मध्ये संस्थेने कोरेगाव येथे दि मॉडर्न इंग्लिश स्कूल, चिमणगाव येथे काळेश्वर हायस्कूल, कुमठे येथे न्यू इंग्लिश स्कूल व शिरंबे येथे शिवाजी हायस्कूल या माध्यमिक विद्यालयांची स्थापना केली.

याचवेळी खटाव तालुक्यात कातर खटाव येथे कामेश्वर हायस्कूल, चितळी येथे महाराष्ट्र हायस्कूल व गुरसाळे येथे सोमेश्वर विद्यामंदिर या माध्यमिक विद्यालयांची स्थापना केली. त्याचप्रमाणे खंडाळा तालुक्यात संस्थेमार्म त कनेरी येथे श्री समर्थ विद्यामंदिर व भादे येथे नवमहाराष्ट्र विद्यामंदिर सुरू करण्यात आले.

सन १९६० मध्ये साताऱ्या खालोखाल सांगली जिल्ह्यात संस्थेने माध्यमिक विद्यालय स्थापन केली. मिरज तालुक्यात कुची येथे बाबुराव लठ्ठे विद्यामंदिर, रांजणी येथे यशवंत विद्यामंदिर, खंडेराजुरी येथे न्यू इंग्लिश स्कूलची स्थापना केली.

खानापूर तालुक्यात कडेपूर येथे न्यू इंग्लिश स्कूल, चिंचणी मंगरूळ येथे चिंचणी हायस्कूल, हिवरे येथे न्यू इंग्लिश स्कूल याशिवाय वाळवा तालुक्यात कामेरी येथे व तासगाव तालुक्यात चिंचणी येथे संस्थेने माध्यमिक विद्यालय सुरू केली.

१९६० मध्ये कोल्हापूर जिल्ह्यात ही संस्थेमार्म त अनेक माध्यमिक विद्यालय स्थापन करण्यात आली करवीर तालुक्यात वडणगे येथे ज्योतिर्लिंग विद्यामंदिर सुरू करण्यात आले. याचवेळी गडहिंग्लज तालुक्यात कडगाव येथे न्यू इंग्लिश स्कूल व हसुरचंपू येथे यशोदाबाई घोरपडे हायस्कूल सुरू करण्यात आले.

शाहूवाडी तालुक्यात संस्थेने भेडसगाव येथे न्यू इंग्लिश स्कूलची स्थापना केली.

कोल्हापूर जिल्ह्यातील हातकणंगले तालुक्यात सावर्डे, माणगाव व इचलकरंजी या ठिकाणी संस्थेने तीन नवीन माध्यमिक विद्यालय सुरू केली.

रत्नागिरी जिल्ह्यात हातखंबा येथे न्यू इंग्लिश स्कूल, पुणे जिल्ह्यातील हवेली तालुक्यात लोणी काळभोर व मु रसुंगी येथे हायस्कूल सुरू केली. याच वर्षी संस्थेने सोलापूर जिल्ह्यात माढा तालुक्यातील निमगाव टेंभुर्णी येथे न्यू इंग्लिश स्कूल व लऊळ येथे श्री कुर्मदास विद्यामंदिर स्थापन केले.

सोलापूर जिल्ह्यातील करमाळा तालुक्यात अगदी मोजक्या शाळा होत्या या भागातील गरीब विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची सोय करण्याच्या हेतूने बापूजींनी या परिसरातील कै. बाबासाहेब घाटगे कै. भोईटे गुरुजी, कै. भीषण सेठजी, श्रीमंत भगवानराव पाटील, जुने कार्यकर्तेश्री देवकर तात्या इत्यादी मंडळीच्या सहकार्याने पोमलवाडी येथे व दक्षिण सोलापुरात बंकलगी येथे माध्यमिक विद्यालय सुरू केली.

सन १९६१ या वर्षांमध्ये देखील संस्थेने अनेक माध्यमिक विद्यालये सुरू केली. कोल्हापूर जिल्ह्यात संस्थेने हातकणंगले तालुक्यात रेंदाळ येथे न्यू इंग्लिश स्कूल व कुंभोज येथे न्यू इंग्लिश स्कूलची स्थापना केली. राधानगरी तालुक्यात शेळेवाडी येथे विद्यालंकार भवन तर सोळांकूर येथे सोळांकूर हायस्कूलची स्थापना केली.

सातारा जिल्ह्यात स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेने नुने येथे शिवाजी हायस्कूल, कराड तालुक्यात औंध, गुरसाळे येथे सोमेश्वर विद्यामंदिर, कोरेगाव तालुक्यात शिरंबे येथे शिवाजी हायस्कूल, साप येथे सिद्धेश्वर हायस्कूल तर वाठार स्टेशन येथे श्री वागदेव विद्यामंदिर या विद्यालयांची स्थापना केली. तसेच चिंचणेर सोनारगाव बनपुरी येथेही संस्थेने माध्यमिक विद्यालयाची स्थापना केली.

सांगली जिल्ह्यात तासगाव तालुक्यात वायफळे येथे बाळासाहेब देसाई हायस्कूल तसेच जत तालुक्यात बिल्लुर येथे गुरु बसवेश्वर हायस्कूल डफळापूर येथे न्यू इंग्लिश स्कूल आणि खानापूर तालुक्यात हिवरे व वांगी येथे संस्थेने माध्यमिक विद्यालयाची स्थापना केली.

सोलापूर येथे सोलापूर हायस्कूल ची स्थापना केली पुणे जिल्ह्यात हवेली तालुक्यात विझर येथे न्यू इंग्लिश स्कूल पुरंदर तालुक्यात सासवड येथे पुरंदर हायस्कूल शिरूर तालुक्यात वडगाव येथे व रासाय येथे छत्रपती विद्यामंदिर तसेच बारामती तालुक्यात कारखेल येथे न्यू इंग्लिश स्कूल या विद्यालयांची संस्थेने स्थापना केली.

याचवेळी रायगड जिल्ह्यात जोहे येथे न्यू इंग्लिश स्कूल व उस्मानाबाद जिल्ह्यात तुळजापूर येथे महर्षी विठ्ठल रामजी शिंदे विद्यालय सुरू केले.

सन १९६२-६३ मध्ये संस्थेने रायगड जिल्ह्यातील कुलाबा येथे सर्वात जास्त माध्यमिक विद्यालय स्थापन केली. या जिल्ह्यातील पेन तालुक्यातील गहू येथे जनता हायस्कूल पनवेल तालुक्यातील आजीवली येथे जनता

विद्या मंदिर, गुळसंदे येथे तुंगारतन विभाग विद्यामंदिर साई येथे सार्वजनिक विद्यामंदिर म्हसळा तालुक्यात म्हसळा येथे न्यू इंग्लिश स्कूल, खालापूर येथे स्वामी विवेकानंद विद्यालय, बादोशी येथे छत्रपती विद्यामंदिर, रोहा तालुक्यातील घगेरी येथे न्यू इंग्लिश स्कूल, कर्जत तालुक्यातील पोशीर येथे श्रमजीवी जनता विद्या मंदिर ही विद्यालय श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेने स्थापन केली.

पुणे जिल्ह्यातील शिरूर तालुक्यात कोरेगाव भीमा येथे श्री छत्रपती संभाजी हायस्कूल, केंदूर येथे सरदार रघुनाथराव ढवळे हायस्कूल, भोर तालुक्यात भोर येथे छत्रपती शिवाजी हायस्कूल ही माध्यमिक विद्यालय सुरू करण्यात आली.

सातारा जिल्ह्यात १९६२ मध्ये संस्थेने पाटण तालुक्यात बांबवडे येथे महात्मा फुले हायस्कूल आणि पाटण येथे कैलासवासी ज्ञानोजीराव साळुंखे हायस्कूल ही विद्यालय स्थापन केली.

याच वर्षी कोल्हापूर जिल्ह्यात गगनबावडा तालुक्यातील कुर या गावी नवभारत हायस्कूल नावाचे विद्यालय स्थापन सुरू केले.

याच वर्षी संस्थेने सांगली जिल्ह्यात तासगाव तालुक्यातील नागराळे या गावी पैलवान विष्णू नागराळे विद्या मंदिर या विद्यालयाची स्थापना केली.

सन १९६४-६५ मध्ये संस्थेने रायगड जिल्ह्यातील अलिबाग तालुक्यात चिखली येथे सरखेल कान्होजी आंग्रे हायस्कूल, श्रीवर्धन तालुक्यात बोरली पंचायतन गावी न्यू इंग्लिश स्कूल आणि महाड तालुक्यात रावडळ येथे न्यू इंग्लिश स्कूल माध्यमिक विद्यालयाची स्थापना केली.

याच वर्षी कोल्हापूर जिल्ह्यातील राधानगरी तालुक्यात अनाजे येथे न्यू इंग्लिश स्कूल व हातकणंगले तालुक्यात अंबक या गावी राजेंद्र हायस्कूल सुरू केले. सातारा जिल्ह्यात पाटण तालुक्यात कडवे येथे न्यू इंग्लिश स्कूलची स्थापना करण्यात आली.

सन १९६५ मध्ये श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेने ठाणे जिल्ह्यातील डहाणू तालुक्यातील आशागड या आदिवासी गावात पोस्ट बेसिक माध्यमिक विद्यामंदिर स्थापन केले.

रत्नागिरी जिल्ह्यातील दापोली तालुक्यात करंजाने येथे श्री शिवाजी हायस्कूल उरुले येथे जगदंबा हायस्कूल व नानेगाव येथे न्यू इंग्लिश स्कूल सुरू केले.

सातारा जिल्ह्यातील पाटण तालुक्यात मालवण या गावी संस्थेमार्फत श्री छत्रपती शिवाजी मराठा हायस्कूल सुरू करण्यात आले. त्याचवेळी कोल्हापूर जिल्ह्यातील पन्हाळा तालुक्यात माले येथे न्यू इंग्लिश स्कूल ची स्थापना करण्यात आली.

सन १९६५ मध्ये संस्थेने मराठवाड्यात देखील माध्यमिक विद्यालय सुरू केली. तत्पूर्वी सन १९५९ मध्ये रामकृष्ण परमहंस महाविद्यालय उस्मानाबाद येथे पहिले महाविद्यालय स्थापन करून मराठवाड्यात प्रवेश केला.

मराठवाड्यात उस्मानाबाद जिल्ह्यातील काजळे या गावी संस्थेने रामानंद महाराज विद्यामंदिर तसेच बीड येथे बीड हायस्कूल सुरू केले.

सन १९६६ मध्ये श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेने सातारा जिल्ह्यातील कराड तालुक्यात शेरे गावी कृष्णा विद्यालय, सुपने गावी कोयना विद्यालय, अटके गावी न्यू इंग्लिश स्कूल वसुली गावी महर्षी विठ्ठल रामजी शिंदे विद्यामंदिर ही माध्यमिक विद्यालय सुरू केली. त्याचवेळी पुणे जिल्ह्यातील भोर तालुक्यात अंबोडे येथे संस्थेचे नागेश्वर विद्यालय सुरू झाले.

सन १९६७ मध्ये मराठवाड्यात संस्थेने उस्मानाबाद जिल्ह्यात कामेगाव येथे यशवंत विद्यामंदिर, बीड जिल्ह्यात पाचंग्री येथे एकनाथ कोल्हे हायस्कूल ही माध्यमिक विद्यालय सुरू केली. तसेच पुणे जिल्ह्यात भोर तालुक्यात नेरे गावी पंचक्रोशी आदर्श विद्यामंदिर आणि पुरंदर तालुक्यात दिवे गावी कातोबा हायस्कूल हे संस्थेने सुरू केले.

रायगड जिल्ह्यात १९६७ मध्ये पेण तालुक्यात कासोगावी शारदा विद्यालय व चुनाभट्टी गावी बाल गंगा विद्यालय स्थापन करण्यात आले. त्याच वर्षी संस्थेने रत्नागिरी जिल्ह्यातील दापोली तालुक्यात वाकवली या गावी डॉ. वि. रा. घोले विद्यामंदिर, जामगे गावी नवभारत विद्यामंदिर स्थापन करण्यात आले.

१९६७ मध्ये कोल्हापूर जिल्ह्यातील कागल तालुक्यात मध्ये या गावी भावेश्वरी हायस्कूल व गडहिंग्लज तालुक्यात नेसरी या गावी सेनापती प्रतापराव गुजर हायस्कूल हे दोन माध्यमिक हायस्कूल सुरू करण्यात आली.

१९६७ मध्ये सातारा जिल्ह्यातील खटाव तालुक्यातील राजाची कुर्ले या गावी गिरिजाशंकर हायस्कूल स्थापन केले.

सन १९६८ मध्ये श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे एक तप पूर्ण झाले. या बारा वर्षाच्या कालखंडात संस्थेचा शिक्षण प्रसार महाराष्ट्राच्या दऱ्याखोऱ्यात कानाकोपऱ्यात व कर्नाटक राज्याच्या काही भागात झपाट्याने झाला. परंतु याच वर्षी संस्थेच्या सर्वात जास्त संस्कृती केंद्रे असलेल्या सातारा जिल्ह्यातच कराड येथून अंतर्गत यादीला सुरुवात झाली. तरी संस्थेच्या शिक्षण प्रसारात खंड पडला नाही. सन १९६८ मध्ये कोल्हापूर जिल्ह्यात शाहूवाडी तालुक्यातील कापशी या गावी संस्थेने न्यू इंग्लिश स्कूल ची स्थापना केली. तसेच सिंधुदुर्ग जिल्ह्यात वैभववाडी तालुक्यातील कुसुर या गावी याच वर्षी 'नवभारत हायस्कूल'ची स्थापना केली.

सन १९६९ मध्ये संस्थेने बेळगाव जिल्ह्यात किणे या गावी न्यू इंग्लिश स्कूल सुरू केले. जून १९७० मध्ये सातारा जिल्ह्यात कराड तालुक्याच्या ठिकाणी प्रॅक्टिसिंग स्कूल व रत्नागिरी जिल्ह्यात दापोली तालुक्यातील गावताळे या गावी न्यू इंग्लिश स्कूल ही संस्थेचे दोन माध्यमिक विद्यालय सुरू झाली.

अशा प्रकारे पहिल्या पंचवीस वर्षात श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेची १४२ माध्यमिक विद्यामंदिरे सुरू झालेले दिसून येतात. ही संस्था काळाच्या मानाने जास्त आहे. याला कारण संस्थेच्या स्थापनेपासूनच्या काळातच महाराष्ट्राच्या राजकीय परिस्थितीमध्ये अनुकूल असे बदल होत गेले. माननीय यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री (१९५६-६०) व बाळासाहेब देसाई राज्याचे शिक्षण मंत्री (१९६०-६२) तसेच डॉ. आप्पासाहेब पवार (१९५८-६२) राज्याचे शिक्षण संचालक या बहुजन समाजातील तीन थोर व्यक्ती काही काळ एकाच वेळी महत्त्वाच्या अधिकार पदावर होत्या. त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर महात्मा फुले, राजश्री शाहू महाराज, महर्षी वि. रा. शिंदे व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचा उदात्त विचारसरणीचा प्रभाव होता. ग्रामीण भागातील बहुजन समाजाच्या शिक्षणासाठी आपल्या सत्तेचा वापर व्हावा अशा विचारसरणीच्या त्या

व्यक्ती होत्या. श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या शिक्षण प्रसाराच्या कार्यात त्यांनी सर्वतोपरी सहाय्य केले. शिवाय यशवंतराव चव्हाण, बाळासाहेब देसाई यांच्या प्रयत्नामुळे राज्य शासनाने जनतेच्या शैक्षणिक विकासाला चालना मिळावी या उद्देशाने पुरोगामी निर्णय घेतले व महत्त्वाची पावले उचलली. त्याचा प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरीत्या श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या कार्याच्या विस्तारास उपयोग झाला.

### २.३ श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे उच्च शिक्षण क्षेत्रातील कार्य :

देशातील विद्यापीठातून पदवी उच्च विद्या विभूषित होऊन बाहेर पडणारी माणसे देशाचे नेतृत्व करतात.

चांगला नेता निर्माण करणे सद्गुणांचा उपासक समाजात निर्माण करणे यासाठी विद्यापीठे शिक्षण महत्त्वाचे आहे. हे ओळखून बापूजींनी विद्यापीठ शिक्षण प्रसार याकडे लक्ष वळवले व महाविद्यालय स्थापन करण्याचा निर्धार केला. बापूजींनी निर्धार प्रमाणे कार्यास प्रारंभ केला. पश्चिम महाराष्ट्र शैक्षणिक, सांस्कृतिक क्षेत्रात अग्रेसर असला तरी मराठवाड्यात १९६० च्या सुमारास शिक्षण प्रसाराचे काम फारच कमी झाले होते. यास्तव तिकडे शिक्षण प्रसार करण्याची आवश्यकता असल्याचे बापूजींनी हेरले व मराठवाड्याकडे प्रथम आपला मोर्चा वळला.

#### २.३.१ रामकृष्ण परमहंस महाविद्यालय उस्मानाबाद :

मराठवाड्यातील संस्थेचे पहिले महाविद्यालय उस्मानाबाद या जिल्ह्याच्या ठिकाणी सुरू झाले. हे महाविद्यालय २० जून १९६० रोजी उस्मानाबाद येथे सुरू झाले. मराठवाडा विद्यापीठाचे कुलसचिव एम. बी. चिटणीस यांनी प्रत्यक्ष भेट देऊन महाविद्यालय सुरू करण्याची सर्व तयारी पाहून समाधान व्यक्त केले.

#### २.३.२ आर्ट्स सायन्स अँड कॉमर्स कॉलेज तासगाव :

जून १९६० पासून संस्थेने वाई, तासगाव व इचलकरंजी येथे कॉलेज सुरू करण्याची परवानगी मिळण्याबद्दल पुणे विद्यापीठाकडे अर्ज केले. विद्यापीठाने सन १९६२ मध्ये तासगाव व इचलकरंजी येथे महाविद्यालय काढण्यास परवानगी दिली. तासगाव येथे महाविद्यालय काढण्यास परवानगी मिळाल्यानंतर बापूजी आणि तासगाव येथील प्रतिष्ठित नागरिक यांच्या सहकार्याने जून १९६२ पासून तासगाव येथे श्री रामानंद भारती विद्या मंदिराच्या नव्या इमारतीत महाविद्यालय सुरू झाले.

#### २.३.३ आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स कॉलेज इचलकरंजी :

इचलकरंजी हे महाराष्ट्राचे मँचेस्टर म्हणून ओळखले जाते. जून १९६२ पासून संस्थेच्या न्यू इंग्लिश स्कूलच्या नव्या इमारतीत हे महाविद्यालय सुरू करण्यात आले.

#### २.३.४ विवेकानंद महाविद्यालय, कोल्हापूर :

स्वामी विवेकानंदांच्या जन्मशताब्दी निमित्त त्यांचे कोल्हापूर येथे स्मारक व्हावे या हेतूने २० जून १९६४ रोजी हे महाविद्यालय सुरू केले.

#### २.३.५ आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स कॉलेज मिरज :

२० जून, १९६५ रोजी मिरज येथे महाविद्यालय सुरू करण्यात आले.

या महाविद्यालयात सुरुवातीला आर्ट्स अँड कॉमर्स या दोन शाखा होत्या. १५ जून १९७४ पासून या महाविद्यालयात सायन्स शाखा सुरू करण्यात आली. सुरुवातीच्या इमारतीला जोडून ग्रंथालय व सायन्स विभागाची तीन मजली इमारत बांधण्यात आली. सध्या महाविद्यालयात जुनिअर विभाग ही कार्यरत आहे.

### २.३.६ लालबहादूर शास्त्री महाविद्यालय, सातारा :

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या सर्वात जास्त शाखा सातारा जिल्ह्यात असून तेथे संस्थेचे महाविद्यालय नाही, याची बापूजींना खंत होती. सातारा शहरात रयत शिक्षण संस्थेचे छत्रपती शिवाजी कॉलेज प्रगतीपथावर होते. परंतु सातारची वाढती लोकसंख्या लक्षात घेता तेथे आणखी एक महाविद्यालयाची आवश्यकता होती. महाराष्ट्र सरकारच्या इ. बी. सी. (EBC) सवलत योजनेमुळे महाविद्यालयात जाणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या वाढली होती. यामुळे संस्थेने जून १९६७ मध्ये सातारा येथे महाविद्यालय काढण्यास परवानगी मिळावी म्हणून शिवाजी विद्यापीठाकडे अर्ज केला. शिवाजी विद्यापीठाचे तत्कालीन कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार यांनी सातारा शहराची उच्च शिक्षणाची सामाजिक गरज लक्षात घेऊन श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेला सातारा शहरात महाविद्यालय काढण्याची परवानगी दिली. या महाविद्यालयास प्रारंभी सातारा जिल्हा परिषदेने दहा हजार रुपयाचे अर्थसहाय्य मंजूर केले. अन्य शिक्षणप्रेमी व्यक्तींनी सुमारे ४००० रुपयांच्या देणग्या या महाविद्यालयास दिल्या. हे महाविद्यालय सुरू करण्यास प्रामुख्याने बापूजी व श्री. एच. टी. पाटील यांची जिद्द कारणीभूत ठरली.

### २.३.७ काकासाहेब चव्हाण महाविद्यालय, तळमावले :

काकासाहेब चव्हाण यांच्या ५६ व्या वाढदिवसानिमित्त जमलेला सुमारे वीस हजार रुपयांचा गौरव निधी काकांनी नामदार बाळासाहेब देसाई यांच्या हस्ते बापूजींच्या हाती सोपविला. श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेने आवश्यक अनामत रकमेसह तळमावले येथे कॉलेज काढण्यास परवानगी करिता शिवाजी विद्यापीठाकडे अर्ज केला. विद्यापीठाच्या परवानगीने १५ जून १९६९ पासून संस्थेने हे कॉलेज सुरू केले. हे कॉलेज स्थापन होण्यामध्ये काकासाहेब चव्हाण यांचा सिंहाचा वाटा असल्याने या कॉलेजचे नाव काकासाहेब चव्हाण महाविद्यालय असे ठेवण्यात आले. श्री सासनूर हे या महाविद्यालयाचे सुरुवातीचे प्राचार्य होते. त्यांनी आपल्या कारकीर्दीत कॉलेज प्रगतीपथावर नेले.

### २.३.८ राजे रामराव महाविद्यालय जत :

कै. राजे रामराव डफळे यांनी जत भागात अनेक लोककल्याणाच्या गोष्टी केल्या. त्यांचे पुत्र श्रीमंत विजयसिंह डफळे हे उदार शिक्षणप्रेमी, उत्कृष्ट क्रीडापटू व माजी संसद सदस्य होते. त्यांनी जत संस्थेतील महाविद्यालयाच्या स्थापनेकरिता बापूजींना पन्नास हजार रुपयाची देणगी दिली. शिवाय महाविद्यालयाकरिता आपल्या आलिशान राजवाड्याचा काही भाग व प्रशस्त मोकळी जागा महाविद्यालयास दिली. त्यामुळे दि. १५ जून १९६९ पासून श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कला, वाणिज्य महाविद्यालय जतला सुरू झाले. या महाविद्यालयास कै. राजे रामराव महाराजांचे नाव देण्यात आले. या महाविद्यालयामुळे जत सारख्या दुष्काळाने सतत गाजलेल्या परिसरातील सर्वसामान्य समाजातील विद्यार्थ्यांच्या उच्च शिक्षणाची सोय झाली.

### २.३.९ तुळजाभवानी महाविद्यालय, तुळजापूर :

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे तुळजापूर येथे १९ जून १९५९ रोजी तुळजाभवानी ट्रेनिंग कॉलेज व सन १९६१ मध्ये महर्षी विठ्ठल रामजी शिंदे हायस्कूल स्थापन करण्यात आले होते. याच्या जोडीलाच तुळजापूर सारख्या तीर्थक्षेत्री व तालुक्याच्या ठिकाणी महाविद्यालय असावे. या इच्छेतून बापूजी व त्यांचे सहकारी व स्थानिक शिक्षण प्रेमी यांनी १९६४ मध्ये महाविद्यालय स्थापनेसाठी प्रयत्न केला परंतु यश मिळू शकले नाही. सन १९७१ मध्ये प्राचार्य देशमुख व रामकृष्ण परमहंस महाविद्यालयाचे प्राचार्य व्ही. जी. वाळके आणि बापूजी साळुंखे यांच्या प्रयत्नामुळे संस्थेला जून १९७१ पासून कॉलेज काढण्यास परवानगी मिळाली. दि. ३ जून १९७१ पासून प्रत्यक्ष कॉलेजला सुरुवात झाली.

अशा प्रकारे श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेने संस्थेची स्थापना झाल्यानंतर पहिल्या पाच वर्षाच्या आत महाविद्यालयांची स्थापना केली. संस्थेने पहिले महाविद्यालय शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या मराठवाड्यात उस्मानाबाद येथे सन १९५९ मध्ये सुरू केले. त्यानंतर सन १९७१ मध्ये मराठवाड्यात तुळजापूर येथे संस्थेचे महाविद्यालय सुरू झाले. पुणे विद्यापीठाच्या कक्षेत इचलकरंजी व तासगाव या ठिकाणी १९६२ मध्ये संस्थेने महाविद्यालयाची स्थापना केली. सन १९६२ मध्ये शिवाजी विद्यापीठाची स्थापना झाल्यानंतर कोल्हापूर, मिरज, सातारा, तळमावले व जत या ठिकाणी संस्थेने महाविद्यालयाची स्थापना केली. तळमावले सारख्या डोंगराळ भागात तसेच जत सारख्या सतत दुष्काळी व उपेक्षित भागात महाविद्यालयाची स्थापना करून संस्थेने या परिसरातील सर्वसामान्य समाजातील विद्यार्थ्यांच्या उच्च शिक्षणाची सोय केलेली दिसून येते. श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेने स्थापनेनंतरच्या पहिल्या पंचवीस वर्षात महाराष्ट्रात एकूण दहा महाविद्यालय स्थापन करून ग्रामीण भागातल्या बहुजन समाजाला उच्च शिक्षणाचे द्वार खुले केले.

## २.४ व्यावसायिक शिक्षण :

स्वातंत्र्यानंतर भारत सरकारने तांत्रिक अभियांत्रिकी कृषी व वैदक शिक्षणाला उत्तेजन दिले. महाराष्ट्र शासनाने देखील तांत्रिक कृषी व वैद्यकीय शिक्षणाची सोय शासकीय पातळीवर केली. शासनाने नेमलेल्या शिक्षण आयोगांनी देखील माध्यमिक, उच्च माध्यमिक व महाविद्यालयीन शिक्षणाचे मोठ्या प्रमाणावर व्यावसायिकरण व्हावे यासाठी प्रयत्न केले. महाराष्ट्रातल्या तळागाळातल्या खेड्यापर्यंत शिक्षणाची गंगा नेऊन पोचविणाऱ्या खाजगी शिक्षण संस्थांनी मात्र व्यावसायिक शिक्षणाकडे दुर्लक्ष केलेले दिसून येते. श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था ही याला अपवाद नाही संस्थेने व्यावसायिक शिक्षणाबाबत पुढील कार्य केले आहे.

### २.४.१ अध्यापक विद्यालय :

बहुजन समाजातील शिक्षक असल्याशिवाय बहुजन समाजातील मुलांचे शिक्षण होणार नाही. हा विचार महात्मा ज्योतिबा फुले यांनी मांडला. याला अनुसरूनच मुलींना शिक्षण देण्याकरिता त्यांनी आपल्या पत्नी सौ सावित्रीबाई फुले यांना प्रशिक्षण देऊन शिक्षका बनविले. श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेने ग्रामीण अध्यापक प्रशिक्षण केंद्र सुरू केली.

### २.४.२ तुळजाभवानी जुनिअर कॉलेज ऑफ एज्युकेशन तुळजापूर :

ग्रामीण भागात प्रशिक्षित शिक्षक निर्माण व्हावेत या उद्देशाने संस्थेच्या जून १९५९ साली या शाखेची

स्थापना करण्यात आली. हे कॉलेज दशावतार मठामध्ये भरत होते. सध्या हे कॉलेज स्वतःच्या सुसज्ज इमारती भरते. या इमारतीत ट्रेनिंग कॉलेज करिता आवश्यक साहित्य फिल्म प्रोजेक्टर, दूरदर्शन, सुतकाम, विणकाम याकरिता स्वतंत्र हॉल उपलब्ध आहेत. सन १९८७-८८ मध्ये या कॉलेजमध्ये १२० विद्यार्थी संख्या होती.

### २.४.३ गुरुजन ज्युनिअर कॉलेज ऑफ एज्युकेशन, पाटण :

महाराष्ट्रात स्वातंत्र्यपूर्वकालापासूनच शैक्षणिक चळवळीचा वारसा निर्माण झाला होता. तरीही हे शिक्षण शहरी भागामध्ये चालू होते. ग्रामीण विभागातील शैक्षणिक कार्याचा उठाव हा तेथील शिक्षक निर्माण झाल्याशिवाय होणार नव्हता. ग्रामीण भागात नवीन शाळा सुरू करण्याकरिता प्रशिक्षित शिक्षकांची आवश्यकता भासत होती. याकरिता संस्थेने १९५९ मध्ये या अध्यापक विद्यालयाची स्थापना केली. सुरुवातीला स्थानिक देणग्या व संस्थेची आर्थिक मदत यावर एका खाजगी इमारतीत हे कॉलेज सुरू झाले. यानंतर चारच वर्षात कॉलेजने स्वतःची सुसज्ज इमारत बांधली. सुरुवातीला बाहेर गावच्या विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहाची सोय होती. तेथे १६० विद्यार्थी संख्या होती. सन १९८७-८८ पासून शासनामार्फत मर्यादित प्रवेश दिला जातो. त्यामुळे प्रथम वर्ष ४० व द्वितीय वर्षी ४० अशी एकूण विद्यार्थी संख्या फक्त ८० आहे.

### २.४.४ अद्यापक जुनियर कॉलेज ऑफ एज्युकेशन, तासगाव :

सांगली जिल्ह्यात तासगाव येथे बापूजींनी जून १९६० मध्ये ट्रेनिंग कॉलेज सुरू केले. सुरुवातीला ते तासगाव येथील संस्थाने श्री भाऊसाहेब पटवर्धन यांचे इमारतीत सुरू केले. सध्या कॉलेजसाठी संस्थेने नऊ खोल्यांची सुसज्ज इमारत बांधलेली आहे. सन १९८१-८२ या वर्षात कॉलेजमध्ये प्रथम वर्षास ४० व द्वितीय वर्षात ४० अशी ८० विद्यार्थी संख्या होती.

### २.४.५ प्रताप ज्युनिअर कॉलेज ऑम एज्युकेशन वडणगे :

कोल्हापूर जिल्ह्यातील करवीर तालुक्यातील वडणगे निगवे एक खेडेगाव आहे. कोल्हापूर शहराजवळ बहुजन समाजाच्या सोयीसाठी प्रशिक्षण पदविका अभ्यासक्रमाची गरज भागविण्यासाठी बापूजींनी कोल्हापूर नगरपालिकेचे अध्यक्ष कैलासवासी दादा हळदकर यांच्या मदतीने कोल्हापूर जवळच निगवे येथे तेथील वतनदार श्रीमंत बहादुर चव्हाण यांच्या साह्याने जून १९६० पासून प्रताप ज्युनिअर कॉलेज ऑफ एज्युकेशन सुरू केले सुरुवातीला कॉलेज करिता हिम्मत बहादूर चव्हाण यांनी आपला वाडा व अकरा एकर बागायत जमीन दिली सध्या स्वतःच्या मालकीच्या जागेवर सदर अद्यावत इमारतीत हे कॉलेज भरते या इमारती करिता ग्रामस्थांनी ६० टक्के व संस्थेने ४० टक्के खर्च केला. सन १९८० ८१ मध्ये या कॉलेजमध्ये ७८ विद्यार्थी संख्या होती.

### २.४.६ जय मल्हार ज्युनिअर कॉलेज ऑफ एज्युकेशन, नळदुर्ग :

इसवी सन १९६१ मध्ये उस्मानाबाद जिल्ह्यात नळदुर्ग या ठिकाणी स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या जय मल्हार जुनियर कॉलेज ऑफ एज्युकेशन ची स्थापना करण्यात आली. सन १९८०-८१ या वर्षात या कॉलेजची विद्यार्थी संख्या ७२ होती.

### २.४.७ जूनियर कॉलेज ऑफ एज्युकेशन बीड :

सन १९६५ मध्ये बापूजींनी बीड येथे एक अध्यापक विद्यालय सुरू केले. हे स्थापन करण्यामध्ये

मराठवाड्यातील लोकप्रिय आमदार श्री साहेबराव हंगरेकर, शिंदे गुरुजी, कोल्हे वकील, श्री. नरसिंहराव देशमुख इत्यादींचे सहकार्य लाभले. तसेच संस्थेचे कार्यवाहक व ज्येष्ठ आजीव सेवक भाऊसाहेब मराठे, श्री. नानासाहेब कळंत्रे यांचेही सहकार्य लाभले. बापूजींनी बीड येथे आठ दिवस मुक्काम ठोकून व तेथील प्रतिष्ठित नागरिकांशी विचारविनिमय करून हे कार्य केले.

**२.४.८ बी. एड. कॉलेज, उस्मानाबाद :**

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे उस्मानाबाद येथे सन १९५९ मध्ये रामकृष्ण परमहंस महाविद्यालय सुरू झाले होते. बापूजींना असे दिसून आले की मराठवाड्यात शिक्षणाचा प्रसार कमी असून तेथे प्रशिक्षित शिक्षक ही पुरेशा संख्येने उपलब्ध नव्हते. मराठवाड्यात त्यावेळी प्रशिक्षित शिक्षकांचे प्रमाण १४% होते. माध्यमिक विद्यालयांमध्ये प्रशिक्षित शिक्षकांची मोठ्या प्रमाणावर गरज असल्याचे ओळखून संस्थेने सन १९६० मध्ये उस्मानाबाद येथे बी. एड. कॉलेज स्थापन केले. सुरुवातीला या कॉलेजला कोणाचेच आर्थिक सहाय्य लाभले नाही. बापूजी व त्यांचे सहकारी यांनी अनेक वेळा शिक्षण मंत्र्याच्या भेटी घेतल्या. तेव्हा महाराष्ट्र राज्याचे त्यावेळचे शिक्षण खात्याचे उपमंत्री नामदार भाऊसाहेब वर्तक यांनी कॉलेजच्या इमारती करिता ३५ हजार रुपयेचे कर्ज मंजूर करून अंशतः आर्थिक समस्या सोडविण्यास मदत केली. या कॉलेजमध्ये आता शिक्षण शास्त्रातील पदव्युत्तर शिक्षण क्रम शिकविण्याची व्यवस्था आहे.

अशा प्रकारे पहिल्या पंचवीस वर्षाच्या कालावधीत श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेची ८ अध्यापक विद्यालय होती. यामध्ये ७ जूनियर कॉलेज ऑफ एज्युकेशन तर १ बी. एड. कॉलेज आहे. संस्था स्थापन झाली त्याच वर्षी सन १९५५ मध्ये मुलींकरिता कमला नेहरू जुनियर कॉलेज ऑफ एज्युकेशनची स्थापना करून संस्थेने फार मोठा उपक्रम हाती घेतला. महात्मा फुले यांनी सुरू केलेले स्त्री शिक्षण प्रसाराचे कार्य पुढे चालू ठेवून संस्थेने स्त्रियांच्या अध्यापन शिक्षणाचा मार्ग मोकळा केला. सन १९५९ मध्ये संस्थेने मराठवाड्यात उस्मानाबाद येथे पहिले महाविद्यालय सुरू केले. त्याचबरोबर तुळजापूर, बीड, नळदुर्ग या ठिकाणीही अध्यापक विद्यामंदिरे सुरू करून मराठवाड्यातील शैक्षणिक विस्तार केलेला दिसतो.

**२.५ तांत्रिक शिक्षण :**

स्वतंत्र भारताची निकडीची गरज म्हणजे सर्वच क्षेत्रात उत्पादनाची वाढ करणे ही होती. देशाच्या संरक्षणाच्या दृष्टीने ही उच्चतांत्रिक व अभियांत्रिकी शिक्षणाचा विस्तार व विकास करणे ही देखील महत्त्वाची बाब होती. सरकारने नेमलेल्या समितीच्या सल्ल्यानुसार औद्योगिक व तांत्रिक शिक्षणाची सोय तीन स्तरावर करण्यात आली.

१. पदवी व पदव्युत्तर शिक्षण २. तंत्रनिकेतनातील पदविका अभ्यासक्रम ३. शालेय स्तरावरील तांत्रिक शिक्षण

शालेय स्तरावरील सामान्य शिक्षण व तांत्रिक शिक्षण यांची योग्य सांगड घालण्यासाठी तीन उपक्रम सुरू आहेत. पहिला उपक्रम तंत्र विद्यालयांची (टेक्निकल हायस्कूल) स्थापना. या कार्याचा आरंभ सन १९३६ – ३७ पासूनच झाला आहे. दुसरा उपक्रम बहुउद्देशीय शाळांत तांत्रिक शिक्षणाची सोय. तिसरा उपक्रम म्हणजे अभ्यासक्रमात कार्यानुभव या एका महत्त्वाच्या विषयाचा समावेश.

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेने तांत्रिक शिक्षणाच्या बाबतीत पहिल्या पंचवीस वर्षात माध्यमिक स्तरावर फक्त दोन तांत्रिक विद्यालयांची (टेक्निकल हायस्कूलची) स्थापना केली आहे.

**२.५.१ स्वामी रामानंद भारती टेक्निकल हायस्कूल, तासगाव :**

तासगाव जिल्हा सांगली येथे सन १९५५ मध्ये संस्थेने स्वामी रामानंद भारती विद्या मंदिराची स्थापना केली. याच हायस्कूलमध्ये सन १९६४ मध्ये टेक्निकल शाखा सुरू करण्यात आली. सन १९८० ८१ मध्ये विद्यालयाच्या या शाखेत १५५ विद्यार्थी संख्या होती.

**२.५.२ पराशर टेक्निकल हायस्कूल, पारगाव :**

सन १९६३ मध्ये कोल्हापूर जिल्ह्यात हातकणंगले तालुक्यात या टेक्निकल हायस्कूलची स्थापना करण्यात आली. सन १९८०-८१ मध्ये या विद्यालयातील टेक्निकल शाखेचे विद्यार्थी संख्या १६१ होती.

अशाप्रकारे पहिल्या २५ वर्षात व्यावसायिक शिक्षणाच्या क्षेत्रात मात्र संस्थेने काही खास प्रयत्न केलेले दिसून येत नाहीत. स्वातंत्र्यानंतर महाराष्ट्रामध्ये खेड्यापाड्यातून विखुरलेल्या बहुजन समाजाला केवळ पुस्तकी ज्ञान न देता व्यवहारिक व्यावसायिक शिक्षण देणे गरजेचे होते. या दृष्टीने महाराष्ट्र शासनाने देखील तांत्रिक कृषी व वैद्यकीय शिक्षणास उत्तेजन दिले. परंतु पहिल्या २५ वर्षाच्या कालावधीत संस्थेने अध्यापक विद्यालय व दोन टेक्निकल हायस्कूल वगळता व्यावसायिक शिक्षणाकडे फारसे लक्ष पुरवलेले दिसत नाही .

**स्वयं अध्ययन प्रश्न – २ :**

**अ) रिकाम्या जागा भरा.**

१. सन ..... मध्ये उस्मानाबाद येथे बी.एड कॉलेज स्थापन केले.
   अ) १९६० ब) १९६१
   क) १९६२ ड) १९६३

२. स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे 'जय मल्हार जुनियर कॉलेज ऑफ एज्युकेशन' हे कॉलेज ..... येथे आहे.
   अ) उस्मानाबाद ब) तुळजापूर
   क) नळदुर्ग ड) बीड

३. श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या सर्वात जास्त शाखा ..... जिल्ह्यात आहेत.
   अ) कोल्हापूर ब) सांगली
   क) सातारा ड) पुणे

४. श्री स्वामी विवेकानंद संस्थेने बेळगाव जिल्ह्यात ..... या गावी हायस्कूल सुरु केले.
   अ) निपाणी ब) हत्तरगी
   क) किणे ड) कागवाड

५. कोल्हापूर येथे ..... पेठेत बापुजी साळुंखे यांनी वसतिगृह सुरु केले.

अ) शिवाजी पेठेत ब) रविवार पेठ

क) मंगळवार पेठ ड) जुना बुधवार पेठ

## २.२.३ शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर :

महाराष्ट्राला सामाजिक, सांस्कृतिक व शैक्षणिक क्षेत्रात मोठा वारसा लाभलेला आहे. राजर्षी शाहू महाराजांनी कोल्हापूरच्या शैक्षणिक विकासाला जालना दिली. त्यांच्यानंतर छत्रपती राजाराम महाराजांनी त्यांचे हे धोरण पुढे चालविले. कोल्हापूर बरोबरच आजूबाजूच्या सातारा, सांगली, सोलापूर, बेळगाव, रत्नागिरी, विजापूर अशा शेजारच्या जिल्ह्यातून येणाऱ्या गरीब विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची व्यवस्था करणारे कोल्हापूर हे दक्षिण महाराष्ट्रातील एक प्रमुख केंद्र होते. पुढे १९६२ मध्ये कोल्हापूर येथे शिवाजी विद्यापीठाची स्थापना झाली.

### २.२.३.१ शिवाजी विद्यापीठाच्या स्थापनेचा इतिहास :

आज कोल्हापुरात शिवाजी विद्यापीठ मोठ्या दिमाखाने उभे असल्याचे दिसून येते. कला, वाणिज्य, वैद्यक, तंत्रशिक्षण इत्यादी विविध शाखातील उच्च शिक्षण देणारी असंख्य महाविद्यालय या विद्यापीठाच्या कक्षेत मोठ्या जोमाने शिक्षण प्रसाराचे काम करीत आहेत. जवळजवळ अर्धशतक ओलांडलेल्या प्राथमिक शाळा ही अनेक आहेत या विद्यापीठाची ज्ञानवृक्षाची मूळ चांगली खोलवर रुजली आहेत. अगणित शाखांनी हा वृक्ष भरलेला आहे परंतु प्रतिकूल परिस्थितीत हा वृक्ष लावण्याचे कार्य ज्यांनी केले त्याची माहिती घेणे आवश्यक आहे.

स्वातंत्र्यपूर्व काळात जुन्या मुंबई राज्यात उच्च शिक्षणाची जबाबदारी ही सन १८५७ मध्ये स्थापन झालेल्या मुंबई विद्यापीठावर होती. सन १९४७ साली भारताला स्वातंत्र्य मिळाल्याने मुंबई राज्यासाठी मुंबई विद्यापीठ हेच एकमेव विद्यापीठ होते. या विद्यापीठाचे कार्यक्षेत्र मुंबईसह पश्चिम महाराष्ट्र, उत्तर कर्नाटक व संपूर्ण गुजरात एवढ्या मोठ्या भागात होते.

स्वातंत्र्यानंतर मुंबई विद्यापीठाचा व्याप वाढल्याने प्रशासकीय सोयीसाठी प्रादेशिक विद्यापीठे स्थापन करण्याचे ठरले. त्याप्रमाणे गुजरातसाठी अहमदाबाद येथे उत्तर कर्नाटकसाठी धारवाड येथे विद्यापीठाची स्थापना १९४८ मध्ये करण्यात आली. तर मुंबई येथे फक्त मुलींसाठी महिला विद्यापीठ १९५९ साली स्थापन करण्यात आले.

राज्य पुनर्रचनेच्या धोरणानुसार एक नोव्हेंबर १९५६ मध्ये द्विभाषिक मुंबई राज्याची निर्मिती झाली. या द्विभाषिक मुंबई राज्यात मुंबईसाठी मुंबई विद्यापीठ विदर्भातील आठ जिल्ह्यांसाठी नागपूर विद्यापीठ(१९२५), पश्चिम महाराष्ट्रातील १३ जिल्ह्यासाठी पुणे विद्यापीठ (१९४८), संपूर्ण गुजरातसाठी आमदाबाद येथील विद्यापीठ (१९४९), फक्त मुलींसाठी मुंबई येथील महिला विद्यापीठ (१९४९), अशी सहा विद्यापीठे कार्यरत होती.

पुढे पुणे विद्यापीठाचा व्याप वाढल्यामुळे नवीन प्रादेशिक विद्यापीठाची गरज वाटू लागली. त्यावेळेस कोल्हापूर येथे नवीन विद्यापीठाची मागणी जोर धरू लागली होती. कोल्हापूरला एखादे विद्यापीठ स्थापन करावे असे अनेकांना वाटत होते. त्या विद्यापीठाला छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव देण्याचे नक्की झाले होते. कोल्हापूर येथे विद्यापीठ स्थापन होण्यासाठी येथील जनतेने खूप परिश्रम घेतले.

### २.२.३.२ विद्यापीठ स्थापनेचे स्वातंत्र्यपूर्व काळातील प्रयत्न :

कोल्हापूर येथे विद्यापीठ स्थापनेची कल्पना फार जुनी आहे. राजश्री छत्रपती शाहू महाराज यांनी आपले संपूर्ण आयुष्य बहुजनांना शिक्षण मिळावे यासाठी खर्च केले. त्यांची कोल्हापूरला ग्रामीण विद्यापीठाची महत्त्वकांक्षा होती. तर करवीर नगरी छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावे विद्यापीठ व्हावे ही कल्पना राजाराम कॉलेजचे एक विद्वान व भूतपूर्व प्राचार्य आणि शिवचरित्राचे गाढे अभ्यासक डॉ. बाळकृष्ण यांनी कॉलेजच्या वार्षिक स्नेहसंमेलनात सर्वप्रथम १९३१-३२ साली मांडली. त्यानंतर संधी मिळेल तेव्हा प्रत्येक व्यासपीठावर डॉ. बाळकृष्ण आपल्या विद्यापीठ स्थापनेच्या कल्पनेचा सतत पाठपुरावा करीत राहिले.

डॉ. बाळकृष्ण यांनी आपली विद्यापीठ स्थापनेची कल्पना करवीर छत्रपती राजाराम महाराजांसमोर मांडली. राजाराम महाराजांनीही या कल्पनेला पाठिंबा दिला. तसेच विद्यापीठाला आवश्यक अशा अभ्यासाचा लॉ कॉलेज (१९३३), महाराणी ताराबाई टीचर्स कॉलेज (१९३४), इत्यादी संस्थांची निर्मिती केली. त्याचबरोबर कोल्हापूरच्या जनतेनेही विद्यापीठ स्थापनेच्या कल्पनेचे उस्फूर्तपणे स्वागत केले.

डॉ. बाळकृष्ण यांनी मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू चंदावरकर यांच्या उपस्थितीखाली कोल्हापूर येथे मोठा समारंभ घडविला होता. तेथे त्यांनी विद्यापीठ स्थापनेची निश्चित अशी योजना पुढे ठेवली. चंदावरकर यांनीही या कल्पनेस पाठिंबा दिला. अशा प्रकारे विद्यापीठ स्थापनेचे प्रयत्न जोमाने करणारे डॉ. बाळकृष्ण हे खऱ्या अर्थाने शिवाजी विद्यापीठाचे प्रेरणास्थान होते. तथापि विद्यापीठाचे पुरस्कर्ते डॉ. बाळकृष्ण यांचे दि. २४ ऑक्टोबर १९४० आणि छत्रपती राजाराम महाराज यांचे दि. २१ नोव्हेंबर १९४० रोजी निधन झाल्याने विद्यापीठ स्थापनेची चळवळ मंदावली.

### २.२.३.३ विद्यापीठ स्थापनेचे स्वातंत्र्योत्तर काळातील प्रयत्न :

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारत सरकारने विद्यापीठ शिक्षणाचा विचार करण्यासाठी डॉ. राधाकृष्णन यांच्या अध्यक्षतेखाली युनिव्हर्सिटी एज्युकेशन कमिशन नावाची समिती नेमली होती. शिक्षणाचे केंद्रीकरण शहरात झाले असल्याने ग्रामीण भागात शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी ग्रामीण विद्यापीठांच्या स्थापनेचा मुद्दा राधाकृष्णन समितीने सुचविला होता. त्यानंतर सन १९५४ मध्ये श्री माळी समितीने ग्रामीण विद्यापीठाच्या अभ्यासक्रमाचा तपशीलवार मसुदा केंद्र सरकारला दिला होता. त्याचप्रमाणे स्वातंत्र्योत्तर काळात दक्षिण महाराष्ट्रातील विद्यापीठ स्थापनेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला. या विद्यापीठ स्थापनेबाबत सभा, मेळावे, चर्चासत्रे सुरू झाली. विद्यापीठ प्रश्नावर लोकभावना हळूहळू तीव्र होत असल्याचे निदर्शनास आल्यावर करवीर नगरपालिकेने विद्यापीठ स्थापनेच्या मुद्द्यावर अभ्यास करण्यासाठी एक समिती स्थापन केली. या समितीने सुचविलेल्या शिफारशींवर आधारित असे एक निवेदन नगरपालिकेने राज्य सरकारला दिले होते. तथापि सरकारकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाला नाही. तरीही कोल्हापूर वाशीयांचे विद्यापीठ स्थापनेचे प्रयत्न चालूच राहिले.

द्विभाषिक मुंबई राज्याचे मुख्यमंत्री नामदार यशवंतराव चव्हाण यांनी सन १९५६-५७ साली सातारा जिल्ह्यातील फलटण येथील एका समारंभात विद्यापीठ स्थापनेच्या कल्पनेचा उल्लेख केला. पुढे कोल्हापूरच्या ताराराणी विद्यापीठाच्या एका समारंभातही यशवंतराव चव्हाण यांनी विद्यापीठ स्थापनेचा पुनरुच्चार केला. त्यांच्या या वक्तव्यामुळे विद्यापीठ स्थापनेच्या प्रयत्नांना जोर चढला.

पुणे विद्यापीठाचे तत्कालीन कुलगुरू रँगलर र.पु. परांजपे यांनी सप्टेंबर १९५६ मध्ये राजाराम कॉलेजच्या विद्यार्थ्यांसमोर केलेल्या भाषणात कोल्हापूरच्या शैक्षणिक कामगिरीचा अभिमानाने उल्लेख केला. तसेच कोल्हापुरात विद्यापीठाची स्थापना झाल्यास आपल्याला त्यांचे आश्चर्य वाटणार नाही आणि पुणे विद्यापीठाचे दुःखही होणार नाही, असे आपल्या भाषणात सांगितले. त्यांच्या या वक्तव्यामुळे विद्यापीठ स्थापनेच्या प्रयत्नांना नैतिक बळ प्राप्त झाले.

सन १९६० साली भाई माधवराव बागल यांनी मुख्यमंत्री नामदार यशवंतराव चव्हाण यांना कोल्हापूरला विद्यापीठाची मागणी करणारे लेखी निवेदन दिले. विद्यापीठ स्थापनेची कल्पना ही जनसामान्यात खोल रुजलेली होती. हिंदवी स्वराज्याचे संस्थापक व महाराष्ट्राचे स्फूर्ती स्थान असणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराजांचे विद्यापीठाच्या स्वरूपात चिरकाल, चिरंतन टिकणारे असे स्मारक करवीर नगरीत उभारावे या विचाराने कोल्हापूरची जनता भारावली होती.

### २.२.३.४ विद्यापीठ स्थापनेचे महाराष्ट्र राज्य सरकारचे प्रयत्न :

दि. १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्य अस्तित्वात आले. महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री म्हणून नामदार यशवंतराव चव्हाण व पहिले शिक्षणमंत्री म्हणून नामदार बाळासाहेब देसाई यांनी शपथ घेतली. हे दोघेही कोल्हापूरच्या राजाराम कॉलेजचे माजी विद्यार्थी होते. कोल्हापुर येथील वास्तव्यामुळे करवीरवाशी यांची विद्यापीठ स्थापनेमागील तळमळ ते जाणून होते. त्यामुळे त्यांनी विद्यापीठ स्थापनेच्या प्रश्नाकडे लक्ष देऊन विद्यापीठ स्थापनेच्या दृष्टीने ठोस उपाययोजना सुरू केली.

दक्षिण महाराष्ट्रात कोल्हापूर येथे विद्यापीठ स्थापन करण्याचे निश्चित झाल्यानंतर विद्यापीठ स्थापनेची पूर्वतयारी म्हणून श्री छत्रपती शिवाजी युनिव्हर्सिटी कमिटीच्या स्थापनेची घोषणा शिक्षण मंत्री माननीय बाळासाहेब देसाई यांनी जून १९६१ मध्ये मुंबई आकाशवाणी वरून केली. तसेच मुंबई येथील पत्रकार परिषदेत माननीय शिक्षण मंत्र्यांनी १० जुलै १९६१ रोजी कमिटीतील सदस्यांची नावे जाहीर केली.

विधिमंडळाच्या अधिवेशनात सरकारने विधानसभा विद्यापीठ स्थापनेची ५० लाख रुपयाची प्राथमिक तरतूद केल्याची माहिती माननीय शिक्षण मंत्र्यांनी ९ ऑगस्ट १९६१ रोजी दिली. तसेच शिवाजी युनिव्हर्सिटी कमिटीच्या टर्म्स ऑफ रेफरन्स ही सभागृहात सांगितल्या.

अशाप्रकारे राज्य सरकारने विद्यापीठ स्थापनेच्या दृष्टीने आणखी एक पाऊल पुढे टाकले.

**श्री छत्रपती शिवाजी युनिव्हर्सिटी कमिटीची निर्मिती :**

महाराष्ट्र शासनाने श्री छत्रपती शिवाजी युनिव्हर्सिटी कमिटीचे अध्यक्ष म्हणून नियुक्ती केल्याचे पत्र प्राचार्य

सी. आर. तावडे यांना ४ सप्टेंबर १९६१ रोजी मिळाले. तसेच कमिटीचा अहवाल सादर करण्यास चार महिन्याची मुदत दिलेली होती.

श्री छत्रपती शिवाजी युनिव्हर्सिटी कमिटी मधील अकरा सदस्य पुढील प्रमाणे होते –

१ प्राचार्य सी. आर. तावडे – अध्यक्ष, कोल्हापूर

२. प्राचार्य डॉक्टर बी. आर. ढेकणे – सदस्य, राजाराम कॉलेज कोल्हापूर

३. प्राचार्य डॉक्टर आर. एस. मुगळी – सदस्य, विलिंग्डन कॉलेज सांगली

४. श्री राजाराम बापू पाटील – सदस्य, सांगली

५. तर्कतीर्थ लक्ष्मण शास्त्री जोशी – सदस्य, वाई, सातारा

६. डॉक्टर बी. एस. पाटील – सदस्य, छत्रपती शिवाजी कॉलेज सातारा

७. प्राचार्य डॉक्टर भगवानदास – सदस्य, दयानंद कॉलेज, सोलापूर

८. प्राचार्य बाळासाहेब खर्डेकर – सदस्य, आर्ट्स कॉमर्स कॉलेज, वेंगुर्ला, रत्नागिरी

९. प्राचार्य डॉक्टर बी. एस. नाईक – सदस्य, राणी पार्वती देवी हायस्कूल, सावंतवाडी

१०. प्राध्यापक ना. सी. फडके – सदस्य, पुणे

११. श्री. व्ही. ए. आपटे – सदस्य. सचिव, शिक्षण उपसंचालक, पुणे

कमिटीने मुंबई विद्यापीठ, पुणे विद्यापीठ, महाराजा सयाजीराव गायकवाड विद्यापीठ बडोदा (गुजरात), श्री वल्लभभाई पटेल विद्यापीठ, आनंद (गुजरात), कर्नाटक विद्यापीठ धारवाड (कर्नाटक) इत्यादी विद्यापीठांना भेटी देऊन माहिती मिळविली. तसेच महाराष्ट्रातील शिक्षण तज्ञांकडून माहिती घेतली. जनतेची मते आजमावली. त्याचप्रमाणे कमिटीने एकूण १२६ मान्यवरांकडून तोंडी माहिती व ६४६ मान्यवरांकडून प्रश्नावली द्वारे माहिती मिळवली.

कमिटीने दिलेल्या नियोजित वेळी चार महिन्यात आपला अहवाल सादर केला. कमिटीचे अध्यक्ष प्राचार्य सी. आर. तावडे यांनी दिनांक ३० जानेवारी १९६२ रोजी आपला अहवाल शिक्षण मंत्री माननीय बाळासाहेब देसाई यांना सचिवालयात सादर केला. कमिटीने आपल्या अहवालात सरकारला विद्यापीठाच्या संदर्भात काही शिफारशी सुचविल्या.

**श्री छत्रपती शिवाजी युनिव्हर्सिटी कमिटीच्या मुख्य शिफारसी :**

**१. विद्यापीठाचा प्रकार :**

इतर महाविद्यालयांना संलग्न करून घेणारी, संशोधन करणारी व स्वतः पदव्युत्तर स्तरापर्यंत शिक्षण देणारी संस्था असे विद्यापीठाचे स्वरूप असावे.

**२. विद्यापीठाचे कार्यक्षेत्र :**

विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात कोल्हापूर, सोलापूर, सातारा, सांगली व रत्नागिरी या पाच जिल्ह्यांचा समावेश करावा.

**३. विद्यापीठाची जागा :**

कोल्हापूरच्या दक्षिणेकडील सागर माळ व राजाराम तलावासह पुणे – बेंगलोर राष्ट्रीय महामार्गावरच्या दोन्ही बाजूस पसरलेल्या जागेवर विद्यापीठ उभारावे.

**४. विद्यापीठाचे नाव :**

राज्य शासनाच्या आदेशानुसार विद्यापीठाचे नाव श्री छत्रपती शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर असे ठेवायचे होते पण असे लांबलचक नाव ठेवले की लोक राष्ट्रपुरुषाच्या नावाचा अपभ्रंश करतात व मुख्य नाव बाजूलाच पडते तसे होऊ नये म्हणून शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर असे साधे सुटसुटीत नाव ठेवावे.

**५. विद्यापीठाची कार्य :**

(अ) मराठी भाषेच्या व साहित्याच्या तसेच महाराष्ट्राच्या इतिहासाच्या व संस्कृतीच्या अभ्यासाला प्रोत्साहन देणे.

(ब) विद्यापीठ कार्यक्षेत्रातील साधन संपत्तीचा अभ्यास करणे आणि या क्षेत्राच्या विकासासाठी आवश्यक त्या सुधारणा उपयोजित संशोधनाद्वारे सुचविणे.

कमिटीच्या शिफारशीनुसार राज्य सरकारने विद्यापीठाचे नाव श्री छत्रपती शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर ऐवजी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर असे बदलले. त्यानंतर सरकारने शिवाजी विद्यापीठाचे विधेयक विधिमंडळात मांडले. १७ जुलै १९६२ रोजी विधान परिषदेने व २४ जुलै १९६२ रोजी विधानसभेने या विधेयकाला मंजुरी दिली. दिनांक १७ ऑगस्ट १९६२ रोजी शिवाजी विद्यापीठ विधेयकाचे कायद्यात रूपांतर होऊन विद्यापीठ स्थापनेवर शिक्कामोर्तब झाले.

**२.२.३.५ शिवाजी विद्यापीठाची स्थापना :**

महाराष्ट्र सरकारने शिवाजी विद्यापीठ कायद्यातील काही तरतुदींचा दिनांक १ सप्टेंबर १९६२ रोजी प्रत्यक्षात अंमलबजावणी केली यामुळे कोल्हापुरात विद्यापीठ स्थापनेच्या दृष्टीने आणखी एक पाऊल पुढे पडले.

दिनांक ११ सप्टेंबर १९६२ रोजी शिवाजी विद्यापीठाचे प्रथम कुलगुरू म्हणून महाराष्ट्र राज्याचे शिक्षण संचालक डॉ. आप्पासाहेब पवार यांची नियुक्ती सरकारने केली. दिनांक २० सप्टेंबर १९६२ रोजी डॉ. आप्पासाहेब पवार यांनी शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरू पदाचा कार्यभार स्वीकारला. याचबरोबर दक्षिण महाराष्ट्रात एक स्वतंत्र ग्रामीण विद्यापीठ असावे ही दक्षिण महाराष्ट्रातील जनतेची दीर्घकाळची असणारी इच्छा सफल झाली.

**२.२.३.६ शिवाजी विद्यापीठाच्या कार्यालयीन कामकाजाला सुरुवात :**

शिवाजी विद्यापीठाच्या स्थापनेवेळी शिवाजी विद्यापीठाला स्वतःची अशी जागा किंवा इमारत नव्हती. त्यामुळे सुरुवातीला विद्यापीठाच्या कार्यालयीन कामकाजासाठी माजी खासदार कै. भाऊसाहेब महागावकर यांचा बंगला दोन वर्ष भाड्याने घेण्यात आला. याच महागावकर बंगल्यात सध्याचे ओपल हॉटेल आहे. दिनांक ८ ऑक्टोबर १९६२ रोजी शिवाजी विद्यापीठाचा नोकर वर्ग, कोल्हापुरातील अनेक शिक्षणप्रेमी नागरिक यांच्या साक्षीने दुपारी १२ वाजून ४५ मिनिटांनी कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार यांनी विधीपूर्वक सरस्वती पूजन करून

शिवाजी विद्यापीठाच्या कार्यालयीन कामकाजाला रीतसर सुरुवात केली. शिवाजी विद्यापीठाचे कुलपती आणि महाराष्ट्राचे राज्यपाल डॉ. सुब्रायन यांचे थोड्या दिवसापूर्वी दुःखद निधन झाल्याने शिवाजी विद्यापीठाच्या कार्यालयाच्या प्रारंभानिमित्त सायंकाळी चार ते आठ पर्यंत निमंत्रितांसाठी पान सुपारीचा असलेला कार्यक्रम मात्र रद्द करण्यात आला.

**◆ शिवाजी विद्यापीठाचे औपचारिक उद्घाटन :**

पंचगंगेला ज्ञानगंगा मिळाली असा तो अमृताने न्हालेला सोन्याचा दिवस अखेर उजाडला. १८ नोव्हेंबर १९६२ रोजी शिवाजी विद्यापीठाचे औपचारिक उद्घाटन भारताचे तत्कालीन राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या हस्ते झाले.

हिंदवी स्वराज्य संस्थापक राष्ट्रनिर्माते शककर्तेयुगप्रवर्तक असे रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या नावाने विद्यापीठ रूपात शिक्षण क्षेत्रात नवीन तारा उदयाला आला. महात्मा ज्योतिराव फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाळकृष्ण अशा थोर व्यक्तींचे विद्यापीठ स्थापनेचे स्वप्न साकार झाले. शिवाजी विद्यापीठाच्या रूपाने ज्ञानाची गंगा दक्षिण महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात अवतरली.

विद्यापीठाच्या शैक्षणिक कामाला दि. ९ जून १९६३ रोजी प्रारंभ झाला. कोल्हापूर, सांगली, सातारा, सोलापूर व रत्नागिरी या पाच जिल्ह्यांचे सुमारे ५५ हजार चौरस किलोमीटर एवढे विद्यापीठाचे कार्यक्षेत्र होते. या क्षेत्रातील लोकसंख्या सुमारे ८० लाख होती. विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात प्रारंभी ३४ महाविद्यालयातून सुमारे १४००० विद्यार्थी शिक्षण घेत होते. कृषी व्यतिरिक्त शिक्षणाची सर्व अंगे शिवाजी विद्यापीठाकडे होती.

शिवाजी विद्यापीठ खऱ्या अर्थाने ग्रामीण जनतेचे विद्यापीठ व्हावे ही तळमळ डॉ. अप्पासाहेब यांच्या मनात होती. विद्यापीठाला आतून तसेच बाहेरून परिपूर्णता आणून ग्रामीण जनतेला जिव्हाळा आपुलकी वाटावी व विद्यापीठाच्या प्रवाहात ग्रामीण जनता समरस व्हावी म्हणून डॉ. आप्पासाहेब पवारांनी विद्यापीठाच्यावतीने प्राध्यापक प्रशिक्षणाची योजना आखली. विद्यार्थी प्रतिनिधीची शिबिरे भरविली. विद्यार्थी भवनची स्थापना केली. ग्रामीण शिबीरे भरविली. त्यामुळे आज शिवाजी विद्यापीठ हे कोल्हापूरचं भूषण बनल आहे.

आज शिवाजी विद्यापीठ बहुजन समाजाच्या आकांक्षा पूर्ण करणार ध्येयवादी मंदिर बनल आहे. बाहेरून जितकं भव्य जितका सुंदर आहे. तितका आदर्श आहे. तितकच ध्येयवादान रसरसलेलं आहे आणि सेवावृत्तीने भारलेलं आहे. नव्या युगाची नवी पिढी निर्माण करण्याचे कार्य करीत आहे. त्यामुळे शिवाजी विद्यापीठ हे आपले विद्यापीठ असल्याची भावना ग्रामीण जनतेच्या मनात दृढ झाली आहे.

**◆ शिवाजी विद्यापीठाची शैक्षणिक वाटचाल :**

**१ शिवाजी विद्यापीठाचे कार्यक्षेत्र :**

९ जून १९६३ रोजी शिवाजी विद्यापीठाच्या कार्याला प्रारंभ झाला. या काळात शिवाजी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर आणि रत्नागिरी या जिल्ह्यांचा समावेश होता. हे पाचही जिल्हे सामाजिक आर्थिक व राजकीयदृष्ट्या एकमेकांशी जोडलेले होते. सुरुवातीला पुणे विद्यापीठ कार्यक्षेत्रातील ७१ महाविद्यालयापैकी ३४ महाविद्यालयांचा समावेश शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रात करण्यात आला. या

पद्धतीने अनेक महाविद्यालये शिवाजी विद्यापीठाशी संलग्नित झाली. शिवाजी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील सर्वच घटकांनी शिवाजी विद्यापीठाची शैक्षणिक पातळी उंचावण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले. नंतरच्या काळात शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रात संलग्न महाविद्यालयांची संख्या दिवसेंदिवस वाढत गेली. सन २००० पर्यंत या महाविद्यालयांची संख्या २५५ इतकी झाल्याचे दिसून येते. यातील ७ विधी महाविद्यालये, २१ वैद्यकीय महाविद्यालये, २१ अध्यापक महाविद्यालये, ७ शारीरिक शिक्षण महाविद्यालये, १३ अभियांत्रिकी महाविद्यालये, ३ आर्किटेक्चर महाविद्यालये, ७ वाणिज्य व्यवस्थापन महाविद्यालये, ही महाविद्यालये, विद्यापीठ कार्यक्षेत्रात कार्यरत आहेत. या संलग्न महाविद्यालयाच्या संख्येत कालांतराने वाढ झाल्याचे दिसून येते. १९६२-६३ मध्ये ३४ संलग्न महाविद्यालयापासून झालेली सुरुवात सन २००० पर्यंत २५५ संलग्न महाविद्यालये इतकी झाली.

**२. शिवाजी विद्यापीठातील अधिविभागांची स्थापना :**

शिवाजी विद्यापीठ हे उच्च शिक्षणाचे केंद्र असून या विद्यापीठ परिसरात अनेक विषयात पदव्युत्तर शिक्षणाची सोय उपलब्ध करून देण्यात आली. पाच जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी पुणे व मुंबई येथे जावे लागत असे. त्यामुळे त्यांची सोय शिवाजी विद्यापीठाच्या स्थापनेमुळे येथे झाली. सन १९६२ ते २००० पर्यंत शिवाजी विद्यापीठांमध्ये २७ विभागांची स्थापना करण्यात आली. यामध्ये १९६२ मध्ये क्रीडा विभाग, १९६४ मध्ये पदार्थ विज्ञान, रसायनशास्त्र जीवशास्त्र, वनस्पतीशास्त्र व गणित या विभागांची सुरुवात करण्यात आली. त्यानंतर २२ जुलै १९६५ मध्ये इतिहास विभागाची व इंग्रजी विभागाची स्थापना शिवाजी विद्यापीठाचे पहिले कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार यांनी केली. १९७० साली राज्यशास्त्र व समाजशास्त्र विभागाची सुरुवात करण्यात आली.यावेळी राज्यशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. एन. डी. साखरीकर, समाजशास्त्र विभागाचे आवटी यांची विभाग प्रमुख म्हणून नेमणूक करण्यात आली. यानंतर १९७९ मध्ये मराठी, शिक्षणशास्त्र व १९८२ मध्ये संख्याशास्त्र विभागाची स्थापना करण्यात आली. दि. १ ऑगस्ट १९८२ पासून केंद्र सरकारच्या गृह मंत्रालयातर्फे अनुसूचित जाती - जमातीकरिता आय. ए. एस प्रशिक्षण केंद्र व जून १९८४ पासून संगीत शिक्षण विभाग सुरू करण्यात आला. १९८४ नंतर संगणक केंद्राची सुरुवात करण्यात आली. त्या अनुषंगाने १९८७ ला संगणक शास्त्र विभागाची स्थापना करण्यात आली. १९९० ला मानव्यविद्या इमारतीत वाणिज्य व व्यवस्थापन या स्वतंत्र विभागाची स्थापना करण्यात आली. १९८८ मध्ये इलेक्ट्रॉनिक विभागाची सुरुवात करण्यात आली. अशा प्रकारे १९६२ ते २००० पर्यंत शिवाजी विद्यापीठाच्या परिसरात जवळजवळ २७ अधिविभाग कार्यरत होते.

शिवाजी विद्यापीठाचे कार्यक्षेत्र प्रामुख्याने ग्रामीण भागाशी निगडित होते. ग्रामीण भागात काम करणाऱ्या विद्यापीठाने केवळ विद्यापीठात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना ठराविक अभ्यासक्रम शिकवणे एवढ्या पुरतेच मर्यादित न ठेवता. त्यांच्या सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक विकासासाठी तसेच विद्यापीठ हे जनताभिमुख शिक्षणाचे केंद्र निर्माण करण्यासाठी १९६५ साली बहि:शाला शिक्षण मंडळाची स्थापना करण्यात आली. या बहि:शाला शिक्षण मंडळाच्या सातारा, कोल्हापूर, सांगली, सोलापूर अशा जिल्हानिहाय समित्या स्थापन करण्यात आल्या व त्यांच्याकडून शैक्षणिक कार्याप्रमाणेच समाजप्रबोधनाची जबाबदारी पार पाडली. प्राचार्य के. भोगिशियन यांच्या कार्यकाळापर्यंत म्हणजे १९६२ ते १९८३ या काळात अध्ययन - अध्यापन याकडे जास्त

लक्ष दिले गेले. प्राचार्य के. भोगिशियन यांच्या काळात भारताच्या उच्च शिक्षणाचे तिसरे महत्त्वाचे अंग म्हणजे प्रौढ आणि निरंतर शिक्षण होय. त्यांनी प्रौढ आणि निरंतर शिक्षण या विभागाची स्थापना विद्यापीठांमध्ये केली. पुढे डॉ. के. बी. पवार यांच्या काळात अध्ययन – अध्यापन याबरोबरच संशोधन यावर कटाक्षाने त्यांनी लक्ष दिले.

### ३. शिवाजी विद्यापीठाचा शैक्षणिक विस्तार :

शिवाजी विद्यापीठाच्या स्थापनेवेळी ३४ संलग्न महाविद्यालये, ५ अधिविभाग आणि १४००० विद्यार्थी कार्यरत होते. या विद्यापीठाच्या विस्ताराबरोबरच शैक्षणिक विस्तार ही मोठ्या प्रमाणात होत गेला. आत्तापर्यंत शिवाजी विद्यापीठ अंतर्गत २८० संलग्न महाविद्यालये कार्यरत असून विद्यापीठ परिसरात ३४ अधिविभाग आहेत. या माध्यमातून उच्च शिक्षणाच्या सोयी शिवाजी विद्यापीठाने निर्माण केल्या. या अधिविभागा बरोबरच १३ संशोधन संस्था, १० अध्यासन, १४ अभ्यास व संशोधन केंद्र निर्माण केली असून याच्या माध्यमातून त्यांनी विविध विचारवंत व त्यांच्या विषयाला प्रोत्साहन दिले आहे. शिवाजी विद्यापीठाच्या स्थापनेनंतर विद्यार्थ्यांच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ झाली. जवळ जवळ विद्यापीठ कार्यक्षेत्रात ३ लाख विद्यार्थी असून संलग्न महाविद्यालय यांच्या संख्येत ८ पटीने वाढ झाली. तर अधिविभागांची संख्या २१ पटीने वाढल्याचे दिसून येते. यावरूनच शिवाजी विद्यापीठाचा शैक्षणिक विकास व विस्तार कसा झाला हे दिसून येते.

### ४. शिवाजी विद्यापीठ अधिकार मंडळ आणि शैक्षणिक विकास :

शिवाजी विद्यापीठ अधिकार मंडळ हे विद्यापीठातील महत्त्वाचे मंडळ असून या अधिकार मंडळामार्फत विद्यापीठाच्या विकासासंदर्भात विविध निर्णय प्रत्येक वर्षी घेतले जातात. उदाहरणार्थ विविध विषयाबाबत नवीन शैक्षणिक अभ्यासक्रम सुरू करण्यास मान्यता देणे, जुन्या अभ्यासक्रमात दुरुस्ती बाबतचा प्रस्ताव विद्यापीठ अंतर्गत परिक्षेत्रात महाविद्यालयातील विविध शैक्षणिक प्रस्ताव निर्णय घेणे, गुणवंत विद्यार्थ्यांच्या पारितोषकाबाबतचे प्रस्ताव इत्यादी या सर्वांची चर्चा या मंडळामध्ये केली जाते. व विद्यापीठाच्या विकासाच्या दृष्टिकोनातून निर्णय घेतला जातो. या मंडळाच्या माध्यमातून शिवाजी विद्यापीठातील शैक्षणिक अभ्यासक्रम गरजेनुसार बदलण्यात आले आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांना जीवनाभिमुख शिक्षण देण्यास मदत झाली. तसेच विद्यापीठाने विविध अभ्यासक्रम सुरू करून त्यांना शिक्षणाची संधी दिल्यामुळे विद्यार्थ्यांच्या उदरनिर्वाहाचे साधन उपलब्ध झाले.

### ५. शिवाजी विद्यापीठाचे शैक्षणिक परीक्षा बाबत धोरण :

विद्यापीठाच्या स्थापनेनंतर ऑक्टोबर १९६३ मध्ये विद्यापीठाच्यावतीने पहिली पुरवणी परीक्षा घेण्यात आली. मार्च – एप्रिल १९६४ मध्ये स्वतंत्र परीक्षा घेण्यात आली त्याच दरम्यान १६ एप्रिल १९६४ रोजी शिवाजी विद्यापीठ परीक्षेच्या कामकाजात सुधारणा सुचवण्यासाठी एक 'परीक्षा सुधारणा समिती' स्थापन करण्यात आली. या समितीचे अध्यक्ष डॉ. ए. एन. उपाध्ये हे होते. या समितीने परीक्षा पद्धत व गुणांच्या तपासणीबाबत काही नियम घालून दिले. या नियमाची अंमलबजावणी आजतागायत केली जात आहे. तसेच सन १९६७ पासून अभियांत्रिकी शाखेमध्ये टिटोरियल (स्वाध्याय) आणि पिरियॉडिकल टेस्टवर आधारित सेमिस्टर आणि ट्रायसेमिस्टर योजना सुरू केली. १९६८ पासून बी. एससी भाग दोन व १९६९ पासून बी. एससी

भाग तीन यांना ही योजना सुरू करण्यात आली. तसेच कालांतराने इतर शाखांना ही योजना चालू करण्यात आली. १९८२ – ८३ पासून विद्यापीठ अनुदान मंडळाच्या परीक्षा सुधार कार्यक्रमांतर्गत विद्यापीठाने 'निरांतर अंतर्गत मूल्यमापन योजना' सुरू केली. तसेच विद्यापीठाने सत्र पद्धत बंद करून त्याऐवजी क्रमाक्रमाने वार्षिक पद्धतीचा अवलंब करण्याचा निर्णय घेतला गेला. त्यानुसार बी. एस्सी, बी.कॉम. व एम. ए, एम. एस्सी. भाग १ ला जून १९८३ पासून वार्षिक परीक्षा पद्धती लागू करण्यात आली. तर १९८४ पासून भाग २ ला ही वार्षिक परीक्षा पद्धती लागू करण्यात आली. या पद्धतीत १०० गुणांच्या परीक्षेमध्ये ७० गुणांची वार्षिक परीक्षा विद्यापीठ पातळीवर होईल व ३० गुणांचे 'निरंतर अंतर्गत मूल्यमापनम (CIE) महाविद्यालय व विद्यापीठातील विभाग यांच्यावर सोपवण्यात आले. यामध्ये 'निरंतर अंतर्गत मूल्यमापन' व वार्षिक परीक्षा दोन्ही स्वतंत्ररित्या उत्तीर्ण होणे आवश्यक आहे असे बंधन होते.

अशा प्रकारे शिवाजी विद्यापीठाने आपल्या परीक्षा धोरणात काही सुधारणा घडवून आणल्या.

**६. शिवाजी विद्यापीठ – ग्रंथालयाच्या माध्यमातून शैक्षणिक विकास :**

जून १९६४ पासून विद्यापीठात ग्रंथालयाच्या कार्यास प्रारंभ झाला. यावेळी एल. जी. परब यांची ग्रंथपाल म्हणून नेमणूक करण्यात आली. या ग्रंथालयाच्या इमारतीला बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर यांचे नाव देण्यात आले असून ही इमारत अंदाजे एक लाख चौरस फूट किंवा त्याहीपेक्षा मोठी अशी आहे. ग्रंथालयाची इमारत अत्यंत सुसज्ज व चार मजली बांधण्यात आली आहे. या इमारतीमध्ये रीडिंग रूम, कार्यालय, संशोधन कक्ष, संदर्भ ग्रंथ विभाग इ. विभाग प्रशस्त स्वरूपात आहेत. या ग्रंथालय विभागाच्या माध्यमातून २३ जुलै १९६५ रोजी ग्रंथालय शास्त्र पदव्युत्तर डिप्लोमा कोर्सची सुरुवात करण्यात आली. या माध्यमातून सुरुवातीला २५ विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आला. त्यामध्ये १० मुली होत्या. या ग्रंथालयाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांप्रमाणेच शिक्षक व्यासंगी बनला पाहिजे. या हेतूने तसेच शिक्षकांना पैशाअभावी ग्रंथ किंवा पुस्तक खरेदी करण्यात अडचणी येऊ नये व शिक्षकांनी नवीन माहिती विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवावी. या उद्देशाने १९६६ – ६७ सालापासून 'शिक्षक वैयक्तिक ग्रंथालय योजना' सुरू करण्यात आली. या योजनेमध्ये शिक्षकांना ग्रंथ व पुस्तके खरेदी करण्यासाठी विद्यापीठ दरवर्षी आर्थिक मदत करण्याची तरतूद करण्यात आली. १९७२ साली विद्यापीठ अनुदान आयोगाच्या सहकार्याने शिवाजी विद्यापीठाने कोल्हापूर व सोलापूर येथे दोन अभ्यास केंद्र स्थापन केली. ही अभ्यास केंद्रे सकाळी ७ ते रात्री १२ वाजेपर्यंत सुट्टी दिवशी देखील खुली ठेवण्यात आली. याच दरम्यान सोलापूर येथे एच. एन. वाचनालय स्थापन करण्यात आले. तसेच ग्रंथालय विभागाकडून अंतर ग्रंथालयीन देवघेव योजना सुरू करण्यात आली. ज्याच्या माध्यमातून इतर ग्रंथालयाकडून विद्यापीठ ग्रंथालयात ग्रंथ उपलब्ध करून देण्याची सोय निर्माण करण्यात आली. ज्याचा फायदा अभ्यासकांना झाला.

**७. शिवाजी विद्यापीठ – शैक्षणिक गुणवत्ता व विविध प्रोत्साहनपर पारितोषिके :**

शिवाजी विद्यापीठाने आपल्या कार्यक्षेत्रातील विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेला प्रोत्साहन देण्यासाठी विविध विषयात बक्षीस अथवा पारितोषके देण्याची योजना सुरू करण्यात आली. ही पारितोषिके विविध विषयातील असून पारितोषिके देताना समाजातील प्रतिष्ठित दानशूर व्यक्तीच्या सहकार्याने तसेच काही वेळा त्यांच्या नावाने दिली जात असत. अशी पारितोषिके पुढीलप्रमाणे––

- बी. ए. भाग तीन (भूगोल) विषयात सर्वाधिक गुण मिळवून उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना गुरुवर्य एस. पी. दाते पारितोषिक
- एम. बी. बी. एस. भाग ३ परीक्षेत सर्वाधिक गुण मिळवून उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना कै. गुरुवर्य कलाप्पा घाटे गुरुजी पारितोषिक
- एम. ए. (मराठी) विषयात सर्वाधिक गुण मिळवून उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना गुरुवर्य कै. डॉ. विष्णू नारायण कुलकर्णी भाषाभूषण पारितोषिक
- एम. डी. (मेडिसिन) या परीक्षेत सर्वाधिक गुण मिळवून उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रा. डॉ. पी. डब्ल्यू. देशमुख गौरव पारितोषिक
- एल. एल. बी. (स्पेशल) या पदवी परीक्षेत टॅक्सेशन विषयात सर्वाधिक गुण मिळवून उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना श्री कन्हैयालाल बिहारीलाल कायस्थ पारितोषिक
- एम. डी. (मेडिसिन) या परीक्षेत सर्वाधिक गुण मिळवून उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना कै. डॉ. मधुसूदन लाटकर एम.डी. मेडिसिन पारितोषिक
- नाट्यशास्त्र पदविका परीक्षेत सर्वाधिक गुण मिळवून उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना कै. श्री विलास वंजारी पारितोषिक
- डिप्लोमा कोर्स इन म्युझिकल (अंतिम) परीक्षेसाठी कै. लक्ष्मीबाई जाधव पारितोषिक
- बी. फार्मसीच्या (अंतिम) परीक्षेसाठी कै. श्री शेखर पंडितराव कुलकर्णी पारितोषिक म्युझिकल कोर्स इन म्युझिक व डिग्री कोर्स इन म्युझिक परीक्षेसाठी पंडित नाना उर्फ मधुकर सडोलीकर पारितोषिक
- बी. ए. (अंतिम) वर्ष परीक्षेसाठी फक्त सांगली केंद्राकरिता मा. जी. पी. पाटील तथा काका तासगाव पारितोषिक
- बी. पीएड. व एम. पीएड. परीक्षेसाठी अनुक्रमे कै. श्रीमती हिराबाई घाडगे पारितोषिक व कै. जयसिंगराव घाटगे राजसाहेब (सीनियर) पारितोषिक
- बी. ई. (मेकॅनिकल) इंजिनिअरिंग अंतिम वर्षासाठी एच. एम. टी. गोल्ड प्लेटेड सिल्वर मेडल पारितोषिक
- बी. ई. (सिव्हिल) कै. शंकरराव रामराव नागेशकर मेमोरियल गोल्ड मेडल पारितोषिक
- एल. एल. बी. अंतिम परीक्षेसाठी एडवोकेट व्ही. एन. पाटील मेमोरियल प्राईज
- बी. कॉम. परीक्षेत (अर्थशास्त्र) विषयात बी. कॉम. भाग एक, दोन व तीन मध्ये जास्त गुण प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्याला डॉ. बी. एम. भनगे पारितोषिक
- एम. ए. (इतिहास) अंतिम परीक्षेसाठी परमपूज्य हरीकाका गोसावी पारितोषिक
- एम. एस्सी. (वनस्पतीशास्त्र) अंतिम परीक्षेसाठी डॉक्टर केशवराव बळवंतराव गोरे देशमुख प्राईज

◆ एम. कॉमच्या (अंतिम) परीक्षेसाठी कै. दत्तात्रेय रामचंद्र कुलकर्णी – जांभळीकर पारितोषिक इ.

अशी वेगवेगळी पारितोषिके शिवाजी विद्यापीठांतर्गत विविध देणगी देण्याच्या नावाने सुरू केल्याचे दिसून येते. या माध्यमातून गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करून त्यांच्या शैक्षणिक कार्यास प्रोत्साहन देण्याचे धोरण विद्यापीठाने अवलंबले. या पुरस्काराच्या निमित्ताने विद्यार्थ्यांच्या मनात अभ्यास विषयी रुची निर्माण करून त्याचा शैक्षणिक विकास करणे व भविष्यात शिक्षण घेण्यास प्रोत्साहन देण्याचा उद्देश यातून दिसून येतो.

**८. शिवाजी विद्यापीठांतर्गत विविध व्याख्यानमाला :**

शिवाजी विद्यापीठाचे पहिले कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार यांनी ज्ञानाच्या कक्षा रुंदावण्याच्या दृष्टिकोनातून सतत नवनवीन उपक्रम हाती घेतले. बहुतांश शिक्षणाचा दर्जा हा शिक्षकांवर अवलंबून असतो. तो जर वाढवायचा असेल तर शिक्षकांची ज्ञानार्जनाची तळमळ, उत्कृष्ट दर्जाचा सातत्याने केलेला पाठपुरावा, व्यावसायिक प्रामाणिकपणा व विद्यार्थ्यांच्या भवितव्याची काळजी इत्यादी गोष्टींची आवश्यकता आहे. जर शिक्षण पद्धती लोकाभिमुख व्हावयाची असेल तर आपले शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यात राष्ट्राने स्वीकारलेल्या लोकशाही, समाजवाद त्याविषयी आदर निर्माण झाला पाहिजे. त्या दृष्टिने त्यांच्या विचारांची जडणघडण झाली पाहिजे. म्हणूनच शिवाजी विद्यापीठाच्या सहकार्याने विविध विषयांच्या व्याख्यानमाला आयोजित केल्या जातात ज्यातून फक्त पुस्तकी ज्ञानाव्यतिरिक्त इतरही माहिती या व्याख्यानमालेच्या माध्यमातून पोहोचविली जात असे. या माध्यमातून विद्यार्थ्यांना विशेषत: ज्ञाना बरोबरच संवाद साधण्याची संधी प्राप्त करून दिली जात असे. अशा व्याख्यानमाला विद्यापीठाच्या माध्यमातून प्रतिवर्षी घेतल्या जात असत. अशा व्याख्यानमाला पुढील प्रमाणे –

१. राजर्षी छत्रपती शाहू स्मृती व्याख्यानमाला
२. ज्ञानविस्तार व्याख्यानमाला
३. मराठा इतिहास व्याख्यानमाला
४. कर्मवीर भाऊराव पाटील जयंती निमित्त व्याख्यानमाला
५. छत्रपती प्रतापसिंह महाराज सातारा व्याख्यानमाला
६. ज्ञानविस्तार व्याख्यानमाला (विज्ञान)
७. कैलासवासी प्रभाकर पंत कोरगावकर व्याख्यानमाला
८. डॉक्टर ए. एन. उपाध्ये व्याख्यानमाला
९. कैलासवासी आमदार पी. बी. साळुंखे व्याख्यानमाला
१०. कैलासवासी डॉक्टर जी. व्ही. जोशी व्याख्यानमाला
११. महात्मा फुले स्मारक व्याख्यानमाला
१२. भद्रकाली ताराराणी व्याख्यानमाला
१३. पुढारीकार कैलासवासी डॉक्टर ग. गो. जाधव व्याख्यानमाला
१४. आचार्य दादा धर्माधिकारी व्याख्यानमाला

१५. कैलासवासी प्राध्यापक नरहर विष्णू कारेकर व्याख्यानमाला

१६. एक्सटेन्शन लेक्चर सिरीज

१७. संत तुकाराम महाराज व्याख्यानमाला

१८. कैलासवासी वि. स. खांडेकर व्याख्यानमाला

१९. छत्रपती शिवाजी महाराज व्याख्यानमाला

या विविध व्याख्यानमालेच्या माध्यमातून शिक्षक विद्यार्थी व समाज यांचा सर्वांगीण विकास करण्याचा प्रयत्न शिवाजी विद्यापीठाच्या माध्यमातून होत असताना दिसतो.

**८. शिवाजी विद्यापीठाची सामाजिक विकासाची भूमिका :**

परिवर्तन हे मानवी समाजाचे महत्त्वाचे अंग मानले जाते. त्यामुळे बदलत्या समाजातील लोकशिक्षण हेही सातत्याने बदलत असल्याचे दिसून येते. या लोकतत्त्वाच्या माध्यमातून लोकशिक्षण हे समाज शिक्षणाचे मूळ आहे. समाज हा अनौपचारिक, औपचारिक आणि सहज शिक्षण अशा तीन प्रकारे शिक्षण घेत असतो. आजही समाजात अनौपचारिक व सहज शिक्षण हे समाज शिक्षणाची मोठी जबाबदारी पार पाडत आहे. तत्कालीन काळात संतांनी आपल्या अभंगांच्या माध्यमातून लोकतत्त्वाचा प्रभावी वापर केला. संतांनी आपले विचार समाजापर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्याचा प्रयत्न केला. समाज शिक्षणाचे अनौपचारिक पद्धतीने काम करणारे संत म्हणजे पहिले लोकशिक्षक होते.

महाविद्यालयातील शिक्षक आणि विद्यार्थी यांच्या माध्यमातून उच्च शिक्षणाचा लाभ सर्वसामान्य जनतेपर्यंत कसा पोहोचेल यासाठी प्रयत्न करणे व म्हणूनच शिवाजी विद्यापीठाने निरंतर शिक्षण योजना, साक्षरता कार्यक्रम, लोकसंख्या शिक्षण मंडळ, नियोजन मंडळ, राष्ट्रीय सेवा योजना, बहि:शाल शिक्षण मंडळ, दूर शिक्षण इत्यादी अनेक ज्ञान विस्तार योजनांच्या माध्यमातून शिवाजी विद्यापीठाने सामाजिक जाणीव मनामध्ये ठेवून सामाजिक विकास करण्याचा प्रयत्न केला.

विद्यापीठे केवळ पदवीधरांचे तांडे निर्माण करणाऱ्या शैक्षणिक संस्था असू नयेत. स्पर्धेच्या युगात समर्थपणे ही शैक्षणिक संस्था समर्थपणे उभी राहिली पाहिजे. तशी मूल्याधिष्ठित युवा पिढी निर्माण करण्याचे कार्य विद्यापीठाने करणे आवश्यक असते. शिवाजी विद्यापीठ हे दक्षिण महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील उच्च शिक्षणाची गरज पुरवण्याच्या उद्देशाने १८ नोव्हेंबर १९६२ रोजी सुरू झाले. या शिवाजी विद्यापीठाचे कार्यक्षेत्र सातारा, सांगली, कोल्हापूर व रत्नागिरी या पाच जिल्ह्यासाठी होते. हे कार्यक्षेत्र प्रामुख्याने ग्रामीण भागाशी निगडित असल्याने विद्यापीठात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना ठराविक अभ्यासक्रम शिकविणे एवढ्या पुरतेच आपले कार्य मर्यादित ठेवून चालणार नाही. तर त्यासाठी विद्यापीठासारख्या शिक्षण क्षेत्रातील उच्च शिक्षण संस्थेने सामाजिक प्रश्न सोडविण्यासाठी काही महत्त्वपूर्ण पुढाकार घेऊन विविध उपक्रम राबविले पाहिजेत. हा उद्देश मनात ठेवून शिवाजी विद्यापीठाने काही उपक्रम राबविले.

**९.१ बहि:शाला शिक्षण मंडळ :**

विद्यापीठ हे जनता भिमुख शिक्षणाचे केंद्र बनले पाहिजे. या उद्देशाने १९६५ मध्ये विद्यापीठात बहि:

शाला शिक्षण मंडळाची स्थापना करण्यात आली. बहि:शाला शिक्षण मंडळाने जिल्हा समिती मार्फत शिवाजी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रा अंतर्गत सामाजिक विकासाच्या दृष्टीने कार्य केलेले आहे. सुरुवातीच्या काळात विद्यापीठाचे संलग्न असलेल्या प्रत्येक महाविद्यालयाने एक खेडे दत्तक घेण्याची योजना सुरू केली. ज्यातून खेड्यांच्या विकासासाठी कार्य केले जाऊ लागले. शिवाजी विद्यापीठाचे पहिले कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार यांनी विद्यार्थ्यांच्या शक्तीचा व कल्पनेचा रचनात्मक वापर करून घेतला. तसेच विद्यार्थी कल्याण मंडळाच्या माध्यमातून सामाजिक विकास करण्याचे ध्येय निर्माण केले. याचबरोबर सामाजिक विकासासाठी युवक हा महत्त्वपूर्ण घटक असतो. या युवाशक्तीला विधायक वळण देण्यासाठी जून १९६९ पासून राष्ट्रीय सेवा योजना सुरू करण्यात आली. सुरुवातीला ही योजना १२ महाविद्यालयांमध्ये सुरू करण्यात आली.

### ९.२ कंजारभाट मुलांसाठी बालक मंदिर :

कंजारभाट समाज हा विद्यापीठाच्या परिसरा शेजारीच वस्ती करून राहत होता. हा समाज अशिक्षित, बेकार व अल्पशिक्षित असल्याने तो चोऱ्या करून आपला उदरनिर्वाह चालवत असे. डॉ. आप्पासाहेब पवार यांनी या समाजाची समस्या लक्षात घेऊन विद्यापीठाला होणारा त्रास कमी करण्यासाठी या समाजाला विद्यापीठ विकासाच्या प्रक्रियेत सहभागी करून घेण्याचे ठरविले. त्यांनी विद्यार्थी कल्याण मंडळाच्या वतीने कंजारभाट या भटक्या जमातीच्या मुलांसाठी बालक मंदिर सुरू केले. याचे उद्घाटन १७ नोव्हेंबर १९६९ रोजी डॉ. आप्पासाहेब पवार यांनी स्वतः केले

याप्रसंगी बोलताना ते म्हणाले की मागासलेले लोक सुद्धा माणसे आहेत. ते गुन्हेगार आहेत. हा केवळ त्यांचा दोष नाही. त्या लोकांना शिक्षण देऊन सुसंस्कृत करणे सुशिक्षितांचे कर्तव्य होय. शिक्षण जनतेपर्यंत पोहोचवणे हे आमचे ध्येय आहे आणि त्या ध्येयाची वाटचाल आमचे विद्यार्थी करीत आहेत. ही कौतुकाची गोष्ट होय. या बालक मंदिरातील जो विद्यार्थी प्रथम एस. एस. सी. पास होईल. त्याला विद्यापीठाने योग्य अशी नोकरीची ग्वाही दिली. जेव्हा तुमच्यातील कोणी विद्यार्थी प्रोफेसर होऊन विद्यापीठांमध्ये येईल तेव्हाच आमची तपश्चर्या पूर्ण झाली असे आम्ही मानू. अशाप्रकारे विद्यापीठाच्या शैक्षणिक विकासात सामाजिक कार्याची जोड असल्याचे प्रतीक या बालक मंदिराच्या स्थापनेतून दिसून येते.

### ९.३ विद्यापीठ सल्ला सेवा योजना :

शिवाजी विद्यापीठात अनेक ज्ञान शाखा माध्यमातून प्रगत अध्ययन अध्यापन संशोधन सातत्याने होत असे. हे संशोधन समाजापर्यंत पोहोचावे आणि समाजास ते उपयुक्त ठरावे या जाणिवेतून विद्यापीठ सल्ला सेवा योजना १९८२-८३ मध्ये सुरू करण्यात आले. यामध्ये शेती, सहकार, वाणिज्य अधिक क्षेत्रातील संस्थांना आणि उत्पादन उद्योगांना अद्यावत माहिती पुरवणे, त्यांच्या तांत्रिक अडचणी सोडविणे, व्यवसाय संबंधित सल्ला देणे, कारखाने आणि कार्यालय यांच्या कामकाजातील भाषेच्या वापराविषयीच्या अडचणी सोडविणे अशा अनेक मार्गांनी समाज जीवनाच्या विकासाला अनुसरून कार्य करण्याचे हे सल्ला सेवा केंद्र कार्य करत असे.

### ९.४ आरोग्य विषयक कार्य :

शिवाजी विद्यापीठाने सामाजिक जाणिवेतून राष्ट्रीय सेवा योजना व संलग्न महाविद्यालय यांच्या माध्यमातून

समाजातील बिगर शासकीय संस्था, विविध जिल्ह्यातील शासकीय आरोग्य केंद्र, खाजगी दवाखाने यांच्या सहकार्याने विद्यापीठ कार्यक्षेत्रातील जिल्ह्यांमध्ये महिला बालक अपंग व्यक्ती तसेच पशुंच्यासाठी आरोग्य तपासणी शिबिर आरोग्य विषयक जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आले.

### ९.५ स्त्री रोग व कर्करोग चिकित्सा शिबिर :

शिवाजी विद्यापीठ बही:शाल शिक्षण मंडळ व धनलक्ष्मी महिला मंडळातर्फे आणि छत्रपती प्रमिलाराजे शासकीय रुग्णालयाच्या सहकार्याने दि. १४ एप्रिल १९९३ रोजी कोल्हापुरातील राजमाता जिजामाता गर्ल्स हायस्कूल येथे स्त्रीरोग व कर्करोग चिकित्सा शिबिराचे उद्घाटन जिल्हा शल्यचिकित्सक डॉक्टर र. अ. पाठक यांनी केले. या शिबिराचा लाभ जवळजवळ दीडशे महिलांनी घेतला. या महिलांना आवश्यकतेनुसार एक महिन्यासाठी लोहयुक्त गोळ्या देण्यात आल्या शिबिरामध्ये ज्या महिलांच्या शरीरात गाठी आढळल्या त्यांना कर्करोगाचे भय नाही याची खात्री करून घेण्यासाठी बायोप्सी करून घेण्याचा सल्ला देण्यात आला. जिल्हा शासकीय रुग्णालयामार्फत शिबिरात सहभागी महिलांची बायोप्सी विनामूल्य करण्यात आली यामुळे कर्करोगाचे निदान करण्यास मदत झाली.

### ९.६ एड्स व लैंगिक आरोग्य विषयी जनजागृती शिबिर :

बहि:शाल शिक्षण मंडळ व दिलासा सामाजिक विश्वस्त संस्थेच्या संयुक्त विद्यमाने आणि छत्रपती प्रमिला राजे शासकीय रुग्णालयाच्या सहकार्याने १४ सप्टेंबर १९९३ रोजी वारणानगर जवळच्या नवे पारगाव येथील तात्यासाहेब कोरे डेंटल कॉलेज आणि रिसर्च सेंटर मध्ये एड्स व लैंगिक आरोग्य विषयक जनजागृती शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरास तळसंदे, वाठार, पारगाव, वारणानगर या पंचक्रोशीतील जवळजवळ साडेसहाशे हून अधिक महिलांची उपस्थिती होती. या शिबिराच्या माध्यमातून महिलांच्या विनामूल्य आरोग्य तपासणीचे कामे केले. एड्स पासून दूर राहून आरोग्य संपन्न जीवन जगायचे असेल तर लैंगिक आरोग्य विषयी महिला पुरुष सर्वांना जास्तीत जास्त शास्त्रीय माहिती असणे आवश्यक असल्याने जाणीव जागृती शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

### ९.७ महिला विकास शिबिर :

कांचनपूर येथे महिला विकास शिबिराचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी जवळजवळ २०० महिला, १०० पुरुष व काही तरुण असे एकूण ३५० लोकांचा समुदाय उपस्थित होता. या कार्यक्रमात प्राध्यापक सुकुमार कांबळे यांनी जीवघेणी अंधश्रद्धा व महिलांचे प्रश्न या विषयावर शिबिरातील मार्गदर्शन केले यानंतर परिवर्तन संघटनेचे कार्यकर्ते श्रीमती स्मिता तिरमारे महावीर खाडे प्रफुल्ल तिरमारे यांनी अंधश्रद्धा निर्मूलन विषयी चमत्काराचे प्रयोग करून दाखविले.

### ९.८ शेती व पशुपालन विषयक कार्य :

दिनांक ८ जानेवारी १९८४ रोजी पशुचिकित्सा व औषधोपचार शिबिर बाबासाहेब खंजिरे ट्रस्ट व पशुसंवर्धन खाते यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आले. याला जिल्हा परिषद कोल्हापूर येथे सहकार्य लाभले. या शिबिरात जनावरांचे सर्वांगीण तपासणी करून लाळ रोग प्रतिबंधक लस आवश्यक जनावरांना

टोचली गेली. तसेच ५०० जनावरांची तपासणी करण्यात आली याच महिन्यात तुळजापूर येथे शेतकरी मेळावा आयोजित करण्यात आला. यामध्ये शिवाजी विद्यापीठाचे वनस्पतीशास्त्र विभागाचे प्राध्यापक यांनी क्षारयुक्त जमिनीत किफायतशीर शेती याविषयी व्याख्यान देण्यात आले. तसेच बार्शी, बोराळे, लोणी येथील शेतकऱ्यांच्या सहकार्याने शेतकरी मेळावे घेण्यात आले.

### ९.९ सामाजिक प्रबोधन विषयक कार्य :

विद्यापीठे सामाजिक प्रबोधनाचे केंद्र मानले जाते त्या दृष्टीने शिवाजी विद्यापीठाने सामाजिक विकासाचे कार्य आपल्या परिक्षेत्रातील सामाजिक संस्था बिगर शासकीय संस्था यांच्या सहकार्याने शिवाजी विद्यापीठ अंतर्गत महाविद्यालय व राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून अंधश्रद्धा निर्मूलन, हुंडाबळी, दारूबंदी, समाजातील अनिष्ट रूढी परंपरा अशा विविध विषयाबाबत प्रबोधन प्रशिक्षण व्याख्याने आयोजित करून समाज प्रबोधन केले.

दक्षिण महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील विद्यापीठ म्हणून नावारूपास आलेल्या शिवाजी विद्यापीठाने आपल्या कार्यक्षेत्रातील महाविद्यालयाच्या माध्यमातून उल्लेखनीय अशी कामगिरी केली. विद्यापीठ परिक्षेत्रातील शिक्षक व विद्यार्थी यांना ज्ञानार्जनाची व संशोधनाची उत्तम अशी संधी प्राप्त करून दिली. संशोधनाच्या माध्यमातून समाजाला दिशा देण्याची महत्त्वपूर्ण कामगिरी शिवाजी विद्यापीठाने बजावली. आपल्या परिक्षेत्रातील ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये अभ्यासाविषयी रुची निर्माण व्हावी यासाठी विविध पारितोषिके जाहीर करून विद्यार्थ्यांना आपले जीवन परिपूर्ण करण्याची संधी प्राप्त करून दिली. विद्यापीठाच्या या उल्लेखनीय कामगिरीमुळे ग्रामीण भागातील अनेक विद्यार्थ्यांनी उत्तुंग अशी कामगिरी करून दाखविली. तसेच देशाचे नेतृत्व करण्यासाठी ही या विद्यापीठातील विद्यार्थ्यांनी मोलाची कामगिरी बजावल्याची दिसून येते. या विद्यापीठामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थी जो परिघाबाहेर फेकला गेला होता त्याला मुख्य प्रवाहात आणण्याचे काम शिवाजी विद्यापीठाने केले.

शिवाजी विद्यापीठाला लाभलेल्या कुलगुरूंमध्ये डॉ. आप्पासाहेब पवार यांनी शिवाजी विद्यापीठाला नावलौकिक प्राप्त करून दिला. त्याचबरोबर सामाजिक बांधिलकीची जाण निर्माण केली. शिवाजी विद्यापीठ हे समाजाभिमुख कसे होईल यासाठीचे प्रयत्न सातत्याने केले गेले. म्हणूनच आजही या विद्यापीठाचा नावलौकिक समाजामध्ये सर्व दूरपर्यंत पसरलेला दिसून येतो. हे सर्व या विद्यापीठाला लाभलेल्या कुशल अशा नेतृत्वामुळेच झाल्याचे दिसून येते.

**स्वयं अध्ययन प्रश्न – ३ :**

**अ) रिकाम्या जागा भरा.**

१. ..... येथे महिला विकास शिबिराचे आयोजन करण्यात आले.

अ) कांचनपूर ब) नगर

क) तुळजापूर ड) सोलापूर

२. कंजारभाट या भटक्या जमातीच्या मुलांसाठी सुरु केलेल्या 'बालक मंदिर' याचे उद्घाटन ..... यांच्या हस्ते करण्यात आले.

अ) यशवंतराव चव्हाण ब) बाळासाहेब देसाई

क) डॉ. आप्पासाहेब पवार ड) यापैकी नाही

३. 'परीक्षा सुधारणा समिती' चे अध्यक्ष ..... हे होते.

अ) डॉ. ए. एन. उपाध्ये ब) डॉ. बी. एम. हिर्डेकर

क) डॉ. देसाई ड) यापैकी नाही

४. शिवाजी विद्यापीठाच्या स्थापनेवेळी ..... संलग्न महाविद्यालये होती.

अ) ३१ ब)३२

क) ३३ ड) ३४

५. ..... रोजी इतिहास विभागाची व इंग्रजी विभागाची स्थापना शिवाजी विद्यापीठाचे पहिले कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार यांनी केली.

अ) २२ जुलै १९६५ ब) २२ जुलै १९६६

क) २२ जुलै १९६७ ड) २२ जुलै १९६८

## २.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ :

**१. बायोप्सी :** रोग निदान करण्यासाठी शरीरातील उतींना छेद घेऊन त्यांची सूक्ष्मदर्शकाच्या साहायाने करावयाची परीक्षा पद्धती

**२. बहि:शाल :** जे शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात नाहीत आशांना शिक्षणाच्या मुख्यप्रवाहात आणण्याकरिता स्थापन केलेली शाळा

## २.४ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे :

**स्वयं अध्ययन प्रश्न – १ :**

१. अ. १९४२ २. क. सातारा ३. क. ७

४. अ. १९३२ ५. क. काले

**स्वयं अध्ययन प्रश्न – २ :**

१. अ. १९६० २. क. नळदुर्ग ३. क. सातारा

४. क. किणे ५. ड. जुना बुधवार पेठ

**स्वयं अध्ययन प्रश्न – ३ :**

१. अ. कांचनपूर २. क. डॉ. अप्पासाहेब पवार ३. अ. डॉ. ए. एन. उपाध्ये

४. ड. ३४ ५. अ. २२ जुलै १९६५

## २.५ सारांश :

ब्रिटीशांच्या आगमनामुळे भारतात आधुनिक शिक्षण पद्धतीला सुरुवात झाली. या शिक्षण पद्धतीमुळे भारतात प्रामुख्याने महाराष्ट्रात अनेक समाज सुधारक निर्माण झाले. त्यांनी समाजाला शहाणे करण्याचा प्रयत्न केला. इथल्या असणाऱ्या अनिष्ट प्रथा परंपरा, रूढी, रितीरिवाज, कर्मकांड, समाजाला कसे मागे खेचतात. हे उदाहरणाने दाखवून दिले. महाराष्ट्रात पहिल्यांदा महात्मा फुले यांनी बहुजन समाजाला मुख्य प्रवाहात आणण्याचा प्रयत्न केला. त्यांचे अपूर्ण राहिलेले कार्य राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी पुढे चालू ठेवले. त्यांनी बहुजन समाजाच्या हिताच्या अनेक गोष्टी केल्या. त्यांना त्यांच्या हक्क व अधिकारासाठी लढायला शिकविले. या समाजाचा शैक्षणिक विकास साधण्याचा महत्वपूर्ण प्रयत्न केला. त्यांच्याच विचारांचा वारसा कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ. बापुजी साळुंखे, शिवाजी विद्यापीठाचे पहिले कुलगुरू डॉ. अप्पासाहेब पवार या शिक्षणाविषयी तळमळ असणाऱ्या प्रभृतींनी पुढे नेला. ही शैक्षणिक चळवळ महाराष्ट्रातील तळागाळातील लोकांपर्यंत पोहचविण्यासाठी अहोरात्र कष्ट घेतले.

पश्चिम महाराष्ट्रातील शैक्षणिक चळवळीमध्ये कर्मवीर भाऊराव पाटील व डॉ. बापुजी साळुंखे यांचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते. या दोन शिक्षण महर्षींनी महाराष्ट्रातील खेडोपाडी शिक्षणाची ज्ञानगंगा पोहोचवली. त्यांनी प्राथमिक पासून ते उच्च शिक्षणापर्यंतचे शिक्षण गरीब विद्यार्थ्यांना देवू केले. हे शिक्षण घेण्यासाठी त्यांनी वसतिगृहाची सोय विनामूल्य उपलब्ध करून दिली. जेणेकरून गरीब विद्यार्थ्यांचे पैशा अभावी त्याचे शिक्षण थांबणार नाही. याची काळजी घेतली. त्यांनी आपल्या कुटुंबाचाही विचार केला नाही. हा वंचित असणारा समाजच आपले कुटुंब मानले. आज या शैक्षणिक संस्थांची मुळे खोलवर रुजली गेली. त्याचा वृक्ष आज सर्वांना सावली देतो आहे. याचा प्रत्यय आज आपल्याला येतो आहे. या दोन शिक्षण महर्षींनी हे सर्व शून्यातून निर्माण केले. त्यांची जिद्द, चिकाटी, खरोखरच आजच्या पिढीला प्रेरणा देते. त्यांनी प्राथमिक, माध्यमिक, उच्च, व्यावसायिक, तांत्रिक शिक्षणाची सोय उपलब्ध करून दिली. त्यामुळे देशाला अनेक चांगले नेतृत्व लाभले.

ब्रिटीशांनी सुरु केलेल्या आधुनिक शिक्षणामुळे देशात मुंबई, मद्रास व कलकत्ता येथे विद्यापीठाची निर्मिती झाली. त्यामुळे पदव्युत्तर शिक्षणाची सोय उपलब्ध झाली. या पदव्युत्तर शिक्षणामुळे संशोधनाच्या कार्याला वेग आला. महाराष्ट्रात सुरुवातीला मुंबई, पुणे येथेच विद्यापीठ होते. त्यामुळे दक्षिण महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांना पुणे येथे पदव्युत्तर शिक्षणासाठी जावे लागत होते. त्यामुळे पुढील कळात कोल्हापूर येथे विद्यापीठ व्हावे यासाठी मागणी होवू लागली. त्यातूनच १९६२ मध्ये कोल्हापूर येथे शिवाजी विद्यापीठाची स्थापना करण्यात आली. शिवाजी विद्यापीठ हे दक्षिण महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील विद्यापीठ म्हणून नावारूपास आले. या माध्यमातून ग्रामीण भागातील विद्यार्थ्याच्या पदव्युत्तर शिक्षणाचा प्रश्न सुटला. शिवाजी विद्यापीठाची स्थापना करण्यामध्ये तत्कालीन महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा. यशवंतराव चव्हाण, शिक्षणमंत्री बाळासाहेब देसाई, अनेक मान्यवराच्या प्रयत्नामुळे शिवाजी विद्यापीठाची स्थापना झाली. शिवाजी विद्यापीठाला खऱ्या अर्थाने

नावलौकिक मिळवून देण्याचे काम शिवाजी विद्यापीठाचे पहिले कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार यांनी केले. तसेच विद्यापीठाल शिस्त निर्माण करून देण्याचे महत्वपूर्ण काम केले. डॉ. आप्पासाहेब पवार यांनी आपल्या कारकिर्दीत विद्यापीठाच्या माध्यमातून सामाजिक बांधिलकी जपण्याचे काम केले. शिवाजी विद्यापीठ हे समाजाभिमुख कसे होईल यासाठीचे प्रयत्न सातत्याने केले गेले. शिवाजी विद्यापीठाने आपल्या कार्यक्षेत्रातील विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेला प्रोत्साहन देण्यासाठी विविध विषयात बक्षीस अथवा पारितोषके देण्याची योजना सुरू केली. या पुरस्काराच्या निमित्ताने विद्यार्थ्यांच्या मनात अभ्यास विषयी रुची निर्माण करून त्याचा शैक्षणिक विकास करणे व भविष्यात शिक्षण घेण्यास प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न केला. डॉ. आप्पासाहेब पवार यांनी सतत नवनवीन उपक्रम राबविले. विद्यापीठ परिक्षेत्रातील शिक्षक व विद्यार्थी यांना ज्ञानार्जनाची व संशोधनाची उत्तम संधी प्राप्त करून दिली. संशोधनाच्या माध्यमातून समाजाला दिशा देण्याची महत्त्वपूर्ण कामगिरी शिवाजी विद्यापीठाने बजावली.

## २.६ सरावासाठी स्वाध्याय :

**अ) दीर्घोत्तरी प्रश्न :**

१. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी केलेल्या शैक्षणिक कार्याचा आढाव घ्या.

२. डॉ. बापुजी साळुंखे यांची शिक्षण क्षेत्रातील कामगिरी सांगा.

३. स्वामी विवेकानंद संस्थेची महाविद्यालयीन व व्यावसायिक शिक्षणाची चर्चा करा.

४. रयत शिक्षण संस्थेची स्थापना सांगून त्या संस्थेचे शैक्षणिक कार्य स्पष्ट करा.

५. शिवाजी विद्यापीठाच्या स्थापनेचा इतिहास सांगून त्याच्या सामाजिक विकासाची भूमिकेची चर्चा करा.

६. शिवाजी विद्यापीठाच्या शैक्षणिक विस्ताराची चर्चा करा.

**ब) टिपा लिहा.**

१. कर्मवीर भाऊराव पाटील

२. डॉ. बापुजी साळुंखे

३. शिवाजी विद्यापीठाची सामाजिक विकासाची भूमिका

४. शिवाजी विद्यापीठातील अधिविभागाची स्थापना

५. स्वामी विवेकानंद संस्थेची वसतिगृहे

६. कर्मवीर भाऊराव पाटील यांचे शैक्षणिक तत्वज्ञान

७. डॉ. बापुजी साळुंखे यांचे शैक्षणिक तत्वज्ञान

## २.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ :

१. रयत शिक्षण संस्था : वाटचाल, हीरकमहोत्सव प्रकाशन १९८४

२. रयतेचे कर्मवीर – मनोहर लांडगे

३. कर्मवीर भाऊराव पाटील आणि रयत शिक्षण संस्था – प्राचार्य आ. भा. मगदूम

४. कर्मवीर भाऊराव पाटील – डॉ. रमेश जाधव

५. आधुनिक शिक्षणाचे शिल्पकार – कर्मवीर भाऊराव पाटील – प्राचार्य आ. भा. मगदूम

६. स्वामी विवेकानंद संस्थेचा इतिहास – एम. फील अप्रकाशित प्रबंध

७. डॉ. बापुजी साळुंखे आणि मराठवाडा – डॉ. मच्छिंद्र नागरे

८. ग्रामीण महाराष्ट्राची शिक्षण परंपरा कर्मवीर भाऊराव पाटील आणि शिक्षणानंद बापुजी साळुंखे – चव्हाण रा. ना.

९. परमपूज्य बापुजी साळुंखे व्यक्ती आणि कार्य – गजानन सुर्वे

१०. शिक्षण महर्षी बापुजी साळुंखे – संभाजीराव पाटणे

११. कमावा व शिका योजना – एम. फील अप्रकाशित प्रबंध

१२. शिवाजी विद्यापीठ वार्षिक अहवाल

❖❖❖

घटक ३

# सामाजिक चळवळी

## (Social Movements)

अनुक्रमणिका


३.० उद्दिष्टे

३.१ प्रास्ताविक

३.२ विषय विवेचन

- ३.२.१ स्त्री हक्काच्या चळवळी
- ३.२.२ मागासवर्गीयांच्या मुक्तीच्या चळवळी
- ३.२.३ अंधश्रद्धा निर्मुलन

३.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

३.४ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

३.५ सारांश

३.६ सरावासाठी स्वाध्याय

३.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ

## ३.० उद्दिष्टे :

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला –

१. स्त्रियांचे हक्क, शिक्षण, आरोग्य, आणि सन्मानासाठी उभ्या राहिलेल्या चळवळींचे स्वरूप व कार्य समजून घेता येईल.

२. मागासवर्गीयांच्या सामाजिक, शैक्षणिक, व आर्थिक मुक्तीसाठीच्या संघर्षाविषयी माहिती मिळेल.

३. अंधश्रद्धेविरुद्ध उभ्या राहिलेल्या विज्ञानवादी, पुरोगामी चळवळींची गरज, कार्यपद्धती व परिणाम याविषयी माहिती समजेल.

४. समाजपरिवर्तनासाठी चळवळी कशा प्रकारे प्रभावी ठरतात हे समजेल.

## ३.१ प्रास्ताविक :

महाराष्ट्रातील स्त्रीहक्क चळवळ ही एक महत्वपूर्ण घटना आहे. कारण भारतीय समाजामध्ये अनेक अंधश्रद्धा, रूढी आणि परंपरा मानल्या जात होत्या. महिलांना घरकामापुरते सीमित ठेवले जात होते. महिलांना शिक्षण घेण्याचा अथवा समाजात सक्रिय सहभाग घेण्याचा अधिकार नव्हता. महात्मा फुले, सावित्रीबाई फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्त्रियांच्या शिक्षण, सामाजिक न्याय आणि कायदेशीर अधिकारांसाठी मोलाचे योगदान दिले. त्यांच्या कार्यामुळे महिलांच्या सक्षमीकरणाला एक नवा मार्ग मिळाला. १९६० नंतरच्या काळात स्त्रीशिक्षण, रोजगार आणि समानतेसाठी अनेक चळवळी सुरू झाल्या. विविध संघटनांच्या माध्यमातून महिलांनी आपल्या हक्कांसाठी आवाज उठवला. ही चळवळ आजही सुरू असून, ती सामाजिक परिवर्तनाच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे.

१९६० साली स्थापन झालेल्या महाराष्ट्रात मागासवर्गीय समाजघटकांनी (SC, ST, OBC, NT-DNT) आपल्या हक्कांसाठी चळवळी सुरू केल्या. संविधानाने सर्व नागरिकांना समान हक्क दिले असून, मागासवर्गीयांसाठी आरक्षण, शिष्यवृत्ती, वसतिगृहे अशा विशेष योजना आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या 'शिका, संघटित व्हा, संघर्ष करा' या विचारांनी प्रेरणा घेऊन दलित पँथर, नामांतर आंदोलन यांसारख्या चळवळी उदयास आल्या. शिक्षण, राजकारण व साहित्याच्या माध्यमातून समाज जागरूक झाला. आजही काही अडचणी कायम आहेत, म्हणून सामाजिक समता आणि हक्कांसाठी प्रयत्न सुरूच आहेत. संविधान, सरकारी योजना आणि समाजाची सकारात्मक भूमिका यामुळेच या समाजाचा खरा विकास शक्य आहे.

भारतीय समाजात संत आणि समाज सुधारकांनी सामाजिक असमानता, जातिभेद आणि अंधश्रद्धेविरोधात महत्त्वपूर्ण कार्य केले. संत तुकाराम, संत एकनाथ, संत ज्ञानेश्वर यांनी अभंग व कीर्तनांतून जातीभेदाचा निषेध केला. महात्मा गांधींनी सत्याग्रहाद्वारे अंधश्रद्धेविरोधात लढा दिला, तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्यता व जातीव्यवस्थेविरुद्ध मोठा लढा उभारला. समतेचा, विज्ञानाचा आणि विवेकाचा मार्गच खऱ्या सामाजिक प्रगतीस कारणीभूत ठरतो. आज विज्ञानयुग असूनही अंधश्रद्धा आणि छद्मविज्ञान समाजात प्रबळ आहेत. याविरोधात महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती (मंअंनिस) कार्यरत आहे. डॉ. नरेंद्र दाभोलकर यांनी १९८९ मध्ये स्थापन केलेली ही संस्था वैज्ञानिक दृष्टिकोन आणि विवेकवादासाठी झटते आहे.

सदर प्रकरणात स्त्री हक्काच्या चळवळी, मागासवर्गीयांच्या मुक्तीच्या चळवळी, अंधश्रद्धा निर्मुलन समितीचे कार्य यांचा आढावा घेण्यात आला आहे.

## ३.२ विषय विवेचन :

### ३.२.१ स्त्री हक्काच्या चळवळी :

महाराष्ट्रातील स्त्री हक्काच्या चळवळींचा इतिहास एक दीर्घ आणि संघर्षशील प्रक्रिया आहे हि चळवळ १९६० च्या दशकातच सुरू झाला नाही, तर त्याचे मुळ सामाजिक आणि सांस्कृतिक परंपरांमध्ये खोलवर रुजलेले होते. भारतीय समाजात महिलांचा ऐतिहासिक ठसा चांगला वळण घेतो, परंतु रूढीवादी विचारधारा, सामाजिक बंधने, आणि धार्मिक कर्तव्यांनी महिलांना नेहमीच त्यांच्या हक्कांपासून वंचित ठेवलं. महाराष्ट्रातल्या महिलांनाही त्यांच्या कुटुंबातील, समाजातील आणि धार्मिक नियमांनुसार दडपले गेले होते. महिलांना घरकामापुरतेच सीमित ठेवले गेले होते. महिलांना स्वातंत्र्य, शिक्षण किंवा समाजात सक्रिय होण्याची संधी कमी मिळत होती.

महात्मा जोतिराव फुले, सावित्रीबाई फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि इतर समाजसुधारकांचे कार्य स्त्री हक्कांच्या चळवळीला एक प्रेरणा देणारे ठरले. जोतिराव फुले यांनी स्त्रियांसाठी शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले आणि मुलींच्या शिक्षणाची सुरूवात केली. फुले यांच्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अनुसूचित जाती आणि इतर धर्मातील महिलांना सामाजिक आणि कायदेशीर अधिकार दिले. महिलांना दिलेल्या अधिकारांमध्ये विवाह, घटस्फोट, तसेच महिलांना समान हक्क प्राप्त करण्यासाठी विविध कायदे समाविष्ट होते.

तथापि, स्त्री हक्कांच्या चळवळीचा मुख्य प्रवास १९६० च्या दशकातच सुरू झाला. विशेषतः, त्या काळात स्त्री शिक्षण, रोजगार, आणि समानतेसाठी आवाज उठवण्यात महत्त्वाचे योगदान दिले गेले. महिलांच्या शोषणाला विरोध करण्यासाठी विविध संघटनांची स्थापना झाली. यामुळे महिलांना अधिक चांगली जीवनशैली, सशक्तीकरण आणि समानतेसाठी लढा देण्याची संधी मिळाली. महाराष्ट्रातील स्त्री हक्कांची चळवळ केवळ एका दशकात सुरू झाली असली तरी ती एक ऐतिहासिक प्रक्रिया होती, जी समाजाच्या सांस्कृतिक, सामाजिक आणि राजकीय प्रवाह अनुकूल करण्यासाठी सातत्याने कार्यरत राहिली.

#### ३.२.१.१. प्रारंभिक टप्पा (१९६०–७०) :

**१. स्त्री शिक्षण आणि जागरूकतेची सुरूवात :**

१९६० च्या दशकात भारतीय समाजात महिलांना मिळणारी शिक्षणाची संधी अत्यंत मर्यादित होती. विशेषतः ग्रामीण भागात, महिलांसाठी शिक्षणाला प्राधान्य मिळत नव्हते. त्यावेळी स्त्री शिक्षणाला अनेक अडचणी होत्या. सांस्कृतिक आणि सामाजिक अडथळे, आर्थिक परिस्थिती आणि पारंपरिक रूढीवाद या सर्वांचा त्यावर परिणाम होत होता. तथापि, १९६० च्या दशकाच्या मध्यापर्यंत, भारतीय समाजात शिक्षणाच्या महत्त्वाचे प्रमाण वाढले, आणि त्यात महिलांचे स्थान अधिक महत्त्वाचे ठरू लागले.

**२. १९६० च्या दशकात स्त्री शिक्षणावर भर :**

या दशकात स्त्री शिक्षणावर भर देण्याचे अनेक प्रयत्न झाले. विशेषतः शहरी आणि ग्रामीण भागांमध्ये महिलांच्या शिक्षणासाठी शालेय धोरणांमध्ये सुधारणा केली गेली. केंद्र सरकार आणि राज्य सरकार यांनी

मुलींसाठी शालेय शिक्षण अनिवार्य करण्याच्या दिशेने धोरणं आखली. 'राष्ट्रीय शालेय शिक्षा अभियान' या कार्यक्रमामुळे महिलांच्या शिक्षणाचा पाया घालण्यास मदत झाली. महिलांसाठी प्राथमिक शिक्षणाच्या सुलभतेच्या दृष्टीने अनेक शालेय योजनेत सुधारणा करण्यात आल्या.

शालेय शिक्षणामुळे मुलींमध्ये वैचारिक प्रगल्भता आणि सामाजिक जाणीवा वाढल्या. यामुळे त्यांना घरकाम आणि पारंपरिक भूमिकांपासून बाहेर पडण्याची प्रेरणा मिळाली आणि त्यांच्या जीवनशैलीत बदल होण्याची प्रक्रिया सुरू झाली. शिक्षित महिलांनी आपल्या कुटुंबात आणि समाजात सकारात्मक बदल घडवण्यास सुरुवात केली.

**३. महिलांसाठी शालेय शिक्षणातील सुधारणा :**

१९६०–७० च्या दशकात स्त्री शिक्षणावर घेतलेले प्रयत्न लक्षात घेतल्यास, शिक्षणाची संरचना आणि पद्धती यामध्ये सुधारणा केली गेली. विशेषतः, मुलींच्या शिक्षणावर अधिक लक्ष देण्यात आले. अनेक शाळांमध्ये मुलींना शिक्षणासाठी प्रवेश मिळविण्याचे धोरण तयार करण्यात आले. त्याचबरोबर, महिला शिक्षकांची नियुक्ती करण्यात आली आणि त्यांना उत्कृष्ट प्रशिक्षक म्हणून तयार करण्याच्या योजना राबवण्यात आल्या.

तसेच, विविध सरकारी आणि खाजगी संस्थांनी महिला शिक्षणासाठी प्रशिक्षण केंद्रे सुरू केली. त्यामध्ये महिलांना त्यांच्या स्वावलंबी जीवनासाठी आवश्यक कौशल्यांची शिकवण दिली जात होती. विशेषत: स्वयंसाहाय्यता आणि कार्यक्षमतेच्या कक्षेत महिलांना शिकवणारी शाळा आणि संस्था मोठ्या प्रमाणावर निर्माण झाल्या.

**४. स्त्री शिक्षण संस्थांची स्थापना आणि त्याचे महत्त्व :**

१९६० च्या दशकात स्त्री शिक्षण संस्थांची स्थापना हा एक महत्त्वाचा टप्पा होता. विविध संघटनांनी महिला शिक्षणाच्या प्रसारासाठी कार्य केले. धोंडो केशव कर्वेनी १९६३ मध्ये कर्वे इन्स्टीट्युट या संस्थेची स्थापना केली. यासारख्या संस्थांच्यामुळे महिला शिक्षणाची व्याप्ती वाढली. या संस्थांनी मुलींच्या शिक्षणावर विशेष भर दिला आणि समाजातील महिलांना शिक्षण मिळवण्याची संधी दिली.

याशिवाय, अनेक सामाजिक संघटनांनी महिलांसाठी विविध शैक्षणिक उपक्रम राबवले. यामुळे महिलांचा आत्मविश्वास वाढला, आणि त्या अधिक सक्षम आणि शिक्षित होऊ लागल्या. या संस्थांची महत्त्वाची भूमिका होती की त्या केवळ महिलांना शिक्षित करण्याचे काम करत नव्हत्या, तर महिलांच्या अधिकारांसाठीही आवाज उठवत होत्या.

**५. महिलांच्या हक्कांसाठी प्रारंभिक संघटनांचा संघर्ष :**

स्त्री शिक्षण आणि सामाजिक जागरूकतेची सुरूवात करत असतानाच, महिलांना त्यांच्या शोषणाच्या विरोधात आवाज उठवण्यासाठी सुरुवात झाली. घरकाम, शारीरिक शोषण, आणि कौटुंबिक हिंसा या सर्व बाबींवर प्रारंभिक संघटनांनी आवाज उठवला. या लढ्याची प्राथमिक दिशा होती – महिलांचे समान हक्क, न्याय आणि स्वावलंबन. महिलांचे स्थान घराच्या चौकटीतून बाहेर काढून त्यांना समाजात स्थान देणे हे महत्त्वाचे ठरले.

**६. समाजातील महिलांच्या जागरूकतेचा वाढता प्रवास :**

१९६०-७० च्या दशकात महिलांची जागरूकता वाढली. महिलांनी आपल्या हक्कांसाठी जास्त प्रमाणात आवाज उठवला आणि या चळवळीने समाजातील स्थानिक तसेच राष्ट्रीय पातळीवर महत्त्वाचे बदल घडवले. महिला आणि मुलींना शिक्षण, समान वेतन, कौटुंबिक हिंसा, आणि अन्य अत्याचारांसाठी लढण्यास प्रोत्साहन मिळाले. या चळवळींच्या माध्यमातून महिलांनी हक्कांच्या संरक्षणासाठी कायदेमंडळ व प्रशासनावर दबाव टाकला. समाजातील जागरूकतेमुळे महिलांच्या जीवनशैलीत मोठे बदल झाले, ज्यामुळे त्यांना आत्मनिर्भर होण्याची प्रेरणा मिळाली.

**३.२.१.२. मध्यवर्ती टप्पा (१९७०-८०) :**

**१. स्त्री-पुरुष समानतेची चळवळ :**

१९७०-८० चा काळ महाराष्ट्रात स्त्री-पुरुष समानतेच्या चळवळीचा निर्णायक टप्पा होता. या दशकात महिलांनी फक्त शोषणाविरोधात लढा दिला नाही, तर सामाजिक, आर्थिक आणि राजकीय क्षेत्रात पुरुषांसारखीच संधी मिळावी यासाठीही आवाज उठवला. समान वेतन, समान संधी, आणि निर्णयप्रक्रियेत सहभाग हे स्त्रियांचे मूलभूत अधिकार असावेत, ही भावना रुजण्यास सुरुवात झाली.

कामाच्या ठिकाणी महिलांना मिळणारे वेतन पुरुषांच्या तुलनेत कमी होते. सरकारी आणि खाजगी क्षेत्रांमध्ये वेतन विषमतेविरोधात महिलांनी संघर्ष केला. मजूर महिलांसाठी 'समान काम, समान वेतन' या मागणीसाठी आंदोलनं झाली. यामध्ये "SEWA" (Self-Employed Women's Association) सारख्या संघटनांनी मोठे योगदान दिले.

कृषी, औद्योगिक, शिक्षण व आरोग्य क्षेत्रात कार्यरत महिलांनी आपापल्या क्षेत्रात समानतेच्या हक्कासाठी लढा दिला. या दशकात महिलांच्या विविध संघटनांनी मोर्चे, आंदोलने, आणि पत्रकाद्वारे शासनावर दबाव निर्माण केला.

**२. स्त्री-पुरुष समानतेसाठी विविध आंदोलनांचे आयोजन :**

या कालावधीत महिलांच्या नेतृत्वात अनेक सामाजिक आणि राजकीय आंदोलनं झाली. उदाहरणार्थ, माथाडी कामगार महिला, कष्ट करणाऱ्या महिला अशा असंघटित क्षेत्रात कार्यरत महिलांनी आपल्या हक्कांसाठी संघटीत संघर्ष केला.

पोलिस दलात महिलांचा सहभाग वाढावा, मुलींसाठी स्वतंत्र हॉस्टेल्स निर्माण व्हावीत, सार्वजनिक ठिकाणी महिलांसाठी सुरक्षितता वाढावी अशा विविध मागण्यांसाठी मोर्चे काढले गेले. अनेक महिला नेत्यांनी या काळात नेतृत्व करताना समाजात महिलांची भूमिका नव्याने अधोरेखित केली.

**३. 'राष्ट्रीय महिला आयोग'ची स्थापना आणि त्याची भूमिका :**

सन १९७० च्या दशकात महिलांच्या हक्कांच्या रक्षणासाठी राष्ट्रीय स्तरावर विचार सुरू झाला. त्यातून पुढे १९९२ मध्ये राष्ट्रीय महिला आयोग (National Commission for Women - NCW) ची स्थापना झाली, परंतु त्याची कल्पना आणि आधार १९७०-८० च्या दशकातच तयार झाला होता.

या काळात महिलांच्या समस्यांचा अभ्यास करणाऱ्या समित्या स्थापन करण्यात आल्या. त्यांनी महिलांवरील अत्याचार, बालविवाह, हुंडा प्रथा, लैंगिक शोषण यांसारख्या गंभीर समस्यांचा अभ्यास करून शासनाला शिम ारसी दिल्या. या समित्यांच्या अहवालांच्या आधारावर महिलांसाठी संरक्षणात्मक कायदे तयार करण्यात आले.

**४. स्त्रीवादी चळवळ आणि तत्त्वज्ञान :**

सन १९७०-८० च्या दशकात स्त्रीवादी (Feminist) चळवळींना वैचारिक पाया मिळू लागला. भारतात, विशेषतः महाराष्ट्रात, सामाजिक सुधारकांची परंपरा स्त्रीवादाशी जोडली गेली. या काळात सावित्रीबाई फुले, पंडिता रमाबाई, महात्मा फुले, डॉ. आंबेडकर यांच्या विचारांचा पुनर्प्रसार झाला.

स्त्रीवाद हा केवळ लैंगिक समानतेबद्दल नव्हता, तर सामाजिक न्याय, आर्थिक सक्षमीकरण, आणि महिलांचा आत्मसन्मान यासंबंधीही होता. माझं शरीर - माझा हक्क यासारख्या घोषवाक्यांनी महिलांना आपल्या शरीरावरील हक्काची जाणीव करून दिली.

अनेक मराठी लेखिका - उदा. मालती बडेकर, शांता गोखले, विद्या बाळ - यांनी स्त्रीवादाचे विचार साहित्य, नाटक आणि व्यासपीठांद्वारे मांडले. त्यांनी महिलांच्या आत्मकथनातून त्यांच्या संघर्षांना आवाज दिला.

**५. महिला स्वातंत्र्य, समतेची भावना :**

या दशकात महिलांना फक्त कुटुंबापुरतेच न ठेवता त्यांच्या वैयक्तिक निर्णयक्षमतेवर भर दिला गेला. विवाह, शिक्षण, नोकरी, आणि मातृत्वासंबंधी निर्णय घेण्याचा अधिकार स्त्रीकडे असावा ही भूमिका पुढे आली.

स्त्रीच्या स्वातंत्र्याची व्याख्या रूढ चौकटीबाहेर गेली. महिला आपल्या अधिकारांसाठी स्वतंत्रपणे विचार करू लागल्या. त्यांचा आत्मविश्वास वाढला आणि त्या आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र होण्यासाठी प्रयत्नशील झाल्या. त्यामुळे महिलांचे सामाजिक स्थान उंचावले.

**६. मुलींच्या शिक्षणाचे महत्त्व :**

शिक्षण ही महिलांच्या सशक्तीकरणाची किल्ली आहे हे १९७०-८० च्या दशकात स्पष्ट झाले. शासनाने मुलींच्या शिक्षणासाठी अनेक योजना सुरू केल्या. उदा. बालिका प्रोत्साहन योजना, वसतीगृह योजना, शिष्यवृत्ती योजना. या योजनांमुळे मुलींच्या शालेय प्रवेशात वाढ झाली. शाळा आणि महाविद्यालयांमध्ये मुलींना प्रवेश देताना भेदभाव होऊ नये यासाठी शासनाने धोरणात्मक निर्णय घेतले.

**७. महिलांच्या जाणीवतेला वाढविण्यासाठी शालेय आणि महाविद्यालयीन कार्यक्रम :**

शाळा-महाविद्यालयांमध्ये स्त्री-जागृतीसाठी विशेष कार्यक्रम घेतले गेले. विद्यार्थिनींसाठी संवाद, व्याख्याने, निबंध स्पर्धा, स्त्री आरोग्यविषयक कार्यशाळा यांचे आयोजन झाले. विद्यार्थिनींमध्ये नेतृत्वगुण विकसित होण्यासाठी विद्यार्थिनी परिषद, स्त्री विकास मंच अशा संस्थांची स्थापना झाली. यामुळे महिलांना फक्त शिक्षण नाही तर समाजात नेतृत्वही करता येते, याचे भान मिळाले.

अशा प्रकारे १९७०-८० या दशकात स्त्री चळवळीने सामाजिक, वैचारिक, आणि शैक्षणिक पातळीवर

एक महत्त्वाचा टप्पा गाठला. या कालखंडाने पुढील संघर्षांची दिशा आणि पाया घालून दिला. आपण या चळवळींचा अभ्यास केल्यास आधुनिक काळातील स्त्री सक्षमीकरणाची मुळे हाच कालखंड ठरतो, हे स्पष्ट होते.

### ३.२.१.३. प्रगत टप्पा १९८०–९० :

सन १९८० ते १९९० हा काळ महाराष्ट्रातील महिला चळवळीसाठी निर्णायक ठरला. या कालखंडात महिलांच्या हक्कांसाठी विविध स्तरांवर लढा दिला गेला. सामाजिक अन्याय, लैंगिक शोषण, विवाहप्रथा, बालविवाह, हुंडा, आणि इतर गंभीर समस्यांवर महिलांनी थेट आवाज उठवला. एकीकडे स्त्रीवादी विचार अधिक प्रगल्भ झाले, तर दुसरीकडे महिलांचा सहभाग राजकीय आणि सामाजिक निर्णयप्रक्रियेत वाढू लागला.

#### १. अश्लिलता विरोधी आंदोलन (१९९०) :

१९९० च्या दशकात मुंबई आणि पुण्यासारख्या शहरांमध्ये सुरू झालेल्या अश्लिलता विरोधी आंदोलनाने (anti-obscenity movement) मुली आणि महिलांवरील लैंगिक हिंसाचाराविरोधात नवा लढा उभा केला. काही व्यावसायिक जाहिराती, पोस्टर्स आणि मीडियातील स्त्रीदेहाच्या अश्लील प्रदर्शनाविरोधात महिलांनी मोर्चेकाढले. या आंदोलनाचा उद्देश फक्त बाह्य अश्लीलतेला विरोध करण्याचा नव्हता, तर स्त्रीला वस्तूसारखे दाखवले जाणे थांबवणे हाच खरा केंद्रबिंदू होता. स्त्री ही शरीर नव्हे, ती विचार आहे हा संदेश या आंदोलनाने दिला.

#### २. 'सोनाली' केस आणि त्यावर चाललेली चळवळ :

सन १९८० च्या दशकाच्या अखेरीस 'सोनाली केस' महाराष्ट्रात गाजली. सोनाली या तरुणीवर झालेल्या बलात्काराच्या घटनेनंतर पोलिस आणि न्यायव्यवस्थेच्या दुर्लक्षाविरुद्ध महिलांनी तीव्र आंदोलन छेडले. स्त्री अत्याचार विरोधी समित्या, महिला संघटना, विद्यार्थिनी, पत्रकार अशा सर्व स्तरांतील लोकांनी एकत्र येत न्यायव्यवस्थेवर दबाव टाकला. या आंदोलनामुळे बलात्काराच्या घटनांवर तात्काळ कारवाई व्हावी, पीडित महिलेला संरक्षण व न्याय मिळावा यासाठी ठोस मार्गदर्शक तत्त्वे तयार झाली.

#### ३. हुंडा प्रथेला व बालविवाहाला विरोध :

महिला संघटनांनी हुंडा प्रथेला (dowry) आणि बालविवाह यांच्या विरोधात या कालखंडात तीव्र भूमिका घेतली. गरीब आणि ग्रामीण भागात अजूनही हुंडा आणि बालविवाहाची प्रथा रूढ होती. महिला कार्यकर्त्यांनी 'हुंडा विरोधी पथनाट्ये', शाळांमध्ये जनजागृती वर्ग, विवाह समारंभात जनजागृती पत्रके वाटप यासारख्या उपक्रमांद्वारे समाजाला जागवण्याचा प्रयत्न केला. 'हुंडा घेणं म्हणजे मुलीला खरेदी करणं' या स्पष्ट संदेशांनी महिलांच्या हक्कांच्या संरक्षणासाठी व्यापक जनमत तयार झाले.

#### ४. आधुनिक स्त्रीवादी विचार :

सन १९८०–९० मध्ये स्त्रीवादी विचार अधिक प्रगल्भ झाले. स्त्रीच्या शरीरावर, शिक्षणावर, नोकरीवर, आणि आयुष्यावर तिचा स्वतःचा हक्क आहे हे ठामपणे मांडले गेले. 'माझं शरीर – माझा निर्णय', 'मी बोलते आहे, मी लढते आहे' अशी घोषवाक्ये रूढ झाली. स्त्रियांनी लैंगिक हिंसेविरोधात न्यायालयात याचिका दाखल

केल्या, कायद्यात सुधारणा सुचवल्या. उदाहरणार्थ, १९८३ मध्ये बलात्कारावरील कायद्यात सुधारणा, आणि १९८६ मध्ये 'इंदिरा जयसिंह' यांच्या नेतृत्वाखाली 'कौटुंबिक हिंसा' हा गंभीर गुन्हा मानला गेला.

**५. स्त्रियांनी विविध क्षेत्रात आपला ठसा उमटवला :**

या दशकात महिलांनी शिक्षण, पत्रकारिता, विधी, प्रशासन, न्यायव्यवस्था, राजकारण आणि संशोधन शाखांमध्ये आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली. डॉ. शरदिनी डांगे, रजनी टिळक, आणि रावसाहेब कसबे यांसारख्या बुद्धिवादी विचारवंतांनी स्त्रीवादी विचारसरणीत भर घातली.

याच काळात महिलांनी ग्रामपंचायत, जिल्हा परिषद, आणि महानगरपालिका यांसारख्या स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये सक्रिय सहभाग घेतला. ७३ व्या आणि ७४ व्या घटना दुरुस्तीमुळे महिलांसाठी राजकीय आरक्षण आले आणि सार्वजनिक प्रशासनात महिलांचा सहभाग वाढला.

अशा प्रकारे १९८०-९० चा कालखंड हा महाराष्ट्रातील महिला चळवळीचा 'प्रगत टप्पा' ठरला. केवळ संघर्ष नव्हे, तर महिलांचे वैचारिक व सामाजिक सक्षमीकरण घडवणारा हा कालखंड होता. या टप्प्याने पुढील दशकात येणाऱ्या धोरणात्मक सुधारणांसाठी एक सशक्त पाया घातला.

**३.२.१.४. आधुनिक टप्पा २०००-२०१० :**

**१. स्त्री चळवळींचा सशक्त आणि परिवर्तनशील कालखंड :**

२००० ते २०१० हा कालखंड महाराष्ट्रासह भारतातील महिला चळवळीचा अधिक प्रगल्भ आणि प्रभावी टप्पा ठरतो. या कालावधीत नारी सशक्तीकरण हे केवळ घोषवाक्य न राहता धोरणनिर्मिती, कायद्यातील सुधारणा, आणि समाजप्रबोधनाच्या स्वरूपात प्रत्यक्षात उतरवले गेले. महिलांच्या शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक आणि राजकीय क्षेत्रात लक्षणीय सहभाग दिसून आला. याला पाठिंबा देणारे अनेक कायदे, शासकीय योजना आणि जागरूकतेच्या चळवळी यांची निर्मिती झाली.

**२. मनारी 'शक्तीकरण' आणि 'स्त्री हक्क कायदा' :**

या कालखंडात महिलांच्या सक्ष्मीकरणासाठी केंद्र सरकारने आणि राज्य सरकारांनी अनेक महत्त्वाचे कायदे आणि धोरणे राबवली. घरेलू हिंसा प्रतिबंधक कायदा २००५ (Protection of Women from Domestic Violence Act, 2005) हा स्त्रियांविरुद्ध होणाऱ्या कौटुंबिक अत्याचाराविरोधातील एक ऐतिहासिक पाऊल ठरले. 'Dowry Prohibition Act', 'Sexual Harassment of Women at Workplace Bill' (2006 draft) अशा कायद्यातील सुधारणांनी महिलांच्या सुरक्षिततेसाठी नवीन पायाभूत संधी निर्माण केल्या. महिला आयोग, महिला व बालकल्याण विभाग यांनी महिला हक्कांची माहिती लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी सक्रिय भूमिका बजावली.

**३. महिलांवरील अत्याचाराविरोधातील कायदे आणि अंमलबजावणी :**

स्त्री-शोषण, बलात्कार, लैंगिक छळ, बालविवाह, भ्रूणहत्या, मानवी तस्करी यांसारख्या गुन्ह्यांवर कडक शिक्षा होणारे कायदे तयार करण्यात आले. 'महिला बलात्कार विरोधी कायदा' अधिक कडक बनवण्यात

आला. पोलीस स्टेशनमध्ये महिला अधिकाऱ्यांची नियुक्ती, महिला हेल्पलाईन्स, तक्रार नोंदणी प्रक्रिया सुलभ करणारे पोर्टल्स यांसारख्या सुधारणा करण्यात आल्या.

**४. शिक्षणातील सुधारणांची अंमलबजावणी :**

महिलांच्या सक्षमीकरणात शिक्षण हे मूलभूत साधन असल्याचे ओळखून सरकारने 'सर्व शिक्षा अभियान', 'कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय योजना', 'बेटी बचाओ - बेटी पढ़ाओ' अभियानांचा प्रचार केला. ग्रामीण भागातील मुलींना शिष्यवृत्ती, फुकट वह्या-पुस्तके, सायकल योजना यांद्वारे शालेय शिक्षणासाठी प्रोत्साहन दिले गेले.

**५. स्त्री-पुरुष समानतेसाठी प्रशिक्षण आणि शाळांमधील विशेष उपक्रम :**

शाळांमध्ये स्त्री-पुरुष समानतेवर आधारित सॉफ्ट स्किल्सचे प्रशिक्षण, 'जेंडर सेंसिटायझेशन वर्कशॉप्स', पोस्टर स्पर्धा, निबंध लेखन आदी उपक्रम घेण्यात आले. शिक्षकांसाठी स्त्रीविषयक संवेदनशीलता प्रशिक्षण सुरू झाले. त्यामुळे लहान वयातच विद्यार्थ्यांमध्ये लिंगसमानतेविषयी सकारात्मक दृष्टिकोन तयार होऊ लागला.

**६. महिलांच्या कामाच्या क्षेत्रात वाढ :**

सन २००० नंतर महिलांनी बँकिंग, माहिती-तंत्रज्ञान, शासकीय सेवा, न्यायव्यवस्था, पत्रकारिता, संशोधन, व्यवसाय, वकील, लष्कर, विज्ञान, अशा विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी केली. महिला स्वयंसहायता बचत गट चळवळीमुळे ग्रामीण आणि आदिवासी भागातील महिलांमध्ये आर्थिक स्वावलंबन आणि नेतृत्वगुण वाढले. कामाच्या जागी महिलांना सुरक्षित आणि समतावादी वातावरण मिळावे यासाठी 'विशाखा मार्गदर्शक तत्त्वे' लागू करण्यात आली.

**७. माहिती तंत्रज्ञान आणि स्त्रीच्या सहभागाची वाढ :**

या दशकात इंटरनेट आणि मोबाईल क्रांतीमुळे महिलांना ऑनलाईन लर्निंग, ब्लॉगिंग, फोरम्स, सोशल मीडिया यांद्वारे स्वतःचे विचार व्यक्त करता येऊ लागले. फेसबुक, ट्विटर, ब्लॉग्स, यूट्यूबसारख्या माध्यमांद्वारे महिलांच्या प्रश्नांवर जनजागृती व्हायला लागली. 'Pink Chaddi Campaign', "Blank Noise Project' ही ऑनलाईन स्त्रीवादी चळवळी याच काळात उदयाला आल्या.

**८. कायदेशीर मंचांचा विस्तार आणि हक्कांची जाणीव :**

महिलांना त्यांचे कायदेशीर हक्क समजावेत म्हणून कायदेतज्ज्ञ, स्वयंसेवी संस्था आणि महिला आयोग यांनी विविध जागरूकता शिबिरे, कायदे साक्षरता मोहीम, सार्वजनिक चर्चासत्रे घेतली. या उपक्रमांमुळे सामान्य महिलांनाही तक्रार कशी नोंदवावी, कौटुंबिक हिंसेविरोधात कायदेशीर मदत कुठे मिळेल, कायदेशीर सल्ला कोण देतो याबाबत माहिती मिळाली.

२०००-२०१० या दशकात महिला चळवळींनी आपले स्वरूप बदलले. केवळ रस्त्यावरच्या निदर्शनांपुरते मर्यादित न राहता त्या शिक्षण, तंत्रज्ञान, कायदा, व्यवसाय, आणि समाजमनात दृढपणे रुजल्या. स्त्री हक्कांचा

साक्षर, तांत्रिक, कायदेशीर आणि संस्थात्मक आधार याच कालखंडात बळकट झाला. याने २०१० नंतरच्या डिजिटल आणि समावेशी युगासाठी महिलांना सक्षम, जागरूक आणि प्रभावी बनवले.

### ३.२.१.५ सामाजिक व सांस्कृतिक बदल: आधुनिक महिलांच्या जीवनातील परिवर्तन :

१९७० नंतरच्या काळात आणि विशेषतः २१ व्या शतकाच्या सुरुवातीस भारतात महिलांच्या सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक स्थितीत लक्षणीय बदल घडून आले. स्त्रिया केवळ कुटुंबाच्या मर्यादित भूमिकेतून बाहेर पडून समाजाच्या विविध क्षेत्रांमध्ये सक्रिय सहभागी झाल्या. त्यांच्या जीवनशैलीत, विचारसरणीत आणि अभिव्यक्तीत मोठी सकारात्मक क्रांती झाली.

**१. महिलांच्या जीवनातील बदल :**

स्त्रिया आता अधिक जागरूक, आत्मनिर्भर आणि अधिकार संपन्न झाल्या आहेत. शिक्षणाच्या वाढलेल्या संधींमुळे त्यांनी शहरी तसेच ग्रामीण भागातही आपल्या अस्तित्वाची नव्याने ओळख पटवली. पारंपरिक संकोच झुगारून त्यांनी वैचारिक, आर्थिक आणि व्यावसायिक क्षेत्रांत पाय रोवले.

महिलांनी शिक्षण, व्यवसाय, उद्योजकता, विज्ञान, राजकारण अशा विविध क्षेत्रात यशस्वीपणे आपली छाप उमटवली आहे. विशेषतः शहरी भागात महिलांनी करिअर आणि कुटुंब यांचा समतोल साधत नव्या जीवनशैलीचा स्वीकार केला आहे. ग्रामीण भागातही स्वयंसहायता गटांमुळे महिलांमध्ये आर्थिक स्वावलंबन वाढले आहे.

**२. अत्याचार आणि महिला संरक्षण :**

स्त्रियांवरील बलात्कार, शारीरिक छळ, मानसिक हिंसा, कौटुंबिक अत्याचार या समस्या अजूनही गंभीर आहेत, पण महिलांनी त्याविरुद्ध आवाज उठवण्याची क्षमता विकसित केली आहे. 'घरेलू हिंसा विरोधी कायदा २००५', 'पोस्को कायदा', 'बलात्कारविरोधी कायद्यांमधील सुधारणां', महिला आयोगाची सक्रियता, अशा कायदेशीर उपाययोजनांमुळे महिलांना संरक्षणाचा आधार मिळू लागला आहे.

त्याचप्रमाणे, विविध स्वयंसेवी संस्था, महिला आयोग, पोलिस विभागाचे महिला कक्ष यांचा महिलांच्या हक्कांसाठी सक्रिय सहभाग दिसून येतो. जनजागृतीसाठी कार्यशाळा, हेल्पलाईन सेवा, कायदे साक्षरता शिबिरे, हे समाजात सकारात्मक परिवर्तन घडवत आहेत.

**३. महिला सशक्तीकरणासाठी योजना :**

'सुकन्या समृद्धी योजना', 'बेटी बचाओ, बेटी पढ़ाओ', 'उज्ज्वला योजना', 'मिशन शक्ति', 'महिला हेल्पलाईन - १८१', अशा विविध योजना महिलांच्या संरक्षणासाठी राबवण्यात आल्या आहेत. या योजनांनी शिक्षण, आरोग्य, सुरक्षितता आणि आर्थिक सक्षमीकरणाला चालना दिली.

**४. स्त्रीवादी लेखन आणि कलात्मक अभिव्यक्ती :**

नारीवादी विचारांचा प्रभाव साहित्य, कविता, ललित लेखन, चित्रपट, नाटके, डॉक्युमेंटरी चित्रपट, लोककला, सोशल मीडियावरील अभिव्यक्ती अशा माध्यमांतून स्पष्टपणे दिसून येतो. मधुराणी गोखले, उषा मेहता, विद्या बाळ, शांता गोखले, मेधा पाटकर यांसारख्या लेखिकांनी आणि कार्यकर्त्यांनी स्त्रीजीवनाच्या

विविध पैलूंना वाचा फोडली. 'समांतर', 'अस्तित्व', 'पारो', 'बंदिनी', 'पिंजरा', 'क्वीन', 'थप्पड' यांसारखे चित्रपट समाजातील स्त्रीविषयक मुद्द्यांना प्रभावीपणे मांडतात. लोककला, पथनाट्ये, महिला संगीत, स्त्री-केन्द्रित साहित्यिक संमेलने हे सर्व माध्यमांद्वारे स्त्रिया आपली मते, भावना, अनुभव आणि संघर्ष जगासमोर ठेऊ लागल्या.

सामाजिक आणि सांस्कृतिक पातळीवर महिलांच्या जीवनात सकारात्मक बदल घडले असून, त्यांनी स्वतंत्रता, समता, सुरक्षितता आणि सशक्तता यांच्या दिशेने निर्णायक पावले उचलली आहेत. हे परिवर्तन केवळ कायद्यापुरते मर्यादित न राहता जाणीवेच्या आणि सृजनात्मक अभिव्यक्तीच्या माध्यमातून समाजात खोलवर रुजलेले आहे.

**स्वयं अध्ययन प्रश्न – १ :**

**अ) योग्य पर्याय निवडा.**

१. महिलांसाठी शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित करणारे ..... हे पहिले समाजसुधारक होते.
   अ) डॉ. बाबासाहेब आंबेडकर ब) धोंडो केशव कर्वे
   क) महात्मा गांधी ड) जोतिराव फुले

२. धोंडो केशव कर्वे यांनी १९६३ मध्ये ..... संस्था स्थापन केली.
   अ) सावित्रीबाई शिक्षण संस्था ब) महिला शिक्षण मंडळ
   क) कर्वे इन्स्टिट्युट ड) राष्ट्र सेवा दल

३. १९७०-८० च्या दशकात स्त्री-पुरुष समानतेसाठी कार्य करणारी महत्त्वाची संस्था ..... होती.
   अ) CBI ब) SEW
   क) NITI -ayog ड) NCERT

४. 'समान काम, समान वेतन' ही मागणी विशेषतः ..... केली.
   अ) शिक्षण क्षेत्रातील महिलांनी ब) पोलिस कर्मचारी महिलांनी
   क) मजूर आणि असंघटित क्षेत्रातील महिलांनी ड) आरोग्य क्षेत्रातील महिलांनी

५. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी महिलांसाठी ..... हक्क सुनिश्चित केले?
   अ) मताधिकार आणि धार्मिक स्वातंत्र्य ब) रोजगार हमी
   क) विवाह, घटस्फोट व कायदेशीर अधिकार ड) आरक्षण आणि जमीन वाटप

### ३.२.२ मागासवर्गीयांच्या मुक्तीच्या चळवळी :

महाराष्ट्र राज्य १९६० साली स्थापन झाले. या नव्या राज्यात वेगवेगळ्या समाजघटकांनी आपापले हक्क मागण्यासाठी चळवळी सुरू केल्या. यात अनुसूचित जाती (SC), अनुसूचित जमाती (ST), इतर मागासवर्ग

(OBC), आणि भटक्या-विमुक्त जमाती (NT-DNT) यांचा समावेश होतो. हे लोक अनेक वर्षे अन्याय, जातिभेद, गरिबी आणि शिक्षणाच्या अभावामुळे मागे पडले होते.

भारताचे संविधान १९५० साली लागू झाले. यात सर्व नागरिकांना समान हक्क, सन्मान, शिक्षण, आणि रोजगाराच्या संधी मिळाव्यात असा उद्देश आहे. संविधानात काही विशेष तरतुदी केल्या आहेत ज्या मागासवर्गीय समाजाला न्याय देण्यासाठी आहेत. उदाहरणार्थ, शिक्षण व नोकरीमध्ये आरक्षण, सामाजिक वसतिगृहे, आणि शिष्यवृत्ती अशा योजना लागू केल्या गेल्या.

महाराष्ट्रात १९६० नंतर अनेक सामाजिक चळवळी झाल्या. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेले विचार, 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' हे ब्रीद वाक्य मागासवर्गीय समाजासाठी प्रेरणा बनले. दलित पँथर, नामांतर आंदोलन, भटक्या-विमुक्तांसाठीच्या मागण्या यामुळे समाजात आत्मभान निर्माण झाले. शिक्षण, राजकारण आणि साहित्य यामार्फत मागासवर्गीय समाज पुढे येऊ लागला.

तरीही आजही अनेक अडचणी आहेत. काही ठिकाणी अजूनही जातीय भेदभाव दिसतो. शिक्षण, नोकरी किंवा सामाजिक सन्मान मिळवताना अडथळे येतात. म्हणून संविधानाने दिलेले सामाजिक न्यायाचे तत्व अजून पूर्णपणे साकारले गेलेले नाही. सामाजिक समता, हक्क आणि संधी मिळवण्यासाठी मागासवर्गीय समाजाचे प्रयत्न आजही चालू आहेत. या समाजाच्या उन्नतीसाठी संविधानिक तरतुदी, सरकारच्या योजना आणि समाजाची सकारात्मक भूमिका खूप महत्त्वाची आहे.

### ३.२.२. १. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा प्रभाव: मागासवर्गीय चळवळींसाठी प्रेरणास्थान :

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे केवळ भारताच्या राज्यघटनेचे शिल्पकार नव्हते, तर ते एक समाजसुधारक, विचारवंत आणि दलित-मागासवर्गीय समाजासाठी दीपस्तंभ होते. त्यांनी आपल्या आयुष्यातून सामाजिक न्याय, समता आणि स्वाभिमानाची शिकवण दिली. त्यांच्या विचारांचा परिणाम महाराष्ट्रासह संपूर्ण भारतात मागासवर्गीय चळवळींवर खोलवर झाला.

**१. मागासवर्गीय समाजासाठी प्रेरणास्थान :**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी स्वतः अत्यंत हलाखीच्या परिस्थितीतून शिक्षण घेऊन आपल्या बुद्धिमत्तेच्या जोरावर देशविदेशात उच्च शिक्षण घेतले. त्यांनी दाखवून दिलं की, शिक्षण हेच खरे शस्त्र आहे ज्याच्या मदतीने वंचित समाज स्वतःला सक्षम बनवू शकतो. यामुळे त्यांनी 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' हे त्रिसूत्री मंत्र दिला, ज्याने मागासवर्गीय समाजात आत्मविश्वास आणि चेतना निर्माण झाली. त्यांनी जातीभेदाविरोधात आवाज उठवला. अस्पृश्यता ही केवळ सामाजिक शाप नसून मानवी हक्कांवर होणारा आघात आहे, असे ते म्हणत. त्यांच्या नेतृत्वामुळे मागासवर्गीय समाजाने शिक्षण, नोकरी, राजकारण आणि सामाजिक क्षेत्रात आपली हक्काची जागा मागण्यास सुरुवात केली.

**२. बौद्ध धर्मांतर व सांस्कृतिक मुक्ती :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मते, फक्त सामाजिक आणि शैक्षणिक सुधारणांनी पूर्ण परिवर्तन होणार नाही, त्यासाठी सांस्कृतिक बदल आवश्यक आहे. म्हणूनच त्यांनी १४ ऑक्टोबर १९५६ रोजी लाखो

अनुयायांसह बौद्ध धर्म स्वीकारला. हे केवळ धर्मांतर नव्हते, तर एका सांस्कृतिक क्रांतीचा भाग होता. यामागे त्यांचा उद्देश होता की दलितांनी मन, विचार आणि आचरणाने स्वतंत्र व्हावे.

बौद्ध धर्मात त्यांनी अहिंसा, करुणा, समता आणि शुद्ध जीवनमूल्ये यांचा पुरस्कार केला. यामुळे हजारो लोकांना आत्मसन्मान, नवीन ओळख आणि स्वतंत्र विचारसरणी मिळाली. धर्मांतराने एका मोठ्या समाजाला अस्पृश्य या ओळखीपासून मुक्ती दिली आणि त्यांनी स्वतःला 'नवबौद्ध' या नवीन सांस्कृतिक ओळखीने सज्ज केले.

**३. स्वातंत्र्य व समानतेसाठी चळवळ :**

डॉ. आंबेडकरांची विचारसरणी ही पूर्णपणे लोकशाही, प्रजासत्ताक आणि संविधाननिष्ठ होती. त्यांनी संविधान लिहिताना प्रत्येक व्यक्तीला समान हक्क, स्वतंत्रता आणि बंधुतेची हमी दिली. त्यांचा दृढ विश्वास होता की सर्वांना एकसमान संधी मिळाल्या पाहिजेत. हे विचार पुढे चालवण्यासाठी महाराष्ट्रात अनेक चळवळी उभ्या राहिल्या. दलित पँथरसारख्या चळवळींनी डॉ. बाबासाहेबांच्या विचारांचा लढा रस्त्यावर आणला. त्यांनी सामाजिक अपमान, अत्याचार आणि भेदभावाविरुद्ध संघर्ष केला. शिक्षण, आरक्षण, सामाजिक प्रतिष्ठा आणि आर्थिक उन्नती या बाबतीत मागासवर्गीय समाजाने हक्क मागायला सुरुवात केली. हे सर्व बाबासाहेबांच्या विचारसरणीचा परिणाम होता.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार हे राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक परिवर्तनाचे अधिष्ठान होते. त्यांनी दिलेले विचार आजही मागासवर्गीय समाजासाठी प्रेरणादायी आहेत. त्यांच्या शिकवणीमुळे मागासवर्गीय समाजाने आत्मसन्मानाने जगायला सुरुवात केली, अन्यायाविरुद्ध आवाज उठवला, आणि आपल्या हक्कांसाठी संघटितपणे लढा उभा केला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेले विचार, त्यांचा लढा आणि बौद्ध धर्मांतराने मागासवर्गीय समाजाला एक नवी दिशा दिली. त्यांच्या विचारांनी अनेक पिढ्यांमध्ये सामाजिक चेतना, संघर्षाची तयारी आणि प्रबोधन निर्माण केले. आजही त्यांच्या विचारांचा प्रभाव महाराष्ट्रातील मागासवर्गीय चळवळींमध्ये दिसून येतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे फक्त एक व्यक्ती नव्हते, तर एका नवजागरणाचे प्रतीक होते, ज्यांची प्रेरणा पुढील पिढ्यांसाठीही मार्गदर्शक राहील.

**३.२.२.२ महाराष्ट्रातील प्रमुख चळवळींचा उदय :**

महाराष्ट्रात १९६० नंतर मागासवर्गीय समाजाच्या सक्षमीकरणासाठी अनेक प्रभावी चळवळी उदयास आल्या. या चळवळींनी सामाजिक अन्याय, विषमता, भेदभावाविरोधात संघर्ष केला आणि समाजाच्या नवचैतन्याचा पाया रचला. अशा पाच महत्त्वपूर्ण चळवळींचा आढावा पुढीलप्रमाणे आहे.

**१. दलित पँथर चळवळ (१९७२) :**

१९७० च्या दशकात भारतात विशेषतः महाराष्ट्रात दलित समाजावर होणाऱ्या अत्याचारांत मोठी वाढ झाली होती. सामाजिक बहिष्कार, जातीवर आधारित हिंसाचार, विषमता आणि अन्यायाच्या घटनांनी दलित युवकांमध्ये संतापाची भावना वाढू लागली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या निधनानंतर दलित चळवळीला

प्रभावी नेतृत्वाचा अभाव भासत होता. अशा परिस्थितीत दलित समाजात एका नव्या क्रांतिकारी विचारसरणीची गरज निर्माण झाली आणि या पार्श्वभूमीवर १९७२ मध्ये मुंबईत 'दलित पँथर' या संघटनेची स्थापना झाली.

दलित पँथरची स्थापना नामदेव ढसाळ, राजा ढाले, अरुण कांबळे आदी दलित तरुणांनी केली. या संघटनेवर प्रभाव थेट अमेरिकेतील कृष्णवर्णीय समाजाच्या 'ब्लॅक पँथर' चळवळीचा होता. त्यामुळेच दलित पँथर ही चळवळ केवळ सामाजिक न्यायाची मागणी करणारी नव्हती, तर ती अधिक आक्रमक, थेट कृती करणारी आणि शोषणाविरुद्ध लढणारी ठरली. त्यांनी 'हल्ला बोल', 'क्रांती होईल ती रस्त्यावरच' असे घोषवाक्य घेत, थेट कृतीचा मार्ग स्वीकारला.

दलित पँथरचे प्रमुख उद्दिष्ट होते – दलितांवरील अत्याचारांना रोखणे, आरक्षणाच्या तरतुदींची अंमलबजावणी, शिक्षण व रोजगारामध्ये समान संधी, आणि सामाजिक प्रतिष्ठा. त्यांनी जातीव्यवस्थेविरुद्ध आणि ब्राह्मणवादी वर्चस्वाविरुद्ध खुले आव्हान दिले. विशेषतः ग्रामीण भागात दलित स्त्रियांवरील अत्याचार, जमिनीवरील हक्कांपासून वंचित ठेवणे, सामाजिक बहिष्कार अशा घटनांविरुद्ध त्यांनी उग्र आंदोलनं केली.

या चळवळीने एक नवा साहित्यिक आणि सांस्कृतिक प्रवाह निर्माण केला. नामदेव ढसाळ, राजा ढाले, ज्येष्ठ साहित्यिक यांच्यामुळे 'दलित साहित्य' या नव्या साहित्यप्रवाहाचा उदय झाला. 'गोलपीठा', 'ठिंबक ठिंबक रक्ताचं पाणी', अशा कविता आणि लेखांनी दलितांचे अनुभव, वेदना, संघर्ष समाजासमोर आणले. दलित साहित्य परिषद, आंबेडकरी विचारांचा प्रचार, आणि समाजप्रबोधन हे या चळवळीचे महत्त्वाचे अंग होते.

दलित पँथरने केवळ दलितच नव्हे, तर ओबीसी, आदिवासी, भटक्या विमुक्त वर्गाच्या हक्कांसाठी देखील आवाज उठवला. त्यांच्या मते, संविधानाने दिलेले हक्क मिळवण्यासाठी लढा देणे हे आवश्यक होते. त्यामुळेच ही चळवळ 'बहुजन समाजाच्या जागृतीचे आंदोलन' बनली.

दलित पँथरचे कार्य पुढे राजकीय पक्षांतील फूट, वैचारिक मतभेद आणि सरकारकडून दडपशाही यामुळे थांबले. तथापि, त्यांनी दिलेला लढा, जागृती आणि आत्मभान यामुळे एक नवा सामाजिक बदल घडून आला. अनेक नव्या संघटना आणि चळवळींना या पँथर चळवळीने प्रेरणा दिली.

आजही दलित पँथरचा इतिहास अभ्यासताना आपल्याला दिसते की त्यांनी संघर्ष, साहित्य, आंदोलन, विचार आणि कृती या पाचही पातळ्यांवर आपले योगदान दिले. दलित पँथर ही केवळ एका दशकापुरती मर्यादित राहिलेली चळवळ नव्हती, तर ती सामाजिक परिवर्तनाची आणि अन्यायाविरुद्धच्या संघर्षाची एक प्रभावी पायवाट होती.

त्यांनी आंबेडकरी विचारधारेच्या नव्या पिढीला दिशा दिली. दलितांचा आत्मसन्मान जागवला आणि सामाजिक संघर्षात लढण्याची ताकद दिली. त्यामुळेच दलित पँथर ही चळवळ आजही भारतीय सामाजिक चळवळींच्या इतिहासातील एक महत्त्वाचा अध्याय मानली जाते.

**२. नामांतर आंदोलन :**

१९७० च्या दशकात मराठवाडा विद्यापीठाच्या नावामध्ये बदल करून ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर

विद्यापीठ असे करण्याची मागणी उभी राहिली. ही मागणी म्हणजे केवळ एका नावात बदल करण्यापुरती मर्यादित नव्हती, तर डॉ. आंबेडकरांच्या शैक्षणिक, सामाजिक व बौद्धिक योगदानाला मान्यता देण्याचा प्रयत्न होता. दलित समाजाला वाटत होते की शिक्षणाचे प्रतीक असलेल्या विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देणे ही बाब त्यांच्या स्वाभिमानाची आणि अस्तित्वाची ओळख ठरेल.

पण ही मागणी समोर आल्यानंतर समाजातील उच्चवर्णीय आणि पुरोगामी म्हणविणाऱ्या घटकांकडून तीव्र विरोध झाला. या विरोधात काही ठिकाणी जाणीवपूर्वक दलित वस्तीवर हल्ले झाले, दलित विद्यार्थ्यांवर अत्याचार झाले, आणि समाजात तणाव निर्माण झाला. या पार्श्वभूमीवर १९७८ साली औरंगाबाद येथे मोठ्या प्रमाणावर दलित समाजाने मोर्चा काढला. या वेळी पोलिसांनी केलेल्या गोळीबारात काही निष्पाप विद्यार्थी आणि नागरिक मरण पावले. ही घटना महाराष्ट्राच्या सामाजिक चळवळीतील एक काळा दिवस मानली जाते.

नामांतराच्या मागणीमागे केवळ राजकीय हेतू नव्हते. ही मागणी डॉ. आंबेडकरांचे विचार, शिक्षणातील योगदान, आणि दलितांना मिळालेले आत्मभान याचे प्रतीक होती. त्यामुळे दलित समाजाने या मागणीसाठी दोन दशकांहून अधिक काळ संघर्ष केला. विविध संघटना, विद्यार्थी, कार्यकर्ते, आणि साहित्यिकांनी आपल्या-आपल्या पद्धतीने आंदोलनाला चालना दिली.

हे आंदोलन हळूहळू महाराष्ट्रभर पसरले. नामांतरासाठी रात्रंदिवस सुरू असलेले आंदोलन, मोर्चे, पत्रव्यवहार, उपोषण, साहित्य संमेलने अशा विविध मार्गांनी लढा दिला गेला. अनेकवेळा आंदोलनकर्त्यांना अटक झाली, त्यांच्यावर खटले दाखल झाले, तरीही त्यांनी हार मानली नाही.

शेवटी, १४ जानेवारी १९९४ रोजी महाराष्ट्र शासनाने मराठवाडा विद्यापीठाचे नाव अधिकृतपणे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ असे घोषित केले. हे केवळ एका संस्थेच्या नावात झालेले बदल नव्हता, तर दलित समाजाच्या संघर्षाला मिळालेला न्याय होता.

नामांतर आंदोलनाने सामाजिक न्याय, सन्मान आणि समानतेच्या चळवळीस नवा आयाम दिला. आजही हे आंदोलन दलित स्वाभिमानाचे, आत्मभानाचे, आणि बाबासाहेबांच्या विचारासाठी लढणाऱ्या समाजाच्या निर्धाराचे प्रतीक मानले जाते.

**३. मंडल आयोग आणि ओबीसी आरक्षण चळवळ (१९८० नंतर) :**

सन १९८० मध्ये भारत सरकारने मंडल आयोगाचा अहवाल प्रसिद्ध केला. या अहवालामध्ये इतर मागासवर्गीय (OBC) समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक स्थितीचा अभ्यास करून, सरकारी नोकऱ्या व शिक्षण क्षेत्रात २७% आरक्षण देण्याची शिफारस करण्यात आली. या शिफारशी लागू करण्यासाठी देशभरात आणि विशेषतः महाराष्ट्रात मोठी चळवळ उभी राहिली.

या चळवळीत ओबीसी समाजातील शेतकरी, मजूर, गरीब तरुण, तसेच विविध सामाजिक संघटना व कार्यकर्ते उत्स्फूर्तपणे सहभागी झाले. त्यांच्या मागण्या होत्या – शिक्षणात प्रवेश, सरकारी नोकऱ्यांमध्ये आरक्षण, आणि सामाजिक न्यायाची अंमलबजावणी. महाराष्ट्रात ही चळवळ विशेषतः ग्रामीण भागात जोर धरू

लागली. मंडल आयोगाच्या अंमलबजावणीस विरोध करणाऱ्या उच्चवर्णीय आंदोलनांना उत्तर म्हणून, मागासवर्गीय समाजाने स्वतःची हक्काची जागा मागण्यासाठी संघर्ष सुरु केला.

या चळवळीच्या पार्श्वभूमीवर ओबीसी नेत्यांनी मोठी भूमिका बजावली. त्यांनी ओबीसी समाजाला राजकीय आवाज आणि नेतृत्व दिले. त्यामुळे ओबीसी समाजाची राजकीय, सामाजिक आणि शैक्षणिक जाणीव वाढली. या आंदोलनामुळे ओबीसी समाजातील अनेकांना शैक्षणिक संधी आणि नोकऱ्यांमध्ये प्रवेश मिळू लागला. ही चळवळ फक्त आरक्षणासाठी नव्हती, तर सामाजिक न्याय, सन्मान, आणि स्वाभिमानासाठीचा लढा होती.

**४. भटक्या–विमुक्त जमातींच्या चळवळी** (NT-DNT) **:**

महाराष्ट्रात भटक्या आणि विमुक्त जमाती म्हणजेच NT-DNT समाज अनेक वर्षांपासून सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिकदृष्ट्या अत्यंत मागास राहिला आहे. ब्रिटिश काळात या जमातींना गुन्हेगार जमाती म्हणून घोषित करण्यात आले होते, आणि त्यांना नजरकैदेत ठेवण्यात आले. स्वातंत्र्यानंतरही त्यांच्यावरचा संशय कायम राहिला.

या समाजाच्या हक्कांसाठी अनेक चळवळी उभ्या राहिल्या. त्यामध्ये स्वतंत्र ओळख, पुनर्वसन, आरक्षण, आणि शिक्षणाच्या संधी मिळाव्यात, यासाठी सातत्याने संघर्ष करण्यात आला. लक्ष्मण गायकवाड, सुधीर ढवळे यांसारख्या लेखकांनी या समाजाच्या वेदना साहित्याच्या माध्यमातून समाजासमोर मांडल्या. अनेक सामाजिक कार्यकर्त्यांनी शासनाकडे यासाठी मागण्या मांडल्या. या संघर्षातून काही मागण्या मान्यही झाल्या, मात्र भटक्या–विमुक्तांचा संघर्ष अजूनही पूर्ण झालेला नाही. सामाजिक समावेशकतेसाठी हा लढा आजही सुरू आहे.

**५. बहुजन चळवळ :**

बहुजन चळवळ ही अनुसूचित जाती, जमाती, ओबीसी, भटक्या–विमुक्त जमाती, मुस्लिम–दलित अशा समाजघटकांची एकत्रित सामाजिक आणि राजकीय शक्ती उभी करण्याचा प्रयत्न होता. बहुजन या संकल्पनेतून उपेक्षित, शोषित, आणि दुर्लक्षित वर्गांचा एकत्रित आवाज निर्माण करण्याचा उद्देश होता. या चळवळीला कांशीराम, वामनराव गायकवाड, प्रकाश आंबेडकर, शरद पाटील यांसारख्या नेत्यांनी दिशा दिली. त्यांनी बहुजन समाजाच्या हक्कांसाठी लढा उभारला. ही चळवळ फक्त जातिव्यवस्थेविरोधातच नव्हती, तर राजकीय प्रतिनिधित्व, सामाजिक न्याय आणि आर्थिक समानता यांसाठीही होती.

B-MCEF, RPI, बहुजन महासंघ, दलित पँथर यांसारख्या संघटनांनी या चळवळीला संघटित रूप दिले. 'बहुजन हिताय, बहुजन सुखाय' या तत्त्वावर ही चळवळ उभी राहिली आणि बहुजन समाजाच्या स्वाभिमानाला नवे बळ दिले.

या चळवळींनी महाराष्ट्रातील मागासवर्गीय समाजाला आत्मभान, स्वाभिमान, आणि राजकीय ओळख दिली. समाजातील असमानतेविरोधात त्यांनी लढा दिला आणि पुढील पिढ्यांसाठी नव्या संधी उभारल्या. या चळवळी केवळ इतिहासाचा भाग नसून आजही प्रेरणास्थान आहेत.

**५. आरक्षण व शैक्षणिक सबलीकरण :**

भारतीय समाजातील ऐतिहासिक अन्याय, जातीय विषमता आणि सामाजिक दुय्यमतेमुळे मागासवर्गीय समाज शिक्षणापासून वंचित राहिला होता. ही सामाजिक असमानता दूर करण्यासाठी भारतीय राज्यघटनेत आरक्षणाची तरतूद करण्यात आली. पण त्याची प्रभावी अंमलबजावणी १९९० मध्ये मंडल आयोगाच्या शिफारशींनंतर झाली.

मंडल आयोग, जो १९८० मध्ये स्थापित झाला, त्याने ओबीसी (Other Backward Classes) समाजासाठी शिक्षण व सरकारी नोकऱ्यांमध्ये २७% आरक्षण द्यावे, अशी शिफारस केली. ही अंमलबजावणी तत्कालीन पंतप्रधान व्ही. पी. सिंग यांच्या सरकारने १९९० मध्ये केली. यामुळे मागासवर्गीय समाजात एक नवा आत्मविश्वास निर्माण झाला. या आरक्षणामुळे शाळा, कॉलेज, तांत्रिक शिक्षण संस्था, वसतिगृहे यामध्ये मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर वाढले. शिक्षण ही आता वंचित समाजासाठी एक हक्काची गोष्ट बनली. ग्रामीण भागातील गरिब, ओबीसी, दलित आणि भटक्या-विमुक्त जमातींच्या मुलामुलींना शिक्षणाच्या संधी मिळू लागल्या. विद्यार्थी वसतिगृहे, शिष्यवृत्ती योजना, आणि मोफत शिक्षण यामुळे आर्थिक अडचणी असूनही अनेकजण शिक्षण घेऊ लागले.

शिक्षणाच्या वाढत्या प्रसारामुळे मागासवर्गीय समाजात नवे नेतृत्व तयार होऊ लागले. या शिक्षित युवकांनी सामाजिक चळवळींमध्ये सक्रिय भाग घेतला. त्यांनी स्वतःचे विद्यार्थी संघटन निर्माण केली, जसे की B-MCEF, विद्यार्थी पँथर, आणि विविध ओबीसी युवक संघटना. या संघटनांनी सामाजिक न्याय, समान संधी, आणि शिक्षणातील अडथळ्यांविरोधात लढा उभारला.

शैक्षणिक सबलीकरणामुळे केवळ नोकरीच नाही, तर मागासवर्गीय समाजात वैचारिक जागृती, आत्मभान, आणि स्वाभिमान निर्माण झाला. अनेक तरुणांनी लेखक, पत्रकार, वकील, डॉक्टर, अभियंते, आणि प्रशासकीय अधिकारी म्हणून नवा आयाम गाठला. शिक्षण ही सामाजिक परिवर्तनाची शक्ती ठरली. शेवटी, आरक्षण ही केवळ सवलत नसून समान संधी निर्माण करणारी घटना ठरली. त्याद्वारे मागासवर्गीय समाजाला न्याय, प्रतिष्ठा, आणि सक्षमीकरणाचा मार्ग खुला झाला. हे परिवर्तन केवळ व्यक्तीपुरते न राहता संपूर्ण समाजाच्या उन्नतीसाठी उपयुक्त ठरले. त्यामुळेच आरक्षण व शिक्षण ही सामाजिक परिवर्तनाची दोन महत्त्वाची साधने ठरली आहेत.

**६. सामाजिक-सांस्कृतिक आत्मभान :**

१९७० नंतर महाराष्ट्रात दलित आणि बहुजन समाजात सामाजिक-सांस्कृतिक आत्मभान विकसित होऊ लागले. यामागे शिक्षण, चळवळी, आणि आंबेडकरी विचारांचे मोठे योगदान होते. विशेषतः दलित व बहुजन साहित्याने या आत्मभानाला दिशा दिली.

दलित साहित्य हे केवळ साहित्यिक प्रयोग नव्हते, तर ते सामाजिक वास्तवाचे, दुःखाचे आणि अन्यायाच्या विरुद्ध आवाज उठवणारे साहित्य होते. नामदेव ढसाळ, शरणकुमार लिंबाळे, लक्ष्मण गायकवाड, बाबुराव बागुल यांसारख्या लेखकांनी आपापल्या कवितांमधून, आत्मचरित्रांमधून आणि कथांमधून दलित जीवनाचे सत्य मांडले. या साहित्यातून दुःख, असहायता, संघर्ष आणि स्वाभिमान प्रकट झाला.

बहुजन साहित्य देखील फुले-शाहू-आंबेडकर यांच्या विचारांवर आधारित होतं. या साहित्यातून बहुजन समाजाच्या स्वाभिमानाचा, ऐतिहासिक योगदानाचा आणि संघर्षाचा गौरव करण्यात आला. यामुळे बहुजन वर्गाला आपली वेगळी ओळख आणि सामाजिक स्थान मिळू लागले.

या चळवळीचा एक महत्त्वाचा भाग म्हणजे फुले, शाहू, आंबेडकर यांचे जयंती उत्सव, व्याख्याने, प्रभातफेऱ्या, आणि सामाजिक कार्यक्रम. हे उत्सव म्हणजे इतिहासाची उजळणी आणि सामाजिक आत्मभानाचा सण ठरले.

कविता, नाटकं, पथनाट्यं, लोककला, भिमगीतं यांद्वारे सामाजिक अन्यायाविरुद्ध आवाज उठवला गेला. विद्रोही साहित्य, भिमगीतं, आणि लोकनाट्य हे माध्यम बहुजन आत्मभानाचे प्रभावी साधन झाले. या सगळ्या उपक्रमांमुळे दलित व बहुजन समाजात आत्मसन्मान, जागरूकता आणि संघटनाची भावना वाढीस लागली, आणि सांस्कृतिक स्तरावरही एक नवा परिवर्तनाचा काळ सुरू झाला.

**८. नव्याने समोर आलेल्या समस्या :**

मागासवर्गीय आणि बहुजन समाजाने गेल्या काही दशकांत अनेक सामाजिक व शैक्षणिक प्रगती साधली असली, तरीही त्यांना अजूनही अनेक समस्या सतावत आहेत. या समस्यांपैकी काही आजही अत्यंत गंभीर स्वरूपाच्या आहेत. सर्वात महत्त्वाची समस्या म्हणजे जातीय अत्याचार. शिक्षण आणि कायदे असूनही ग्रामीण भागात अजूनही दलितांवर अत्याचार होतात. याचे ठळक उदाहरण म्हणजे खैरलांजी प्रकरण (२००६). महाराष्ट्रातील भंडारा जिल्ह्यातील खैरलांजी गावात चार दलित सदस्यांची निर्घृण हत्या झाली. या घटनेने राज्यात आणि देशात मोठा संताप उसळला. ही घटना दाखवते की जातीय विषमता अजूनही किती खोलवर आहे.

दुसरी महत्त्वाची समस्या म्हणजे, शिक्षण मिळूनही आर्थिक सशक्तता न मिळणे. दलित, ओबीसी, आणि भटक्या-विमुक्त समाजातील अनेक युवक शिक्षण घेतात, पदवीधर होतात, पण त्यांना दर्जेदार नोकऱ्या मिळत नाहीत. व्यवसाय सुरू करण्यासाठी भांडवलाची, सल्लागार यंत्रणांची आणि सामाजिक नेटवर्कची कमतरता जाणवते. त्यामुळे त्यांचे आर्थिक स्थिती सुधारत नाही.

तिसरी समस्या म्हणजे, सामाजिक भेदभाव अजूनही ग्रामीण आणि शहरी भागात दिसतोच. ग्रामीण भागात अजूनही दलित वस्ती वेगळी असते, विहिरी, मंदिरे, शाळांमध्ये अघोषित भेदभाव असतो. शहरी भागातही घरभाड्याच्या व्यवहारात, नोकरीच्या संधींमध्ये, किंवा सामाजिक वर्तुळात दलित व मागासवर्गीयांना अदृश्य भिंतींना सामोरे जावे लागते.

या समस्यांवर मात करण्यासाठी केवळ कायदे नव्हे, तर सामाजिक जाणीव, समतेचे शिक्षण, आणि सर्वसमावेशक धोरणांची गरज आहे. समाज परिवर्तनासाठी ही लढाई अजूनही अपूर्ण आहे.

**१०. समारोप :**

महाराष्ट्रातील मागासवर्गीय चळवळीने सामाजिक परिवर्तनाचा एक महत्त्वाचा प्रवास घडवून आणला आहे. फुले, शाहू, आंबेडकर यांच्यापासून सुरू झालेली ही चळवळ दलित, ओबीसी, भटक्या-विमुक्त

समाजातील लोकांसाठी जागरूकता, स्वाभिमान आणि हक्क मिळवून देणारी ठरली. शिक्षण, आरक्षण, आणि संविधानिक अधिकारांमुळे अनेकांनी समाजात आपले स्थान निर्माण केले.

दलित पँथर, बहुजन चळवळ, नामांतर आंदोलन, मंडल आयोगाच्या अंमलबजावणीसारख्या संघर्षांनी मागासवर्गीय समाजाचा आवाज राजकीय आणि सामाजिक पातळीवर ऐकू येऊ लागला. या चळवळींमुळे मागास घटकांची ओळख, संघटन, आणि सशक्तीकरण यामध्ये मोठी वाढ झाली.

पण तरीही सामाजिक न्यायाची प्राप्ती पूर्णपणे झालेली नाही. आजही जातीय अत्याचार, भेदभाव, आर्थिक विषमता, आणि सामाजिक बहिष्कार यासारख्या समस्या कायम आहेत. शिक्षणाने भलेही काहीजण पुढे आले असतील, पण बहुतांश मागासवर्गीय जनता अजूनही आर्थिकदृष्ट्या दुर्बल आहे. त्यामुळे सामाजिक न्यायाचे अंतिम उद्दिष्ट अजून गाठायचे बाकी आहे.

आगामी काळात या चळवळीने एकता, समावेशक राजकारण आणि आर्थिक सबलीकरण यावर भर द्यायला हवा. दलित, ओबीसी, आणि इतर वंचित घटकांनी एकत्र येऊन आपले प्रश्न सामूहिकपणे मांडले पाहिजेत. शिक्षण, उद्योजकता, तंत्रज्ञान आणि नव्या संधींचा वापर करून समाजाने स्वतःला सक्षम बनवले पाहिजे.

समाजाच्या सर्व स्तरांमध्ये समानतेची भावना निर्माण करणे, हेच या चळवळीचे अंतिम ध्येय आहे, आणि ते पूर्णत्वास नेण्यासाठी संघर्ष अजून सुरू आहे.

**स्वयं अध्ययन प्रश्न – २ :**

**अ) योग्य पर्याय निवडा.**

१. महाराष्ट्रात दलित पँथर चळवळीची स्थापना ..... झाली.

अ) १९६० ब) १९७२

क) १९८० ड) १९९०

२. महाराष्ट्रातील बहुजन चळवळीचा मूलमंत्र ..... होता.

अ) समाजवादाचे पुनरुज्जीवन ब) स्वराज्य व सुराज्य

क) बहुजन हिताय, बहुजन सुखाय ड) शेतकरी आणि कामगार एकत्र

३. मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतरासाठी ..... आंदोलन प्रसिद्ध होते.

अ) मंडल आयोग आंदोलन ब) दलित पँथर आंदोलन

क) बहुजन चळवळ ड) नामांतर आंदोलन

४. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी ..... धर्मांतर्गत प्रवेश करून सांस्कृतिक मुक्तीचा मार्ग निवडला.

अ) इस्लाम ब) ख्रिश्चन धर्म

क) बौद्ध धर्म ड) जैन धर्म

५. खैरलांजी प्रकरण ..... प्रकारच्या समस्येशी संबंधित होते.

अ) शैक्षणिक समस्या ब) सामाजिक उत्सव

क) जातीय अत्याचार ड) राजकीय निवडणूक

### ३.२.३ अंधश्रद्धा निर्मुलन :

भारताच्या ऐतिहासिक व सांस्कृतिक परंपरेत संत आणि समाजसुधारक यांचे कार्य अत्यंत महत्त्वपूर्ण ठरले आहे. संत समाजसुधारकांद्वारे केल्या गेलेल्या कार्याने भारतीय समाजाच्या मानसिकतेला एक नवा आयाम दिला आहे. यामध्ये संत तुकाराम, संत ज्ञानेश्वर, संत एकनाथ, तसेच महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, लोकशाहीर अण्णा भाऊ साठे आणि इतर अनेक समाजसुधारकांचा उल्लेख करता येईल. या संतांचा आणि सुधारकांचा मुख्य उद्देश समाजातील विविध कुप्रवृत्तींविरोधात आवाज उठवणे, अंधश्रद्धा निर्मूलन करणे आणि शोषित व वंचित घटकांसाठी समाजातील असमानतेला विरोध करणे होता.

संत तुकाराम आणि संत एकनाथ यांसारख्या संतांनी त्यांच्या अभंगांतून समाजातील असमानता, जातीव्यवस्था आणि अंधश्रद्धेविरुद्ध आवाज उठवला. त्यांचा संदेश धार्मिक पंथ, रंग, जाती आणि लिंग यांच्या भेदभावाचा निषेध करणारा होता. याच मार्गावर जातीयतेचे, असंवेदनशीलतेचे आणि अंधश्रद्धेचे विरोध करणारे सुधारक पुढे आले. महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली भारताने अंधश्रद्धेविरुद्ध व्यापक चळवळ राबवली, ज्यात 'नम्रतेचे सत्य' व 'सत्याग्रह' यांचा आधार घेत समाजातील असमानतेचे आणि अंधश्रद्धेचे निर्मूलन करण्याचा प्रयत्न केला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समाजातील अस्पृश्यतेविरोधी चळवळीला दिशा दिली. त्यांनी भारतीय समाजाच्या जडलेल्या रूढी आणि अंधश्रद्धांचा प्रतिवाद करत 'जातीव्यवस्था'च्या विरोधात आवाज उठवला. अशा पद्धतीने संत आणि समाजसुधारकांनी विविध पिढ्यांमध्ये समाजाच्या मानसिकतेला बदलण्यासाठी आपली भूमिका स्पष्ट केली.

आजच्या विज्ञान-आधारित युगात अंधश्रद्धा, छद्मविज्ञान आणि अज्ञेयवाद यांच्या वाढत्या प्रभावामुळे समाजात अनेक प्रकारच्या समस्यांना तोंड द्यावे लागले आहे. विशेषतः, भारतासारख्या विविधतेने नटलेल्या देशात विविध धार्मिक आणि सांस्कृतिक परंपरांचे पालन करत असताना, या अंधश्रद्धांचे अस्तित्व अधिक प्रबळ झाले आहे. यामध्ये विज्ञानाची उपेक्षा करणे आणि अंधविश्वासांच्या आधारावर समाजाचे मार्गदर्शन करणे हे गंभीर धोके निर्माण करीत आहे. समाजाच्या भल्या-बुऱ्या काळात अंधश्रद्धा आणि गैरसमज पसरविणारे अनेक गट समाजात आपली छाप सोडत आहेत, ज्यामुळे व्यक्तिमत्व विकास आणि सामाजिक प्रगती अडथळ्यांत सापडतात.

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती (मअंनिस) एक अशाच चळवळीचा भाग आहे जी अंधश्रद्धा, फसवणूक आणि छद्मविज्ञानाच्या विरोधात कार्यरत आहे. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती (मअंनिस) ही एक वैज्ञानिक दृष्टिकोन आणि विवेकवाद यांना प्रोत्साहन देणारी अग्रगण्य संघटना आहे. या संस्थेची स्थापना डॉ. नरेंद्र दाभोलकर यांनी १९८९ मध्ये केली. त्यांनी विज्ञाननिष्ठ विचार, मानवता, आणि अंधश्रद्धेविरुद्ध समाजात

जागृती निर्माण करण्यासाठी आपले संपूर्ण जीवन समर्पित केले. याची स्थापना केवळ महाराष्ट्रातच नव्हे, तर संपूर्ण भारतात समाजाच्या भल्यासाठी कार्य करण्याच्या हेतूने झाली. समितीने विविध मोहिमा राबवून अंधश्रद्धा निर्मूलनाच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. त्याचा उद्देश फक्त समाजातील अंधश्रद्धेला दूर करणे नाही, तर विज्ञान व तर्कशुद्ध विचारांची जाणीव निर्माण करून प्रत्येक नागरिकाच्या जीवनाला प्रकाश देणे हा आहे.

### ३.२.३.१ जादूटोणाविरोधी कायद्याची चळवळ :

महाराष्ट्रातील अंधश्रद्धांविरोधातील लढ्याचे प्रभावी नेतृत्व महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती (मंअंनिस) ही संस्था करत आहे. जादूटोणा, तंत्रमंत्र, भुत-खेत, करणी, अंगात येणे, नरबळी, चेटूक, भानामती यासारख्या अंधश्रद्धा समाजात खोलवर रुजलेल्या होत्या. या अंधश्रद्धांमुळे महिलांवर, गरीब आणि अशिक्षित लोकांवर शारीरिक, मानसिक व आर्थिक अत्याचार होतो. या पार्श्वभूमीवर मंअंनिसने अशा अमानवी कृत्यांना रोखण्यासाठी विशेष कायदा असावा यासाठी दीर्घकाळ संघर्ष केला.

महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानवी कृत्यांना प्रतिबंध करणारा व त्यास संबंधित अंधश्रद्धा निर्मूलन व मानवहक्क संरक्षण अधिनियम २०१३ हा कायदा तयार होण्यासाठी तब्बल १८ वर्षांचा कालावधी लागला. मंअंनिसचे संस्थापक डॉ. नरेंद्र दाभोलकर यांनी हा कायद्या तयार करण्यासाठी सातत्याने सरकारवर दबाव टाकला. त्यांनी विविध ठिकाणी व्याख्यानं, आंदोलने, जनजागृती मोहीमा राबवून समाजात वैज्ञानिक दृष्टिकोन जागवण्याचा प्रयत्न केला.

२० ऑगस्ट २०१३ रोजी नरेंद्र दाभोलकर यांची हत्या झाली. समाजात संतापाची लाट उसळली. परिणामी अवघ्या ११ दिवसांत, म्हणजेच ३१ ऑगस्ट २०१३ रोजी, या कायद्याचा अध्यादेश काढण्यात आला आणि त्यानंतर तो विधिमंडळात मंजूर होऊन कायद्यात रूपांतरित झाला.

या कायद्यामुळे बुवाबाजी करणारे, तांत्रिक, ढोंगी बाबा, अंधश्रद्धांचा लाभ घेणारे भोंदूबाबा यांच्यावर पोलीस आणि प्रशासनाच्या साहाय्याने कायदेशीर कारवाई शक्य झाली. ज्या प्रकारचे अत्याचार याआधी अबाधित होते, त्यावर नियंत्रण आणले गेले. अंनिसच्या कार्यकर्त्यांनी या कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी महत्त्वाचे योगदान दिले. समाजात कायद्याविषयी जनजागृती निर्माण करण्यासाठी कार्यशाळा, शिबिरे, चर्चासत्रं, रॅली आणि संवादपर कार्यक्रम घेतले जातात. हा कायदा वैज्ञानिक दृष्टिकोनाला पाठबळ देणारा, मानवी हक्कांचं संरक्षण करणारा आणि विवेकवादी समाजनिर्मितीकडे वाटचाल करणारा ऐतिहासिक टप्पा ठरतो.

### ३.२.३.२ प्रदूषणमुक्त दिवाळी अभियान :

आजच्या आधुनिक काळात प्रदूषण हे एक अत्यंत गंभीर सामाजिक आणि पर्यावरणीय संकट बनले आहे. यामध्ये विशेषतः ध्वनीप्रदूषण आणि वायुप्रदूषण हे महत्त्वाचे मुद्दे आहेत. दिवाळीच्या सणात मोठ्या प्रमाणावर फटाके फोडले जातात, ज्यामुळे वातावरणात धूर, रसायनांचे कण, ध्वनी यांचे प्रमाण प्रचंड वाढते. याचा आरोग्य, पर्यावरण आणि समाजावर मोठा दुष्परिणाम होतो. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती (मअंनिस) ही संस्था दरवर्षी प्रदूषणमुक्त आणि ध्वनीप्रदूषणमुक्त दिवाळी या उपक्रमाद्वारे जनजागृती करत आहे.

या अभियानाचा उद्देश म्हणजे फटाके न वाजवता पर्यावरणस्नेही आणि शांत दिवाळी साजरी करणे. फटाक्यांमुळे होणारे अपघात, लहान मुलांवर होणारे दुष्परिणाम, वृद्ध आणि आजारी लोकांना निर्माण होणारा त्रास, तसेच प्राणी-पक्ष्यांच्या संवेदनशील आरोग्यावर होणारे परिणाम याबाबत जनतेला जागरूक करणे हे या मोहिमेचे मुख्य ध्येय आहे.

मंअंनिस या उपक्रमांतर्गत विविध शाळांमध्ये प्रबोधनपर व्याख्याने घेतात. विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाची जाण निर्माण व्हावी. यासाठी चित्रकला स्पर्धा, निबंध स्पर्धा, हस्ताक्षर स्पर्धा घेतल्या जातात. अनेक शाळांमध्ये आणि महाविद्यालयांमध्ये रॅली काढून फटाके मुक्त दिवाळी या संदेशाचा प्रचार केला जातो. समाज माध्यमांवर (सोशल मिडिया) या अभियानासाठी विशेष मोहीम राबवली जाते. विविध मराठी-इंग्रजी पोस्टर्स, व्हिडिओ क्लिप्स, लघुपट यांच्या माध्यमातून जनमानसात संवेदनशीलता वाढवली जाते.

या उपक्रमामुळे अनेक ठिकाणी फटाके न वाजवता दिवाळी साजरी करण्याची चळवळ निर्माण झाली आहे. पर्यावरणाची काळजी घेणारी, शांत, आरोग्यदायी आणि विवेकशील दिवाळी साजरी करण्यासाठी हा उपक्रम मोठे योगदान देत आहे. लहानांपासून मोठ्यांपर्यंत प्रत्येकाला पर्यावरणसंवेदनशील बनवण्याचा हा प्रयत्न समाजहितासाठी महत्त्वाचा ठरतो.

### ३.२.३.३ बुवाबाजीविरोधी अभियान :

भारतीय समाजात अनेक दशकांपासून अंधश्रद्धा बळावण्यामागे ढोंगी बाबा, तथाकथित धर्मगुरू यांचा मोठा वाटा आहे. हे बुवाबाजी करणारे लोक स्वतःला देवदूत, अवतार, सिद्धपुरुष किंवा चमत्कारी शक्ती असलेले म्हणून सादर करतात. ते सामान्य लोकांची श्रद्धा, भीती आणि अज्ञानाचा फायदा घेतात. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती (मंअंनिस) या बुवाबाजीविरोधात गेली अनेक वर्षे प्रभावी अभियान राबवत आहे.

या अभियानाचा उद्देश समाजातील अशा ढोंग्यांच्या मुखवट्यांचा भांडाफोड करून लोकांमध्ये विवेक निर्माण करणे हा आहे. हे ढोंगी बाबा अनेक वेळा स्त्रियांचे लैंगिक शोषण, भक्तांची आर्थिक फसवणूक, मानसिक गुलामगिरी, अघोरी विधी, भोंदू उपचार यासाठी जबाबदार असतात. अशा घटनांमध्ये मंअंनिसचे कार्यकर्ते पीडितांची मदत करतात, पोलिसांत तक्रारी करतात आणि कायदेशीर लढा देऊन अनेक बुवांना तुरुंगात पाठवण्यात यश मिळवतात.

या अभियानांतर्गत मंअंनिसने विविध ठिकाणी बुवांचे तथाकथित चमत्कार, उदाहरणार्थ नारळातून रक्त काढणे, हवेत उडणे, विस्तवातून चालणे इत्यादी प्रयोग प्रत्यक्ष सादर करून वैज्ञानिक पद्धतीने खंडन केले आहे. कार्यकर्ते शाळा, महाविद्यालये आणि गावपातळीवर जाऊन अशा भोंदूबाबांच्या फसव्या दाव्यांमागील विज्ञान समजावून सांगतात.

मंअंनिसने समाजमाध्यमांचा उपयोग करून ढोंग्यांच्या व्हिडिओ क्लिप्स, त्यांच्या विरोधातील पुरावे, फसवणुकीची प्रकरणे समाजापर्यंत पोहोचवली आहेत. प्रसंगी मीडियाच्या सहाय्याने खुल्या चर्चासत्रांतून या बुवांचा पर्दाफाश करण्यात आला.

या मोहिमेमुळे समाजातील अनेक स्त्री-पुरुष बुवांच्या मानसिक, सामाजिक आणि आर्थिक शोषणातून

मुक्त झाले आहेत. अंधश्रद्धा कमी होण्यास मदत झाली असून विवेकाधिष्ठित विचार करण्याची सवय विकसित झाली आहे. ही चळवळ म्हणजे विवेकवादी समाजनिर्मितीच्या दिशेने टाकलेले ठोस पाऊल आहे.

### ३.२.३.४ छद्मविज्ञानविरोधी अभियान :

आजचे युग विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या झपाट्याने होणाऱ्या प्रगतीचे असले तरी समाजात अजूनही अनेक छद्मवैज्ञानिक म्हणजेच बनावट विज्ञानाचे दावे मोठ्या प्रमाणावर केले जातात. यामध्ये चुंबकीय पट्ट्यांनी रोग बरे होणे, पिरॅमिड शक्तीने अन्न टिकून राहणे, ऊर्जा उपचारांद्वारे आजार बरे होणे, वास्तुशास्त्रातील अदृश्य ऊर्जा, सायकोट्रॉनिक्स, रेकी, नाडीशास्त्र यांसारख्या अनेक गोष्टींचा समावेश होतो. हे सगळे दावे विज्ञानाच्या नावाखाली केले जातात, पण त्यामागे कोणतेही वैज्ञानिक संशोधन किंवा वैध पुरावे नसतात.

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती (मंअंनिस) ने अशा छद्मविज्ञानाविरोधात जागरूकता निर्माण करण्यासाठी विशेष अभियान सुरू केले. या मोहिमेंतर्गत समितीने विविध व्याख्याने, कार्यशाळा, विज्ञानप्रदर्शन आणि लेखमालिका यांच्या माध्यमातून समाजाला सांगितले की अशा गोष्टींना वैज्ञानिक आधार नाही. उलट या बनावट उपचारांवर विश्वास ठेवून अनेक लोक औपचारिक वैद्यकीय उपचार घेण्यापासून दूर राहतात आणि त्यामुळे त्यांचे आरोग्य धोक्यात येते. विशेषतः कॅन्सर, मधुमेह, उच्च रक्तदाब, मानसिक आजार अशा गंभीर आजारांवर छद्म उपाय करून लोकांना जीव गमवावा लागलेला आहे.

मअंनिसचे कार्यकर्ते अशा दाव्यांचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिकांद्वारे खंडन करतात. विज्ञाननिष्ठ दृष्टिकोनातून उलगडा करून दाखवतात की अशा गोष्टी केवळ मनाचा भ्रम, अर्धवट माहिती आणि व्यावसायिक फसवणुकीवर आधारित आहेत.

या अभियानामुळे समाजात छद्मविज्ञानाविषयी प्रश्न विचारण्याची, तपासणी करण्याची आणि वैज्ञानिक निकष लावण्याची प्रवृत्ती वाढली आहे. लोक अंधविश्वासाऐवजी वैज्ञानिक दृष्टिकोन अंगीकारू लागले आहेत. हे अभियान म्हणजे विज्ञानावर आधारित विवेकवादी समाज निर्माण करण्याच्या दिशेने टाकलेले एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे.

### ३.२.३.५ फलज्योतिष, वास्तुशास्त्रविरोधी मोहिमा :

भारतीय समाजात जन्मकुंडली, ग्रहदशा, रत्नधारण, वास्तुदोष अशा गोष्टींना मोठे महत्त्व दिले जाते. विवाह, व्यवसाय, शिक्षण, घरबांधणी, गृहप्रवेश, नवस, नामकरण अशा अनेक निर्णयांसाठी फलज्योतिष आणि वास्तुशास्त्राचा आधार घेतला जातो. या गोष्टी विज्ञानाच्या कसोटीवर खरी ठरत नसतानाही त्यावर समाजाचा मोठा वर्ग विश्वास ठेवतो. अशा अवैज्ञानिक आणि अंधश्रद्धा वाढवणाऱ्या प्रथा थांबवण्यासाठी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती (मंअंनिस) ने 'फलज्योतिष व वास्तुशास्त्रविरोधी मोहिमा' राबवल्या.

या अभियानांतर्गत मंअंनिसने विविध व्याख्याने, चर्चासत्रे, कार्यशाळा, लेखमालिका आणि जनजागृतीपर कार्यक्रम घेतले. त्यांनी हे स्पष्ट केले की मानवी जीवन हे ग्रह, नक्षत्रं किंवा जन्मवेळेवर आधारित नसते, तर व्यक्तीच्या कृती, विचार, शिक्षण, परिश्रम आणि सामाजिक परिस्थितींवर अवलंबून असते. जन्मकुंडली किंवा ग्रहदशा पाहून भविष्य सांगणं हे वैज्ञानिक न राहता केवळ अंदाज किंवा अंधश्रद्धा आहे.

त्याचप्रमाणे वास्तुशास्त्राच्या नावाखाली मोठ्या प्रमाणावर आर्थिक फसवणूक होते. घरातील खोलींची

दिशा, दरवाज्यांचा कोन, देवघराची जागा, पाण्याचा नळ यावरून वास्तुदोष सांगून हजारो रुपये खर्च करवले जातात. यामुळे अनेक गरजू कुटुंबांना मानसिक त्रास आणि आर्थिक नुकसान सहन करावे लागते. चुकीच्या वास्तुशास्त्रीय सल्ल्यांमुळे काही वेळा घराचे आराखडे बिघडतात, नैसर्गिक वाऱ्याचे किंवा प्रकाशाचे नियोजन अयोग्य होते आणि वास्तू अधिक अपायकारक ठरते.

मंअंनिसने यावर वैज्ञानिक दृष्टिकोनातून भाष्य करत लोकांना जागृत केले. त्यांनी समाजात एक विचारप्रवृत्ती निर्माण केली की आपले भविष्य आपणच घडवतो – ते ग्रह, रत्न किंवा दिशांवर अवलंबून नसते. ही मोहिम समाजाला विवेक, विज्ञान आणि तार्किकतेकडे वळवण्याच्या दृष्टीने महत्त्वाची ठरली आहे.

### ३.२.३.६ चमत्कारांचे सादरीकरण :

भारतीय समाजात अनेक वेळा सामान्य घटनांनाही चमत्काराचा रंग दिला जातो. हातातून आग येणे, देवाच्या मूर्तीला दूध पाजणे, हवेतून वस्तू काढणे, भोंदू बाबांकडून अंगात येणे किंवा चमत्कारी उपचार केल्याचा दावा – या सर्व गोष्टींना अनेक जण श्रद्धेने आणि भीतीने स्वीकारतात. अशा प्रकारच्या अंधश्रद्धा आणि गैरसमज दूर करण्यासाठी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती (मंअंनिस) अनेक वर्षांपासून 'चमत्कारांचे भांडाफोड' अभियान राबवत आहे.

या उपक्रमांतर्गत मंअंनिसचे कार्यकर्ते गावागावात, शाळांमध्ये, सार्वजनिक सभा, जत्रा, यात्रा, धार्मिक स्थळे, उत्सव आदी ठिकाणी जाऊन अशा चमत्कारांची सत्यता वैज्ञानिक दृष्टिकोनातून उघड करतात. उदाहरणार्थ – हातातून आग येणे हे केवळ केमिकलचा वापर असतो; देवाला दूध पाजणे हे केवळ सायफोन क्रिया (capillary action) असते; हवेतून वस्तू उडवणे हे दोऱ्यांचा किंवा चुंबकांचा खेळ असतो. हे सर्व प्रयोग मंचावर प्रत्यक्ष करून दाखवले जातात, आणि त्यामागचं विज्ञानही समजावून सांगितलं जातं.

या प्रयोगांमुळे प्रेक्षकांमध्ये वैज्ञानिक जाणिवा विकसित होतात. विशेषतः ग्रामीण भागात आणि लहान वयोगटातील विद्यार्थ्यांमध्ये या कार्यक्रमांना चांगला प्रतिसाद मिळतो. हे प्रयोग केवळ करमणुकीसाठी नसून शिक्षणासाठी असतात – त्यामुळे भीती, चमत्कार यावर विश्वास ठेवण्याऐवजी 'काय, का, कसे' असा वैज्ञानिक प्रश्न विचारण्याची सवय लागते.

धार्मिक भावनांचा अपमान न करता, केवळ अंधश्रद्धेचा पर्दाफाश करणे हा मंअंनिसच्या या कार्यक्रमाचा मुख्य हेतू आहे. अनेक वेळा भोंदू बाबांकडून होणारी फसवणूक थांबवण्यासाठी हे प्रयोग प्रभावी ठरतात. या अभियानामुळे लोकांमध्ये आत्मविश्वास निर्माण होतो आणि प्रत्येक घटनेला वैज्ञानिक दृष्टिकोनातून पाहण्याची वृत्ती विकसित होते.

### ३.२.३.७ सण आणि परंपरांवरील वैज्ञानिक दृष्टिकोन :

#### १. सणांचा सामाजिक आणि सांस्कृतिक हेतू :

भारतीय समाजात सण आणि परंपरा केवळ धार्मिक विधी नसून सामाजिक एकजूट, सांस्कृतिक अभिव्यक्ती आणि सामूहिक आनंदाचे प्रतीक आहेत. परंतु काही प्रथा आजच्या काळात अंधश्रद्धा, पर्यावरणीय नुकसान आणि अपव्यय वाढवणाऱ्या बनल्या आहेत.

**२. मंअंनिसची भूमिका :**

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती (मंअंनिस) ने सणांकडे वैज्ञानिक आणि विवेकाधिष्ठित दृष्टीकोनातून पाहण्याचे आवाहन केले आहे. 'सण साजरे करू या, पण शास्त्रीय पद्धतीने' हा संदेश देत त्यांनी विविध मोहिमा राबवल्या.

**३. पर्यावरणपूरक गणेशोत्सव :**

POP मूर्तींमुळे जलप्रदूषण होते. त्यामुळे शाडू मातीच्या मूर्ती, घरगुती गणपती, आणि सामूहिक विसर्जनास प्रोत्साहन देण्याचे कार्य मंअंनिस करते. यामुळे सणाचे स्वरूप टिकून राहते आणि पर्यावरणही सुरक्षित राहते.

**४. विवेकाधिष्ठित होळी :**

होळीसाठी झाडांची कत्तल आणि पाण्याचा अपव्यय रोखण्यासाठी 'कोरडी होळी', 'होळीची पोळी दान' यांचे आयोजन केले जाते. यामुळे पर्यावरण जागृतीसोबतच विवेकशीलता वाढते.

**५. प्रदूषणमुक्त दिवाळी :**

फटाक्यांमुळे होणारे ध्वनी आणि वायू प्रदूषण, अपघात, आणि प्राण्यांवर होणारे दुष्परिणाम याची जाणीव करून देत शांत, पर्यावरणस्नेही दिवाळीचा संदेश दिला जातो.

**६. इतर सणांवरील मोहिमा :**

१. मकर संक्रांतीस पतंगाच्या मांजामुळे पक्षांचे जीव जातात – यावर जनजागृती

२. श्रावण महिन्यात नद्यांमध्ये प्लास्टिक, फुले न टाकण्याचे आवाहन

३. मानवतावादी दृष्टीकोनातून सण साजरे करण्याचा आग्रह

सर्व उपक्रमांतून मंअंनिसने सणांचे सामाजिक मूल्य टिकवून ठेवताना पर्यावरणपूरक आणि वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित केला आहे. यामुळे परंपरांचे शाश्वतीकरण होते आणि समाज अधिक विवेकशील बनतो.

**३.२.३.८ यात्रांतील अंधश्रद्धा विरोध :**

**१. धार्मिक समारंभातील अंधश्रद्धेचे स्वरूप :**

यात्रा या धार्मिक परंपरांचा हेतू, श्रद्धा, भक्ती आणि सामाजिक ऐक्य वाढवणे असा आहे. मात्र अनेक ठिकाणी या सोहळ्यांत अंधश्रद्धेपुढे झुकलेले, स्वतःला टोचून घेणे, अंगात येणे, अंगावर दगड फोडणे, पेटत्या निखाऱ्यावरून चालणे, रक्त काढणे अशा हानिकारक प्रथा दिसतात. या कृती केवळ धार्मिक उत्साह नसून मानसिक आणि शारीरिक हानी करणाऱ्या अंधश्रद्धा आहेत.

**२. मंअंनिसचा हस्तक्षेप :**

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती (मंअंनिस) ने या अंधश्रद्धांचा तीव्र विरोध करत अनेक ठिकाणी प्रत्यक्ष

यात्रांमध्ये सहभागी होऊन जनतेशी संवाद साधला. त्यांनी हे पटवून दिले की देव भक्तीने प्रसन्न होतो, स्वतःला इजा करून नव्हे.

**३. जनजागृतीचे माध्यम :**

कार्यकर्त्यांनी जिथे अशा घटना घडतात, तिथे थेट उपस्थित राहून संवाद साधला. स्थानिक मंडळांशी चर्चा करून धोकादायक प्रथा थांबवण्यासाठी समज दिली. पत्रके, व्याख्याने, प्रयोग, आणि दृकश्राव्य माध्यमांद्वारे विवेक जागवण्याचे कार्य झाले.

**४. अंधश्रद्धेचा सामाजिक परिणाम :**

अशा कृतींमुळे केवळ व्यक्तिगत इजा होत नाही, तर समस्त समाज अंधश्रद्धेच्या भोवऱ्यात अडकतो. कुटुंबातील इतर सदस्यही भीतीपोटी या प्रथा मान्य करतात. यामुळे आर्थिक, मानसिक आणि सामाजिक नुकसान होते.

**५. समितीचा संदेश :**

वारी आणि यात्रा या श्रद्धेचे, परस्पर प्रेम आणि सामाजिक ऐक्याचे प्रतीक राहाव्यात, अंधश्रद्धेचे नव्हे – हा स्पष्ट आणि ठाम संदेश मंअंनिसकडून देण्यात आला आहे.

या मोहिमेमुळे अनेक यात्रांमध्ये बदल दिसून आले आहेत. अनेक कार्यकर्ते आता या अंधश्रद्धांविरोधात उघडपणे बोलू लागले असून, धार्मिक श्रद्धेला विवेकशीलतेची जोड मिळत आहे.

**३.२.३.८ राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय सहकार्य :**

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती (मअंविस) ने केवळ भारतातच नव्हे, तर आंतरराष्ट्रीय पातळीवरही अंधश्रद्धेविरोधी चळवळीला प्रभावीपणे प्रोत्साहन दिले आहे. समितीने देशभरातील इतर विज्ञानवादी संघटना, समाजशास्त्रज्ञ, आणि विचारवंतांशी संवाद साधला आहे. यामुळे भारतातील वैज्ञानिक चळवळीला एक शक्तिशाली आधार मिळाला आहे आणि देशभरातील लोकांची वैज्ञानिक दृष्टिकोनाची जाणीव वाढवली आहे.

२०१९ मध्ये आयोजित अंधश्रद्धाविरोधी राष्ट्रीय परिषद हे मंअंनिसच्या कार्याचे एक महत्त्वाचे उदाहरण आहे. या परिषदेत विविध राज्यांमधून आलेल्या विज्ञानवादी कार्यकर्त्यांनी आपापले विचार, अनुभव, आणि अंधश्रद्धेविरोधी चळवळीच्या यशस्वी प्रयत्नांची मांडणी केली. या परिषदेमध्ये देशभरातील शास्त्रज्ञ, शिक्षणतज्ञ, आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी एकत्र येऊन अंधश्रद्धेच्या विविध रूपांबद्दल चर्चा केली आणि त्यावर तातडीने उपाय शोधण्याचा निर्धार केला.

याशिवाय, समितीने युनेस्को आणि इतर आंतरराष्ट्रीय संस्थांशी विचारविनिमय केला आहे. युनेस्को सारख्या जागतिक संस्थांशी सहकार्य केल्याने समितीला जागतिक स्तरावर आपले कार्य प्रसार करण्यास मदत मिळाली आहे. यामुळे भारतातील अंधश्रद्धेविरोधी चळवळीला आंतरराष्ट्रीय स्तरावर अधिक मजबूत आधार मिळाला आहे.

या आंतरराष्ट्रीय संमेलनांमुळे विज्ञान, तंत्रज्ञान, आणि अंधश्रद्धेविरोधी जागरूकतेच्या मुद्द्यांवर एक

शक्तिशाली जागतिक नेटवर्क तयार झाले आहे. समितीच्या या प्रयत्नांमुळे भारतातील चळवळीला जागतिक स्तरावर महत्त्व प्राप्त झाले आहे आणि यामुळे ही चळवळ विस्तृत पातळीवर पसरली आहे. यातून, अंधश्रद्धा निर्मूलनाच्या कार्याला नवीन दिशा मिळाली आहे, तसेच हे कार्य आंतरराष्ट्रीय समुदायाच्या पातळीवर अधिक प्रभावी बनले आहे.

या प्रकारच्या सहकार्यामुळे, अंधश्रद्धेविरोधी चळवळ अधिक प्रभावीपणे कार्यरत आहे आणि तिचा परीघ देश आणि विदेशात मोठ्या प्रमाणावर वाढला आहे.

**३.२.३.९ शाळा–महाविद्यालयांतील उपक्रम :**

शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन रुजवण्यासाठी मंअंनिस शाळांमध्ये 'चमत्कारांची भांडाफोड', विज्ञानावर आधारित नाटके, चर्चासत्रे, व्याख्याने, विज्ञान मेळावे, प्रश्नमंजुषा अशा उपक्रमांचे आयोजन करते. विद्यार्थ्यांमध्ये बालवयातच विवेकवादी विचार पेरण्यासाठी विविध प्रयोगदर्शक उपक्रम हाती घेतले जातात. या उपक्रमांमुळे नव्या पिढीमध्ये अंधश्रद्धांविरुद्ध विचार तयार होतो. अनेक वेळा शिक्षकही या कार्यक्रमात सहभाग घेतात आणि शाळेचा परिसर विवेकदर्शी बनतो.

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीने गेल्या तीन दशकांहून अधिक काळ अंधश्रद्धेविरोधात चालवलेल्या कार्यक्रमांद्वारे समाजात विवेक, विज्ञान आणि मानवतेच्या मूल्यांची पायाभरणी केली आहे. मंअंनिसची चळवळ ही केवळ विरोध करण्यापुरती मर्यादित न राहता, ती पर्यायी विवेकाधिष्ठित विचारसरणी निर्माण करणारी चळवळ ठरली आहे. या कार्यक्रमांचे परिणाम दीर्घकालीन असून, त्यातून एक विवेकी, वैज्ञानिक आणि सहिष्णू समाज निर्माण होण्यास मदत होत आहे.

**स्वयं अध्ययन प्रश्न – ३ :**

**अ) योग्य पर्याय निवडा.**

१. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीने ..... कायद्याच्या मागणीसाठी दीर्घकाळ चळवळ केली.

अ) शिक्षणाचा हक्क कायदा ब) अन्न सुरक्षा कायदा

क) जादूटोणा आणि काळी जादू प्रतिबंधक कायदा ड) माहितीचा अधिकार कायदा

२. प्रदूषणमुक्त दिवाळी अभियानाचा मुख्य उद्देश ..... होता.

अ) दिवाळीला धार्मिक महत्त्व देणे ब) लोकांना फटाके विकत घेण्यास उद्युक्त करणे

क) ध्वनी आणि वायू प्रदूषण टाळून पर्यावरणपूरक सण साजरा करणे

ड) दिवाळीची आर्थिक उलाढाल वाढवणे

३. मंअंनिसने बुवाबाजीविरोधात ..... माध्यमातून जनजागृती केली.

अ) मनोरंजनात्मक नाटके आणि जाहीर सभा ब) फक्त लेखांद्वारे

क) सरकारमार्फत शिक्षण योजना ड) मंदिरांमधून लावणी स्पर्धा

४. सण साजरे करताना मंअंनिसने ..... दृष्टिकोन अंगीकारण्याचे आवाहन केले आहे.

अ) पारंपरिक दृष्टिकोन ब) वैज्ञानिक व विवेकाधिष्ठित दृष्टिकोन

क) सामूहिक दृष्टिकोन ड) धार्मिक दृष्टिकोन

५. यात्रांतील अंधश्रद्धांविरोधात मंअंनिसने ..... केले.

अ) यात्रांना बंदी घातली ब) सरकारी मदत मागितली

क) नवीन यात्रा सुरू केल्या ड) सहभागी होऊन संवाद साधून गैरप्रथांना विरोध केला

**३.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ :**

**१. महिला संघटना –** महिलांच्या हक्कांसाठी काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्था किंवा चळवळी.

**२. स्त्रीवादी तत्त्वज्ञान –** महिलांच्या समानतेसाठी असलेली वैचारिक भूमिका व विचारप्रणाली.

**३. स्त्री सशक्तीकरण –** महिलांना सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक व राजकीय दृष्टिकोनातून सक्षम बनवणे

**४. समान वेतन –** पुरुष व महिलांना एकसारख्या कामासाठी समान मोबदला मिळावा, ही मागणी.

**५. मागासवर्ग –** आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक दृष्ट्या वंचित समाजघटक - अनुसूचित जाती, जमाती, OBC, NT-DNT.

**६. दलित पँथर –** १९७२ साली स्थापन झालेली दलित हक्कांसाठी लढणारी संघटना.

**७. नामांतर आंदोलन –** मराठवाडा विद्यापीठाचे 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठ' असे नामकरण करण्यासाठीचा संघर्ष.

**८. बहुजन चळवळ –** बहुसंख्य मागासवर्गीय समाजाच्या राजकीय-सामाजिक ओळखीची चळवळ.

**९. मंडल आयोग –** मागासवर्गीय आरक्षणासाठी स्थापन झालेला आयोग, ज्याच्या शिफारशींवर १९९० मध्ये अंमलबजावणी झाली.

**१०. आरक्षण धोरण –** मागासवर्गीयांसाठी शैक्षणिक व नोकरीत राखीव जागांची तरतूद.

**११. सांस्कृतिक मुक्ती –** जुन्या रूढी-परंपरांपासून मुक्त होऊन नव्या विचारसरणीचा स्वीकार.

**१२. अंधश्रद्धा –** वैज्ञानिक पुरावा नसलेल्या श्रद्धा किंवा समजुती.

**१३. बुवाबाजी –** स्वतःला चमत्कारी किंवा देवदूत म्हणून सादर करणाऱ्या व्यक्तींचे लोकांची फसवणूक करण्याचे प्रकार.

**१४. छद्मविज्ञान –** खोटे शास्त्र म्हणून प्रसिद्ध झालेली प्रणाली जसे की फलज्योतिष, वास्तुशास्त्र इ.

**१५. वैज्ञानिक दृष्टिकोन –** एखाद्या गोष्टीकडे पुराव्यावर आधारित, तर्कशुद्ध पद्धतीने पाहण्याची वृत्ती.

**१६. प्रदूषणमुक्त सण –** पर्यावरणाचे भान ठेवून सण साजरे करण्याचा विचार.

### ३.४ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे :

**प्रश्नसंच – १ उत्तरे :**

१-ड, २- क , ३- ब, ४- क , ५- क

**प्रश्नसंच – २ उत्तरे :**

१-ब, २- क, ३- ड, ४- क, ५-क

**प्रश्नसंच – ३ उत्तरे :**

१-क, २-क , ३-अ, ४-ब, ५-ड

### ३.५ सारांश :

१९६० नंतर महाराष्ट्रात स्त्री जागृती आणि मागासवर्गीय चळवळींना वेग मिळाला. स्त्री शिक्षणावर भर देत महिलांसाठी शाळा, शिक्षण संस्था उभारल्या गेल्या. 'ऑल महाराष्ट्र महिला संघ' आणि इतर महिला संघटनांनी महिलांच्या शोषण, कौटुंबिक हिंसा, शारीरिक अत्याचाराविरोधात आवाज उठवला. १९७०-८० मध्ये समान वेतन, हक्क व सन्मानासाठी चळवळी घडल्या; राष्ट्रीय महिला आयोग स्थापन झाला. मुलींच्या शिक्षणाचे महत्त्वही अधोरेखित झाले.

१९८०-९० या काळात आधुनिक स्त्रीवादी विचारांचा उदय झाला. बालविवाह, वधू मान्यता, अत्याचाराविरोधात महिलांनी चळवळी केल्या. २००० नंतर 'बेटी बचाओ, बेटी पढ़ाओ' अभियान, माहिती तंत्रज्ञानातील महिलांचा सहभाग आणि कायदे राबवले गेले. स्त्रिया विविध क्षेत्रांत पुढे आल्या. सोशल मीडियातून चळवळी घडल्या.

त्याच वेळी मागासवर्गीय समाजासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार, दलित पँथर, नामांतर आंदोलन, OBC आरक्षण आंदोलन उभे राहिले. शैक्षणिक व सामाजिक सबलीकरण वाढले. बहुजन साहित्य, लोककला, सण समारंभातून आत्मभान व्यक्त झाले. मात्र जातीय अत्याचार, सामाजिक भेदभाव, आर्थिक सशक्ततेचा अभाव आजही आहे.

अंधश्रद्धा निर्मूलन समितीने जादूटोणा, बुवाबाजी, फलज्योतिष, छद्मविज्ञान, अशा अंधश्रद्धांविरोधात चळवळी चालवून विवेकाधिष्ठित विचार प्रसार केला. प्रदूषणमुक्त दिवाळी, पर्यावरणपूरक गणपती, विवेकाधिष्ठित होळी, यात्रांतील अंधश्रद्धांविरोधात मोहीम राबवली गेली. सणांचे वैज्ञानिक, सामाजिक आणि पर्यावरणपूरक भान समाजात निर्माण केले गेले.

या चळवळींमुळे समाजात जागरूकता वाढली असून, सामाजिक न्यायासाठीचा लढा अजूनही सुरू आहे.

### ३.६ सरावासाठी स्वाध्याय :

**अ) दीर्घोत्तरी प्रश्न :**

१. महाराष्ट्रातील स्त्री चळवळीच्या कार्याचा आढावा घ्या.

२. महाराष्ट्रातील मागासवर्गीयांच्या मुक्तीसाठी कार्य केलेल्या चळवळींचा मागोवा घ्या.

३. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मुलन समितीच्या कार्याचा आढावा घ्या

**ब) टीपा लिहा.**

१. १९७० च्या दशकातील स्त्री चळवळ

२. दलित पँथर

३. नामांतर चळवळ

४. फलज्योतिष आणि वास्तुशास्त्रिवरोधी मोहीम

५. बुवाबाजीविरोधी अभियान

## ३.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ :


१. खरात शंकरराव, 'पददलितांचा अस्पृश्यांचा मुक्तिसंग्राम', इंद्रायणी साहित्य पुणे, २००३.

२. दाभोलकर नरेंद्र, 'तिमिरातून तेजाकडे समग्र अंधश्रद्धा निर्मुलन व पुढे', राजहंस प्रकाशन, पुणे, एप्रिल २०१०.

३. दाभोलकर नरेंद्र, 'लढे अंधश्रद्धेचे', साधना प्रकाशन, पुणे, १९ मे २०१४.

४. देव वि.रा., 'स्त्री चळवळीची वाटचाल', सुगावा प्रकाशन पुणे, २००२.

५. कर्वे स्वाती, 'स्त्री विकासाच्या पाऊलखुणा', प्रतिमा प्रकाशन पुणे, २००३.

६. नानिवडेकर मेधा, 'महाराष्ट्रातील स्त्री चळवळीचा मागोवा', प्रतिमा प्रकाशन, पुणे,२००६.

७. परुळेकर आशा, 'आधुनिक स्त्रीच्या समस्या', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे,१९९२.

८. भागवत विद्युत, 'स्त्री प्रश्नांची वाटचाल', प्रतिमा प्रकाशन, पुणे,२००४.

९. लिंबाळे शरणकुमार, 'दलित चळवळ', नंदिनी गवळी, कोल्हापूर, प्रथम आवृत्ती, १९९१.

१०. साळवी दिनकर, 'चक्रव्यूहात दलित चळवळ', सावित्रीबाई फुले प्रकाशन, पुणे, १९९७.

११. लांजेवार ज्योती, 'भारतीय समाज आणि स्त्री', सुगावा प्रकाशन, पुणे, २००५.

१२. सिंगारे अनिल, घुले विठ्ठल, 'महाराष्ट्रातील आंबेडकरी चळवळीचा इतिहास' (१८९१-१९९४), अरुणा प्रकाशन, लातूर,दि. २६ नोव्हेंबर २००९.


❖❖❖

घटक ४

# आधुनिक महाराष्ट्र : आव्हाने

## (Modern Maharashtra : Challenges)

अनुक्रमणिका


४.० उद्दिष्टे

४.१ प्रास्ताविक

४.२ विषय विवेचन

- ४.२.१ शेतकऱ्यांच्या समस्या
- ४.२.२ धरणग्रस्तांच्या समस्या
- ४.२.३ आदिवासी समाजाच्या समस्या

४.३ सारांश

४.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

४.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

४.६ सरावासाठी स्वाध्याय

४.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

## ४.० उद्दिष्टे :

१. महाराष्ट्रातील कृषी व्यवस्थेची मुख्य वैशिष्ट्ये समजून घेता येतील.

२. आधुनिक महाराष्ट्रातील शेतकरी वर्गाच्या समस्या समजून घेता येतील.

३. शेतकऱ्यांच्या समस्या सोडविण्यासाठी करण्यात आलेल्या उपाययोजनाचे आकलन होईल.

४. धरणग्रस्त समुदायासमोरील प्रमुख प्रश्न आणि आव्हाने स्पष्ट होतील.

५. धरणग्रस्त समुदायाला त्यांचे हक्क मिळून देण्यासाठीचे प्रयत्न जाणून घेता येतील.

६. आदिवासी समाजासमोरील प्रमुख प्रश्न आणि आव्हाने कळतील.

७. आदिवासींच्या समस्या सोडविण्यासाठीचे प्रयत्न लक्षात येतील.

## ४.१ प्रास्ताविक :

महाराष्ट्र हे देशातील एक महत्त्वाचे कृषिप्रधान राज्य असून राज्याच्या एकूण लोकसंख्येपैकी मोठा वर्ग शेती आणि शेतीशी निगडीत व्यवसायांमध्ये कार्यरत आहे. तथापि, आधुनिक महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना विविध समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. हवामानातील अनियमितता, सततचा दुष्काळ किंवा अतिवृष्टी, अपुरी सिंचन सुविधा, शेतीच्या वाढत्या खर्चामुळे होणारा तोटा, बाजारातील अनिश्चितता आणि सरकारी धोरणांतील त्रुटी यामुळे शेतकरी अडचणीत सापडला आहे. विशेषत: कर्जबाजारीपण आणि त्यातून उद्भवणाऱ्या आत्महत्या या गंभीर समस्या निर्माण झाल्या आहेत. आधुनिक तंत्रज्ञान आणि सुधारित शेती पद्धतींची माहिती सर्वच शेतकऱ्यांना सहज मिळत नाही, त्यामुळेही त्यांचे नुकसान होते.

याशिवाय, औद्योगिक विकास आणि मोठ्या पायाभूत सुविधा प्रकल्पांच्या वाढीमुळे अनेक गावांमध्ये जमीन अधिग्रहण आणि विस्थापनाची समस्या निर्माण झाली आहे. महाराष्ट्रातील अनेक भागांमध्ये मोठ्या धरणांची उभारणी झाल्यामुळे हजारो कुटुंबे धरणग्रस्त झाली आहेत. शेती, घरे आणि पारंपरिक जीवनशैली गमावल्यामुळे ही कुटुंबे पुनर्वसनाच्या प्रतिक्षेत असून, त्यांना योग्य भरपाई आणि पर्यायी उपजीविकेच्या संधी मिळालेल्या नाहीत. अशा परिस्थितीत, धरणग्रस्तांचे जीवन अधिक बिकट झाले आहे.

शेतकरी व धरणग्रस्त यांच्यासोबतच आदिवासी समाजही अनेक आव्हानांना तोंड देत आहे. महाराष्ट्रातील आदिवासी समाज हा अजूनही सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासलेला आहे. जंगल व जमिनींच्या हक्कांबाबत अद्याप अनेक आदिवासींना त्यांच्या कायदेशीर अधिकारांची जाणीव नाही. शिक्षणाच्या संधींचा अभाव, आरोग्य सेवा अपुऱ्या आणि मूलभूत सोयींमध्ये कमतरता असल्यामुळे त्यांचे जीवन अत्यंत कठीण आहे. रोजगाराच्या मर्यादित संधींमुळे आदिवासी युवक शहरांकडे स्थलांतर करत असून, तिथेही त्यांना शोषणाला सामोरे जावे लागते.

सदर प्रकरणात आपण महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या समस्या, धरणग्रस्तांच्या वेदना आणि आदिवासी समाजाच्या अडचणी यांचा सखोल अभ्यास करणार आहोत. त्यांच्या समस्यांचे स्वरूप आणि या समस्यांचे निरसन करण्यासाठी वेगवेगळ्या उपाययोजना यांचा विचार होणे आवश्यक आहे. या समाजघटकांना न्याय मिळवून देण्यासाठी आणि त्यांच्या जीवनमानात सुधारणा व्हावी यासाठी सर्वांनीच प्रयत्न करणे आवश्यक आहे.

## ४.२ विषय विवेचन :

### ४.२.१ शेतकऱ्यांच्या समस्या :

शेती ही महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेचा आधारस्तंभ आहे. शेकडो वर्षांपासून, राज्यातील बहुसंख्य लोक शेती व शेतीशी निगडीत इतर व्यवसायांवर अवलंबून आहेत. महाराष्ट्रातील शेतीचे स्वरूप विविधतेने समृद्ध आहे. शेतीमुळेच राज्यातील ग्रामीण अर्थव्यवस्था टिकून आहे आणि शेतकरी समाज हा महाराष्ट्राच्या सामाजिक-सांस्कृतिक जडणघडणीचा एक अविभाज्य भाग आहे. महाराष्ट्र राज्याच्या निर्मिती नंतर १९६० ते २०१० या पाच दशकांच्या कालावधीत, शेतीच्या क्षेत्रात मोठे बदल घडले, ज्यामुळे शेतकऱ्यांसमोर नवीन आव्हाने निर्माण झाली.

या कालखंडात, भारतातील हरितक्रांतीमुळे शेतीच्या पद्धतीत मोठे बदल झाले. उच्च उत्पादन क्षमतेच्या बियाणांचा वापर, रासायनिक खते आणि कीटकनाशकांचा प्रसार, आणि सिंचन सुविधांचा विस्तार यामुळे शेतीच्या उत्पादकतेत वाढ झाली. तथापि, या बदलांचे फायदे सर्व शेतकऱ्यांपर्यंत पोहोचले नाहीत. अल्पभूधारक शेतकऱ्यांना या तंत्रज्ञानाचा फायदा मिळण्यास अडचणी येत राहिल्या. त्यांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा होण्याऐवजी, त्यांच्यावर कर्जाचा बोजा वाढत गेला.

१९९० च्या दशकात भारतातील आर्थिक उदारीकरणामुळे शेतीक्षेत्रावरही परिणाम झाला. सरकारी अनुदाने कमी झाली, आणि शेतकऱ्यांना बाजारपेठेवर अधिक अवलंबून राहावे लागले. या बदलांमुळे शेतकऱ्यांसमोर आर्थिक अस्थिरता निर्माण झाली. बाजारपेठेच्या असमानतेमुळे तसेच जागतिकीकरणाच्या प्रभावामुळे शेतकऱ्यांच्या पिकांना योग्य मोबदला मिळणे कठीण झाले.

या कालखंडात, पर्यावरणीय समस्यांमुळेही शेतकऱ्यांसमोर आव्हाने निर्माण झाली. अनियमित पाऊस, दुष्काळ, मातीची ऱ्हास, आणि भूजल स्तरातील घट यामुळे शेतीची उत्पादकता कमी झाली. विशेषतः महाराष्ट्रातील मराठवाडा आणि विदर्भ प्रदेशातील शेतकऱ्यांना या समस्यांमुळे मोठ्या प्रमाणावर आर्थिक हानी सहन करावी लागली.

**१. महाराष्ट्रातील कृषी व्यवस्थेचा आढावा :**

महाराष्ट्र हे भारताच्या पश्चिम भागात असलेले एक आर्थिकदृष्ट्या विकसित राज्य आहे. तथापि, राज्यातील शेतीक्षेत्रात प्रादेशिक असमानता दिसून येते. काही भागात सिंचन आणि तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे फायदा झाला आहे, तर काही भाग पूर्णपणे पावसावर अवलंबून आहेत. १९६० ते २०१० या कालावधीत महाराष्ट्रातील शेतीक्षेत्रात मोठे बदल झाले, ज्यात हरितक्रांती, सिंचनाच्या पायाभूत सुविधांचा विस्तार आणि १९९० च्या दशकात भारतीय अर्थव्यवस्थेचे उदारीकरण यांचा समावेश होतो. या विकासाच्या पार्श्वभूमीवरही, महाराष्ट्रातील शेती अनेक आव्हानांना तोंड देत आहे.

**१.१ महाराष्ट्रातील कृषी व्यवस्थेची काही मुख्य वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत :**

- **विविधता :** महाराष्ट्रातील कृषी व्यवस्था ही विविधतेने भरलेली आहे. राज्यात विविध प्रकारची पिके घेतली जातात, ज्यामध्ये ऊस, कापूस, सोयाबीन, ज्वारी, बाजरी, तांदूळ, हरभरा, आणि भुईमूग यांचा समावेश होतो.

• **पावसावर अवलंबून शेती :** महाराष्ट्रातील बहुतेक शेती पावसावर अवलंबून आहे. राज्यातील सुमारे ८०% शेती पावसावर अवलंबून आहे, ज्यामुळे अनियमित पाऊस आणि दुष्काळ यामुळे शेतीवर मोठा प्रभाव पडतो.

• **सिंचन सुविधांचा अभाव :** महाराष्ट्रातील सिंचन सुविधांचा अभाव ही एक मोठी समस्या आहे. राज्यातील केवळ २०% शेतजमीन सिंचनाखाली आहे, ज्यामुळे बहुतेक शेतकऱ्यांना पावसावर अवलंबून राहावे लागते.

• **अल्पभूधारक शेतकरी :** महाराष्ट्रातील बहुतेक शेतकरी अल्पभूधारक श्रेणीतील आहेत. त्यांच्याकडे कमी जमीन आहे, आणि त्यांना शेतीसाठी आवश्यक असलेली संसाधने मिळण्यास अडचणी येतात.

### १.२ महाराष्ट्रातील प्रमुख पिके :

महाराष्ट्रात विविध प्रकारची पिके घेतली जातात, ज्यामध्ये खालील प्रमुख पिकांचा समावेश होतो:

तापी, वैनगंगा, गोदावरी, भीमा, कृष्णा या नद्यांच्या खोऱ्यांचा प्रदेश हा शेतीचा मुख्य विभाग आहे. सातपुड्याच्या रांगा व पश्चिम घाटाचे क्षेत्र एकूण शेतीच्या सुमारे १८% आहे व तेथील शेतीवर डोंगराळ भागामुळे मर्यादा पडल्या आहेत.तांदूळ, गहू, ज्वारी, बाजरी, मका, नाचणी ही तृणधान्ये; डाळी, तूर ही कडधान्ये; ऊस, कापूस, मिरची, तंबाखू ही नगदी पिके; भुईमुग, तीळ, जवस मोहरी, करडी, एरंडी ही गळिताची पिके महाराष्ट्रात प्रामुख्याने होतात.

• **कोकण :** कोकणपट्टीमध्ये भरपूर डोंगर-खाड्या, खारी जमीन असल्यामुळे भात हे एकच प्रमुख पीक होते. रत्नागिरी-सिंधुदुर्ग या जिल्हयांमध्ये ते वर्षातून दोनदा व इतर ठिकाणी सामान्यत: एकदाच घेतले जाते. हिवाळी पिकांमध्ये कडधान्ये घेतली जातात. आंबा, फणस, काजू, सुपारी, नारळ, ही कोकणातील फळबागांची उत्पादने घेतली जातात.

• **पश्चिम घाट विभागातील शेती :** भरपूर पाऊस, खडकाळ जमीन यांमुळे येथे भात, भाजीपाला, मिरच्या, कांदे अशीच पिके होतात.

• **देशावरील निमशुष्क प्रदेश :** भीमा नदीच्या खोऱ्याचा (पुणे, सोलापूर, धाराशिव अशा जिल्ह्यांचा) हा प्रदेश. बरीचशी सुपीक जमीन आणि पाऊस मध्यम; भीमा नदी, तिच्या उपनद्यांवरील लहान व मध्यम धरणे व उपसा जलसिंचन योजना यांमुळे बागायती शेतीचे प्रमाण आहे. ज्वारी, ऊस, बाजरी, कडधान्ये, भुईमूग, कांदे, बटाटे ही पिके घेतली जातात.

• **कृष्णा नदीचे खोरे :** सातारा, सांगली, कोल्हापूर असा दक्षिण महाराष्ट्रातील भाग यात समाविष्ट होतो. काळी सुपीक जमीन, गाळाचे पट्टे, पुरेसा पाऊस अशी भौगोलिक परिस्थिती असलेल्या या प्रदेशात, उस, गहू, ज्वारी, बाजरी, भाजीपाला ही मुख्य पिके घेतली जातात. शेतीचे यांत्रिकीकरण मोठ्या प्रमाणात झाले असून कुक्कुटपालन, मेंढपाळी, दुग्ध व्यवसाय हे जोडधंदे आहेत.

• **गोदावरीचे खोरे :** नाशिक, अहिल्यानगर, छत्रपती संभाजी नगर, बीड, परभणी, नांदेड या जिल्ह्यांना

गोदावरी नदीचे पाणी मिळते. या प्रदेशात मुख्यतः ज्वारी, बाजरी, गहू, कापूस, ऊस हि पिके घेतली जातात. प्रवरा नदीच्या खोऱ्यात द्राक्षे, कागदी लिंबे, पेरू व भाजी-पाला होतो.

• **तापी नदीचे खोरे :** धुळे, जळगाव, बुलढाणा, अकोला, अमरावती या जिल्हयांचा भाग या खोऱ्यात येतो. ज्वारी, कापूस हि पिके महत्वाची आहेत. रब्बीच्या मोसमात गहू घेतला जातो.

• **वर्धा – नागपूरचा भाग :** वर्धा, वैनगंगा, पूर्णा नद्यांचे खोरे असलेल्या या प्रदेशात कापूस, ज्वारी, गहू, भुईमूग ही पिके घेतली जातात. संत्र्यांच्या बागा मोठ्या प्रमाणात आहेत.

• **पूर्व विदर्भाचा पठारी प्रदेश :** कडधान्ये, कापूस, ज्वारी, तांदूळ अशी मुख्य पिके घेण्यात येतात. भंडारा, चंद्रपूर जिल्हांचा भाग यात मोडतो.

**१.३ शेती पद्धती :**

महाराष्ट्रातील शेती पद्धती ही पारंपारिक आणि आधुनिक पद्धतींचे मिश्रण आहे. या पद्धतींमध्ये खालील गोष्टींचा समावेश होतो –

• **पारंपारिक शेती पद्धती :** महाराष्ट्रातील बहुतेक शेतकरी पारंपारिक शेती पद्धतींचा वापर करतात. या पद्धतींमध्ये बैलगाडी, नांगर, आणि पारंपारिक साधने वापरली जातात.

• **आधुनिक शेती पद्धती :** हरितक्रांतीमुळे महाराष्ट्रातील शेती पद्धतीत मोठे बदल झाले आहेत. उच्च उत्पादन क्षमतेच्या बियाणांचा वापर, रासायनिक खते आणि कीटकनाशकांचा प्रसार आणि सिंचन सुविधांचा विस्तार यामुळे शेतीच्या उत्पादकतेत वाढ झाली आहे. आधुनिक यंत्रसामग्री, सिंचन पद्धती इत्यादींचा वापर करून शेतीची उत्पादन क्षमता वाढवली जाते. ट्रॅक्टर, हार्वेस्टर, आणि इतर यंत्रसामग्रीचा वापर शेतीसाठी केला जातो.

• **जैविक शेती :** अलीकडे, महाराष्ट्रातील काही शेतकऱ्यांनी जैविक शेतीचा अवलंब केला आहे. या पद्धतीमध्ये रासायनिक खते आणि किटकनाशकांचा वापर न करता, नैसर्गिक पद्धतींचा वापर करून शेती केली जाते.

**२. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांसमोरील मुख्य समस्या (१९६० ते २०१०) :**

**२.१ अनियमित पाऊस आणि दुष्काळ :**

या कालावधीत महाराष्ट्रातील शेतकऱ्यांसमोरील सर्वात मोठे आव्हान म्हणजे पावसाची अनियमितता. महाराष्ट्रातील पाऊस हा मुख्यतः मान्सूनच्या हंगामात (जून ते सप्टेंबर) पडतो. तथापि, मान्सून अत्यंत अनिश्चित असल्याने, वारंवार दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण होते व पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होते.

• **दुष्काळग्रस्त प्रदेश :** महाराष्ट्रातील मराठवाडा आणि विदर्भ हे प्रदेश दुष्काळग्रस्त आहेत. या प्रदेशांमध्ये पाण्याची टंचाई ही ऐतिहासिक समस्या आहे, जी हवामान बदल आणि भूजल स्रोतांच्या अविरत उपसा यामुळे आणखी गंभीर झाली आहे. पश्चिम महाराष्ट्रातही काही भागांमध्ये पाण्याच्या उपलब्धतेबद्दल मोठ्या अडचणी आहेत.

● **सिंचनाचा अभाव व शेतीवर परिणाम :** अनियमित पाऊस आणि दुष्काळ यामुळे शेतीवर विनाशकारी परिणाम झाला आहे. पिकांचे नुकसान, उत्पादनात घट आणि शेतकऱ्यांच्या उत्पन्नात घट झाली आहे. राज्यातील अनेक भागात सिंचनाच्या सुविधांचा अभाव असल्याने, शेतकरी मान्सूनवर अवलंबून आहेत. वेळेवर पाऊस पडत नसल्यामुळे केलेली लागवड वाया जाते. कधीकधी याच्या अगदीच विपरीत परिस्थिती निर्माण होते व अवेळी पाऊस व गारा पाडून उभे पिक नाश पावते.

### २.२ मातीचा ऱ्हास आणि मातीची सुपीकता कमी होणे :

महाराष्ट्रात मातीच्या ऱ्हास ही एक सततची समस्या आहे, ज्यामुळे शेतीच्या जमिनीची उत्पादकता प्रभावित होते. मातीच्या ऱ्हासाची कारणे बहुआयामी आहेत, ज्यात त्याच जमिनीच्या तुकड्यावर वारंवार उत्पादन घेणे, अयोग्य सिंचन पद्धतीचा वापर आणि रासायनिक खते आणि कीटकनाशकांचा अतिवापर यांचा समावेश होतो.

● **वारंवार शेती :** महाराष्ट्रातील अनेक भागात, शेतकऱ्यांना पर्यायी उपजीविकेच्या साधनांच्या अभावामुळे त्याच जमिनीवर वारंवार शेती करावी लागते. यामुळे मातीतील पोषक तत्वांचा ऱ्हास होतो आणि मातीची सुपीकता कमी होते.

● **अयोग्य सिंचन पद्धती :** महाराष्ट्रात सिंचनाच्या पायाभूत सुविधांचा विस्तार समान रित्या झालेला नाही, ज्यामुळे काही भागात पाण्याच्या स्रोतांचा जास्त उपसा झाला आहे. अयोग्य सिंचन पद्धती, जसे की जास्त पाणी देणे आणि खराब निचरा, यामुळे माती खारी होणे आणि दलदल होणे यासारख्या समस्या निर्माण झाल्या आहेत.

● **रासायनिक पदार्थांचा अतिवापर :** १९६० च्या दशकात सुरू झालेल्या हरितक्रांती अंतर्गत शेतीची उत्पादकता वाढवण्यासाठी रासायनिक खते आणि कीटकनाशकांचा वापर सुरु झाला. तथापि, या रसायनांचा अतिवापर करण्यात आल्यामुळे मातीच्या सुपीकतेवर दीर्घकालीन वाईट परिणाम झालेला आहे.

### २.३ कर्जबाजारीपणा :

कर्जबाजारीपणा ही महाराष्ट्रातील शेतकऱ्यांसमोरील एक मोठी समस्या आहे. हि समस्या विशेषतः अल्पभूधारक शेतकऱ्यांसाठी जीवघेणी ठरत आहे. औपचारिक कर्जाच्या अभावामुळे अनेक शेतकऱ्यांना अनौपचारिक कर्जाची म्हणजेच सावकारी कर्जाची मदत घ्यावी लागते. कर्जाच्या दृष्टचक्रात अडकून अनेक शेतकऱ्यांचे आयुष्य उध्वस्त झाले आहे.

● **न परवडणारा उत्पादन खर्च :** बियाणे, खते आणि कीटकनाशक यासारख्या शेतीच्या उत्पादन सामुग्रीची किंमत वर्षानुवर्षे लक्षणीयरीत्या वाढली आहे. अल्पभूधारक शेतकरी अतिशय कमी उत्पन मिळवतात व त्यांना उत्पादन सामुग्रीची किंमत परवडणारी नाही. शेती नापीक ठेवण्यापेक्षा कर्ज घेऊन शेती करण्याची वेळ या शेतकऱ्यांवर येते. बेभरवशाची नैसर्गिक परिस्थती, बाजारभावाचे न समजणारे समीकरण अश्या अनेक आव्हानांना शेतकरी तोंड देतात. अनेकदा अपेक्षित उत्पन्न मिळत नाही आणि घेतलेले कर्ज फेडणे अशक्य होते. एक कर्ज फेडण्यासाठी दुसरे कर्ज घेण्याची वेळे येते. अनेकदा तारण ठेवलेली जमीन हातून जाते. अश्या प्रकारचे कर्जबाजारीपणाचे चक्र तयार होते.

• **अनौपचारिक कर्ज :** औपचारिक संस्थात्मक कर्ज हे राष्ट्रीयकृत बँक, जिल्हा बँक किंवा भारतीय रिजर्व्ह बँक द्वारे नियंत्रित इतर पतसंस्था यांच्याकडून प्राप्त होते. नियंत्रणाखाली असल्यामुळे या संस्था वाजवी व्याजदर, चोख हिशेब व परिस्थितीची जाणीव ठेऊन शेतकऱ्यांना कर्ज उपलब्ध करून देतात. परंतु या औपचारिक संस्था तळागाळात पोहोचल्या नसल्यामुळे व शिक्षणाचा अभाव असलेल्या शेतकरी वर्गाला या संस्थांच्या प्रक्रिया किचकट वाटत असल्यामुळे शेतकरी अनौपचारिक कर्जांकडे वळतात. सावकारी कर्ज पद्धतीमध्ये उच्च व्याजदर आकारला जातो. सावकारांकडून आर्थिक फसवणूक करून शेतकऱ्यांच्या जमिनी गिळंकृत केल्याची अनेक उदाहरणे आहेत.

• **उदारीकरणाचा परिणाम :** १९९० च्या दशकात भारतीय अर्थव्यवस्थेचे उदारीकरण झाल्यामुळे शेतीसाठी पूर्वीपासून असलेल्या शासकीय मदतीमध्ये घट झाली. शेतकऱ्यांना उपलब्ध असलेली अनुदाने कमी झाली तसेच सार्वजनिक वितरण प्रणाली कमकुवत झाली. यामुळे शेतकऱ्यांसमोरील आर्थिक अडचणी आणखी वाढल्या.

• **शेतकऱ्यांच्या आत्महत्या :** १९६० ते २०१० या कालावधीत महाराष्ट्रात, विशेषत: विदर्भात, शेतकऱ्यांच्या आत्महत्यांची संख्या वाढली आहे. यापैकी अनेक आत्महत्या पिकांच्या वारंवार नुकसानीमुळे आणि वाढत्या कर्जाच्या तणावामुळे झाल्या आहेत असे आढळले आहे.

### २.४ बाजारपेठ आणि पायाभूत सुविधांचा अभाव :

महाराष्ट्रातील शेतकऱ्यांसमोरील आणखी एक मोठी समस्या म्हणजे बाजारपेठ आणि पायाभूत सुविधांचा अभाव, खराब रस्ते, अपुरी वाहतूक व्यवस्था, अपुरी साठवण सुविधा आणि बाजारपेठेत उत्पादनाला योग्य भाव व वजन मिळण्याची शाश्वती याचा अभाव यामुळे शेतकऱ्यांना शेती करणे कठीण झाले आहे.

• **खराब वाहतूक व्यवस्था :** महाराष्ट्रातील अनेक ग्रामीण भागात योग्य वाहतूक व्यवस्थेचा अभाव आहे. रस्ते नाहीत किंवा रस्त्यांची अवस्था वाईट आहे. उत्पादन वाहतुकीसाठी रास्त भावात वाहनव्यवस्था मिळत नाही. या सुविधांच्या अभावामुळे शेतकऱ्यांना त्यांचे उत्पादन बाजारपेठेत नेणे कठीण होते. पिक वेळेवर बाजारपेठेत पोहोचले नाही तर शेतकऱ्यांचे उत्पन्न कमी होते.

• **अपुरी साठवण सुविधा :** योग्य साठवण सुविधांच्या अभावामुळे शेतकऱ्यांसमोर मोठ्या समस्या निर्माण झाल्या आहेत.विशेषतः नाशवंत पिकांची नासाडी होऊन मोठे आर्थिक नुकसान होते. योग्य साठवण सुविधा नसल्यामुळे, शेतकऱ्यांना कापणीनंतर लगेचच त्यांचे उत्पादन विकावे लागते. बाजारपेठेत एकाच वेळी सर्व शेतकऱ्यांचे पिक आल्यामुळे त्यांना कमी किंमत मिळते. शीतगृहे, भांडारगृहे इत्यादी मुबलक असल्यास शेतकऱ्यांना बाजारभावाचा अंदाज घेऊन कधी पिक विकायचे याचा निर्णय घेता येतो.

• **अन्नप्रक्रिया (फूड प्रोसेसिंग) उद्योगाचा मागासलेपणा :** पाश्चिमात्य देशांमध्ये अन्नप्रक्रिया (फूड प्रोसेसिंग) उद्योग मोठ्या प्रमाणात अस्थित्वात असल्यामुळे तेथील शेतकऱ्यांना त्यांचा नाशवंत शेतमाल प्रक्रिया करून मूल्यवर्धित स्वरुपात बाजारात आणता येत होता. महाराष्ट्रातील अन्नप्रक्रिया उद्योग विकसित नसल्यामुळे शेतकऱ्यांना मिळेल त्या भावात सर्व शेतमाल विकावा लागत होता. अद्यापही महाराष्ट्रातील अन्नप्रक्रिया उद्योग हवा तितका विकसित झालेला नाही.

● **बाजारपेठेत सहकार्य :** बाजारपेठेत विश्वासू खरेदीदार लाभेल याची शाश्वती नसल्यामुळे शेतकऱ्याला परावलंबी रहावे लागते. त्यांना त्यांच्या उत्पादनाची योग्य किंमत मिळने व तसेच योग्य वजन मिळणे कठीण होते. मध्यस्थ अनेकदा शेतकऱ्यांच्या परिस्थितीचा फायदा घेतात आणि मोठा नफा कमावतात, तर शेतकऱ्यांना कमी उत्पन्न मिळते.

### २.५ धोरणात्मक अपयश :

कोणत्याही देशातील शेतीव्यवस्था तेथील शासनाच्या धोरणावर अवलंबून असते. चांगल्या धोरणांमुळे शेतीची सुधारणा होते व शेतीवर अवलंबून असलेला शेतकरी वर्ग आर्थिक व सामाजिकदृष्ट्या सक्षम होतो. परंतु शासनाच्या धोरणात्मक अपयशामुळे व्यापक असंतोष पसरून आंदोलने निर्माण होतात. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना शासकीय धोरणांचा संमिश्र लाभ झाला आहे.

● **हरितक्रांती :** १९६० च्या दशकात सुरू झालेल्या हरितक्रांतीमध्ये उच्च उत्पादन क्षमतेच्या बियाणांचा, रासायनिक खतांचा आणि सिंचनाचा वापर करून शेतीच्या उत्पादकता वाढवण्यावर भर देण्यात आला. हरितक्रांतीमुळे अन्न उत्पादनात लक्षणीय वाढ झाली असली, तरीही यामुळे प्रादेशिक असमानता वाढली. लहान शेतकऱ्यांच्या विशेष गरजा उपेक्षित राहिल्या व त्यामुळे हरितक्रांतीचा फायदा त्यांना मिळू शकला नाही.

● **जमीन सुधारणा :** महाराष्ट्रातील जमीन सुधारणा धोरण हे जमीनधारणेच्या प्रश्नावर मोठ्या प्रमाणात अप्रभावी ठरले आहे. मोठ्या जमीनमालकांनी जमीनधारणा कायद्यांना बगल देण्याचे मार्ग शोधले, तर अल्पभूधारक शेतकऱ्यांना जमीन मिळवण्यासाठी संघर्ष करावा लागला. मोठ्या जमीनदार शेतकऱ्यांना आधुनिक शेती पद्धती लाभदायक ठरली परंतु छोट्या शेतकऱ्यांना उत्पादन वाढविण्यात हवे तसे यश मिळाले नाही. वाढत्या लोकसंखेमुळे शेतीवरील तान अधिक वाढला व दरडोई उत्पन्न घटले.

● **जागतिकीकरणाच्या व उदारीकरणाच्या लाभापासून शेतकरी दूर :** जागतिकीकरण व उदारीकरण देशातील जनतेला नवीन संधी उपलब्ध करून देतील व उत्पादकता वाढून गरिबी कमी होईल अशी अपेक्षा होती. परंतु भारतीय शेतकऱ्यांना याचा फायदा झाल्याचे दिसून येत नाही. पाश्चिमात्य देशांनी त्यांच्या शेतकऱ्यांना मोठ्याप्रमाणात अनुदान देणे सुरूच ठेवले व भारतीय शेतकऱ्यांना जागितक बाजारपेठेत स्पर्धा करणे शक्य झाले नाही. वेगवेगळ्या प्रकारचे अडथळे उभारून पाश्चिमात्य देशांनी भारतीय शेतमालाला आपल्या बाजारपेठेपासून दूर ठेवले परंतु स्वतः भारतीय बाजारपेठेत शिरकाव केला. धोरणात्मक दृष्ट्या जागतिकीकरणाचा व उदारीकरणाचा भारतीय शेतीसाठी फारसा फायदा झाला नाही.

● **पिक विमा योजनांचे अपयश :** नैसर्गिक व मानवनिर्मित आपतींमुळे शेतीचे होणारे नुकसान शेतकऱ्यांसाठी मोठा आघात असतो. या पासून शेतकऱ्यांना संरक्षण मिळावे यासाठी पिक विमा योजना आणण्यात आल्या. परंतु विमा कंपन्यांनी शेतकऱ्यांची दिशाभूल करून त्यांना योजनांच्या फायद्यापासून दूर ठेवले.

### २.६ पर्यावरणीय ऱ्हास आणि हवामान बदल :

पर्यावरणीय ऱ्हास आणि हवामान बदल हे महाराष्ट्रातील शेतकऱ्यांसमोरील महत्वाचे आव्हान ठरले.

हवामान बदलाचे परिणाम, जसे की वाढते तापमान, बेभरवशाचे पर्जन्यमान, आणि अतिवृष्टी यासारख्या घटनांची वाढती वारंवारता, यामुळे शेतीवर गंभीर परिणाम झाला आहे.

• **वाढते तापमान :** वाढते तापमानामुळे बाष्पीभवनाचे प्रमाण वाढले आहे, ज्यामुळे सिंचनासाठी पाण्याची उपलब्धता कमी झाली आहे. ही समस्या विशेषतः दुष्काळग्रस्त प्रदेशांमध्ये गंभीर आहे, जेथे पाण्याची टंचाई आधीच एक मोठी समस्या आहे.

• **पर्जन्यमानाचे बदलते स्वरूप :** हवामान बदलामुळे पर्जन्यमानाचे स्वरूप बदलले आहेत, ज्यामुळे अधिक तीव्र आणि अनियमित पाऊस पडू लागला आहे. यामुळे पुर आणि जमिनीचा ऱ्हास यांचा धोका वाढला आहे.

• **अतिवृष्टीच्या घटना :** अलिकडच्या काळात अतिवृष्टीच्या घटना, जसे की चक्रीवादळे आणि गारपीट, यांची वारंवारता वाढली आहे. या घटनांमुळे पिकांना मोठे नुकसान झाले आहे, ज्यामुळे उत्पादनात घट होऊन शेतकऱ्यांना आर्थिक नुकसान सहन करावे लागले आहे.

**२.७ सामाजिक समस्या आणि शेतकरी संकट :**

आर्थिक आणि पर्यावरणीय आव्हानांबरोबरच, महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना सामाजिक समस्यांना देखील तोंड द्यावे लागले आहे. यामध्ये अनिष्ट चाली व परंपरा, शिक्षणाचा अभाव या समस्या अधिक प्रभावी ठरतात.

• **अनिष्ट चाली व परंपरा :** महाराष्ट्रात आजही अनेक अनिष्ठ चाली व परंपरा अस्थित्वात आहेत व शेतकरी वर्ग मोठ्या प्रमाणात याला बळी पडत आहे. आर्थिक परिस्थिती बेताची असेल तरीही मुला-मुलींच्या विवाहप्रसंगी मोठा खर्च करणे; हुंडा, किमती भेटवस्तू देणे या प्रकारामुळे शेतकरी कर्जबाजारी होत आहेत व हे कर्ज फेडता न आल्यामुळे आत्महत्या केल्याचेही आढळून आले आहे.

• **शिक्षणाचा अभाव :** महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर शिक्षणाच्या प्रसारासाठी मोठे प्रयत्न झाले, परंतु ग्रामीण भागात शिक्षणाचा प्रसार हवा तितक्या वेगाने झाला नाही. ग्रामीण भागात राहणारा बहुतांश शेतकरी वर्ग शिक्षणापासून दूर राहिला. शेती क्षेत्रात होणाऱ्या सुधारणा, शासनाच्या उपलब्ध योजना, बाजारातील शेतीमालाची खरेदी-विक्री या सारख्या अनेक बाबींची माहिती शिक्षणा अभावी शेतकऱ्यांना मिळत न्हवती. यामुळेच शेतीमध्ये योग्य सुधारणा करणे अनेक शेतकऱ्यांना शक्य झाले नाही.

**३. शेतकऱ्यांच्या समस्या सोडविण्यासाठी करण्यात आलेल्या उपाययोजना :**

महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीपासूनच शेतकऱ्यांच्या अडचणी व समस्या यांचा अभ्यास करून त्यावर उपाययोजना करण्याचा प्रयत्न शासकीय व सामाजिक स्थरावर सुरु आहेत. या प्रयत्नांना संमिश्र यश प्राप्त झालेले दिसून येते. सुरवातीच्या काळात शासनाकडे उपलब्ध संसाधने व शेतकऱ्यांच्या समस्या सोडविण्यासाठी लागणारे निधी यांच्यात मोठी तफावत होती. कालांतराने शासनाची क्षमता वाढली परंतु शेतीच्या अडचणीही अधिक बिकट होत राहिल्या. शेतकऱ्यांच्या समस्या सोडविण्यासाठी करण्यात आलेल्या उपाययोजना पुढील प्रमाणे आहेत.

• **कायदेशीर उपाययोजना :** भारतीय संविधानाने वेठबिगारीसारख्या अमानुष प्रथेवर बंदी लादली.

वेठबिगारीसारख्या प्रथेमुळे शेतकऱ्यांना गुलामीचे जीवन जगावे लागत होते. संविधानातील कलम ३९, जमीन व इतर संसाधनांच्या समान उपयोजनाचे ध्येय मांडते तसेच कलम ४८ आधुनिक व शास्त्रशुद्ध शेतीचे व पशुधन संवर्धनाचे उद्देश मांडते. नियोजन मंडळाची स्थापना करून शेतीचा नियोजनबद्ध विकास करण्याला प्राधान्य देण्यात आले.

• **जमीन सुधारणा कायदा :** जमीनदारीची प्रथा नष्ट करण्यासाठी अनेक कायदे केंद्र व राज्य स्थरावर संमत करण्यात आले. कूळ कायद्यान्वये 'कसेल त्याची जमीन' तत्त्वानुसार कुळाच्या नावावर जमिनी करण्यात आल्या. २६ जानेवारी १९६२ रोजी कमाल जमीन धारणा कायदे महाराष्ट्रात संमत झाले. या कायद्यानुसार विशिष्ट मर्यादेपेक्षा जास्त जमीन धारण करण्यात बंदी लादण्यात आली.२.२१ लाख हेक्टर जमिनीचे संपादन करून २.१४ लाख हेक्टर जमीन भूमिहीनांना वाटण्यात आली.

• **सहकारी संस्थांची स्थापना :** शेतकऱ्यांना रास्त व्याजदराने कर्ज उपलब्ध करून देण्यासाठी सहकारी पतसंस्था उभारण्यात आल्या. शासनाने या पतसंस्थाना निधीपुरवठा करून शेतकऱ्यांना संस्थात्मक कर्ज मिळविण्याचा मार्ग खुला केला. राष्ट्रीयकृत बँकांना ग्रामीण भागात शाखा उघडून तेथील जनतेला आर्थिक सेवा पुरविण्यास सांगण्यात आले. शासनाच्या मदतीने अनेक सहकारी कारखाने सुरू करण्यात आले. शेतकऱ्यांना या सहकारी संस्थांमध्ये भागीदारी देऊन सक्षम बनविले.

• **शासकीय अनुदान वितरण :** खते, बी-बियाणे, शेती अवजारे, विहीर खणणे, शेतीला उपयोगी व दुग्ध व्यवसायासाठी आवश्यक जनावरे खरेदी इत्यादी कार्यांसाठी सरकारकडून मोठ्या प्रमाणावर अनुदाने उपलब्ध करून देण्यात येऊ लागली.

• **शेती विषयक संशोधनाला प्रोत्साहन :** आधुनिक शास्त्रशुद्ध शेतीस प्रोत्साहन देण्यासाठी शेती क्षेत्रात निरंतर संशोधन होत राहणे आवश्यक आहे. यासाठी कृषी विद्यापीठे, शेतकी महाविद्यालये, व इतर संशोधन संस्था सुरू करण्यात आल्या. आधुनिक व संकरित बी-बियाणे, शेती अवजारे संशोधनाला प्राधान्य देण्यात आले. सरकारच्या प्रयत्नांनी हरित क्रांती, श्वेत क्रांती, यशस्वी होऊन भारत हा देश अन्नधान्य आणि दुग्धउत्पादनात स्वावलंबी बनू शकला. खाजगी क्षेत्रात फलटण येथील निंबकर कृषी अनुसंधान संस्था या १९६८ मध्ये स्थापन केलेल्या संस्थेने प्रभावी कार्य केले.

• **शेती संबंधी नियंत्रण संस्थांची स्थापना :** केंद्र शासनाने १९५५ साली अशोक मेहता यांच्या अध्यक्षतेखाली 'अन्नधान्य चौकशी समिती' नेमली होती. या समितीने 'शेतकी किंमत आयोग' स्थापन करण्याची शिफारस केली. त्या अनुषंगाने १९६४ साली एल. के. झा यांच्या अध्यक्षतेखाली 'शेतकी किंमत आयोग' स्थापन करण्यात आला. १९६५ मध्ये केंद्र सरकारने कृषी खर्च मूल्य आयोगाची स्थापना केली. हा आयोग शेतमालाच्या किमतीतील प्रवृत्तीची चिकित्सा करणे आणि त्यांच्या आधार किमतीबाबत शिफारशी करण्याचे कार्य करतो. शेतमालाला उत्पादन खर्चावर आधारित भाव मिळावा म्हणून आयोगामार्फत हंगामापूर्वीच आधारभूत किमती घोषित केल्या जातात. आयोग शेतमालाची किमान किंमत जाहीर करतो. या किमतीपेक्षा कमी किमतीत शेतमालाची खरेदी करता येत नाही, त्यामुळे शेतकऱ्यांना किमान किंमत मिळते. राज्यात विधानसभेत कायदा संमत करून कृषी उत्पन्न बाजार समित्या करण्यात आल्या आहेत. निर्धारित क्षेत्रात

शेतीमालाचा व्यापार करण्याचे एकाधिकार या समितीला देण्यात आले. खुल्या लिलाव पद्धतीने मालाची विक्री केली जाते व शेतकऱ्यांना मालाचे वजन, प्रतवारी, साठवणूक इत्यादी सुविधा रास्त दराने एकत्रित मिळतात. सध्या कृषी उत्पन्न बाजार समित्यांच्या कार्यप्रणालीमध्ये अनेक सुधारणा प्रस्तावित असून देशभरातील बाजार समित्यांना e-National Agriculture Market (श-छ-च्) प्रणालीद्वारे एकमेकांशी जोडण्यात आले आहे.

महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळाची स्थापना १९७६ मध्ये झाली. या मंडळाने विविध पिकांचे बियाणे शेतकऱ्यांना वाजवी किमतीत मिळून देण्यासाठी कार्य केले. १९८१ साली महाराष्ट्रात फलोत्पादन विभाग सुरु झाला. या विभागाने फळझाडांची कलमे व रोपे तयार करण्याच्या नर्सरी राज्यभर सुरु केल्या.

- **शेतमाल खरेदी साठी महामंडळांची स्थापना :** अन्नधान्याची खरेदी, साठवणूक, वाहतूक, विक्री व वितरण योग्य पद्धतीने व्हावे म्हणून शासनाने १९६५ मध्ये 'फूड कॉपोरेशन ऑफ इंडिया'ची स्थापना केली. मुंबई राज्यात १९५७ साली वखार महामंडळ स्थापन करण्यात आले. महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर, १९६० मध्ये या मंडळाची 'राज्य वखार महामंडळ' अशी पुनर्रचना करण्यात आली. शासनाच्या वतीने अधिकृतरीत्या अन्नधान्य व शेतमालाची खरेदी करण्याचे माध्यम म्हणून महामंडळ काम करू लागले, या महामंडळामुळे शेतमालाच्या खरेदीतील सट्टेबाजी, नफेखोरी व फसवणुकीला आळा बसला, शेतकऱ्यांना योग्य भाव मिळू लागला. अन्नधान्य साठविण्यासाठी आवश्यक सुखसुविधा निर्माण होऊ लागल्या. महाराष्ट्रात कापूस एकाधिकार योजनेसारख्या योजनेमुळे शेतकऱ्यांना कापूस पिकासाठी हमीभाव मिळू लागला.

- **सिंचन सुविधांचा विकास :** शेतीतील सर्वांत मोठी समस्या म्हणजे सिंचनाचा असलेला अभाव होय. ही समस्या दूर करण्यासाठी शासनाने धरण प्रकल्प, तलाव, कालवे, बंधारे, शेततळी निर्माण करण्यासाठी निधी खर्च केला. सिंचनातील आधुनिक पद्धतीचा वापर शेतकऱ्यांनी करावा यासाठी ठिबक सिंचन, तुषार सिंचनाचा प्रचार-प्रसार केला जाऊ लागला. त्यासाठी मोठ्या प्रमाणावर अनुदान उपलब्ध करून देण्यात येऊ लागले.

- **उत्पादकता वाढविण्यावर भर :** शेतीतील उत्पादकता वाढविण्यासाठी शासनाने जमिनीचे सपाटीकरण, जमिनीची धूप थांबविण्यासाठी बांधावर झाडे लावणे, पीक पद्धतीतील बदलाबाबत मार्गदर्शन, गांडूळ व कंपोस्ट खत निर्मितीला प्रोत्साहन, जैविक शेतीवर भर, पाण्याचा योग्य पद्धतीने निचरा करणे इत्यादी प्रयत्न सातत्याने सुरू आहेत. या प्रयत्नांच्या माध्यमातून शेतकऱ्यांची उत्पादकता वाढविण्यावर भर दिला जातो.

- **प्रशिक्षण व मार्गदर्शन :** शेती क्षेत्रातील नवीन नवीन प्रयोग व संशोधन शेतकऱ्यांपर्यंत पोहचविण्यासाठी शासनाकडून मोठ्या प्रमाणावर शेतकऱ्यांना प्रशिक्षण व मार्गदर्शन केले जाते. कृषी प्रदर्शने आयोजित केली जात आहेत. कृषी उत्पादनाचे बाजार भरविले जात आहे. शेतीला पूरक उद्योग विकसित व्हावे म्हणून कुक्कुटपालन, शेळीपालन, मत्स्य उद्योग, गाई व म्हशी पालनाचे शास्त्रोक्त प्रशिक्षण दिले जात आहे.

शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी शासनाने व्यापक प्रमाणात प्रयत्न केलेले आहेत. परंतु, शेतकऱ्यांच्या संख्येच्या मानाने हे प्रयत्न अत्यंत तोकड्या स्वरूपाचे आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांच्या जीवनात फारसा बदल झालेला आढळून येत नाही.

**स्वयं अध्ययन प्रश्न –१ :**

**अ) खालील पैकी योग्य पर्याय निवडा.**

१. कोकणपट्टीमध्ये भरपूर डोंगर-खाड्या, खारी जमीन असल्यामुळे ..... हे एकच प्रमुख पिक होते.

अ) ज्वारी ब) सातू

क) भात ड) गहू

२. ..... रोजी कमाल जमीन धारणा कायदा संमत झाला.

अ) २६ जानेवारी १९६२ ब) २६ जानेवारी १९४७

क) २४ जानेवारी १९६२ ड) १५ ऑगस्ट १९४७

३. महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळाची स्थापना ..... मध्ये झाली.

अ) १९७२ ब) १९८०

क) १९७६ ड) १९२०

४. 'फूड कॉपोरेशन ऑफ इंडिया'ची स्थापना ..... मध्ये झाली.

अ) १९७० ब) १९६५

क) १९७५ ड) १९८०

५. ..... साली महाराष्ट्रात फलोत्पादन विभाग सुरु झाला.

अ) १९८१ ब) १९५६

क) १९८५ ड) १९९०

### ४.२.२ धरणग्रस्तांच्या समस्या :

धरणे ही मानवी प्रगतीची प्रतीके मानली जातात. धरणांमुळे सिंचन, वीजनिर्मिती आणि पाणीपुरवठा यासारख्या अनेक समस्यांवर मात करण्यात मदत होते. तथापि, धरणांमुळे होणारे विस्थापन आणि त्याचे सामाजिक-आर्थिक परिणाम गंभीर आहेत. महाराष्ट्रातील धरणग्रस्त समुदाय अनेक अडचणींना मागील अनेक दशके सामोरे जात आहे. स्वतंत्रपूर्व व स्वतंत्र कालखंडात महाराष्ट्रात अनेक मोठी धरणे बांधली गेली व या धरणक्षेत्रातील हजारो कुटुंबे त्यांच्या मूळ वास्तव्यापासून विस्थापित झाली आहेत. या प्रकरणात आधुनिक महाराष्ट्रातील धरणग्रस्त समुदायाच्या समस्यांचा आणि आव्हानांचा सविस्तर आढावा घेण्यात आला आहे. यात विस्थापन, पुनर्वसन, आर्थिक अडचणी, सामाजिक विघटन आणि पर्यावरणीय परिणाम यासंदर्भातील प्रश्नांचा मागोवा घेण्यात आला आहे.

**१. महाराष्ट्रातील काही मुख्य धरणे व त्यामुळे झालेले विस्थापन :**

महाराष्ट्रात सिंचन व जनतेची पाण्याची तहान भागविण्यासाठी अनेक धरणे उभारण्यात आली आहेत. या धरणांच्या उभारणीसाठी अनेक लोकांना विस्थापित करावे लागले आहे. या धरणग्रस्त समुदायाला अनेक अडचणींना सामोरे जावे लागले आहे. काही मुख्य धरणे व त्यांचा विस्थापितांच्या जीवनावर झालेला परिणाम पुढे देण्यात आला आहे.

- **कोयना धरण :**

  ▶ विस्थापित : २५,००० पेक्षा अधिक कुटुंबे

  ▶ परिणाम : कोयना धरण प्रकल्पामुळे पुनर्वसित लोकांना त्यांच्या पारंपरिक उपजीविकेपासून वंचित राहावे लागले. १९६७ च्या भूकंपामुळे अनेक गावांना दुसऱ्यांदा स्थलांतर करावे लागले.

- **उजनी धरण :**

  ▶ विस्थापित : १०,००० पेक्षा अधिक कुटुंबे

  ▶ परिणाम : पुनर्वसित भागांमध्ये उपजीविकेच्या संधी फार कमी आहेत, त्यामुळे स्थलांतरित समुदाय आर्थिक संकटात आहेत.

- **जायकवाडी धरण :**

  ▶ विस्थापित : २५००० पेक्षा अधिक कुटुंबे

  ▶ परिणाम : या धरणामुळे विस्थापित झालेल्या लोकांपैकी ५०% पेक्षा अधिक लोक आजही पुनर्वसनासाठी संघर्ष करत आहेत.

- **पैठण (नाथसागर) धरण :**

  ▶ विस्थापित : २०,००० पेक्षा जास्त कुटुंबे

  ▶ परिणाम : पुनर्वसन अपुरे राहिल्याने विस्थापितांना स्थलांतर करावे लागले. अनेक कुटुंबे शहरात जाऊन मिळेल ते काम करू लागले.

- **राधानगरी धरण :**

  ▶ विस्थापित : १०,००० पेक्षा अधिक कुटुंबे

  ▶ परिणाम : या धरणामुळे अनेक गावांना स्थलांतर करावे लागले. कृषी उत्पादनांवर परिणाम झाला असून, पुनर्वसन क्षेत्रांमध्ये आर्थिक संधी कमी आहेत.

- **वारणा धरण :**

  ▶ विस्थापित : १५,००० पेक्षा अधिक कुटुंबे

  ▶ परिणाम : वारणा धरणामुळे विस्थापित झालेल्यांना नवीन जमिनी मिळाल्या नाहीत, त्यामुळे त्यांचे उपजीविकेचे प्रश्न अद्याप सुटले नाहीत. अनेकांना स्थलांतर करून शहरांमध्ये जावे लागले आहे.

- **काळम्मावाडी धरण :**

  ▶ विस्थापित : ५,००० कुटुंबे

▶ परिणाम : पुनर्वसन क्षेत्रांमध्ये रोजगाराच्या संधी मर्यादित आहेत, त्यामुळे स्थलांतरितांचे जीवनमान खालावले आहे.

**२. धरणग्रस्त समुदायासमोरील प्रमुख प्रश्न आणि आव्हाने :**

**२.१ विस्थापन आणि पुनर्वसन :**

धरणांमुळे होणारे विस्थापन हे धरणग्रस्त समुदायासमोरील सर्वात मोठे आव्हान आहे. धरण बांधल्याने मोठा भूप्रदेश पाण्याखाली जातो. या प्रदेशात अस्थित्वात असलेली गावे व शेतजमिनी पाण्याखाली बुडतात व तेथील जनसमुदाय विस्थापित होतो. या विस्थापित समुदायाला त्यांच्या पिढीजात घरे, जमिनी यापासून दूर व्हावे लागते व हा त्यांच्यासाठी मोठा आघात ठरतो. अनेक पिढ्यांच्या आठवणी या ठिकाणांशी निगडीत असतात व अचानक हा परिसर विलुप्त होणे हि एक भावनिक क्षति त्यांना अनुभवावी लागते. शेतजमीन हि ग्रामीण जनतेच्या आर्थिक व सामाजिक जीवनाचा आधारस्तंभ असते. काबाड कष्ट करून कसलेली जमीन अचानक अधिग्रहीत झाल्यामुळे धरणग्रस्त व्यथित होतात.

विस्थापित समुदायाचे योग्य पुनर्वसन होणे अपेक्षित असते परंतु असे अनेकदा होताना दिसत नाही. महाराष्ट्र शासनाने राज्यातील सिंचन व्यवस्थेची परिस्थिती व सुधारणा यावर अभ्यास करण्यासाठी ७ डिसेंबर १९६० रोजी 'जलसिंचन आयोग' नेमला. या आयोगाने ९ जून १९६२ रोजी शासनाकडे आपला अहवाल सादर केला. आयोगाने धरणे, कालवे व इतर प्रकल्प उभारण्याबाबत काही मुद्दे मांडले. सरकारने आयोगाच्या सर्व शिफारशी स्वीकारून पुनर्वसनाबाबतच्या काही सूचना केल्या. त्यामध्ये धरणग्रस्तांच्या अडचणींचा विचार करून पुढील तत्वे मांडण्यात आली:

(१) एखाद्या प्रकल्पाच्या आराखड्याबरोबरच त्या प्रकल्पासाठी ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी ताब्यात घेण्यात येणार आहेत, अशांच्या पुनर्वसनाची योजनाही आखणे आवश्यक आहे.

(२) सर्वांगीण पुनर्वसन योजना तयार करणे व ती धरण प्रकल्पाबरोबरच मंजूर करणे हे एकाचवेळी होणे गरजेचे आहे.

(३) सरकारच्या संबंधित खात्यांनी अशा योजनेतील आपला कार्यभाग जमीन प्रत्यक्ष पाण्याखाली जाण्यापूर्वी किंवा ताब्यात घेण्यापूर्वी पार पाडण्याची सोय करावी.

जलसिंचन आयोगाच्या सर्व सूचना महाराष्ट्र सरकारने मान्य केल्या असल्या, तरी दरवेळी प्रत्यक्षात त्यांची अंमलबजावणी झालेली दिसून येत नाही. विकासप्रकल्पामुळे विस्थापन ज्या प्रमाणात घडून आले, त्या तुलनेत विस्थापितांचे पुनर्वसन झाले नाही.

विविध अहवालांनुसार, राज्यात २०२१ पर्यंत ११ लाखांहून अधिक लोक धरणांमुळे विस्थापित झाले आहेत. त्यातील ३०% पेक्षा अधिक लोक अद्याप सक्षम पुनर्वसनाच्या प्रतीक्षेत आहेत. तसेच पुनर्वसन क्षेत्रांमध्ये पायाभूत सुविधांची कमतरता आहे. पुनर्वसन झालेल्या जवळपास ४०% गावांमध्ये अद्यापही पाणीपुरवठ्याच्या समस्या आहेत. अश्या सुविधांचा तुटवडा असलेल्या ठिकाणी जीवन व्यतीत करणे विस्थापितांना अधिक कठीण होते.

## २.२ आर्थिक अडचणी :

धरणग्रस्त समुदायाला भयंकर आर्थिक अडचणींचा सामना करावा लागतो. विस्थापित झाल्यामुळे त्यांचे पारंपारिक आर्थिक स्रोत संपुष्टात येतात. शासनाकडून मिळालेली आर्थिक मदत तुटपुंजी ठरते.

- **शेतजमिनी मिळण्यात अडचणी :** नवीन शेतजमीन देण्याचे आश्वासन देण्यात येते परंतु अद्यापही विस्थापित झालेल्या अनेक शेतकऱ्यांना नवीन शेतीसाठी जमीन मिळालेली नाही. अधिग्रहित जमिनींच्या मालकी हक्काबाबत पूर्वीपासून वाद असल्यास नवीन जमीन कोणाला द्यायची याचा निर्णय वर्षोनुवर्षे होत नाही. कागदपत्रे पूर्ण नसल्यामुळे अनेक शेतकऱ्यांना जमिनीचे वाटप होत नाही. काही ठिकाणी धरण क्षेत्रामध्ये अतिरिक्त जमीन अधिग्रहित करण्यात आलेली आहे. परंतु प्रशासकीय अडचणींमुळे हि अतिरिक्त जमीन मूळ मालकांना परत देण्यात येत नाही.

- **रोजगाराचा अभाव :** विस्थापित समुदायाला नवीन ठिकाणी योग्य रोजगाराच्या संधी मिळत नाहीत. शेतीवर अवलंबून असलेल्या या समुदायाला इतर उद्योगांमध्ये रोजगार मिळणे कठीण होते. नवीन रोजगारासाठी आवश्यक असलेले कौशल्य सर्व विस्थापितांकडे असेलच असे होत नाही. सर्वेक्षणात असे आढळून आले आहे की विस्थापित समुदायांमध्ये बेरोजगारी दर सामान्य दराच्या दुपटीहून अधिक आहे.

- **कर्जबाजारीपणा :** आर्थिक अडचणींमुळे विस्थापित कुटुंबे कर्ज घेऊन आपल्या गरजा पूर्ण करतात परंतु शाश्वत रोजगाराचे साधन नसल्यामुळे कर्ज फेडणे शक्य होत नाही. कर्जबाजारीपणामुळे आधीच तणावाखाली जीवन व्यतीत करणारा विस्थापित वर्ग अधिकच भरडला जातो.

## २.३ असमाधान कारक मानव विकास निर्देशांक :

धरणग्रस्त समुदायाचा मानव विकास निर्देशांक हा इतर समाजापेक्षा निम्न व असमाधानकारक आहे. मानव विकास निर्देशांक हा विविध समुदायांच्या सामाजिक आणि आर्थिक विकासाची पातळी मोजण्यासाठी वापरला जाणारा परिणाम आहे. यात चार प्रमुख घटकांचा अंतर्भाव केला गेला आहे – १) शालेय शिक्षणाची सरासरी वर्षे, २) शालेय शिक्षणाची अपेक्षित वर्षे, ३) जन्माच्या समयापासून सरासरी आयुर्मान आणि ४) दरडोई एकूण उत्पन्न. या सर्वच बाबींमध्ये धरणग्रस्त समुदाय पिछाडीवर आहे.

धरणग्रस्त पुनर्वसन क्षेत्रांमध्ये शाळा आणि दवाखाने हे अपुरे आहेत. शाळा असल्या तर पुरेसे शिक्षक नेमेलेले नाहीत. आरोग्यसेवा मिळवण्यासाठी धरणग्रस्तांना जवळपासच्या गावी प्रवास करावा लागतो. जलप्रदूषण आणि स्वच्छतेच्या कमतरतेमुळे विस्थापित क्षेत्रांमध्ये साथीचे आजार मोठ्या प्रमाणावर आढळतात. इतकेच नाही तर विस्थापनामुळे विस्थापित समुदायातील घटकांना मानसिक आरोग्याचे प्रश्न भेडसावतात. त्यांना तणाव, चिंता, आणि नैराश्य यासारख्या समस्यांना तोंड द्यावे लागते. विस्थापित समुदायात गरीबीचे प्रमाण जास्त आहे. दरडोई उत्पन्न हे राज्याच्या सरासरी पेक्षा कमी आहे.

## २.४ सामाजिक आणि सांस्कृतिक प्रश्न :

धरणग्रस्त समुदायाला विशिष्ठ सामाजिक आणि सांस्कृतिक प्रश्नांचा सामना करावा लागतो. विस्थापनामुळे

त्यांच्या सामाजिक आणि सांस्कृतिक ओळखीवर विपरीत परिणाम होतो. विस्थापनामुळे समुदायाचा सामाजिक ढांचा विघटित होतो. पारंपारिक समुदाय आणि कुटुंबे विखुरली जातात व त्यांची विशिष्ट अशी सामाजिक आणि सांस्कृतिक ओळख संपुष्टात येते. प्रत्येक गाव-खेड्याची स्वतःची वेगळी परंपरा असते. अशा विविध परंपरांनी भारत देश समृद्ध आहे. गाव धरणाच्या पाण्यात विलुप्त होते व त्यासाबोतच त्या गावाच्या विशिष्ट परंपरा व रूढी संपुष्टात येतात.

**२.५ नैसर्गिक आपत्तींचा धोका :**

काही पुनर्वसन क्षेत्रे पूरप्रवण भागांमध्ये आहेत. त्यामुळे पुनर्वसित कुटुंबांना वारंवार पुरासारख्या नैसर्गिक संकटांचा सामना करावा लागतो. इतकेच नव्हे तर इतर नैसर्गिक आपत्तींना सुद्धा सामोरे जावे लागते. उदाहरणार्थ, कोयना धरणाच्या भूकंपप्रवण भागात पुनर्वसित झालेल्या लोकांना १९६७ च्या भूकंपामुळे मोठे नुकसान सहन करावे लागले होते.

**३. धरणग्रस्त समुदायाला त्यांचे हक्क मिळून देण्यासाठीचे प्रयत्न :**

१९६० नंतरच्या दशकात महाराष्ट्रात १००० पेक्षा जास्त मध्यम क्षमतेची धरणे बांधण्यात आली. या धरणांमुळे विस्थापित झालेल्या शेतकऱ्यांच्या मागण्यांचा विचार करून महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम, १९७६ आणण्यात आला. १९९९ मध्ये महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम, हा सुधारित अधिनियम लागू झाला. या अधिनियमात बाधित व्यक्तींचे पुनर्वसन करण्यासाठी काही महत्वाच्या तरतुदी करण्यात आल्या. प्रकल्पापासून लाभ मिळत असलेल्या गावातील जमिनीवर किंवा क्षेत्रावर बाधित व्यक्तींचे पुनर्वसन करणे; बाधित व्यक्तींच्या पुनर्वसन प्रयोजनार्थ स्थापन केलेल्या नवीन गावठाण्यात शाळा, रस्ते, विहिरी, वीजपुरवठा, बस थांबा, बाजार, गायरान अश्या १८ विवध नागरी सुविधांची तरतुद असेल; राज्य शासकीय विभाग, स्थानिक स्वराज्य संस्था इत्यादी मध्ये वर्ग तीन आणि वर्ग चार प्रर्वगातील सर्व सेवांमध्ये रोजगाराकरिता किमान ५ टक्के कोटा असेल अश्या या तरतुदी आहेत. राज्य व जिल्हा स्तरावर विशेष यंत्रणा स्थापन करून धरणग्रस्त समुदायाचे प्रश्न सोडविण्याचे प्रयत्न झाले.

अनेक सामाजिक नेतृत्व व संघटना यांनी धरणग्रस्तांचे प्रश्न प्रभावीपणे मांडण्याचे कार्य केले. महाराष्ट्रातील एक थोर स्वातंत्र्यसैनिक क्रांतिवीर नागनाथअण्णा नायकवडी यांनी वारणा धरणग्रस्त व कोयना धरणग्रस्त यांच्या चळवळी उभ्या करून धरणग्रस्तांचा मुंबईत मोर्चा काढून सरकारचे या समस्येकडे लक्ष वेधले. स्वातंत्रपूर्व काळात सेनापती बापट यांनी मुळशी सत्याग्रहाचे नेतृत्व केले होते. अनेक चळवळी त्यांचा आदर्श समोर ठेऊन कार्य करत आहेत. श्रमिक मुक्ती दलाचे कार्यकर्ते धरणग्रस्त समुदायाच्या हक्कासाठी वेळोवेळी आंदोलने करत असतात. धरणग्रस्त समुदायास शाश्वत भविष्य मिळण्यासाठी सामाजिक संस्था आणि स्थानिक समुदाय यांना पुनर्वसन प्रक्रियेत सक्रीयपणे सहभागी करून घेणे आवश्यक आहे.

महाराष्ट्रातील धरणग्रस्त समुदायांचे प्रश्न केवळ विस्थापनापुरते मर्यादित नाहीत, तर ते सामाजिक, आर्थिक आणि मानसिक आरोग्याशी संबंधित आहेत. पुनर्वसनासाठी प्रभावी उपाययोजना राबवून या समुदायांचे जीवनमान उंचावण्याचा प्रयत्न करणे आवश्यक आहे.

**स्वयं अध्ययन प्रश्न – २ :**

**अ) खालील पैकी योग्य पर्याय निवडा.**

१. कोयना धरण प्रकल्पामुळे पुनर्वसित लोकांना ..... च्या भूकंपामुळे दुसऱ्यांदा स्थलांतर करावे लागले.

अ) १९६७ ब)१९६५

क) १९३२ ड)१९३३

२. महाराष्ट्र राज्याने ..... रोजी जलसिंचन आयोगाची स्थापना केली.

अ) २१ डिसेंबर १९६२ ब) १ डिसेंबर १९६२

क) ७ डिसेंबर १९६० ड) ७ डिसेंबर १९६२

३. स्वातंत्र्यपूर्व काळात ..... यांनी मुळशी सत्याग्रहाचे नेतृत्व केले.

अ) नागनाथ अण्णा ब) सेनापती बापट

क) महात्मा गांधी ड) स्वातंत्रवीर सावरकर

४. मानव विकास निर्देशांक सामाजिक व ..... विकासाची पातळी मोजण्यासाठी वापरला जातो.

अ) सांस्कृतिक ब) आर्थिक

क) राजकीय ड) मानसिक

५) महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम ..... साली लागू झाला.

अ) १९९० ब) १९९५

क) १९९९ ड) २०००

### ४.२.३ आदिवासी समाजाच्या समस्या :

महाराष्ट्रातील आदिवासी समाज हा राज्याच्या सामाजिक आणि सांस्कृतिक वैविध्याचा एक अविभाज्य भाग आहे. २०११ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रातील एकूण लोकसंखेतील ९.३५ टक्के प्रमाण हे आदिवासी समाजाचे आहे. महाराष्ट्रात आदिवासी समाजाला अनुसूचित जमाती प्रवर्गात गणले जाते व सध्या ४५ जमातींचा यामध्ये समावेश आहे. महाराष्ट्रातील वेगवेगळ्या विभागांमध्ये आदिवासी जमाती विखुरलेल्या आहेत. सह्याद्री विभागात (ठाणे, नाशिक, पुणे, अहमदनगर, रायगड इ. जिल्हे) महादेव कोळी, वारली, कातकरी, कोकण, ठाकर, ढोर कोळी, मल्हार कोळी, काथोडी या जमाती वास्तव्यास आहेत. सातपुडा विभागात (धुळे, जळगाव, अमरावती, नंदुरबार, औरंगाबाद) भिल्ल, गावीत, पावरा, धानका, हुबळा, तडवी, पारधी, कोलम, मावची कोरकू या जमाती आढळतात. तसेच, गोंडवन विभागात (नागपूर, चंद्रपूर, भंडारा, यवतमाळ, नांदेड इ. जिल्हे) गोंड, मांडिया गोंड, कोला, परधान, आंध, कोया, हलवा, करब या जमाती आहेत.

महाराष्ट्रातील आदिवासी समाज हा प्रामुख्याने राज्यातील वने, डोंगर, दऱ्या अश्या दुर्गम भागात वास्तव्य करतो. आदिवासी समाज मुख्यधारेतील जनजीवनापासून प्रादेशिक आणि सांस्कृतिकदृष्ट्या अलिप्त आहे. आदिवासींमधील प्रत्येक जमातीची स्वतःची स्वतंत्र अशी संस्कृती आहे. आदिवासींची जीवनशैली, बोलीभाषा, सामाजिक रीतिरिवाज, सामाजिक मूल्ये, रूढी आणि परंपरा इत्यादी इतर समाजापेक्षा भिन्न आहेत.

**१. आदिवासी समाजासमोरील प्रमुख प्रश्न आणि आव्हाने :**

अगदी सुरवातीच्या काळापासून आदिवासी समुदायाची स्वतःची एक पारंपरिक जीवनपद्धती आहे. या जीवनपद्धतीमध्ये अनेक समस्या आढळून येतात. तसेच, ब्रिटिश कालखंडापासूनच आदिवासींच्या परंपरागत जमिनी आणि संसाधनांवर बाह्य लोकांचे अतिक्रमण सुरू झाले. स्वातंत्र्यानंतरही, विकासासाठी आदिवासींच्या वास्तव्यात हस्तक्षेप होत राहिला आहे. यामुळे काही आधुनिक व नवीन समस्या आदिवासींच्या जीवनात निर्माण झालेल्या आहेत.

**१) अलिप्तता व मागासलेपणा :**

आदिवासी समाज हा शहर व गाव-वस्त्या यापासून अलिप्त अश्या दुर्गम डोंगराळ प्रदेश, घनदाट जंगल या ठिकाणी वास्तव्यास असतो. दळणवळणाच्या दृष्टीने अत्यंत कठीण व बिकट प्रदेशांत वस्ती करून राहात असल्यामुळे प्रगत समाजाशी त्यांचा संपर्क येऊ शकला नाही. संपर्काअभावी मुख्य प्रवाहात झालेल्या सुधारणा त्यांच्यापर्यंत पोहचू शकल्या नाहीत. एकांतवास आणि भौगोलिक पृथकता ही आदिवासींच्या विकासाच्या मार्गातील सर्वांत मोठी अडचण ठरली. एकांतवासात राहिल्यामुळे सांस्कृतिक आदानप्रदान होऊ शकले नाही. आधुनिक विज्ञान व तंत्रज्ञान यांच्या अज्ञानामुळे आदिवासी समाज दारिद्र्य, रोगराई, नैसर्गिक संकटे इत्यादी समस्यांशी झुंजत राहिला. प्रगत समाजाबद्दल भय आणि बुजऱ्या स्वभावामुळे आदिवासी जमातींना अलिप्त राहणे योग्य वाटले.

**२) आदिवासी समाजव्यवस्थेवर ब्राह्य अतिक्रमण :**

आदिवासी भौगोलिकदृष्ट्या पृथक राहात असले तरी प्रगत समाजाने आपल्या हितासाठी आदिवासींशी संपर्क प्रस्थापित केले. प्रस्थापित धर्मव्यवस्थेचा आदिवासी भागात विस्तार होऊ लागला. आदिवासींवर मुख्य प्रवाहातील धर्म लादले गेले. आदिवासींचा परंपरागत धर्म निसर्गपूजेवर आधारलेला होता. आदिवासी आपली जुनी संस्कृती पूर्णपणे सोडू शकले नाहीत आणि नव्याने आलेल्या तत्त्वांचाही पूर्णपणे स्वीकार करू शकले नाहीत. सोबतच, परंपरागत बोलीभाषा, रूढी व परंपरा यांचा ऱ्हास होऊन समाजाचे विशिष्ट सांस्कृतिक अस्तित्व नष्ट होऊ लागले आहे. प्रगत समाजातील जे घटक आदिवासींच्या संपर्कात आले त्यांनी आदिवासींचे विविधप्रकारचे शोषण सुरु केले. जंगल हे आदिवासींच्या उपजीविकेचा प्रमुख आधारस्तंभ होते. जंगलातील उत्पादने स्वतःच्या फायद्यासाठी एकाधिकारशाहीपणे मिळविण्यासाठी ब्रिटिशांनी आदिवासींवर बांधणे लादली. इंग्रजांनी केलेल्या कायद्यांमुळे आदिवासींचा जंगलावरील हक्क हिरावला गेला व त्यांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला.

**३) आर्थिक समस्या :**

आदिवासींची पारंपरिक अर्थव्यवस्था जंगलावर आधारित होती. परंतु, आधुनिक कालखंडात आदिवासींना

जंगलातून बेदखल करण्यात आले. ठेकेदार, कंत्राटदार, सावकार, खाण मालक आणि फिरते व्यापारी यांनी आदिवासींचा आपल्या फायद्यासाठी उपयोग करून घेण्यास सुरुवात केली. त्यांच्या जमिनी नाममात्र किमतीत गिळंकृत करण्यात आल्या. आदिवासी आपल्या जीविताची पर्वा न करता वनांमधून नैसर्गिक साधनसंपत्ती गोळा करतात व व्यापारी नाममात्र दरात त्याची खरेदी करून स्वतः मोठा फायदा मिळवतात. परंपरागतरित्या आदिवासी स्थलांतरित शेती करतात. या शेतीपद्धतीमध्ये मोठे उत्पन्न मिळत नसल्याने आदिवासींची कसातरी आपला उदरनिर्वाह चालवतात. जंगलातील लाकूडफाटा गोळा करणे, मध, डिंक गोळा करणे, शिकार व मासेमारी यातून काही आदिवासी उत्पन्न मिळवत असत. परंतु जंगल संवर्धन कायद्यामुळे जंगलात शिकार, मासेमारी आणि लाकूडतोड यावर बंदी घालण्यात आली. उदरनिर्वाहासाठी अनेक आदिवासी वेगवेगळ्या शहरात स्तलांतरित झाले. शिक्षण व तांत्रिक कौशल्य याचा अभाव असल्याने आदिवासींना समाधानकारक रोजगार मिळत नाही. अल्पमोबदल्यावर मजुरीची कामे देऊन राबविले जाते. दोनवेळा अन्न प्राप्त होणेही दुरापास्त झालेले दिसते.

**४) सामाजिक व सांस्कृतिक समस्या :**

आदिवासी समाज मुख्य प्रवाहाच्या संपर्कात आल्यामुळे अनेक सामाजिक समस्या निर्माण झाल्या आहेत. हुंडा पद्धतीच्या प्रभावामुळे विवाहपद्धती किचकट झाली आहे. उच्चभ्रू समाजाच्या अनुकरणातून आदिवासी समाजातील विवाह सोहळ्यात प्रचंड पैसा खर्च होऊ लागला. हा खर्च पेलण्याएवढे उत्पन्न नसल्यामुळे आदिवासी समाज कर्जबाजारी बनला. आदिवासी समाजामध्ये बालविवाहाच्या वाढत्या प्रमाणामुळे बालमृत्यू आणि मातामृत्यूचे प्रमाण मोठे आहे. व्यसनाधीनता ही एक मोठी समस्या आदिवासी समाजात आढळून येते. व्यसनांच्या दुष्परिणामांची महिती नसल्यामुळे कुटुंबातील अनेक सदस्य व्याधींच्या आहारी जातात.

**५) भाषाविषयक समस्या :**

प्रत्येक आदिवासी समाजाची स्वतःची बोलीभाषा असते. या बोलीभाषेसाठी स्वतंत्र लिपी नाही. आदिवासी भाषा या मौखिक स्वरूपाच्या आहेत. लिखाणपद्धत नसल्यामुळे या समुदायांची विश्वसनीय ऐतिहासिक माहिती मिळत नाही. मुख्य प्रवाहात येण्यासाठी आदिवासींना प्रगत समाजाची भाषा शिकावी लागली. या प्रक्रियेमुळे आदिवासी समाज आपल्या मूळ भाषेला विसरू लागला आहे. नव्याने स्वीकारलेली भाषा पूर्णपणे अवगत होणे अवघड असल्यामुळे आदिवासी समाजामध्ये न्यूनगंड निर्माण झाला. भाषिक कौशल्य आदिवासी समाजाच्या शैक्षणिक प्रगतीच्या मार्गात मोठा अडथळा ठरले.

**६) आरोग्यविषयक समस्या :**

आदिवासी समाजाला भेडसावणाऱ्या समस्यांपैकी सर्वात भीषण समस्या या आरोग्यविषयक समस्या आहेत. व्यसनाधीनता, कुपोषण, त्वचारोग, सर्पदंश, कॉलरा, साथीचे आजार यामुळे आदिवासी समाज त्रासला आहे. मद्यपान करणे ही आदिवासी समाजाची परंपरा होती. सण, समारंभ, उत्सव, लग्न इत्यादी कार्यक्रमात आदिवासी समाजात मद्याचे सेवन केले जात असे. परंतु अत्याधिक मद्यसेवनामुळे अनेक अरोग्यविषयक, सामाजिक आणि सांस्कृतिक प्रश्न आदिवासींच्या जीवनात निर्माण झालेले आहेत. तसेच, आदिवासी समाजात गरोदर माता आणि लहान बालकांच्या कुषोषणाचा प्रश्न गंभीर आहे. आदिवासींमध्ये अनेकदा त्वचारोग,

टायफॉईड, न्यूमोनिया, कॉलरा, साथीचे आढळून येतात. अपुऱ्या आरोग्य सुविधा आणि अज्ञानामुळे आदिवासी योग्य उपचारांऐवजी मंत्र, तंत्र, जडीबुटी, झाडपालांचा उपचार करतात त्यात रुग्ण दगावण्याची शक्यता असते.

**७) शिक्षण, दळणवळण व नक्षलवादाची समस्या :**

आदिवासी समाजाच्या विकासाच्या मार्गातील एक मोठी अडचणं म्हणजे दुर्गम भागातील शिक्षण, दळणवळण व संपर्काची समस्या. आदिवासी समाज दुर्गम वने, डोंगर रांगांमध्ये वस्ती करत असल्याने त्यांच्यापर्यंत शाळा, दवाखाने, नवीन तंत्रज्ञान, रस्ते, रेल्वे व इतर सर्व सुखसुविधा पोहचविणे अत्यंत अवघड असते. आदिवासी पाडे दुर्गम भागात विखुरलेले असल्यामुळे तेथे शाळा चालवणे अवघड होते. अश्या दुर्गम ठिकाणी शिक्षकांची उपलब्धता नसते.

विकासाच्या अभावामुळे काही जहाल विचारांच्या नक्षलवादी संघटना समता आणि विकासाचे स्वप्न दाखवून आपल्या संघटनेत आदिवासींना ओढत आहेत. संविधानिक मार्गाने आपले प्रश्न सुटू शकत नाहीत व हिंसाचार हाच योग्य मार्ग आहे असे विचार पसरवून आदिवासी तरुण-तरुणींना नक्षलवादाकडे आकर्षित केले जाते. या दिशाभूल झालेल्या तरुणांना सामान्य जीवन व्यतीत करणे शक्य होत नाही.

**८) विस्थापनाच्या समस्या :**

देशाच्या व राज्याच्या विकासासाठी स्वातंत्र्योत्तर काळात मोठ्या प्रमाणावर धरणे, कालवे, औद्योगिक वसाहती, खाणी इत्यादी उभारण्यात आल्या. यासाठी आदिवासींना मोठ्या प्रमाणावर विस्थापित व्हावे लागले आहे. विकासाच्या नावाखाली आदिवासींच्या, जमिनी सक्तीने ताब्यात घेतल्या गेल्या. विस्थापनामुळे आदिवासींच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला. पुनर्वसनासाठी केलेल्या उपाययोजना अपुऱ्या व अप्रभावी असल्यामुळे आदिवासींवर मोठा अन्याय झाला. अनेक विस्थापितांना जमिनीच्या मोबदल्यात जमिनी देण्याचे आश्वासन देण्यात आले, परंतु, जमिनी अद्यापही दिल्या गेल्या नाहीत.

**२. आदिवासींच्या समस्या सोडविण्यासाठीचे प्रयत्न :**

**१) कायदेशीर तरतुदी :**

आदिवासींच्या जमिनीवरील त्यांचे हक्क शाबूत राहावे व त्यांची फसवणूक करून कोणी त्यांच्या जमिनी बळकावू नये, यासाठी महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ मधील कलम ३६ व ३६ (अ) अन्वये असा नियम करण्यात आला आहे की, आदिवासींच्या जमिनी शासनाच्या पूर्वपरवानगीशिवाय बिगर आदिवासींकडे हस्तांतरित करता येणार नाहीत. आदिवासींच्या पारंपरिक वन हक्कांना २००६ साली कायदेशीर मान्यता देण्यात आली. कायदेशीररीत्या जमीन आदिवासींच्या नावावर करण्यात येऊन सातबाराचे वाटप करण्यात आले. आदिवासींच्या विकासासाठी शासनाने कूळ कायदा, सावकारी नियंत्रण कायदा, कमाल जमीन धारणा कायदा, आदिवासी जमीन हस्तांतर बंदी कायदा, आदिवासी आर्थिक विकास कायदा असे अनेक कायदे केले आहेत. महाराष्ट्रात १९७६ साली आदिवासी विकास आयुक्तालय सुरु करण्यात आले. दि. २२ एप्रिल १९८३ रोजी स्वतंत्र आदिवासी विकास विभागाची स्थापना करण्यात आली आणि १९८४ पासून आदिवासी विकास विभाग स्वतंत्रपणे कार्यरत आहे.

आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे ही एक महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था असून या संस्थेची स्थापना सन १९६२ मध्ये केंद्र पुरस्कृत योजनेअंतर्गत करण्यात आली. आदिवासी विषयावरील विविध बाबींवर संशोधन करण्यासाठी देशातील काही आदिवासी बहुल राज्यात आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था कार्यरत आहेत. या संस्थेची उदिष्ट व कार्य पुढील प्रमाणे आहे – केंद्र व राज्य शासनामार्फत आदिवासी समाजाच्या आर्थिक, शैक्षणिक व सामाजिक विकासाकरिता राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचा आदिवासी जीवनावर झालेल्या परिणामांचे मूल्यमापन करणे ; आदिवासी जीवन व विकास यांचेशी संबधित विषयावर संशोधन करणे; आदिवासींच्या करिता विविध प्रशिक्षण सत्रांचे आयोजन करणे; आदिवसी कला व संस्कृती जतन करण्याकरिता आदिवासी सांस्कृतिक संग्रहालय चालविणे, हस्तकला प्रदर्शनाचे विविध शहरी भागात आयोजित करणे तसेच आदिवासी जीवनावर लघुपटाची निर्मिती करणे.

**२) आर्थिक विकास :**

आदिवासींच्या आर्थिक विकासासाठी भारतीय आदिवासी सहकारी विपणन विकास संघ मर्यादित (ट्रायमे ड) या संस्थेची स्थापना १९८७ साली करण्यात आली. या संस्थेच्या माध्यामातून आदिवासी उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध करून दिली जाते व त्यांना योग्य दर मिळवून दिला जातो. Tribes India या ब्रँड अंतर्गत विविध ठिकाणी विक्री केंद्रे चालवली जातात. आदिवासी कारागिरांना व लघु उद्योजकांना प्रशिक्षण दिले जाते. आधुनिक तंत्रज्ञान आणि डिजिटायझेशनच्या मदतीने त्यांचे उत्पादन व विक्री वाढवली जाते.

ट्रायफेडच्या उपक्रमांमुळे आदिवासी समाजाला आर्थिक स्वावलंबन मिळते, त्यांच्या हस्तकलेला राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर बाजारपेठ मिळते आणि पारंपरिक आदिवासी संस्कृतीला संरक्षण मिळते.

आदिवासी उपयोजनेच्या (Tribal Sub Plan) माध्यमातून विकास योजनेचा निधी आदिवासी भागाकडे वळविला जातो. आदिवासींमधील मनुष्यबळ विकसित करण्यासाठी आदिवासी संशोधन संस्थेची स्थापना करण्यात आली आहे. शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ ९ डिसेंबर १९९८ रोजी स्थापन करण्यात आले. या महामंडळातर्फे आदिवासींना कमी व्याजावर कर्ज उपलब्ध करून दिले जाते. स्वयंरोजगारासाठी शासनाकडून अनुदान व कर्जाची सोय उपलब्ध करून देण्यात आली आहे.

**३) दळणवळण आणि शैक्षणिक सुविधा :**

आदिवासींना जगाशी व प्रगत समाजाशी जोडण्यासाठी शासनाने मोठ्या प्रमाणावर विकास कामे हाती घेतली आहेत. कच्चे व पक्के रस्ते, पूल, टपाल सेवा, तार सेवा, रेल्वे सेवा, रेडिओ आणि दूरदर्शन केंद्रे इत्यादी सोयींच्या माध्यमातून आदिवासींना आधुनिक युगाशी जोडण्याचा प्रयत्न शासनाने केला. तसेच आदिवासींमधील अज्ञान दूर करण्यासाठी प्राथमिक शाळांची निर्मिती, आश्रमशाळांची निर्मिती केली. शासकीय व खासगी आश्रमशाळेत निःशुल्क शिक्षण, भोजन व निवास, पुस्तके, गणवेश उपलब्ध करून दिले जातात. आदिवासी विद्यार्थ्यांना विद्यावेतन, पोलीस दल भरतीपूर्व प्रशिक्षणाची सोय, शासकीय आश्रमशाळा समूह योजना, जिल्ह्याच्या ठिकाणी पब्लिक स्कूलच्या धर्तीवर निवासी इंग्रजी माध्यमाच्या शाळा, एकलव्य इंग्रजी माध्यमाच्या निवासी शाळा, वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती, आदिवासी सांस्कृतिक संग्रहालय, महाराष्ट्र राज्य जनजाती सल्लागार परिषद इत्यादी सुविधा शासनाने उपलब्ध करून दिल्या आहेत.

**४) आरोग्य सुधारण्यासाठी कार्य :**

बालरोग निदान सेवा, नवजात आणि बाल्यावस्थेतील आजारांचे एकात्मिक व्यवस्थापन, राजमाता जिजाऊ पोषण अभियान इत्यादी योजनांच्या माध्यमातून बालमृत्यू आणि मातामृत्युचे प्रमाण कमी करण्याचा प्रयत्न सुरू आहे. आदिवासी भागात ठिकठिकाणी प्राथमिक आरोग्य केंद्रे, फिरते दवाखाने, कुष्ठरोग निवारण केंद्रे, प्रसूतिगृहे, बालसंगोपन केंद्रे स्थापन करण्यात आली आहेत. कुपोषण नष्ट करण्यासाठी माता जननी योजना, सकस आहार पुरवठ्याच्या सोयी, मोफत आरोग्य शिबिरे, कुटुंबकल्याण कार्यक्रमाचा पुरस्कार इत्यादी कार्यक्रमांच्या माध्यमातून आदिवासींच्या विकासाला चालना देण्याचे कार्य सरकारी पातळीवरून सुरू आहे.

**५) सांस्कृतिक व सामाजिक सुधारणांचे कार्य :**

बोलीभाषा आणि संस्कृतीच्या रक्षणासाठी विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करणे, आदिवासी कलाकारांना प्रोत्साहन देणे, त्यांना निर्वाह वेतन देणे इत्यादींच्या माध्यमातून त्यांच्या संस्कृती व भाषेच्या संरक्षणासाठी शासकीय पातळीवर प्रयत्न केले जात आहेत. याशिवाय, आदिवासींना सामूहिक विवाह सोहळ्यासाठी अनुदान इत्यादी योजनांच्या माध्यमातून सरकार आदिवासींच्या सामाजिक विकासावर भर देत आहेत. अंधश्रद्धा निर्मूलनासाठी विविध उपक्रमांच्या माध्यामातून आदिवासींच्या सामाजिक विकासाला चालना देण्याचे कार्य शासन करत आहे.

**६) सामाजिक व स्वयंसेवी संस्था पातळीवरील प्रयत्न :**

आदिवासी समाजाच्या विकासासाठी सामाजिक पातळीवरदेखील व्यापक प्रयत्न झालेले आहेत. अहमदनगर येथील सत्यनिकेतन, डॉ. राणी बंग आणि डॉ. अभय बंग यांनी स्थापन केलेली सर्च (१९८६) या संस्था आरोग्य क्षेत्रात काम करतात. आदिवासी समाजातील अनिष्ट रूढी व परंपरा नष्ट करून त्यांच्यात स्वावलंबनाची वृत्ती निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे. बाबा आमटे, प्रकाश आमटे, मेधा पाटकर, शंकरराव ठकार, अनुताई वाघ, गोदाताई परूळेकर यांसारख्या समाज सेवकांनी आदिवासींना विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी आपले आयुष्य खर्ची घातले.

**स्वयं अध्ययन प्रश्न – ३ :**

**अ) खालील पैकी योग्य पर्याय निवडा.**

१. २०११ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रातील एकूण लोकसंख्येतील ..... टक्के प्रमाण हे आदिवासी समाजाचे आहे.

अ) १५% ब) ९.३५ %

क) १०% ड) ५%

२. महाराष्ट्रात अनुसूचित जमाती प्रवर्गात सध्या ..... जमातींचा समावेश आहे.

अ) ४७ ब) ५०

क) ४५ ड) ४०

३. आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेची स्थापना ..... मध्ये झाली.

अ) १९५० ब) १९६१

क) १९४७ ड) १९६२

४. डॉ. राणी बंग आणि अभय बंग यांनी १९८६ मध्ये ..... या संस्थेची स्थापना केली.

अ) सर्च ब) शोध

क) बोध ड) संवेदना

५) वारली जमत हि मुख्यत: ..... विभागात आढळून येते.

अ) सातपुडा ब) सह्याद्री

क) गोंडवन ड) कोकण

**४.३ सारांश :**

आधुनिक महाराष्ट्रात शेतकरी, धरणग्रस्त व आदिवासी अश्या समुदायांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागले आहे. या समस्यां राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक स्वरूपाच्या आहेत. शासन व सामाजिक संघटना आपापल्यापरीने या समस्यांचे निरसन करण्यासाठी प्रयत्न करत आहेत.

शेतकऱ्यांसमोर अनेक गंभीर आव्हाने आहेत, ज्यामध्ये अनियमित पाऊस, मातीची ऱ्हास, कर्जबाजारीपणा, बाजारपेठेचे अपुरे ज्ञान, धोरणातील अपयश, पर्यावरणीय ऱ्हास, आणि सामाजिक समस्या यांचा समावेश होतो. या आव्हानांमुळे शेतकऱ्यांच्या जीवनावर आणि राज्यातील एकूण कृषी क्षेत्रावर गंभीर परिणाम झाला आहे. या समस्यांना सामोरे जाण्यासाठी शासकीय व सामाजिक स्थरावर अनेक प्रयत्न झाले, परंतु समस्यांचे स्वरूप गंभीर असल्याने हे सर्व प्रयत्न अपेक्षित यश देऊ शकले नाहीत. त्यामुळेच आव्हानांच्या जटिलतेचे आकलन करून ग्रामीण विकास आणि कृषी धोरणावर एक समग्र दृष्टिकोन विकसित करण्यासाठी प्रयत्न होणे आवश्यक आहे. शेतकरी वर्गानेसुधा आपला परंपरागत दृष्टीकोन बदलून, नवनवीन उपक्रम व प्रयोग अंगिकारले पाहिजे व एकमेकांना सहकार्याची भावना जोपासली पाहिजे.

महाराष्ट्रातील धरणग्रस्त समुदायांचे प्रश्न केवळ विस्थापनापुरते मर्यादित नाहीत, तर ते सामाजिक, आर्थिक आणि मानसिक आरोग्याशी संबंधित आहेत. पुनर्वसनासाठी प्रभावी उपाययोजना राबवून या समुदायांचे जीवनमान उंचावण्याचा प्रयत्न करणे आवश्यक आहे. शासकीय योजनांचा फायदा धरणग्रस्तांना मिळत नसल्यामुळे या समुदायात मोठ्याप्रमाणात अस्वस्थता निर्माण झालेली आहे. विस्थापन होऊन वर्षोनुवर्षे पालटली तरी योग्य पुनर्वसन होत नसल्याने या समाजाच्या मानव हक्कांचे उल्लंघन होत आहे.

महाराष्ट्रातील आदिवासी समाज देशातील इतर राज्यांप्रमाणेच उपेक्षित राहिला आहे. जमीन हक्क, विस्थापन, आर्थिक असमानता, शिक्षणाचा अभाव, आरोग्य सेवांचा अभाव आणि सांस्कृतिक ओळखीचे संकट यासारख्या समस्यांमुळे आदिवासींचे जीवन अत्यंत कठीण आहे. या समस्यांचे निराकरण करण्यासाठी अधिक प्रभावी सरकारी धोरणे आणि अधिक जागृत सामाजिक संघटना याची आवश्यकता आहे.

समाजातील सर्वच घटकांचा सर्वसमावेशक व शाश्वत विकास होणे गरजेचे आहे. शहरी भागावर केंद्रितएकांगी विकास हा उपेक्षित समाजघटकांमध्ये असंतोष निर्माण करतो व संपूर्ण समाजामध्ये दुही निर्माण होते. राष्ट्रीय संसाधनांचे न्यायपूर्ण वाटप होऊन तळागाळातील घटकांचे कल्याण होणे आवश्यक आहे.

### ४.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ :

**१. अल्पभूधारक :** असे शेतकरी ज्यांच्याकडे फार छोटी शेत जमीन आहे. अश्या छोट्या शेतजमिनीच्या तुकड्यावर शेती करणे परवडणारे नसते.

**२. आर्थिक उदारीकरण :** आर्थिक विकासात अडसर ठरणारी अनावश्यक नियंत्रणे व नियमांपासून अर्थव्यस्थेला मुक्त करणे.

**३. शीतगृहे :** नाशवंत शेतमाल जास्त काळ टिकवा यासाठी थंड वातावर राखलेले कोठार.

**४. फूड प्रोसेसिंग :** नाशवंत शेतमाल प्रक्रिया करून मूल्यवर्धित स्वरुपात बाजारात आणणे.

**५. शासकीय अनुदान :** विवध प्रयोजनासाठी शासनातर्फे देण्यात येणारी आर्थिक मदत.

**६. डिजिटायझेश :** माहिती छापील किंवा हस्तलिखित स्वरुपात न ठेवता संगणकीय स्वरुपात जतन करणे.

### ४.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे :

**स्वयं अध्ययन प्रश्न – १ :**

१. क. भात　　२. अ. २६ जानेवारी १९६२　　३. क. १९७६

४. ब. १९६५　　५. अ. १९८१

**स्वयं अध्ययन प्रश्न – २ :**

१. अ.१९६७　　२. क. ७ डिसेंबर १९६०　　३. ब. सेनापती बापट

४. ब. आर्थिक　　५. क. १९९९

**स्वयं अध्ययन प्रश्न – ३ :**

१. ब. ९.३५ %　　२. क. ४५　　३. ड. १९६२

४. अ. सर्च　　५. ब. सह्याद्री

### ४.६ सरावासाठी स्वाध्याय :

**अ) टीपा लिहा.**

१. महाराष्ट्रातील कृषी व्यवस्था

२. महाराष्ट्रातील प्रमुख पिके

३. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांसमोरील समस्या

४. महाराष्ट्रातील मुख्य धरणे व तेथील विस्थापन

५. धरणग्रस्तांसमोरील आर्थिक अडचणी

६. विस्थापन आणि पुनर्वसन

७. ट्रायफेड

८. आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था

९. सामाजिक व स्वयंसेवी संस्थाचे आदिवासींसाठी कार्य

**ब) खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.**

१. महाराष्ट्रातील कृषी व्यवस्थेची वैशिष्ट्ये थोडक्यात सांगा.

२. पर्यावरणीय ऱ्हास व हवामान बदल यांचा शेतीवरील परिणाम विशद करा.

३. शेतकऱ्यांसमोरील सामाजिक समस्या स्पष्ट करा

४. धरणग्रस्त समुदायाच्या सामाजिक आणि सांस्कृतिक प्रश्नांचा थोडक्यात आढावा घ्या.

५. महाराष्ट्रातील प्रमुख धरणे व त्यामुळे झालेले विस्थापन यांचे थोडक्यात मूल्यमापन करा.

६. धरणग्रस्त समुदायाचा मानव विकास निर्देशांक थोडक्यात स्पष्ट करा.

७. आदिवासी समाजाच्या आरोग्यविषयक समस्यांबद्दल माहिती द्या

८. आदिवासींच्या मागासलेपणाची कारणे सांगा

९. आदिवासींच्या कल्याणासाठीच्या कायदेशीर तरतुदी सांगा.

**क) खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांसमोर असणाऱ्या मुख्य समस्या स्पष्ट करा.

२. शेतकऱ्यांच्या समस्या सोडवण्यासाठी करण्यात आलेल्या उपाययोजनांचे मूल्यमापन करा.

३. धरणग्रस्त समुदायासमोरील अडचणी व आव्हाने यांचे विस्तृत मूल्यमापन करा.

४. धरणग्रस्त समुदायाला त्यांचे हक्क मिळवून देण्यासाठीचे प्रयत्न स्पष्ट करा.

५. आदिवासी समाजाला भेडसावणाऱ्या समस्या यांचे विस्तृत मूल्यमापन करा.

६. आदिवासींच्या समस्या सोडविण्यासाठी शासनाने कोणकोणत्या उपाययोजना केल्या आहेत याबद्दल विस्तृत माहिती द्या.

## ४.७ अधिक वाचनासाठी पुस्तके :


१. Ahuja Ram, Social Problems in India, Rawat Publication, Jaipur, 2021.

२. Gupta, Namita, Human Rights Discourse on Dams, Displacement andResettlement, Cambridge Scholars Publishing, 2023

३. Maharashtra State Gazetteers - Various Districts

४. Patil Rajendra B., S. -. Salunkhe, Dams, Displacement and Rehabilitation, - Case of Western Maharashtra, NavVishnu Publications, 2015

५. Vora, Rajendra, The world's first -nti-Dam Movement: The Mulshi Satyagraha, 1920-1924, Ranikhet, 2009.

६. कुलकर्णी शौनक, महराष्ट्रातील आदिवासी, डायमंड प्रकाशन, पुणे, २०११.

७. दास्ताने संतोष, राजेंद्र व्होरा, महाराष्ट्र १९८९, दास्ताने रामचंद्र कं., पुणे

८. पाटील महेंद्र, महाराष्ट्रातील सामाजिक – राजकीय चळवळी आणि महाराष्ट्र प्रशासन, डायमंड प्रकाशन, पुणे, २०२०.

९. मेधा कुलकर्णी (संपा.), पन्नाशी सामाजिक महाराष्ट्राची, अक्षर प्रकाशन, २०१२

❖❖❖